# सातारा शहराचा इतिहास
# (१८०८ ते १९४७)

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
इतिहास विभाग

तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध

संशोधक
श्री. दत्तात्रय जयसिंग ओवाळे

मार्गदर्शक
प्राचार्य डॉ. अंकुश लक्ष्मण बेलवटकर

एप्रिल २०१५

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी श्री. दत्तात्रय जयसिंग ओवाळे यांनी **“सातारा शहराचा इतिहास” (१८०८ ते १९४७)”** या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोध प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु.जी.सी.) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरून सदर शोधप्रबंधाचे काम केलेले आहे.

स्थळ : सातारा                                        मार्गदर्शक

दिनांक :

(प्राचार्य, डॉ.ए. एल. बेलवटकर)

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, **"सातारा शहराचा इतिहास (१८०८ ते १९४७)"** हा शोधप्रबंध मी प्रा. डॉ. ए. एल. बेलवटकर यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. पदवीसाठी हा शोधप्रबंध सादर केला आहे. हा शोधप्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : सातारा

संशोधक

दिनांक :

(श्री. दत्तात्रय जयसिंग ओवाळे)

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास विभागात विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीसाठी हा शोध प्रबंध सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. या माझ्या कार्याला अनेकांचे मोलाचे मार्गदर्शन, प्रेरणा आणि प्रत्यक्षात सहकार्य मिळालेले आहे. त्याच्याबद्दल कृतज्ञताभाव व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

“सातारा शहराचा इतिहास(इ.स.१८०८ ते १९४७)” या विषयावर संशोधन काम पूर्ण करण्यासाठी माझे मार्गदर्शक मा.प्राचार्य, डॉ.अंकुश बेलवटकर यांनी मला मार्गदर्शन केले. त्यांनी मला माझे विचार स्वतंत्रपणे मांडू दिले, पण लेखन प्रभावी होण्यासाठी तसेच त्यात सुत्रबद्धता आणण्यासाठी योग्य त्या ठिकाणी अनमोल अशा सूचना केल्या. त्यांच्या मार्गदर्शनामुळे मी माझे काम पूर्ण करू शकालो. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. तसेच मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे. तसेच संशोधन करण्याची मूळ प्रेरणा डॉ.एस.पी.शिंदे व माजी प्राचार्य डॉ.मधुकर जाधव यांनी दिली आहे. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था, देऊर संस्थापक मा.प्रा.संभाजीराव कदम, अध्यक्ष श्री. पुरूषोत्तम माने, चेअरमन मा.ॲड.संजीव कदम, सचिव मा.श्री. भिमराव कदम, विश्वस्त श्री. सर्जेराव कदम, श्री. किसनराव कदम, श्री.दत्तात्रय शिंदे, श्री. हणमंतराव कदम(काका), प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालयाचे स्था. व्य. समिती अध्यक्ष मा.श्री धनसिंग कदम(भाऊ) यांची प्रेरणा व मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले. त्या सर्वाचे मनःपूर्वक आभार मानतो. तसेच प्रा.डॉ.नलिनी वाघमारे, इतिहास विभाग प्रमुख, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे व प्रा.डॉ विनायक जाधव, प्रा.डॉ.सदाशिव गावडे, प्रा.डॉ.अनिल टिके, प्रा. डॉ. संजय दीक्षित, प्रा.डॉ.दत्तात्रय कोरडे या सर्वानी मला मदत केल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. त्यांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

माझ्या संशोधन कार्याला सतत प्रेरणा व मदत करणारे माझ्या महाविद्यालयाचे मा. प्राचार्य, डॉ. डी. के. पाटील यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. तसेच माझ्या महाविद्यालयातील माझे सर्व सहकारी प्राध्यापक वृंद आणि महाविद्यालयातील सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी संशोधनासाठी मला वेळोवळी सहाय्य केले, त्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

माझ्या संशोधन कार्यासाठी इतर अनेकांचे सहकार्य लाभले. त्यामध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर ग्रंथालय, प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालय देऊरचे ग्रंथालय, छ.शिवाजी कॉलेज ग्रंथालय, डी.पी.भोसले कॉलेज कोरेगावचे ग्रंथालय, मुधोजी महाविद्यालय, फलटणचे ग्रंथालय, छ.प्रतापसिंह महाराज नगरवाचनालय, सातारा, लोकमान्य टिळक ग्रंथसंग्रहालय वाई, विश्वकोश व धर्मकोश कार्यालय वाई, सातारा जिल्हा परिषद सांख्यिकी विभाग, सातारा, सातारा नगरपालिका सातारा, सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे ग्रंथालय, तसेच मुंबई पुराभिलेखागार मुंबई, पेशवे दप्तर पुणे, पुणे अभिलेखागार पुणे या ठिकाणी मला जी माहिती उपलब्ध झाली, याबद्दल मी ग्रंथालयाचे आभार मानतो.

माझ्या संशोधन कार्यात माझ्या कुटुंबाचे फार मोठे योगदान आहे. माझी आई व वडील यांचे आशीर्वाद आणि माझी पत्नी सौ.लता ओवाळे हिची प्रेरणा, प्रोत्साहन, माझी कन्या कु.संपदा ओवाळे व चिरजिंव श्रीपाद ओवाळे यांनीही मला खूप मदत केली आहे. या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

शोधप्रबंधाचे सुबक व आकर्षक टायपिंग करून देण्याचे काम समृद्धी टायपरायटींगचे प्रोप्रा. सौ.वैशाली कोरडे (वहिनी) यांचेही मी मनापासून आभार मानतो आणि धन्यवाद देतो.

अभ्यासक
श्री.दत्तात्रय जयसिंग ओवाळे

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्रं |
|---|---|---|
| ● | प्रमाणपत्र | I |
| ● | प्रतिज्ञापत्र | II |
| ● | प्रमाणपत्र | III |
| ● | ऋणनिर्देश | IV-V |
| १. | सातारा शहराची पार्श्वभूमी | १ ते ४५ |
| | प्रबंधाचे शिर्षक, संशोधन विषयाची निवड, संशोधनाची | |
| | आवश्यकता, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाची मर्यादा, | |
| | संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, सिद्धांत कल्पना, | |
| | संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन, संशोधन पद्धती, | |
| | संदर्भ साधने, प्रकरण नियोजन | |
| | सातारा शहराची पार्श्वभूमी, सातारा नावाची उत्पत्ती, | |
| | सातारा शहराची भौगोलिक परिस्थिती, सातारा शहराचे वर्णन, | |
| | प्राचीन काळातील सातारा शहर–छत्रपती शाहूच्या काळातील सातारा शहर छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या काळातील सातारा शहराचा विस्तार, ब्रिटिश काळातील सातारा शहराचा विस्तार | |
| २. | सातारा शहराचा राजकीय इतिहास | ४६ ते १३१ |
| ३. | सातारा शहराचा सामाजिक इतिहास | १३२ ते १८७ |
| ४. | सातारा शहराचा आर्थिक इतिहास | १८८ ते २३६ |
| ५. | सातारा शहराचा सांस्कृतिक इतिहास | २३७ ते २८७ |
| ६. | उपसंहार | २८८ ते ३११ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | ३१२ ते ३२३ |
| | परिशिष्टे | ३२४ ते ३३० |
| | नकाशे | ३३१ ते ३३५ |
| | छायाचित्रे | ३३६ ते ३४५ |

# प्रकरण पहिले
# सातारा शहराची पार्श्वभूमी

## १.१ प्रास्ताविक

प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक महाराष्ट्राच्या पर्यायाने देशाच्या विकासात अनेक शहरांचा मोठा वाटा आहे. सातारा शहर हे त्यापैकी एक आहे. सातारा शहराला प्राचीन काळापासून ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. याची साक्ष सातारा शहर व परिसरातील अनेक ऐतिहासिक स्थळे देत आहेत. सातारा शहर व जिल्हयाच्या ऐतिहासिक वारसा सांगणाऱ्या खाणाखुणा आजही येथील परिसरात सुस्पष्ट आहेत. इ.स.पू.पहिले शतक ते इ.स.चौथे शतक या काळात येथे सातवाहन राजांचा अंमल होता. इ.स.च्या १३ व्या शतकामध्ये साताऱ्यावर चालुक्य व राष्ट्रकूट राजांचा अंमल होता. शिलाहार घराण्यातील राजा दुसरा भोज याने १५ किल्ले बांधले होते. त्यामध्ये सातारा किल्ल्याचा समावेश होतो. हा किल्ला सन ११९० च्या सुमारास बांधला गेला आहे.

पुढे यादव, खिलजी व तुघलक घराण्यांनी याठिकाणी राज्य केले. बहामनी सत्ता दुभंगल्यानंतर हा किल्ला विजापूरच्या आदिलशहाच्या ताब्यात गेला. या किल्ल्याला 'हुकेबहन' असे नाव दिले होते. शिवकाळात सातारा किल्ल्याचे महत्त्व वाढले. १७व्या शतकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेले हे शहर आहे. सातारा शहर अजिंक्यतारा, पांडवगड, वैराटगड, चंदनगड, वंदनगड़, वसंतगड आणि कल्याणगड उर्फ नांदगिरी या सात किल्ल्यांच्या सुरक्षित तटबंदीमध्ये वसलेले शहर आहे. औरंगजेब बादशहाने इ.स. १६८९ मध्ये मराठयांची राजधानी रायगड जिंकली. तेंव्हापासून छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई आणि नंतर छत्रपती शाहू महाराजांच्या काळात सातारा शहर मराठयांची राजधानी म्हणून प्रसिद्धीस आले. पुढे पेशवे मराठयांचा कारभार पुणे येथून पाहत असले, तरी ते सातारच्या छत्रपतींच्या अधिपत्याखाली होते.

इ.स. १६७३ मध्ये शिवाजी महाराजांनी परळीचा किल्ला जिंकल्यानंतर साताऱ्यास वेढा दिला. ३ महिन्याच्या वेढयानंतर किल्ला महाराजांच्या ताब्यात आला. इ.स.१६९९ मध्ये मोगल बादशहा औरंगजेबाने या किल्ल्यास वेढा दिला. इ.स. १७०० मध्ये बादशहाने किल्ला जिंकून

घेतला व त्याचे नाव 'आझमतारा' असे ठेवले. इ.स.१७०३ साली सातारचा किल्ला पुन्हा मराठयांच्याकडे आला.

आद्य इतिहास लेखनात ग्रीकांनी मुख्यत्वे राजकीय घटना, लढाया, तह करार, युद्धे यावर भर दिला. पुढे काळाच्या ओघात इतिहास लेखनाच्या परिभाषा बदलत गेल्या. आठरावे शतक हे विद्येच्या पुनरूज्जीवनाचे, बुद्धीवाद्यांचे(Renaissance) ठरले. १९ व्या शतकात अनेक सामाजिक क्रांतीकारी बदल झाल्यामुळे इतिहास लेखनातही अनेक मूलगामी बदल घडून आले. सामान्य मानवी जीवनाचा अधिकाधिक व्यापक दृष्टीने विचर होऊ लागला. मानवी जीवनाच्या जडणघडणीत समाजाचा वाटा अधोरेखित होऊ लागला. विशेषतः इ.स.१७८९ च्या फ्रेंच राज्य क्रांतीनंतर इतिहासात सामान्य माणसाचा व त्याच्या कार्याचा प्रकर्षाने विचार होऊ लागला.

२० व्या शतकात प्रादेशिक इतिहास लेखनास महत्त्व प्राप्त झाले. एखाद्या विशिष्ट प्रदेशाचा, अभ्यासाचा मुख्य हेतू त्या प्रदेशाची सखोल व सर्वांगीण माहिती करून घेणे हा असतो. त्यातूनच स्थानिक इतिहास पुढे आला. आज स्थानिक इतिहासाला महत्त्व प्राप्त झाले असून त्यात तेथील राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, स्थित्यांतराचा अभ्यास होऊ लागला आहे.

इ.स.१७०७ साली औरंगजेब मरण पावल्यावर शाहू महाराजांची त्याच्या छावणीतून सुटका झाली व ते साताऱ्यात आले. १२ जानेवारी १७०८ रोजी छत्रपती शाहू महाराजांचा सातारा किल्ल्यात राज्याभिषेक झाला आणि ते मराठी सत्तेचे छत्रपती झाले. येथून पुढे इ.स. १८४८ पर्यत साताराच मराठयांची अधिकृत राजधानी होती. इ.स.१७०८ ते इ.स.१७४९ या थोरले शाहू महाराजांच्या काळातील मराठयांच्या इतिहासातील महत्त्वाच्या घटनेशी साताऱ्याचा निकटचा संबंध आहे. इ.स. १८१८ मध्ये इंग्रजांनी सातारा पेशव्याकडून जिंकून घेतला होता. पुढे प्रतापसिंह महाराजांच्या अधिपत्याखाली सातारा शहर हे राजधानीचे शहर म्हणून नावारूपास आले. छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा इंग्रज सहाय्यक व ब्रिटिश रेसिडेंट जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ याने 'मराठयांचा इतिहास' याच शहरात लिहिला.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सातारा शहराने महत्त्वपुर्ण भूमिका बजावली होती. असहकार आंदोलनात नारायण नरहर अष्टपुत्रे, वा.वि.आठल्ये, नारायण कृष्ण आगाशे, रघुनाथ

पांडुरंग करंदीकर, आचार्य कालेलकर, काळे रावजी रामचंद्र, नारायण केळकर, उमरभाई बाळभाई खाटिक, गोविंदानंद स्वामी, पंढरीनाथ वामन घाणेकर, घाणेकर निळकंठ वामन, गणेश वासुदेव चिरमुले, जोशी माई गोपाळ, महादेव दत्तात्रय ढगे, वाग्भट नारायण देशपांडे, परचुरे शास्त्री, दत्तात्रय रामचंद्र पराजंपे, महादेव नारायण पारसनीस, नबी मोहमंद बागवान, मुकुंद चिंतामण बापट, शंकर भालचंद्र बापट, केशवराव मारूतराव बुधकर, विष्णू बळवंत भिडे, दादामिया अंबूलाल महात, विष्णू नायक मुतालिक, गणपतराव हरी साठे, विठ्ठल वामन हडप, भाऊसाहेब सोमण, इस्माईल नूरमहमंद हकीम, गणपतराव साठे व दादासाहेब करंदीकर इत्यादी कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता. सविनय कायदेभंग चळवळीत माई गोपाळ जोशी, वा.वि.आठल्ये, लक्ष्मण रामचंद्र जोशी, विठ्ठल रामचंद्र दुधे, दत्तात्रय रामचंद्र परांजपे, राजाराम केशव पालकर, विठ्ठल वासुदेव फडके, केशवराव मारूतीराव बुधकर, चंपावती मोडक, महादेव कृष्णजी लेले, पिलू बुवा वडूजकर, अनंत वासुदेव सहस्त्रबुद्धे, शंकर विनायक सोवनी, गोविंद बापूजी श्रोती इत्यादीनी सहभाग घेतला होता.

क्रांतिसिंह नाना पाटील, किसन वीर, यशवंतराव चव्हाण व नागनाथ नायकवडी वगैरे देशभक्तांनी साताऱ्यात 'प्रतिसरकारची स्थापना' केली होती. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून त्याचे मुख्य कार्यालय सातारा शहरात आणले. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत 'क्रांतिकारकांचा जिल्हा' म्हणून सातारा शहराची प्रसिद्धी भारतभर होती. यास्तव सातारा शहराचा इतिहास अभ्यासणे आवश्यक आहे.

## १.२ प्रबंधाचे शिर्षक

**सातारा शहराचा इतिहास (इ.स.१८०८ ते १९४७)**

## १.३ संशोधन विषयाची निवड

इतिहास लेखनामध्ये महाराष्ट्रातील अनेक शहरावर संशोधन झाले आहे. त्यामुळे त्या शहरांचा इतिहास उजेडात येण्यास मदत झालेली आहे. या शहरांनी महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक इतिहासात महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. त्यामध्ये सातारा शहरानेही सहभाग घेवून आपले महत्त्वाचे योगदान दिले आहे. सातारा शहरास प्राचीन काळापासून राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक इतिहास आहे. सातारा शहरात मध्ययुगीन काळापासून फार मोठया प्रमाणावर स्थित्यंतरे झालेली दिसून

येतात. मराठा काळात सातारा शहराचे महत्त्व वाढले होते. एवढेच नव्हे तर छत्रपती शाहू महाराजांनी आपले राजधानीचे ठिकाण सातारा शहर निवडले होते. ज्या पेशव्यानी पुणे येथे आपल्या राजकीय हालचाली केल्या त्याचे मुख्य केंद्र सातारा शहर हे होते.

आधुनिक कालखंडात सातारा शहरात ज्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक बदल झाले, ते महत्त्वपूर्ण आहेत. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत या शहराने मोलाची कामगिरी पार पाडली होती. याशिवाय या काळात महाराष्ट्रामध्ये ज्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक सुधारणा राबविल्या गेल्या होत्या, त्यातही सातारा शहराने सहभाग घेतला आहे. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात ज्या राजकीय व सामाजिक घडामोडी घडल्या त्याचेही पडसाद सातारा शहरावर पडल्याचे दिसतात. तेव्हा सातारा शहराचा समग्र इतिहास संशोधनातून पुढे यावा, यासाठी सातारा शहराचा इतिहास (इ.स.१८०८ ते १९४७) हा संशोधनासाठी विषय निवडलेला आहे. सदर अभ्यासाची व्याप्ती ही सातारा शहरापुरती मर्यादित आहे. तथापी सातारा जिल्हा स्वातंत्र्य चळवळीचे महत्त्वाचे केंद्र असल्याने १९४७ पूर्विच्या सातारा जिल्हयातील महत्त्वाच्या ठिकाणांचा आनुशांगिक संदर्भाचा अभ्यास केला जाणार आहे.

या विषयावर संशोधन झाले नाही, म्हणून प्रस्तुत संशोधन विषयाची निवड केली आहे. या संशोधनामुळे सातारा शहराच्या इ.स.१८०८ ते १९४७ या कालखंडातील इतिहासावर अभ्यास करणे शक्य होईल. सातारा शहरास राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक महत्त्वाचे स्थान आहे. अशा प्रकारे सातारा शहराच्या इ.स.१८०८ ते १९४७ काळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक इतिहासाची समाजाला ओळख व्हावी, म्हणून हा विषय निवडला आहे.

## १.४ संशोधनाची आवश्यकताः

१. सातारा शहराचा प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंतचा राजकीय इतिहास उजेडात आणणे.

२. सातारा शहराने स्वातंत्र्य चळवळीत दिलेल्या योगदानाची माहिती जाणणे.

३. सातारा शहरातील ऐतिहासिक स्थळांची माहिती जाणून घेणे.

४. सातारा शहराचा सांस्कृतिक इतिहास जाणून घेणे.

५. ऐतिहासिक स्थळांचे जतन करण्यासाठी युवा पिढीला प्रोत्साहन देणे.

## १.५ संशोधन विषयाची व्याप्ती

सातारा शहराचा इतिहास पाहत असताना, सातारा शहर व त्याच्या आसपासच्या परिसराचा इतिहास पाहणार आहे. प्राचीन काळात सातारा शहर अस्तित्त्वात नव्हते तर त्याची निर्मिती मध्ययुगीन काळात झालेली आहे. तेव्हा प्राचीन काळात या ठिकाणी करंजे नावाचे गाव असून त्याच्या सभोवती घनदाट जंगल व डोंगर दऱ्या होत्या. तेव्हा प्राचीन काळातील सातारा शहराचा अभ्यास करीत असताना या भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करावा लागणार आहे. याच काळातील काही पुरावशेष सातारा शहराच्या आसपास सापडले आहेत. तेव्हा प्राचीन इतिहास पाहताना त्या पुरावशेषाची माहिती घ्यावी लागणार आहे.

सातारा शहराचा राजकीय संबधातून महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, कोल्हापूर, कराड व सांगली इत्यादी ठिकाणी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेणाऱ्या क्रांतिकारकांचा संबंध आलेला होता. त्यामुळे त्या ठिकाणी त्यांनी केलेले कार्य पाहत असताना आपणास त्या ठिकाणांचीही माहिती पाहावी लागणार आहे. सामाजिक इतिहास पाहत असताना सातारा शहरातील सामाजिक संस्थांचा अभ्यास करणार आहोत. परंतु त्या सामाजिक संस्थांनी निर्माण केलेले समाज व धर्मसुधारक यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर फिरून समाज जागृतीचे कार्य केले. त्यांनी कशा प्रकारे कार्य केले. त्याच बरोबर लोकांच्या मनावर त्याचा कसा प्रभाव पडला हे पाहण्यासाठी समाज–सुधारकांनी ज्या ठिकाणी भेटी दिल्या. त्या स्थळांची माहिती घ्यावी लागेल.

सातारा शहरावर स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीशांचे वर्चस्व होते. तेंव्हा सातारा शहर हे एक संस्थान होते. त्यामुळे ब्रिटीशांशी संघर्ष घडून येत असताना मुंबई, पुणे व सातारा या शहरांशी संबंध आलेला होता. सातारा शहरातील मंदिरे व मूर्ती यांचे महत्त्व पाहत असताना त्यांचा प्रभाव महाराष्ट्रातील लोकांवर पडलेला होता. तेंव्हा त्या लोकांच्या दृष्टिकोनातून सातारा शहराविषयीची माहिती घेण्यास मदत होणार आहे.

अशाप्रकारे सातारा शहराचा अभ्यास करीत असताना, सातारा शहराच्या आसपासची खेडी, कराड, कोल्हापूर, मुंबई, पुणे इत्यादी ठिकाणांचा समावेश करावा लागणार आहे. यातूनच याविषयीची व्याप्ती दिसून येते.

## १.६ संशोधन विषयाची मर्यादा

सातारा शहराचा इतिहास पाहत असताना सातारा शहरातील स्वातंत्र्यपूर्व काळातील परिस्थितीचा व तेथील राजकीय संस्थांनी केलेल्या कार्याची माहिती घ्यावी लागेल. यामध्ये सातारा शहरावर प्राचीन व मध्ययुगीन काळात झालेली राजकीय स्थित्यंतरे, आधुनिक काळातील स्वातंत्र्य चळवळीतील हिंदुस्थानी सेवा दल, असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, चले जाव आंदोलन इत्यादी राष्ट्रीय चळवळीच्या उपक्रमात सातारा शहरातील जनतेने सहभाग घेतला होता. तरीही आपणास या संशोधनामध्ये सातारा शहरात याविषयी घडलेल्या परिस्थितीची माहिती घेतली आहे. क्रांतिकारकांनी स्वातंत्र्य चळवळीत दिलेले योगदान याचीही माहिती दिलेली आहे.

सातारा शहरातील सामाजिक संस्थांनी समाजात सुधारणा करण्याचा प्रयत्न सुरू केला होता. तेव्हा या संस्थांची माहिती या संशोधनातून घेतली आहे. सातारा शहरातील रूढी, परंपरा, चालीरीती, जातियता व वर्गीयता इत्यादीची माहिती संशोधनातून दिलेली आहे. अस्पृश्यता निवारण, अंधश्रध्दा, प्रतिगामी व सनातनी धार्मिक आचारविचार याविरूध्द समाज व धर्मसुधारकांनी केलेल्या कार्याची माहिती घेतलेली आहे.

सातारा शहराचा सांस्कृतिक दृष्टीने तेथील लोकांचा आहार, विहार, पोशाख याबरोबर शैक्षणिक कार्य, धार्मिक कार्य व पर्यटन स्थळे यांचा अभ्यास, तसेच सातारा शहरातील मंदिर स्थापत्य यामध्ये पंचमुखी मंदिर, नटराज मंदिर, यवतेश्वर मंदिर व इतर मंदिरांची माहिती घेतलेली आहे. अदालतवाडा, जुना राजवाडा, नवा राजवाडा, चारभिंती, कमानी हौद इ. सातारा शहरातील ऐतिहासिक वाडे व स्थळे इत्यादी माहिती दिलेली आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासात स्वातंत्र्यपूर्वकाळ व स्वातंत्र्योत्तर काळात जी महत्त्वपूर्ण शहरे होती. त्यापैकी सातारा हे एक शहर होय. या शहराने राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक बाबतीत आपले लक्ष केंद्रित करून आपली प्रगती केली, म्हणून सातारा शहराच्या इतिहासावर संशोधनदृष्टी केंद्रीत केलेली आहे.सातारा शहराचा इतिहास (इ.स.१९०८ ते १९४७) या विषयावर संशोधन करीत असताना सातारा शहराचा संबंध महाराष्ट्रातील किंवा महाराष्ट्राबाहेरील ठिकाणाशी येत असला, तरी या संशोधनाचा भर हा प्रामुख्याने सातारा शहरावर देण्यात आला आहे. या संशोधनाची ही मर्यादा आहे.

## १.७ संशोधनाची उद्दिष्टे

संशोधकाने नियोजित संशोधनासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित केलली आहेत.

१. सातारा शहराची पार्श्वभूमी अभ्यासण्यासाठी सातारा जिल्हयाचा पुर्वेतिहास पाहणे.

२. सातारा शहराने स्वातंत्र्य चळवळीत दिलेले योगदान अभ्यासणे.

३. सातारा शहराच्या विकासातील राजकीय व सामाजिक संस्थाचे कार्य अभ्यासणे.

४. सातारा शहरातील धार्मिक, ऐतिहासिक व पर्यटन स्थळे यांचे महत्त्व पहाणे.

५. सातारा शहरातील विविध शैक्षणिक केंद्रे, संस्था व शाखा यांचा अभ्यास करणे.

६. सातारा शहराचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक उत्कर्ष कसा होत गेला हे अभ्यासणे.

## १.८ संशोधनाची गृहितके :

संशोधन कार्य यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी संशोधनामध्ये विधान मांडावे लागते. या विधानाच्या आधारे संशोधनाचे अनुमान काढता येईल. या संपूर्ण संशोधनामध्ये खालीलप्रमाणे काही गृहितके मांडण्यात आलेली आहेत.

१. महाराष्ट्रातील अनेक शहराप्रमाणे सातारा शहरास ही ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे.

२. सातारा शहराचा मध्ययुगीन काळापासून विकास झालेला आहे. मध्ययुगीन काळात सातारा शहरावर यादव, खिलजी, तुघलक, बहमनीशाही, निजामशाही, आदिलशाही पुढे मराठे, मोगल व पुन्हा मराठे यांची सत्ता होती.

३. साताऱ्याच्या छत्रपतींनी महाराष्ट्रातील राजकारणाबरोबर भारतातील राजकारणात अप्रत्यक्षपणे सहभाग घेतल्याने ब्रिटीशांनी त्यांना विरोध करून त्यांच्यावर अन्याय व अत्याचार केले होते.

४. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महाराष्ट्रातील विविध शहरातील क्रांतिकारकानी स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभाग घेतला होता. त्यामध्ये सातारा शहरातील क्रांतिकारकांचा ही अंतर्भाव होता. भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केली होती.

५. साताऱ्यातील क्रांतिसिंह नाना पाटील यांनी स्थापन केलेल्या प्रतिसरकारने भारतीय स्वातंत्र्य चळवळीत मोलाचे कार्य केले आहे.

## १.९ सिद्धांत कल्पना

१. मध्ययुगीन काळात सातारा शहर हे राजकीय व लष्करीदृष्टया महत्त्वाचे ठिकाण होते.

२. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सातारा शहरातील क्रांतिकारकांना साताऱ्यातील सामान्य

जनतेने सहकार्य केल्याने ती चळवळ यशस्वी झाली होती.

३. स्वातंत्र्योत्तर काळात सातारा शहरावर प्रारंभी शेतकरी कामगार पक्षाचे व नंतर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व होते.

४. सातारा शहरातील ऐतिहासिक वाडे, मंदिरे, मूर्ती आणि भित्तिचित्रकला कलात्मक व सांस्कृतिक दृष्टया वैशिष्टयपूर्ण आहेत.

५. सातारा शहराचा राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक इतिहास आजच्या समाजाला मार्गदर्शक, प्रेरक व प्रोत्साहन देणारा आहे.

## १.१० संदर्भ साहित्यांचे पुनर्विलोकन (Review of Litarature)

सातारा शहराविषयी माहिती विविध संदर्भ ग्रंथातून उपलब्ध आहे. त्यापैकी सर्वात जुनी व पौराणिक माहिती देव शां.भा. यांच्या 'महाराष्ट्र एक पुरातत्त्वीय समालोचन', या ग्रंथातून मिळते. पुढील काळाविषयीची माहिती बहमनी काळातील तवारिखामधून मिळते. मध्ययुगीन मराठा अमंलाविषयी प्रामुख्याने ग्रँट डफच्या 'हिस्टरी ऑफ द मऱ्हाठाज'(सन १८२६) या ग्रंथातून आणि शिवचरित्र साहित्याच्या विविध खंडामधून आढळते. शिवाय मराठी बखर वाङमयातून सातारा शहरासंबधीचे उल्लेख येतात. डॉ. म. श्री. माटे यांनी 'मराठा आर्किटेक्चर'(१९५९) या प्रबंधात्मक ग्रंथात मराठयांच्या वास्तूशैलीची तपशीलवार चर्चा केली आहे; मात्र त्यांनी सातारा शहरातील मंदिरांचा अगदी थोडाच उल्लेख केला आहे.

डॉ.अरूण भोसले यांनी पीएच.डी.साठी सातारा जिल्हयातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास(१८८५–१९४७) सन १९७८ मध्ये शोधप्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे सादर केला होता. यामध्ये फक्त सातारा जिल्हयातील स्वातंत्र्य चळवळीची माहिती देण्यात आलेली आहे. डॉ.निवासराव वरेकर यांनी इतिहास विषयातील पीएच.डी.पदवीसाठी सन २००९ मध्ये 'स्वातंत्र्योत्तर काळातील सातारा शहर : एक नागरी ऐतिहासिक अभ्यास' हा शोधप्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे सादर केलेला होता. यामध्ये स्वातंत्र्यानंतरच्या काळातील सातारा शहराचे राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास केलेला आहे.

प्रा.विनायक जाधव यांनी एम.फिल.साठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे सन १९८६ मध्ये 'छत्रपती प्रतापसिंह महाराज आणि सातारा(१८०८–१८३९)' हा शोधप्रबंध सादर केला होता. यामध्ये फक्त सन १८०८ ते १८३९ या काळातील छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या

विषयीची माहिती दिलेली आहे. कु.नलिनी दिसले यांनी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे इतिहास विषयातून एम.फिल.पदवी मिळविण्यासाठी सन २००५ मध्ये 'सातारा शहराचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास(१९००–१९४७)', शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे प्रबंध सादर केला होता. यामध्ये सन १९०० ते १९४७ या काळातील सामाजिक व सांस्कृतिक माहिती उजेडात आलेली आहे. प्रा.संजय भोसले यांनी इतिहास विषयातून एम.फिल.पदवीसाठी सन २००८ मध्ये 'सातारा जिल्हयातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचाः एक चिकित्सक अभ्यास (१६००–१९००)', टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे येथे हा प्रबंध सादर केला होता. यामध्ये सातारा जिल्हयातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा अभ्यास केलेला आहे. ही स्थळे सन १६०० ते १९०० या कालखंडात निर्माण झालेली आहेत. प्रा.किरण कुंभार यांनी इतिहास विषयातून एम.फिल.पदवीसाठी सन २००९ मध्ये 'छत्रपती शाहू आणि सातारा (१७००–१७४९)', हा प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे येथे सादर केला होता. यामध्ये छत्रपती शाहू महाराजांचे सातारा शहरासंबंधीचे सुधारणा कार्य याविषयी सविस्तर माहिती दिलेली आहे. प्रा.दत्तात्रय ओवाळे यांनी इतिहास विषयातील एम.फिल. पदवीसाठी सन २०११ मध्ये 'श्री.छत्रपती शिवाजी संग्रहालय, सातारा : एक चिकित्सक अभ्यास (१६००–१९००)', हा प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे सादर केला होता. यामध्ये सातारा शहरातील फक्त वस्तुसंग्रहालयाचा अभ्यास केलेला आहे.

अशाप्रकारे सातारा शहर व जिल्हयावर संशोधन झाले असले तरी आज पर्यत सातारा शहरावर कोणीही इ.स.१८०८ ते १९४७ या कालखंडावर संशोधन झालेले नाही. तेव्हा या कालखंडातील सातारा शहराचा समग्र राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक इतिहास उजेडात यावा, या दृष्टीने मी सदरील प्रबंधात सविस्तर माहिती दिलेली आहे.

## १.११ संशोधन पद्धती

सातारा शहराचा इतिहास (इ.स.१८०८ ते १९४७) या विषयाच्या संशोधनासाठी सर्वेक्षण आणि संदर्भ साधने या दोन संशोधन पद्धतीबरोबरच संशोधनासाठीचे प्राथमिक तथ्य संकलन करण्यासाठी मुलाखती, प्रश्नावली व गटचर्चा इत्यादी पद्धतीचा वापर केला आहे. त्याचबरोबर सर्वेक्षण करून पुरातत्त्वीय साधनामध्ये ठिकठिकाणी असलेले किल्ल्यांचे अवशेष, इमारतीचे अवशेष, राजवाडे, वस्तुसंग्रहालय इत्यादी ची माहिती गोळा करून प्रबंधाची मांडणी

केली आहे.

त्याचप्रमाणे वेगवेगळया संस्थाचे वार्षिक अहवाल, स्मरणिका, मासिके, हस्तलिखिते, चरित्रग्रंथ, पत्रे, आत्मचरित्र, फोटो, शासकीय कागदपत्रे, उत्खनन अहवाल, मुंबई पुराभिलेखागारातील कागदपत्रे, जुने संदर्भग्रंथ, वृत्तपत्रे, नियतकालिके व गॅझेटियर यांचा उपयोग संशोधन वृद्धिसाठी केला आहे. याशिवाय संदर्भासाठी सातारा शहरासंबंधी लिहिल्या गेलेल्या सर्व संदर्भग्रंथाचा वापर या संशोधन वृद्धीसाठी केला आहे.

## १.१२ संदर्भ साधने

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती संग्रहित करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला आहे. या दोन साधनांच्या आधारे संदर्भ साधनांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. ती पुढीलप्रमाणे आहेत.

**प्राथमिक साधने (अप्रकाशित)**

१. मुंबईतील पुराभिलेखागार कार्यालयातील राजकीय फाईल्स.

२. पुणे येथील पेशवे दप्तरातील कागदपत्रे.

३. सातारा शहरातील राजकीय, सामाजिक व धार्मिक संस्थाची वार्षिक अहवाल.

४. सातारा नगरपरिषद अहवाल.

५. सातारा नगरवाचनालयाचे वार्षिक अहवाल.

६. सातारा जिल्हा परिषदेचे वार्षिक अहवाल.

७. पंचायत समिती सातारा वार्षिक अहवाल.

८. रयत शिक्षण संस्थेचे घटनापत्रक, व वार्षिक अहवाल.

९. धार्मिक वतनपत्रे, दानपत्रे, इनामपत्रे.

**प्राथमिक साधने(प्रकाशित)**

१. महाराष्ट्र राज्य गॅझेटियर.

२. सातारा जिल्हा गॅझेटियर.

३. विश्वकोश खंड १ ते १७

४. जनगणना अहवाल सातारा जिल्हा.

५. सातारा जिल्हा प्रौढ शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद सातारा.

६. सांख्यिकी घोषवारा, महाराष्ट्र राज्य, १९७१–७२.

७. डॉ.कुंटे भ.ग.(संपा.), स्वातंत्र्य चरित्रकोश, महाराष्ट्र राज्य पश्चिम विभाग, खंड ३, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८०

८. Chaudhari K.K.(Ed.), Source Material for a History of the Freedom Movement in India(1818-1920) Vol.I, II Government Central Press, Bombay, 1889, 1923

**पुरातत्त्वीय साधनेः**

१. मराठाकालीन नाणी, मंदिरे, मूर्ती, स्मारके, ऐतिहासिक किल्ले व इमारती.

२. ताम्रपट, वीरगळ, शिलालेख, दगडी उपकरणे.

### दुय्यम साधने

१. विविध संदर्भ पुस्तके

२. एम.फिल. व पीएच.डी.चे प्रबंध

३. नकाशे, सीडी व कॅसेट

४. विविध वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके, त्रैमासिक व सहामाही अंक.

५. विश्वकोश व संस्कृतीकोश खंड

६. आत्मचरित्रे व अभिनंदन ग्रंथ

७. विविध संस्थाच्या स्मरणिका व नियतकालिके

## १.१३ प्रकरण नियोजन

**प्रकरण पहिले**

**सातारा शहराची पार्श्वभूमी :**

या पहिल्या प्रकरणामध्ये सुरूवातीला प्रस्तावना दिलेली आहे. त्यानंतर प्रबंधाचे शिर्षक, संशोधन विषयाची निवड, संशोधनाची आवश्यकता, संशोधन विषयाची व्याप्ती, संशोधन विषयाची मर्यादा, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, सिद्धांत कल्पना, संदर्भ साहित्यांचे पुनर्विलोकन (Review of Litarature), संशोधन पद्धती, संदर्भ साधने संशोधन विषयाचे महत्त्व व प्रकरण नियोजन इत्यादी गोष्टींचा समावेश या प्रकरणात समावेश केला आहे. त्याच

प्रमाणे सातारा शहराची व्युत्पत्ती,भौगोलिक स्थिती, प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळातील सातारा शहराचे वर्णन यांची माहिती दिलेली आहे.

**प्रकरण दुसरे**

**सातारा शहराचा राजकीय इतिहास**

या प्रकरणामध्ये सातारा शहराची राजकीय पार्श्वभूमी, सातारचे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांचे राजकीय कार्य, छत्रपती आप्पासाहेब महाराजांच्या कारकिर्दीतील राजकीय घटना, सन १८४८ ते सन १८५७ मधील सातारा शहरातील राजकीय परिस्थिती, सातारा शहराचा १८५७ च्या उठावातील सहभाग, कर्ज निवारण व राष्ट्रीय जागृती कार्यक्रम, लोकमान्य टिळकांच्या काळातील सातारा शहरातील राजकीय घडामोडी–यामध्ये गणेश मेळा चळवळ, होमरूल चळवळ, सत्यशोधक चळवळ इत्यादी, महात्मा गांधी यांच्या नेतृत्त्वाखाली सुरू झालेल्या स्वातंत्र्य चळवळीतील सातारा शहराचा सहभाग, यामध्ये असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, वैयक्तिक सत्याग्रह, सन १९४२ चे चले जाव आंदोलन, प्रतिसरकारची स्थापना व कार्य, सन १९४७ मधील भारतास स्वातंत्र्य मिळाले त्यावेळचे सातारा शहर या सर्व राजकीय घडामोडीची सविस्तर माहिती या प्रकरणात दिलेली आहे.

**प्रकरण तिसरे**

**सातारा शहराचा सामाजिक इतिहास**

या प्रकरणामध्ये सातारा शहराची सामाजिक पार्श्वभूमी, सातारा शहरातील समाजरचना यामध्ये हिंदू, ख्रिश्चन, जैन व बौद्ध धर्मातील समाजजीवन अभ्यासणार आहे. हिंदूच्या समाजरचनेत विविध जाती व त्यांचे व्यवसाय, सातारा शहरातील लोकसंख्येचा आराखडा, लोकसंख्येची धर्मनिहाय विभागणी, पोशाख, अलंकार, भाषा, आहार, घरे, उपनयन, विवाह, स्त्रीजीवन, धार्मिक श्रद्धा व चालीरीती, मुहूर्त, सण व उत्सव, जातीय भेद, रोगराई व आरोग्य सुधारणा, सातारा शहरातील सामाजिक बदल व इतर उपक्रम इत्यादीची माहिती दिलेली आहे. सातारा शहरातील ऐतिहासिक व सामाजिक घराणी यांचीही माहिती या प्रकरणात घेतलेली आहे. याशिवाय सातारा शहरातील सामाजिक कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थाच्या कार्याचीही माहिती घेतलेली आहे.

**प्रकरण चौथे**

**सातारा शहराचा आर्थिक इतिहास**

या प्रकरणात सातारा शहराची आर्थिक पार्श्वभूमी, शेती, व्यापार व उद्योगधंदे याची माहिती घेणार आहे. तसेच नगरपरिषदेमार्फत शहरातील लोकांना पुरविलेल्या सुविधा त्यासाठी होणारा खर्च व त्या मोबदल्यात लोकांच्याकडून विविध मार्गाने जमा होणारे उत्पन्न, जकातीद्वारे मिळणारे उत्पन्न यांचाही अभ्यास या प्रकरणात केला आहे.

**प्रकरण पाचवे**

**सातारा शहराचा सांस्कृतिक इतिहास**

या प्रकरणात सातारा शहराची सांस्कृतिक पार्श्वभूमी, सातारा शहरातील प्रमुख ऐतिहासिक धार्मिक व पर्यटन स्थळांची माहिती दिली आहे. ऐतिहासिक व धार्मिक स्थळांच्या आधारे तत्कालीन सांस्कृतिक स्थितीचा अभ्यास केला आहे. मुर्तीकला व मंदिरशैली यांचीही माहिती घेणार आहे. सातारा शहरातील, चारभिंती, कमानी हौद, अदालतवाडा, जुना राजवाडा, नवा राजवाडा, जलमंदिर, संगम माहुली वगैरे ऐतिहासिक व धार्मिक स्थळे तसेच अंजिक्यतारा किल्ला इ. पर्यटन स्थळे व त्यांचे ऐतिहासिक महत्त्व अभ्यासणार आहे. सातारा शहरातील शिक्षण व्यवस्थेची माहिती घेत असताना यामध्ये शैक्षणिक संस्था, मराठी पाठशाळा, पूर्वप्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण, या शाळातील अभ्यासक्रम, माध्यमिक शिक्षण, उच्च शिक्षण, प्रौढ शिक्षण व ग्रंथालये इत्यादीची माहिती घेतली आहे .

**प्रकरण सहावे**

**उपसंहार**

या प्रकरणात संशोधनातून निघालेले निष्कर्ष मांडलले आहेत.

अशाप्रकारे सातारा शहराचा इतिहास अभ्यासत असताना तेथील राजकीय, सामाजिक व आर्थिक संस्था, धार्मिक संस्था, सांस्कृतिक केंद्र आणि शैक्षणिक संस्थाच्या आधारे सातारा शहरावर प्रकाश टाकला आहे.

## १.१४ सातारा शहराची पार्श्वभूमी

### सातारा शब्दाची व्युत्पत्ती

'सातारा' शब्दांचे अनेक अर्थ आणि व्युत्पत्ती सांगितली जाते. त्यामध्ये सातारा शहराच्या दक्षिणेस शिलाहार राजा दुसरा भोज याने इ.स.११९० च्या सुमारास सातारा (अंजिक्यतारा) किल्ला बांधला आहे. या किल्ल्याच्या भिंतींना सतरा बुरूज आणि सतरा दरवाजे होते आणि त्यावरून या किल्ल्यास आणि किल्ल्याजवळील गावास 'सातारा' हे नाव पडले आहे.[१] ठाणे–ठाणा, लोणावळे–लोणावळा, बडोदे–बडोदा, सुपे–सुप याप्रमाणे मूळ सातारे नावापासून 'सातारा' शब्द झाला असावा. अजिंक्यतारा किल्ल्याच्या पायथ्याशी दक्षिणेकडून उत्तरेकडे वाहणारे सात ओढे आहेत. प्रत्येक ओढयाच्या दोन्ही बाजूंना डोंगराच्या रांगाप्रमाणे उंचवटयांच्या रांगा आहेत. मराठीत दरे व खोरे असे दोन शब्द आहेत. दरे हे खोऱ्यापेक्षा लहान असते. त्यातून ओढा वाहत असतो. साताऱ्याच्या किल्ल्याच्या पायथ्यापासून असे सात ओढे वाहत आहेत. त्यांच्या दोन्ही बाजूंना डोंगराच्या रांगाप्रमाणे उंचवटयांच्या रांगा आहेत. आज या दऱ्यावर बांधकाम झालेले आहे. किंवा नैसर्गिकरित्या ते भरून निघाले आहेत. केवळ तीनच दरे आज पूर्वीच्या स्थितीत पाहावयास मिळतात. आजही या दऱ्यापैकी काही दऱ्यांची नावे प्रचलित आहेत. उदा.महादरे, आंबेदरे, अस्वलदरे या तीन दऱ्याची नावे मिळतात. इतर चार दऱ्याची नावे सापडत नाहीत. परंतु या दऱ्यांच्या जागा सातारा शहरापासून दूर आहेत. यावरून या दऱ्याच्या सातारा नांवाशी संबंध असावा. साताऱ्यात दहा–बारा लहान मोठे ओढयावरील पूल आहेत. तेव्हा सात दरे – सातारे – सातारा – हीच व्युत्पत्ति योग्य वाटते.[२]

तारा म्हणजे किल्ला. साताऱ्याभोवती सात किल्ले आहेत, म्हणून सात–तारे सात्तारे असा शब्द झाला, असे काहींचे मत आहे. यावर काही लोक आक्षेप घेतात की, साताऱ्याभोवती सात किल्ले नसून नऊ किल्ले आहेत. असे असले तरी या नऊ किल्ल्यामध्ये सात किल्ले हे प्रमुख असून दोन महत्त्वाचे नव्हते. त्यामुळे त्या सात किल्ल्यावरून 'सातारा' हे नाव पडले आहे. किल्ल्यावर सप्तर्षीचे मंदिर आहे. हे सप्तर्षी म्हणजे आकाशातील सात तारे होत. त्यावरून सात–तारे, सात्तारे–सातारा असा शब्द बनला. असा उल्लेख काही ग्रंथात आढळतो. सप्तर्षिपूर हे नाव ऐतिहासिक राजकीय पत्रव्यवहारात आढळते. सप्तर्षीच्या मंदिरावरून सप्तर्षिपूर असे संस्कृतनिष्ठ नाव जुन्या पोथ्यात आढळते.[३]

अजिंक्यतारा किल्ल्याचे जुने नाव सप्तर्षीचा किल्ला असे होते.[४] गो.स.सरदेसाई यांच्या नानासाहेबांच्या चरित्रात सप्तर्षीवरील मातुश्रीचेही येथे कागदपत्रे येतात असा उल्लेख आहे. यावरून सातारा शहराचे जुने नाव सप्तर्षी हे होते. सप्तर्षी यावरूनच सातारा हे नाव पडले असावे. वामन पंडिताच्या भगवद्‌गीता समश्लोकी या पोथीच्या शके १८७५ मध्ये लिहिलेल्या एका प्रतीत सप्तर्षिपुरे लेखन संपूर्ण असा उल्लेख आहे. पण ऐतिहासिक व राजकीय पत्रव्यवहारात सातारे असाच उल्लेख आहे.[५]

या किल्ल्याचे नाव सप्तर्षी असण्यामागील अशी धारणा आहे, की प्राचीन काळी आर्यावर्तात अनेक ऋषी होऊन गेले. अशा ऋषीपैकी कश्यप, अत्रि, भारद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नि व वसिष्ठ या प्रसिद्ध ऋषींची नोंद सप्तर्षी नावाने होते. आकाशात दिसणाऱ्या एका सात ताऱ्यांचा पुंजक्यास त्यांचे 'सप्तर्षी' नाव देण्यात आले आहे व याच ऋषींच्या सप्तर्षी देवालयावरून किल्ल्यास सप्तर्षी किंवा 'सातदरे' असे नाव पडले असावे.[६] सातारा किल्ल्याचे सतारे नाव शाहूकालीन पत्रव्यवहारात सापडते.[७]

सात म्हणजे विपुल या अर्थाच्या शब्दापासून 'सातारा' या संकल्पनेची व्युत्पत्ती काही इतिहासकार मांडतात. सात, सातर म्हणजे विस्तार असा अर्थ निघतो. विस्तार करणारा तो 'सातारा' हे विशेषनाम भाषा शास्त्रीय दृष्टीने योग्य ठरते अशा व्युत्पत्ती अधिक सार्थ ठरते.[८] कन्नडमध्ये सात म्हणजे विपुल व सातार म्हणजे विस्तार. यावरून विस्तार करणारा सातारा असाही अर्थ निघतो.[९]

सातारा किल्ल्यास मंगळाई, सप्तर्षी, सतारे, उकाबैन, इसमतारा, शाहगड व अजीमतारा अशी नावे आहेत. यापैकी पहिली तीन नावे प्राचीन असून उकाबैन नाव बहमनी राज्यातील व त्यानंतरच्या आदिलशाहीतील आहे. इसमतारा नाव अहमदनगरचा बादशहा हुसेन निजामशहा याची मुलगी व विजापूरचा बादशहा अली आदिलशहा याची राणी चांदबिबी हिला तिचा वजीर किशवरखान याने इ.स. १५८२ साली सातारा किल्ल्यात कैद करून ठेवले होते, त्यावेळी मिळाले. आझमतारा नाव इ.स.१७०० मध्ये औरंगजेबाने हा किल्ला घेतला. त्यावेळी त्याचा मुलगा आझमशहा याचे नावावरून दिले आहे.[१०]

अशाप्रकारे सातारा शहराची व्युत्पत्ती ही वरील वेगवेगळया माहितीवरून स्पष्ट होते. या सर्व गोष्टीमध्ये सातारा हे नाव अजिंक्यतारा किल्ल्याच्या भिंतींना सतरा बुरूज आणि सतरा

दरवाजे होते. सातान्याच्या किल्ल्याच्या पायथ्यापासून असे सात ओढे वाहत आहेत. त्यांच्या दोन्ही बाजूंना डोंगराच्या रांगाप्रमाणे उंचवटयांच्या रांगा आहेत. सातान्याभोवती सात किल्ले आहेत, म्हणून सात–तारे सात्तारे असा शब्द झाला, तसेच ऋषींच्या सप्तर्षी देवालयावरून किल्ल्यास सप्तर्षी किंवा 'सातदरे' असे नाव पडले असावे. या सर्व बाबीमधून सातारा हे नाव प्रचलित झाले आहे. हे स्पष्ट होते.

## १.१५ सातारा शहराची भौगोलिक स्थिती

सातारा शहर हे जिल्हयाचे ठिकाण आहे. त्याचे भौगोलिक स्थान १७° ४०' उ.,७३° ०५' पू. आहे. म्हणजे हे शहर उष्ण कटिबंधात आहे. याची समुद्र सपाटीपासूनची उंची सुमारे २३०० फूट आहे. या उंचीमुळे हवेतील उष्णता कमी होऊन ती समशितोष्ण हवेच्या प्रकारात पडते. सहयाद्रीच्या पूर्व उतारावरील डोंगराळ भागात हे शहर वसले आहे. सातारा शहर सहयाद्री पर्वताच्या पूर्व उतारावरील डोंगराळ भागात वसलेले मुंबई–पुणे–बंगळुर राष्ट्रीय महामार्ग व महाबळेश्वर–सातारा–पंढरपूर राज्य महामार्गावर आहे. अजिंक्यतारा किल्ल्याच्या पायथ्यास हे शहर वसले आहे. या शहरातून ७ ओहोळ वाहत जाऊन ते पुढे एकमेकास मिळून वेण्णा नदीस जाऊन मिळाले आहेत. यामुळे शहरातील सांडपाणी त्यातून वाहत जाते. पावसाळयातही पाणी शहरात मुरत नाही. पावसाळी दिवसात आकाश सतत आभ्राच्छादित असते. पाऊस हा सरासरी ३५ ते ४० इंच असतो. या ठिकाणाहून उत्तरेस पुणे, दक्षिणेस कोल्हापूर व पूर्वेस पंढरपूर असे मोठे मार्ग आहेत. याशिवाय आणखी उपरस्ते आहेत. शहराच्या सभोवती डोंगराळ मुलुख जास्त आहे.

### हवामान

भौगोलिकदृष्टया सातान्याचे हवामान उष्ण व कोरडे असून प्राकृतिक रचनेनुसार उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तीन ऋतु आहेत. सहयाद्री रांगाच्या सुमारे २५ ते ३५ कि.मी. रूंदीच्या अरूंद पटट्यात सर्वात जास्त पाऊस पडतो. सातारा जिल्हयात हवामानविषयक वेदशाळा फक्त महाबळेश्वर येथे असून या हवामान शाळेतील आकडेवारी फक्त पश्चिम घाट प्रदेशासाठी प्रमाण मानली जाते. डिसेंबर महिना सर्वाधिक थंडीचा असतो. सातारा शहराची समुद्रसपाटीपासूनची उंची २३०० फूट आहे. सातारा शहरात पाऊस सरासरी ७१०.३ मिलिमीटर पडतो. हिवाळा व उन्हाळाही मोठया प्रमाणावर असतो.

### नदीप्रणाली

सातारा परिसरातून प्रामुख्याने दोन नद्या वाहतात. सातारा शहराच्या पूर्वेस उत्तरेकडून दक्षिणकडे कण्हेर धरणावरून वाहणारी वेण्णा नदी वाहते. ही नदी संगम माहुली या ठिकाणी कृष्णा नदीस मिळते. सातारा शहरामधून एक ओढा वाहत येऊन कृष्णा नदीस येऊन मिळाला आहे. कण्हेर धरणामुळे सातारा परिसरातील शेतीला कालव्याद्वारे पाणीपुरवठयाची उत्तम सोय झाली आहे. याशिवाय कास पठारावर कास तलाव, यवतेश्वराच्या डोंगराच्या पायथ्यास महादरा तलाव व बदामी तलाव यांच्याद्वारे शहरास पाणीपुरवठा केला जातो.

सातारा शहरातून कण्हेर धरणातून कालवा काढलेला आहे. सातारा परिसरातील शेतीला पाणी मिळाल्याने ती शेतजमीन बागायती बनली आहे. पाण्याची उपलब्धता, सुपीक जमीन आणि अनुकूल हवामान यामुळे सातारा येथे कृषी उत्पन्न चांगले होते. ऊस, हळद व आले या नगदी पिकांबरोबर इतरही अन्नधान्याचे उत्पादन काढले जाते.

सातारा शहराजवळच अजिंक्यतारा किल्ला व चारही दिशास डोंगर आहेत. सहयाद्रीतील महाबळेश्वर व कासची डोंगररांगा, कृष्णा व वेण्णा नदीचे खोरे पंचक्रोशीतील सज्ज्नगड, कल्याणगड, चंदनवंदन, वसंतगड, जरंडेश्वर डोंगर व वासोटा इत्यादी किल्ले व जावळीचे खोरे यामुळे या स्थानास भौगोलिक महत्त्व प्राप्त झाले आहे. [११]

### सातारा शहरातील पेठा

सातारा शहरामध्ये ब्रिटिश अमदानीत येथे सात वारांच्या नावावरून सात पेठा वसविल्या आहेत. पुढे त्यात आणखी भर पडली आहे. यामध्ये रामाऊचा गोट, व्यंकटपुरा पेठ , चिमणपुरा पेठ , ढवळपुरा पेठ , गोसावीपुरा पेठ , माची, यादवगोपाळ पेठ, केसरकर पेठ, प्रतापगंज पेठ, भवानी पेठ, सदाशिव पेठ, रघुनाथपुरा पेठ, राजसपुरा पेठ, मल्हार पेठ, बसाप्पाची पेठ, पंताचा गोट व दुर्गा पेठ इत्यादी  पेठा सातारा शहरात आहेत.[१२]

## १.१६ सातारा शहराचा इतिहास

### १.१६.१ प्राचीन काळातील सातारा

सुमारे अडीच हजार वर्षापासून सातारा भागात लोकवस्ती असल्याचे दाखले मिळतात. इसवीसनपूर्व दोनशे वर्षे सातारा येथे बौद्ध लोकांचा अमंल होता. त्यापूर्वी सातारा शहरावर आंध्रभृत्याचे राज्य होते. साताऱ्याचा इतिहास म्हणजे एकापरीने अंजिक्यतारा किल्ल्याचाच

इतिहास असे म्हटले पाहिजे. कारण या किल्ल्यावर बहुतेक सर्व महत्त्वाच्या घटना घडल्या आहेत. सुमारे ८०० वर्षापूर्वी सातारा हे नाव अगर या नावाचे ठिकाण अस्तित्त्वात नव्हते. त्याठिकाणी घनदाट जंगलानी व्यापलेला, चारी बाजूने काळया कभिन्न खडकांच्या, तुटलेल्या उंच कडयांची तटबंदी लाभलेला, एक साधा डोंगर होता. हिंदुस्थानच्या पश्चिम किनारपट्टीवर उत्तरेकडून दक्षिणेकडे लांबवर पसरलेल्या सहयाद्री पर्वताच्या डोंगररांगामध्ये घाटमाथा व कोकणच्या मध्यावर उभा असलेला वैशिष्टयपूर्ण पसरट माथा असलेला डोंगर होता. त्यावेळी करंजे नावाचे खेडेगांव जंगलात वसलेले होते. त्या गावच्या हद्दीतील हे उंच ठिकाण 'करंजे गावचा डोंगर' या नावाने ओळखले जात होते.[१३]

**प्रागैतिहासिक कालखंड**

सातार्‍याचा प्रागैतिहासिक कालखंड जाणून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण साधन म्हणून एस.सी.मलिक यांचा 'स्टोन एज इंडस्ट्रिज ऑफ द बॉम्बे ॲण्ड सातारा डिस्ट्रिक्ट' हा अहवाल अत्यंत उपयुक्त ठरतो. सातारा जिल्हयामध्ये झालेल्या पुरातत्त्वीय संशोधनातून येथे पुरापुराश्मयुगीन मानवाचे अस्तित्त्व दर्शविणारा पुरावे उपलब्ध झाले अअहेत. या काळातील हत्यारे मर्ढे, माहुली, सोनगाव, पाचवड, आसगाव येथे मिळाली आहेत. दक्षिण महाराष्ट्रातील प्रमुख जिल्हयात सातारा जिल्हयाचा समावेश होतो. सातार्‍याच्या प्रागैतिहासिक कालखंडाविषयीची माहिती सातारा जिल्हयातील आसगाव, पाचवड, मर्ढे, माहुली, लिंब व सोनगाव इत्यादी ठिकाणी आढळणार्‍या प्राचीन हत्यारांमधून विश्वसनीयरित्या मिळते.[१४]

**मध्याश्मयुगीन कालखंड**

या कालखंडातील सातारा जिल्हयातील मानवाचे अस्तित्त्व उंब्रज, कराड, काशिळ, कोपर्डे, गोवारे, चिंचणे, टेंबू, तारगाव, धामणेर, माहुली, लिंब व वेणेगाव इत्यादी ठिकाणी व सातारा परिसरात आढळली आहेत. त्यामध्ये हातकुर्‍हाडी आणि फरश्यासारखी ओबडधोबड मोठया आकाराची हत्यारे आहेत. ही हत्यारे तासण्या, वेधण्या आणि नोक या हत्यार प्रकारात मोडतात. तत्कलीन काळात या हत्याराचा उपयोग प्रामुख्याने शिकारीसाठी केला जात होता. सातारा परिसरातील कृष्णा नदीकाठी 'संगम माहुली' येथे नदीच्या पात्रात ही हत्यारे सापडली आहेत.[१५]

**उत्तराश्मयुग**

सातारा परिसरात विशेषतः कराड येथे या काळातील हत्यारे सापडली आहेत. या काळात ॲगेट, चाल्सेडोनीसारख्या दगडापासून धारदार पाती असलेली लांबट हत्यारे तयार केली गेली. या प्रकारची हत्यारे महाराष्ट्रत इतर ठिकाणीही सापडतात. हा कालखंड साधारणपणे इ.स.पू.१०,००० ते ४००० असा मानला जातो.[१६]

अशाप्रकारे हवामान वनस्पती, पशुपक्षी आणि स्वतःच्या गरजा यांच्या अनुमानाने हत्यारात व अवजारात योग्य तो बदल करण्याची काळजी त्या काळातील मानवाने घेतलेली दिसून येते.

**सातवाहनकालीन सातारा**

सातवाहन काळात सातारा व परिसरात बौद्ध लेण्या व गुफा खोदल्या गेल्या होत्या. यामध्ये कराड येथील बौद्ध लेणी तर शिरवळ, वाई, भोसे, मलवडी व कुंडल इत्यादी ठिकाणी गुफा खोदल्या गेल्या आहेत. यावरून या काळात सातारा येथे सातवाहनांची सत्ता होती हे स्पष्ट होते. इ. स. पू. तिसरे शतक ते इ.स.तिसरे शतक या कालवाधीत दक्षिणेत सातवाहनांचे राज्य होते. इ. स. पू. दुसऱ्या शतकात सातारा जिल्हयातील कराड या गावाच्या यात्रेवरून मध्य–प्रदेशातील सुप्रसिद्ध 'भारहुत' येथील स्तुपाच्या वेदिकेच्या बांधणीसाठी काही अनुदाने दिल्याचा तेथील अभिलेखात उल्लेख आहे. यावरूनच सातारा परिसरातील लोक इतर प्रांताच्या संपर्कात आलेले होते.[१७]

'सिमुख' या सातवाहन राजाच्या काळात साताऱ्याचा परिसर मराठवाडयातील पैठण येथून राज्य करणाऱ्या सातवाहनांच्या अधिपत्याखाली होता हे स्पष्ट झाले आहे. कलिंगचा राजा खारवेल याच्या सैन्याने सातकर्णी राजाच्या दक्षिण भागातील कृष्णा नदीच्या काठावरील शहरावर हल्ला केला होता. यावरून सातकर्णीच्या ताब्यात दक्षिण भारताचा उत्तर भाग होता. त्यावरून साताऱ्याच्या परिसरावरही त्यांचे राज्य होते, हे स्पष्ट होते.[१८]

**राष्ट्रकूट व चालुक्यकालीन सातारा**

मानकूटचे राष्ट्रकूट यांचे राज्य या परिसरावर सातवाहनांत होते. याचा उल्लेख पांडरंगपल्ली ताम्रपटातील उल्लेखावरून आढळतो. राष्ट्रकूट घराण्यातील अविधेय या राजाने माण तालुक्यातील वळईच्या आसपासचा प्रदेश दान केल्याचा उल्लेख आहे. दान दिल्याचा उल्लेख या

ताम्रपटात आहे. याशिवाय या ताम्रपटात वर्णन केलेले स्थान हे सातारा येथील आहे.[१९]

प्राचीन काळातील सातारा महाराष्ट्राप्रमाणेच आपले ऐतिहासिक स्थान टिकवून आहे. उत्खननातून आढळणाऱ्या अवशेषावरून प्राचीन साताऱ्याचे प्रागैतहिासिक, मध्याश्म, मध्यपुराश्म, उत्तरपुराश्म असे कालखंड आहेत. सातारा जिल्हयाच्या उत्खननात सापडलेली मानवी हत्यारे, पुरातत्त्वीय अवशेष तसेच बौद्ध लेणी, गुफा यावरून साताऱ्याच्या परिसरात प्राचीन कालखंडापासून मानवी अस्तित्त्व असल्याचे सिद्ध होते. यातूनच सातारा जिल्हयाच्या प्राचीन इतिहासावर प्रकाश पडतो

### १.१६.२ मध्ययुगीन  काळातील सातारा शहर

### शिलाहार कालीन सातारा

शिलाहार घराण्यातील सम्राट द्रितीय जतिन याच्या काळात साताऱ्याशी संबंध आलेला आहे. द्रितीय जतीन हा स्वबळावर स्वतंत्र राजा झालेला होता. त्याने सिंधवंशीय राजाचा पराभव करून सातारा जिल्हयातील कराड येथे आपली राजधानी स्थापन केली होती.[२०]

१२ व्या शतकाच्या उत्तरार्धात सहयाद्री पर्वतरांगांच्या डोंगरी प्रदेशावर ऐतिहासिक शिलाहार घराण्याची सत्ता होती. त्यांचे राजधानीचे ठिकाण पन्हाळा किल्ला हे होते. या घराण्यातील दुसरा भोजराजाने उत्तरेकडील प्रदेशावर लक्ष ठेवण्यासाठी एक मजबूत व मध्यवर्ती ठिकाण असलेल्या डोंगरमाथ्यावर किल्ला बांधावयाचे निश्चित केले. त्यासाठी भोजराजाने करंजे गावच्या हद्दीतील या विस्तीर्ण पठार असलेल्या व नैसर्गिक खडकांच्या तुटलेल्या कडयांची मजबूत तटबंदी लाभलेल्या डोंगराची निवड किल्ला बांधण्यासाठी केली. अनेक वर्षे परिश्रम करून डोंगराच्या नैसर्गिक कडयाचा आधार घेऊन इ.स.११९० मध्ये या किल्ल्याचे बांधकाम पूर्ण केले. बांधकाम पूर्ण झालेल्या या किल्ल्याचे नाव भोजराजाने ‘सितारा’ असे ठेवल्याचे इतिहास तज्ज्ञ सांगतात.[२१]

या किल्ल्याच्या नावाबद्दल तज्ज्ञात मतभेद असल्याचे आढळून येते. काही इतिहास तज्ज्ञाचे मते भोजराजाने या किल्ल्याचे नाव ‘सप्ततारा’ असे ठेवले असावे. तर काही इतिहास तज्ज्ञांच्या मते या किल्ल्याचे नाव ‘सातदरा’ असे ठेवले गेले असावे.

सितारा, सप्ततारा किंवा सातदरा या नावाचा अपभ्रंश होवून पुढील काळात या किल्ल्याचे नाव ‘सातारा’ असे रूढ झाले. भोजराजाने सन ११९० मध्ये बांधून पूर्ण केलेल्या

सातारा किल्ल्याची पूर्व–पश्चिम लांबी ३३०० फूट व दक्षिणोत्तर रूंदी १८०० फूट आहे. किल्ल्याच्या चोहोबाजूने तुटलेल्या कडयांच्यावर आठ फूट रूंदीचा दगडी तट बांधण्यात आला आहे. या किल्ल्याची पायथ्यापासून उंची ९०० ते १००० फूट आहे.

किल्ल्याच्या पठारावर तट बांधण्यासाठी खाणीतून दगड काढल्याने तयार झालेल्या नैसर्गिक सात तळयांना पुढीलप्रमाणे नावे दिली होती. १) दूधबावी तळे २) सुलतान पीर तळे ३) मंगळाईचे तळे ४) शिवसागर तळे ५)सप्तऋषी तळे ६) कोठी तळे ७) भवानी तळे इत्यादी आहेत, तर प्रत्येक तळयाच्या काठावर शेजारीच सात देवळे बांधण्यात आली आहेत. ती देवळे म्हणजे १) मंगळाईचे देऊळ २) शंकराचे देऊळ ३) महालक्ष्मीचे देऊळ ४) सप्तऋषींचे देऊळ ५) बिरोबाचे देऊळ ६) हनुमंताचे देऊळ ७) नृसिंहाचे देऊळ इत्यादी हे सर्व बांधकाम दगडात करण्यात आले. त्यावेळच्या पद्धतीप्रमाणे बांधकामाच्या ठिकाणी तयार करून बांधकामासाठी चुना वापरण्यात आला. हा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात आल्यानंतर या किल्ल्यावर छत्रपती पहिले शाहू महाराज, छत्रपती रामराजा, छत्रपती धाकटे शाहू महाराज, छत्रपती थोरले प्रतापसिंह महाराज व राजपरिवार राहिलेला होता. त्याचप्रमाणे त्या राजवाडयाच्या आसपास सेवक व अधिकाऱ्यांची निवासस्थाने, शस्त्रांची कोठारे, धान्य साठविण्याची गोदामे व बंदीवासात डांबण्यात आलेल्या राजकीय कैद्यासाठीची निवासस्थाने बांधण्यात आली होती. वाडयाच्या शेजारी पिण्याच्या पाण्याच्या खोल विहिरी बांधलेल्या होत्या. त्यांच्या बांधकामाच्या खुणा आजही दिसतात.[२२]

बांधकाम केलेल्या जवळजवळ सर्व वास्तूंचे आता फक्त जोत्यांचे बांधकाम पाहावयास मिळते. विहिरींचे बांधकाम अप्रतिम असून काही तळी गाळांनी भरलेल्या अवस्थेत आहेत, परंतु ती पाण्याने तुडुंब भरलेली आहेत. त्यातील पूर्वेकडील भागातील एक तळे पावसाळयात भरून वाहते. किल्ल्याच्या उत्तरेला बुरूजाशेजारी मंगळाईचे देऊळ सुस्थितीत असून त्याचा जिर्णोद्धार केलेला असून मंगळाईच्या दर्शनासाठी लांबून लोक दर मंगळवारी व शुक्रवारी येत असतात. नवरात्रात देवीच्या दर्शनासाठी गर्दी होते.

मंगळाईच्या देवळाच्या पाठीमागील बाजूस काही अंतरावर एक तलाव असून त्याच्या पाठीमागे शेजारी शिवमंदिर आहे. छत्रपती शिवाजी महाराज इ.स.१६७५–७६ मध्ये या किल्ल्यावर विश्रांतीसाठी मुक्कामास असताना दररोज सकाळी शंकराच्या मंदिरात दर्शनास येत

असत व शिवलिंगाची पूजा करीत असत.

शिवलिंगाचे दक्षिणेस शेजारीच राजवाडयाच्या बांधकामाचे जोते, दगडी पायऱ्या आहेत. वाडयाच्या शेजारीच एक पिण्याच्या पाण्याची विहिर असून त्याच्या पूर्वेकडील बाजूस एक विस्तीर्ण व खोल भरलेले तळे आहे.

सातारा किल्ल्याच्या १०० ते १५० फूट उंच तुटलेल्या कडयांवरील पठारावर जाण्यासाठी किल्ल्याच्या उत्तरेकडील खडकांत खोदून तयार केलेला सुमारे १५ ते १८ फूट उंचीचा व ५ फूट रूंदीचा कमानीचा पश्चिमाभिमुख दरवाजा आहे. त्यास सुमारे ६ इंच जाडीची, लोखंडी कडया कोयंडे व दिंडी दरवाजा असलेली दोन भक्कम लाकडी दारे बसविण्यात आलेली आहेत. दरवाजाच्या चौकटीचे काम खदकात खोदून तयार केले आहे. बाहेरच्या बाजूकडील बुरूज उभ्या कडयाच्या खडकातच कोरून तयार केलेला आहे. त्याची रूंदी सुमारे ५ फूट असून उंची सुमारे २० फूट आहे. डावीकडील बुरूज घडीव दगडांचा सुबक बांधलेला आहे. त्याची रूंदी ६ ते ८ फूट इतकी आहे. तो उत्तरेकडील बाजूकडील तटांबरोबर एकसंघ केलेला आहे. या दोन बुरूजामुळे तेथे किल्ल्यावर जाण्यासाठी दरवाजा असल्याचे लक्षात देखील येत नाही. तो किल्ल्याच्या तटाचाच एक भाग असल्यासारखे दिसते. सध्या किल्ल्यावर जाणाऱ्या या दरवाजापर्यंत जाण्यासाठी गोडोलीतून डांबरी रस्ता तयार केला आहे.[२३]

किल्ल्यावर जाण्याऱ्या दरवाजास सुमारे दहा फूट लांबीचा घडीव दगडात तयार केलेला उंबरठा आहे. त्याच्या बाहेरील बाजूस ५ फूटापर्यंत दगडी फरशी बसविण्यात आलेली आहे. किल्ल्याचा दरवाजा बंद केल्यावर आतील बाजूस सुमारे एक फूट जाडीचा लाकडाचा अढना भिंतीच्या खाचेत बसतो. त्याच्या टोकाला बाहेर ओढण्यासाठी जाड लोखंडी कडे बसविलेले आहे. त्या कडयास धरून अडना दारांच्या आतून ओढून भिंतीच्या उजव्या बाजूच्या खाचेत अडकवला जातो. अशाप्रकारे मजबूत अडण्याने आतून दार बंद केल्यानंतर बाहेरून हत्तीने जरी धडकदिली तरी दरवाजा उघडला जाणार नाही. प्रवेशद्वाराच्या आतील बाजूस उजव्या बाजूला १२ ते १५ फूट लांब-रूंद व ४ फूट उंच खडकात ओवरी तयार केली आहे. डाव्या बाजूला ही तशीच ओवरी बांधण्यात आलेली आहे. त्याठिकाणी हत्यारबंद पहारेकरी थांबण्याची व्यवस्था आहे. ओवऱ्यांच्यामध्ये दगडांची जमीन तयार केली आहे. उंबऱ्यापासून सुमारे १० फूट सपाट अंतरावरून किल्ल्याच्या पृष्ठभागावर चढण्यासाठी सुमारे ८ फूट रूंद व ८ इंच उंचीच्या दगडी

पायऱ्या बसविण्यात आल्या आहेत. त्या पायऱ्या चढून २० फूट उंचीवर वळण घेऊन उजवीकडे दुसरी दगडी कमान उभी आहे. त्या कमानीच्या आतून १५–२० फूट चढून गेल्यावर किल्ल्यावर प्रवेश करता येते. पायऱ्यांच्या दोन्ही बाजूला उंच दगडी भिंती हेमाडपंती पद्धतीत चुना मातीशिवाय बांधण्यात आल्या आहेत. आजही ते बांधकाम आहे त्या स्थितीत उभे आहे.

किल्ल्यावर तटास लागून चार फूट उंचीचा दगडी चौथरा आहे. त्यावर ध्वजस्तंभ उभा करून ठेवण्यात आलेला आहे. ज्या सत्ताधाऱ्याच्या ताब्यात किल्ला व प्रदेश असेल, त्याचा ध्वज फडकविण्याची ती उंच जागा आहे. चौथऱ्यापासून सुमारे आठ फूट रूंदीचा दगडी बांधीव तट सरू होतो. तो उत्तरेकडून तिरका पूर्वेच्या बाजूला जातो. तटाच्या बाहेरच्या कडेला दोन–तीन फूट उंचीच्या दगडांच्या चिऱ्यांचा सुमारे एक फूट रूंदीचा तट बांधण्यात आला आहे. त्यास मधून–मधून शस्त्रे व दारूगोळा फेकण्यासाठी व पाणी जाण्यासाठी जागा ठेवण्यात आल्या आहेत. किल्ल्याच्या तटाकडील पूर्वेकडील भिंत तिरकी आहे. या भिंतीवरून चारी दिशांना टेहळणी करता येते. किल्ल्याच्या उत्तरेकडील मध्यावर पश्चिमाभिमुख दरवाजा आहे.तशाच प्रकारचा दरवाजा पूर्वेच्या तटास दक्षिणाभिमुख आहे. त्या दरवाजाच्यावरून संपूर्ण परळी खोऱ्याची टेहळणी करता येते. परंतु या दरवाजातून किल्ल्यावरून जाण्यायेण्यास खूप लांबचा वळसा घालावा लागतो.

या दरवाजाच्या बाजूला पूर्वेच्या बुरूजाशेजारी तटावर लोखंडी कप्पी बसवून किल्ल्यावर धान्य व शस्त्रांचे साहित्य दोरखंडाने वर ओढून घेण्याची व्यवस्था केलेली होती. त्याशिवाय बुरूजाच्या डाव्या हाताला एक उंच चबुतरा असून त्यावरून कैद्यांचा कडेलोट करण्याची जागा आहे. तेथे किमान ७०० ते ८०० फूट खोल दरी आहे. याठिकाणी किल्ल्याच्या तटापासून ते पायथ्यापर्यंत घनदाट अरण्य आहे.[२४]

### १.१६.३ शाहूपूर्व काळातील सातारा शहर–

शिलाहार राजा भोज याने सन ११९० मध्ये हा किल्ला मजबूत बांधकाम करून पुर्ण केला. तथापि इ.स.१२०० मध्ये हा किल्ला देवगिरीच्या यादववंशीय सिंघण राजाने शिलाहार यांचेकडून जिंकून घेतला. तो यादव राजांच्या ताब्यात तब्बल १०० वर्षे होता. इ.स.१३०० मध्ये दिल्लीच्या अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीच्या यादवांचा पराभव केल्याने हा किल्ला खिलजी घराण्याच्या ताब्यात गेला. खिलजी घराण्याकडून तो पुढे तुघलक घराण्याकडे व

तुघलकांच्याकडून हा किल्ला बहामनी राजाच्या ताब्यात गेला. इ.स.१३४७ मध्ये बहामनी घराण्याची स्थापना झाली. बहामनीचे शकले पडल्यानंतर सातारचा किल्ला निजामशाहीच्या ताब्यात गेला. निजामशहाने हा किल्ला चांदबिबीच्या विवाहाप्रसंगी विजापूरकरास अंदन दिला. तेव्हा त्याचे नाव हुकेबहन असे ठेवण्यात आले होते.[२५]

इ.स.१५४९ मध्ये विजापूरच्या तख्तावर त्यावेळी आदिलशहाचा अल्पवयीन मुलगा सुलतान झाला होता. त्याची पालक म्हणून चांदबीबी नावाची कर्तबगार स्त्री आदिलशाही कारभार पाहत होती. सन १५७९ मध्ये चांदबीबीविरूद्ध आदिलशहाच्या किश्वरखानाने बंड करून चांदबीबीस या किल्ल्यावर दीर्घकाळ बंदिवासात ठेवले होते.[२६] इ.स.१५९२ मध्ये आदिलशहाचा दिवाण दिलावरखान यास याच किल्ल्यावर मरेपर्यत कैदेत ठेवण्यात आले होते. काही कालावधीतच तो तेथे मरण पावला.[२७] विजापूरकरानी फलटणचे मुधोजी नाईक निंबाळकर यांना सन १६४० पर्यंत ७ वर्षे या किल्ल्यावर बंदिवासात ठेवले होते.[२८]

विजापूरच्या ताब्यात असलेला हा किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांनी २७ जुलै १६७३ रोजी आपल्या ताब्यात घेतला.[२९] छत्रपती शिवाजी महाराज डिसेंबर १६७५ व जानेवारी १६७६ मध्ये आजारी पडले असताना त्यांचा मुक्काम सातारा किल्ल्यावर होता. तेथून त्यानी देशसेवा, अनुष्ठाने व दानधर्म केला.[३०]

सातारा किल्ला स्वराज्यात असताना, छत्रपती संभाजी महाराजांना सन १६८९ मध्ये मोगलांनी पकडले व त्यांची हालहाल करून हत्या केली. त्यानंतर मोगलांनी स्वाराज्यातील राजधानी रायगडास वेढा टाकला असता, महाराणी येसूबाईंनी शिवाजी महाराजांचे द्वितीय पुत्र राजाराम महाराज यांना गादीवर बसविले. त्यानंतर राज्य वाचविण्यासाठी त्यांना कुटुंबियासह काही निवडक सरदारांबरोबर रायगडावरून वेढयातून बाहेर पडावे लागले होते. तेव्हा ते प्रथम प्रतापगडावर येऊन नंतर सातारा किल्ल्यावरून चंदन-वंदन किल्ले करीत पन्हाळा किल्ल्याकडे गेले होते. पन्हाळा किल्ल्यावरून विश्रांती करून मजल दर मजल करीत मराठयांच्या ताब्यात असलेल्या कर्नाटकातील जिंजी येथे राजधानी थाटली होती. तथापि मोगल सेनेने त्यांचा पाठलाग करत जिंजी किल्ल्यास वेढा दिला. पुढे छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजीच्या वेढयातून निसटून आल्यावर २३ मे १६९८ रोजी मराठयांची राजधानी विशाळगड किल्ल्याहून सातारा किल्ल्यावर राजधानी आणली.[३१] अशाप्रकारे सातारा नगरीस मराठी राज्याच्या

राजधानीचा दर्जा प्रथमच दिला गेला. यापूर्वी सातारा किल्ल्याचा उपयोग फक्त राज्याचे संरक्षण व राजकीय कैद्यांना बंदिवासात ठेवण्यासाठीच केला जात होता.

छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात राज्यकारभाराच्या सोईसाठी किल्ल्यावर आवश्यक सुविधा निर्माण केल्या. पूर्वेकडील बुरूजाशेजारी ढाली, तलवारी, भाले, बरची, चिलखते, बाण इत्यादी शस्त्रास्त्रे बनविण्याचा कारखाना सुरू केला. धान्याची कोठारे घोडयांच्या पागा, कैद्यासाठी तुरूंगाची इमारत वगैरे बांधून घेतल्या. उत्तरेस लांबवर पसरलेल्या चार भिंती टेकडीवर टेहळणी बुरुज निर्माण केले. याच टेकडीला पुढे चार भिंती टेकडी हे नाव रूढ झाले. त्या टेकडीच्या पायथ्याशी मेट म्हणून ठिकाण आहे. अशाप्रकारे मेटाच्या वस्तीपासून किल्ल्याच्या पायथ्याशी सातारा शहराच्या स्थापनेचा प्रारंभ झाला.

सातारच्या किल्ल्यावर राजधानीची स्थापना केल्यानंतर छत्रपती राजाराम महाराजांनी वऱ्हाड खानदेशाची मोहिम आखली. त्यावेळी ते सिंहगडावर गेले. तेथे अचानक आजारी पडले. त्यातच २ मार्च १७०० रोजी त्यांचे निधन झाले. छत्रपती राजाराम महाराज सिंहगडावर गेले असताना मागे औरंगजेब बादशहाने सातारा किल्ल्यास वेढा टाकला. सुदैवाने त्यावेळी छत्रपती राजाराम महाराजांचा परिवार विशाळगडावर होता. औरंगजेब बादशहाने ९ जून १७०० रोजी मोठी रक्कम देऊन सातारचा किल्ला ताब्यात घेऊन त्याचे नाव आझमतारा असे ठेवले.

या कालावधीत विशाळगडावर दुसऱ्या शिवाजी राजांचा राज्याभिषेक होऊन १६ मार्च १७०० रोजी मराठयांची राजधानी विशाळगड बनविली असल्याची घोषणा महाराणी ताराबाईनी केली. अशाप्रकारे अजिंक्यतारा मोगलांच्या ताब्यात गेल्यामुळे किल्ल्यावर केलेल्या सुविधांची बरीच तोडफोड झाली व कोणत्याही सुविधा शिल्लक राहिल्या नाहीत. त्यानंतर आझमतारा किल्ला इ.स. १७०६ मध्ये महाराणी ताराबाईने परशुराम पंताकडून जिंकून घेतला. त्याचे अजिंक्यतारा असे नाव रूढ करण्यात आले. २० फेब्रुवारी १७०७ रोजी मोगल बादशहा औरंगजेबाचा मृत्यू झाला. त्या दिवसापासून मोगल–मराठे संघर्ष संपुष्टात आला.[३२]

### १.१६.४ छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील सातारा शहर

छत्रपती राजाराम महाराजांची सातारचा किल्ला राजधानी म्हणून उपयोग केला परंतु त्यावेळी या किल्ल्याखाली फारशी वस्ती नव्हती. छत्रपती शाहू महाराजांनी १२ जानेवारी १७०८ रोजी सातारा किल्ल्यावर स्वतःस राज्याभिषेक करवून घेतला व अष्टप्रधान मंडळाची

निर्मिती केली. छत्रपती शाहू महाराजांचे आसन स्थिर झाल्यावर त्यांनी या ठिकाणास राजधानीस योग्य असे रुप देण्यास सुरूवात केली. छत्रपती शाहू महाराजांचे आयुष्य औरंगजेब बादशहाच्या छावणीत गेल्याने त्यांना सपाट प्रदेशात राहण्यास आवडत होते. यासाठी त्यांनी किल्ल्याच्या खाली वस्ती करण्यास सुरूवात केली. ही वस्ती करताना ज्यांनी पुढाकार घेतला. त्यानां महाराजांनी उत्तेजन दिले. या वस्तीच्या भागास प्रथमतः त्यांनी वारांची नावे दिली होती. यामुळे सात वारांची नावे पेठांना आहेत. या सात भागातच इतर लहान लहान भाग पडून त्यांना निरनिराळी नावे मिळाली. ती पुढे क्रमशः येतील. या सात पेठांचा पाया माची ही पेठ होय. या पेठेत उभे राहून आपण शहराकडे दृष्टी टाकली तर आपल्या डावीकडून पेठांचा क्रम लागतो. छत्रपती शाहू महाराजांनी किल्ल्यावर स्वतःस व राजपरिवारास राहण्यासाठी टोलेजंग राजवाडा बांधून त्यांनी किल्ल्यावर स्वराज्याचा कारभार पाहण्यास सुरूवात केली. पुढील काळात राज्यविस्तार वाढून प्रशासनाचा व्याप वाढला. त्यामुळे सर्व कारभार किल्ल्यावरून पाहणे गैरसोयीचे झाले. यास्तव त्यांनी किल्ल्याच्या पायथ्याशी राजधानीचे शहर वसविण्याचे ठरविले. त्यानुसार त्यांनी सन १७२० मध्ये किल्ल्याच्या पायथ्याशी उत्तरेच्या बाजूला पूर्वपश्चिम रस्ता बांधून नवीन नगर वसविले. त्यांच्या नावावरून त्यास शाहूनगर हे नाव पडले.[३३]

छत्रपती शाहू राज्याचा कारभार पाहू लागले. त्यावेळी सातारा हे राजधानीचे ठिकाण होते. छत्रपती शाहूच्या राज्याचा विस्तार वाढू लागल्याने शाहू व त्याचे मंत्री, सरदार हे वाडे बांधून राहू लागले. छत्रपती शाहूच्या काळात प्रारंभी पाणीपुरवठयाचे नळ नसल्याने विहिरी खणून पाण्याची सोय केली जात होती. त्यामुळे या पेठातून विहिरींचे मोठे प्रमाण पाहावयास मिळते. पुढे छत्रपती शाहूने खापरी नळाद्वारे यवतेश्वर डोंगरावरून सातारा शहरास पाणीपुरवठयाची सोय केली. तसेच किल्ल्यावरून राजधानी पायथ्याला आणल्याने सातारा शहराचा आणखी विस्तार झाला.[३४]

### १.१६.५ छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील सातारा शहराचा विकास

छत्रपती शाहूच्या काळात साताराची जी जुनी वस्ती होती त्यामध्ये माची, मंगळवार पेठ, चिमणपुरा पेठ, शुक्रवार पेठ, व्यंकटपुरा पेठ, यादोगोपाळ पेठ व केसरकर पेठ, रघुनाथपुरा, राजसपुरा व दुर्गा पेठ व संगममाहुली इत्यादी पेठा वसविल्या तर वाडयाचे बांधकामामध्ये अदालतवाडा, रंगमहाल, तख्ताचा वाडा, महादरे व गेंडामाळ एवढाच विस्तार होता. तेव्हा याची

सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे–

**१) माची–**

माची पेठ ही अजिंक्यतारा किल्ल्याच्या पायथ्यास आहे. या पेठेतील वस्ती ही मुळचीच आहे. या पेठेच्या कडेने बोगद्याकडे रस्ता गेला आहे. या पेठेत रंगमहाल, अदालतवाडा, बोगदा व खतिबाची मशिद इत्यादि स्थळे आहेत.

या पेठेत ढोल्या गणपतीचे मंदिर आहे. या गणपतीस मंत्रीचा गणपती असेही म्हणतात. याचे कारण या गणपती मंदिराशेजारी मंत्री यांचे वसतीस्थान होते हे मंत्री घराणे सध्या उरण इस्लामपूर येथे राहत आहे. या मंदिरातील मूर्ती मोठी असून टेकून बसलेली आहे.[३५]

सातारा येथे छत्रपती शाहू महाराजांनी खतिब यांचे घराणे आणले. हे खतिब घराणे छत्रपती शाहू महाराज औरंगजेब बादशहाच्या कैदेत असताना त्यांचा योगक्षेम ज्या बिबिसाहेबांचे कृपेने योग्य प्रकारे चालला, त्याचे स्मरणार्थ खतिब घराणे साताऱ्यात आणून त्यांच्यासाठी या पेठेत एक मशीद बांधली आहे. या मशिदीस खतिबाची मशीद असे म्हणतात. तिचा खर्च छत्रपती शाहू महाराजांच्याकडून केला जात होता. या ठिकाणी जो ताबूत होतो त्यास महाराजांचा ताबूत असे म्हणतात. साताऱ्यातील मुसलमान घराण्यात हे सर्वात जुने घराणे आहे.

खतिबाच्या मशिदीच्या पूर्वेस शेखमिरे यांची पागा होती. शेखमिरे हे आदिलशाहीत वाईचे सुभेदार होते. त्यांनीच प्रतिनिधीस कैद करून सातारचा किल्ला शाहूस मिळवून दिला होता. म्हणून शेखमिरे यांना ही जी जागा दिली होती. तिला माची असे म्हटले जात होते. माचीवर अदालतीच्या वाडयाच्या पलिकडे खतीबाचे घर व मशीद आहे. तसेच डफळयाची पागा, अक्कलकोटकरांचा वाडा व पिंगळयांचा वाडा याचे अवशेष आहेत.[३६]

माची भागातून उरमोडीखोऱ्यात डोंगर ओलांडून जाणे त्रासाचे होते. दक्षिणेकडे कराडकडे किंवा परळी किल्ल्याकडे जाण्यासाठी बोगदा बांधण्याचे काम सन १८५५ मध्ये कॅ.पी.एल.हॅरी याच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले. त्यावेळी ओगिल्व्ही हा साताऱ्याचा कमिशनर होता. या बोगद्यासाठी एकूण २९००० रूपये खर्च आला होता.[३७]

माची पेठेतील रंगमहालच्या पूर्वेस अक्कलकोटकर भोसले यांचा वाडा होता. छत्रपती शाहूने मानलेला मुलगा फत्तेसिंग यास अक्कलकोटची जहागीर दिली होती. या ठिकाणी सन १८८२ पासून बौद्धवस्ती आहे. या अक्कलकोटकरांची पागा शुक्रवार पेठेत होती.

या पेठेत शंकरचार्याचा मठ आहे. या मठाशेजारी कोठीचा वाडा आहे. छत्रपती शाहू महाराजांनी या वाडयाचा उपयोग राजघराण्यास लागणाऱ्या सामानाच्या साठयासाठी केला जात होता. या वाडयात एक दगडी भूयार आहे.[३८]

## २) मंगळवार पेठ

इ.स.१७०० मध्ये मंगळाईचा बुरूज औरंगजेबाच्या बाजूने उडवून देणारे डफळे नावांचे सरदार होते. ते पुढे शाहूचे मांडलिक झाल्याने त्यांचा वाडा या ठिकाणी होता. या पेठेत दिवेकरांचा हौद नावाने ओळखला जाणारा हौद छत्रपती शाहू महाराजांनी बांधला होता.

थोरल्या शाहूची चौथी राणी सगुणाबाई हिला धनीण म्हणत होते. तिची राहण्याची सोय ज्या ठिकाणी केली होती. त्या बागेस धनिणीची बाग असे म्हटले जाते. या ठिकाणी बंगलेवजा एक वाडा बांधलेला होता. तो वाडा २३ एप्रिल १८७५ रोजी जळाला. येथे आंबा, फणस, नारळ, देवदार वगैरेंची झाडे होती. ही बाग 'रयत शिक्षण संस्थेकडे' असून त्यामध्ये त्यांची प्राथमिक शाळा आहे.

या पेठेत काळाराम मंदिर आहे. या मंदिरातील मूर्ती काळया पाषाणाची आहे. गुजराचे भाई घराण्याने छत्रपती प्रतापसिंह महाराजांना फार मोठया प्रमाणावर मदत केली होती. त्यामुळे छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी गुजर भाईकडे वंशपरंपरागत खजिनदारी दिली होती. त्याला दरमहा १५० रूपये पगार होता. या गुजरांनी या पेठेत एक मंदिर बांधले होते. हे मंदिर भाईचा राम अगर गुजराचा राम या नावाने ओळखले जाते.

सन १८२०–३० च्या दरम्यान विठोबाचे मंदिर जोती गोपाळा देशपांडे उर्फ जोतीपंत दादा महाभागवत यांनी बांधले. या मंदिराजवळ पाण्याचा एक उसासा आहे. म्हणून त्या देवळास विठोबाचा नळ असे म्हणतात. मंगळवार पेठेतच फरासखाना मोडतो. महाराजांच्या दरबारातील कपडे स्वच्छ ठेवण्याचे हे ठिकाण होते. त्यासाठी जवळच एक तळे होते. त्या पाण्याचा उपयोग सरकारी कपडे धुण्यास व जवळच्या बागेस होत असे. इंग्रज सरकारने नगरपालिकेस ही इमारत २००० रूपयास विकली.[३९]

## ३) चिमणपुरा पेठ

छत्रपती राजाराम महाराज हे खानदेशवर स्वारी करून परत आले. पण आपल्यातर्फे त्यांनी परसोजी भोसले यास खानदेशात ठेवले. या भोसल्यास मदत म्हणून मोघे यांची नेमणूक

झाली. छत्रपती शाहू दक्षिणेत आले. तेव्हा मराठयाकडील सरदार मोघे हा प्रथम शाहूस मिळाला. छत्रपती शाहूस सातारा येथे येण्यास त्यानेच मदत केली. चिमणाची मोघे याच्यावर छत्रपती शाहूची राणी सगुणाबाई हिचा पूर्ण विश्वास होता. व बम्हेंद्रस्वामी धावडशीकर यांचे लक्ष होते. या कारणाने तो सरदारकीत राहिला. पहिले बाजीराव पेशवे यांचे दाभाडयांशी युद्ध झाले. त्यात हा सरदार दाभाडयाचे बाजूने लढला. यामुळे त्यास छत्रपती शाहू महाराजांच्या पक्षाकडील बाजीरावाकडून हकालपट्टी झाली. त्यामुळे तो काही दिवस करवीरकरांच्याकडे नोकरीस राहिला. म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी त्यास समज दिली आणि त्याला आपल्या पक्षात घेतले. त्यास खानदेशात एक जहागिर दिली. याच चिमणाजी दामोदर मोघे याने ही पेठ वसविली. त्याच्या नावावरून चिमणपुरा नाव पडले आहे. त्याची पागा या पेठेत होती. जळगाव जवळ रिंगणगाव येथे यांचे एक वंशज आहेत.[४०]

ढवळपुरा म्हणून एक भाग चिमणपुऱ्यात आहे. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात कापडाचा धंदा फार महत्त्वाचा होता. कापडाची मोजदाद करण्यासाठी त्या काळात सोने चांदी प्रमाण करीत असत. प्रत्येक सरदार आपल्या गावी कापड विकणारे लोक बाळगत असत. छत्रपती शाहू महाराजांना शिकारीप्रमाणेच मासेमारीचा छंद होता. मासे गळाने मारीत असत. त्यासाठी बारीक सूत लागे, ते सूत बुऱ्हाणपूरहुन आणले जात असे. ही उणीव भरून काढण्यासाठी कापडी शिंपी लोकांची वस्ती येथे केली. या लोकांमध्ये ढवळे नावाचा शिंपी प्रमुख होता. म्हणून या भागास ढवळपुरा म्हणत असत.[४१]

### ३) शुक्रवार पेठ

छत्रपती शाहू महाराजांचे पूर्वापार कारभारी, आश्रित व सेवेकरी आदि छत्रपतींशी संबधित मंडळी प्रामुख्याने या भागात वस्ती करून आहेत. या पेठेत मोती तळे, बाजीरावाची विहीर, जलमंदिर, गोजरा साहेबांचा वाडा, गंजीखाना व  गोसावीपुरा ही ऐतिहासिक दर्शनीय स्थळे या पेठेतच आहेत.[४२]

छत्रपती शाहू महाराजांच्या काळात त्यांच्या जनावरांना वैरण, गवत लागे. त्यांच्या गंजी लावून ठेवीत. गंजीकरिता खुली जागा असे. या जागेस गंजीखाना असे म्हटले जात होते. इ.स.१९०५–०६ पासून तेथे शिवाजी क्लब ही संस्था स्थापन केली आहे.

या पेठेतच गोसावीपुरा आहे. मराठी अंमलात फार मोठया प्रमाणावर सावकारी धंदा करणारे गोसावी लोक प्रसिद्ध आहेत. हे लोक राजे, सरदार, जहागिरदार यांना कर्ज देत असत. यामुळे यांची वस्ती मुख्यतः शहरात आहे. ही वस्ती गेंडामाळाकडून कोटेश्वराकडे पसरलेली होती. त्यांच्या वाडयावरूनच त्यांच्याजवळ असलेल्या संपत्तीची कल्पना येते.[४३]

**४)व्यंकटपुरा पेठ**

इचलकरंजी संस्थानचे संस्थापक घोरपडे यांच्या घराण्यात व्यकंटराव नावाचे गृहस्थ होऊन गेले. त्यांची पागा या पेठेत होती. व्यंकटराव हा पेशवा बाळाजी विश्वनाथ याचा जावई होता. त्याने कोकणातून ब्राह्मण कुटुंबे आणून या पेठेत वसविली. तेथे पाण्याच्या सोईसाठी एक विहीर खणली होती. त्याच्या नावावरूनच या पेठेस व्यंकटपुरा पेठ पड्ले.[४४]

**५) यादोगोपाळ पेठ**

छत्रपती शाहू महाराजांच्या काळात यादव गोपाळ खटावकर नावाचा एक महाराणी ताराबाईचा कारभारी होता. त्याच्या नावावरून या पेठेला यादव गोपाळ पेठ हे नाव पडले आहे. या पेठेतील मारूतीचे मंदिर ही त्या काळातील सातारा शहराची उत्तर बाजूची सीमा होती. हा मारूती वेशीतील मारूती म्हणून प्रसिद्ध होता. खटावकरांचे वंशज आजही तेथे राहतात. त्यांना जामदारखाने म्हणतात.

या पेठेस पेठखालसा असे म्हणतात. कारण यादव गोपाळ यास छत्रपती शाहूने खालशाचे उत्पन्नाची बाब तोडून दिली होती. यावरून यादव गोपाळ खालशे हे आडनाव पडले होते. सातार्‍यास सचिवांचा वाडा आहे. सरकारी पीलखान्याचा खर्च सचिवाने भागवावा असे ठरले होते. यादव गोपाळ पेठेतच पीलखाना होता. तो पूर्वी रंगमहालाजवळ होता. छत्रपती शाहू महाराजांची स्वारी रंगमहालातून निघून अदालतीवरून यादव गोपाळ पेठेतून वाडयात जात असे.[४५]

छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात शंकराजी नारायण गाडेकर ही व्यक्ती रामचंद्रपंत अमात्य यांचे हाताखाली काम करीत असत. त्यांना छत्रपती राजाराम महाराज यांनी सचिव म्हणून नेमले होते. मराठा काळात त्यांचे वंशज त्याच ठिकाणावर राहिले होते. छत्रपती प्रतापसिंह महाराज यांना जो मुलुख मिळाला. त्यात यांचा प्रांत आला. त्यामुळे ते त्यांचे मांडलिक बनले. इ.स.१८४८ मध्ये सातारा संस्थान खालसा झाले त्यावेळी त्यांचा संबंध हा

कलेक्टरशी आला. तेव्हा त्यांना सातारा येथे नेहमी यावे लागत होते. त्यासाठी त्यांनी एक वाडा बांधला. या वाडयास भोरकरांचा वाडा असे म्हणतात.

या पेठेत छत्रपती शाहू महाराजांनी अपराधी लोकांना बंदोबस्तात ठेवण्यासाठी एक छोटा तुरूंग बांधला आहे. या तुरूंगास धाकटा परज असे म्हणतात.[४६]

**६) केसरकर पेठ**

औरंगजेब बादशहाच्या आज्ञेने मुघल सरदार झुल्फिकारखान याने राजधानी रायगड येथून छत्रपती शाहू महाराजांना पकडून नेले होते. त्यावेळी या लोकांत जोत्याजी केसरकर हा मराठा नोकर होता. त्याने निष्ठेने छत्रपती शाहू महाराजांची सेवा केली. त्यामुळे कैदेतून सुटून आल्यावर छत्रपती शाहू महाराजांनी त्याला बिनीचा सरदार केले. त्याचे घर या पेठेत होते. छत्रपती शाहू महाराज ज्यावेळी दसऱ्याचे दिवशी मिरवणुकीत जरी पटका व भगवा झेंडा धरण्याचा मान केसरकरास असे. त्याचे वंशज या पेठेत राहतात. गोपाळराव पंडितराव राजोपाध्ये यांनी या पेठेत अमृतेश्वराचे मंदिर बांधले. त्याचा जीर्णोद्धार कृष्णराय अमृतराय यांनी केला.[४७]

**७) रघुनाथपुरा पेठ**

रघुनाथपुरा पेठेत माळी राहत असत. हे माळी छत्रपती शाहू महाराजांनी करंजे व बुधवार पेठेत ज्या खाजगी बागा लावल्या आहेत. त्यात काम करीत असत. या पेठेचे नाव बाजीरावाचा मुलगा रघुनाथ याच्या नावावरून पडले आहे. ही पेठ सातारा शहरात उत्तरेच्या बाजूस आहे.[४८]

**८) राजसपुरा**

छत्रपती शाहू महाराजांना राणी सगुणाबाईपासून राजसबाई नावाची मुलगी झाली. ही मुलगी लहानपणीच मरण पावली. तिच्या नावावरून या पेठेस राजसपुरा हे नाव पडले.या पेठेत मुसलमान वस्ती मोठया प्रमाणावर आहे.

**९) बसाप्पा पेठ–**

छत्रपती शाहू महाराजांच्या कोठीवर बसाप्पा नावाचा एक लिंगायत जातीतील व्यक्ती अधिकारी म्हणून काम करीत होता. त्याच्या स्वामीनिष्ठेवर व प्रामाणिकपणावर खुश होऊन छत्रपती शाहू महाराजांनी त्यास खूप मोठी रक्कम बक्षीस दिली. त्याने त्या बक्षिसाच्या रक्कमेतून

शिखर शिंगणापूरच्या महादेवाच्या देवालयाचा जिर्णोद्धार केला. करंजे गावच्या दक्षिणेकडील भागात महाराजांनी एक नवीन पेठ वसविली. त्या पेठेस 'बसाप्पा पेठ' असे नाव दिले.

**१०) संगम माहुली–**

सातारा शहरापासून पाच कि.मी.अंतरावर कृष्णा व वेण्णा या दोन नद्यांचा संगम झाला आहे. हे ठिकाण अतिशय पवित्र तीर्थक्षेत्र समजले जाते. छत्रपती शाहू महाराजांच्या आज्ञेवरून पंतप्रतिनिधीनी इ.स.१७१९ मध्ये संगमानजीक ४० ब्राह्मण कुंटुबाची वसाहत केली. त्यांना स्नान, संध्या विधी करून राजाचे शुभचिंतन करण्यासाठी साडेपाच चावर सात बिघे जमीन पाटखळ येथील इनाम दिली. त्या वसाहतीस संगम माहुली असे नाव देण्यात आले.[४९]

**११) वाडयाचे बांधकाम**

**१) अदालतवाडा–**

छत्रपती शाहू महाराजांनी किल्ल्याच्या पायथ्याशी सन १७२० मध्ये डोंगर उतारावर अदाालतवाडा बांधला. या वाडयाचे जोते १० फूट उंच असून संपूर्ण इमारतीची लांबी व रूंदी २२५ फूट व १६० फूट आहे. या वाडयातील आरसे महाल नगारखाना व भव्य दरवाजा आहे. या वाडयात मराठी राज्याचे मुख्य न्यायालय होते. छत्रपती शाहू महाराज, पंतप्रधान पेशवे व मुख्य न्यायाधीश नियमितपणे रयतेची गाऱ्हाणी ऐकून घेण्यासाठी या वाडयात बसत असत. खटल्याची पूर्ण चौकशी करून निकाल देत असत. अदालतवाडयाच्या पश्चिमेस फत्तेसिंग भोसले यांना वाडा बांधून देण्यात आला होता.[५०]

**२)रंगमहाल–**

रंगमहाल ही वास्तू अदालतवाडयाच्या पूर्वेस सुमारे २०० मी. अंतरावर आहे. मूळ इमारत ३० मी.लांब व १५ मी. रूंदीची असून नवीन इमारत जोडून बांधली आहे. मूळ इमारत तीन मजली हेती. शाहूच्या राण्यांचा राणीवसा येथे होता म्हणून या इमारतीस रंगमहाल असे नाव देण्यात आले आहे. छत्रपती शाहू महाराजांचे या वाडयातच निधन झाले. इमारतीसमोर सेनापतीचा वाडा होता. रंगमहालाच्या उत्तरेस दोन शाखा असलेली आयताकृती इमारत आहे. त्यातील एका इमारतीचा वापर राजांचे हत्ती बांधण्यासाठी केला जात असे. सन १८५७ च्या उठावात शिर्क्यावर आरोप ठेवून ती इमारत सरकारजमा करण्यात आली.[५१]

### ३) तख्ताचा वाडा

सन १७२० मध्ये रंगमहाल वाडयाच्या उत्तरेस राज्यकारभारासाठी हा वाडा बांधला. या वाडयात दरबार भरत असे तेथे छत्रपतींचे सिंहासन होते. म्हणून त्यास ‘तख्ताचा वाडा’ असे म्हणत असत. या वाडयाशेजारी छत्रपती शाहू महाराजांच्या अष्टप्रधान मंडळातील पंडितराव मुद्गल भट उपाध्ये यांचा वाडा होता.

### ४)महादरे

छत्रपती शाहू महाराजांनी गाईची खिल्लारे बाळगली होती. ती सांभाळण्यासाठी लोकांची कायमची वसाहत यवतेश्वराच्या डोंगर पायथ्याशी करून दिली. त्या वसाहतीस महाराजांनी ‘महादरे’ असे नाव दिले.

### ५) गेंडामाळ

छत्रपती शाहू महाराजांना प्राण्याचा संग्रह करण्याची आवड होती. त्यामुळे त्यांनी सातारा शहरात एक प्राणी संग्रहालय तयार केले होते. या संग्रहालयात चांगल्या जातीची कुत्री, घोडी, वनगायी, कस्तुरी मृग, हरीण, हत्ती, वाघ इत्यादी विविध प्रकारचे प्राणी बाहेरील प्रांतातून आणून ठेवले होते. शहराच्या उत्तरेकडील भागात एक गेंडा पाळलेला होता. त्या भागास गेंडामाळ असे नाव प्राप्त झाले.[५२]

अशा प्रकारे छत्रपती शाहू महाराजांच्या काळात सातारा शहराची वस्ती होती. ही वस्ती वसविण्याकामी छत्रपती शाहू महाराजांचे योगदान मोठे होते. पुढे ब्रिटिश काळात प्रतापसिंह महाराज व त्यानंतरच्या छत्रपतींनी सातारा शहराचा विस्तार केला होता. ब्रिटिशांनी सातारा शहराचा विकास करत असताना वेगवेगळया पेठांना वेगवेगळी नावे दिली होती.

## १.१७ छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या काळातील सातारा शहराचा विस्तार

छत्रपती प्रतापसिंह महाराजांचे कारकिर्दीत पुढील नवीन पेठा वसविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये भवानी पेठ, सदाशिव पेठ, दुर्गा पेठ, मल्हार पेठ, प्रतापगंजपेठ, जुना राजवाडा व जुने जलमंदिर इत्यादीची निर्मिती करून सातारा शहराचा विकास केला. तेव्हा या पेठेची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे

**१) भवानी पेठ–**

आजची ही मारवाड आळी आहे. या पेठेचे नाव भवानी देवीच्या नाववरून पडले आहे. ही पेठ राजवाडयाशेजारी व राजपथाच्या दोन्ही बाजूस ३४ एकर जागेत वसविण्यात आली. या पेठेत व्यापारी व दुकानदारांना रस्त्यालगत दुकाने व घरे बांधण्यास जागा दिल्या. या पेठेच्या पाणी पुरवठयासाठी १९ नवीन विहिरी, दोन साठवण टाक्या व एक कारंजे बांधण्यात आले. छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी भवानी पेठेत रस्त्याच्या उत्तरेकडील बाजूस त्यांचा विश्वासू सेवक नरसू काकडे यास दोन टोलेजंग वाडे बांधून दिले होते. त्यापैकी एक काकडेवाडा त्यांच्या वंशजाकडे असून त्याच्या पूर्वेकडील वाडा रहिमतपूरकर माने यांनी खरेदी केला. त्याचे समोर दक्षिणेकडील बाजूस चिटणीसांचा वाडा होता.

**२) सदाशिव पेठ–**

ही पेठ सन १८२२ मध्ये सुमारे १० एकर जागेत भवानी पेठेच्या जवळ वसविण्यात आली आहे. या पेठेच्या पाणीपुरवठयासाठी नवीन १४ विहिरी खोदण्यात आल्या आणि एक साठवण टाकी बांधण्यात आली होती.

**३) दुर्गा पेठ–**

सन १८३० मध्ये ही पेठ राजपथाच्या उत्तर व दक्षिणेस दोन एकर जागेत वसविण्यात आली. पानगाव येथील एका गरीबाच्या घरी गुप्तपणे महाराणी ताराबाई यांचा नातू रामराजांचा सांभाळ दुर्गा नावाच्या दाईनीने केला होता. तिच्या स्मरणार्थ ही पेठ वसविण्यात आली. छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या काळात या पेठत मांग लोकांची फार मोठया प्रमाणावर वस्ती होती. हे मांग छत्रपती प्रतापसिंह व आप्पासाहेब महाराजांच्या तोफखान्यात असत. या पेठेत एक सुंदर व मोठी मशीद आहे. ती मशीद बांधण्यास एक लाख रूपये खर्च आला होता. ही मशीद बुवासाहेब महाराजांनी आपली कलावंतीण अमीना हिच्या सांगण्यावरून बांधली होती. या मशीदीला महाराजांकडून नेमणूक आहे. या मशीदीत भाविक मुसलमान प्रार्थना करण्यास जात नाहीत. कारण ती कलावंतिणीची आहे. मशिदीसाठी लागणारा पैसा चांगल्या मार्गाने मिळविलेला असावा अशी धर्माची आज्ञा आहे. या पेठेतच एक जुने शासकीय रूग्णालय आहे.[५३]

**४)मल्हार पेठ–**

ही पेठ सन १८३० मध्ये गुरूवार पेठ नजीक दहा एकर जागेत वसविण्यात आली. या पेठेच्या पाणी पुरवठयासाठी नवीन चार विहिरी खोदण्यात आल्या व एक साठवण टाकी बांधण्यात आली. तसेच जनावरांना पाणी पिण्यासाठी दोन कोंडाळी बांधण्यात आली होती. छत्रपती रामराजांचा सांभाळ पानगाव येथील मल्हार नावाच्या सेवकाने अतिशय प्रामाणिकपणे केला होता. त्याचे स्मरणार्थ ही पेठ वसविण्यात आली. या पेठेत एक धर्मशाळा असून ती मुघल सरदार दौलतखान याने बांधली. या पेठेत एक पंचमुखी मारूतीचे मंदिर आहे. या पेठेत तेली व चांभार लोक राहतात. या पेठेत तुरूंग व पोलीस मुख्यालय आहे.

**५) प्रतापगंज पेठ–**

ही सदाशिव पेठेच्या उत्तरेस छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी सन १८३३–३४ साली वसविण्यात आली. या पेठेत घरे बांधण्यासाठी शेटे व महाजन या लोकांना जागा देण्यात आल्या होत्या. प्रतापगंज पेठ व भवानी पेठ वसविताना मधून वाहणाऱ्या ओढयावर नवे भक्कम पूल बांधण्यात आले होते. ते अद्याप सुस्थितीत आहेत. प्रत्येक पेठेत रस्त्याच्याकडेला कोंडाळी बांधून जनावरांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली होती. ही पेठ वसविली आहे. म्हणून तिला प्रतापगंज पेठ असे म्हटले जाते. प्रतापसिंह महाराजांनी मारवाडी, गुजर, शिंपी वगैरे अनेक धंद्याच्या व जातीच्या लोकांना बोलावून आणून त्यांना जागा देऊन त्यांची वस्ती केली. हळूहळू या पेठेचा विस्तार होत गेला.[५४]

**६) जुना राजवाडा–**

छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी हा राजवाडा इ.स.१८२४ मध्ये बांधला. या वाडयाचा दरवाजा फार मोठा आहे. या वाडयाच्या पहिल्या मजल्यावर सभागृहाच्या भिंती, स्तंभ खिडक्या प्रवेशद्वार यावर भित्तिचित्रे काढलेली आहेत. भिंतीच्या वरील बाजूस पिसारा फुलविलेली मोरांची जोडी काढलेली आहे. सध्या या वाडयात प्रतापसिंह हायस्कूल भरविले जाते.[५५]

**७) जुने जलमंदिर–**

छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी सन १८२४–२५ मध्ये हे जलमंदिर बांधले. ही इमारत एकमजली असून पूर्वी या इमारतीला गोल बंगला असे म्हटले जात होते. या इमारतीत एका

खोलीच्या भिंतीत व  छतात आरसे बसविले आहेत. तसेच इमारतीच्या सभोवती अनेक कारंजे बसविले आहेत. या इमारतीजवळच एक उद्यान असून त्याच्याजवळ तलाव आहे.[५६]

## १.१८ छत्रपती आप्पासाहेब महाराजांनी बांधलेल्या वास्तू

छत्रपती आप्पासाहेब महाराजांच्या काळात सातारा शहरात नवीन राजवाडा व नवे जलमंदिर निर्माण केले असून त्यामुळे सातारा शहराच्या विकासात भर पडली.

### १)नवीन राजवाडा–

हा राजवाडा छत्रपती आप्पासाहेब महाराजांनी इ.स.१८४४ मध्ये बांधला. या वाडयाच्या पुढील मंडपाची लांबी २५ मी., रूंदी १२.५ मीटर व उंची ७.५ मीटर आहे. वाडयात दोन्ही बाजूस दोन कारंजे तयार करण्यात आली होती. छतातील लाकडी वास्यामुळे अकरा खण निर्माण झाले असल्याने सभागृहास अकरा खणी सभागृह असे म्हणतात. सभागृहाच्या दक्षिणेस असलेल्या भिंतीत खिडक्या व प्रवेशद्वार बांधून भित्तिचित्रावर प्रकाशाची योजना केली आहे. तेथून वायूविजनही होण्यास मदत झाली आहे.[५७]

राजवाडयातील  भिंतीवर रामायण व महाभारत या महाकाव्यातील अनेक प्रसंगावरील चित्रे काढलेली आहेत. ही भित्तिचित्रे वाई व मेणवलीच्या भित्तिचित्रापेक्षा वेगळया शैलीची व त्यानंतरच्या कालावधीतील आहेत. या भित्तिचित्रामधील मांडणी, सामग्री व रेखाटन पूर्ण मराठा शैलीची आहेत. येथील रंगही वाई मेणवलीचा रंगाप्रमाणे वापरलेले आहेत.[५८]

### २) नवे जलमंदिर

छत्रपती आप्पासाहेबांनी नवे जलमंदिर इ.स.१८४५ मध्ये बांधले. या नवीन जलमंदिरात एक   खोली आहे. या खोलीच्या चारही बाजूस आरसे बसविले आहेत. म्हणून त्याला आरसे महाल असेही म्हणतात. जलमंदिराच्या पाठीमागील बाजूस बदामाच्या आकाराची एक विहीर आहे. या विहिरीत गणपतीची मूर्ती आहे. उत्तरेच्या बाजूस एक मोठी विहिर आहे. तिला बाजीरावाची किंवा पेशव्यांची विहीर असे म्हणतात. या वाडयाजवळ एक भवानीदेवीचे मंदिर आहे. छत्रपतीचे खाजगी दैवत आहे. २३ जुलै १९५२ रोजी जलमंदिरातील ४३५ भार वजनाच्याा सोन्याच्या मूर्ती चोरीस गेल्या. नंतर सुमित्राराजे भोसले यांनी चांदीच्या मूर्ती करून त्यांची मंदिरात स्थापना केली.[५९]

## १.१९ ब्रिटिश काळातील सातारा शहराचा विस्तार

ब्रिटिश काळात सातारा शहरात ज्या नवीन पेठा वसविल्या होत्या, त्यांची नावे गोसावीपुरा, शनिवार पेठ, सोमवार पेठ, गुरूवार पेठ, बुधवार पेठ, रघुनाथपुरा पेठ, राजसपुरा, बसाप्पाची पेठ, पंताचा गोट, दुर्गा पेठ, व रविवार पेठ इ. आहेत. त्यांची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे–

### १)गोसावीपुरा–

या पेठेत गोसावी लोकांची वस्ती मोठया प्रमाणावर आहे. त्यांचे चार मठ आजही तेथे आहे. हे गोसावी लोक पुर्वी सावकारीचा धंदा करीत असत. मराठे सरदारांना व राजेराजवाडयांना ते कर्जे देत, त्याच्यांत गिरी, पुर व भारती वगैरे दहा पंथ आहेत. त्यावरूनच त्यांना दशनाम गोस्वामी ही संज्ञा आहे. त्यांच्यातील एका दानशूर लवंगगिरी गोसाव्याने कोटेश्वराचे मंदिर बांधले. कारण लिंब गोवे येथील कोटेश्वराच्या दर्शनासाठी जाण्या–येण्यास त्याच्या वृद्धत्त्वामुळे त्रास होऊ लागला होता. त्याने बांधलेल्या मंदिराची रचना लिंब–गोव्याच्या मंदिरासारखीच आहे. या मंदिराशेजारी जतीचा मठ, दारूवाल्याचा मठ, नारायण भारती गुरू भगवान भारती यांचा मठ आहे. या मंदिर परिसरात उंचवटयावरील वाडयात काशीगिरीचा मठ आहे. तसेच गुलाबपुरी या नावाचा मठही येथे आहे.

या पेठेच्या उत्तरेस गेंडा–माळ म्हणून छत्रपती शाहू महाराजांचा शिकारीसाठी राखीव माळ आहे. यास दत्ताचा माळ असेही म्हणतात. येथेच सध्या शाहूपुरी नावाची नवीन पेठ वसलेली आहे. गेंडामाळाला लागूनच पश्चिमेस भैरोबाची टेकडी असून या भागातही नवीन वसाहत होत आहे. सन १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झालेल्यांना जेथे फाशीची शिक्षा मिळाली तो 'फाशीचा वड' या परिसरातच आहे.[६०]

### २) शनिवार पेठ

ही सातारा शहरातील सर्वात मोठी पेठ आहे. या पेठेत जुनी ऐतिहासिक अनेक घराणी आहेत. ती म्हणजे बाळाजीपंत नातूंचा जुना वाडा राजवाडा आहे. तेथेच छत्रपती रामराजा राहत असे. हा वाडा प्रतापसिंह महाराजांनी बाळाजीपंत नातूना त्यांनी इंग्रजाकडून राज्य मिळविण्याच्या कामी मदत केल्याबद्दल बक्षिस दिला व जवळच दुसराही एक वाडा बांधून दिला. या वाडयाजवळच्या ओढयावर छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी पूल बांधला आहे. नातूच्या

वाडयासमोर सुमंताचा वाडा आहे. या सुमंताचे वंशज कराड तालुक्यात रिसवड येथे राहतात.[६१]

कासारदेवीचे मंदिर सातारा शहरातील भांडयाचे व्यापारी कासार यांनी बांधले. या कासार समाजात काही महानुभावी लोक आहेत. शनिवार पेठेच्या खालच्या चौकात मुस्लिम धर्मातील सुन्नी पंथायाची नमाज पढण्याची मशीद आहे. जवळच खाटिक बागवानांची दुसरी एक मशीद आहे. ही मशीद फार जुनी आहे.

### ३) सोमवार पेठ

या पेठेत फुटके तळे आहे. या तळयात फारसे पाणी नसते. पर्वी तळयात एक विहीर होती. लोक या पाण्याचा वापर पिण्यासाठी करत असत. कासचे पाणी सातारा शहरात आल्यावर या तळयात पाणी साचू लागले. या तळयाच्या पश्चिमेस महातांची घरे होती. या तळयाला पूर्वी इमामपुरा तळे म्हणत असत.[६२]

### ४) गुरूवार पेठ

गुरूवार पेठेत शिर्क्याचा वाडा व पंडितरावांचा वाडा आहे. शिर्क्यांचे मूळ नाव श्रीक असून छत्रपती शाहू महाराजांची पत्नी सकवारबाई व छत्रपती संभाजीची पत्नी जिजाबाई या शिर्के घराण्यातील होत्या.[६३]

या पेठेतील तक्ताच्या वाडयात प्रारंभीच्या काळात छत्रपती प्रतापसिंह महाराज राहत असत. नवा राजवाडा बांधल्यावर ते त्या राजवाडयात राहावयास गेले. नंतर हा वाडा सगुणाबाई उर्फ आईसाहेब यांच्याकडे गेला. पुढे इंग्रजांनी त्याचा ताबा घेऊन तो वाडा विकून टाकला. या वाडयाजवळ नरसिंहाचे एक लहानसे मंदिर आहे. त्याची व्यवस्था पलुसकरांकडे आहे. या मंदिराशेजारी एक मारूतीचे मंदिर आहे.

गुरूवार पेठेत शंकराचार्यांच्या मठास लागून एक कोठीचा वाडा आहे. राजघराण्यास लागणारे सर्व साहित्य येथे संग्रह करून ठेवले जात असे. तेथे एक भुयार असून ते बंद केले आहे. या पेठेत छत्रपती आप्पासाहेब महाराजांनी कमानीचा हौद बांधला आहे. या हौदाला तीन बाजूंनी सतरा कमानी आहेत. छत्रपती आप्पासाहेब महाराजांच्या काळात एकेक कमानीतून एकेक हत्ती पाणी पिण्यास जात असे. याच पेठेत नकासपुरा म्हणून एक भाग आहे. तेथे सोन्याचांदीवर नक्षीचे काम करणारे लोक राहात आहेत. हे लोक सरदारांना दागिने पुरविण्याचे काम करत असत.[६४]

५) बुधवार पेठ

सातारा शहरात महाबळेश्वर व निंब या गावच्या लोकांना प्रवेश करण्यास बुधवार पेठतूनच प्रवेश करावा लागत असे. येथे प्रतापसिंह महाराजांचे प्राणी संग्रहालय होते. त्याच्याजवळ एक बाग आहे. तिला बुधवार बाग असे म्हणतात. या बागेजवळ म्हतबा नायकिणीचे थडगे व एक मशीद आहे. त्याच्या जवळ दिवाणांचा मळा असून त्यांत एक मोठी विहीर आहे. तिला दिवाणांची विहीर म्हणतात.[६५]

८) बसाप्पा पेठ

छत्रपती शाहू महाराजांच्या काळात बसाप्पा नावाचा एक लिंगायत गृहस्थ कोठीवर होता. त्याने काम प्रामाणिकपणे केल्याने छत्रपती शाहू महाराज त्याच्यावर प्रसन्न झाले व त्यांनी त्याला खूप पैसा दिला. त्याला मूलबाळ नहते. तेव्हा या पैशाचे काय करायचे हा प्रश्न त्याच्या पुढे निर्माण झाला. त्याने तो पैसा छत्रपती शाहू महाराजांना परत करावयाचे ठरविले. दिलेला पैसा म्हणून महाराज परत घेईनात. तेव्हा त्याने तो पैसा महाराजांच्या सांगण्यावरून शिखर शिंगणापूरच्या शंभु महादेवाच्या देवळाचा जिर्णोद्धार केला. म्हणून त्याच्या नावावरून या पेठेचे नाव बसाप्पाची पेठ असे पडले.

९) पंताचा गोट

या पेठेत पंतप्रतिनिधींचा वाडा आहे. पंतप्रतिनिधी या पेठेतच नेहमी उतरत असत. त्यांच्या नावावरूनच या पेठेला पंताचा गोट असे म्हणतात. छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात पंतप्रतिनीधी हा नवा नववा मंत्री नेमण्यात आला. किन्हई गावचे कुलकर्णी परशुराम त्रिंबक यांना या पेठेत वाडा बांधून देण्यात आला. या भागात शासकीय खजीना(ट्रेझरी) व काही कचेऱ्या आहेत. येथेच हजेरी बंगला आहे. हजिरी बंगला म्हणण्याचे कारण येथे शिपायांची हजिरी घेऊन देण्यात येत असे. हा बंगला शेवटच्या दोन छत्रपतींच्या वेळी दौलतखान नावाच्या रिसाल्याच्या मुख्य अधिकाऱ्याचे ठिकाण होते. त्याने हा बंगला घोडयांच्या लिदीच्या विक्रीतून बांधला असे म्हणतात.[६६]

१०) रविवार पेठ–

मुघल सरदार दौलतखान याचे थडगे या पेठेत आहे. त्यानेच हजेरी बंगला व धर्मशाळा बांधली. साताऱ्याहून माहूली, धामणेर, खिंडवाडी, कोरेगाव वगैरे ठिकाणी जाणाऱ्या लोकासाठी

माळावर दगडी रांजण पाणी भरून ठेवीत असत. म्हणून या माळास पोवईचा माळ पूर्वी म्हणत. हल्ली त्याला पोवईचे नाके म्हणतात.

याशिवाय गवळी आळी, तांबट आळी व तांदुळ आळी अशा ते ते धंदे करणाऱ्या लोकांच्या आळया होत्या. पण यंत्र युगामुळे हाताने धंदे करणाऱ्या लोकांचे मूळ धंदे बसले व ते आपली घरेदारे विकून देशोधडीला लागले.

**११) लष्कर–**

सन १८१८ पासून इंग्रजी शिपायांची तुकडी ज्या ठिकाणी राहत होती. त्या भागाला लष्कर असे म्हणतात. या भागात कलेक्टरचा(रेसिडेंट) बंगला, काळया व गोऱ्या शिपायाच्या बराकी, जिमखाना व ख्रिस्ती प्रार्थना मंदिरे आहेत.[६७]

अशा प्रकारे छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्यानंतर ब्रिटिश सत्तानी सातारा शहराचा विकास करण्यासाठी वरीलप्रमाणे निरनिराळया पेठांची निर्मिती केली आहे. ब्रिटिश काळात सातारा शहराचा विकास मोठया प्रमाणावर झालेला आहे. सातारा शहरात हिंदु, मुस्लिम, ख्रिस्ती, जैन, पारशी व बौद्ध धर्माचे लोक एकत्रित राहत आहेत. सातारा शहरात कोणतीही अशी पेठ नव्हती की, त्या पेठेत विशिष्ठ धर्माचे लोक वेगळे राहत आहेत. अशी रचना नव्हती. त्यामुळे शिवकाळापासून जो सर्वधर्मसमभाव आहे . तो सर्वत्र पाळला जात होता. हे सातारा शहरातील पेठेच्या रचनेवरून दिसते.

अशाप्रकारे पेठांच्या निर्मितीमुळे सातारा शहराचा आकार झपाटयाने वाढत गेला. सन १८२२ मध्ये सातारा–पंढरपूर, सातारा कराड, सातारा चिपळूण रस्ते बांधणीच्या कामास सुरूवात झाली. त्याचप्रमाणे सातारा शहरातील पूर्वपश्चिम व डोंगर उतारावरून दक्षिणोत्तर रस्त्यांची बांधणी प्रत्येक पेठ वसविण्यापूर्वी करण्यात आली होती. हे रस्ते बांधण्यासाठी आसपासच्या खेडयातील शेतकरी व कामगार, तुरूंगातील शेकडो कैदी यांचा उपयोग करण्यात आला होता.

सातारा किल्ल्याच्या पायथ्याने बोगद्यापासून पूर्वेस चारभिंतीच्या टेकडीच्या टोकापर्यत म्हणजेच पवई नाक्यापर्यत माची पेठ रस्ता आहे. पोवई नाक्यापासून सातारा–पंढरपूर, सातारा–कराड, सातारा–रहिमतपूर–औंध, सातारा–फलटण रस्ता वडूथ वाठार, लोणंद, तरडगाव असा जातो. सातारा शहरात पाणीपुरवठा सुधारणा, वीजपुरवठा, नगरवाचनालय,

वृत्तपत्रे, शिक्षण सुधारणा, वाणिज्य व्यापार उद्योगधंदे, सातारा इंडियल वर्क्स, अंजिक्य इंडस्ट्रीज, औद्योगिक वसाहत, सातारा नगरपालिका इत्यादीची स्थापना झाली होती. या सुधारणामुळे सातारा शहराचा विकास मोठया प्रमाणावर झालेला आहे.[६८]

## १.२० समारोप

सातारा हे अनेक दृष्टींनी एक लक्षवेधी शहर आहे. ज्या पर्वताच्या पायथ्याशी आणि काही प्रमाणात त्या पर्वतावर ते वसले आहे. तो सहयाद्री हा पृथ्वीच्या पाठीवरील सर्वात जुना पर्वत आहे. अडीच हजार वर्षापासून सातारा भागात लोकवस्ती आहे. इसवी सनापूर्वी दोनशे वर्षे सातारा येथे बौद्ध लोकांचा अमंल होता. त्यापूर्वी आंध्रभृत्याचे राज्य येथे होते. साताऱ्याचा इतिहास म्हणजे एकापरीने अंजिक्यतारा किल्ल्याचाच इतिहास असे म्हटले पाहिजे. कारण या किल्ल्यावर बहुतेक सर्व महत्त्वाच्या घटना घडल्या आहेत. सुमारे ८०० वर्षापूर्वी सातारा हे ठिकाण अगर या नावाचे शहर अस्तित्त्वात नव्हते.

सातारा शहरास प्रागैतिहासिक काळापासून ते आधुनिक काळापर्यत राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक पार्श्वभूमी लाभली आहे. त्यामुळे सातारा शहरास महाराष्ट्राच्या इतिहासात गौरवशाली स्थान प्राप्त झाले आहे . दुर्गमता हे सातारा शहराचे भौगोलिक वैशिष्टय आहे. या वैशिष्टयामुळेच सातारा परिसरातच शिवाजीराजांच्या रूपाने स्वराज्य स्थापनेचा पहिला प्रयोग झाला. सातारा शहराला या वैभवशाली ऐतिहासिक परंपरेचा सार्थ अभिमान आहे. सातारा जिल्हयात घडलेल्या राजकीय  परिवर्तनाचे दुरगामी परिणाम समाजजीवनाच्या सर्वच बाजूंवर झाले.

सातारा शहराचा विकास खऱ्या अर्थाने छत्रपती शाहूच्या काळात झाला. छत्रपती शाहूने अजिंक्यतारा किल्ल्यावरून पायथ्याला शहराचा विकास करून त्यास शाहूनगर हे नाव दिले. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात सातारची जी जुनी वस्ती होती त्यामध्ये माची, मंगळवार पेठ, चिमणपुरा पेठ, शुक्रवार पेठ, व्यंकटपुरा पेठ, यादोगोपाळ पेठ व केसरकर पेठ, रघुनाथपुरा, राजसपुरा व दुर्गा पेठ व संगममाहुली इत्यादी पेठा वसविल्या तर वाडयाचे बांधकामामध्ये अदालतवाडा, रंगमहाल , तख्ताचा वाडा, महादरे व गेंडामाळ एवढाच विस्तार होता. पुढे छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या काळात त्याच्यात वाढ होऊन त्यामध्ये भवानी पेठ, सदाशिव पेठ, दुर्गा पेठ, मल्हार पेठ, प्रतापगंजपेठ, जुना राजवाडा व जुने जलमंदिर इत्यादीची

निर्मिती करून सातारा शहराचा विकास केला. छत्रपती आप्पासाहेब महाराजांच्या काळात सातारा शहरात  नवीन राजवाडा व नवे जलमंदिर निर्माण केले जाऊन सातारा शहराच्या विकासात भर पडली. ब्रिटीश काळात सातारा शहरात ज्या नवीन पेठा वसविल्या होत्या, त्यांची नावे गोसावीपुरा, शनिवार पेठ, सोमवार पेठ, गुरूवार पेठ, बुधवार पेठ, रघुनाथपुरा पेठ, राजसपुरा, बसाप्पाची पेठ, पंताचा गोट, दुर्गा पेठ, व रविवार पेठ इ. आहेत.

आधुनिक काळात सातारा शहरात अनेक सुधारणा होऊन मोठया प्रमाणावर प्रगती झाली. नगरपालिकेच्या साहाय्याने अनेक उपक्रम राबवून सातारा शहरात सुधारणा घडवून आणल्या गेल्या आहेत. त्यामुळे सातारा शहरात राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, सहकार क्षेत्रात बदल घडून आल्याने सातारा शहरास महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

# संदर्भ


१) Gazetteer of the Satara District, 1885, P.551

२) माटे गो.रा., असा घडला जिल्हा सातारा, जानेवारी १९८८, पृ.३

३) कित्ता, पृ.४

४) पाटणे संभाजीराव, अंजिक्यताऱ्यावरून, अंजिक्य, ६६ वे आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सातारा, १९९३, पृ.५१

५) माटे गो.रा., उपरोक्त, पृ.४

६) चव्हाण शिवाजी, सातारा जिल्हयाचा सांस्कृतिक आकृतीबंध सातारा जिल्हा परिषद गौरव गाथा रौप्यमहोत्सवी अंक सातारा, १९८७, पृ.३

७) जोशी वा.वि., सातारा शहरासंबंधी काही जुनी माहिती, भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, एप्रिल १९७३, पृ.२८

८) कित्ता, पृ.३८

९) माटे गो.रा., उपरोक्त , पृ.४१

१०) चव्हाण शिवाजी, उपरोक्त, पृ.३

११) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, पृ.८९४

१२) साळुंखे गणपतराव, असा घडला सातारा, १ ऑगस्ट, २०१२, पृ.६

१३) कित्ता, पृ.७

१४) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त , पृ.७७

१५) कित्ता, पृ.७९–८०

१६) कित्ता, पृ.८१

१७) मिराशी वा.वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ, नागपूर, १९५७, पृ.८३

१८) कित्ता, पृ.८४

१९) काळे विकास, लेखमानपूरचे राष्ट्रकूट नृपती अविधेय यांचा वळई ताम्रपट, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद कोल्हापूर, अधिवेशन बारावे, कोल्हापूर, २००७, पृ.८६)

२०) पानसे मु.ग., यादवकालीन महाराष्ट्र, मुंबई, १९६३, पृ.४२)

२१) कित्ता, पृ.७

२२) कित्ता, पृ.८

२३) कित्ता, पृ.९

२४) कित्ता, पृ.१०, ११

२५) माटे गो.रा. उपरोक्त, पृ.२५

२६) Joshi P.M., The Adilshahi And The Baridi, History of Medival Deccan (1295-1724), Vol.1, P.338

२७) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९६३, पृ.९०३

२८) माटे गो.रा. उपरोक्त, पृ.२५

२९) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड ४, १९८८, पृ.३०४

३०) केपन डेव्हीड, मराठयांची बखर(ग्रँट डफच्या हिस्टरी ऑफ दि मराठाजचे भाषांतर) पृ.७८

३१) Kulkarni A.R.,The Maratha's, History of Medival Deccan, Vol.I, 1989, P.591

३२) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड ३, १९८७, पृ.४९, ५०

३३) माटे गो.रा. उपरोक्त, पृ.२५

३४) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड ४, १९९०, पृ.१९८

३५) सातारा शहर नगरपालिका, शताब्दि महोत्सव स्मृतिग्रंथ, सप्तर्षि आमची शाहुनगरी, प्रजासत्ताक दिन, २६ जानेवारी १९५४, पृ.१६

३६) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९,उपरोक्त, पृ.९०१

३७) Satara Gazetteer 1885, P.560

३८) सातारा शहर नगरपालिका, उपरोक्त, पृ.१६

३९) कित्ता, पृ.१४

४०) कित्ता, पृ.१३

४१) माटे गो.रा. उपरोक्त, पृ.२६

४२) कित्ता, पृ.२७

४३) सातारा शहर नगरपालिका, उपरोक्त, पृ.२२

४४) कित्ता, पृ.२७

४५) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, उपरोक्त, पृ.९०२

४६) कित्ता, पृ.२९

४७) सातारा शहर नगरपालिका, उपरोक्त, पृ.१५

४८) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.९०२

४९) साळुंखे गणपतराव, उपरोक्त, पृ.२१

५०) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.९०३

५१) कित्ता, पृ. ९०३

५२) साळुंखे गणपतराव, उपरोक्त, पृ.२२

५३) कित्ता, पृ.२६

५४) कित्ता, पृ.२७

५५) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.९०४

५६) भोसले एस.एच., सातारा जिल्हयातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा– एक चिकित्सक अभ्यास(१६००ते १९००), एम. फिल. शोधप्रबंध, टि.म.वि.पुणे, ऑक्टोबर २००८, पृ.५२

५७) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.९०४

५८) आपटे द.वि., दिवेकर स.म.(संपा.), शिवचरित्र प्रदिप, शिवापूर दप्तर यादी,पुणे,१९२५ पृ.१०

५९) आमचा सातारा, सातारा शहर नगरपालिका, १९६७, पृ.२४

६०) माटे गो.रा. उपरोक्त, पृ.२८

६१) सरदेसाई गो.स., उपरोक्त खंड–४, पृ.१९८९ ते २०२

६२) माटे गो.रा. उपरोक्त, पृ.२९

६३) सरदेसाई गो.स., उपरोक्त खंड–४, पृ.१९८९ ते २०२

६४) माटे गो.रा. उपरोक्त, पृ.३०

६५) कित्ता, पृ.३१

६६) माटे गो.रा. उपरोक्त, पृ.३१,३२

६७) कित्ता, पृ.३२

६८) साळुंखे गणपतराव, उपरोक्त, पृ.३५ ते ३०

# प्रकरण दुसरे

# सातारा शहराचा राजकीय इतिहास

## २.१ प्रास्ताविक

सातारा परिसरास प्राचीन काळापासून ऐतिहासिक वारसा आहे. प्राचीन काळात सातारा परिसरावर सातवाहन, राष्ट्रकूट, वाकाटक, विष्णुकुण्डिन, कलचुरी, बदामीचे चालुक्य(५४० ते ७०३), कलचुरी, शिलाहार व देवगिरीचे यादव इत्यादी घराण्यांनी राज्य केले होते. मध्ययुगीन कालखंडात सातारा परिसरावर मुस्लिम राजवट यामध्ये सुलतानशाही, बहामनीशाही, निजामशाही व आदिलशाही इत्यादीची राजवट होती. मराठा काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करून सातारा परिसरावर आपली सत्ता निर्माण केली होती. पुढे छत्रपती संभाजी महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य टिकविले तर छत्रपती राजाराम महाराजांनी सातारा शहर हे राजधानीचे ठिकाण बनवून महत्त्व वाढविले होते.

छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात साताऱ्याची राजधानी म्हणून निवड झाली होती. तेव्हापासून सातारा येथे राजकीय घडामोडी होऊ लागल्या. त्यानंतर महाराणी ताराबाई यांनी तर सातारा शहरास राजकीयदृष्टया महत्त्वाचे केंद्र बनवले होते. महाराणी ताराबाई यांनी औरंगजेब बादशहास सातारा किल्ल्याच्या साहाय्याने जेरीस आणले होते. पुढे छत्रपती शाहू महाराजांचा राज्याभिषेक सातारच्या किल्ल्यावर झाला होता. छत्रपती शाहू महाराजांनी सातारा किल्ल्याच्या पायथ्यास शाहूनगर नावाचे शहर स्थापन केले. त्यांनी स्वराज्याचा कारभार सातारा येथून पाहण्यास सुरूवात केली होती. त्यामुळे सातारा शहराचे महत्त्व वाढीस लागले होते.. पुढे या शहराचा विकास छत्रपती रामराजा, छत्रपती दुसरे शाहू व छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी मोठया प्रमाणावर केला. याच सातारा शहराने महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात मोठा ठसा उमटविला आहे. सातारा संस्थान ब्रिटिशांनी खालसा केले. या शहराने भारतीय स्वातंत्र्य चळवळीत फार मोठे योगदान दिले आहे.

या प्रकरणामध्ये प्राचीन काळातील साताऱ्याचा राजकीय इतिहास, मध्ययुगीन सातारा यामध्ये शिवपूर्वकाळ व शिवकाळ व त्यानंतर छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या पूर्वीची सातारा शहराची राजकीय पार्श्वभूमी, सातारचे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांचे राजकीय कार्य, छत्रपती आप्पासाहेब महाराजांच्या कारकिर्दीतील राजकीय घटना, सन १८४८ ते सन १८५७

मधील सातारा शहरातील राजकीय परिस्थिती, सातारा शहराचा सन१८५७ च्या उठावातील सहभाग, कर्ज निवारण व राष्ट्रीय जागृती कार्यक्रम, लोकमान्य टिळकांच्या काळातील सातारा शहरातील राजकीय घडामोडीमध्ये गणेश मेळा चळवळ, होमरूल चळवळ, सत्यशोधक चळवळ इत्यादी, महात्मा गांधी यांच्या नेतृत्त्वाखाली सरू झालेल्या स्वातंत्र्य चळवळीतील सातारा शहराचा सहभाग, यामध्ये असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, वैयक्तिक सत्याग्रह, सन १९४२ चे चले जाव आंदोलन, प्रतिसरकारची स्थापना व कार्य, सन १९४७ मधील भारतास स्वातंत्र्य मिळाले त्यावेळचे सातारा शहर या सर्व राजकीय घडामोडीची सविस्तर माहिती घेणार आहोत.

## २.२ प्राचीन काळातील साताऱ्याचा राजकीय इतिहास

प्राचीन काळात सातारा शहर अस्तित्त्वात नसले तरी या शहराच्या आजूबाजूच्या प्रदेशात ज्या घटना घडल्या आहेत. त्यावरून सातारचा इतिहास समजण्यास मदत होते. साताऱ्याच्या इतिहासाची सुरूवात प्रागैतिहासिक कालखंडापासून सुरूवात झाली आहे. या काळातील केवळ मानवनिर्मित दगडी हत्यारे व तत्कालिन प्राण्यांचे अवशेष यावरूनच निष्कर्ष काढावे लागतात. या अश्मयुगीन पुराव्याचे वर्गीकरण प्राचीन अश्मयुग, मध्य अश्मयुग, उत्तराश्मयुग आणि नवाश्मयुग या कालखंडात करावे लागते. सातारा जिल्हयातील आसगाव, पाचवड, मर्ढे, माहूली आणि सोनगाव इत्यादी ठिकाणी प्रागैतिहासिक काळातील हत्यारे सापडली आहेत. मध्याश्मयुगीन मानवाचे अस्तित्त्व उंब्रज , कराड, काशिळ, कोपर्डे, गोवरे, चिंचणेर, टेंभू, तारगाव, धामणेर, माहुली, लिंब, वेणेगाव येथे आढळते. तर उत्तर अश्मयुगातील हत्यारे फक्त कराड येथे सापडली आहेत. नवाश्मयुगीन अवशेष हे साताऱ्याच्या परिसतार र्स्वत्र आढळून आलेले आहेत.[१]

कराड येथे सापडलेल्या आहत नाण्यावरून इ.स.पू. ४थ्या सतकार साताऱ्याचा परिसर हा उर्वरित महाराष्ट्र व भारताशी संबधित होता, हे स्पष्ट होते. मौर्य सातवाहन काळतील काही अवशेष उत्खननातून उपलब्ध झाल्यामुळे महाराष्ट्राच्या प्राचीन ऐतिहासिक काळाचा प्रारंभ तेथून म्हणजेच इ.स.पू.४ थ्या शतकापासूनचा मानता येतो. हे अवशेष कराड येथेही सापडले आहेत. इ.स.पू. तिसऱ्या शतकात सातारा परिसरावर सातवाहनांची सत्ता होती. इ.स.पू.च्या दुसऱ्या शतकात सातारा जिल्हयातील कराड या गावाच्या यात्रेकरूंनी मध्यप्रदेशातील सुप्रसिद्ध भारहूत

येथील स्तूपाच्या वेदकिच्या बांधणीसाठी काही अनुदाने दिल्याचा तेथील अभिलेखात उल्लेख आहे.[२] याचाच अर्थ सातवाहन काळात या परिसरातील लोक पतर प्रांताच्या संपर्कात होते. असे दिसते कराड येथील इ.स.च्या पहिल्या शतकातील बौद्धलेणी सातवाहन काळात खोदल्या गेल्या होत्या. सातवाहन काळात सिमुक, सातकर्णी, वेदश्री, गौतमीपुत्र सातकर्णी, यज्ञश्री पुळुमावी इ. कर्तबगार राजे होऊन गेले.[३]

इ.स.११० ते १२५ या काळात सातारा परिसरावर परकीय शक क्षत्रप नहपान याचे राज्य होते. त्याने सातवाहनांचे राज्य जिंकून घेतला होते. त्यानंतर पुढे सातवाहन घराण्यातील कर्तबगार सत्ताधीश गौतमीपुत्र व पुळुमावी या सातवाहन राजांनी हा प्रदेश पुन्हा जिंकून घेतला.[४]

इ.स.४०० मध्ये सातारा परिसरावर मानपूरच्या राष्ट्रकूटांची सत्ता होती. मानाङ्क हा या घराण्याचा संस्थापक होता. पांदरंगपल्ली ताम्रपटात वेण्णा नदी व जावळीचा उल्लेख येतो. ही नदी व ठिकाण सातारा परिसरात आहे. यावरूनच या प्रदेशात मानपूरच्या राष्ट्रकूट घराण्याची सत्ता होती हे सिद्ध होते.[५]

कलचुरी घराण्याच्या अनेक शाखा होत्या त्यातील माहिष्मतीच्याकलचुरीशी सातारा जिल्हयाचा संबंध आला होता. कृष्णराज हा या शाखेचा संस्थापक असून त्याने ५५० ते ५७५ या काळात राज्य केले. त्याच्या काळातील राजपुताना व माळवा भागात जशी चांदीची नाणी सापडली आहेत तशीच नाणी सातारा जिल्हयातही सापडली आहेत.[६]

चालुक्य घराण्यातील जयसिंह, दुसरा पुलकेशी, विनयादित्य व विजयादित्य यानी सातारा परिसरावर राज्य केले होते.[७] राष्ट्रकूट घराण्यातील दंतीदुर्ग व इतर सहा राजांनी सातारा परिसरावर राज्य केले होते.[८] याच घराण्यातील राजा सहावा विक्रमादित्य(इ.स.१०७६ ते ११२६), राजा पेर्मादिदेव (इ.स.११२८ ते ११६२) व रायमुरारी सोमेश्वर सोयीदेव(इ.स.११६६ ते ११७७) इत्यादी सातारा परिसरावर राज्य केल्याचे आढळते.[९]

त्यानंतर राष्ट्रकूट घराण्यातील राज द्वितीय जतिग(इ.स.१००० ते १०२०), पहिला गोंक (इ.स.१०२० ते १०५०), मारसिंह (इ.स.१०५० ते १०७५), विक्रमादित्य(१०७६ ते ११२६), विजयादित्य(इ.स.११४० ते ११७५), द्वितीय भोज (इ.स.११७५ ते १२१५) इत्यादी राजांनी सातारा परिसरावर राज्य केले होते.[१०]

यादव घराण्यातील राजा सिंघण(इ.स.१२१० ते १२४७), राजा महादेव(इ.स.१२६० ते १२७१) या दोन राजांनी सातारा परिसरावर राज्य केल्याचे दिसून येते.[११]

## २.३ मध्ययुगीन सातारा

### २.३.१ शिवपूर्वकाळातील सातारा

यादव घराण्यातील शेवटचा राजा रामचंद्र यादव याचा अल्लाउद्दीन खिलजी याने इ.स.१२९४ मध्ये पाडाव केला. त्याच्या पाडावाबरोबरच यादवाची सत्ता संपुष्टात आली. त्याचवेळी दक्षिणेतील लहानमोठी हिंदू राज्य मुस्लिम आक्रमणास बळी पडली. परंतु कोणत्याच मुस्लिम सत्तेला संपूर्ण दक्षिण भारतावर एकछत्री अमंल निर्माण करता आला नाही. कारण त्यांच्यात स्थानिक व परकिय असे दोन गट निर्माण झाले होते. इ.स.१३६५ मध्ये बहामनीशाहीने विजयनगर राज्याचा नाश केला.

दक्षिणेतील विजयनगरच्या अस्तानंतर बहामनीशाहीची शकले पडली. त्यामुळे स्थानिक हिंदू गटाचे महत्त्व वाढत गेले. मराठा वतनदारांच्या संख्येत वाढ झाली. या वतनदारांनी सोयीच्या राज्यकर्त्या घराण्यास पाठिंबा दिला व त्यातून आपली वतनदारी टिकवून धरली होती. अशाप्रकारे परस्पर संघर्षामुळे दक्षिणी इस्लामी सत्ता क्षीण झाल्या आणि स्थानिक मराठी देशमुख–देशपांडयानी याचा लाभ घेऊन स्वतःची प्रभाव क्षेत्रे निर्माण केली. यामधूनच १७ व्या शतकाच्या मध्यास छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य निर्माण झाले. पुढे सातारा शहर हे हिंदुपदपातशाहीचे केंद्र बनले होते.

### २.३.२ मुस्लिम राजवट

देवगिरीच्या यादव घराण्यानंतर दक्षिणेत अल्लाउद्दीन खिलजी याने खिलजी घराण्याची स्थापना केली. त्यानंतर देवगिरी येथे दिल्लीचा सुलतान महमद तुघलक याने राजधानी आणल्याने खिलजीची राजवट संपुष्टात आली. या तुघलक घराण्यातील दक्षिणेचा मुस्लिम सरदार हसन गंगू बहामनी याने बंड करून इ.स.१३४७ मध्ये बहामनीशाहीची स्थापना केली. त्याने तुघलकांच्या सेनेचा पराभव केला. अशा प्रकारे दक्षिणेत बहामनीचे राज्य सुरू झाले.[१२]

### २.३.३ बहामनीशाही कालखंड(१३४७ ते १४८९)

हसन गंगू बहामनी हा या सत्तेचा संस्थापक आहे. ही सत्ता दक्षिणेत साधारणपणे १५० वर्षे होती. या राज्याची राजधानी गुलबर्गा असून ती सातारा शहराच्या पूर्वेस १८० मैलावर होती. पुढे ती इ.स.१४२६ मध्ये राजधानी बिदरला नेण्यात आली.[१३]

बहामनीशाहीत एकूण १८ सुलतान झाले. त्यांनी १२ ऑगस्ट १३४७ पासून सन १५२६ पर्यत राज्यकारभार केला. सन १४८१ नंतर बहामनीशाहीचे बहामनी साम्राज्याचे पाच तुकडयात विभाजन करण्यात आले. आणि साताऱ्याच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास विजापूरच्या आदिलशाहीमध्ये साताऱ्याचे महत्त्व वाढले होते.[१४]

### २.३.४ आदिलशाही व निजामशाही कालखंड

१७व्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रातील बराचसा प्रदेश अहमदनगरच्या निजामशाही व विजापूरच्या आदिलशाहीच्या ताब्यात होता. आपले प्रशासन चालविण्यासाठी हे सुलतान स्थानिक लोकांची मदत घेत असत. आदिलशाही काळात राज्य मुस्लिमांचे असले आणि जबाबदार पदावर मुस्लिम अधिकारी असले तरी शासनव्यवस्थेत हिंदू अधिकाऱ्यांची संख्या मोठी होती. एकंदरीत प्रशासन व्यवस्थेत हिंदू हा महत्त्वाचा घटक होता. विशेषतः सातारा परिसर व डोंगराळ भाग हिंदू प्रशासकाकडे म्हणजेच देशमुखाकडे होता. जिल्हयाच्या प्रमुख अधिकाऱ्यांना देशमुख ही पदवी दिली जात होती. आदिलशाही काळात सातारा परिसरात जावळीचे मोरे, फलटणचे निंबाळकर, मलवडीचे घाटगे, म्हसवडचे माने, जतचे डफळे, कापशीचे घोरपडे इत्यादी मराठी घराण्यांचा उदय झालेला होता.[१५]

### २.३.५ शिवकालीन सातारा

१७व्या शतकात महाराष्ट्रामध्ये मराठी सत्तेचा उदय झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी विजापूरची आदिलशाही उत्तरेतील बलाढय मुघल सत्ता, गोव्यातील पोर्तुगीज, कोकणातील सिद्दी व इंग्रज यांच्याशी युद्ध करून मराठयांचे स्वतंत्र व सार्वभौम राज्य निर्माण केले. लोककल्याण आणि सहिष्णूता हा या राज्याचा पाया होता. साताऱ्याचा परिसर छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्या वंशजांच्या कर्तबगारीशी निगडित आहे.

छ.शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केल्यानंतर साताऱ्याच्या वायव्येस असणारा जावळीचा प्रदेश छ.शिवाजी महाराजानी आदिलशाही सरदार चंद्रराव मोरे याच्याकडून

सन १६५६ मध्ये जिंकून घेतला. तेव्हापासून छत्रपती शिवाजी महाराजांच्या ताब्यात साताऱ्याचा परिसर आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या वाढत्या हालचालींना प्रतिबंध घालण्यासाठी आदिलशाही दरबाराने अफझलखानास पाठविले. छत्रपती शिवाजी महाराजांनी ११ नोव्हेंबर १६५९ रोजी प्रतापगड किल्ल्याच्या पायथ्याशी अफझलखानाचा वध केला. त्यानंतर आदिलशाहीच्या ताब्यातील कोल्हापूर व पन्हाळा किल्ला जिंकून घेतला.[१६]

इ.स.१६७६ च्या सुमारास छत्रपती शिवाजी महाराज आजारी पडले त्यावेळी त्यांचे वास्तव्य सातारच्या किल्ल्यावर होते. या आजारातून बरे होऊन ते पुढे काही काळ पन्हाळयास जाऊन राहिले तरी साताऱ्याकडील खटाव येथे आदिलशाही प्रदेशावर छत्रपती शिवाजी महाराजांची आक्रमणे चालूच होती.[१७]

छत्रपती शिवाजी महाराजांनी कर्नाटक मोहिमेवरून परतल्यावर सन १६७७ मध्ये आपला पुत्र संभाजी याच्या वागणूकीत सुधारणा व्हावी यासाठी समर्थ रामदास महाराजांच्या सहवासात सज्जनगड येथे ठेवले. पण समर्थाच्या उपदेशाचा इष्ट परिणाम होण्यापूर्वीच संभाजी १३ डिसेंबर १६७८ रोजी मुघलांना जाऊन मिळाले. परंतु पुढे दिलेरखानाबरोबर मतभेद झाल्यान ४ डिसेंबर १६७९ रोजी युवराज संभाजी पुन्हा स्वराज्यात आले. पन्हाळा येथे छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी यांची भेट झाली. यानंतर छत्रपती शिवाजी महाराज पुन्हा फेब्रुवारी १६८० मध्ये समर्थ रामदास महाराजांच्या भेटीसाठी सज्जनगडावर आले. पुढे ३ एप्रिल १६८० रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू झाला.[१८]

### २.३.६ छत्रपती संभाजीकालीन सातारा

छत्रपती संभाजी महाराजांचा १६ जानेवारी १६८१ रोजी रायगड किल्ल्यावर राज्याभिषेक झाला. छत्रपती संभाजी महाराजांच्या काळात औरंगजेब बादशहा दक्षिणेत आलेला होता. इ.स.१६८२ पासून सातारा परिसरात मुघलांची लूटमार व हल्ले चालूच होते. परंतु त्यांना या प्रदेशातील किल्ल्यावर ताबा मिळविता येत नव्हता. औरंगजेब बादशहाने विजापूरचे राज्य खालसा केल्यानंतर मराठयांचे राज्य नष्ट करण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. सरदार सर्जाखान यास बादशहाने छत्रपती संभाजीराजांचा मुलूख जिंकण्यास पाठविले. सर्जाखान मराठयाचा सेनापती हंबीरराव मोहिते यांची वाई प्रांतात लढाई होऊन त्यात सर्जाखानाचा पराभव झाला. परंतु सेनापती हंबीरराव मोहिते ठार झाला. त्यामुळे इ.स.१६८८ मध्ये वाईला मुघल ठाणेदार

कायम झाला. पुढे एक वर्ष छत्रपती संभाजी महाराजांनी औरंगजेब बादशहाशी निकराचा लढा दिला. शेवटी औरंगजेब बादशहाने छत्रपती संभाजी महाराजांना मुकर्रबखानाकरवी पकडले व ११ मार्च १६८९ रोजी संभाजी महराजांना ठार मारण्यात आले. सप्टेंबर १६८९ पर्यत सातारा परिसरातील सातारा, परळी, निंब, चंदन, वंदन, कराड माजगाव, मसूर इत्यादी प्रदेश मराठयांच्या ताब्यात होता.[१९]

### २.३.७ छत्रपती राजाराम महाराजांच्या काळातील सातारा शहर

छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर रायगड ही मराठयांची राजधानी मोगलांनी जिंकून घेतली. त्यापूर्वीच रायगड किल्ल्यावरून छत्रपती राजाराम महाराज त्यांच्या कुटुंबासहित बाहेर पडले. छत्रपती राजाराम महाराज एप्रिल, १६९० मध्ये दक्षिणेत जिंजी येथे जाऊन पोहोचले. एप्रिल, १६९० मध्ये छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजी ही मराठी राज्याची राजधानी बनवली. तसेच त्यांनी मराठी मुलखात रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण सचिव, संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्या सहकार्याने महाराणी ताराबाई यांच्या नेतृत्वाखाली एक राजमंडळ निर्माण केले होते. त्यावेळी छत्रपती राजाराम महाराजांनी रामचंद्रपंत अमात्य यांना 'हुकूमतपन्हा' व 'राजाज्ञा' इत्यादी पदव्या दिल्या.[२०]

छत्रपती राजाराम महाराज यांनी २६ डिसेंबर, १६९७ रोजी जिंजी वेढयातून आपली सुटका करून घेतली. छत्रपती राजाराम महाराज जिंजीवरून पन्हाळा किल्ल्यावर व तेथून ते विशाळगडावर आले.[२१] विशाळगडावर रामचंद्रपंत अमात्य मराठा राज्याचा कारभार पाहत होते. परंतु विशाळगडावरून मोगलांच्या हालचालींवर नजर ठेवण्यास अडचणी येत होत्या. म्हणून छत्रपती राजाराम महाराजांनी आपल्या सर्व सहकाऱ्यांशी चर्चा करून ऑक्टोबर १६९८ मध्ये आपली राजधानी सातारा येथे आणली.[२२] सातारा हे राजधानीचे ठिकाण झाल्याने सातारा किल्ल्याला व परिसराला महत्त्व प्राप्त झाले. मराठयांनी सातारा येथे राजधानी केल्यानंतर मोगलांविरूध्द हालचालींचा वेग वाढला. छत्रपती राजाराम महाराजांचा २ मार्च, १७०० रोजी सिंहगड किल्ल्यावर मृत्यू झाला.[२३]

### २.३.८ महाराणी ताराबाई व सातारा

छत्रपती राजाराम महाराजांची पत्नी महाराणी ताराबाई यांनी आपला चार वर्षाचा मुलगा शिवाजी दुसरा यास छत्रपती म्हणून गादीवर बसवले. त्याच्या नावे राज्यकारभार पाहण्यास

सुरूवात केली होती.[२४] छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यूमुळे मोगल–मराठा युद्ध आणखी तीव्र झाले. मराठयांचे सेनापती संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनी आपल्या पराक्रमाने मोगली फौजांना हैराण करून सोडले होते. त्यावेळी महाराणी ताराबाई यांना रामचंद्रपंत अमात्य, परशुराम पंत प्रतिनिधी, कान्होजी आंग्रे, खंडो बल्लाळ चिटणीस, संताजी घोरपडे व धनाजी जाधव या सर्वांनी महाराणी ताराबाईस सहकार्य केले होते. त्यामुळे महाराणी ताराबाई यांनी मोगलांशी सतत सात वर्षे यशस्वी संघर्ष केला. औरंगजेब बादशहाने सातारा व परळी वेढयात महाराणी ताराबाईचा पराक्रम पाहिला होता. औरंगजेब बादशहा महाराणी ताराबाईच्या नेतृत्वापुढे अपयशी ठरला होता. मराठयांच्या चिवट पराक्रमापुढे मुघल सैन्य व बादशहा नामोहरण झाला होता.[२५]

साताऱ्यास वेढा देणाऱ्या मुघल लष्कराची सूत्रे खुद्द औरंगजेब बादशहा हलवित होता. बादशहाच्या छावणीचा तळ करंजे गावाजवळ तर आझमशहाचा तळ किल्ल्याच्या पश्चिमेस होता. त्यावेळी मराठयांचा किल्लेदार सुभानजी लावंघरे व हवालदार प्रयागजी भानू हा होता. त्यांनी सातारा किल्ल्याचे संरक्षण केले. इकडे मराठयांनी बादशहाच्या छावणीस धान्याचा पुरवठा होऊ नये म्हणून किल्ल्याच्या सभोवतालचा प्रदेश जाळून बेचिराख केला. धनाजी जाधव, हणमंतराव निंबाळकर, राणोजी घोरपडे इत्यादींनी मोगलांना जेरीस आणले. शेवटी वाटाघाटीचा प्रस्ताव ठेवला. तेव्हा मराठयांनी शहाजादा आझम याने केलेल्या वाटाघाटीतून २१ एप्रिल १७०० रोजी हा किल्ला मुघलांच्या ताब्यात आला. म्हणून औरंगजेब बादशहाने या किल्ल्याचे नाव 'आझमतारा' ठेवले.[२६] त्यानंतर औरंगजेब बादशहाने सातारा किल्ल्याच्या आसपासचे किल्ले जिंकून घेण्यास सुरूवात केली. त्यावेळी औरंगजेब बादशहा किल्ल्यावर चालून जात असता महाराणी ताराबाई आपल्या लोकांना प्रोत्साहन देत असे. मुघल इतिहासकार खाफीखान यानेही महाराणी ताराबाईची प्रशंसा केलेली आढळते. यावेळी मराठयांनी मुघलाविरूद्ध जास्त नुकसान होऊ न देता किल्ला लढवायचा व द्रव्य घेऊन किल्ला स्वाधीन करावयाचा. मुघलांची पाठ वळताच पुनः तो किल्ला जिंकून घेणे हे धोरण स्वीकारले होते.[२७]

मराठयांना असामान्य नेता, साधनसामग्री नसताना व सर्वत्र प्रतिकूल परिस्थिती असताना मराठी जनतेने लढा दिला होता. एखादे राज्य टिकविण्यासाठी फारसे मोठे नेतृत्व

नसणाऱ्या जनतेने इतका दीर्घकाळ लढा दिला.[२८] शेवटी अपयशी ठरलेला मुघल बादशहा औरंगजेब निराश अवस्थेत अहमदनगर येथे शुक्रवार २० फेब्रुवारी, १७०७ रोजी मरण पावला.[२९]

### २.३.९ छत्रपती शाहू महाराज(इ.स. १७०८ ते १७४९)

छत्रपती शाहू महाराजांचे बालपण हे इ.स.१६९० ते १७०७ पर्यंत बादशहा औरंगजेब याच्या कैदेत गेले होते. औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा आझमशहा याने १४ मार्च, १७०७ रोजी स्वतः बादशहा झाल्याची घोषणा केली. आपले भाऊ व इतर आप्तस्वकियांचा विरोध मोडून काढण्यासाठी तो उत्तरेकडे निघाला. छत्रपती शाहू, मातोश्री येसूबाई व त्याचा इतर सर्व राज्यपरिवारही त्याच्या सोबत होता. मराठयांच्यापासून शांतता लाभावी तसेच त्यांच्यात आपल्यासारखी दुफळी माजून त्यांची लष्करी ताकद कमी व्हावी या उद्देशाने आझमशहाने झुल्फीकारखान व इतर मुत्सद्यांशी चर्चा करून दोराहजवळ ८ मे, १७०७ रोजी काही अटी घालून शाहूची मुक्तता केली.[३०]

शाहूची सुटका झाल्यानंतर ते साताऱ्याकडे येत असताना त्यांना काही मराठी सरदार ससैन्य मिळाले. त्याची चुलती महाराणी ताराबाई हिने आपला मुलगा दुसरा शिवाजी याचे नावे राज्य चालवित होती. ती आपला हक्क सोडण्यास तयार नव्हती. छत्रपती शाहूला मोगलांचा आधार होता. मुअज्जम हा आपला बंधू कामबक्ष याचा बंदोबस्त करण्यास दक्षिणेत विजापूर येथे आलेला होता. त्यास छत्रपती शाहूने मदत दिली होती. छत्रपती शाहूस त्यामुळे जोर होता. १२ ऑक्टोबर १७०७ रोजी खेड येथे झालेल्या लढाईत महाराणी ताराबाईचा छत्रपती शाहू महाराजांनी पराभव केला. खेडच्या विजयाने छत्रपती शाहूचा पुढील मार्ग सोपा झाला. धनाजी जाधव याच्याबरोबर खंडो बल्लाळ चिटणीस, बाळाजी विश्वनाथ, बहिरोपंत पिंगळे यासारखी पराक्रमी सेनानी छत्रपती शाहूस येऊन मिळाले.[३१] छत्रपती शाहू महाराज साताऱ्याच्या रोखाने निघाले. या मार्गातील चंदनवंदन किल्ल्याच्या किल्लेदारांनी छत्रपती शाहूचे प्रभुत्व मान्य केले. छत्रपती शाहू साताऱ्याच्या रोखाने येत आहे. हे समजल्यावर महाराणी ताराबाईने परशुरामपंत प्रतिनिधीवर साताऱ्याच्या रक्षणाची जबाबदारी सोपवून तिने स्वतः पन्हाळा किल्ल्याचा आश्रय घेतला. सातारा किल्ल्याचा किल्लेदार शेखमिरा होता. छत्रपती शाहूचे सामर्थ्य पाहून तो शाहूला शरण आला आणि सातारा किल्ला छत्रपती शाहूच्या ताब्यात दिला. शनिवार १२ जानेवारी १७०८ रोजी छत्रपती शाहू महाराजांनी राज्याभिषेक करून घेतला. त्यामुळे मराठा राज्याची

राजधानी सातारा ही संकल्पना छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीत (१७०८ ते १७४९) खऱ्या अर्थाने अस्तित्वात आली. ताराबाईचा त्रास चुकविण्यासाठी तिच्या सावत्र मुलास मदत करून ताराबाई व शिवाजी यांस कैद करविले व त्याच्याशी म्हणजे संभाजीशी तह करून वारणा नदी दोघांची सरहद्द ठरवून यादवी संपुष्टात आणली.[३२]

### छत्रपती शाहू महाराजांचे अष्टप्रधान मंडळ

छत्रपती शाहूने आपला विधीपूर्वक राज्याभिषेक घडवून आणल्यानंतर त्यास जे मराठा छत्रपती म्हणून अधिकार प्राप्त झाले. त्याप्रमाणे त्याने आपल्या अष्टप्रधानांच्या नियुक्त्या केल्या. त्यामध्ये त्याने सातारा ही स्वराज्याची राजधानी निश्चित केली. बहिरोपंत पिंगळे यास पेशवेपद दिले. सेनापतीपद धनाजी जाधव यास दिले. याशिवाय सचिव नारोशंकर, अंबुराव हणमंते मुतालिक, सुमंत महादजी गदाधर, मंत्री रामचंद्र पुंडे, न्यायाधीश होनाजी अनंत, पंडितराव महादजी गदाधर व नंतर मुद्‌गलभट उपाध्ये यांचा समावेश होता. तसेच बाळाजी विश्वनाथ भट्ट यांना अमात्य म्हणून नेमले.[३३] पुढे इ.स.१७१३ मध्ये छत्रपती शाहूंने बाळाजीचा प्रामाणिकपणा बघून त्याला मुख्य पेशवा म्हणून नेमले. याशिवाय परसोजी भोसले यांच्या जुन्या सरंजामात भागानगरच्या सुभ्याची भर घालून त्याचा सरंजाम कृपापूर्वक ३० लाख रूपयावर नेला. व त्यास सेनासाहेबसुभा हा किताब देऊन त्याचा सन्मान केला. वरीलप्रमाणे छत्रपती शाहू महाराजांनी राजधानीच्या ठिकाणी आपले अष्टप्रधान मंडळ निर्माण करून राज्यकारभारास सुरूवात केली.[३४]

### छत्रपती शाहू महाराज यांच्या राज्यभिषेकानंतरच्या अडचणी व निवारण

राज्याभिषेक झाला तरी अनेक समस्या छत्रपती शाहू महाराजांच्यापुढे होत्या. पहिली समस्या म्हणजे आपले आसन अजून स्थिर नव्हते. महाराणी ताराबाईचा अद्याप पूर्ण पराभव झालेला नव्हता. दुसरी समस्या आर्थिक होती. पंचवीस वर्षाच्या प्रदिर्घ लढयामुळे मराठी राज्याचा खजिना रिकामा झाला होता. तिसरी समस्या म्हणजे प्रशासकीय होती. प्रदिर्घ चाललेल्या मुघल–मराठा संघर्षात राज्यकारभार कोलमडला होता. तो पुनः उभा करणे आवश्यक होते.[३५]

महाराणी ताराबाई यांनी पन्हाळा हे राजधानीचे ठिकाण निश्चित केले व १७१० मध्ये शिवाजी दुसरा यास छत्रपती बनवून स्वतंत्र कोल्हापूर राज्य स्थापन केले. पण १७१४ च्या ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात कोल्हापूर येथे छत्रपती राजाराम महाराजांची दुसरी पत्नी

राजसबाईने रामचंद्रपंत अमात्य यांच्या मदतीने ताराबाई व शिवाजी दुसरे यांना कैद केले आणि कोल्हापूरच्या गादीवर आपला मुलगा संभाजी राजांना बसविले.[३६]

कोल्हापूरच्या छत्रपती संभाजीराजांनी राज्य ताब्यात घेतल्यानंतर छत्रपती शाहू महाराजांना विरोध करण्याचे धोरण स्विकारले. छत्रपती शाहू महाराजांनी इ.स.१७१८ व १७१९ मध्ये वडगांव व कोल्हापूर परिसरात झालेल्या लढाईत संभाजी राजांचा पराभव केला. त्यावेळी छत्रपती शाहू महाराजांनी महाराणी ताराबाई, मातोश्री राजसबाई, जिजाबाई, व्यंकटराव घोरपडे, भगवंतराय अमात्य यांना कैद केले होते. यानंतर स्वतः संभाजी महाराजानी शरणागती पत्करून छत्रपती शाहू महाराजांची भेट घेऊन प्रकरण सामोपचाराने मिटवावे अशी विनंती केली. म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी अखेरीस ३१ डिसेंबर, १७३१ रोजी छत्रपती संभाजी राजांच्याबरोबर वारणेचा तह केला. या तहाने मराठा राज्याची सातारा व कोल्हापूर अशी दोन राज्ये अस्तित्वात आली. या तहानंतर दक्षिणेतील सहा सुभ्यातून चौथाई व सरदेशमुखी गोळा करण्याचे अधिकार छत्रपती शाहू महाराजांच्याकडे आल्यामुळे सातारचे राज्य मराठी सत्ता या नावाने उभे राहिले.[३७]

दिल्लीचे कारभारी सय्यद बंधू यांनी छत्रपती शाहू महाराजांच्याकडे मदत मागितली होती. ती छत्रपती शाहू महाराजांनी दिली. छत्रपती शाहू महाराजांच्यावतीने बाळाजी विश्वनाथ याने दिल्लीतील संकटाना यशस्वी तोंड देऊन काम फत्ते केले. त्यामुळे छत्रपती शाहूं महाराजांना दिल्लीच्या बादशहाकडून इ.स.१७१९ मध्ये स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी या तीन सनदा प्राप्त झाल्या. स्वराज्य या सनदेत सातारा राज्याचे खरे मुळ आहे. तसेच चौथाई व सरदेशमुखी या सनदात सरदारकी व जहागिरी व्यवस्था मजबूत केली गेली.[३८]

मराठी मुलखात सतत चाललेल्या युद्धाने प्रदेश ओसाड पडला होता. तो व्यवस्थित करण्याची कामगिरी छत्रपती शाहू महाराजांनी केली. तसेच त्याने मराठी राज्याचा विस्तार केला. छत्रपती शाहू महाराज सातारा येथे आला होता त्यावेळी हे राज्य सातारा व परिसरापुरतेच मर्यादित होते. परंतु छत्रपती शाहू महाराज सत्तेवर आल्यावर गुजराथ, माळवा, वऱ्हाड, मध्यप्रांत, ओरिसा, कोकण, महाराष्ट्राचा मध्यप्रदेश व कर्नाटकचा काही भाग एवढा त्याच्या राज्याचा विस्तार झाला होता.[३९]

छत्रपती शाहू महाराजांची राजधानी प्रारंभी सातारा किल्ल्यावर होती. पुढे राज्याचा विस्तार वाढल्याने ती गैरसोयीची वाटून किल्ल्याच्या उत्तरेकडील पायथ्याशी छत्रपती शाहू महाराजांनी शाहूनगर नावाचे एक शहर वसवले. हेच आजचे सातारा होय. या शाहूनगरीची स्थापना इ.स.१७२१ च्या सुमारास झाली व तिचा सर्वाधिक विस्तार छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीत झाला. या शहराची रचना व त्यातील भागाची नावे छत्रपती शाहू महाराजांच्या आमदनीची आठवण करून देतात. शाहूनगर येथे छत्रपती शाहू महाराज यांनी रंगमहाल, अदालतवाडा यासारख्या वास्तू बांधल्या. यवतेश्वराहून व महादऱ्याहून खापरी नळाने पाणी आणून साताऱ्यात पाण्याची व्यवस्था लावली. हौद बांधले. उत्तर हिंदुस्थानातून व दक्षिणेकडून सावकारी, वकिली, देवतार्चन इत्यादी कामे करणारी अनेक कुटुंबे शाहूनगरात येऊन राहिले. त्याचबरोबर आशानंद, सुखानंद, मनसापुरी, बन्सीपुरी, सुमेरगिरी, गोसावी यासारखे नामांकित व्यापारी साताऱ्यात येऊन राहिल्यामुळे सातारा शहराची भरभराट झाली. सातारा ही मराठयांची राजधानी असल्यामुळे प्रधान व सरदारांचे वाडे बांधले. नवीन पेठा वसविल्या. सातारा शहराच्या सौंदर्यात भर घातली. छत्रपती शाहू महाराजांनी करंजे येथे बागा लावल्या. विविध प्रकारची फळझाडे व फुलझाडे येथे होती.[४०]

छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीत बाळाजी विश्वनाथ, बाजीराव बल्लाळ व बाळाजी बाजीराव असे तीन पेशवे झाले. बाळाजी बाजीरावाने राज्याच्या वसूलीची शिस्त लावून दिली. सरदारांचे अधिकार कायम केले. बाजीरावाने जुन्या सरंजामदारांना दहशत बसविण्यासाठी नवे सरदार निर्माण केले. छत्रपती शाहू महाराजांना मूलबाळ नव्हते त्यामुळे आपल्या गादीचा वारस म्हणून ताराबाईचा नातू रामराजा यास केले. छत्रपती शाहू महाराजांचा मृत्यू इ.स.१७४९ मध्ये झाला. राणी सकवारबाई त्यांच्यासोबत सती गेल्या.[४१]

### २.३.१० छत्रपती रामराजा(इ.स.१७५० ते १७७७)

छत्रपती शाहू महाराज निपुत्रिक मरण पावल्यामुळे सातारा गादीसाठी वारसाचा प्रश्न निर्माण झाला होता. छत्रपती शाहू महाराजांचे निधन झाले त्याच दिवशी बाळाजी बाजीरावाने रामराजास साताऱ्यात आणण्यासाठी बापूजी खंडेराव चिटणीस यांच्या समवेत काही मंडळीना पानगावात पाठविले. कोल्हापूरचा संभाजी व त्याची पत्नी जिजाबाई त्याचा नाश करण्याच्या प्रयत्नात होती. म्हणून ताराबाईने त्याला प्रथम अमात्याच्या घरी, नंतर त्यांची मावशी दर्याबाई

निंबाळकर हिच्याकडे पानगावास व तेथून पुढे तुळजापूरास नारोबा आराध्ये यांचेकडे लपवून ठेवले. तेथे तो गोंधळयाच्या वेशात राहत असे. आपण छत्रपती घराण्यांशी संबंधित आहोत हे त्याला माहितही नव्हते. म्हणून गादीवर बसविण्यासाठी जेव्हा त्याला सातारला आणण्यात आले तेव्हा याला आश्चर्य वाटले.[४२] त्यानंतर रामराजाला घेऊन ही मंडळी २६ डिसेंबर १७४९ रोजी साताऱ्याजवळील वडूथ येथे येऊन पोहचली. रामराजाने ताराबाईची भेट घेतली. दुसरे दिवशी पेशवे व इतर सरदार रामराजास भेटले. रामराजाचा ४ जानेवारी १७५० रोजी मोठया समारंभपूर्वक साताऱ्यात येऊन दाखल झाला. त्याच दिवशी त्याचा राज्यारोहण समारंभ पार पडला.[४३]

छत्रपती रामराजा यांना राज्यकारभार चालविण्याचे कसलेही शिक्षण त्याला मिळाले नव्हते. राज्यकारभार चालवण्यास लागणारे गुणही त्याच्या अंगात नव्हते. तो त्या कामास पुर्णपणे लायक नव्हता. यमाजी शिवदेवाविरूद्ध, तो सदाशिवरावभाऊ बरोबर स्वारीवर गेला असता त्याला ती दगदग सहन झाली नाही. त्याने सदाशिवरावभाऊस सांगितले की, तुम्हीच राज्य चालवा, मी तुम्हास सर्व अधिकार देतो. मला फक्त काही जहागीर तोडून द्या. सदाशिवरावभाऊने ते कबूल करून त्याला छपन्न लाखांचा मुलुख तोडून दिला. हे करणे महाराणी ताराबाईस पसंत पडले नाही. त्यावेळेस ती सातारा किल्ल्यावर राहत होती व छत्रपती रामराजा किल्ल्याच्या पायथ्याशी राहत असे. किल्ल्यावर महाराणी ताराबाईने बोलावले तरी जाऊ नये. असे पेशव्यांनी सांगितले असतानाही ते न ऐकता महाराणी ताराबाईच्या बोलावण्यावरून तो इ.स.१७५० मध्ये चंपाषष्ठीच्या पूजेच्या दिवशी किल्ल्यावर गेला असता महाराणी ताराबाईने त्यास कैदेत ठेवले. पेशव्यांनी तिच्या कैदेतून त्यास सोडवण्याचा प्रयत्न केला पण यश आले नाही. छत्रपती रामराजे पेशवे म्हणतील तसे ऐकतात म्हणून ताराबाईने रामराजांना सातारा येथील अजिंक्यतारा किल्ल्यावर नजरकैदेत ठेवले. तसेच हा छत्रपती आपला खरा नातू नाही असे म्हणण्यास सुरूवात केली. त्यामुळे छत्रपती म्हणून रामराजांना कसलेही महत्त्व राहिले नाही. महाराणी ताराबाई ९ डिसेंबर, १७६१ मध्ये सातारा येथे वयाच्या ८६ व्या वर्षी मरण पावल्या. त्यानंतर छत्रपती रामराजे नाना फडणवीसांच्या नजरकैदेत राहिले.[४४]

यमाजी शिवदेव प्रतिनिधी यांच्या ताब्यातील सांगोला व मंगळवेढा ही ठिकाणे पेशव्याने आपल्या कब्जात मागितली. यमाजी शिवदेवने पेशव्यांशी सांगोला येथे युद्धाची तयारी सुरू केली. त्याने पेशव्यास कळविले की, प्रतिनिधी हे छत्रपतींचे सेवक असून त्यांच्याच आज्ञेने हे प्रदेश पेशव्यास देता येतील पेशव्यांचा हुकूम आपण मानणार नाही. लढाईशिवाय भागणार नाही. ही लढाई छत्रपतींच्या आज्ञेनेच झाली पाहिजे. हे ओळखून पेशव्याने सदाशिवराव व रामराजा यास फौजेसह सांगोल्यावर रवाना केले. सांगोला येथे लढाई होऊन यमाजी शिवदेव शरण आला. मराठी राज्याची सत्ता आता साताऱ्यात नसून पुण्यात आहे. हे पटविण्यासाठी व आता सर्वांनी पेशव्याच्या हुकमतीत चालले पाहिजे यासाठी पेशवा बाळाजी बाजीरावाने रामराजाबरोबर २५ सप्टेंबर १७५० रोजी सांगोला येथे करार केला. या करारानुसार असे ठरले की, पेशव्याने छत्रपतीच्या नावे दौलतीचा राज्यकारभार करावा व छत्रपतीस त्याच्या इतमामासाठी छपन्न लाखाचा मुलूख तोडून द्यावा. या करारामुळे पेशवे मराठी सत्तेचे निरंकुश सत्ताधिश झाले. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात राजधानी म्हणून सातारला जे महत्त्व होते. ते छत्रपती रामराजांच्या काळात राहिले नाही. पेशव्यांनी राज्यकारभाराच्या सोयीसाठी म्हणून पुणे हे राजधानीचे ठिकाण केले. पुढे ६८ वर्षे मराठी सत्तेचा कारभार पुण्यातूनच केला गेला. सांगोला तहामुळे छत्रपतींची व अष्टप्रधान मंडळातील पेशवा सोडून बाकी प्रधानांची सत्ता पेशव्याकडे गेली. पेशवा म्हणून नियुक्त केलेल्या व्यक्तीला पेशवेपदाची वस्त्रे देणे. एवढे एकमात्र काम छत्रपतीकडे राहिले. इ.स.१७५० पासून १८१८ पर्यंत सुमारे ६८ वर्षे पेशवे हेच मराठी सत्तेचा राज्यकारभार करीत होते. ९ डिसेंबर, १७७७ रोजी छत्रपती रामराजांच्या मृत्यू झाला.[४५]

### २.३.११ छत्रपती दुसरे शाहू महाराज(इ.स.१७७८ ते १८०८)

छत्रपती रामराजांनी मृत्यूपूर्वी पेशव्याकरवी वाईकर भोसले घराण्यातील त्रिंबकजीराजे भोसले यांचा मुलगा विठोजीराजे यांना आणून अष्टप्रधानांच्या संमतीने व स्वतः पसंत करून दत्तक घेतले. हा दत्तक समारंभ सातारा येथे १९ जुलै, १७७७ रोजी झाला. दत्तक झाल्यावर विठोजीराजे यांचे नाव बदलून शाहू असे ठेवण्यात आले. हे सातारचे दुसरे शाहू होत. त्यावेळी शाहूचे वय १८ वर्षाचे होते. शाहू राजांचा राज्याभिषेक १२ डिसेंबर, १७७८ रोजी साताऱ्यात मोठया समारंभाने झाला.[४६] अमृतराव पेठे व बाबुराव आपटे यांनी सर्व व्यवस्था केली होती.

छत्रपती शाहूचे वडील त्र्यंबकजी व भाऊ चतुरसिंग वाई सोडून साताऱ्यात राहू लागले होते. बंधू परशुराम मात्र वाई येथेच राहू लागला.[४७]

छत्रपती दुसऱ्या शाहूस स्वातंत्र्य कधीच मिळाले नाही. साताऱ्याच्या किल्ल्यात छत्रपती दुसरा शाहू पेशव्यांच्या खडया पहाऱ्यात राहू लागला. पुण्यास राज्याचा कारभार सुरळीत चालला होता. तोपर्यत पेशव्याच्या विरूद्ध आवाज उठविण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही. सवाई माधवराव पेशव्याच्या मृत्यूनंतर(२७ ऑक्टोबर १७९५) पुण्यास नवीन राजकारणे सुरू झाली. नाना फडणीसाच्या हातात सर्व सत्ता आली. पूर्वीच्या पेशव्यांपेक्षा नाना फडणीसाने मराठा छत्रपतींचा अधिक कोंडमारा केला. छत्रपतींच्या खर्चाचे ऐवज जे स्वतंत्र होते ते बंद करून जो ऐवज देणे तो पुण्याहून नख्त पाठवावा असे ठरविले. कारखाने व कारखानदार यांचा खर्च पाचसहा लाख रूपयांचा होता. तो लाख रूपये करून पागा, सर्व पुण्यास आणले. देशमुख व खासगी यांचे ऐवज पुण्यात येऊ लागले. छत्रपती दुसरा शाहू यांच्यावर पहारा ठेवून राजमंडळाचे लोक येऊन त्यांना कोणी भेटू नये असे केले होते. तेथीला नोकरांची संख्याही कमी केली. अशा रीतीने छत्रपती दुसरा शाहू यांच्या नशिबी बंदिवास, तेजोभंग व अपमानाचे प्रसंग येऊ लागले. छत्रपती दुसरा शाहू याचा भाऊ चतुरसिंग भोसले याला छत्रपतीचा बंदिवास व अपमान सहन न होऊन तो पेशव्याविरूद्ध उठाव करण्यास तयार झाला. मराठयांचे गेलेले वैभव परत मिळविण्याच्या तयारीला लागला. चतुरसिंग भोसले हा पराक्रमी, धाडसी व हुशार होता. मराठयांचे सरदार शिंदे, होळकर व नागपूरकर भोसले यांना एकत्र आणून राज्याची घडी पुनः बसवावी या भावनेने कार्यप्रवण झाला. परंतु त्यामध्ये त्याला यश आले नाही. खानदेशात गिरणा नदीच्या काठी चतुरसिंगाचा मुक्काम असताना त्याला कैद करण्यात आले. दुसऱ्या बाजीरावाने त्याची रवानगी रायगडावर केली. पुढे कैदेत असतानाच रायगडजवळच्या कांगोरी किल्ल्यावर १५ एप्रिल १८१८ रोजी मृत्यू पावला. छत्रपती दुसरा शाहू याची चौथी पत्नी राणी आनंदीबाई उर्फ माईसाहेब या कर्तबगार, बुद्धिवान व व्यवहारकुशल होत्या. त्यांना तीन मुले झाली. थोरला मुलगा प्रतापसिंह, दुसरा मुलगा भाऊसाहेब व तिसरा मुलगा शहाजी उर्फ आप्पासाहेब ही होती. छत्रपती दुसरा शाहू याचा मृत्यू ४ मे १८०८ रोजी झाला. त्यानंतर छत्रपती प्रतापसिंह महाराज हे सत्तेवर आले.[४८]

## २.४ छत्रपती प्रतापसिंह महाराज (१८०८ ते १८३९)

### २.४.१ छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा राज्याभिषेक

छत्रपती शाहू दुसरे यांचा मृत्यू झाला त्यावेळी त्यांचा थोरला मुलगा प्रतापसिंह महाराजांचे वय १५ वर्षाचे होते. त्यांचा जन्म १८ जानेवारी, १७९३ रोजी अजिंक्यतारा किल्ल्यावर माईसाहेब उर्फ आनंदीबाई यांच्या पोटी झाला.[४९] दुसऱ्या शाहूच्या मृत्यूनंतर सातारचा बंदोबस्त करण्यास त्रिंबकजी डेंगळे यास सांगण्यात आला. दुसऱ्या बाजीराव पेशव्याने त्रिंबकजी डेंगळयांच्या मदतीने छत्रपती प्रतापसिंह महाराजांना गादीवर बसविले. अशाप्रकारे छत्रपती प्रतापसिंहाचा १६ मे, १८०८ रोजी सातारच्या किल्ल्यावर राज्याभिषेक झाला.[५०] बाजीरावाला विरोध करण्याची ताकद साताऱ्यातील कोणाजवळही राहिली नव्हती. छत्रपती प्रतापसिंह महाराज लहान असल्याने त्यांची आई माईसाहेब राज्यकारभार पाहत असे. दुसऱ्या बाजीराव पेशव्यांशी स्नेहाचे बोलणे ठेवून माईसाहेबांनी सातारच्या छत्रपती प्रतापसिंह महाराजांचे रक्षण केले होते.[५१]

### २.४.२ दुसरे बाजीराव पेशवे व छत्रपती प्रतापसिंह महाराजांचे संबध

छत्रपती प्रतापसिंह महाराजांना स्वातंत्र्य मिळवून देण्याचा प्रयत्न हनुमंतस्वामी चाफळकर, चतुरसिंगाचा मुलगा बाळासाहेब भोसले, बळवंतराव मल्हारराव चिटणीस, विठ्ठलपंत दिवाण, रंगो बापूजी गुप्ते इत्यादींनी केला होता. मागील अनुभव लक्षात घेऊन मराठयांच्या सरदार अगर संस्थानिक यांच्याशी विचारविनिमय न करता इ.स.१८१२ मध्ये परस्पर इंग्रजांशी संबंध बांधण्याचे ठरविले. या कामी रंगो बापूजीची नेमणूक झाली. त्याने पुण्यास एलफिन्सटनची भेट घेतली व बोलणे केले. त्यावेळी एलफिन्स्टने काम करतो असे लेखी न देता तोंडी वचन दिले.

इ.स.१८१२ मधील पंढरपूरचा तह व ८ मे १८१७ चा पुण्याचा तह यामुळे दुसरा बाजीराव चिडला व त्याने सोक्षमोक्ष करून घेण्याचा निश्चय केला. या कामी सातारकर तरी आपल्या विरूद्ध जाऊ नयेत. आपल्या मदतीस असावेत म्हणून तो स्वतः साताराशेजारील माहूली येथे आला. छत्रपती प्रतापसिंह महाराज व इंग्रज यांच्यात बोलणे सुरू झाले असून ते कायम होईल असे त्यास समजले होते तरी तुम्ही इंग्रजांस सामील होऊ नका. मला मदत करा.

मी नोकर म्हणून राहतो. इत्यादी प्रकारे विनविले. हे मान्य नसेल तर मी सुचवितो त्याप्रमाणे मान्यता देऊन कारभार चालवावा. ती सूचना अशी होती की, महाराजांना विश्वासार्ह वाटतील असे ५ ते १० सरदारांचे एक मंडळ स्थापन करावे व त्यास छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी स्वतःचे देखरेखीखाली घ्यावे. २५ हजार खडी फौज व तिच्या खर्चाची तरतूद करून देतो. महाराजांनी युद्ध चालवावे. या दोन्ही सूचना छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी नाकारल्या. इंग्रंजाबरोबर दुसरा बाजीराव पेशवा याचे युद्ध सुरू झाले. त्यावेळी दुसऱ्या बाजीरावाने छत्रपती प्रतापसिंह महाराजांची सातारच्या किल्ल्यावरील मंडळी १४ डिसेंबर १८१७ रोजी वासोटा किल्ल्यावर ठेवून छत्रपती प्रतापसिंह महाराजांना आपल्याबरोबर सिद्धटेक येथील छावणीत आणले.[५२]

### २.४.३ एलफिन्स्टन व सातारचे छत्रपती प्रतापसिंह महाराज

छत्रपती प्रतापसिंह महाराजांना इंग्रजांच्यावर विश्वास ठेवणे कठीण झाले. म्हणून त्यांनी बाळाजीपंत नातू याच्यामार्फत एल्फिन्स्टन याची भेट घेतली. त्यावेळी पुढील कार्यक्रम ठरला. परंतु त्याबाबत लेखी करार झालेला नाही. त्या कार्यक्रमाप्रमाणे छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी दुसऱ्या बाजीराव पेशव्याची छावणी सोडून इंग्रज छावणीचा आश्रय घेतला. यानंतर एलफिन्स्टनने एक जाहिरनामा छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्याकडून काढला. तो पुढीलप्रमाणे होता. बाजीरावाने रघुनाथपंत पेशव्यास त्याच्या गैरवर्तनाबद्दल पेशवे पदावरून दुर केले आहे. त्याने इंग्रजांविरूद्ध युद्ध पुकारून मुलुखात पुण्डावा व धामधुमी माजविली आहे. तरी त्यास सातारच्या प्रजेने अगर सरदार, जहागीरदार यांनी कोणत्याही प्रकारची मदत करू नये. याविरूद्ध जो कोणी पेशव्यास मदत करील तो राजद्रोही समजला जाईल. त्याचे इनाम व उत्पन्न सरकार जमा केले जाईल. हा जाहिरनामा प्रगट करून इंग्रजांनी १० फेब्रुवारी १८१८ रोजी सातारचा किल्ला ताब्यात घेतला. ६ एप्रिल १८१८ रोजी वासोटा किल्ला घेऊन छत्रपती प्रतापसिंह महाराजांची सर्व माणसे मुक्त केली. हा किल्ला घेत असताना छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा बंधु रामचंद्रपंत यांचा मुलगा बाबासाहेब हा भाजून मरण पावला. छत्रपती प्रतापसिंह महाराजांची माणसे हाती आल्यानंतर सर्वजण साताऱ्यास आली.[५३]

बाजीरावाचा इंग्रजांपुढे निभाव लागत नाही. असे कळून आल्यावर त्यांनी छत्रपतींच्या राज्यरक्षणाची बोलणी इंग्रजांकडे सुरू केली. पेशवाईचा अस्त होण्यापूर्वी माईसाहेबांनी इंग्रजांशी

गुप्त बोलणी करून ११ फेब्रुवारी, १८१८ रोजी इंग्रजांच्याकडून सातारा राज्याच्या निर्मितीची घोषणा ऐकविली.[५४] तसेच १० एप्रिल, १८१८ रोजी आपला मुलगा स्वतंत्र अशा सातारा राज्याच्या गादीवर बसल्याचे पाहिले.[५५]

२५ सप्टेंबर १८१९ च्या तहानुसार ब्रिटिशांचे सार्वभौमत्व मान्य करून छत्रपती प्रतापसिंह महाराजांना मराठा गादी प्राप्त झाली होती. त्यानुसार सातारा संस्थानात तासगाव सोडून इ.स.१८८५ मध्ये अस्तित्त्वात असलेल्या सातारा जिल्हयातील प्रदेशाचा समावेश होत होता. त्याशिवाय सोलापूर जिल्हयातील सांगोला, माळशिरस व पंढरपूर उपविभाग आणि नजिकच्या विजापूर जिल्हयाचा काही भाग देखील सातारा संस्थानात येत होता. मात्र छत्रपती प्रतापसिंह महाराजांना सर्वाधिकार न देता इंग्रजांनी सातारा येथे इंग्रज रेसिडेन्ट नियुक्त केला होता. त्याच्या सहमतीनेच राजांना कारभार चालवावा लागणार होता. या योजनेनुसार जेम्स ग्रँट डफ साताऱ्याचा रेसिडेन्ट म्हणून कार्यरत झाला. ग्रँट डफला सहाय्यक म्हणून माऊन्ट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या खास विश्वासातील बाळाजीपंत नातू याची नियुक्ती करण्यात आली. बाळाजीपंत नातूच्या स्वार्थी व कटकारस्थानी वृत्तीमुळे राजांना पहिल्यापासून त्याच्याबद्दल नावड होती. मात्र छत्रपती प्रतापसिंह महाराजांचे ग्रँट डफ याच्याबरोबर चांगले संबंध होते.

ग्रँट डफ याने छत्रपती प्रतापसिंह महाराजांना राज्यकारभारविषयक मार्गदर्शन केले. राज्यकारभाराच्या नवनव्या योजना सांगितल्या. उत्तेजन दिले आणि राज्य सर्वतोपरी नमुनेदार कसे होईल याची शिकवणी दिली. ग्रँट डफच्या सल्ल्यानुसार छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी आपल्या राज्यात प्रजाहिताच्या अनेक सुधारणा केल्या. राज्यकारभार व न्यायनिवाडा करण्यासाठी ते स्वतः कचेरीत जाऊ लागले. रयतेशी जनसंपर्क ठेवून पिकांच्या पाहणीसाठी ते प्रारंभी ग्रँट डफ बरोबर जात असत. ग्रँट डफ व छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या परस्पर सहकार्याने सातारा संस्थान खूप चांगले झाले होते.[५६]

पूर्वीच्या कोणत्याही छत्रपतींना शहर सुधारणा करण्याचे जमले नाही. राजधानी असलेल्या सातारा शहरात पाण्याची टंचाई मोठया प्रमाणावर होती. छत्रपती प्रतापसिंह महाराजांची यवतेश्वर मंदिराच्या मागे एक मोठा तलाव बांधून त्यातील पाणी नळाने शहरास पुरविले. महारदरा येथेही इ.स.१८२९ मध्ये तलाव बांधून खापरीच्या नळाने त्याचे पाणी शहरात आणले. याच्यासाठी एक लाख रूपये खर्च केले होते. सातारा शहरात सरळ व आखीव रस्ते

बांधले आणि इतरांना ते बांधण्यासाठी होतकरू लोकांना कर्जे दिली होती. संस्कृत, मराठी व इंग्रजी शिक्षणासाठी एक मोठी पाठशाळा बांधली. तेथेच १२ हजार रूपये खर्च करून एक छापखाना काढला व त्या छापखान्यात अनेक उपयुक्त ग्रंथ छापून घेतले. दरबारी मानकऱ्यांसाठी अनेक वाडे बांधले. सातारा शहर व परिसरातील मंदिरासाठी लाखो रूपये खर्च करून काही मंदिराचा जिर्णोद्धार केला. अल्पकाळात छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी सातारा राजधानीची सुधारणा केली. कारागिरी, उद्योग व व्यापार यास राजाश्रय प्राप्त झाला.[५७]

छत्रपती प्रतापसिंह महाराजांचे राज्यकारभारातील कर्तृत्त्व व लोककल्याणासाठी झटण्याची तयारी पाहून रेसिडेंट जेम्स गँट डफने त्यांच्याबद्दल प्रशंसोद्गार काढले आहेत. माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनचीही याबाबत खात्री पटली. म्हणून ब्रिटिश सरकारने छत्रपती प्रतापसिंह महाराजांना अधिकार प्रदान करण्याचे ठरविले. त्यासाठी सातारा येथे ५ एप्रिल १८२२ रोजी मोठा दरबार भरविला. या प्रसंगी अधिकारदानाचा सरकारी जाहीरनामा वाचून दाखविण्यात आला. हा जाहिरनामा ऐतिहासिक दृष्टिने महत्त्वाचा मानला जातो. या जाहिरनाम्यामध्ये पुढील मजकूर आहे. जाहीरनामा सरकार दौलतमदार कंपनी इंग्रज बहादूर तमाम लोकांस महशूर व्हावयाकरिता लिहिले जाते जे सरकार श्रीमंत महाराज छत्रपतिसाहेब राजे सातारा यांसी कंपनी सरकारातून राज्य देऊन तहनामा जाहाला. त्या वेळेस असे ठरले होते की, मुलकाचे आबादी व बंदोबस्ताकरिता व महाराज व त्याचे अलहकार(कारकून) लोक बंदोबस्ताचे कामास वाकब व्हावयाकरिता काही दिवस मुलकाची वहिवाट महाराज यांचे मसलतीने इंग्रजी सरकारचे सरदार करतील. यास हल्ली महाराजांचे सरकारातून दरोबस्त वहिवाट आजपासून होत जावी असे ठरले. त्यावरून उलियम चापलीन साहेब कमिशनर बहादूर यानी साताऱ्यास येऊन महाराज यांचे दरबारात मोठे सरदार व जहागिरदार वगैरे सारे लोक जमा होऊन राज्याची वहिवाट महाराज याचे सरकारात सुपूर्द केली असे. तरी सरदार व जहागिरीदार लहान मोठे जे महाराजांचे इलाख्यात आहेत, त्यांनी तमाम रयत वगैरे हरएक लोकांनी, महाराज यांचे सरकारचे लक्ष ठेवून त्यांचे हुकमात वागत असावे मोठे सरदार व जहागिरदार यांनी आपल्या यादीप्रमाणे वागावे महाराजांचे सरकारातूनही या लोकास हुकूम देते वेळेस यादीप्रमाणे देत जातील. सर्वांनी जाहीरनामा समजोन वागत असावे. जाणीजे. तारीख ५ एप्रिल सन १८२२ इसवी मु । । छत्रपती १२ रजब सु । । इसने आशरीन मयातैन व अलफ.[५८]

### २.४.४ माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन नंतरच्या गव्हर्नरचे छत्रपती प्रतापसिंह महाराजांशी धोरण

मुंबई प्रांताच्या गव्हर्नर पदावरून ३१ ऑक्टोबर १८२७ रोजी माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन सेवानिवृत्त झाला. त्याच्या दुसऱ्या दिवसापासून सर जॉन माल्कम गव्हर्नर झाला. एल्फिन्स्टनच्या कालावधीत जेम्स ग्रँट डफ (एप्रिल १८१८ ते डिसेंबर १८२२) व कर्नल ब्रिग्ज(जानेवारी १८२३ ते डिसेंबर १८२६) हे साताऱ्याचे रेसिडेंट असताना एल्फिन्स्टनच्या धोरणी व मनमिळाऊ परंतु साम्राज्यवादी दृष्टिकोनाचे परिणाम सातारा राज्यावर झाले होते. नोव्हेंबर १८२७ ते डिसेंबर १८३० या काळात माल्कम गव्हर्नर असताना जून १८२७ ते जानेवारी १८३२ या दरम्यान कर्नल रॉबर्टसन रेसिडेंट झाला. माल्कमनंतर काही काळ सिडने बेकविथ हा गव्हर्नर झाला. परंतु त्याची कारकिर्द अल्प ठरली. त्याच्यानंतर अर्ल क्लेअर गव्हर्नरपदी रूढ झाला. हा इ.स.१८३२ ते १८३५ या दरम्यान पदावर होता. तर रेसिडेंट म्हणून कर्नल लॉडविक जानेवारी १८३२ ते १४ जून १८३७ या दरम्यान हा होता. अशाप्रकारे छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा मार्च १८३५ पर्यत राज्यकारभार निर्वेधपणे चालला होता. छत्रपती प्रतापसिंह महाराज व इंग्रज अधिकारी यांच्यात सामंजस्य व सहकाराचा व्यवहार चालू होता. २५ सप्टेंबर १८१९ रोजी इंगजांशी झालेल्या तहातील अटींच्या मर्यादेत साताऱ्याच्या राज्यकारभारात उदारता, प्रेमभाव व प्रागतिकपणा होता. प्रजेलाही हा काळा बराच अनुकूल होता.[५९] तथापि मार्च १८३५ ते ९ जुले १८३८ या दरम्यान रॉबर्ट ग्रँट गव्हर्नरपदी आल्यानंतर छत्रपती प्रतापसिंह महाराजांना अनेक कटकटी व कारस्थानांना तोंड द्यावे लागले होते. त्याच्या काळात कर्नल ओव्हन्स रेसिडेंट असताना १५ जून १८३७ ते १९ मे १८४५ या दरम्यान छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या एतद्देशीय शत्रूंनी व इंग्रजांनी कटकारस्थाने करून त्यांना खूप कोंडीत पकडले व पदच्यूत करण्याचा कट यशस्वी केला.[६०]

### २.४.५ छत्रपती प्रतापसिंह महाराज व पहिला पोलिटिकल एजंट ग्रँट डफ तह (२५ सप्टेंबर, १८१९)

इंग्रजानी पेशव्याना ३ जून, १८१८ रोजी पदावरून दूर करून प्रतापसिंह महाराजांना गादीवर बसविले. परंतु प्रतापसिंह महाराज हे वयाने लहान असल्याने त्यांना वर्षभर नुसतेच थांबवून ठेवले. इंग्रजांनी दुसऱ्या बाजीराव पेशव्याकडून जिंकून घेतलेला सर्व प्रदेश सातारच्या छत्रपतीचा होता. त्यामुळे तो प्रदेश छत्रपतींना सुपूर्द करणे हवे होते. परंतु इंगजांनी जी कूटनीती

होती. त्यानुसार जिंकलेल्या प्रदेशापैकी छत्रपती प्रतापसिंह महाराजांना चरितार्थ चालविता येईल तेवढाच थोडासा प्रदेश द्यावयाचा बाकीचा मोठा प्रदेश स्वतःकडे ठेवावयाचा असे धोरण इंग्रजांनी राबविले होती. त्यामुळे छत्रपती प्रतापसिंह महाराजांना वाटत होते की, आपल्या पूर्वजांनी ज्याप्रमाणे मोठा पराक्रम करून मराठी राज्य मोठे केले. व हिंदू धर्म वृद्धिंगत केले. त्याचप्रमाणे आपण राज्यकारभार करावा. तसेच दुसऱ्या बाजीराव पेशव्याने घालविलेले राज्य पुन्हा परत मिळवावे असा छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा विचार होता.[६१]

छत्रपती प्रतापसिंह महाराज हे मित्रत्वाच्या नात्याने इंग्रजांच्या बाजूने सामील झाले होते. इंग्रजांतर्फे एलफिन्स्टनने पेशवाईने महाराष्ट्रात पुन्हा डोके वर काढू नये यासाठी छत्रपती प्रतापसिंह महाराजांना आपल्या बाजूस वळवून घेतले होते. इंग्रजांना पेशव्याचा आयता मिळालेला प्रदेश हातचा जाऊ नये म्हणून एलफिन्स्टनने डेक्कन कमिशनर पदावर असताना गव्हर्नर जनरलकडे सर्व जबाबदारी दिलेली होती. तसेच छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी कसलीही काळजी करू नये असे ग्रँट डफ सांगत होता. यावरून इंग्रजांनी सातारा राज्याबद्दल कोणता विचार केला होता हे लक्षात येते.[६२]

एलफिन्स्टनचे हे विचार ग्रँट डफने छत्रपती प्रतापसिंह महाराजांना सांगितले होते. त्यास छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी विरोध केला नाही. अशाप्रकारे ग्रँट डफने राज्याचा प्रशासक आणि छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा मार्गदर्शक अशी दुहेरी भूमिका वठविली होती. त्याने राजाच्या सर्व प्रदेश मिळवून त्याची व्यवस्था लावण्याचे फार मोठे काम केले होते. शेवटी ग्रँट डफने सातारा सरहद्दीबाबत २५ सप्टेंबर १८१९ रोजी तह केला. या तहानुसार साताराचे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांना काही प्रदेश तोडून द्यावयाचा होता. म्हणून हा तह करण्यात आलेला आहे. छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्यामार्फत विठ्ठल बल्लाळ फडणीस व इंग्रजांमार्फत कॅप्टन जेम्स ग्रँट डफ यांनी तहावर सहया केल्या. या तहातील अटी पुढीलप्रमाणे होत्या.

१) ब्रिटिशांकडून छत्रपतींना दिलेल्या मुलुखाचे राज्य छत्रपती महाराज व त्यांचे वारस यांनी कायमस्वरूपी तेथे राज्य करावे.

२) इंग्रज सरकार छत्रपती प्रतापसिंह महाराज व त्यांच्या वारसांना जे राज्य देत आहे. ते घेऊन इंग्रज सरकारला तहहयात मदत करावी. इंग्रज सरकाशी सल्लामसलत करून प्रत्येक काम करावे.

३) छत्रपतीच्या प्रदेशात अंतर्गत व परकीय शत्रूनी उपद्रव करून नुकसान पोहचवण्याचा प्रयत्न झाल्यास त्यापासून संरक्षण करण्याची जबाबदारी इंग्रज सरकारची राहिल. यावेळी लष्कराच्या खर्चाकरिता छत्रपतीनी मदत करावी.

४) छत्रपती महाराजांनी इंग्रजांच्या सल्ल्याशिवाय कोणाशीही तह किंवा करार करू नये.

५) छत्रपती महाराजांनी इंग्रजांच्या परवानगीशिवाय कोणासही पत्रव्यवहार करु नये. छत्रपतींना जर कोणी त्रास दिला तर त्याचा बंदोबस्त इंग्रज सरकार करेल. छत्रपतींच्या प्रदेशातील काही अडचण निर्माण झाल्यास हा प्रश्न इंग्रजांच्या मार्फत छत्रपती पार पाडतील.

६) छत्रपती महाराज यांना इंग्रजांनी दिलेला जो मुलूख आहे त्याची बडदास्त काही दिवस छत्रपतीच्या हाती सुपूर्त करण्यात येईल. परंतु जर या मुलूखाचा बंदोबस्त छत्रपतीकडून झाला नाही तर त्याचा बंदोबस्त इंग्रज सरकार करतील.

७) छत्रपती महाराजांना ब्रिटिश सरकारने दिलेल्या मुलुखातील जहागिरदारांची जहागिरी इंग्रजांच्या मर्जीने चालेल.

८) इंग्रजाच्या मुलुखातील खुनी किंवा चोर, अपराधी वगैरे लोक छत्रपतीच्या मुलुखात आल्यास छत्रपतींनी ते धरून इंग्रजांच्याकडे स्वाधीन करावेत. तसेच छत्रपतींच्या मुलुखातील असे लोकही इंग्रजांच्या स्वाधीन करावेत. तसेच छत्रपतींनी अपराधी लोकास आश्रय देऊ नये.

९) कोकणच्या बाजूचा जास्तीत जास्त प्रदेश छत्रपतींचा राहील. छत्रपतींच्या मुलुखाची हद्द सहयाद्री घाटाची राहील. घाटावरील काही डोंगर इंग्रजांकडे ठेवल्यास बाकी छत्रपतींच्याकडे राहतील. याची सरहद्द आखण्यासाठी पाहाणी व मोजणी लवकरात लवकर करण्यात येईल. त्यानंतर जितका प्रदेश इंग्रजांना आपणाकडे ठेवावयाचा आहे. तेवढा आपल्याकडे ठेवून बाकीचा छत्रपतींना द्यावा व सागवानी लाकडे इंगज तोडून नेतील.

१०) व्यापार व जकातीच बंदोबस्त होऊन त्याची चौकशी झाली पाहिजे यासाठी हे कलम केले गेले. इंग्रज सरकार आपल्या प्रदेशातून जेवढी जकात घेतील तेवढीच जकात छत्रपतींनी घेतली पाहिजे.

११) हा तह अकरा अटीचा असून २५ सप्टेंबर सन १८१९ रोजी सातारा येथून अमलात आणला गेला. या तहाच्या मसुदयाची नक्कल इंग्रजी, मराठी व फारशी भाषेत करण्यात येऊन त्यावर ग्रँट डफची दस्कत व छत्रपती प्रतापसिंह महाराजांची मोहर दस्कती केली

जाऊन एक प्रत इंग्रज सरकारकडे व एक सातारा राजधानीत सुपूर्त केली जाईल.[६३]

अशाप्रकारे या अकरा कलमी तहाच्या इंग्रजी, मराठी व उर्दू अशा तीन भाषांत नकला तयार करून त्यावर ग्रँट डफ व छत्रपती प्रतापसिंह महाराज या दोघांच्या सहया झाल्या होत्या. २७ नोव्हेंबर, १८१९ रोजी गव्हर्नर जनरल यांचे कौन्सिलांत त्यांच्या सही शिक्यानिशी मंजूर करण्यात येऊन तो छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी मान्य केला. या तहानुसार पंतप्रतिनिधी औंधकर, पंतसचिव भोरकर, राजे भोसले अक्कलकोटकर, नाईक निंबाळकर फलटणकर, राजे डफळे जतकर व नबाब शेख मिरे पसरणीकर इत्यादी सहा जहागीरदार हे छत्रपती प्रतापसिंह महाराजांचे मांडलिक व त्याच्या हुकुमतीखाली राहणारे जहागिरदार म्हणून मानले गेले. तसेच या तहाने महाराजांस मिळालेल्या राज्याच्या चतुःसीमा दक्षिणेस वारणा व कृष्णा, उत्तरेस निरा व भीमा, पश्चिमेस सहयाद्री व पूर्वेस पंढरपूर व विजापूर अशा होत्या.[६४]

या तहानुसार सातारा येथे ५ एप्रिल, १८२२ रोजी ग्रँट डफने दरबार भरविला. त्यासाठी चॅपालिनला उपस्थितीत राहण्यास सांगण्यात आले होते. चॅपलिनने करारनाम्याप्रमाणे सातारचे राज्य छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या ताब्यात दिले. त्यावेळी आपण रेसिंडेंटच्या सल्ल्यानुसार राज्यकारभार करू असे आश्वासन छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी दिले होते. मात्र सातारा याठिकाणी रेसिडेंटचे ऑफिस असावे असे छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी चॅपलिनला विनंती केली. त्याप्रमाणे ग्रँट डफने २७ नोव्हेंबर, १८२२ रोजी त्याने सातारा शहर सोडले. पुढे छत्रपती प्रतापसिंह महाराजांना सल्ला देण्यासाठी ॲडम्स हा १८२९ पर्यंत साताऱ्यात होता. ग्रँट डफनंतर तो राजाचा सल्लागार होता. ॲडम्सच्या मृत्यूनंतर छत्रपती प्रतापसिंह महाराज व इंग्रज यांच्यातील संघर्षास सुरूवात झाली. [६५]

### २.४.६ ग्रँट डफच्या काळातील सातारा राज्यातील प्रशासन

सातारा राज्यात शांतता प्रस्थापित व्हावी या उद्देश्याने ग्रँट डफने छत्रपती प्रतापसिंह महाराजांना हे छोटेसे सातारा राज्य निर्माण करून दिले होते. त्याने सातारा राज्याचे पश्चिम विभाग व दुसरा पूर्व विभाग असे दोन विभाग केले होते.[६६]

### २.४.७ सातारा राज्याचे अष्टप्रधान मंडळ

सातारा राज्याच्या अष्टप्रधान मंडळात पुढील महत्त्वाचे प्रधान होते.

१) दिवाण– विठ्ठल बल्लाळ महाजनी

२) पंत अमात्य – बाळू कान्हो फडणीस (इ.स.१८३६)

३) पंत सचिव भोरचे चिमणाजी पंडित

४) पंत मंत्री जयवंतराव इस्लामपूरकर (इ.स.१८३१)

५) सेनापती चतूरसिंग भोसले यांचे पूत्र बळवंतराव राजे भोसले((इ.स.१८२०)

६) सुमंत  बळवंतराव मल्हार चिटणीस( १८२१)

७) न्यायाधिश चिंतामण चिटको भट (इ.स.१८३६ ते १८३९)

८) प्रतिनिधी औंधचे परशूराम श्रीनिवास (इ.स.१८२२)

**इतर अधिकारी**

१) सरलष्कर  खंडेराव राजे शिर्के, सन १८२७

२) सेनाकर्ते  दिनकरराव मोहिते, सन १८२७

३) चिटणीस  बळवंत मल्हार चिटणीस, सन १८१८

४) फडणीस  बापू कान्हो, सन १८२७

५) बक्षी  बळवंतराव रामचंद्र, त्याच्या मृत्यूनंतर सखाराम बळवंत, सन १८२७

६) दप्तरदार  वासुदेवपंत अभ्यंकर, सन १८२७

७) राजाज्ञा  केशव यशवंत आगटे, सन १८२७

८) शिकनीस  अमृतराव उपाध्ये त्याच्या मृत्यूनंतर सखाराम कान्हेरे, सन १८२७

९) पोतनिस  भिवराव यास पोतनिस, सन १८२७

१०) मुन्शी  मिर्झा फझल अली, सन १८२७

११) सरखेल  कुशाबा राजे महाडिक, सन १८२७[६७]

अशाप्रकारे छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी अष्टप्रधान मंडळ बनविले असले तरी २५ सप्टेंबर, १८१९ च्या तहामुळे छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या अष्टप्रधान मंडळाला विशेष अधिकार राहिले नव्हते. कारण ब्रिटीश रेसिडेंटच्या हातात सर्व प्रकारचे अधिकार होते.

### २.४.८ छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्यावरील कटकारस्थान

गव्हर्नर रॉबर्ट ग्रँट झाल्यापासून छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या छळास सुरूवात झाली.  कर्नल ओव्हान्स, जेम्स ॲडट्रॅम व बार्टल फ्रियर या व्यक्तींनी बाळाजीपंत नातूला हाताशी धरून सातारा राज्य खालसा व्हावे म्हणून प्रयत्न केले होते.[६८] इंग्रजी राज्याची घडी

बसविण्यात ब्रिटिशांना बाळाजीपंत नातूच्या स्वार्थी व साहसीपणाचा अतिशय चांगला उपयोग झाला. म्हणून त्याच्यावर ब्रिटिशांची मर्जी होती. बाळाजीपंत नातूचे सर्व हेतू व वाईट मार्ग माहती असूनही आपल्या फायद्यासाठी इंग्रजांनी त्याचा स्वार्थी हेतूने उपयोग करून घेतला. बाळाजीपंत नातूमुळे छत्रपती प्रतापसिंहाचा ऱ्हास झाला असेही म्हटले जाते. पण साताऱ्यातील दिवाणपद न मिळाल्यामुळे दुखावलेल्या बाळाजीपंत नातूने प्रतापसिंह महाराजांना राज्य करू न देण्याचा विडा उचलला होता. परकिय इंग्रजांशी एकनिष्ठ असणाऱ्या स्वार्थी बाळाजीपंत नातूने आपल्या हाताने शनिवारवाडयावर इंग्रजांचे निशाण फडकाविले होते.[६९]

बाळाजीपंत नातू हा प्रतापसिंह महाराजांचा एक नंबरचा शत्रू आहे. हे इंग्रजांनी ओळखले होते. म्हणूनच इंग्रजानी नातूला ४ नोव्हेंबर, १८१९ रोजी साताऱ्यातून घालवून दिले होते. पण आपल्याशी एकनिष्ठ असणाऱ्या नातूला एलफिन्स्टनने पुण्यात 'प्रधान अमानतदार' हे पद दिले.[७०]

सातारा शहराच्या दक्षिण सीमेवर एक 'यशवंत तलाव' नावाचा जुना तलाव आहे. तेथे एका तंबूमध्ये एक इंग्रज अधिकारी, श्रीमंत आप्पासाहेब महाराज व बाळाजीपंत नातू या तिघांच्यामध्ये गुप्त मसलती झाल्या. छत्रपती प्रतापसिंह महाराजांचे बंधू आप्पासाहेब महाराज यांनी मला गादीवर बसविले तर मी छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्याविरूद्ध सरकारला सवर्ततोपरी मदत करीन असे वचन त्यांनी दिले. हा कट पुढे यशस्वी झाल्याने या तलावास यशवंत तलाव असे नाव देण्याचे ठरले. छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी बाळाजीपंत नातूविरूद्ध केलेल्या तक्रारीकडे इंग्रज सरकारने अजिबात लक्ष दिले नाही. या उलट छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्याविरूद्ध बाळाजी पंत नातू याने जे आरोप केले होते त्यामध्ये 'प्रतापसिंहाला अधिकाराची हाव आहे, जहागीरदार आणि संस्थानिकांना तो ऐनकेन प्रकाराने छळत असतो. त्यांच्या जहागीऱ्या जप्त करण्याचा त्याचा हेतू आहे. आपला इलाखा आणि ताकद वाढविण्याचा त्याचा प्रयत्न आहे. 'महाराज सरकार कंपनी सरकारविरूध्द गुप्त मसलती करीत आहेत'.[७१] अशा प्रकारच्या अनेक तक्रारी सांगून ब्रिटीश अधिकाऱ्यांची मने तो राजाविरूध्द कलुषित करीत होता. खोटे आरोप करणाऱ्या व्यक्तीवर विश्वास ठेवून एक गुप्त चौकशी कमिशन साताऱ्यास पाठविले. या कमिशनने छत्रपती प्रतापसिंह महाराजांना दोषी ठरविले. तथापि या प्रकरणी इंग्रज सरकारला अनुकूल नसलेल्या रेसिडेंट लॉडविकची साताऱ्याहून बदली करून त्याच्या जागेवर

रॉबर्ट ग्रँटच्या मर्जीतील ओव्हन्सची नेमणूक करण्यात आली. यानंतर छत्रपती प्रतापसिंह महाराजांना पदच्यूत करण्याचे कारस्थान रचण्यात आले. त्यांच्यावर दोषारोपत्र बजावण्यात आले. दोषारोपपत्रातील असत्य आरोपपत्रातील असत्य आरोपातून मुक्ती आणि न्याय मिळावा यासाठी छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी प्रथम सय्यद मीर अफझल अली व नंतर यशवंतराव शिर्के, भगवंतराव विठ्ठल, चिटकोजी सुर्वे यांना फेब्रुवारी १८३९ मध्ये लंडनला पाठविले. छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या सर्व प्रयत्नाना अपयश येत होते. दरम्यान आरोपमुक्तीच्या बदल्यात इंग्रजांनी घातलेल्या अटी मान्य करण्यास छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी स्पष्ट नकार दिला. त्यामुळे रॉबर्ट ग्रँट याने छत्रपती प्रतापसिंह महाराजांना पदच्युत करण्याचे ठरविले. पुण्याहून साताऱ्याला लष्कर पाठवून छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा अपात्र भाऊ आप्पासाहेब भोसले यास साताऱ्याच्या गादीवर बसविण्याचा आदेश नव्याने गव्हर्नरपदी आलेल्या रिव्हेट कारनॅकने बजावला. त्यानुसार पदच्युत केलेल्या छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा भाऊ आप्पासाहेब भोसले याच्याशी ४ सप्टेबर १८३९ रोजी नवीन तह करून त्यास गादीवर बसविले. पूर्वीच्या म्हणजे २५ सप्टेंबर १८१९ रोजीच्या तहात ठरलेली जी कलमे ब्रिटिशांना अडचणीची वाटत होती ती सर्व नवीन तहानुसार दुरूस्त करण्यात आली. पूर्वी साताऱ्याच्या छत्रपतीकडे असलेल्या सहा जहागिरदारावरील ताबा नवीन तहाद्वारे इंग्रजांनी स्वतःकडे घेतला. त्याद्वारे ब्रिटिशांची सत्ता दृढमूल होण्यास मोठया प्रमाणावर मदत झाली.[७२]

छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या पदच्युतीच्या आदेशाची बजावणी रेसिडेंट ओव्हन्सने रात्रीच्या वेळी सातारच्या राजवाडयात जाऊन केली. छत्रपती प्रतापसिंह महाराजांना रात्रीच्याच पोशाखात बिछान्यावर असताना पकडले. साताऱ्याहून १६ कि.मी. अंतरावरील लिंब या गावी एका गोठयात नेऊन पहाऱ्यात ठेवले. अशाप्रकारे ७ डिसेंबर १८३९ रोजी त्यांना लिंब येथे नेण्यात आले होते. तेथून २५ मार्च १८४० रोजी त्यांना काशीला(बनारस) पाठविण्यात आले. काशी येथेच १४ ऑक्टोबर १८४७ रोजी त्याचे निधन झाले.[७३]

माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन याने नोव्हेंबर १८२६ मध्ये सातारा भेटीवर आले त्यावेळी छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्याविषयी पुढील उद्गार काढलेले आहेत, “He is the most civilized Maratha I ever met, has his country in excellent order, and everything to his roads and aqueducts in a style that would credit a

Yuropean."[७४]

मुंबईचा गव्हर्नर अर्ल ऑफ क्लेर(इ.स.१८३१ ते १८३५) याने ६ ऑक्टोबर १८३३ रोजी साताऱ्यात छत्रपती प्रतापसिंह महाराजांची भेट घेल्यावर जो वृत्तांत लिहून ठेवला आहे त्यात पुढील मजकूर आहे, लोकास विद्यादान देण्याची त्यास मोठी हौस असून त्यासाठी साताऱ्यास त्याने पाठशाळा काढली आहे. त्यात इंग्लिश, पर्शियन, मराठी या भाषा शिकवल्या जातात. एल्फिन्स्टन, ब्रिग्ज, माल्कम, रॉबर्टसन इत्यादी कसलेल्या इंग्रजांनी छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या कारभाराची भरघोस प्रशंसा करून त्यांना उचित पारितोषिक देण्याची इंग्लंडच्या सरकारकडे शिफारस केली होती. त्यानुसार प्रशंसेचा खलिता व मौल्यवान अशी तलवार कंपनी सरकारकडून इंग्लंडमधून पाठविण्यात आली. तथापि दरम्यानच्या काळात गव्हर्नरपदी आलेला रॉबर्ट ग्रँट(इ.स.१८३५ ते १८३८) याला छत्रपती प्रतापसिंहाची प्रशंसा न आवडल्यामुळे तो खलिता व तलवार त्याने मध्येच दडपून ठेवली. लंडनमधील न्यायालयात साक्ष देताना कर्नल ब्रिग्ज याने म्हटले की, ज्या हिंदुस्थानी राजांशी आपला संबंध आला त्या सर्वात छत्रपती प्रतापसिंह सच्छील व सद्वर्तनी होता.[७५]

औरंगजेब बादशहाच्या कैदेतून सुटका झाल्यावर छत्रपती शाहू महाराज सातारा येथे स्थायिक झाले. यामुळे सातारा शहराला मराठी राज्याच्या राजधानीचा लौकिक लाभला. पेशव्यांच्या पुण्याप्रमाणे छत्रपतींचे साताराही कंपनी सरकारच्या विस्तारवादी नजरेला सलू लागले. या दोन प्रमुख सत्ताकेंद्रांचा अस्त घडवून आणल्याशिवाय मराठी मुलुखावर आपला अमंल प्रस्थापित करणे जमू शकणार नाही, हे इंग्रजांच्या ध्यानात आले. सन १८१८ मध्ये पेशवाई संपुष्टात आल्यानंतर कंपनीसरकारने आपले लक्ष साताऱ्यावर केंद्रित केले. त्यांच्या या कारवायांना वेळीच पायबंद घालायचा असेल तर आपण देशी शिपायांची मदत घ्यायला हवी, हे साताऱ्यचे राजे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी ओळखले. बॉंबे आर्मीची एक पलटण अगोदरपासूनच साताऱ्याला होती. आपला मनोदय प्रतापसिंहांनी आपले दिवाण गोविंदराव यांच्या कानावर घातला. गोविंदरावांनी त्या दृष्टीने चाचपणी आरंभली.

८ साप्टेबर १८३६ या दिवशी शेख गुलामसिंग आणि गुलजार मिसार हे दोन सुभेदार वेषांतर करून छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या भेटीला आले. मुंबई आणि बेळगाव येथील पलटणी लवकरच बंड करून उठणार आहेत असे छ.प्रतापसिंह महाराजांना समजले होते.

म्हणून ते त्या सुभेदारांना म्हणाले, ‘तिकडे उठाव होताच आपणही इथे तो मार्ग अनुसरायचा.’ त्याप्रमाणे ते दोघे सुभेदार आपल्या इतर सहकाऱ्यांशी विचारविनिमय करू लागले. आपल्याला शिपायांच्या पुरेसा पाठिंबा मिळू शकेल अशी या बैठकींमधून त्या दोघांची खात्री पटली. तसे त्यांनी छत्रपती प्रतापसिंह महाराजांना कळविले होते.

कंपनी सरकारच्या अरेरावीला अनेक संस्थाने कंटाळली होती. हे छत्रपती प्रतापसिंह महाराजांना समजले होते. तेव्हा छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी ग्वाल्हेर, नागपूर, हैदराबाद व बेळगाव इत्यादी ठिकाणी आपले प्रतिनिधी पाठविले होते. प्रतापसिंह महाराजांच्या या हालचालीवर कंपनीसरकारची बारीक लक्ष होते. म्हणून सरकारने छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांची चौकशी करण्यासाठी एक आयोग नेमला. या आयोगाचा अहवाल हातात येताच सरकारने ५ सप्टेंबर १८३९ रोजी त्यांना पदच्युत त्यांची रवानगी वाराणसीला केली. सातारच्या गादीवर त्यांचा भाऊ छत्रपती शहाजी यांना बसविले.[७६]

कंपनीसरकारकडून आपल्यावर झालेल्या अन्यायाचे परिमार्जन करून घेण्यासाठी छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी सांगितल्याप्रमाणे रंगो बापूजी गुप्ते हे ३० जून १८४० रोजी इंग्लंडला पाठविले. यावेळी तेथील संसद सदस्यांना छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्यावर कसा अन्याय झाला आहे, हे पटवून देऊ लागले. इंग्लंडमधील जनमत जागृत करण्यासाठी ते जागोजागी जाहीर सभा घेऊन तेथील वृत्तपत्रात या सभांचे वृत्त प्रसिद्ध करू लागले. रंगो बापूंच्या प्रयत्नांची दखल घेणे कंपनीलाही भाग पडले. त्यानुसार ८ फेब्रुवारी १८४३ रोजी जनरल कोर्टाच्या खास सभेत रंगो बापूना बोलण्याची संधी देण्यात आली. याशिवाय रंगो बापूजींनी ब्रिटिश पार्लमेंटमध्ये व ईस्ट इंडिया कंपनीच्या कोर्ट ऑफ डायरेक्टर्समध्ये अनेक अर्ज केले. कंपनीच्या अन्यायी कारभारामुळे सातारच्या राजाला कसे पदच्युत व्हावे लागले हे ब्रिटिश लोकमताला पटवून दिले. परंतु रंगो बापूजीचे हे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. अनेक वर्षे न्यायासाठी लढा देऊनही ब्रिटिशांनी आपल्या धोरणात बदल केल्याने शेवटी लंडन येथेच मोडी लिपीत ‘प्रतापसिंहावरील आरोपांचे खंडन’ हा ग्रंथ लिहून प्रकाशित केला. या ग्रंथाच्या आधारे छत्रपती प्रतापसिंह महाराजांवरील आरोप चुकीचे आहेत हे इंग्लडमधील जनतेला समजले. यामुळे ब्रिटिश धोरणवरही टिका झाली. आपल्या स्वामीना न्याय मिळावा यासाठी ते चौदा वर्षे लंडनमध्ये राहिले. रंगो बापूजी डिसेंबर १८५३ मध्ये लंडनहून निघून फेब्रुवारी १८५४ मध्ये

पहिल्या आठवडयात मुंबईला परत आले. त्यांना यश मिळाले नाही. तत्पूर्वीच, म्हणजेच सन १८४७ मध्ये छत्रपती प्रतापसिंह महाराजांचे निधन झाले होते.[७७]

छत्रपती प्रतापसिंह महाराजांना सत्यात्याग करावा लागला, याचा त्यांच्या अनेक प्रजाननांना संताप आला. अंताजी राजेशिर्के यांनी चाळीस हजार रोहिल्यांना सातारा येथे आणण्याची धाडसी योजना आखली. प्रसिद्ध असलेल्या रोहिल्यापुढे कंपनी सरकारचे काहीही चालणार नाही याबद्दल राजेशिर्के यांना खात्री होती. परंतु रोहिल्यांना आणण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम ते उभी करू शकले नाहीत. मात्र रंगो बापूजी यांनी सन १८५७ च्या उठावात सहभाग घेऊन आपले कार्य पुढे चालूच ठेवले होते.[७८]

अशाप्रकारे छत्रपती प्रतापसिंह महाराजांना प्रारंभापासूनच अनेक हालअपेष्टांना तोंड द्यावे लागले होते. दुसऱ्या बाजीराव पेशव्याने इंगजाशी वैर येताच छत्रपती प्रतापसिंह महाराजांना नजरकैदेत ठेवले होते. त्यांनी इंग्रजांशी गुप्तपणे संधान बांधून कैदेतून सुटण्याचा प्रयत्न केला. तेव्हा बाजीरावाने काही लढायात छत्रपती प्रतापसिंह महाराजांना सोबत घेतले. शेवटी इंगजांच्या हाती १० फेब्रुवारी १८१८ रोजी छत्रपती प्रतापसिंह महाराज लागले. इंग्रजांनी पेशवाई इ.स.१८१८ मध्ये नष्ट करून बाजीरावास उत्तरेस ब्रम्हवर्तास पाठविले आणि सातारच्या गादीवर इ.स.१८१८ मध्ये छत्रपती प्रतापसिंह महाराजांना बसविले. पुढे त्यांच्याशी १८१९ मध्ये एक तह करून त्यांच्या पूर्वापार चालत आलेल्या हक्कात काटछाट केली. एक मांडलिक संस्थान एवढा दर्जा ठेवून संस्थानास सैन्य वाठविणे, इतरांशी राजनैतिक संबंध प्रस्थपित करणे वगैरेवर निर्बंध घालण्यात आले. राज्यकारभार व व्यवस्था पाहण्यासाठी मुंबईचा गव्हर्नर एल्फिन्स्टन याने ब्रिटिश रेसिडेंट (प्रशासक) दरबारी ठेवला. पहिला रेसिडेंट म्हणून ग्रँट डफ याने छत्रपती प्रतापसिंह महाराजांना राज्यकारभाराचे प्रशिक्षण दिले आणि उत्तेजनही दिले. त्यामुळे छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी सातारा शहरात अनेक सुधारणा केल्या. राजवाडा, जलमंदिर यांसारख्या अनेक वास्तू बांधल्या. शिक्षणासाठी पाठशाळा बांधल्या. इंग्रजी अध्ययनाची सोय केली. छापखाना काढून ग्रंथ छापविले आणि सातारा शहरास पाणी पुरवठा करणारी योजना कार्यान्वित केली. तेव्हा ग्रँट डफने त्यांच्याविषयी कंपनीकडे शिफारस केले. तसेच ईस्ट इंडिया कंपनीने त्यांच्या अधिकारात काही प्रमाणात वाढ केली. डफने इ.स.१८१८ ते १८२२ या काळात ऐतिहासिक साधनसामग्री जमवून पुढे इ.स.१८२६ मध्ये हिस्टरी ऑफ

मराठाज हा ग्रंथ लिहिला. एल्फिन्स्टनची गव्हर्नरची मुदत संपली आणि डफही इंग्लडला गेला, तेव्हा छत्रपती प्रतापसिंह महाराजांचे मुंबईचे गव्हर्नर रॉबर्ट ग्रँट(इ.स.१८३५ ते १८३८) आणि नंतरचे रेसिडेंट ब्रिग्ज, रॉबर्टसन, लॉडविक यांच्याशी पटले नाही. तेव्हा छत्रपती प्रतापसिंह महाराज इंग्रजांविरूद्ध कारस्थान करतो, म्हणून चौकशी समिती नेमली. तर ओव्हान्स या रेसडिंटने गोवा व नागपूरशी संगनमत करून छत्रपती प्रतापसिंह महाराज कट करीत असल्याचा खोटा आरोप केला. यावेळी छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी जहागिरदारावरील अधिकार सोडून देण्याच्या इग्रंजांच्या सूचनेचे पालन केले. तेव्हा ४ सप्टेंबर १८३९ रोजी छत्रपती प्रतापसिंह महाराजांना पदच्युत करून सहकुटुंब काशीला बनारस पाठविले. तिथेच छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा इ.स.१८४७ मध्ये मृत्यू झाला.

## २.५ शहाजी उर्फ आप्पासाहेब महाराज(इ.स.१८३९ ते १८४८)

छत्रपती प्रतापसिंह महाराज यांना गादीवरून दूर करून त्यांचे बंधू शहाजी उर्फ आप्पासाहेब महाराजांना ५ ऑक्टोबर १८३९ रोजी समारंभाने सातारा गादीवर बसविण्यात आले.[७९] बाळाजीपंत नातू त्यांचा दिवाण झाला होता. इंग्रजांनी ४ ऑक्टोबर, १८३९ रोजी आप्पासाहेबांशी नवीन तह केला. त्यात इ.स.१८१९ सालच्या तहातील सर्व कलमे होते. पण त्यात असलेल्या जहागीरदार यांच्यावरील राजहक्क कमी केले.[८०] त्याचा सरकारसी प्रत्यक्ष संबंध आणला याचा अर्थ भोर, फलटण, अक्कलकोट, औंध व जत ही संस्थाने स्वतंत्र केली. तेवढा मुलूख राज्यांतून कमी झाला. छत्रपती शहाजी महाराज यांनी आपल्या अमदानीत खालील गोष्टी केल्या.

१) छत्रपती प्रतापसिंह महाराजांचे पाणीपुरवठयाचे अपुरे राहिलेले काम छत्रपती शहाजी महाराजांनी पूर्ण केले.

२) सातारा शहरात इ.स.१८४५ मध्ये नवा राजवाडा बांधून दरबारची सोय केली.

३) सातारा–पुणे रस्त्यावर वेण्णा नदीस वाढे व कृष्णा नदीस वडूथ या ठिकाणी पूल बांधले. तसेच सालपे गावापर्यंतचा सातारा राज्याच्या हद्दीतील रस्ता दुरूस्त केला. हा सातारा, पुणे जुना रस्ता आहे.

४) छत्रपती आप्पासाहेब महाराजांनी स्वतःच्या ताब्यातील मुलुखात सतीची चाल बंद केली.

५) आपले राज्यात स्वतःचे नाणे बंद करून कंपनीचे नाणे सुरू केले.

६) सन १८४५ मध्ये कोल्हापूर व सावंतवाडी संस्थानात दंगे झाले तेव्हा स्वतःच्या मुलुखात त्याचा प्रादुर्भाव होऊ न देता आपले लष्कर वरील संस्थानातील बंडखोरांना शासन करण्यासाठी कंपनी सरकारकडे दिले.[८१]

छत्रपती आप्पासाहेब महाराजांनी ब्रिटीश अधिकाऱ्यांना कधीही दुखविले नाही त्यांना मूळबाळ नव्हते त्यामुळे त्यांनी शेडगावकर घराण्यातील शरीफजीच्या वंशातील मुलगा व्यंकटराव यास दत्तक घेतला. ब्रिटिशांनी राज्याधिकारास हा मुलगा अयोग्य ठरविला. ५ एप्रिल, १८४८ रोजी आप्पासाहेबांचे निधन झाल्यानंतर इंग्रजानी दत्तक वारस नामंजूर करून ६ जून १८४९ रोजी सातारा राज्य खालसा केले.[८२] अशा प्रकारे पुण्यातील शनिवारवाड्याप्रमाणे अंजिक्यताऱ्यावरही युनियन जॅक फडकू लागले.[८३] शिवछत्रपतींच्या राज्याचा हा अवशेष समाप्त झाला.

छत्रपती आप्पासाहेब महाराजांच्यानंतर सातारा येथे भोसले घराण्यातील अनेक वंशज होऊन गेले. त्यामध्ये व्यंकोजी राजे (इ.स.१८४८ ते १८६४), राजाराम उर्फ आबासाहेब ((इ.स.१८६५ ते १९०४), शिवाजी तथा आण्णासाहेब(इ.स.१९०४ ते १९१४), प्रतापसिंह तथा भाऊसाहेब (इ.स.१९१४ ते १९२५), शाहू राजे(इ.स.१९२५ ते १९५०) असे छत्रपतीच्या घरातील राजे होऊन गेले. परंतु त्यांना स्वतःचा राज्याभिषेक करता आले नाही. कारण ब्रिटिशांनी सातारा संस्थान १८४९ मध्ये खालसा केले असल्याने त्यावर ब्रिटिशांचे राज्य होते. त्यामुळे या घराण्यातील लोकांना नाममात्रच राहावे लागले होते.[८४]

## २.६ भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सातारा शहराचे योगदान

### २.६.१ सन १८५७ चा उठाव व सातारा

ईस्ट इंडिया कंपनीने भारतात आर्थिक परिवर्तनाबरोबर धार्मिक क्षेत्रातही काही बदल घडवून आणले. हिंदूचे धर्मातंर त्याचबरोबर हिंदू रूढी व परंपरांची हेटाळणी करू लागले. त्यामुळे सनातनी हिंदू लोक ब्रिटिश राजसत्तेकडे अत्यंत संशयी वृत्तीने पाहत होते. कंपनी सरकारच्या स्वार्थी व शोषणप्रवण कारभाराने संस्थानिकांची मने असंतुष्ट झाली होती.

रंगो बापूजी गुप्ते यांनी प्रदीर्घ व अथक प्रयत्न केल्यानंतरसुद्धा सातारा संस्थान टिकून राहू शकले नाही. हे संस्थान खालसा करण्याच्या इंग्रंजाच्या स्वार्थी कृतीने संस्थानिकावर निष्ठा बाळगून असलेली सरदार घराणी व इतर लोकांमध्येही असंतोष पसरला. गव्हर्नर जनरल

मार्क्विस ऑफ डलहौसी याच्या संस्थाने खालसा करण्याच्या आक्रमक कारवाईमुळे हिंदुस्थानात राग धुमसत होता. नागपूरचे भोसले व झाशीची राणी लक्ष्मीबाई यांना पदभ्रष्ट करून त्यांची संस्थाने ईस्ट इंडिया कंपनीने हस्तगत केली. उत्तर हिंदुस्थान व मध्य भारत प्रक्षुब्ध झालेला होता. याचवेळी ७ फेब्रुवारी १८५६ रोजी अवधचे राज्य खालसा केल्याची बातमी सर्वत्र पसरली. अवधच्या बेगमांचा छळ सुरू केलेला होता. लखनौचे संस्थानही खालसा केले होते. या सर्व गोष्टींचा परिणाम उत्तर भारताचा दौरा करीत असलेल्या रंगो बापूजी यांच्यावर झाला. ते रामदासी गोसाव्याच्या वेषात फिरत असताना कानपूरजवळ त्यांची भेट क्रांतिकारक तात्या टोपे यांच्याशी झाली. तात्या टोपे यांनी बिठूर येथे नानासाहेब पेशवा व रंगो बापूजी यांची भेट घडवून आणली. त्यांच्यात झालेल्या बैठकीत असे ठरले की, उत्तर हिंदुस्थानात स्थायिक झालेले दक्षिणी संस्थानिक व इतर लोकांनी पेशवाईच्या पुनर्घटनेसाठी एकदिलाने प्रयत्न करावा. सातारा नागपूर, झांशी याचबरोबर आपले राज्य टिकविण्यासाठी उत्सुक असलेला दिल्लीचा मुघल बादशहा बहादुशहा, पंजाबातील शीख, लखनौचे नबाब व पेशव्यांचे वंशज नानासाहेब यांच्यात इंग्रजाबद्दल राग धुमसत होता. अशा वातावरणात रंगो बापूजीनी उमाजी नाईकांच्या बंडाच्यावेळी एकत्र आलेल्या मावळे, रामोशी, कातकरी, कोळी व भंडारी लढवय्ये यांना संघटित केले. सातारा, भोर, रत्नागिरी, मावळ प्रांत विजापूर, पंढरपूर, कोल्हापूर व बेळगाव परिसरात गुप्त संघटना उभारली. रंगो बापूने आपला पुत्र सीताराम गुप्ते याला संघटनेवर देखरेख करण्यासाठी ठेवले.[८५]

## २.६.२ सातारा येथील राजद्रोहाचा कट

सन १८५७ च्या सातारा राजद्रोहाच्या कटाचे मुख्य सूत्रधार रंगो बापूजी गुप्ते होते. सन १८५६–५७ च्या संधिकाळात मनुष्यबळ, द्रव्य व इतर मदत मिळविण्यासाठी रंगो बापूजी सर्वत्र फिरले. त्यामध्ये ते वाठार, येनवडे, देऊर, वर्धनगड, वारूगड, आर्वी, कळंबी, कराड, आरळे, अर्जुनगड, येकमुल्ली, जकातवाडी, फलटण व सातारा येथे भूमीगत केंद्रे स्थापन केली.[८६] रंगो बापूजींच्या सहकाऱ्यामध्ये साताऱ्याचे फडणीस, कराडचे दौलत पवार, रंगोजीचे महाडचे मेहुणे केशव नीलकंठ तथा अण्णा मामा चित्रे, भोरमधील शेटये बंधू, साताऱ्याचे बाविसाव्या पलटणीतील दफेदार गणेश सखाराम कारखानीस, जकातवाडीचे हरी राघोजी देवरूख साताऱ्याचे बाळाजी शिंपी इत्यादींचा समावेश होता. इंग्रजांच्या सेनादलात फितुरी माजविणे,

शस्त्रे गोळा करणे, दारूगोळा तयार करणे व पैसा मिळविणे अशी कामे या सर्वांनी वाटून घेतली.[८७]

या कटात सहभागी झालेल्या लोकांचा ईस्ट इंडिया कंपनीविरूद्ध लढण्याचा आणि सातारा जिल्हा मुख्यालय जिंकून सरकारी खजिना लुटण्याचा या सर्वांचा कट होता. सरकारी कारागृहातील तीनशे बंदिवानांना मुक्त करून त्यांना उठावात सामील करून घेण्याचा बेत त्यांनी रचलेला होता. एप्रिल १८५७ पासून रंगो बापूजींनी जोरदार हालचाली सुरू केल्या. दोन हजार लोकांची सेना उभारण्यात आली. सातारा शहरात संपूर्ण कटाची योजना करण्यात आली. सातारा येथील खजिना लुटून सातारा व यवतेशवर येथील युरोपियन लोकांचा वध करणे हा बेत आखण्यात आला. सातारा येथील मराठा गादीवर प्रतापसिंह महाराजांचा दत्तक मुलगा शाहू यास बसवून मराठा राजवट सुरू करणे. हे अंतिम ध्येय होते. सातारा तुरूंगातील एक राजपूत पहारेकरी मानसिंग याच्यावर २२ व्या पालटणीतील सैनिकांना फितूर करून दारूगोळा हस्तगत करण्याची कामगिरी सोपविण्यात आली होती. तसेच दारूगोळा व तोफांचे गोळे तयार ठेवण्यात आलेले होते.कोल्हापूरचे राजबंधू चिमासाहेब यांच्यासी तात्या फडणीसामार्फत संपर्क साधण्यात येत होता.[८८] बंडखोरांनी उठाव केल्यास घोडेस्वार सैनिक त्यांना प्रतिकार करणार नाहीत, असे दफेदार कारखानीस यांनी रंगो बापूंना आश्वासन दिले होते. हा सर्व कट व्यवस्थित रचलेला होता. तथापि सैन्यात फितुरी माजवणारा पहारेकरी मानसिंग यास संशयावरून पकडण्यात आले. व १२ जून १८५७ रोजी त्यास तोफेच्या तोंडी देण्यात आले. त्यावेळी मानसिंग लोकांना उद्देशून म्हणाला, तुम्ही जातिवंत हिंदू किंवा जातिवंत मुसलमान असाल तर तुम्ही या गोऱ्या लोकांचा सूड घेतल्याशिवाय राहणार नाही.[८९] मानसिंगचा तपास लागल्याने साताऱ्याच्या जिल्हाधिकाऱ्याने ताबडतोब हालचालींना सुरूवात केली. त्यामुळे बंडाचा कट अयशस्वी झाला. यावेळी भोर संस्थानाचे राजे चिमणाजी रघुनाथपंत सचिव हे ही उठावात सामील झाले होते. परंतु या चिमणाजी रघुनाथने पुढे रंगो बापूजींचा विश्वासघात केला.

सातारा येथील जुन्या राजवाडयात खलबते चालू होती. एके रात्री प्रतापसिंह महाराजांचा दत्तकपुत्र शाहू व सेनपतीचा दत्तक पुत्र दुर्गासिंग याचे घोडे जीन घालून सज्ज असलेले आढळले. याचा उद्देश्य असा होता की, या राजाने इ.स.१८५७ च्या बंडाचे नेतृत्त्व करावे. थोरल्या राणीने साताऱ्याचे पोलीस प्रमुख अंताजी राजे शिर्के तथा बाबासाहेब यांना

बंडकऱ्यांना सहाय्य करण्यास प्रवृत्त केले. याच शिर्के यांनी ४०,००० रोहिले साताऱ्याला आणण्याचा १८५६ मध्ये प्रयत्न केला होता. शहाजी महाराजांचा दत्तकपुत्र व्यंकोजी भोसले यास सर्व कारस्थानाची माहिती मिळाली होती. मात्र त्याने स्वतः कोणतीच ठाम भूमिका घेतली नाही. भोरपासून खानापूरपर्यंतच्या परिसरात उठावासाठी गुप्तपणे वित्तबळ उभारण्यात आल्याचेही नंतर इंग्रज सरकारच्या लक्षात आले. रंगो बापूजी साताऱ्याला परतल्यावर ते स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी आपला मुक्काम परळी येथे हलविला आणि तेथून त्यांनी कोल्हापूर, बेळगाव आणि धारवाड येथील शिपायांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. रंगो बापूजी गुप्ते हे मूळचे भोर संस्थानातील कारी या गावचे होते. म्हणून त्यांनी भोरच्या पंतसचिवांना भेटून आपल्या बेताला सहाय्य करण्याचे आवाहन केले. त्या हा बेत म्हणजे सातारा, महाबळेश्वर आणि यवतेश्वर या तीन ठिकाणी एकदम उठाव करायचा, साताऱ्याला सरकारी खजिना ताब्यात घ्यायचा आणि इंग्रज सैन्य महाबळेश्वर आणि यवतेश्वर येथील चकमकीमध्ये गुंतलेले असताना साताऱ्यावर ताबा प्रस्थापित करायचा असे रंगो बापूजींच्या योजनेचे तिहेरी स्वरूप होते. या योजनेला शक्य तितकी मदत करण्याचे पंतसचिवाकडून आश्वासन मिळविण्यात रंगो बापूजी यशस्वी झाले.[१०]

अशाप्रकारे साताऱ्याचा हा कट व्यवस्थित आखण्यात आलेला होता. खास न्यायाधीश फोबर्स याने नमूद केले आहे की, ब्रिटिशांनी जर वेळीच सावधानतेचे कारवाई केली नसती तर, “The rebellion would have broken out in the course of a few days.” आणि त्यातून भयानक स्थिती उद्भवलेली असती. सातारा राजद्रोह कट नावाचा इंग्रजाविरूद्धचा विद्रोह अपयशी झाला.[११] इ.स.१८५७ च्या उपक्रमास सातारच्या राजघराण्याने आर्थिक मदत केली होती. राणी राजसबाई हिने रंगो बापूजीच्या सर्व कारवायांना सहाय्य केले होते. कोल्हापूच्या महाराजांचे सावत्रभाऊ चिमासाहेब यांनी तर या उठावाला हत्यारे, दारूगोळा व पैसा पुरविला होता. रंगो बापूजीचे मुख्यालय सज्ञनगडाजवळ परळीच्या आसपास होते. तरी सातारा जिल्हयातील वाळवे हे उठावाचे मुख्य केंद्र होते.[१२]

१८५७ चा उठाव बराकपूरच्या छावणीत ४ मे यादिवशी सुरू झाला. १० मे रोजी मीरत उठाव व ४ जून रोजी कानपूर उठाव झाला. ही बातमी महाराष्ट्रात पसरली तेव्हा रंगो बापूजीच्या लोकांनी एकत्र येऊन परळीजवळ मोठा दरोडा टाकला. ही गोष्ट रंगो बापूजीस आवडली नाही.

त्यातच या गोष्टीचा सुगावा इंग्रज अधिकाऱ्यांना लागला. व त्यांनी धरपकड सुरू केली. रंगो बापूजीचा मुलगा सीताराम व इतर १७ जणांना कोल्हापूर येथे पकडले. रंगो बापूजी हा या उठावाचा सूत्रधार असल्याने त्यास पकडण्यासाठी इंग्रजांनी ५००० रूपयाचे बक्षीस जाहीर केले. पण इंग्रजाना तो सापडला नाही शेवटी भोर संस्थानचा पंतसचिव चिमणाजी रघुनाथ याने आम्ही या तुमच्या उठावात सामील आहोत. असे भासवून रंगो बापूजीला भेटायला गेला. शेवटी कृष्णराव शिंदकराने विश्वासघातकीपणे रंगो बापूजींना पकडून ब्रिटिशांच्या हवाली केले. अशाप्रकारे ब्रिटिशांच्या बाजूने चिमणाजी रघुनाथही सामील झाले होते. हे नंतर रंगो बापूजीस समजले. ब्रिटिशांनी रंगो बापूजीस रत्नागिरीच्या तुरूंगात ठेवले. पुढे ग्वाल्हेरच्या तुरूंगात ठेवले. रंगो बापूजी ५ जुलै १८५७ रोजी तुरूंगातून पलायन केले. ते अखेरपर्यंत सापडले नाहीत. इकडे रंगो बापूजीचे सर्व नातेवाईक पकडले गेले.[९३]

१७ ऑगस्ट १८५७ रोजी साताऱ्याच्या राजवाडयास इंग्रजांनी वेढा घालून छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा दत्तक पुत्र शाहू तथा जंगली महाराज, राजसबाई, गुणवंताबाई तिचा दत्तक पुत्र दुर्गासिंग या सर्वांना अटक करून प्रथम खडकीला व नंतर मुंबईच्या बुचर नावाच्या बेटावर स्वतंत्रपणे ठेवण्यात आले. पुढे मार्च १८५८ मध्ये त्यांना कराचीत नेऊन ठेवले व काहींना अहमदनगर किल्ल्यात कैदेत ठेवले. शिर्के यांचा वाडा जप्त करण्यात आला. बंडात सहभागी झालेल्या परंतु माफीच्या साक्षीदार बनलेल्या १५ व्यक्तीना मुक्त करण्यात आले. चौदा स्वातंत्र्य सैनिकाची मालमत्ता जप्त करण्यात येऊन त्यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली. या प्रकरणी खास न्यायालयाने १७ स्वातंत्र्य सैनिकांना देहदंडाची शिक्षा फर्मावून फाशी देणे, तोफेच्या तोंडी देणे, व गोळया घालून ठार मारणे असे हुकूम दिले. ८ सप्टेबर १८५७ रोजी सातारा येथे १७ क्रांतिवीरांना ठार मारण्यात आले.[९४] या क्रांतिकारकामध्ये सातारा शहरातील गेंडा माळावर फाशी देण्यात आलेले श्री. नारायण(नाना) बापू पावसकर (सोनार),केशव नीलकंठ चित्रे, शिवराम मोरेश्वर (बहुश्रुत) कुलकर्णी, विठ्ठल कोंडी (तात्या) वाकणीस, सीताराम रंगो गुप्ते या दोघांचा समावेश होता व तोफेच्या तोंडी दिलले क्रांतिकारक मुनाजी उर्फ बापू(नारायण) बाबर उर्द भांदिर्गे, सखाराम बळवंत शेट्ये(चव्हाण), बाब्या नाथ्या गायकवाड, गणेश सखाराम कारखानीस व नाना उमाजी रामोशी(मुडके) यांचा समावेश होता. इंग्रज अधिकाऱ्यांनी समोरासमोर गोळया घालून ठार केलेले क्रांतिकारक म्हणजे रामजी बापूजी

उर्फ रामसिंग चव्हाण, बाब्या हणंगू शिरतोडे, नाम्या नाईक चव्हाण, शिवाजी सोमाजी पाटोळे पर्वती विठोबा सांळुखे व पाटलू येसू घाडगे या दोघांचा समावेश होता.[९५]

साताऱ्याचे गेलेले राज्य परत मिळविण्यासाठी श्रीमंत सगुणाबाईनी महाराणी व्हिक्टोरियाकडे याचिका दाखल केली. तिचा १४ मार्च १८७४ रोजीचा अर्ज मुबंईचे प्रसिद्ध कायदेपंडित विश्वनाथ नारायण मंडलिक यांनी लिहून दिला होता. मात्र हे सर्व प्रयत्न असफल झाले.

घारे अनंत बाळकृष्ण हे सातारच्या कृष्णेश्वर मंदिराचे पुजारी असून ते इ.स.१८५७ च्या उठावत सामील झाले होते. त्यामुळे त्यांना अहमदनगरच्या किल्ल्यात तीन वर्षे कैदेत ठेवले होते. या तुरूंगातून सुटून आल्यावर संन्यास घेऊन दहा वर्षे काशीला गेले. पुढे इ.स.१८७१ मध्ये माहुली येथे समाधिस्त झाले.[९६]

अशाप्रकारे सन १८५७ चा उठाव हा राजकीय, नैतिक, सामाजिक व आर्थिक कारणांचा विस्फोट होता. या उठावाने ब्रिटिश सरकारला आत्मपरीक्षण व आत्मचिंतन करावे लागले. केवळ व्यापारासाठी हिंदुस्थानात गेलेली ईस्ट इंडिया कंपनी असंस्कृत, बेबंद व क्रूर कार्यपद्धतीने वागल्यामुळे ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी धोरणास बाधा आणत असल्याची इंगजांची खात्री पटली. म्हणून हिंदुस्थानातील सत्ता ईस्ट इंडिया कंपनीकडून काढून घेतल्याचा ब्रिटिनच्या सरकारकडून एक जाहीरनामा प्रसिद्ध केला गेला.

### २.६.३ सातारा येथे सार्वजनिक सभेची स्थापना (२६ जून १८७०)

ब्रिटिशाविरूद्ध असंतोष निर्माण करण्यासाठी जमीन महसूल आकारणीमध्ये होणारा अन्याय दूर करण्यासाठी पुणे येथे सन १८७० मध्ये गणेश वासुदेव जोशी उर्फ सर्वजनिक काका यांनी प्रथमतः सार्वजनिक सभेची स्थापना केली. सातारा येथे गणेश वासुदेव जोशी यांनी दुसरी शाखा २८ मे १८७० रोजी स्थापन केली. त्यास गणेश वासुदेव जोशी सार्वजनिक सभेच्या साताऱ्यातील कार्यास वेळोवळी मदत करीत. सार्वजनिक सभेचे वक्ते सातारा जिल्हयात फिरून जनजागृती करीत असत. सन १८७५ च्या दख्खन दंग्याचाही परिणाम सातारा व परिसरातील लोकांवर झालेला दिसून येतो. पुणे व अहमदनगर जिल्हयामधील बंडाळीच्या बातम्या सातारा शहरात पसरल्यावर असंतोष वाढला. मात्र पुणे व अहमदनगर येथील दंग्यापेक्षा सातारा शहरातील दंग्याची तीव्रता कमी होती.

सरकारला लोकांच्या तक्रारींची व मागण्याची माहिती देऊन सरकारी धोरणात बदल करून घेण्यासाठी दबाव आणण्याचा सार्वजनिक सभा प्रयत्न करीत होती. सार्वजनिक सभेच्या समित्यांच्या अहवलातील पुरावे अविश्वसनीय असल्याचे सांगून इंग्रज अधिकारी अहवाल स्विकारत नसत. तरीदेखील सार्वजनिक सभेने उपस्थित केलेल्या प्रश्नाकडे त्यांना लक्ष द्यावे लागत असे. सार्वजनिक सभेने केलेला पाठपुरावा आणि दंगे यामुळे शासनालाही शेतकऱ्यांच्या कर्जनिवारणविषयक गरजांकडे लक्ष देणे भाग पडले. परिणामतः मुंबई इलाखा शासनाला चौकशीसाठी डेक्कन रायटस कमिशन नेमावे लागले. या कमिशनच्या अहवालानुसार उपाययोजना करयासाठी डेक्कन ॲग्रिकल्चरिस्टस रिलिफ ॲक्ट म्हणजे १८७९ चा अधिनियम क्रमांक सतरा पास करण्यात आला. या अधिनियमाच्या रूपाने सार्वजनिक सभेची मोहिमेची फलनिष्पत्ती झाली. हा नियम सातारा जिल्हयात अमलात आला होता. तारण म्हणून ठेवलेल्या जमिनीव्यतिरिक्त इतर कोणतीही शेतजमीन या अधिनियमानुसार कर्जाच्या परतफेडीसाठी काढलेल्या डिक्रीच्या अमंलबजावणीतून मुक्त करण्यात आली. सर्व जमिनीची नोंदणी करून घेणे बंधनकारक करण्यात आले. कर्जाच्या प्रत्येक व्यवहाराची चौकशी करण्याचेही कलम विहित करण्यात आले. कर्जदारावरील बोजा कमी करण्यासाठी हप्त्याने कर्जाची फेड करण्याचे हुकूम काढण्यासाठी न्यायालयांना अधिकार प्रदान करण्यात आले. या अधिनियमाची सर्वात मोठी फलनिष्पती म्हणजे न्यायालयातील खटल्यांचे प्रमाण खूप कमी झाले ही आहे. सन १८७६–७७ च्या दुष्काळातून सातारा जिल्हा बाहेर पडल्यावर अमलात आणलेल्या या अधिनियमामुळे जमिनी गहाण ठेवण्यावर बंधने घालण्यात आली.[९७]

सार्वजनिक सभेचा कटाक्ष राजकीय बाब मुख्य धरून तिच्या अनुषंगाने लोकांच्या इतरही गाऱ्हाण्याचा शेवट लावून घेण्याकडे दिसतो. १५ ऑक्टोबर १८७४ रोजी सातारा सार्वजनिक सभेमार्फत सर्व हक्क राजाचे व प्रजेचे काही नाही. म्हणून व्याख्यानात सदाशिव रावजी गावंडे यांनी ब्रिटिश कारभारावर बरीच टिका केली होती. तर सार्वजनिक काकांनी स्वदेशाभिमान व स्वदेशी कपडा याचे महत्त्व लोकांना पटवून दिले होते. येथील राजांची हल्लीची स्थिती असा निबंध इंग्रजीमध्ये २१ ऑक्टोबर १८७४ रोजी गोविंद वासुदेव कानिटकर यांनीही वाचला होता. सातारा जिल्हयातील संस्थानी प्रश्नांचा स्वतंत्र विचार म्हणून पहिले महत्त्व या निबंधाला द्यावे लागेल.[९८]

सातारा जिल्हा सार्वजनिक सभेची बैठक सातारा येथील दिवाणांच्या वाडयात ३ डिसेंबर १८७६ रोजी पार पडली. या बैठकीत १ जानेवारी १८७७ या तारखेस व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणानिमित्त जे ठराव पास झालेले होते. त्या ठरावावर विचारविनिमय होऊन या बैठकीत पुढील ठराव मांडले गेले.

१) मोठया राजकीय प्रकरणात सर्व राजे लोकांच्या संमती घेतल्या जाव्यात.

२) लष्करी व दिवाणी खात्यात मोठी हुद्याची कामे नेटिवास द्यावी.

३) सातारा व वऱ्हाड अन्यायाने घेतले ते परत मिळावे.

४) हिंदुस्थांतील जमिनीचा सारा जास्ती वाढलेला आहे तो कमी करून निरंतर कायम घ्यावा व ऐनजिन्नस सारा घेत जावा.

५) लोकांस निःशस्त्र केले आहे ती शस्त्रे देण्याचा विचार व्हावा.

६) हिंदुस्थानवर कर्ज आहे त्याचे व्याज इंग्लंडमधील कर्जाप्रमाणे कमी व्हावे.

७) विलायतेचे पार्लमेंटात हिंदुस्थानचे लोकांतर्फे प्रतिनिधी असावे व कायदे कौन्सिलात लोकांनी निवडलेले सभासद असावेत.

अशाप्रकारे या ठरावातील पायाभूत विचारसरणी व धीटपणा अवलोकन केला, म्हणजे सरकारांनी स्थापन केलेल्या कोर्टातून पक्षकारांचे तंटे चुकविण्यास खर्च फार लागतो व निष्कारण वेळ जातो. आणि एकमेकांत अति वैर माजून मोठमोठाली नुकसाने होतात. देशांतील तंटे जितके कमी होतील तितका देशास व राज्यास फायदा आहे व देशात तंटे कमी असणे हे राज्यास भूषण आहे. असे समजून तंटे आपसात मांडून तोडण्याकरिता ७ जुलै १७७६ रोजी सार्वजनिक काकांच्या हस्ते साताऱ्यास लवाद कोर्ट स्थापन केली. तसेच हेडमास्तर जठार व कृष्णा आगटे यांनी सातारा म्युनिसिपालिटीत साखरेचा कारखाना काढण्याचे ठरविले. मात्र हा साखर कारखाना त्यावेळी कागदोपत्रीच राहिला.[९९]

सार्वजनिक सभेच्या कार्यकर्त्यांनी स्वदेशी वस्तू बनवण्यास सुरूवात केली होती. त्यामध्ये शाई, मेणबत्ती, साबण व छत्र्या इत्यादी दैनंदिन गरजेच्या देशी वस्तूच्या निर्मितीचे उद्योगधंदे सातारा येथे निर्माण झाले होते. देशात तयार झालेले कापड विकण्यासाठी सातारा येथे स्वदेशीची दुकाने उघडली गेली होती. त्यासाठी प्रदर्शन, व्याख्याने, प्रचार इ. साधनांचा वापर केला जात होता. स्वदेशी वस्तू वापरण्यासाठी कार्यकर्त्यांनी शपथा घेतल्या होत्या.

सार्वजनिक सभेच्या शेतसारा बंदी आंदोलनाच्या जिल्हयातील मोहिमेचे नेतृत्व श्री.नरसिंह चिंतामण केळकर यांचेकडे होते. त्यांचा भाऊ सातारा जिल्हाधिकारी कार्यालयात असल्याने जिल्हयात केळकरांचे स्वागत चांगल्या प्रकारे झाले. त्यामुळे सरकारी अधिकाऱ्यांशी संपर्क साधनेही सोपे झाले. तरीदेखील सार्वजनिक सभेला शेतकऱ्यांच्या कर्जनिवारण व करवसुलीबंदी या जनजागृतीच्या कार्यात मिळालेले यश अल्प प्रमाणात होते.[१००]

सन १८७६–७७ च्या तीव्र दुष्काळाची झळ पोहोचलेल्या जनतेला पुणे सार्वजनिक सभेच्या कार्याचे व मोहिमेचे महत्त्व प्रकर्षाने जाणवू लागले. लोकांच्या हितासाठी ही सार्वजनिक सभा काम करीत होती. याचवेळी या दुष्काळामुळे सातारा व आसपासच्या भागातून लोकांनी मुंबईत स्थलांतर केले होते. त्यावेळी मुंबईत कापड गिरण्या मोठया प्रमाणावर निघाल्या होत्या. कापड गिरण्यात काम करण्यासाठी कामगार म्हणून या भागातील लोक दाखल झाले होते. सातारा शहराच्या पश्चिमेकडील भाग सोडला तर बाकीच्या सर्व भागातील लोक कापड गिरण्यात काम करण्यासाठी मुंबईला लोक दाखल झाले. त्यामुळे सातारा व आसपासच्या भागातील लोकसंख्या कमी झाली होती.[१०१]

सातारा जिल्हयात स्थानिक स्वराज्य संस्थेची चळवळ सुरू झाली त्यावेळी पुण्याच्या सार्वजनिक सभेचे एजंट रामचंद्र नारायण करकरे यांनी डिसेंबर १८८२ मधील भेट दिली. त्यांनी सातारा जिल्हयात स्थानिक स्वराज्य संस्थेविषयी जागृती व्हावी या दृष्टिने प्रयत्न केले. त्याच धर्तीवर २ जुलै १८८३ रोजी घाटे थिएटरमध्ये नारायणराव फडणीस यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरली. त्या सभेत दादासाहेब करंदीकरांनी रिपनसाहेबांच्या स्थानिक स्वराज्याच्या योजनेवर मुख्य भाषण केले. हायस्कूलचे फर्स्ट असिस्टंट गोपाळ अनंत भट, गणपतराव कोल्हटकर, आनंद बहिरव पिंगळे व हायस्कूलचे हेडमास्तर पाठक यांनी त्या योजनेचा ऊहापोह केला. त्यानंतर रिपनसाहेबांना द्यावयाचे मानपत्र सखाराम रामचंद्र किर्लोस्कर यांनी तयार केले. स्थानिक स्वराज्याच्या रिपनच्या योजनेने आनंदाच्या टाळया वाजविण्यापुरते हुरळून न जाता, ती योजना जिल्हाभर समजून सांगण्याकरिता करंदीकरांच्या प्रेरणेने रामकृष्ण किराणे, कराड, वाळवा, तासगाव व पाटण भागात फिरले. या सभेत शेतकरी कर्ज मुक्तीचा कायदा त्रासदायक म्हणून असाही ठराव ग.पां.आगटे, वि.ल.रांगोळे, ना.स.फडणीस यांनी केला. अशाप्रकारे सार्वजनिक सभेने सातारा भागात चांगल्याप्रकारे कार्य करून सर्व सामान्य शेतकऱ्यांना न्याय

मिळवून देण्याचा फार मोठा प्रयत्न केला. त्यास थोडयाफार प्रमाणात यशही मिळाले. [१०२]

## २.७ इ.स.१८८५ ते १९२० पर्यतच्या सातारा शहरातील स्वातंत्र्य चळवळीतील घडामोडी

### २.७.१ राष्ट्रीय सभेची स्थापना व सातारा

भारतात इंग्रजांनी सर्वत्र आपली राजकीय सत्ता निर्माण केली होती. तेव्हा इंग्रजांना शह देण्यासाठी भारतीयांनी स्वातंत्रय चळवळ सुरू केली होती. त्यासाठी इ.स.१८८५ मध्ये राष्ट्रीय सभेची स्थापना केली होती. या काँग्रेसने वेळोवेळी ब्रिटीशांच्या विरूध्द लढा उभारला. परंतु ब्रिटीशांनी सर्वत्र दडपशाही सुरू केल्याने भारतीयांना त्यात यश मिळत नव्हते. या चळवळीच्या दृष्टिने राष्ट्रवादी विचारसरणी असणारे नेते लोकमान्य टिळक, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे आणि गोपाळ कृष्ण गोखले यांचे अनुयायी सातारा शहरातही होते. यामध्ये रघुनाथ पांडुरंग तथा दादासाहेब करंदीकर व गणेश बल्लाळ फणसळकर हे दोघे वकील टिळकांचे निकटचे सहकारी होते. या दोघांनीच त्या काळात साताऱ्याचे नेतृत्त्व केले होते. इ.स.१८८५ मध्ये राष्ट्रीय सभेची स्थापना मुंबईस झाली. त्यावेळी तिथे साताऱ्यातून दादासाहेब करंदीकर गेले होते.[१०३] सातारा जिल्हयात राष्ट्रीय सभेच्या चळवळीस मदत करू नका म्हणून कोरेगावच्या मामलेदारांनी खेडयातील अधिकाऱ्यांना सांगितले. तरीही राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमात साताऱ्याने मोठी कामगिरी केली आहे. इ.स.१८८६ पासून ते १९०६ पर्यंत राष्ट्रीय सभेला प्रतिनिधी निवडण्याच्या निमित्ताने आणि राष्ट्रीय सभेला जाऊन आलेल्या प्रतिनिधीचा सन्मान करण्याच्या निमित्ताने राष्ट्रीय सभेचे वजन साताऱ्यात वाढविण्याचा प्रयत्न सातारा जिल्हयातील पुढाऱ्यांनी केला होता. दादासाहेब करंदीकर व बळवंतराव कोल्हटकर यांनी राष्ट्रीय सभेची माहिती करून देण्याकरिता दौरे काढले.कृष्णाजी आबाजी गुरूजी यांनीही याकामी फार मोठे कार्य केले होते. या तिघांनी राष्ट्रीय सभेचे काम सतत चालावे म्हणून तालुकानिहाय 'मंडळे' स्थापन केली. १७ फेब्रुवारी १८८८ रोजी दादासाहेब करंदीकरांनी नानासाहेब वैद्याच्या मदतीने वाई तालुक्यात पहिले मंडळ स्थापन केले होते. त्याचप्रमाणे ही मंडळे कराड येथे स्थापन झाले. पुढे इ.स.१८८९ पासून राष्ट्रीय सभेसाठी वर्गणी गोळा करण्याचा उपक्रम सुरू झाला. इतकेच नव्हे तर त्या निमित्ताने जिल्हयाच्या दक्षिण भागात राष्ट्रीय सभेचा संदेश घरोघरी पोहचविण्याची व्यवस्था केली गेली.[१०४]

दादासाहेब करंदीकर व गणेश बल्लाळ फणसळकर हे दोघेही इ.स.१८९० पासून काँग्रेसचे सक्रीय सभासद होते.गणेश वासुदेव जोशी हे सुद्धा सातारा जिल्हयातील होते. दादासाहेब करंदीकर, बळवंतरराव सहस्त्रबुद्धे, बळवंतराव कोल्हटकर, कृष्णाजी आबाजी गुरूजी, नानासाहेब वैद्य, गोविंदराव धोंडो लिमये, दत्तोपंत पारसनीस इत्यादी कार्यकर्ते काँग्रेसच्या प्रचारासाठी व स्वयंसेवक घडविण्यासाठी सातारा जिल्हयात फिरत असत. सातारा जिल्हयातील वाळवे येथे अभिनव संघटनेचे 'छोटी काँग्रेस' नावाचे अधिवेशन इ.स.१८९३ मध्ये भरले होते. या अधिवेशनास काँग्रेस नेते ए.ओ.हयूम उपस्थित होते. याचप्रमाणे साताऱ्यासह तालुक्याच्या ठिकाणी 'छोटी काँग्रेस' या संघटनेच्या बैठका संपन्न झाल्या होत्या.[१०५]

### २.७.२ सातारा येथील प्रांतिक परिषदेचे अधिवेशन(१२ व १३ मे १९००)

प्रांतिक परिषद ही अखिल भरतीय काँग्रेसची विभागीय शाखा होती. ही परिषद प्रथमतः मुंबईइलाख्यात कार्यान्वित झाली होती. त्यामुळे तिच्यावर मुंबईतील नेत्यांचे प्राबल्य होते. या परिषदेचे अधिवेशन १२ व १३ मे १९०० रोजीचे अधिवेशन सातारा येथे भरविण्यात आले होते. या पूर्वीचे इ.स.१८९१ मध्ये भरलेल्या पुणे येथे भरलेल्या प्रांतिक परिषदेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष साताऱ्याचे गोविंद धोंडो लिमये हे होते. तर सातारा येथे भरलेल्या या परिषदेचे अध्यक्षपद मुंबईचे गोकुळदास पारेख यांनी भुषविले होते. या प्रांतिक परिषदेच्या अधिवेशनास मुंबई व इलाख्यातील मवाळ व जहाल विचारधारांचे प्रमुख पुढारी उपस्थित असल्याने बराच वैचारिक कलह झाला होता.[१०६]

अशाप्रकारे सातारा येथील कार्यकर्त्यानी काँग्रेसच्या राष्ट्रवादी कार्यक्रमात सक्रीय सहभाग घेतला होता. या कार्यकर्त्यानी या भागात राजकीयदृष्टया मोठया प्रमाणात जागृती करण्याचे काम केले होते. हे त्यांनी केलेल्या काँग्रेसच्या पचार कार्य, छोटी काँग्रेस व प्रांतिक परिषदेच्या अधिवेशनावरून दिसून येते.

### २.७.३ बंगालची फाळणी व सातारा(१९०५)

बंगालची फाळणी इ.स.१९०५ मध्ये लॉर्ड कर्झनने केली. त्यावेळी भारतात सर्वत्र असंतोष पसरला होता. या फाळणीविरूद्ध लोकमान्य टिळकांनी वंगभंग आंदोलन सुरू केले होते. त्या अनुषंगाने सुरू केलेल्या स्वदेशी चळवळीस सातारा येथे चांगला प्रतिसाद मिळाला होता. एवढेच नव्हे तर या वंगभंग चळवळीबरोबर देशात दहशतवाद सुरू झाला. सातारा येथे

इंग्रजांच्याविरूद्ध भूमिगत सशस्त्र प्रतिकाराचा पुरस्कार करणाऱ्या संघटना सुरू झाल्या. कृष्णराव मारूतराव कळंबे हे  या संघटनेचे प्रमुख होते. इ.स.१९११ मध्ये पंचम जॉर्ज या राजपुत्राचे राज्यारोहण झाले त्यावेळी सातारा येथे 'शिवाजीचे बंड' नावाचा सशस्त्र प्रतिकार करण्याचा पुरस्कार सातारा येथून झाला.[१०७]

## २.७.४ सातारा जिल्हा सभा(इ.स.१९०७)

इ.स.१९०५ च्या बनारस येथील काँग्रेस अधिवेशनातील निर्णयानुसार काँग्रेसचे कार्य सतत चालू राहावे यासाठी जून १९०७ मध्ये 'सातारा जिल्हा सभा' ही संघटना स्थापन करण्यात आली. दादासाहेब करंदीकर या सभेचे पहिले अध्यक्ष होते. ही जिल्हा सभा इ.स.१९३७ पर्यत कार्यरत होती. या सभेने सातारा जिल्हयातील तालुक्याचा ठिकाणी अधिवेशने घेऊन त्यामध्ये तत्कालिन काँग्रेसची ध्येयधोरणे, सार्वजनिक वाहन कायदा, संमती वयाचा कायदा, जमीन सुधारणा, शिक्षण शुल्काचे दर, आय.सी.एस.स्पर्धा परीक्षा भारतात घेणे इत्यादी विषयावर लोकांना जागृत करून सरकारविरूद्ध लोकमत भडकविण्याचा प्रयत्न केला जात होता. या अधिवेशनात स्वदेशीचाही प्रचार केला जात होता. सुरत येथील सन १९०७ च्या अधिवेशनात मवाळ व जहाल यांच्यात वितुष्टता आली. तरीही सातारा जिल्हयात स्वदेशी चळवळ चालू ठेवण्यासाठी या सभेने मोठया प्रमाणात कार्य केले. या सभेचे कार्यकर्ते पांडुअण्णा शिराळकर यांनी बहुलेकर यांच्या मदतीने स्वदेशी आगपेटयांचा कारखाना काढला. तसेच जहाल व मवाळ यांच्यात ऐक्य प्रस्थापित व्हावे यासाठी सातारचे भाऊसाहेब सोमण व आप्पासाहेब आळतेकर यांनी फार प्रयत्न केले. या काळात सातारच्या कार्यकर्त्यांनी लोकमान्य टिळकांची बाजू उचलून धरून आपले कार्य चालू ठेवले होते. एवढेच नव्हे तर लोकमान्य टिळकांचे जवळचे सहकारी रघुनाथ करंदीकर हे जहाल व मवाळ यांच्या दरम्यानचा एक दुवा मानले जात होते. म्हणून त्यांनी टिळकांचे जवळचे सहकारी असतानाही सन १९०७ मध्ये मवाळांचा पुरस्कार केला. रघुनाथ करंदीकर सन १९११ च्या मुंबई विधिमंडळाचे सभासद म्हणून निवडून आले होते. तसेच ते ताई महाराजांच्या खटल्यात लोकमान्य टिळकांचे सल्लागार होते. या खटल्यात त्यांनी लोकमान्य टिळकांना मदत केली होती.[१०८]

### २.७.५ सातारा येथील प्रांतिक परिषदेचे अधिवेशन(इ.स.१९१४ व १९२५)

सातारा येथे इ.स.१९१४ मधील प्रांतिक परिषदेची अधिवेशन भरले होते. या परिषदेचे सूत्रधार विठ्ठलराव पाठक होते. त्याप्रसंगी साताऱ्यातील राजकीय कार्यकर्त्यांनी मवाळ व जहाल नेत्यामध्ये समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला. हे ऐक्य इ.स.१९१६ च्या बेळगाव प्रांतिक परिषदेत पूर्ण झाले होते. याचे स्वंपूर्ण श्रेय सातारच्या प्रांतिक परिषदेस द्यावे लागते. कारण या कामी रघुनाथ करंदीकर यांनी मोठे कार्य केले होते. सातारा येथे इ.स.१९२५ मध्ये पुन्हा प्रांतिक परिषदेचे अधिवेशन भरविण्यात आले.[१०९]

प्रांतिक कार्यकारी मंदळात तीन पक्ष होते, ते म्हणजे राजीनामा देणाऱ्यांचा, मंडलिकांचा, सातारकरांचा हे होत. पहिला पक्ष हा वर्किंग कमिटीची आज्ञा पाळणाऱ्यांविरूद्ध होता. मंडलिकांना त्या वेळेपर्यत आज्ञा पाळणाऱ्यांची आवश्यकता वाटत नव्हती. सातारकरांना दोन्ही विचारसरणी मान्य नव्हत्या. आपली मते एकदा मांडल्यावर व पुन्हा वेळ येईल तेव्हा ती मांडण्याचा अधिकार राखून काँग्रेस ठरावांची अमंलबजावणी करावी अशा मताची ती मंदळी होती. मांडलिक पक्षाला कोणी विचारित नव्हते. पण एकंदरित प्रांतिकमध्ये कौन्सिलवादी पक्षाचे बहुमत होते.[११०]

अशाप्रकारे राष्ट्रीय सभेमध्ये जहाल व मवाळ गट निर्माण झाले होते. त्यास सुरत येथील इ.स.१९०७ च्या अधिवेशनाने आणखी मतभिन्नतेचे स्वरूप मिळाले होते. तेव्हा या दोन्ही गटात ऐक्य निर्माण व्हावे यासाठी सातारा येथे प्रांतिक परिषद भरवून त्याद्वारे प्रयत्न केले जात होते. यामध्ये साताऱ्यातील मवाळामध्ये रा.व.काळे, विठ्ठलराव पाठक आणि वाग्भट नारायण देशपांडे इत्यादींचा समावेश होत होता. तर जहाल गटामध्ये रघुनाथ पांडुरंग करंदीकर, नानासाहेब वैद्य, बळवंत सहस्त्रबुद्धे, गणपत फळसणकर, नारायण आगाशे, रावसाहेब लिमये, भाऊसाहेब सोमण, भाऊसाहेब भागवत, आर.जी.कुलकर्णी व नाथ घाणेकर इत्यादींचा समावेश होता.

### २.७.६ गणेश मेळा चळवळ

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव चळवळीचा कल्पकतेने उपयोग करून जनजागृती व राष्ट्रवादी आंदोलनाचे एक प्रभावी साधन म्हणून उपयोगात आणले होते. सार्वजनिक वर्गणी गोळा करून मनोरंजनाबरोबर लोकशिक्षणासाठी सार्वजनिक गणेश मंडळांना

कार्यरत केले जात होते. या चळवळीला गणेश मेळे नावाच्या कला पथकाची जोड देऊन मेळयाच्या माध्यमातून राष्ट्रीय गीते, पोवाडे, पथनाटय व नाटकाचे प्रयोग करून लोकांची देशभक्ती जागृत करण्याचा उपक्रम हाती घेतला जात होता. टिळकांच्या आवाहनानुसार पुणे व मुंबई या शहराव्यतिरिक्त इतर शहरामध्येही मेळयाचे कार्यक्रम होऊ लागले. पुण्यातील मेळयाच्या धर्तीवर सातारा येथे मेळे संघटित करण्यात आले. सातारा जिल्हयात इ.स.१९०० मध्ये १५ गणेश मेळे कार्यरत होते. या माध्यमातून सरकारविरोधी वातावरण निर्माण होत असल्याने मेळयांना सरकारी परवाने काढण्याचे बंधन घालण्यात आले. पोवाडे व गीतांचे आयोजन करण्यात येत असे. मिरवणूकांवर कडक निर्बंध होते. त्यातील घोषणा व मिरवणूकीच्या मार्गासाठी दंडाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घ्यावी लागे. या गणेश मेळा चळवळीतून सर्व तरूण एकत्र येत असत. त्यामुळे त्यांच्यात ऐक्याची भावना वाढीस लागण्यास याचा मोठया प्रमाणावर उपयोग झाला होता.[१११]

### २.७.७ सशस्त्र क्रांतीतील सहभाग

#### अ) गदर चळवळ

सशस्त्र क्रांतिकारी मार्गाने हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळेल या विचाराचे आणि त्याप्रमाणे प्रयत्न करणारे कार्यकर्तेही साताऱ्यात होते. दामोदर बळवंत भिडे गुरूजी हे न्यू इंग्लिश स्कूल मध्ये शिक्षक होते. त्यांचा संबंध बाहेरच्या क्रांतिकारकाशी होता. अमेरिकेतील काम करणाऱ्या गदर चळवळीशी लागेबांधे सातारा येथे निर्माण झाले होते. त्याच धर्तीवर क्रांतिकार्य करण्यासाठी मने आणि मनगटे तयार झाली पाहिजेत. या इच्छेने तशा जाणिवेचे पैलवान भिडे गुरूजींनी निर्माण केले होते.[११२]

#### ब) अभिनव भारत संघटना

इ.स.१८९९ ते १९०९ या काळात महाराष्ट्रात अनेक राष्ट्रवादी गुप्त संघटना स्थापन झाल्या होत्या. त्यातील सर्वात मोठी संघटना म्हणजे नाशिक येथे विनायक दामोदर सावरकर व बाबाराव सावरकर यांनी स्थापन केलली 'अभिनव भारत' ही संघटना होय. या संघटनेची सातारा येथेही एक गुप्त शाखा होती. क्रांतिकारकांनी मुझफरपूर येथे बाँबस्फोट केल्याने सर्वत्र खळबळ निर्माण झाली होती. तेव्हा महाराष्ट्रातील अनेक युवक बाँब बनविण्याचे तंत्र शिकण्यासाठी जर्मनी, फ्रान्स व जपानला जात असत. अशा युवकांना प्रेरणा देणाऱ्या

संघटनेच्या शाखा बेळगाव, कोल्हापूर, पुणे व नाशिक या शहराबरोबरच सातारा येथेही होती. इंग्रजांविरूद्ध सशस्त्र प्रतिकार करणाऱ्या एका भूमिगत गटात साताऱ्यातील मांग, कैकाडी व मराठा जातीतील युवक सहभागी झाले होते.[११३]

अभिनव भारत संघटनेच्या सातारा शाखेचे सभासद औंध बॉंब प्रकरणात पकडले गेले. औंध हायस्कूलच्या एका खोलीत २३ मे १९१० रोजी बॉंब सापडला. या प्रकरणातील तिन्ही आरोपी साताऱ्याचे असल्याने या प्रकरणाला 'सातारा कट खटला' असेही म्हटले जाते. काही व्यक्तींनी पोलिसांना माहिती पुरविल्याने आरोपी पकडले गेले व त्यांना सक्त मजुरीच्या शिक्षा झाल्या.[११४] या सातारा शाखेमार्फत कृष्णराव कळंबे, डॉ.वा.वि.आठल्ये, महादेव रामचंद्र हिंगे यांनी पुढाकार घेतला होता. अभिनव भारत संघटनेशी संधान साधून शस्त्रास्त्रे चालविणे, तयार करणे आणि संग्रह करणे या कार्यात अनंत वासुदेव सहस्त्रबुद्धे, कृष्णराव कळंबे आणि महादेवराव हिंगे यांनी संघटनेचा पसार जोरात केला.[११५]

बॉम्ब तयार करण्याची कला डॉ. आठल्ये व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्राप्त करून घेतली. त्यांनी स्वदेशी बॉंब बनविला. या सर्व तयारीने सातारा शहरात फार मोठया क्रांतीचे कार्य घडले नाही. या संघटनेला कृतीचा आदेश कोणीच दिला नाही. कृती घडली नाही म्हणून या कार्याचे महत्त्व कमी होत नाही. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी कार्य केले पाहिजे असा प्रचार तरूणांच्यात झाला आणि त्यांची मने त्यासाठी बनविली गेली. पुढे झालेल्या स्वातंत्र्य चळवळीत हेच तरूण जिद्दीने उतरले. नाशिक कटातील कागदपत्रात साताऱ्यातील बाबुराव अंगापूरकर यांचे नाव असल्याने त्यांना जिल्हा पोलीस प्रमुखांच्याकडून हंटरने मारहाण झाली. त्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. ते भारतमाता वर्तमानपत्राचे संपादक होते.[११६]

### २.७.८ साताऱ्यातील होमरूल चळवळ

लोकमान्य टिळकांनी मे १९१६ मध्ये महाराष्ट्र होमरूल लिग स्थापन केली. लोकमान्य टिळकांनी स्वतंत्र मार्गाने आपली राष्ट्रवादी चळवळ चालू ठेवली. यासाठी त्यांनी संघर्षाची भूमिका सोडून देऊन समन्वयाची कार्यपद्धती अवलंबली. सातारा येथे लोकमान्य टिळकांचे अनुयायी असल्याने होमरूलच्या प्रसारास अनुकूल प्रतिसाद मिळाला. या कामी सातारा येथील युनियन क्लब व शिवाजी क्लब यासारख्या संघटनानी ४ मे १९१६ रोजी लोकमान्य टिळकांचा सत्कार केला.[११७]

सन १९१७ मध्ये सातारा येथील कार्यकर्ते आप्पासाहेब आळतेकर, दिगंबरपंत गोखले यांनी तासगाव इस्लामपूर, कराड, विटा भागात होमरूल लीगच्या शाखा स्थापन केल्या. तर अच्युतराव कोल्हटकर, भाऊसाहेब सोमण, व अष्टपुत्रे यांनी रहिमतपूर, माहुली, पाटखळ, बोरखळ व पाटण परिसरात प्रचारकार्य केले.[११८] होमरूल लीगच्या वतीने मार्च १९१८ मध्ये युरोपमध्ये पाठविलेल्या शिष्टमंडळात लोकमान्य टिळक, नरसिंह चिंतामण केळकर, दादासाहेब खापर्डे, बिपिनचंद्र पाल यांच्याबरोबर साताऱ्याचे रघुनाथ पांडुरंग करंदीकर गेले होते. सातारा डिस्ट्रिक्ट कॉन्फरन्स ही संघटना होमरूल लीगचे कार्य करीत होती. लोकमान्य टिळाक सिंध प्रांताच्या दौऱ्यावर असताना २८, २९ मार्च १९२० रोजी होमरूल लीग संघटनेची बैठक भाऊसाहेब सोमण यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता. तेथे लोकमान्य टिळकांच्या अनुयायांचे वर्चस्व होते.[११९]

अशाप्रकारे लोकमान्य टिळकांची होमरूल चळवळ व राष्ट्रावादी आंदोलनात साताऱ्यातील कॉंग्रेसजनांनी त्यांना भरघोस पाठिंबा दिला होता. लोकमान्य टिळक यांनी सुरू केलेल्या वंगभंग स्वदेशी आंदोलन, भूमिगत कारवाया आणि जहालमवाळ संघर्षातही सातारच्या कार्यकर्त्यांनी टिळकांचा जोरदार पुरस्कार केला होता.

## २.८ महात्मा गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सातारा (इ.स. १९२० ते १९४८)

### २.८.१ असहकार आंदोलनातील सातारा

लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांच्या राजकीय विचारसरणीचा समर्थ असा एकही नेता नव्हता. त्यामुळे महाराष्ट्रात राजकीय पोकळी निर्माण होण्याची भिती निर्माण झाली. याचवेळी टिळक पक्षाच्या प्रभाव कमी झाला. तथापि राष्ट्रवादी आंदोलनात सातत्य टिकवणे आवश्यक असल्याने महात्मा गांधीचे नेतृत्त्व स्विकारले. त्यावेळी शंकरराव देव, न.वि.गाडगीळ, गंगाधरराव देशपांडे, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर व आठल्ये वा.वि. यांनी स्पष्ट केले की, महात्मा गांधीजी हेच खरे लोकमान्य टिळकांचे उत्तराधिकारी होत.

नागपूर येथे डिसेंबर १९२० मध्ये राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनात असहकारितेचा ठराव पास केला. तसेच बहिष्कार व स्वदेशी यांच्या स्पष्ट व्याख्या करण्यात येऊन रचनात्मक कार्यक्रम ठरविण्यात आला. त्यानुसार सुत कातणे, विणणे, या कलास उत्तेजन देणे, लवादकोर्ट

स्थापणे, राष्ट्रीय शाळा कॉलेज स्थापणे, खेडयातून सेवा करणारी मंडळे स्थापणे, स्वयंसेवकपथक उभारणे, चळवळीस पैशाचा पाठिंबा देण्याकरिता टिळक स्वराज्य फंड उभारणे.[१२०]

महात्मा गांधीजीनी सन १९२० मध्ये सुरू केलेली असहकार चळवळ सातारा येथे उशिरा सुरू झाली. महात्मा गांधीजी ६ व ७ नोव्हेंबर १९२० रोजी सातारा, वाई, कराड, सांगली या दौऱ्यावर आले होते त्यावेळी खऱ्या अर्थाने सातारा शहरानेही असहकार आंदोलनात भाग घेतला. या आंदोलनाचा एक भाग म्हणून महात्मा गांधीजींनी वकिलांनी सरकारी न्यायालयावर बहिष्कार घालावा, असे प्रतिपादन केले होते. शासकीय शिक्षण संस्थावर बहिष्कार घालून राष्ट्रीय शाळा व महाविद्यालयामध्ये शिक्षण घेण्याचे महात्मा गांधीजींनी आवाहन केले होते. त्याप्रमाणे जानेवारी ते मार्च १९२१ पर्यंत प्रयत्नांची पराकाष्ठा त्यासाठी करावयाची होती. महात्मा गांधीजींनी वरीलप्रमाणे आवाहन केल्याने सातारा शहरातही त्याचे कार्यवाही सुरू झाली. सातारा न्यू इंग्लिश स्कूलचे एक शिक्षक पंढरीनाथ वामन तथा नाथ घाणेकर व त्यांचे बंधू शाळेतून बाहेर पडून नोव्हेंबरच्या अखेरीस असहकाराचा प्रचार करू लागले. हे दोघेजण १ मार्च १९२१ पासून चिंचवडच्या राष्ट्रीय पाठशाळेसारखी राष्ट्रीय पाठशाळा सातारा येथे चालवू लागले. नरसिंहाचार्य गंजेद्रगडकर व वाग्भट देशपांडे यांनी त्यांना सहकार्य केले. महाराष्ट्रातील प्रसिद्ध राष्ट्रीय शाळांमध्ये साताऱ्याच्या शाळेचा समावेश होता. नागपूर काँगेसनंतर नाथ घाणेकर यांनी सातारा येथे टिळक राष्ट्रीय शाळा स्थापन केली. या शाळेत खास शिक्षणक्रम नव्हता. विद्यअर्थ्यांना देशभक्तीचे संस्कार देऊन चळवळीच्यावेळी शूर सिपाई बनविण्याचे कार्य या संस्थेने केले. त्या शाळेत ५० ते ६० विद्यार्थी असत. त्या शाळेत दादा साखवळकर हे शिक्षक होते. या शाळेतील विद्यार्थ्यासमोर नाथ घाणेकरांचाच आदर्श होता. नाथ घाणेकरांचे सिक्षण जरी महाविद्यालयापर्यतचे झाले असले तरी त्यांचे विद्याभ्यासापेक्षा राष्ट्रीय चळवळीकडे विशेष लक्ष होते. त्यांना लोकमान्य टिळकांच्या पासून स्फूर्ती मिळाली होती. त्यांचे जीवन त्यागी व तपस्वी बनले होते. सन १९१६ पासून त्यांचा विद्यार्थ्यांशी विशेष संबंध आलेला होता. त्यांनी सातारा येथे अनाथ विद्यार्थीगच्ह सुरू केले होते. हरिजनवस्तीत शाळा काढली होती. मिशनऱ्यांच्या कार्याला त्यांनी विरोध केला होता. मोफत वाचनालयासाठी खटपट केली होती. त्यावेळी सातारा येथील राष्ट्रीय पाठशाळा सत्याग्रहासाठी स्वातंत्र्य सैनिक पुरवितच होती.[१२१]

महात्मा गांधीजीं आणि काँग्रेस विचारांच्या आंदोलनाचे नेतृत्त्व सन १९२० पासून ते सन १९५० पर्यत सातारा शहरासह जिल्हयाचे नेतृत्त्व सातारा शहरातील कार्यकर्ते रामचंद्र गणेश तथा भाऊसाहेब सोमण वकील यांनी खंबीरपणे केले होते. त्यांना देशातील मोठे पुढारी भेटण्यासाठी येत असत. असहकार आंदोलनात सातारा शहरातील नारायण नरहर अष्टपुत्रे, नारायण कृष्ण आगाशे, रघुनाथ पांडुरंग करंदीकर, आचार्य कालेलकर, काळे रावजी रामचंद्र, नारायण केळकर, उमरभाई बाळभाई खाटिक, गोविंदानंद स्वामी, पंढरीनाथ वामन घाणेकर, घाणेकर निळकंठ वामन, गणेश वासुदेव चिरमुले, जोशी माई गोपाळ, महादेव दत्तात्रय ढगे, वाग्भट नारायण देशपांडे, परचुरे शास्त्री, दत्तात्रय रामचंद्र पराजंपे, महादेव नारायण पारसनीस, नबी मोहमंद बागवान, मुकुंद चिंतामण बापट, शंकर भालचंद्र बापट, केशवराव मारूतराव बुधकर, विष्णू बळवंत भिडे, दादामिया अंबूलाल महात, विष्णू नायक मुतालिक, गणपतराव हरी साठे, विठ्ठल वामन हडप, भाऊसाहेब सोमण, इस्माईल नूरमहमंद हकीम, गणपतराव साठे व दादासाहेब करंदीकर इत्यादी कार्यकर्त्यानी सहभाग घेतला होता.[१२२]

विठ्ठल वामन हडप यांनी सन १९२०–२१ चे बहिष्कार चळवळीत भाग घेतला. मुंबईतून प्रकाशित होणाऱ्या ‘लोकशाही’ पत्रात आक्षेपार्ह लिखाण केल्याबद्दल विठ्ठल वामन हडप यांनी ९ महिने सक्त मजुरीची शिक्षा भोगली.[१२३] नारायण नरहर अष्टपुत्रे यांनी काही काळासाठी वकीली सोडली. महात्मा गांधीजींनी मुंबईला पेटविलेल्या विदेशी कापडाच्या होळीसारखी होळी सातारा येथेही पेटविण्यात आली. काँग्रेस सभासद नोंदणी कार्यास वेग आला होता. हे सत्याग्रही गावोगावी दारूबंदी व खादीचा प्रसार करीत असत. नोव्हेंबर १९२१ मध्ये प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या भारतातील आगमनावर बहिष्कार घालण्याच्या निमित्ताने सातारा येथे हरताळ पाळण्यात आला. नाथ घाणेकर, दादासाहेब करंदीकर, रा.ग.सोमण व आप्पासाहेब आळतेकर हे असहकार आंदोलनात आघाडीवर होते.[१२४]

न्यू इंग्लिश स्कूल सातारा येथील तालमीत गुरूवर्य दत्तोपंत रामचंद्र परांजपे, रघुनाथ केशव थत्ते मास्तर, बलदंड शरीराचे आणि राष्ट्र प्रेमाने भारावलेले तरूण निर्माण करत होते. पुढे त्यांना पैलवान श्रीरंग जाधव यांनी विशेष साथ दिली.[१२५] सत्यभामाबाई काळे यांनी स्वदेशी व स्वराज्य या चळवळीत भाग घेतला. त्यांनी स्त्रियांना स्वावलंबी करण्यासाठी सातारा येथे स्त्री शिक्षण मंदिर चालविले. सन १९२० मध्ये रावबहादूर रावजी काळे यांनी जिल्हा प्रागतिक संघ

स्थापन केला. ते सन १९२१ मध्ये मद्यपान प्रतिबंधक समितीचे अध्यक्ष होते. त्यांनी सोलापूरच्या लष्करी अमंलाबाबत चौकशी समितीची मागणी केली होती. रयत सभेचे अध्यक्ष या नात्याने शेतकऱ्यांची दुःखे सरकरपुढे मांड्ली. यात त्यांना नरहर गंगाधर जोशी वकील यांनी साथ दिली.[१२६]

नाव्हेंबर १९२० मध्ये झालेल्या मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या निवडणुकीवर राष्ट्रीय काँग्रेसने बहिष्कार घातलेला असल्याने मवाळ पंथीयांना व ब्राम्हणेत्तरांना निवडून येणे सोपे झाले. या निवडणुकीत सातारा येथील ब्राम्हणेत्तर पक्षाचे उमेदवार पांडुरंग आढाव निवडून आले.[१२७] मात्र या निवडणूकीत आलेल्या कटू अनुभवामुळे ब्राम्हणेत्तर पक्षीयांना आत्मनिरीक्षण करावे लागले. त्यानुसार विधिमंडळ तसेच विधिमंडळाबाहेर ब्राम्हणेत्तर चळवळीचे काम पद्धतशीररित्या करण्याची गरज चळवळीच्या नेत्यांना वाटू लागली. महात्मा गांधीजींच्या असहकार आंदोलनाच्या रूपाने या पक्षापुढे एक मोठे आव्हान उभे राहिले होते. या गोष्टींचा विचार करून १२ डिसेंबर १९२० रोजी पुण्यात 'ब्राम्हणेत्तर लीग' ही संघटना स्थापन करण्यात आली. त्याचा प्रभाव सातारा येथेही पडलेला होता.[१२८]

असहकारितेची चळवळ सुरू असताना ब्राम्हणेत्तरांतील अत्याचारी प्रश्न महाराष्ट्रात उफाळून आला होता. सातारा येथे ब्राम्हणद्वेष कळसास पोहचला होता. तेथील अत्याचाराच्या बातम्या ऐकून पंढरपूर येथील ब्राम्हण्य संरक्षक परिषदेने सातारा येथील अत्याचाराची चौकशी करण्यास एक कमिशन नेमले होत. त्या कमिशनने चौकशी करून अहवाल प्रसिद्ध केला. अत्याचारांचे वर्णन साधारणपण, ब्राम्हणांना शिव्या देणे, बीभत्स तमाशे करणे, हिंदु दैवते व धर्मगुरू यांची निंदा करणे, धाक घालणे, मजूर कामावरून पळविणे, लागणीस आलेल्या जमिनी स्वतः न करणे व दुसऱ्यास करू न देणे, ग्रामजोशांच्या हक्कास हरकत करणे, स्वतः त्यांचेपासून किंवा त्यांना धर्मकृत्यास बोलाविणे त्यांचेपासून दंड घेणे, पाणवठे, देवस्थाने यांचा उच्छेद करणे किंवा ती दूषित करणे, गुरे व इतर मालमत्ता चोरणे इत्यादी प्रकारचा अत्याचार सुरू झाला.

ब्राम्हणेत्तरांना ही दिशा लागताच विचार ब्राम्हणेत्तरांनी तिच्याशी संबंध ठेवणे बंद केले. हे अत्याचार काही नवीन तरूण लोकांनी सुरू केले होते. ते जुन्या लोकांना मान्य नव्हते. पुण्यातील डेक्कन सभेचे अध्यक्ष बाबासाहेब कामत यांनी सन १९२१ मध्ये जाहीर भाषण करून

अत्याचारी ब्राम्हणेत्तर पक्षाशी आपली फारकत करून घेतली.[१२९]

दादासाहेब करंदीकर सन १९२९ पर्यत सतत काँग्रेसच्या अधिवेशनात भाग घेत होते. काँग्रेसच्या सर्व समित्यांचे ते सदस्य होते. नानासाहेब आगाशे व विनायकराव फणसळकर हे देखील विविध काँग्रेस कार्यक्रमामध्ये भाग घेत. अखिल भारतीय काँग्रेस समितीवर कंरदीकराव्यतिरिक्त आप्पासाहेब आळतेकर, हकीम, रा.ग.सोमण, पांडुअण्णा शिराळकर आणि गोसावी हे काँग्रेसजन काही दिवस होते.[१३०] प्रतिसहकारवादी पक्षाचे लक्ष्मण महादेव तथा नानासाहेब देशपांडे सन १९२६ मध्ये विधिमंडळावर निवडून गेल्यावर त्यांनी १९२६-२७ सालच्या शेतसारा वाढीविरूद्ध आवाज उठविला. पांडुरंग मोहिते यांच्या सहाय्याने सारावाढी विरूद्ध कराड तालुका शेतकरी परिषद भरविली.

१० मे १९२५ रोजी साताऱ्यात महाराष्ट्र प्रांतिक परिषदेचे अधिवेशन बॅ.रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली भरले. या परिषदेस नाफेरवादी काँग्रेस प्रतिनिधी उपस्थित नसल्याने काँग्रेस सभासदत्त्वासाठी असलेली सूतकताईची शर्त काढून टाकण्याचा ठराव पास झाला. गांधीवाद्यांच्या दृष्टीने हे एक प्रतिगामी पाऊल होते. फेब्रुवारी १९२७ मध्ये महात्मा गांधीजींनी सातारा दौरा केला. या काळात साताऱ्याचे रा.ग.सोमण प्रांतिक काँग्रेसच्या कारभारात सक्रिय होते. बाबुराव गोखले ही त्यांना चांगल्याप्रकारे साथ करीत होते. या काळातच सातारा येथे हिंदुस्थान सेवा दलाचे कार्य प्रभावीपणे चालले होते.[१३१]

महात्मा गांधीजीनी स्वातंत्र्य संग्रामात सर्वाना सहभागी करून घ्यायचे ठरविले होते. त्यानुसार विविध कार्यक्रम या असहकार चळवळीच्या माध्यमातून ठेवले होते. त्यामध्ये खादीच्या कार्यक्रमाला अग्रस्थान दिले होते. खादी उत्पादनाच्या कार्यक्रमाच्या द्वारा निष्ठावान लढयात सहभागी करून घेतले पाहिजे, असा आदेश गांधीजीनी आदेश दिला त्याचे पालन असंख्य कार्यकर्त्यानी करून खेडोपाडी खादीचा प्रसार केला. त्याचप्रमाणे त्याचे लोण सातारा शहरातही पोहचले होते. अशाप्रकारे शेतकरी लोकांनीही खादीचे वस्त्र परिधान करून या आंदोलनास पाठिंबा दिला होता.[१३२]

अशाप्रकारे सातारा शहरातील लोकांनी असहकार आंदोलनात मोठया प्रमाणावर सहभाग घेतला होता.या आंदोलनात आपल्या भाषेचे व संस्कृतीचे शिक्षण मिळावे यासाठी राष्ट्रीय पाठशाळा सातारा येथे स्थापन करून त्यामार्फत विविध उपक्रम चालविले होते. यातून

लोकांच्यात राष्ट्राभिमान निर्माण करण्याचे फार मोठे कार्य या पाठशाळेने केले. याशिवाय वृत्तपत्रातून लिखाण करून सरकारवर टिका केली होती. मुंबई येथील बहिष्कार चळवळीत सहभाग घेतला होता. स्त्री शिक्षण मंदिराची स्थापना करून स्त्रियांना शिक्षण मिळावे यासाठी मोठया प्रमानात प्रयत्न झाले होते. स्वराज्य व स्वदेशी या सूत्रानुसार हे आंदालिन यशस्वी करण्यासाठी फार मोठया प्रमाणावर प्रयत्न झाले होते. याच काळात साताऱ्यात महाराष्ट्र प्रांतिक परिषदेचे अधिवेशन घेतले होते. सातारा येथे सन १९२० मध्ये रावबहाद्दूर रावजी काळे यांनी जिल्हा प्रागतिक संघ स्थापन केला होता. त्याद्वारे सरकारपुढे दुःखे मांडण्याचा प्रयत्न केला होता.

### २.८.२ मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या निवडणुक व सातारा शहर(नोव्हेंबर १९२६)

नोव्हेंबर १९२६ मध्ये झालेल्या मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या निवडणुकीत सातारा येथील रावजी रामचंद्र काळे व रँगलर रघुनाथ पुरूषोत्तम परांजपे हे इंडियन नॅशनल पार्टीचे दोन आमदार होते. तर ब्राम्हणेत्तर पक्षांच्या एकूण बारा आमदारामध्ये भास्करराव जाधव व नामदेव नवले यांचा समावेश होता. सातारा जिल्हयातील ब्राम्हणेत्तर पक्षाच्या नेत्यामध्ये एकमत नसल्याने ब्राम्हण मतदार १०,००० व ब्राम्हणेत्तर मतदार ५०,००० असूनही या १९२६ च्या निवडणूकीत एकच ब्राम्हणेत्तर उमेदवार निवडून आला तो म्हणजे भास्करराव जाधव हे होत. तर ब्राम्हणेत्तरांचा पराभव करून रावजी रामचंद्र काळे व लक्ष्मण महादेव देशपांडे हे ब्राम्हण निवडून आले.[१३३]

### २.८.३ सायमन कमिशनच्या वेळचे सातारा शहरातील कार्यकर्त्यामधील मतभेदाची भूमिका

मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलने काँग्रेसला न जुमानता सायमन कमिशनच्या उपक्रमाशी सहकार्य करण्यासाठी एक समिती नेमली होती. या समितीत या समितीत सिंध प्रांतातील भुत्तो, सरदार मुजुमदार व बाबासाहेब आंबेडकर यांच्या जोडीला साताऱ्याचे भास्करराव जाधव हे होते. त्यावेळी भास्करराव जाधव यांनी सायमन कमिशनशी सहकार्य करावे अशी भूमिका मांडली होती. तर सहकार्य करू नये अशी भूमिका ठेवणाऱ्यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, केशवराव जेधे इत्यादी होते.[१३४] सायमन कमिशनवरील बहिष्कारात सहभागी झालेल्या सातारा यथील कार्यकर्त्यामध्ये रामचंद्र नरसू नांगरे यांनी सहभाग घेतला होता.तसेच वि.गो.कुर्लेकर यांणी इ.स.१९२८ मध्ये नागपूरला ‘सायमन गो बॅक’ अशी घोषणा

केली. त्याबद्दल नऊ महिने त्यांना शिक्षा झाली होती.[१३५]

### २.८.४ सविनय कायदेभंग चळवळीतील सातारा शहराचा सहभाग(इ.स.१९३०)

#### अ) सविनय कायदेभंगाच्या चळवळीचे पहिले पर्व

लाहोर येथे इ.स.१९२९ मध्ये भरलेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात पंडित जवाहरलाल नेहरूनी तयार केलेला संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव काँग्रेसने संमत केला. याच अधिवेशनात तिरंगी ध्वज हा हिंदुस्थानचा ध्वज म्हणून फडकविण्यात आला. त्यामुळे हिंदुस्थानातील देशप्रेमाने भारलेल्या तरूणांचा उत्साह वाढला होता. महात्मा गांधीजींनी हिंदुस्थानातील लोक आंदोलनासाठी कितपत तयार आहेत, याची परीक्षा घेण्यासाठी २६ जानेवारी १९३० हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करण्याचे आवाहन केले. त्यानुसार हिंदुस्थानातील बऱ्याचश्या शहरात व खेडेगावात स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. त्याप्रमाणे सातारा शहरातही हा स्वातंत्र्य दिन सोहळा साजरा केला गेला. हा सोहळा म्हणजे संकल्पित स्वातंत्र्य आंदोलनाची एक पूर्वतयारी होती. याकामी सातारा जिल्हा सभेने मोठया प्रमाणावर कार्य केले होते.[१३६]

महाराष्ट्रात कायदेभंग कोठे व कसा करता येईल याचा विचार करून नक्की योजना करण्यासाठी १८ मार्च १९३० रोजी पुणे येथे परिषद भरली. या परिषदेस सातारा येथील डॉ.आठल्ये, दत्तुनाना रघुनाथ करंदीकर, पांडुरंग केशव कोल्हटकर, श्रीधर दत्तात्रय अवचट हे कार्यकर्ते हजर होते. या सभेत मिठाचा कायदेभंग सुरू करावा, शअक्य असल्यास जनतेची दुसरी गाऱ्हाणी कायदेभंगात घ्यावी, रत्नागिरी किंवा विलेपार्ले येथे मिठाचा कायदेभंग करावा, शंकरराव देव, केतकर, आप्पा पटवर्धन, दास्ताने व डॉ आठल्ये वा.वि. या पाच जणांचे सत्याग्रह मंडळ नेमावे. त्याच दिवशी डॉ. आठल्ये यांनी आपले पथक घेऊन नागपूरपासून अमरावती, सावंतवाडी व संकेश्वरापर्यंत स्वयंसेवक भरी केली होती. महाराष्ट्रातील सर्व जिल्हयानी आपापली वर्गणी सेवकरूपाने या स५याग्रहास दिली होती.[१३७]

सविनय कायदेभंग चळवळीत परदेशी मालावर बहिष्कार, जंगल सत्याग्रह, मीठाचा सत्याग्रह दारूबंदीसाठी पिकेटींग इत्यादी उपक्रम राबविले होते. या उपक्रमात सातारा शहरातील पुढील कार्यकर्त्यानी सहभाग घेतला होता. यामध्ये श्रीधर दत्तात्रय अवचट यांनी इ.स.१९३० च्या पुसद येथील जंगल सत्याग्रहात सहभाग घेतला होता. त्यामुळे त्यांना १० रूपये दंड किंवा

सव्वा महिना सक्त मजूरीची शिक्षा झाली होती. दत्तुनाना रघुनाथ करंदीकर हे १९३० च्या चळवळीत सत्याग्रही शिबीरास धान्य जमवीत असत व राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या प्रत्येक चळवळीला अर्थिक सहाय्य देत असत. आचार्य दत्तात्रय काकासाहेब कालेलकर यांनाही तुरूंगवास झालेला होता. अंबादास कुलकर्णी यांणी कायदेभंगाच्या चळवळीत सभा मिरवणुकीत भाग घेतल्याने त्यांना ३० रूपये दंड किंवा एक महिना साध्या कैदेची शिक्षा झाली. मात्र त्यांनी दंड भरला नाही. पांडुरंग केशव कोल्हटकर यांनी या चळवळीत भाग घेऊन वैद्यकीय मदतीसाठी स्वयंसेवक पथक संघटित करून बिळाशी जंगल सत्याग्रहींची सेवा सुश्रूषा केली. गोविंददास दामोदरदास गुजर यांनी सन १९३२ मध्ये पुणे येथे सोलापूर मार्शल लॉ विरोधी सभेत त्याग केला. त्यामुळे त्यांना सहा महिन्याची सक्तमजुरीची शिक्षा व १०० रूपये दंड झाला होता. रमणलाल विठ्ठलदास गुजर यांनी सातारा येथे मीठाच्या सत्याग्रहात भाग घेऊन मीठाची विक्री केली होती. तसेच विलायती मालावर बहिष्कार घातला होता. त्यामुळे त्यांना दोन वर्षे स्थानबद्ध केले होते. देवचंद भिकू बटाला यांनी मीठाच्या सत्याग्रहात भाग घतेला होता. त्यात त्यांना अटक झाली होती. मात्र योग्य त्या पुराव्याअभावी त्यांच्यावर खटला भरला नाही. त्यांना तीन आठवडयानी सोडून देण्यात आले होते. नारायण कोंडिबा घाटगे यांनी मीठाच्या सत्याग्रहात भाग घेतला होता. नाथ घाणेकर यांनी सन १९३० च्या मीठ सत्याग्रहात भाग घेतला. त्यामुळे त्यांना सहा महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा झाली होती. तसेच १९३२ साली टिळक राष्ट्रीय विद्यालय चालविले होते. त्यामुळे त्यांना एक वर्ष सक्तमजुरी व १०० रूपये दंड झालेला होता. कृष्णराव हरिबा जगदाळे यांनी या चळवळीत पुणे येथे जे शिबीर झाले त्यात सहभाग घेतला होता. तसेच मीठाच्या सत्याग्रहात सहभागी झाले होते. याशिवाय विलेपार्ले सत्याग्रहात भाग घेऊन कापड व दारू दुकानांवर पिकेटींग केले होते. धारासना मीठ सत्याग्रहातही त्यांनी सहभाग घेतला होता. सोलापूर झेंडा सत्याग्रहात त्यांना कच्ची कैद झाली होती. गणेश रामकृष्ण गोवळकर यानी या चळवळीत सभा मिरवणुकीत भाग घेतला होता. त्यामुळे त्यांना एक वर्ष सक्त मजुरीची शिक्षा झाली होती.[१३८]

निळकंठ वामन घाणेकर यांनी कायदेभंगाच्या चळवळीत बेकायदा संस्थेचे सभासद म्हणून तीन महिने शिक्षा झाली होती. परंतु एक महिन्याने अपील होऊन त्यांची सुटका झाली. तसेच सन १९३२ मध्ये एका सभेतील भाषणाबद्दल त्यांना अटक झाली होती. विश्वनाथ

मोरेश्वर चित्रे यांनी विलेपार्ले छावणीत भाग घेतल्याबद्दल एक वर्ष कारावासाची शिक्षा झाली होती. सन १९३० व १९३२ साली त्यांना अनुक्रमे चार महिने व आठ महिने कारावास भोगावा लागला होता. निळकंठ पद्माकर दामले यांनी या चळवळीच्या वेळी मुंबईच्या दादर भागात सभामिरवणुकीत भाग घेतला होता. त्यामुळे त्यांना सहा महिन्याची सक्तमजुरीची शिक्षा झाली होती. परचुरे शास्त्री यांनी १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत सातारच्या स्वयंसेवक शिबिराचे प्रमुख म्हणून कार्य केले होते. ते चिंचवडच्या राष्ट्रीय पाठशाळेत शिक्षक म्हणून काम केले होते. पुरूषोत्तम वासुदेव परांजपे हे सन १९३२ पासून काँग्रेसचे सक्रिय कार्यकर्ते म्हणून काम करीत होते. महादेव नारायण पारसनीस यांनी खामगाव जंगल सत्याग्रहात सहभाग घेतला होता. त्याबद्दल त्यांना दीड वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा झाली होती. ते सन १९३१ च्या वऱ्हाड राजकीय परिषदेचे स्वागताध्यक्ष होते. त्यांनी सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग घेतला म्हणून त्यांना दीड वर्षे सक्तमजुरीची शिक्षा व १०० रूपये दंड झाला होता. हणमंत रामचंद्र महाजन हे न्यायशास्त्री असून त्यांनी १९३० च्या चळवळीत मीठ सत्याग्रह सभेत भाग घेतला होता. त्यामुळे त्यांना तीन महिने साध्या कैदेची शिक्षा झाली होती. त्यांनी सन १९३२ बेकायदा सभा भरविल्याबद्दल अडीच वर्ष सक्तमजूरीची शिक्षा झाली होती. वामन भास्कर माटे हे आयुर्वेद चिकित्सक असून त्यांनी कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला होता. त्यामुळे त्यांना चार महिने व दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली. स्वदेशीचा प्रचार, खादीचा आग्रह व दारूबंदीचे प्रचार कार्य त्यांनी केले होते. नारायण माने यांनी कोल्हापूर येथे या चळवळीच्या सभा व मिरवणुकीत भाग घेतला होता. त्यामुळे त्यांना चार महिने सक्तमजुरी व २०० रूपये दंड झालेला होता. गणपतराव हरी साठे हे मीठाच्या सत्याग्रहात दुसऱ्या तुकडीचे नेतृत्त्व करीत होते. जगन्नाथ बळवंत मांढरे यांनी लोणंद येथे दारूच्या गुत्त्यावर पिकेटिंग केले होते. त्यामुळे त्यांना अटक झाली होती. शिवराम मोडक हे वकील असून ते बेकायदा संस्थेचे सदस्य झाल्यामुळे त्यांना चार महिन्याची सक्तमजुरीची शिक्षा झाली होती. पुढे १९३२ मध्ये त्यांनी सातारा येथे बेकायदा सभा भरविल्याबद्दल त्यांना चार महिने सक्त मजुरीची शिक्षा झालेली होती.[१३९]

गोविंदानंद स्वामी यांनी कायदेभंगाच्या चळवळीतील दुसऱ्या पर्वात सिंधचे सर्वाधिकारी म्हणून कार्य केले होते. सन १९३१ मध्ये झालेल्या कराची येथील काँगेसचे स्वागताध्यक्ष होते.

अनंत चिंतामण लागू यांनी सन १९३२ मध्ये कायदेभंग चळवळीत सामील होऊन बुलेटिन्स वाटणे, भित्तीपत्रिका लावणे अशी कामे करत असताना अटक होऊन सहा महिन्याची शिक्षा झाली. गंगाधर केशव सोहनी यांनी सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग घेऊन जंगल सत्याग्रह घडवून आणला होता. त्यामुळे त्यांना तीन महिन्याची सक्त मजूरीची शिक्षा झाली होती. ईस्माईल नूरमहमंद हकीम यांनी जंगल सत्याग्रहात भाग घेतल्याने १५ महिन्याची सक्त मजूरीची शिक्षा व सन १९३२ मध्ये सभा मिरवणुकीत भाग घेतल्याने १८ महिने सक्त मजूरीची शिक्षा झाली. मारूती आत्माराम हळबेयांनी सन १९३२ मध्ये सातारा राष्ट्रीय शाळेचे शिक्षक म्हणून कार्य केले होते. कायदेभंग चळवळीच्यावेळी त्यांनी सातारा सहरातील सभेत भाषण केल्याने त्यांना चार महिन्याची सक्त मजूरीची शिक्षा झाली होती. शंकर पांडुरंग होनराव व सुशिला पांडुरंग होनराव यांनी कायदेभंगाच्या चळवळीत सातारा शहरात मिरवणूक काढून सभा भरविली म्हणून एक महिना तुरूंगवास भोगला.[१४०]

रावजी रामचंद्र काळे यांनी पुण्यास १९३० साली मुंबई कौन्सिल चालू असता सोलापूरच्या लष्करी अंमलाबाबत चौकशी समितीची मागणी केली. इ.स.१९३२ मध्ये सर्वपक्षीय परिषदेची सरकारकडे मागणी केली. सन १९३४ मध्ये सर्वपक्षीय रयत सभेचे अध्यक्ष होऊन शेतकऱ्यांची दुःखे सरकारपर्यंत पोहोचवली. दत्तात्रय कृष्ण गोसावी यांना दोन वर्षाची शिक्षा झाली होती. माई गोपाळ जोशी, लक्ष्मण रामचंद्र जोशी, विठ्ठल रामचंद्र दुधे, दत्तात्रय रामचंद्र परांजपे, राजाराम केशव पालकर, विठ्ठल वासुदेव फडके, केशवराव मारूतीराव बुधकर, चंपावती मोडक, महादेव कृष्णजी लेले, पिलू बुवा वडूजकर, अनंत वासुदेव सहस्त्रबुद्धे, शंकर विनायक सोवनी, गोविंद बापूजी श्रोती इत्यादींनी सहभाग घेतला होता.[१४१]

महात्मा गांधीजीनी १२ मार्च १९३० रोजी साबरमती आश्रमातून निघून दांडी येथे समुद्र किनाऱ्यापर्यंत मोर्चाचे प्रस्थान ठेवले होते. या मोर्चात सातारा शहरातील काही कार्यकर्ते सहभागी झाले होते. ६ एप्रिल १९३० रोजी दांडी समुद्रकिनाऱ्यावर मीठाचा कायद्याचा भंग करून कायदेभंगाचे आवाहन केल्यानंतर सातारा शहरातील सविनय कायदेभंग आंदोलनाचा जोर वाढला होता. यावेळी सातारा शहरात या चळवळीच्या प्रसारासाठी आले होते. त्यामध्ये सोलापूरचे डॉ.कृष्णराव भीमराव अंत्रोळीकर, पुण्यातील न.वि.गाडगीळ, मुंबईचे कन्हैयालाल मुन्शी इत्यादीचा समावेश होता. सातारा शहरात हे आंदोलन नियोजनपूर्वक असल्याने त्यात

सत्याग्रहीची शिस्त होती. ही शिस्त टिकविण्यासठी सर्व कार्यकर्ते झटत होते. पंढरीनाथ घाणेकर, जी.डी.साने व सोमण यांनी या आंदोलनासाठी निधी मिळविण्यासाठी दौरे करीत होते. निधी गोळा करीत असताना ते स्वयंसेवकही नोंदवून घेण्याचा प्रयत्न करीत होते.[१४२]

वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्त्वाखाली शेतकऱ्यांनी केलेल्या बार्डोली सत्याग्रहासारखी स्थिती सातारा सह जिल्हयात निर्माण करण्याचा प्रयत्न सातारचे काँग्रेस कार्यकर्ते करीत होते. त्यास अनुसरून साराबंदी मोहिमही हाती घेण्यात आली होती होती. साताऱ्याला समुद्र किनारा जवळ नसल्याने मीठ निर्मिती करणे शक्य नव्हे. म्हणून जागोजागी जाहीर सभांमधून मिठाची बेकायदेशीर विक्री करण्यात येत होती. ही विक्री सरकारी कायद्याच्या भंग केल्याच्या अशा घटना इंग्रजांच्या दृष्टीने गंभीर स्वरूपाच्या होत्या. त्यामुळे मिठाचा कायेदभंग ही केवळ प्रतिकात्मक बाब न राहता इंग्रज सरकारला ते एक आव्हान होते. कायदेभंग व साराबंदी याबरोबरच सरकारला प्रचंड महसूल मिळवून देणाऱ्या मद्यविक्रीविरूद्धही जोरदार प्रचार करण्यात येत होता. काँग्रेसचे कार्यकर्ते मद्यविक्रीचे लिलाव बंद करीत असत. मद्यविक्रीच्या दुकानासमोर निग्रहाने निदर्शने करून विक्री थांबवित असत. मद्यपानविरोधी मोहीम हाती घेऊन नशाबंदीचा पुरस्कार करण्यात येत असे. मद्यविक्रीपासून मिळणाऱ्या सरकारी महसुलात बरीच घट झाली ही बाब इंग्रजांना फार हानिकारक वाटत होती.[१४३]

या आंदोलनात सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना राजीनामे देण्यासाठी आवाहन केले होते. या अधिकारी व कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय आंदोलनात सामील करून घेण्याचे प्रयत्न शहरामधून करण्यात येत होते. तलाठी व पाटील कार्यालयातील कर्मचारी इत्यादींनी राजीनामे देण्यास प्रवृत्त केले जात होते. या प्रयत्नाना मिळालेले यश फार मोठे नसले तरी त्याकाळी त्याला फार महत्त्व होते. तसेच पोलिस पाटलांनी राजीनामे देणे ही बाब तर फार महत्त्वाची मानली होती. स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी होण्यासाठी पोलिस हवालदार पदाचा त्याग करून प्रचारकार्यास लागलेले नारायण गोविंद कुलकर्णी यांच्या नावाची गुप्तचरांच्या अहवालामध्ये नोंद केलेली आहे. कायदेभंग आंदोलनाचा उघड प्रचार करीत असलेले हे कुलकर्णी इतर पोलिस कर्मचारी व शासकीय कर्मचाऱ्यांनी राजीनामे देऊन आंदोलनात सहभागी व्हावे यासाठी जोरदार प्रयत्न करीत होते. त्यांच्यावर पोलिसांची करडी नजर होती.सातारा शहरात शेकडो नोकर असे होते की, त्यांनी आपल्या सरकारी नोकरीचा राजीनामा दिलेला नव्हता तरी ते अप्रत्यक्षपणे काँग्रेस

कार्यकर्त्यांना मदत करीत होते.[१४४]

सविनय कायदेभंग आंदोलनात सातारा शहरातील ब्राम्हण कार्यकर्ते आघाडीवर होते. सुशिक्षित व्यक्ती व वकिलांचा सत्याग्रहात मोठा सहभाग होता. महिलांचा ही सहभाग या सत्याग्रहाचे फार मोठे वैशिष्ट्य होते. ब्राम्हणेत्तर पक्षाचे पुढारी जुलैच्या तिसऱ्या आठवडयापासून आंदोलनात सहभागी झाले होते. ब्राम्हणेत्तर पक्षाच्या पाठिंब्यांने ग्रामीण भागातील लोकांचा आंदोलनात सहभाग वाढू लागला. सभांमधील भाषणे अधिकाधिक जहाल होऊ लागली होती.त्यामुळे आंदोलन अधिकाधिक व्यापक बनत गेले. आंदोलनाकरिता ब्राम्हणेत्तर युवकांना संघटित करण्यासाठी साताऱ्यासह इतर ठिकाणी युवकांची शिबीरे नाना पाटील, आत्माराम पाटील, व डॉ.हिंगमिरे यांच्या नेतृत्त्वाखाली भरविली होती.[१४५] कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी सुतकताई व खादी कार्यास प्रोत्साहन दिले. संस्थानिकांनी आपल्या प्रजाजनांना नागरिकत्वाचे अधिकार देण्यासाठी जबाबदार राज्यपद्धतीचा त्वरीत स्वीकार करावा, असे त्यांना आवाहन करण्यात आले.[१४६]

सन १९३० ची चळवळ सातारा शहरातही मोठया प्रमाणवर झाली. राष्ट्रीय निशाण लावण्याची मोहिम निघाली तेव्हा सातारा येथील न्यू इंग्लिश स्कूलवर पहिला झेंडा लावण्यात आला. तसेच राजवाडयासमोरील गांधी मैदानावर हिंदुस्थानातील लहान मोठया पुढाऱ्यांच्या सभा होत नसत. त्यामुळे राष्ट्रीय संस्काराने पुनीत झालेले एक ठिकाण गांधी मैदान बनले होते. त्या ठिकाणच्या गोल बागेत विठ्ठल वामन हडप, मारूतराव हळबे यांनी राष्ट्रीय निशाण लावून झेंडा सत्याग्रह केला. सत्याग्रही तुकडीभोवती लोक जमले होते. तेथे पोलीसांनी 'वंदे मातरम्' हे राष्ट्रगीत सुरू असताना सत्याग्रहींना अटक केली होती.

असे विविध प्रकारचे कार्य आणि कार्यकर्त्याला चेतना देण्याचे काम सातारा येथे सुरू होते. कार्यकर्त्यामधील नैतिक आणि बोद्धिक उंची वाढविण्याचे कार्य, नवे कार्यकर्ते तयार करण्यासाठी आणि त्यांच्यात शिस्त बांधण्यासाठी राष्ट्रीय दलाची स्थापना भाऊसाहेब मोडक यांनी केली होती.[१४७]

जून १९३० पासून सातारा शहरातील मिठाच्या सत्याग्रहाचा जोर कमी होऊन जंगल सत्याग्रह करण्यावर भर देण्यात आला. सातारा तालुक्यासह संपूर्ण जिल्हयात ३५ ठिकाणी जंगल सत्याग्रह सुरू झाला होता. या जंगल सत्याग्रहात सातारा शहरातील कॉंग्रेस कार्यकर्ते

सहभागी झाले होते. हे जंगल सत्याग्रह जुलै व ऑगस्ट १९३० मध्ये पार पाडण्यात आले होते. यापैकी बिळाशीचा जंगल सत्याग्रह फार मोठया प्रमाणावर गाजला होता.

जंगल सत्याग्रहाच्या कालावधीत काँग्रेस स्वयंसेवकांची पथके खेडोपाडी हिंडून प्रचार करीत असत. सातारा शहरातील पांडुरंग केशव कोल्हटकर यांनी बिळाशी जंगल सत्याग्रहाची सेवासुश्रुषा केली होती. वन कायद्याचे उल्लंघन करणे व पोलिसावर सामाजिक बहिष्कार घालण्याचा प्रचार करणेयास जोर चढला. त्याचबरोबर विदेशी वस्तुवरील बहिष्कारासाठी जोरदार मोहीम सुरू होती. सामाजिक बहिष्कार आणि विदेशी वस्तुवरील बहिष्कार या बाबींचा गुप्तचरांच्या अनेक अहवालामध्ये खास उल्लेख करण्यात आलेला आहे.[१४८] जानेवारी १९३१ पर्यंत कायदेभंग आंदोलन विविध स्वरूपामध्ये चालू होते. मात्र महात्मा गांधीनी वाटाघाटी करण्यासाठी २५ जानेवरी १९३१ रोजी कैदेतून मुक्त करण्यात आल्याने आंदोलन मागे न घेता स्थगित ठेवण्यात आले. ५ मार्च १९३१ रोजी इंग्रजांशी झालेल्या करारानुसार आंदोलन औपाारिकरीत्या स्थगित करण्यात आले. हिंसक कृत्ये केल्याच्या आरोप नसलेल्या सर्व स्वांतत्र्य सैनिकांना मुक्त करण्याचे ठरले होते. मात्र इंग्रजांनी कराराचे पालन केले नाही. विविध कारणे दाखवून काही लोकांना जाचक वागणूक देण्यास सुरूवात झाली. अशाप्रकारे सविनय कायदेभंगाच्या पहिल्या पर्वात अहिंसात्मक आंदोलन, इंग्रजांशी संघर्षाचा निग्रह आणि उत्कट राष्ट्रप्रेम या गोष्टींचा अविष्कार स्पष्टपणे दिसून आला. हीच या आंदोलनाची फलनिष्पती होय.[१४९]

**ब)सविनय कायदेभंग चळवळीचे दुसरे पर्व**

लंडन येथे १२ नोव्हेंबर १९३० पासून गोलमेज परिषद सुरू झाली. या परिषदेस काँग्रेस पक्षाचा समावेश नव्हता आणि बाकीच्या प्रतिनिधीमध्ये मतभेद होते. त्यामुळे ही परिषद अपयशी ठरली. ७ सप्टेंबर १७३१ रोजी दुसरी गोलमेज परिषद झाली. या परिषदेस काँग्रेस पक्षातर्फे महात्मा गांधी हे एकटेच काँग्रेसचे नेते हजर राहिले होते. या परिषदेतही कोणतीही फलनिष्पत्ती झाली नाही. त्यामुळे महात्मा गांधी गोलमेज परिषदेवरून भारतात परतल्यानंतर लगेचच हे आंदोलन पुन्हा सुरू झाले. सोमवार ४ जानेवारी १९३२ रोजी गांधीजी व सरदार वल्लभभाई पटेल आणि इतर नेत्यांना अटक झाल्याची बातमी साताऱ्यात येऊन पोहचली. त्यामुळे साताऱ्यात सविनय कायदेभंग चळवळीस पुन्हा सुरूवात झाली. यावेळी काँग्रेस कार्यकर्त्याच्यांत कोणतेही नियोजन नव्हते. कारण त्यांना माहित नव्हते की, पुन्हा चळवळ सुरू होईल. त्यामुळे

ब्रिटिश सरकारने चार वटहुकुम जारी केले आणि अल्पावधीत काँग्रेसला हतबल करून टाकण्याचा चंग बांधला होता.

सातारा जिल्हा काँग्रेस समिती, हिंदुस्थान सेवा दल, टिळक राष्ट्रीय विद्यालय, ग्रामसेवा संघ या सातारा शहरातील सर्व संघटना सरकारने बेकायदेशीर ठरविल्या होत्या. यावेळी ब्रिटिश सरकारने प्रमुख कार्यकर्त्यांना पकडून तुरूंगात टाकले होते.तरीही शहरातील या आंदोलनाचा जोर टिकून होता. काँग्रेस समित्या बरखास्त केल्याने शहरामध्ये 'काँग्रेस डिक्टेटर' नियुक्त करण्यात आले. मात्र सरकारने काँगेसचे प्रमुख कार्यकर्ते अटक करून तुरूंगात टाकल्याने या आंदोलनाच्या नेतृत्त्वाचा अभाव जाणवू लागला. शासनाने वटहुकूमांद्वारे दहशत निर्माण केली होती. सविनय कायदेभंगाच्या पहिल्या पर्वापेक्षा दुसऱ्या पर्वात हे आंदोलन सातारा शहरासह इतर शहरातही तीव्र होते.[१५०]

काँग्रेस कार्यकर्त्यांनी सातारा शहरात 'स्वराज्याचा जाहीरनामा' काढला आणि तो सार्वजनिकरित्या वाचून दाखविला. बाँम्बे क्रॉनिकल या वर्तमानपत्राने सातारा येथील आंदोलनाबाबत चांगले उद्‌गार काढले आहेत. पुणे व सांगलीकडील काँग्रेसचे कार्यकर्ते सातारा येथे येऊन सातारा भागात काँग्रेस डिक्टेटर आंदोलन चालू ठेवण्यासाठी सतत प्रयत्नशील असत. याउलट आंदोलनाचा मुकाबला करणासाठी जिल्हा दंडाधिकारी ठिकठिकाणी सरकारी प्रचारसभा आयोजित करीत असत. अशा सभामधून काही राजनिष्ठ नागरिक व शासकीय अथिकारी काँग्रेसच्या आंदोलनावर टीका करीत असत. कायदेभंग चळवळीत स्वराज्य मिळणार नाही असा प्रचार करीत असत. सरकारी वसुली भरण्यासाठी आणि कायद्यांचे अधिराज्य राखण्यासाठी लोकांना आवाहन करीत. अशा सभांच्या याद्या सरकारला कळविण्यात येत असत. जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या अशा प्रकारच्या प्रयत्नामुळे काँग्रेसच्या साराबंदी आंदोलनाचा शासकीय कोषागारावर फारसा प्रतिकूल परिणाम झाला नाही. शासनाचे वसुलीचे काम जोरदार असूनही सातारा येथील रामचंद्र गणेश सोमण दत्तात्रय परचुरे, डॉ.वासुदेव आठल्ये व पंढरीनाथ वामन घाणेकर हे तुरूंगातून सुटून आल्यावर पुन्हा आंदोलनात सहभागी झाले होते. एप्रिल १९३२ नंतर या आंदोलनाचा जोर कमी झाला.[१५१]

अशाप्रकारे सविनय कायदेभंग चळवळच्या दोन्ही पर्वातील सत्याग्रहाने भारताचे स्वातंत्र्य मिळाले नसले तरी या दोन्ही पर्वाचे महत्त्व अनन्य साधारण आहे या आंदोलनात

तयार झालेल्या युवकांच्या पिढीने सन १९४२ च्या चले जाव आंदोलनाचे नेतृत्त्व केले. सविनय कायदेभंग चळवळीपर्यंतच्या आंदोलनात बहुजन समाज सामील झाला नव्हता. परंतु या आंदोलनात महात्मा गांधीजींचा अन्यायाविरूद्ध लढण्याचा प्रचंड निर्धार, राष्ट्रीय अस्मिता जागृत करण्यासाठी त्यांनी दिलेल्या प्रेरणा आणि जनसामान्यांबरोबर नेण्याची त्यांची अलौकिक शक्ती इत्यादि कारणांनी हे आंदोलन महान ठरले होते. महात्मा गांधीजींच्या शांततामय सत्याग्रहाच्या या प्रयोगाकडे सर्व जग उत्सुकतेने पाहत होते. त्यामुळेच सातारा शहरासह महाराष्ट्रातील बहुजन समाज या आंदोलनामध्ये सहभागी झाला होता.

### २.८.५ सातारा शहरातील सभा(जातीय निवाडा सप्टेंबर १९३२)

जातीय निवाडयाच्या प्रश्नावर महात्मा गांधी व हिंदू महासभा यांच्यात मतैक्य होते. रघुनाथ पांडुरंग करंदीकर यांनी सातारा शहरात सभा सप्टेंबर १९३२ घेऊन मध्ये महात्मा गांधीजींच्या अथक परिश्रमाबाबत कृतज्ञता व्यक्त करणारा ठराव मांडला होता. याच सभेत अस्पृश्यांना मंदिर प्रवेश देण्याचाही ठराव मंजूर केला होता.[१५२]

## २.९ आझाद हिंद सेनेतील सहभाग

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या ध्येयाने सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेचे नेतृत्त्व केले. आझाद हिंद सेनेची संख्या ५० हजार होती. ७ जानेवारी १९४४ रोजी ब्रम्हदेशाची राजधानी रंगून येथे स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार सुभाषबाबूनी स्थापन केले होते. जपान, भारत, ब्रम्हदेश यांच्या फौजा सहकार्याने लढून इंग्रजांची गुलामगिरी नष्ट करतील. भारताच्या भूमिवर पाय ठेवताच जनताही आझाद हिंद सेनेच्या लढाईत सहभागी होऊन देश स्वतंत्र होईल असा विश्वास सुभाषचंद्र बोस यांना वाटत होता. ‘तुम मुझे खुन दो, मै तुम्हे आझादी दूँगा’ असा आवाज त्यांनी उठविला. यामध्ये सातारा शहरातील अनेक शूर हिंदी सैनिक सामील झाले होते.[१५३]

सातारा शहरातील इब्राहिम उमर फरार हे आझाद हिंद सेनेला युद्ध साहित्य व रेशन पोहचविण्याच्या कामावर होते. ते दुसऱ्या महायुद्धात सहभागी झाल्याने दीड वर्ष कारावासाची शिक्षा झाली. सातारा(करंजे) येथील गुलाबराव फडतरे हे शरीररक्षक म्हणून या सेनेत काम करीत होते. ते प्राथमिक शिक्षक असून सन त्यांनी सन १९३९ ते १९४५ सालच्या दुसऱ्या महायुद्धात आझाद हिंद फौजेत दाखल झाले होते. सन १९४५ मध्ये ते युद्ध कैदी म्हणून अटक

झाले होते. पुढे ११ महिन्यांनी सार्वत्रिक माफीत त्यांना मुक्त करण्यात आले. सखाराम लक्ष्मण कीर्दत यांनी दुसऱ्या महायुद्धात आझाद हिंद फौजेमार्फत दाखल होऊन स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतल्याने एक वर्षाची कैद होऊन त्यांना भारतीय सेनादलातून बडतर्फ केले गेले. चव्हाण गोविंद लक्ष्मण यांनी दुसऱ्या महायुद्धात भाग घेतला होता. तसेच ते आझाद हिंद सेनेत दाखल झाले होते. त्यामुळे त्यांना दोन वर्षे तुरूंगवास सहन करावा लागला होता. नारायण सदाशिव धुमाळ यांनी दुसऱ्या महायुद्धात आझाद हिंद फौजेत दाखल होऊन स्वातंत्र्य चळवळीत योगदान दिले होते. बापूराव भोसले आराकान ब्रम्हदेशाच्या डोंगराळ भागात होते. ते आझाद हिंद सेनेत कर्तव्य भावनेने सहभागी झाले होते. पांडुरंग कुंभार रसद पोहचवित असत. काशिनाथ हरी पोरे हे फैजपूर काँग्रेसच्या अधिवेशनासाठी सेवादलाचे स्वयंसेवक म्हणून गेले होते. बापूराव भऊराव भोसले यांनी दुसऱ्या महायुद्धात आझाद हिंद सेनेत दाखल झाले होते. त्यामुळे त्याला एक वर्ष कैद झाली होती. पुढे भारतीय सेनादलातून बडतर्फ करण्यात आले. शेखशफी इब्राहीम रंगारी यांनी दुसऱ्या महायुद्धात आझाद हिंद सेनेत दाखल झाले. सन १९४५ मध्ये त्यांना अटक झाली. तथापि भारतीय सेनादलातून बडतर्फ केले गेले व जेलमधून मुक्तता करण्यात आली. महिताब याकूब शेख हे प्राथमिक शिक्षक असून त्यांनी दुसऱ्या महायुद्धात सिंगापूर येथेआझाद हिंद सेनेत दाखल होऊन स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाचे कार्य केले होते.[१५४]

## २.१० वैयक्तिक सत्याग्रह चळवळ व सातारा

दुसरे महायुद्ध सन १९३९ मध्ये सुरू झाले होते. त्यावेळी या युद्धात ब्रिटिशांना अडथळा होऊ नये म्हणून महात्मा गांधीजी जनआंदोलन न करता वैयक्तिक सत्याग्रहाची योजना मांडली. त्या वैयक्तिक सत्याग्रहात सातारा शहरातील पुढील कार्यकर्त्यांनी भाग घेतला होता. बन्सिलाल रामगोपाळ भट्ट व लक्ष्मीनारायण आकाराम यांनी सन १९४०–४१ च्या युद्धविरोधी वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेऊन भाषण केले होते. त्यामुळे त्यांना सहा महिन्याची सक्तमजुरीची शिक्षा झाली होती. एम.डी.विभूते यांनी या चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना दोन वर्षाची शिक्षा झाली. (३०३) शंकर विनायक सोवनी(३२५), ईस्माईल नूरमहमंद हकीम यांनी सन १९४० मध्ये युद्धविरोधी वैयक्तिक भाषण केले त्याबद्दल त्यांना सहा महिन्याची साधी कैद झाली होती.[१५५]

सन १९४० मध्ये सौ. चंपावती बन्सीलाल भट्ट यांनी मारवाड चौकांत वैयक्तिक सत्याग्रह केला. यावेळी शेकडो स्त्री व पुरूष स्फूर्तीदायक घोषणा देत होते. सौ. चंपावती बाईना अटक होऊन तीन महिने तुरूंगवास व ३०० रूपये दंडाची शिक्षा झाली. ती शिक्षा भोगत असतानाच त्यांचा मृत्यू झाला. तसेच जून १९४० मध्ये सातारा जिल्हा लोकल बोर्डावर सरदार वल्लभभाई पटेल यांचे हस्ते राष्ट्रीय झेंडा फडकविण्यात आला.[१५६]

## २.११ सातारा जिल्हा लोकल बोर्ड निवडणूका(मार्च १९३७ ते १९४१)

सातारा जिल्हयात जिल्हा लोकल बोर्डाचे राजकारण हे श्री धनजीशा कूपर यांच्या सत्ताकारणामुळे एक वादग्रस्त विषय बनलेला होता. श्री धनजीशा कूपर यांनी या संस्था आपल्या ताब्यात ठेवल्या होत्या. त्यामुळे त्यांचे एक आर्थिक, सामाजिक आणि राजकीय वर्चस्व सन १९३७–३८ पर्यत राहिले होते. ते सन १९३७ च्य निवडणुकीत निवडून आले होते. सन १९३५ च्या कायद्याखाली पहिले मुंबई सरकार बनले, त्यात ते काही महिनेपर्यत पहिले मुख्यमंत्री म्हणून राहिले. पुढे काँग्रेसने अधिकार ग्रहण करायचे ठरवल्यनंतर त्यांना बाजूला व्हावे लगले. तसेच ते इंग्रज धार्जिणे होते. परंतु ते स्थानिक स्वराज्य संस्थावरील आपली पकड सोडावयास तयार नव्हते. सन १९३७ च्या सातारा जिल्हा बोर्डाची निवडणूक काँग्रेस पक्षाने जिंकली. या निवडणुकीत उत्तर सातारा मतदारसंघातून निवडून आलेले आमदार बाबासाहेब शिंदे हे अध्यक्ष म्हणून निवडले गेले.

सन १९४१ च्या सातारा जिल्हा लोकल बोर्डाची निवडणूक लागली त्यावेळी कूपर गटातील दोन कार्यकर्ते फुटून काँग्रेस पक्षात आले. त्यातील आण्णासाहेब कल्याणी व सरदार पाटणकर हे दोघेजण अलग होऊन अध्यक्षपदासाठी वाद सुरू झाला. तसेच अध्यक्षपदासाठी सातारा जिल्हयातील दोन तरूण, नवे वकील लढाईच्या मैदानात उभे राहिले. एक श्री आनंदराव चव्हाण आणि दुसरे श्री बाळासाहेब देसाई हे होते. शेवटी या निवडणुकीत श्री बाळासाहेब देसाई निवडून आले. त्यांच्या अध्यक्ष पदाच्या निवडीस काँग्रेस कार्यकर्त्यानी पाठिंबा दिला. अशाप्रकारे सातारा जिल्हा लोकल बोर्डाच्या अध्यक्ष पदावर कूपर गटाचा पराभव करून काँग्रेसच्या पाठिंब्यावर बाळासाहेब देसाई हे निवडून येऊन ते सत्तेवर आले होते.[१५७]

## २.१२ सन १९४२ च्या चळवळीतील सातारा शहर

१९३९ साली दुसरे जागतिक महायुध्द सुरू झाले आणि ब्रिटीशांच्यापुढे भारतीयांनी मांडलेले प्रश्न सोडविण्यात त्यांना अपयश आले. त्यांच्यावर विचार करण्यासाठी ८ ऑगस्ट, १९४२ रोजी मुंबई येथे गवालिया टँक मैदानावर अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. महात्मा गांधीजींनी 'चले जाव' ची घोषणा केली होती. महात्मा गांधीजींनी सर्व काँग्रेस नेत्यांना इशारा दिला की 'आता होणारा लढा निकराचा व शेवटचा आहे व सर्व कार्यकर्त्यानी आपल्या जवळचे काहीही असेल ते सर्व पणास लावले पाहिजे'. हा २६ जुलै, १९४२ च्या 'हरिजन' या वृत्तपत्राच्या अंकात श्री. मधुकाका यांनी लेख प्रसिध्द केला होता. त्यावरून भावी चळवळीची दिशा कोणती असावी याचा अंदाज आला होता. काँग्रेस समितीने 'छोडो भारत' चा ठराव मंजूर केला त्याच दिवशी मुंबईत सातारकरांच्या भूमिगत कारवायांचा प्रारंभ झाला. भारताच्या इतर भागातील शेकडो काँग्रेस प्रतिनिधी मुंबई अधिवेशनानंतर आपापल्या भागात परत गेले. तथापि बहुसंख्य सातारा कार्यकर्ते मुंबई शहरातच भूमिगत राहिले. मुंबईतील पुढाऱ्यांशी विचारविनिमय करून नियोजन करण्याच्या प्रयत्नाला ते लागले कारण उघडपणे सातारा येथे जाणे म्हणजे अटक करवून घेण्यासारखे आहे. म्हणून बरेचशे कार्यकर्ते मुंबईतच राहिले. आणि यथावकास आपल्या कर्मभूमीत येऊन पाहोचले. मुंबईतच भूमिगत झाल्याने साताऱ्यामधील बहुसंख्य आंदोलक अटक टाळू शकले. व त्यांनी काही काळासाठी तरी पोलिसांवर डावपेचात्मक विजय प्राप्त केला. त्यामुळे साताऱ्यातील आंदोलन प्रदीर्घ काळ टिकून राहिले आणि नेतृत्त्वाची गरज फारशी भासली नाही. सातारा आणि इतर ठिकाणच्या लढयातील हा फरक नजरेत भरणारा आहे. स्वातंत्र्य प्राप्तीच्या ध्येयाने भारावलेल्या तरूणांनी आपल्या ध्येयपूर्तीसाठी प्राणांची बाजी लावण्याची तयारी केली होती.[१५८]

सातारा येथील ही चळवळ महात्मा गांधी यांच्या धोरणानुसार नव्हती. तर ही चळवळ हिंसक व दहशतवादी स्वरूपाची होती. या चळवळीत गनिमी कावा युद्धतंत्राचा वापर केला होता. या लढयाचा महात्मा गांधीनी संकेत देताच तसे वातावरण तयार करण्यासाठी शंकरराव देव यांनी मे १९४२ मध्ये संपूर्ण सातारा जिल्हा दौरा केला. शंकरराव देव यांच्या मार्गदर्शनानुसार साताऱ्यातील रा.ग.सोमण, व इतर कार्यकर्ते यांनी या आंदोलनासाठी अभियान सुरू केले. काँग्रेस समित्यांची बांधणी व सभासद नोंदणीसाठी जून १९४२ मध्ये प्रारंभ झाला.

६ ते १४ जुलै पर्यत वर्धा येथे भरलेल्या काँग्रेस कार्यकारणीने महात्मा गांधीजींचा ‘छोडो भारत’ ठराव समंत करताच आंदोलन करणे भाग पडले. त्यानुसार रा.ग.सोमण, कानडे, पवार, एस.आर.कुलकर्णी महाराष्ट्र प्रांतिक चिटणीस गोविंदराव देशपांडे यांनी सातारा जिल्हयातील कार्यकर्त्याना मार्गदर्शन करून पूर्वतयारी केली.[१५९]

वर्धा ठरावावर ७ व ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईत भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या अधिवेशनामध्ये शिक्कामोर्तब व्हावयाचे होते. तेव्हा मुंबईतील या अधिवेशनासाठी सातारा येथील काही काँग्रेस कार्यकर्ते हजर राहिले होते. मात्र नाना पाटील हे संघटना बांधणीसाठी सातारा येथेच राहिले होते. ‘छोडो भारत’ हा ठराव संमत होताच ८ ऑगस्टच्या रात्री मुंबईतील बद्रिकाश्रमात सातारच्या काँगेस व काँग्रेस समाजवादी कार्यकर्त्यांची गुप्त बैठक भरली. त्यात निर्णय घेण्यात आला की, इंग्रज नोकरशाही धरपकड करण्याचे सत्र अमलात आणणयची शक्यता असल्याने प्रमुख व्यक्तींनी भूमिगत राहून सूत्रसंचालन करावे आणि पुढील कार्यक्रमाबाबत वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शनानुसार चळवळ चालवावी.

महात्मा गांधी व काँग्रेस श्रेष्ठी यांना ९ ऑगस्टच्या पहाटेच्या वेळी पोलिसांनी अटक केल्याने सातारा जिल्हयात प्रचंड लोकक्षोभ पसरला. सातारा शहरासह जिल्हयात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्यासह भूमिगत झालेल्या कार्यकर्त्यानी आंदोलन सुरू केले. सरकारी दडपशाहीच्या अंमलाने व पोलिसांच्या हिंसाचाराने प्रक्षुब्ध झालेल्या जनतेने जिल्हयातील सर्व शहरामध्ये व शेकडो गावांमध्ये स्वयंस्फूर्त हरताळ पाळला. सरकारी कारवाईच्या विरोधात निषेधपर सभा झाल्या. घोषणा, मिरवणुका, प्रचार सभा व निषेधाच्या सभा यामुळे वातावरण तापले. उत्स्फूर्त हरताळ, निषेधने व शाळावरील बहिष्काराने आंदोलनाचा प्रारंभ झाला. महात्मा गांधीजींचा ‘करेंगे या मरेंगे’ हा संदेश गावोगावापर्यंत पोहोचला. त्यामुळे लोक भारावून जाऊन आपण स्वतंत्र झालो अशा भावनेने प्रेरित झाले. प्रारंभी या चळवळीची सुरूवात शांततेच्या मार्गाने झाली होती. परंतु सरकारच्या दडपशाहीच्या धोरणाने या चळवळीस हिंसक वळण लागले.[१६०]

ब्रिटीश सत्तेची प्रतिकात्मक अशी जी सत्तास्थाने असतील त्यांच्याविरूद्ध उठाव करायचे याच हेतून मोर्चाची चळवळ सुरू केली. ८, ९ सप्टेंबर १९४२ रोजी इस्लामपूर आणि वडूज येथील तहसिल कार्यालयावर आयोजित केलेल्या मार्चाने सातारा जिल्हयातील चलेजाव

आंदोलनास अतिशय उग्र स्वरूप प्राप्त झाले. यापैकी वडूज येथील मोर्चा आयोजित करण्यामध्ये यशवंतराव चव्हाण यांचा सिंहाचा वाटा होता.[१६१] पोलिसांनी वडूजच्या मोर्च्याच्या वेळी बळाचा वापर करून गोळीबार केला व आपली दहशत निर्माण केली. वडूज व इस्लामपूर मोर्च्यावर पोलिसांनी अत्याचार केला. वडूजच्या मोर्च्यात परशुराम घार्गे शहीद झाले तर इस्लामपूरच्या मोर्च्यात इंजिनियर पंडया हे शहीद झाले. इस्लामपूरच्या मोर्चामध्ये यशवंतराव चव्हाण इस्लामपूरच्या बाहेर पर्यत सहभागी झाले होते.[१६२]

पोलिसांच्या या दडपशाहीच्या कृत्यामुळे भूमिगत कार्याला व घातपाताला जोर वाढला. तारा तोडणे, रेल्वेवर दरोडा टाकून सरकारला जेरीस आणण्याचे प्रकार सुरू झाले. सन १९४३ च्या सुरूवातीपर्यंत घातपात व भूमिगत प्रतिकाराचा पहिला कालखंड झाला. त्यात कुंडल बँकेची लूट, शिराळयामधील पोलिस पाटलांचे राजीनामे, जंगल सत्याग्रह, जमिनी ताब्यात घेणे, तुरूंग फोडणे, बंदुका पळविणे इ. प्रकार या कालावधीत झाले. यामध्ये अनके स्थानिक गट अग्रगामी होते. कॉंग्रेस भाषेत ते डिक्टेटर होते आणि मुंबईतील भूमिगत केंद्राचे नेते अच्युतराव पटवर्धन यांच्याशी संपर्क ठेवून होते.[१६३]

१२ ऑगस्ट १९४२ रोजी मारवाड चौकात सत्याग्रह चालू होता. सत्याग्रहयांना दिली जाणारी वागणूक पाहून चिडून विनायक ढवळे हा तरूण मध्येच घुसला. तेव्हा त्याच्या छातीवर उपजिल्हा पोलीस प्रमुख श्री माऊंटन यांनी पिस्तुल रोखले. यावेळी विनायकराव ढवळे म्हणाला की, तुमचे रक्त खरे आयरीश असेल तर मला तुम्ही मारणार नाही. हे ऐकून श्री माऊंटन हसला आणि त्याने पिस्तुल खाली घेतले.[१६४]

सातारा शहरात रोज फेऱ्या काढण्याचे प्रचार तंत्र विठ्ठलदास सीतारामदास अमंलात आणत असत. पहिल्यांदा पुरूष मग स्त्रिया यांच्या पुढे शालेय विद्यार्थ्यांच्या आणि नंतर हजारो लोकांच्या प्रचार फेऱ्या नियमितपणे काढल्या जात असत. सातारा शहरात प्रभात फेऱ्या, प्रचार फलक, प्रचार सभा, पिकेटिंग, सरकारी कचेऱ्यावर मोर्चे यांनी हिंदुस्थानात सर्वत्र इंग्रजाविरूद्ध चळवळीचा डोंब उठला होता.[१६५]

## २.१३ सन १९४२ च्या आंदोलनातील सातारा शहरातील पत्रके

९ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधी व राष्ट्रसभेचे प्रमुख नेते यांना बंदीखान्यात नेऊन ठेवल्यानंतर मुंबईत अ.भा.राष्ट्रसभा समितीच्या काही सभासदानी ताबडतोब एक गुप्त

बैठक भरवली आणि देशातील जनतेला शांततेच्या क्रांतीचा एक बरा कलमी कार्यक्रम आखला होता. हा कार्यक्रम खेडोपाडयात कसा पोहचेल अशी व्यवस्था केली होती.[१६६] तो बारा कलमी कार्यक्रम सातारा येथे पोहचला होता.

सातारा येथे चले जाव आंदोलनाच्यावेळी सत्याग्रहींनी जी पत्रके वाटली होती. त्यामध्ये महात्मा गांधीजींचा संदेश होता. त्यातील माहिती पुढीलप्रमाणे होती. 'भारत देश आजपासून स्वतंत्र झाला आहे. म्हणून प्रत्येक भारतीयाने स्वतंत्र भारतीय म्हणून घ्यावे हा महात्मा गांधीजींचा क्रांतीकारक संदेश साकार करण्यासाठी खालील गोष्टी कराव्यात.

१) सरकारला कोणत्याही प्रकारचा शेतसारा देऊ नये.

२) सैनिक भरती कार्यालयासमोर निरोधने करावीत.

३) प्रत्येक गावातील पोलीस पाटील,.तलाठयांना राजीनामा देण्यास भाग पाडावे.

४) तालुक्याच्या मामलेदार कचेऱ्यांना हजारोंच्या संख्येने वेढा घालावा आणि सरकारी नोकरांना नोकरीचा त्याग करण्यास भाग पाडावे.

५) सरकारी नोकरांचा कुठलाही हुकूम पाळू नये.

६) जंगलचा कायदा मोडण्यासाठी जंगले आपल्या ताब्यात घ्यावीत.

७) विद्यार्थ्यांनी शाळा, कॉलेजेस सोडून देऊन सरकार विरूद्धच्या अहिंसात्मक आंदोलनात भाग घ्यावा.

८) टेलिफोन सारख्या दळणवळणाच्या साधनांचा विध्वंस करावा.

९) स्वातंत्र्य प्राप्तीसाठी सध्या सुरू असलेल्या आंदोलनातील प्रत्येक गोष्टीचा प्रचार व प्रसार करावा आणि हे काम भिंतीवर हस्तलिखीत पत्रके चिकटवून घोषणा देऊन लहान लहान सभा घेऊन करावे.

१०) ब्रिटीश प्रशासन नेस्तनाबूत करावे.

महात्मा गांधीजींना अटक केल्यावर मुंबई आणि पुणे येथे शेकडो तरूणांच्यावर गोळीबार करण्यात आला आहे. त्यांचे विस्मरण तुम्हाला होता कामा नये. काँग्रेस एक तर स्वातंत्र्य मिळवेल नाहीतर गतप्राण होईल. पण भारतीय लोक काँग्रेसचे असे कधी होऊ देणार नाहीत. काँग्रेसच्या झेंडयाखाली हजारोंनी एकत्र या. आंदोलन यशस्वी करा.[१६७]

सातारा शहरातील येथील न्यु इंग्लिश स्कूलच्या शेजारी मराठी हस्तलिखित पत्रक चिकटवलेले होते. त्यातील मजकूर पुढीलप्रमाणे आहे.

'क्षणभर विचार करा'

१) महादेवभाई देसाई यांना विष देऊन ठार मारण्यात आले.

२) महत्त्वाच्या पुढाऱ्यांचा असहय छळ.

३) आ.मावळणकर यांच्या मुलाचा मृत्यू.

४) दानशूर बिर्लांच्या १ कोटी रूपयांची जप्ती.

म्हणून क्रांती कार्यकर्त्यांनी पेटून उठा आणि ब्रिटिशांची सत्ताधारी यंत्रणा उध्वस्त करा. त्यांना भारतातून चालते होण्यास सांगा.[१६८]

अशाप्रकारे सातारा शहरात विविध ठिकाणी अशा प्रकारची पत्रके चिकटवली होती. ही पत्रके लोक वाचून त्याप्रमाणे कृती करीत असत.

### २.१३.१ मामलेदार कचेरीवर मोर्चा

सातारा जिल्हयातील मामलेदार कचेरीवर कार्यकर्त्यांनी जे मोर्चे काढले होते त्यामध्ये सातारा शहरातील कार्यकर्त्यांनीही सहभाग घेतला होता. कराडच्या तालुका कार्यालयावर पहिला मोर्चा २४ ऑगस्ट १९४२ रोजी काढण्यात आला. या मोर्च्याचे नेतृत्त्व बाळकू आण्णा पाटील उंडाळकर, काशिनाथ राजाराम देशमुख, ल.ग.कुलकर्णी व यशवंतराव चव्हाण इत्यादी नेत्यांनी केले होते. या पद्धतीने पाटणच्या कार्यालयावरही मोर्चा काढण्यात आला. सातारा जिल्हयातील मोर्च्याच्या बाबत सर्वात मोठी घटना म्हणजे तासगाव मामलेदार कचेरीवर काढलेला मोर्चा होय. या मोर्च्याचे नेतृत्त्व कृष्णा रामा कुऱ्हाडे, वि.स.पागे, गोविंद खोत, डॉ.सोहनी यांच्याकडे सोपविले. या मामलेदार कार्यालयावर भूमिगत कार्यकर्ते गेले, तेव्हा या मामलेदारकडे ३३ सशस्त्र व नऊ लाठीधारी पोलिसांची तुकडी होती. तथापि मोर्चाची धडक इतकी जोरात होती की, मामलेदारास प्रतिकार करणे शक्य झाले नाही. इतकेच नव्हे, तर त्याने आपल्या कार्यालयाचा मुख्य दरवाजा उघडून कार्यालयावर काँग्रेसचा राष्ट्रध्वज फडकवून झेंडावंदन करू दिले. पुढाऱ्यासमवेत राष्ट्रीय घोषणा दिल्या. तसेच या पूर्वी अटक केलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना भेटण्याची पुढाऱ्यांना परवानगी दिली. शासकीय अधिकाऱ्यांनी काँग्रेसच्या मोर्चापुढे पत्करलेल्या अशा शरणागतीने मुंबई इलाख्याचे प्रशासन फारच अस्वस्थ झाले होते.[१६९]

### २.१३.२ रेल्वे रूळ उखडणे

सातारा जिल्हयात भूमिगत कार्यकर्त्यानी रेल्वे गाडया रूळावरून घसरविण्याची मोहिम सुरू केली . यामध्ये सातारा शहरातील कार्यकर्त्याचांही समावेश होता. इंग्रज सरकारची सेनादलाची आणि युद्ध सामग्रीची वाहतूक विस्थापित करून सरकारला जेरीस आणणे हा हेतू होता. या घटना अशा पद्धतीने आयोजित करण्यात येते की, फारशी प्राणहानी न होता दळणवळणात अधिकाधिक खंड पडावा. अशा स्थितीत सर्वांनी मिळून एकदोन मैलातील रूळ घट्ट बसवण्यासाठी ज्या लोखंडी कुण्या ठोकलेल्या असतात, त्या काढून टाकल्या. ऑक्टोबर १९४२ पासून प्रारंभ झालेल्या या घटनांनी इंग्रज प्रशासन भयंकर अस्वस्थ झाले होते. शांततामय मार्गाने सरकार विरूद्धचा राग प्रकट करणे अशक्य झाल्याने आंदोलनात घातपात आणि हिंसाचाराचा अवलंब करण्याशिवाय काँगेसजनांना दुसरा मार्ग उरला नव्हता.[१७०]

ऑक्टोबर १९४२ पासून देशी स्फोटकांचा उपयोग करण्यास सुरूवात झाली. आंदोलन हे भूमिगत चळवळीच्या मार्गाने सुरू झाले. भूमिगत चळवळीची व्याप्ती वाढविण्यासाठी पैशाची आवश्यकता होती. ती पूर्ण करण्यासाठी ऑक्टोबर १९४२ पासून या कार्यकर्त्यानी राजकीय दरोडे घालण्यास सुरूवात केली. या क्रांतिकारकांना जनतेनेही पाठिंबा दिला होता. त्यामुळे लोक त्यांना दरोडेखोर मानत नव्हते. एवढेच नव्हे तर ते त्यांच्याबद्दल पोलिसांकडे तक्रारही करीत नव्हते किंवा गुन्हे अन्वेषणासाठी गेलेल्या पोलिसांना ते गुन्हेगाराबद्दल माहिती देत नसत. गृह विभागाच्या अहवालात गृह सचिवाने स्पष्ट कबुली दिली आहे की, काँग्रेसच्या स्वातंत्र्य आंदोलनाबाबत पूर्ण सहानुभूती व सहकाराची भावना तसेच थोडीफार भिती यामुळे पुरावा देण्यास कोणीही तयार होत नसे.[१७१]

डिसेंबर १९४२ च्या सुरूवातीपासून सातारा येथे घातपाती कृत्ये वाढीस लागली. या क्रांतिकारकांनी शेणोली व शिरवडे ही रेल्वे स्थानके जाळून नष्ट केली. शिरवडे येथून क्रांतिकारकांनी सरकारी बंदुका व दारूगोळा हस्तगत केला. यावेळी सातारा जिल्हाधिकाऱ्याने मुंबईच्या होम डिपार्टमेंटला कळविले होते की, सामान्य जनतेचा दडपशाही कृत्यांना पाठिंबा नाही. प्रत्यक्षात मात्र ही चळवळ सामान्य जनतेच्या पाठिंब्याशिवाय यशस्वी होणार नव्हती. या काळात काठया भाले व कुऱ्हाडी घेऊन आंदोलनकर्त्यांचे गट सरकारी यंत्रणा निकामी करण्यात कार्यरत होते. पोस्टाच्या थैल्या आणि मनी ऑर्डरीच्या रक्कमा घेऊन चाललेल्या पोस्टमन

व्यक्तीवर क्रांतीकारकांची पथके चढाई करून पैसे हस्तगत करीत असत. यावेळी अनेक डाकबंगले व चावडीच्या इमारती जाळून टाकल्या गेल्या.[१७२]

### २.१३.३ सन १९४२ च्या चळवळीतील सातारा शहरातील क्रांतिकारक

सन १९४२ मध्ये सातारा शहरात कलेक्टर आगमनाच्या वेळी प्रचार पत्रके वाटण्याचे काम दत्तात्रय रामचंद्र आगटे यांनी केले. त्याबद्दल त्यांना अटक व स्थानबद्ध करण्यात आले. आप्पा मास्तर यांनी या चळवळीच्यावेळी सातारा शहरात तुफान सेनेची निर्मिती केली होती. शिवनारायण जगन्नाथ कासट, विष्णू दत्तात्रय चितळे, ढवळे बाबूराव मार्तंड, गोपाळ विष्णू पालकर, किसनदास लक्ष्मणदास दोशी गीताबाई गणपती तेली, रामभाऊ कोंडिबा माने, सुशिला पांडुरंग होनराव, महादेव कृष्णाजी लेले व बाळू बाबाजी खुडे यांनी चलेजाव आंदोलनात भूमिगत आंदोलनाचे कार्यकर्त्यांना सहाय्य करून आश्रय देण्याचे कार्य केले. महिपतराव अण्णासाहेब खोचरे(पाटील), पुरूषोत्तम बाळकृष्ण पेंढारकर, कमलाकांत सदाशिव तालिम, महादेव वासुदेव मुतालिक व नारायणदास गोवर्धनदास गुजर यांनी या चळवळीत भूमिगत कार्य केले होते. मोडतोड व जाळपोळीच्या कार्यात सहभाग घेतला होता. महादू विठू चव्हाण यांनी चलेजाव आंदोलनाच्या वेळी वडूज ता.खटाव येथे निघालेल्या मोर्चात सहभागी झाले होते. तसेच त्यांनी भूमिगत कार्य केले होते. शंकर रामचंद्र जगदाळे यांनी सातारा शहरातील मिरवणुकीत भाग घेतला होता. त्यामुळे त्यांना मारहाण केली. टेलिफोनच्या तारा तोडणे, शाळांच्या इमारती व बंगल्यांना आगी लावणे यासारख्या घातपाती कृत्यात भाग घेतला. विश्वनाथ कृष्ण टेंबे यांनी या चळवळीत विद्यार्थी संघटनेत कार्य केले होते. शाहू नागेश थोरात, भास्कर रघुनाथ दामले, रामचंद्र दत्तात्रय दीक्षित, प्रमिला विष्णू देशपांडे, महादेव नारायण पारसनीस, जयनारायण किसनलाल लाहोटी, लक्ष्मण तुकाराम क्षीरसागर यांनी चलेजाव चळवळीत सभामिरवणुकीत भाग घेतला होता. मधुसुदन हणमंत दिवेकर यांनी या चळवळीत भूमिगत कार्य केले होते तसेच गुप्त वाङ्मय प्रसार, शस्त्रास्त्रांची जमवाजमव, मोडतोड व जाळपोळीत सहभाग घेतल्याने त्यांना एक वर्ष सक्तमजुरीची शिक्षा आणि पुन्हा शस्त्रास्त्रे जवळ ठेवल्याबद्दल सन १९४४ मध्ये दोन महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली होती.[१७३]

रामराव कृष्णा पाटील यांनी सन १९४२ च्या आंदोलनाच्यावेळी शिरवडे स्टेशन जळीत प्रकरणात भाग घेतला होता आणि लुटीच्या कामात भूमिगत राहून शिबिरे आयोजित केली

होती. त्यांनी प्रतिसरकार व न्यायदान मंडळात कार्य केले होते. ज्ञानदेव गोविंदराव पाटील व गोविंद ज्ञानदेव यादव यांनी या आंदोलनात सहभाग घेऊन शिरवडे स्टेशन जाळपोळीत भाग घेतला होता. पोलिसांच्या बंदुका लुटण्याच्या कार्यक्रमात भूमिगत भाग घेतला होता. मल्हारपेठ डाक बंगला जळीत प्रकरणात सहभागी झाले होते. श्रीधर हणमंत दिवेकर यांनी या चळवळीत पत्रके वाटणे, बाँब तयार करणे इत्यादी कामात सहभाग घेतल्याने त्यांना नऊ महिने स्थानबद्ध केले गेले. विठ्ठलदास सीतारामदास देवी यांनी चले जव आंदोलनात सहभाग त्याने घेतल्याने साबरमती जेलमध्ये तुरूंगवास सहन करावा लागला होता. या चळवळीच्यावेळी आदिवासी सेवा मंडळाच्या कार्यकारिणीचे सदस्य झाले होते. तसेच या चळवळीत सहभाग घेतल्याने त्यांना स्थानबद्ध करण्यात आले होते. ते रामगड काँग्रेसचे प्रतिनिधी होते. चंद्रकांत गणेश भुर्के, गणपतराव हरी साठे, श्रीनिवास जयराम सारडा, सीताराम शाळीग्राम सारडा बन्सिलाल जयराम सारडा, शंकर रामचंद्र सोमण, अब्दुल जब्बर इस्माईल हकिम यांनी सन १९४२ च्या चळवळीत सभा मिरवणुकीत भाग घेतला होता. तसेच सन १९४३ साली सातारा शहरात 'राष्ट्रीय चैतन्य मंडळ' स्थापन करून सेवादल आणि राष्ट्रवादी वाङमय प्रसाराचे केंद्र चालविण्यात भाग घेतला. सूतकताई आणि राष्ट्रभाषा शिक्षणाचे वर्ग सुरू केले होते. भाऊसाहेब बळवंत रांजणे यांनी या चळवळीत भूमिगत सहभाग घेतला होता. काँग्रेस पक्षाच्या प्रचार पत्रकाचे वाटपाचे काम केले होते. पांचगणी येथे सातारा जिल्हयातील अनेक भूमिगतांना आश्रय दिला होता. प्रतिसरकारमधील न्यायमंडळाात प्रामुख्याने भाग घेतला होता. रांजणी गावच्या शाळेवर राष्ट्रीय निसाण लावले होते. टेलिफोनच्या तारा तोडल्या. भूमिगतांच हत्यारे व दारूगोळा सांभाळून पोहचविण्याचे धोक्याचे काम त्यांनी पार पाडले होते. तसेच अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यात सहभाग घेतला होता.[१७४]

अनंत हणमंत लागू यांनी सन १९४२ च्या चळवळीत सातारा जिल्हयातील भूमिगतांना पैसा व माल पुरविण्याचे काम केले होते. एम.डी. विभूते यांनी सन १९४२ साली येरवडा जेलमूधून पालायन करून भूमिगत राहून कार्य केले होते. शंकर बळवंत सहस्त्रबुद्धे यांनी या चळवळीच्यावेळी गुप्त पत्रके वाटली होती. भगवानदास दाजीसाहेब सावंत हे एम.बी.बी.एस. असून त्यांनी या चळवळीच्या वेळी सातारा शहरात काँग्रेसची प्रचारपत्रके काढली, भूमिगतांना औषधोपचार केला. प्रतिसरकारच्या न्यायदान मंडळाचे प्रमुख म्हणून कार्य केले होते. सातारा

शहरात त्यांनी राष्ट्रध्वज लावला. भूमिगतांचा दारूगोळा सांभाळणे व पोहचविणे इत्यादी कार्य केले. तसेच सन १९४३ मध्ये टेलिफोन दळणवळण बंद पाडले. पाचगणी येथे सेवादल शाखेची स्थापना केली. चाँद शेख, हसन शेख यांनी या चळवळीत सहभाग घेऊन मिलीटरी गाडी उलटविण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे त्यांना एक वर्षे स्थानबद्ध व्हावे लागले होते.[१७५]

वरील क्रांतिकारकाशिवाय श्रीधर वामन कुलकर्णी, पांडुरंग केशव कोल्हटकर, वासुदेव शंकर कुमठेकर, एकनाथ दत्तात्रय गोडसे, दत्तात्रय कृष्ण गोसावी, गणेश रामकृष्ण गोळवलकर, उषाताई वसंत घाटगे, रामचंद्र बळवंत घोरपडे, माई गोपाळ जोशी, श्रीपाद गोविंद जोशी, गणपती देवजी तपासे, ज्ञानेश्वर रामचंद्र देवकर, रामचांद्र नरसू नांगरे, तुषार पांडुरंग पवार, आनंदा हरी पाटील, महादेव नारायण पारसनीस, वसंत काशिनाथ पालकर, बन्सिलाल रामगोपाळ भट्ट, नरहर वामन लिमये, पिलू बुवा वडूजकर, रामकृष्ण नारायण वाठारे, आबास बंडूभाई शेख, शंकर विनायक सोवणी, गंगाधर केशव सोहनी, इस्माईल नूरमहामंद हकिम, विठ्ठल वामन हडप, मारूती आत्माराम हळब इत्यादीनी सन १९४२ च्या चले जाव आंदोलनात सहभाग घेतला होता.[१७६]

### २.१३.४ प्रतिसरकारचे कार्य

सातारा जिल्हयातील १९४२ चा लढा व्यवस्थितपणे चालविण्यासाठी कार्यकर्त्यांचे पाच गट पाडले होते. या पाच गटात सातारा शहरातील कार्यकर्त्यानी सहभाग घेतला होता. त्यामध्ये कुंडल गट, शिराळा व वाळवा गट, कराड गट, उत्तरेचा सातारा गट आणि सांगली गट इत्यादी होते. यामध्ये कुंडल गटाचे नेतृत्त्व नाना पाटील यांच्याकडे होते. या सर्व गटांनी नाव्हेंबर १९४२ ते मार्च १९४३ दरम्यान भूमिगत आंदोलन सुरू करून घातपाती कृत्ये घडवून आणली. यामध्ये कुंडल गट आघाडीवर होता. टेलिफोनच्या तारा तोडणे, रेल्वे रूळ उखडणे, रेल्वेवर दरोडे टाकणे, रेल्वे स्थानके जाळणे, पोस्टाच्या बॅगा हस्तगत करणे, पोलिसांची हत्यारे व दारूगोळा हस्तगत करून त्यांची सरकारी यंत्रणा निकामी करणे इत्यादी कार्यक्रम हाती घेतले होते.

यावेळी महात्मा गांधीजीनी सरकारच्या निषेधार्थ १० फेब्रुवारी ते ३ मार्च १९४३ च्या दरम्यान २१ दिवसाचे उपोषण सुरू केले. त्यामुळे सर्व काँग्रेस कार्यकर्त्यानी स्वतःचे आत्मपरिक्षण केले. परिणामी कुंडल गटाने मार्च १९४३ पासून आपल्या कामगिरीचा आढावा घेऊन असे ठरविले की, घातपाती व विनाशकारी कृत्यावर भर न देता विधायक

कार्यक्रमदेखील हाती घ्यावा.[१७७] येथूनच खऱ्या अर्थाने साताऱ्याच्या प्रतिसरकारचा प्रारंभ झाला.

यावेळी पोलिसांनी गुन्हेगारांना हाताशी धरून काँग्रेसची चळवळ बदनाम करण्यास सुरूवात केली. सातारा येथील पोलिस अधीक्षक गिल्बर्ट याने दरोडेखोरांना हाताशी धरून त्यांना काही सवलती दिल्या. त्यानुसार भूमिगतांना समूळ नष्ट करण्याचे धोरण स्वीकारले. त्यामुळे हे दरोडेखोर नाना पाटील यांच्या नावाने दरोडे टाकू लागले. प्रचंड महागाई, अन्नधान्याचा तुटवडा, सक्तीची धान्य लेव्ही, दुष्काळी परिस्थिती इत्यादी आर्थिक समस्यांनी लोक वैतागले होते त्यात या दरोडेखोरांची भर पडली. त्यामुळे लोक न्याय व संरक्षण मिळण्याच्या अपक्षेने काँग्रेसकडे पाहू लागले. त्यासाठी काँग्रेसनेही समांतर शासन यंत्रणा संघटित केली. या प्रतिसरकारने साठेबाजी करणाऱ्यांचे धान्याचे साठे, कर्जबाजारी लोकांचे शोषण करणाऱ्या सावकारांचे धन, रेशन दुकानातील वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्यांचे साठे हस्तगत करण्याचे कार्य सुरू केले.

प्रतिसरकारमध्ये सातारा शहरातील कार्यकर्त्याचा समावेश होता. यामथ्ये रामराव कृष्णा पाटील यांनी सिरवडे स्टेशन जळीत प्रकरणात भाग घेतला होता. तसेच लुटीच्या कामात भूमिगत राहून भूमिगत शिबीर भरविली होती. काँग्रेस प्रति(पत्री) सरकार व न्यायदान मंदळात कार्य केले होते. (२५९) गोविंद ज्ञानदेव यादव यांनी पोलिसांच्या बंदुका लुटणे, मल्हारपेठ सरकारी डाक बंगला जाळणे इत्यादी घातपाती कृत्यात भूमिगत राहून सहभाग घेतला होता. प्रतिसरकारच्या न्यायदान मंडळात काम केले होते. भाऊसाहेब बळवंत रांजणे यांनी भूम्गित राहून कार्य कार्य केले. काँग्रेस पक्षाच्या प्रचारपत्रकाचे वाटप केले. पांचगणी येथे सातारा जिल्हयातील अनेक भूमिगतांना आश्रय दिला होता. प्रतिसरकारातील न्यायमंडळात प्रामुख्याने सहभाग घेतला होता. रांजणी गावच्या शाळेवर राष्ट्रीय निशाण लावण्याचे कार्य रांजणे यांनी केले होते. टेलिफोनच्या तारा तोडणे, भूमिगतांची हत्यारे व दारूगोळा सांभाळणे व पोहचविण्याचे धोक्याचे काम ते करीत होते. अनंत चिंतामण लागू यांनी प्रतिसरकारमधील भूमिगतंना पैसा व माल पुरविण्याचे काम केले होते. भगवानदास दाजीसाहेब सावंत यांनी भूमिगतांचे गुप्त ऑफिस काढले होते. आजारी भूमिगतांना औषधोपचार करीत होते. प्रतिसरकारच्या न्यायदान मंडळाचे प्रमुख म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते. सन १९४३ मध्ये टेलिफोनच्या तारा तोडणे, भुमिगतांना दारूगोळा पुरविण्याचे काम ते करीत होते. पाचगणी येथे त्यांनी सेवादलाची स्थापना

सन १९४३ मध्ये केली होती. याशिवाय प्रतिसरकारमध्ये आप्पा मास्तर, आचार्य काकासाहेब कालेलकर, विष्णु पांडुरंग कुलकर्णी, वासुदेव शंकर कुमठेकर, वि.गो.कुर्लेकर, पांदुरंग केश्व कोल्हटकर, बाबू बाबाजी खुडे, महिपतराव खोचरे(पाटील), नारायण गुजर, एकनाथ गोडसे, दत्तात्रय गोसावी, गणपती देवजी तपासे, ज्ञानदेव गोविंदराव पाटील, गोपाळ विष्णू पालकर इत्यादी कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता.[१७८]

अशाप्रकारे प्रतिसरकारने केलेल्या धाडशी कृत्यामुळे भूमिगत कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला होता. मात्र त्याबरोबर पोलिसांचे दडपणही वाढले होते. पोलिसांचे खबरे प्रतिसरकारच्या स्वातंत्र्य सैनिकांची माहिती पोलिसांना पुरवित असत. त्यामुळे अनेकांना शिक्षा भोगावी लागत असे. प्रतिसरकारचे काही कार्यकर्ते पोलिसांचा गणवेश करून जमीन महसूल व निधी गोळा करीत. पोलिसांच्या खबऱ्याना हैराण करीत असत. काही सरकरनिष्ठ लोक खास करून पोलीस पाटील भूमिगत सैनिकांची माहिती पोलिसांना पुरवित. म्हणून अशा विरोधकांचा समाचार घेण्यासाठी प्रतिसरकाचे कार्यकर्ते तुरळक हिंसाचार करण्यासाठीही प्रवृत्त होत असत. ते पोलिसांच्या खबऱ्यांच्या तळपायावर मिठाचे पाणी ओतून काठीचे आघात करून त्यांना चालणे अशक्य करीत. शिक्षेचा हा प्रकार पत्री लावणे या नावाने ओळखला जात असे. यावरून प्रतिसरकाला अपभ्रंशाने 'पत्री सरकार' हे नाव मिळाले. या संघटनेतील कार्यकर्ते जीवावर उदार होऊन इंग्रजांचे सरकार उखडून टाकण्यासाठी करीत असलेल्या संग्रामाला सर्व जनतेचा पाठिंबा होता. चळवळीतील लोकांबद्दल जनतेच्या मनात आदराचे स्थान होते. जनतेच्या पाठिंब्यामुळेच १ जून १९४३ पासून १३ जून १९४६ पर्यत प्रतिसरकार कार्यरत राहिले.[१७९]

## २.१४ सातारा जिल्हा काँग्रेस अध्यक्ष पदाच्या निवडणूका(मार्च १९४६)

सन १९४२ च्या आंदोलनानंतर मार्च १९४६ मध्ये होत असलेली ही पहिली निवडणूक होती. या निवडणूकीचा प्रचार हा या चळवळीच्या यशाचा प्रचार होता. या निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षातर्फे चार उमेदवार श्री.के.डी.पाटील, जुने अध्यक्ष श्री व्यंकटराव पवार, कराडचे श्री बाबुराव गोखले व श्री.यशवंतराव चव्हाण निवडणुकीसाठी उभे होते. ही निवडणूक सरळ, बिनखर्चाची, तत्त्वनिष्ठ व जनतेच्या स्वयंस्फूर्त पाठिंब्यावर आधारलेली होती. या निवडणूकीत हे चारही उमेदवार निवडून आले.

३० मार्च १९४६ रोजी काँग्रेस पार्लमेंतरी पार्टीची सभा मुंबईला प्रदेश काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात भरली. या सभेस निवडून आलेले चार उमेदरवार व सातारचे भाऊसाहेब सोमण होते. तर बाळासाहेब खेर, सरदार पटेल हेही या सभेस हजर होते. या सभेत श्री.यशवंतराव चव्हाण यांची पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून निवड झाली होती.[१८०]

## २.१५ सातारा शहरातील १५ ऑगस्ट १९४७ च्या पूर्वीची परिस्थिती

१५ जून १९४५ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू, मौलाना आझाद, वल्लभभाई पटेल, जे.बी.कृपलानी, डॉ.राजेंद्र प्रसाद, आचार्य नरेंद्र देव, पट्टाभि सितारामय्या आणि शंकरराव देव यांच्यासारख्या आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांना अटकेतून मुक्त करण्यात आले. काँग्रेसशी समेट आणि सत्तांतराची प्रक्रिया सुरू करणे इंग्रजांना भाग पडले होते. व्हाइसरॉयने त्यासाठी सिमला कॉन्फरन्स आयोजित केली होती. या परिषदेत भाग घेण्यासाठी काँग्रेसने कार्यकारिणीच्या नेत्यांना मुक्त केलेले होते. सर्व राष्ट्राचे लक्ष सिमल्याकडे लागले होते. अशा वाताावरणातही साताऱ्याचे प्रतिसरकार आपला लढा लढवितच होते. विविध गटांच्या कारवाया चालूच होत्या.[१८१]

सातारा भूमिगत आंदोलनाचा सरकारला बंदोबस्त करता येत नव्हता. याचे प्रमुख कारण म्हणजे भूमिगतांच्या हालचालींविषयी सरकारला काहीच माहिती मिळत नसे. जिल्हयातील अधिकृत काँग्रेस संघटनेला वाटत होते की, भूमिगत आंदोलन थांबवावे. मात्र घातपातांचा निषेध करण्यास जिल्हयातील प्रस्थापित काँगेसजन धजत नव्हते. त्यांनी बाळ गंगाधर खेर, सरदार पटेल आणि महात्मा गांधी यांचीही मदत मागितली. तथापि शेवटपर्यंत खेर, सरदार पटेल किंवा गांधीजी यांनी भूमिगतांचा निषेध केला नाही. दरम्यान निवडणूका होऊन काँग्रेस मंत्रिमंडळाने सत्ताग्रहण केले. खेरांच्या नवीन काँग्रेस शासनाने राजकीय बंदिवानांना मुक्त करण्याचे काम हाती घेतले. शासकीय यंत्रणा त्यासाठी कार्यरत झाली. तथापि काँग्रेस मंत्रिमंडळ सत्तेवर असूनही सातारा शहरातील काही भूमिगतांनी आपल्या हालचाली तशाच चालू ठेवल्या. मुंबई राज्याचे गृहमंत्री मोरारजी देसाई यांच्या आदेशानुसार शासनाने २६ एप्रिल १९४६ रोजी राजकीय बंदिवानासाठी सर्वक्षमा जाहीर केली. वस्तुतः यानंतर साताऱ्यातील आंदोलन थांबायला पाहिजे होते. तथापि काही दिशाभूल झालेल्या भूमिगतामुळे आंदोलन रेगांळत राहिले. दि. १३ जून १९४६ रोजी जिल्हा काँगेस समितीने एक पत्रक काढून

न्यायदान मंडळाचे कामकाज बंद करण्याचे आवाहन केले. अन्यथा आज्ञापालन न करणाऱ्या काँग्रेस कार्यकर्त्यांच्याविरूद्ध जिल्हा काँग्रेस समितीला शिस्तभंगाची कारवाई करावी लागेल अशी समज द्यावी लागली. अनेक भूमिगत स्वातंत्र्य सैनिकाकडे सन १९४७ पर्यंत बेकायदेशीर बंदुका व पिस्तुले होती. जिल्हा काँग्रेस समितीने सन १९४७ मध्ये ही शस्त्रे परत करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार बऱ्याच जणांनी जिल्हा पोलिस अधीक्षकाकडे आयुधे परत केली. पुढे हे क्रांतिकारक सामाजिक कार्याकडे झुकले गेले.[१८२]

## २.१६ सातारा शहरातील स्वातंत्र्य दिन

सन १९४६ साली सरकारने हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याच्या वाटाघाटी सुरू केल्या. वाटाघाटीत काही गोष्टी निश्चित झाल्या. तेव्हा प्रती सरकारचे भूमिगत कार्यकर्ते ठिकठिकाणी प्रगट होऊ लागले. सातारा येथील गांधी मैदानावर क्रांतिसिंह नाना पाटील, अच्युतराव पटवर्धन, पांडुमास्तर इत्यादी प्रतीसरकारच्या शेकडो कार्यकर्त्याचा प्रचंड सत्कार करण्यात आला. सातारा शहरातील राजपथ व सदाशिव पेठेच्या रस्त्यावर सुवर्ण अलंकाराच्या कमानी उभारण्यात आल्या होत्या. दुसऱ्या दिवशी सकाळी रयत शिक्षण संस्थेच्या शाहू बोर्डींगमध्ये म्हणजे मंगळवार पेठेतील धननीच्या बागेत कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केलेला खास सत्कार वरील सर्वांनी आपुलकीने स्विकारला. या अगोदर तानाजी पेंढारकर यांचे घरी जाऊन त्यांचे छायाचित्रास या सर्व वीरांना पुष्पहार घातला. अशाप्रकारे अनेक कारणामुळे स्वातंत्र्य चळवळीला यश येऊन १५ ऑगस्ट १९४७ रोजी हिंदुस्थान स्वतंत्र झाला.[१८३]

सातारा शहरात सर्वत्र आनंदीआनंद झाला. राष्ट्रध्वज सर्वत्र फडकले. अंजिक्यतारा किल्ल्यावर १५ ऑगस्ट १९४७ रोजी रात्री १२ वाजता राष्ट्रध्वज लावण्यात आला. सातारा येथील सुप्रसिद्ध गायक बाळ कारंजकर आणि राम मेटे यांनी राजवाडयासमोरील मारूती मंदिरापुढे 'अंधार संपला दाही दिशा उजळल्या' हे गीत म्हटले. हे दोघेजण अशीच स्वातंत्र्याची गीते म्हणत राजपथावरून फिरत होते.

भारतातील अनेक पुढाऱ्यांची सातारच्या गांधी मैदानावर स्वातंत्र्य चळवळीचा उत्साह वाढविण्यासाठी भाषणे केली होती. त्यामुळे राजवाडयासमोरील गांधी मैदान स्वातंत्र्य संस्कारांनी पवित्र झाले होते. त्या गांधी मैदानावरील बागेत राष्ट्रध्वज डौलाने डोलू लागला होता. अशप्रकारे स्वातंत्र्य मिळविण्याच्या शेकडो वर्षाच्या श्रमला गोड फळ आले होते. म्हणून गांधी मैदानावर

हजारो लोकांनी येऊन आनंद व्यक्त केला होता.[१८४]

## २.१७ समारोप

इंग्रजांनी इ.स.१८१८ मध्ये सातारा राज्याची निर्मिती करून पेशव्यांची सत्ता समाप्त केली. इ.स.१८१८ पासून स्वातंत्र्याचा लढा सन १९४७ पर्यत अविरतपणे जवळजवळ १३० वर्षे चालू राहिला होता. सातारचे राजे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांना गादीवर ठेवणे अडचणीचे झाले. म्हणून त्यांनी अनेक प्रकारचे आरोप करून छत्रपती प्रतापसिंह महाराजांना ४ सप्टेंबर १८३९ रोजी सातारा गादीवरून दूर केले व त्यांचे लहान बंधू आप्पासाहेब महाराजांना गादीवर बसविले. आप्पासाहेब महाराजांनी आपले जहागिरदारीवरील हक्क पूर्णपणे सोडून दिल्यामुळे इंग्रजांना सातारा राज्याची अडचण राहिली नाही. पण आप्पासाहेबांच्या मृत्यूनंतर सातारा राज्य भविष्यात अडचणीचे ठरू शकेल म्हणून इंग्रजांनी दत्तक वारस नामंजूर हे निमित्त करून सन १८४८ मध्ये सातारा संस्थान खालसा केले. छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा उठावाचा प्रयत्न अनेक कारणानी अयशस्वी झाला होता. त्यांचे प्रतिनिधी रंगो बापूजी इंग्लंडहून सन १८५३ मध्ये हिंदुस्थानात परत येऊन इंग्रजी राजवटीविरूद्ध उठावासाठी देशातील परिस्थितीचा अंदाज घेत होते. त्यांनी साताऱ्यात आपली मजबूत गुप्त संघटना तयार केली होती. १२ जून १८५७ रोजी इंग्रजांच्या विरूद्ध उठाव कानपूरला झाला. त्याच दिवशी सातारा येथे सशस्त्र उठाव करण्याची तयारी पुर्ण झाली होती. परंतु फितुराकडून ही बातमी इंग्रजांना समजली. त्यामुळे उठावकर्त्यांना पकडून तोफेच्या तोंडी देण्यात आले. त्यामुळे त्या दिवशी उठाव होऊ शकला नाही.

सन १८७१ मध्ये सातारा येथे सार्वजनिक सभेची स्थापना झाली. सन १८८५ मध्ये हिंदी राष्ट्रीय सभेची स्थापना मुंबईस झाली. त्यावेळी सातारा येथील दादासाहेब करंदीकर, बळवंटराव कोल्हटकर, गोविंदराव लिमये यांनी राष्ट्रीय सभेच्या प्रचारासाठी दौरे काढले. सन १९०० मध्ये हिंदी राष्ट्रीय सभेची प्रांतिक परिषद साताऱ्यात भरली होती. लोकमान्य टिळक यांनी सुरू केलेली गणेशोत्सव व शिवजयंती उत्सव यामध्येही सातारा येथील कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता. लोकमान्य टिळक राष्ट्रीय शाळा सातारा येथे स्थापन करण्यात आली होती. या शाळेत राष्ट्रीय शिक्षण दिले जात होते. त्यांनी जी चतुःसूत्री जाहीर केली होती. त्यामध्येही सातारा येथील क्रांतीकारकांचा मोठा सहभाग होता.

महात्मा गांधीजींनी सुरू केलेली स्वदेशीची चळवळ सातारा येथे जोरात सुरू झाली होती. विमा महर्षी अण्णासाो चिरमुले यांनी स्वदेशीच्या मालाचे दुकान सुरू केले आणि सहकारी पतपेढी सुरू केली. सन १९१६ साली त्यांनी सातारा येथे शेतकरी सहकारी परिषद भरविली होती. भारतात इंग्रजी राज्याशी असहकार आणि सत्याग्रह या मार्गाचा अवलंब स्वातंत्र्य चळवळीत सुरू झाला. या असहकारितेच्या चळवळीत साताऱ्यातील पंढरीनाथ घाणेकर व निळूभाऊ घाणेकर, भाऊसाहेब सोमण अशासारख्या अनेक कार्यकर्त्यांनी भाग घेतला. महात्मा गांधी खादीचे प्रचारासाठी दौऱ्यावर असताना त्यांना सातारा शहर नगरपालिकेतर्फे मानपत्र दिले. सन १९३० मध्ये राष्ट्रीय निशाण लावण्याची मोहिम निघाली त्यावेळी न्यू इंग्लिश स्कूल सातारा येथे पहिले निशाण फडकविण्यात आले होते. शिरोडा येथील सत्याग्रहात सातारा येथील कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता. नवीन कार्यकर्ते तयार करण्यासाठी सातारा शहरात भाऊसाहेब मोडक यांनी राष्ट्रीय दलाची स्थापना केली होती.

८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे महात्मा गांधीजीनी ब्रिटिशांना चले जावची घोषणा दिली. काही करून कोणत्याही मार्गाने हिंदुस्थानातून इंग्रजांना घालविण्याचे प्रयत्न देशभर सुरू होते. त्यातूनच प्रतिसरकारची स्थापना झाली. या कामी क्रांतिसिंह नाना पाटील यांचे फार मोठे योगदान आहे. पुढे १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वंतत्र झाला. अशाप्रकारे स्वातंत्र्य चळवळीतील देशातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व सल्ला साताऱ्यातून मिळत होता. एवढेच नव्हे तर सातारा येथील क्रांतिकारकांनी आपल्या जीवाची पर्वा न करता हा लढयात सहभाग घेऊन फार मोठे कार्य केले होते. त्यामुळे सातारा हा क्रांतिकारकांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो.

## संदर्भ


१) देव शां.भा., महाराष्ट्र एक पुरातत्त्वीय समालेचन, मुंबई, १९६८, पृ. ३३

२) कॅनिंगहॅम, स्टुप ऑफ भारहूत, लेख क्र.१३५, १३८, १३९

३) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई,१९९९, पृ.८५

४) कित्ता, पृ.८४

५) कित्ता, पृ.८८

६) मिराशी वा.वि., कलचुरी नृपती आणि त्यांचा काळ, १९५६, पृ.६

७) देव शां.भा., महाराष्ट्र व गोवे शिलालेख ताम्रपट संदर्भसूची, लेख क्र.३८३, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८२, पृ. १७२

८) देव शां. भा., उपरोक्त, पृ.१७३

९) कित्ता, लेख क्र.७६१८, ७६३१ व ७६३६

१०) पानसे मु.ग., यादवकालीन महाराष्ट्र, १९६३, पृ.४२

११) कित्ता, पृ. ५६

१२) डफ जेम्स ग्रँट, हिस्ट्री ऑफ मराठाज, खंड १, पृ.४५

१३) डॉ.कुंटे भ.ग., गुलशने इब्राहिमी(अनुवाद), महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८२, पृ. ५५८

१४) कित्ता, पृ. ५५९

१५) बेंद्रे वा.सी., मालोजीराजे आणि शहाजीराजे, मुंबई १९६७, पृ.३१ ते ५६

१६) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड १, मुंबई, १९८८, पृ.१६८

१७) सरदेसाई जी.एस.(संपा.), सिलेक्शन फ्रॉम द पेशवा दप्तर, खंड ४२, मुंबई, १९३४, पृ.२०

१८) सरदेसाई जी.एस., न्यू हिस्टरी ऑफ दि मराठाज, खंड १, मुंबई १९७१, पृ.२७४, २७६

१९) पगडी सेतू माधवराव (संपा.), मोगल–मराठा संघर्ष, पुणे, १९६४, पृ.७० ते ७९

२०) डॉ.पवार जयसिंगराव, 'महाराणी ताराबाई', पृ.३१

२१) कित्ता, पृ.५९

२२) कित्ता, पृ.६९–७०

२३) पगडी सेतू माधवराव(संपा.), 'मोगल दरबारातील बातमीपत्रे', खंड–२, महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९८३, पृ.७६

२४) किंकडे आणि पारसनिस, 'हिस्ट्री ऑफ मराठा पिपल', खंड–२, १९२२, पृ.११०

२५) पगडी सेतू माधवराव(संपा.), उपरोक्त, पृ.७६

२६) Kulkarni G.T., The Mughal-Maratha Relations: Twenty Five Faitful Years(1682-1707), Pune, 1983, P.420-21

२७) पगडी सेतू माधवराव, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पुणे, १९६६, पृ.२३०

२८) कुरूंदकर नरहर, साधना, शिवराज्याभिषेक त्रिशताब्दी विशेषांक, जून १९७४, पृ.५

२९) पगडी सेतू माधवराव(संपा.), मराठे व औरंगजेब, ज्ञानराज प्रकाशन, पुणे, १९६३, पृ.१४३–१४४

३०) कुलकर्णी अ.रा. व ग.ह.खरे(संपा), 'मराठयांचा इतिहास', खंड–२, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८५, पृ.२

३१) राजवाडे वि.का., मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड १८, मुंबई, १९१४, क्र.४६

३२) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९६७, पृ.३५

३३) सरदेसाई गो.स., 'मराठी रियासत', खंड–२, पृ.१३

३४) शाहू दप्तर, अ सिरीज २६२०० ते २६२१०, ३८५२० अप्रकाशित

३५) पाठक अरूणचांद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९९९, पृ.१६०

३६) कुलकर्णी अ.रा. व ग.ह.खरे(संपा), 'मराठयांचा इतिहास', खंड–३, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे १९८६, पृ.३५५

३७) कित्ता, पृ.३५६

३८) कठारे अ.मु., 'मराठेकालीन सरकारी अधिकारी आणि त्यांचे गैरवर्तन', पुणे, १९९५, पृ.१ व २

३९) सातारा शहर नगरपालिका, शताब्दि महोत्सव स्मृतिग्रंथ, सप्तर्षि आमची शाहुनगरी, प्रजासत्ताक दिन, २६ जानेवारी १९५४, पृ.२३, २४
४०) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, उपरोक्त, पृ.१५७
४१) हेवाडकर र.वि.(संपा.), थोरले शाहू महाराज यांचे चरित्र(चिटणिसकृत), पुणे, १९७६, पृ.४९, ५०
४२) माटे गो.रा., असा घडला सातारा, जानेवारी १९८८, पृ.११
४३) भावे वि.ल., मराठी दप्तर, रूमाल नं.१, ठाणे, १९१७, पृ.१३५
४४) माटे गो.रा., असा घडला सातारा, उपरोक्त, पृ.१२
४५) डॉ.पवार आ.ग., 'स्टडिज इन मराठा हिस्ट्री', शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७१, पृ. ३१२
४६) शेजवलकर टी.एस.(संपा.), नागपूर अफेअर्स, डेक्कन कॉलेज, पुणे, १९५४, पृ.९१
४७) गर्गे स.मा.(संपा.), 'मराठी रियासत', खंड३, पाप्युलर, मुंबई, १९९१, पृ.९१
४८) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, उपरोक्त, पृ.१६०
४९) भावे वि.ल., मराठी दप्तर, रूमाल पहिला, ठाणे, १९१७, पृ.१४०
५०) कित्ता, पृ.१४४
५१) लेले वि.ग., शिवशाहीचा अस्त, मंगल साहित्य प्रकाशन, पुणे, १९४८, पृ.२३९
५२) राणे र.गो., छत्रपती प्रतापसिंह महाराज, पुणे, २०११, पृ.८७
५३) सातारा शहर नगरपालिका, शताब्दि महोत्सव स्मृतिग्रंथ, सप्तर्षि आमची शाहुनगरी, प्रजासत्ताक दिन, उपरोक्त, पृ.२५, २६
५४) लेले वि.ग., शिवशाहीचा अस्त, मंगल साहित्य प्रकाशन, पुणे, १९४८, पृ.२३९
५५) सरदेसाई गो.स., 'मराठी रियासत', खंड३, पृ.५२
५६) ठाकरे के.सी., प्रतापसिंह छत्रपती आणि रंगो बापूजी, १९४८, पृ.८०
५७) Basu B.D. Story of Satara, Bombay¸ 1963, P.110
५८) पेशवे दप्तर, ४२, पृ.४९
५९) पुणे पुराभिलेखागार, प्रतापसिंह महाराजांची रोजनिशी क्र.३, पृ.११
६०) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, उपरोक्त, पृ.१६५

६१) राणे र.गो., छत्रपती प्रतापसिंह महाराज, पुणे, २०११, पृ.१२१

६२) Ballhatchet Kenneth, Social Policy & Social Change in Western India(1817 to 1830), London, 1957, P.21

६३) राणे र.गो., उपरोक्त, पृ.१२७

६४) लेले वि.ग., उपरोक्त, पृ.२६६

६५) पुणे पुराभिलेखागार, प्रतापसिंह महराजांची रोजनिशी क्र.६, तारीख २७.११.१८२२, पृ.२१,

६६) Ogilvy T., Memoir of Satara Territory – Selection from the Record of Bombay Government, Vol.XLI, (New Series), Bombay 1857 P.170

६७) भिडे व्ही.जी., सातारचे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज व प्रतिनिधी आणि अष्टप्रधान यांचा इतिहास, भोर १८६६, पृ.९२९३

६८) Gazetteer of the Bombay Presidency, Satara, , Government Central Press, Bombay, 1885, P. 295

६९) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड ८, १९९२, पृ.६२९ ६३६

७०) पाटील मदन, छत्रपती प्रतापसिंह , श्री स्वामी पब्लिकेशन, पुणे, २००४, पृ.८८

७१) राणे र.गो., उपरोक्त, पृ.१७१

७२) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, उपरोक्त, पृ.१६६

७३) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड ८,उपरोक्त पृ.६४३ ६४४

७४) Colebrooke T.E., Life of the Mountstuart Elphinstone, London, 1884 P.187, 188

७५) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, उपरोक्त, पृ.१६१

७६) वाळिंबे वि.स., सत्तावन्न ते सत्तेचाळीस स्वातंत्र्य लढयाची संस्मरणीय कहाणी, भाग–२, राजहंस प्रकाशन, पुणे, १ जानेवारी १९९७, पृ.२४२

७७) कित्ता, पृ.२४२

७८) खरे ग.ह. आणि कुलकर्णी अ.रा., मराठयांचा इतिहास खंड ३, पुणे १९८६, पृ.२९२

७९) राणे र.गो., उपरोक्त, पृ.३०२

८०) सातारा शहर नगरपालिका, शताब्दि महोत्सव स्मृतिग्रंथ, सप्तर्षि आमची शाहुनगरी, प्रजासत्ताक दिन, उपरोक्त, पृ.२६, २७

८१) लेले वि.ग., उपरोक्त, पृ.३९०

८२) वाळिंबे वि.स., उपरोक्त,पृ.२४३

८३) सातारा शहर नगरपालिका, शताब्दि महोत्सव स्मृतिग्रंथ, सप्तर्षि आमची शाहुनगरी, प्रजासत्ताक दिन, उपरोक्त, पृ.२७, २८

८४) ठाकरे के.सी., प्रतापसिंह महाराज आणि रंगो बापूजी, नवभारत प्रकाशन संस्था, मुंबई, १९४८, पृ.३५८–३६०.

८५) Chaudhari K.K.(Ed.), Source Material for a History of the Freedom Movement in India(1818-1885) Vol.I Government Central Press, Bombay, 1889, P.190
Bombay Archival Dept. Bombay, Political Department, 1857, Vol.26(II), P.461

८६) Gazetteer of the Bombay Presidency, Satara, , Op Cit, P. 317-318

८७) माटे गो.रा., असा घडला जिल्हा सातारा, १९८८, पृ.१२१–१२२

८८) केतकर कुमार, कथा स्वातंत्र्याची, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, १९८५, पृ.३३

८९) वाळिंबे वि.स., उपरोक्त,पृ.२४३

९०) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, उपरोक्त, पृ.१७३

९१) Gazetteer of the Bombay Presidency, Satara, , Op Cit, P. 319

९२) ठाकरे के.सी., उपरोक्त, पृ.३५६

९३) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, उपरोक्त, पृ.१७४

९४) कित्ता, पृ.२२२

९५) डॉ.कुंटे भ.ग.(संपा.), स्वातंत्र्य चरित्रकोश, महाराष्ट्र राज्य पश्चिम विभाग, खंड ३, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८०, पृ.१९५

९६) Gazetteer of the Bombay Presidency, Satara, , Op Cit, P. 189.

९७) गोखले पु.पा. जागृत सातारा, १९७९, पृ.१९

९८) कित्ता, पृ.२०

९९) केळकर न.चि., गतगोष्टी, १९७८ पृ.२१३.

१००) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, उपरोक्त, पृ.१७६

१०१) गोखले पु.पा. उपरोक्त, पृ.२३

१०२) बहुलेकर बाळासाहेब, आपला सातारा, ६ मार्च १९९४, पृ.६५

१०३) गोखले पु.पा. उपरोक्त, पृ.२८, २९

१०४) कित्ता., पृ.२९ ते ३९

१०५) Richard Cashman, The Mith Of The Lokmanya: Tilak And Mas Politics In Maharashtra,1922, P.161

१०६) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, उपरोक्त, पृ.१७८

१०७) Richard Cashman, Op Cit, P. 645

१०८) गोखले पु.पा. उपरोक्त, पृ.५१, ५६

१०९) कंटक प्रेमा, सत्याग्रही महाराष्ट्र, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला पुणे, ऑक्टोबर १९४०, पृ.२६५

११०) प्रधान ग.प्र., स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत, साधना प्रकाशन, पुणे, १९६९, पृ.४७

१११) बहुलेकर बाळासाहेब, उपरोक्त, पृ.६६

११२) फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १, पुणे १९८९, पृ.१०४

११३) कित्ता, पृ.२४७

११४) बहुलेकर बाळासाहेब, उपरोक्त, पृ.६७

११५) कित्ता, पृ.६८

११६) आठल्ये वा.वि., आत्मवृत्त, डॉ. आठल्ये ग्रंथप्रकाशन समिती सातारा, १९५८, पृ.३३

११७) गोखले पु.पा. उपरोक्त, पृ.६९, ७०

११८) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, उपरोक्त, पृ.१८१

११९) कंटक प्रेमा, सत्याग्रही महाराष्ट्र, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला पुणे, ऑक्टोबर १९४०, पृ.७४

१२०) कित्ता, पृ.७४

१२१) कुंटे भ.ग.(संपा.), उपरोक्त, पृ. १५५ ते ३२८

१२२) पाटणे संभाजीराव, स्वातंत्र्य संग्रामातील सातारा जिल्हा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सवी समिती सातारा, १९९२, पृ.२०

१२३) गोखले पु.पा. उपरोक्त, पृ.८४, ९५

१२४) बहुलेकर बाळासाहेब, उपरोक्त, पृ.७३

१२५) कित्ता, पृ.७१, ७२

१२६) गोखले पु.पा. उपरोक्त, पृ.२०, ३०

१२७) फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड २, पुणे १९९२, पृ.२९५

१२८) कंटक प्रेमा, उपरोक्त, पृ.११६

१२९) कित्ता, पृ.२९६

१३०) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, उपरोक्त, पृ.१८९

१३१) प्रधान ग.प्र., उपरोक्त, पृ.२३६

१३२) फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १, पुणे, १९८९, पृ.२३६

१३३) कित्ता, पृ.१९१

१३४) कुंटे भ.ग.(संपा.), उपरोक्त, पृ. २४१

१३५) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, उपरोक्त, पृ.१९३

१३६) कंटक प्रेमा, उपरोक्त, पृ.२७०

१३७) कुंटे भ.ग.(संपा.), उपरोक्त, पृ. १५५ ते २००

१३८) कित्ता, पृ. २०१ ते २५०

१३९) कित्ता, पृ. २५१ ते ३००

१४०) कित्ता, पृ. ३०१ ते ३२८

१४१) Chaudhari K.K.(Ed.), Source Material for a History of the Freedom Movement in India(1921-1935) Vol.XI Government Central Press, Bombay,P.190

१४२) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, उपरोक्त, पृ.१९४

१४३) Chaudhari K.K.(Ed.), Loc. Cit., P.612

१४४) कित्ता, पृ.७७३, ७७४

१४५) गोखले पु.पा. उपरोक्त, पृ.१४२ ते १५६

१४६) बहुलेकर बाळासाहेब, उपरोक्त, पृ. ७४ ते ७६

१४७) Chaudhari K.K.(Ed.), Source Material for a History of the Freedom Movement in India(1921-1935) Vol.XI Government Central Press, Bombay, 1923, P.732

१४८) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, उपरोक्त, पृ.१९८, १९९

१४९) Home Department(Special), weekly Report, File No. C/83, 9th August 1934, P. 1

१५०) Ibid, P. 1

१५१) आठल्ये वा.वि., उपरोक्त, पृ.१९३

- चव्हाण यशवंतराव, चव्हाण यशवंतराव, कृष्णाकाठ, खंड पहिला, प्रेस्टिज प्रकाशन, पुणे, नवी आवृत्ती, १९८७, पृ.४०

१५२) पाटणे संभाजीराव, उपरोक्त, पृ.२८, २९

१५३) कुंटे भ.ग.(संपा.), उपरोक्त, पृ. १६१ ते २५५

१५४) कित्ता, पृ.३०३ व ३०५

१५५) बहुलेकर बाळासाहेब, उपरोक्त, पृ.८२

१५६) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, उपरोक्त, पृ.२०४

१५७) चव्हाण यशवंतराव, उपरोक्त, पृ.३००

१५८) प्रधान ग.प्र., उपरोक्त, पृ.३११, ३१२

१५९) Home Department, Special Branch, File No. 1020(5) 8 (13), 1941, P.1

१६०) Ibid, P. 2

१६१) कायंदे पाटील गंगाधर वि., यशवतंराव चव्हाण, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक, २०००, पृ.१०

१६२) प्रधान ग.प्र., उपरोक्त, पृ.३१५

१६३) चव्हाण यशवंतराव, उपरोक्त, पृ.२५६, २५७

१६४) कॉ.पाटणकर भारत, खेडयातील गरीबांची झुंज, संपादीत क्रांतिसिंह मुक्त व्यासपीठ, विटा, पृ.३,४

१६५) बहुलेकर बाळासाहेब, उपरोक्त, पृ.८४

१६६) कित्ता, पृ.८५

१६७) जावडेकर शं.द., आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००१, पृ.४७४

१६८) लाड अप्पासाहेब व पाटील उत्तमराव, उपरोक्त, पृ.८४, ८५

१६९) कित्ता, पृ.८४, ८५

१७०) कित्ता, पृ.८६

१७१) कित्ता, पृ.८६

१७२) लाड अप्पासाहेब व पाटील उत्तमराव, उपरोक्त, पृ.८५

१७३) कित्ता, पृ.८६

१७४) कुंटे भ.ग.(संपा.), उपरोक्त, पृ. १५५ ते २००

१७५) कित्ता, पृ.२०१ ते २५०

१७६) कित्ता, पृ.२५१ ते २९९

१७७) कित्ता, पृ.२९९ ते ३२०

१७८) चरित्रकोश, पृ. २५९ ते ३२०

१७९) लाड अप्पासाहेब व पाटील उत्तमराव, उपरोक्त, पृ.८७

१८०) चव्हाण यशवंतराव, उपरोक्त, पृ.३००

१८१) Chaudhari K.K., Maharashtra And Indian freedom strugle, 1989, P.130

१८२) लाड अप्पासाहेब व पाटील उत्तमराव, उपरोक्त, पृ.८७

१८३) कित्ता, पृ.२५१

१८४) बहुलेकर बाळासाहेब, उपरोक्त, पृ.९५

# प्रकरण तिसरे

# सातारा शहराचा सामाजिक इतिहास

## ३.१ प्रास्ताविक

प्राचीन काळापासून सातारा शहरास सामाजिक इतिहास आहे. प्राचीन काळातील समाजात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व क्षुद्र हे चार वर्ण होते. मध्ययुगीन काळात समाजामध्ये प्रामुख्याने चातुवर्ण्य व्यवस्थेनुसार विविध जाती आणि पोटजाती यांचा समावेश झाला होता. यामध्ये प्रामुख्याने सवर्ण आणि हीनजाती अशी विभागणी झाली. आधुनिक काळातील सामाजिक इतिहास पाहत असताना तेथील समाजाची रचना व समाजाची परिस्थिती कशी होती. सातारा शहरातील समाजरचना यामध्ये हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, जैन व बौद्ध धर्मातील समाजजीवन अभ्यासणार आहे. हिंदूच्या समाजरचनेत विविध जाती व जमाती त्यांचे व्यवसाय, सातारा शहरातील लोकसंख्येचा आराखडा, लोकसंख्येची धर्मनिहाय विभागणी, पोषाख, अलंकार, भाषा, घरे, आहार, उपनयन, विवाह, स्त्रीजीवन, धार्मिक श्रद्धा व चालीरीती, मुहूर्त, सण व उत्सव, रोगराई व आरोग्य सुधारणा, सातारा शहरातील सामाजिक बदल घडवून आणणाऱ्या सामाजिक संस्था व त्यांचे उपक्रम इत्यादीची माहिती घेणार आहे. सातारा शहरातील ऐतिहासिक व सामाजिक घराणी यांचीही माहिती या प्रकरणात घेतलेली आहे.

## ३.२ सामाजिक पार्श्वभूमी

### ३.२.१ प्राचीन काळातील समाज

प्राचीन काळातील भारतीय समाजरचना ही 'वर्णाश्रम व्यवस्था' यावर अवलंबून होती. परंपरेने चालत आलेल्या या व्यवस्थेला धर्माच्या नावाने स्मृतिग्रंथांनी आणि कर्मसिद्धान्ताच्या तत्त्वज्ञानाने अगदी सनातन करून टाकले. याला विरोध करण्याचा कोणी प्रयत्न केला नाही. ज्यांनी याविरूद्ध आवाज उठविण्याचा प्रयत्न केला त्यांना यश आले नाही. किंवा त्यांना या व्यवस्थेशी तडजोड करणेही भाग पडले.[१] प्राचीन काळापासून समाज हा चातुर्वर्ण्य पद्धतीवर आधारलेला दिसून येतो. वर्णव्यवस्था खोलवर रूजून त्यातूनच जातिसंस्था वाढीस लागली. चातुर्वर्ण्य पद्धतीचे वैशिष्टये म्हणजे एका वर्णाने दुसऱ्या वर्णाबरोबर व्यावसायिक व वैवाहिक संबंध ठेवायचे नाहीत. या चातुर्वर्ण्य पद्धतीतून पुढील काळात जातीसंस्था निर्माण झाल्या.[२]

हिंदू समाजावर वैदिक आणि अवैदिक असे अनेक संस्कार झाल्यामुळे समाजाची रचना जाती पद्धतीवर आधारलेली होती. जाती संस्था ही वेद पुराणावर आधारीत होती. एखाद्या व्यवसायाचे संक्रमण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीत होऊ लागले यावरून व्यक्तीची ओळख जातीवरून ठरू लागली. भारतीय समाजात व्यवसायावरून जाती–जातीचे वेगवेगळे गट निर्माण झाले आहेत. त्यामुळे एक जात दुसऱ्या जातीपासून स्वतंत्र राहू लागली. विशिष्ट जातीच्या विशिष्ट रूढी, परंपरा आचार पद्धती निर्माण झाल्या. उच्च जातीने अधिकार व हक्क उपभोगावेत व कनिष्ठ जातींनी त्यांची सेवा करावी अशी समाजरचना प्राचीन काळापासून असलेली दिसून येते.[३]

### ३.२.२ मध्ययुगीन कालीन समाज

प्राचीन काळापासून समाजाचा चालत आलेला वारसा इ. स. १३५० वर्षापर्यंत चालू होता. मध्ययुगीनकालीन समाजामध्ये प्रामुख्याने हिंदू समाजामधील चातुवर्ण्य व्यवस्थेनुसार विविध जाती आणि पोटजाती यांचा समावेश होतो. यामध्ये प्रामुख्याने सवर्ण आणि हीनजाती अशी विभागणी करता येईल. या समाजामध्ये अस्पृश्य जातीवरचे निर्बंध यादवकालापासून परंपरेने चालत आलेले होते. धर्मशास्त्रकारांनी अतिशूद्र जातीवर निर्बंध घातलेले होते. चातुवर्ण्यामध्ये जाती व पोटजाती निर्माण झालेल्या आहेत.

चातुवर्ण्य व्यवस्थेत ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र यांचा समावेश होत होता. समाजामध्ये ब्राम्हणाला उच्च स्थान होते. क्षत्रिय या वर्णाला समाजात दुसरा दर्जा प्राप्त झाला होता. क्षत्रियांना वेद अध्ययन करता येत असे. त्यांना युध्द कलेचे ज्ञान मिळत होते. क्षत्रियांना पराक्रम गाजवून आपल्या राज्याचे संरक्षण करावे लागे. वैश्याला समाजातील वर्णव्यस्थेत तिसरे स्थान मिळाले होते. वैश्याचा व्यवसाय व्यापार व शेती करणे हा होता. हिदूं समाजातील वर्णव्यवस्थेतील शेवटचा वर्ण शूद्र असून त्यांना कोणतेच हक्क व अधिकार नव्हते. या जातीवर धर्मशास्त्रकाराने अनेक नियम व निर्बंध लादले होते. या जातींना शिक्षणापासून वंचीत ठेवण्यात आले होते. त्यामुळे हया लोकांवर अंध:श्रध्देचा पगडा होता. शूद्रामध्ये महार, मांग, चांभार, ढोर, सुतार, कुंभार, परिट, न्हावी, लोहार, सोनार, गुरव, कोळी तेली, शिंपी इत्यादी जातींचा समावेश होतो.[४]

### ३.२.३ आधुनिक काळातील समाज

आधुनिक काळातील समाजात जातीव्यवस्थेवर अनेक प्रकारची बंधने होती. धर्मशास्त्रानुसार मनुष्य ज्या जातीत जन्मला त्या जातीत मरणे आवश्यक होते. त्याला इतर जातीचा व्यवसाय करणेही जातीसंस्थेविरूद्ध मानले जात होते. त्यामुळे धर्म, जाती, रूढी व परंपरा यांच्या मर्यादा कोणीही ओलांडत नसत. शक्यतो प्रत्येक व्यक्ती धर्म व जातीच्या मर्यादेत जीवन जगण्याचा प्रयत्न करीत असे. समाजव्यवस्थेत जन्मावरून माणसाची जातवार विभागणी झाली, पण त्याशिवाय त्यात्या जातीचा व माणसाचा सामाजिक दर्जा ठरलेला होता. त्यामुळे प्रत्येक जातीच्या वस्त्या वेगळया, पाणवठे वेगळे, सभागृहे व स्मशाने वेगळी होते.[५]

सातारा शहरात १९ व्या शतकात समाजरचना वरील पद्धतीनेच असल्याचे दिसून येते. २०व्या शतकाच्या सुरूवातीला सातारा शहरात उच्चवर्गीयांकडून उपेक्षित समाजाला हिनतेची वागणूक मिळत होती. ही सामाजिक विषमता पूर्वपार चालत आलेली होती. सातारा हे राजधानीचे शहर असल्यामुळे राजघराण्याला सर्वच जनतेकडून सन्मान प्राप्त होत होता. परंतु गोरगरीब जनतेचे, दलित पीडितांचे जीवन जगणे कठीण झाले होते.[६]

सातारा शहरातील समाजात एकत्र कुटुंबपद्धती होती. त्यानुसार एका घरात दोन ते तिन पिढयांचे लोक एकत्र राहत असत. या कुटुंबातील वयाने ज्येष्ट असणारी व्यक्ती कुटुंबप्रमुख म्हणून राहत असे. सातारा शहरात विविध धर्माचे लोक राहत होते. तसेच सर्वच जातीचे लोक एकत्र राहून सर्व समाजातील सन व उत्सवामध्ये सहभागी होत असत. ख्रिश्चन, इस्लाम, जैन व हिंदू इत्यादी धर्माचे लोक होते व आहेत.

## ३.४ सातारा शहरातील हिंदू धर्मातील जाती व जमाती

सातारा शहरात हिंदू धर्मिय प्रामुख्याने असून त्यात मराठे, ब्राम्हण, माळी, सुतार लोहार, चांभार, कुंभार, न्हावी, माळी, वाणी, सोनार, भोई, मांग, जोशी, मुलानी, कोळी, बुरूड, घिसाडी, पाथरवट, तेली, गोसावी, करंजकार, परीट, ढोर, गोंधळी, ओतारी, धनगर, गुरव, कोष्टी, गवळी, कासार, जंगम व महार इत्यादी जाती व जमाती आहेत . इस्लाम धर्मिय प्रमुख आहेत.[७]

**३.४.१ मराठे –**सातारा शहरातील मराठे हे केव्हा, कसे व कोणत्या भागातून आले याबाबत ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नाही. मराठा जातीचा पारंपारिक व्यवसाय हा शेती होता. मराठा हे

नामाभिधान महाराष्ट्र या शब्दापासून निर्माण झाले आहे. महाराष्ट्रावर १७ व्या शतकाच्या मध्यापासून मराठयांची सत्ता प्रस्थापित होण्यास सुरूवात झाली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्य स्थापनेपासून मराठे विशेष नावारूपाला आले. 'मराठा' हा शब्द ऐतिहासिकदृष्टया जातिवाचक नसून त्यात महाराष्ट्रातील मराठी भाषिकांचा प्रमुख्याने समावेश होतो. तरीपण मराठा महाराष्ट्रावर राजकीय सत्ता प्रामुख्याने मराठा जातीनेच प्रस्थापित केल्याचे दिसते. तरीही मराठा हे नामाभिधान नक्की कशापासून झाले हे सांगणे कठीण आहे.[८] 'मराठे' हे स्वतःला क्षत्रिय वंशाचे मानत होते. तरीही त्यांच्यात क्षत्रिय मराठे, कुणबी मराठे व इतर मराठे असे वर्ग आहेत. पूर्वीचे राजे, सरदार, सरदार जमीनदार व लढवय्ये लोक यांचा क्षत्रिय मराठ्यात वर्गात समावेश होतो. त्यांना वैदिक संस्काराचा अधिकार असल्याचे समजतात. मराठयांच्यात ९६ कुळे आहेत, अशी समजूत आहे. त्यांच्यातील आडनावे पुढीलप्रमाणे मोहिते, भोसले, चव्हाण, पवार, मोरे, सरनाईक, घाटगे, घोरपडे, गावडे, नलगे, जाधव, संकुडे, साबळे, साळुंखे, सरनोबत, नलावडे, फडतरे व शिंदे इत्यादी आडनावे आहेत. सध्या मराठयांच्यात शेकडो आडनावे दिसून येतात. क्षत्रिय मराठे कुणबी मराठयांपेक्षा वर्णाने उजळ, देखणे व सदृढ आहेत. सातारा गादीचे वंशज आजही सातारा शहरात आहेत. कुणबी मराठे समाजात शेती हा मुख्य व्यवसाय करीत.[९]

मध्ययुगीन काळात पूर्वीचे राजे, सरदार, सरदार जमीनदार व पाटील हे चांगल्या वाड्यात राहत असत. त्यातील काही वाडे सातारा शहरात अजूनही अस्तित्वात आहेत. बहुसंख्य मराठे हे साध्या घरात राहत होते. मराठयांना सगोत्र विवाह निषिद्ध नाही. परंतु समान देवक असलेल्या कुलांचा विवाहसंबंध घडून येत नाही. मामेबाहिणीशी विवाह करता येतो. पण मावस, आतेबहिणीशी विवाह करीत नाहीत. मयत पत्नीच्या बहिणीशी विवाह करता येतो. मध्ययुगीन काळात मराठे हे जहागिरदार, देशमुख व पाटील होते. गावची पाटीलकी यांच्याकडे होती. पाटील हा गावचा राजाच होता, पाटलाच्या सल्यानेच शेतीतील कामे व गावाचा कारभार चालत असे, पाटीलकी हे वतन क्षत्रिय मराठा किंवा कुणबी यांच्याकडे राहात असे. पाटीलकीचे वतन वंशपरंपरेने चालत आलेले होते. वतन म्हणजे गावकरता किंवा देशाकरिता करीत असलेल्या कर्तव्याबद्दल त्या व्यक्तीच्या उपजीविकेकरिता मानमरातब राखण्यासाठी आणि जनतेने दिलेले व वंशपरंपरेने चालणारे उत्पन्न म्हणजे वतन होय. गावाचे संरक्षण करण्यासाठी

गावकऱ्यांची मदत घ्यावा लागत असे. गावावर धाड आली तर गावकऱ्यांना आत घेऊन वेशी बंद केल्या जात होत्या. पाटलाला संकटकाळी पुढाकार घ्यावाच लागे,परंतु एरवी देखील कोणाच्या घरी काही विशेष घडले तर त्याची चौकशी करून गावातील भांडणतंटे मिटविणे, गावात घडलेल्या गुन्हयाचा तपास वेसकराकडून लावणे. इत्यादी कामे पाटलाला करावी लागत असे.[१०]

या काळातील मराठे स्त्रीया नऊवारी साडी, उंची लुगडी व चोळी घालतात. तर पुरुष अंगात सदरा व कमरेस धोतर डोक्याला पागोटे किंवा पटका असा पोषाख करीत असत. सध्या मराठे आधुनिक पोषाख परिधान करीत असले तरी काही लोक डोक्यावर टोपी व पागोटेही वापरताना दिसतात. मराठे लोक पोळा, दसरा, दिवाळी, होळी, संक्रात, नांगपंचमी, गणेशचतुर्थी इत्यादी सण साजरे करतात. एकादशी, शिवरात्र, चतुर्थी, सोमवार व शनिवार इत्यादी उपवास करतात. गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, डाळ हे या लोकांचे मुख्य अन्न आहे. कांदा, भाकर, मिरचीचा ठेचा व शेंगदाण्याचा म्हाद्या हे गरीबाचे अन्न आहे. हे लोक मांसाहारही करतात.[११]

### ३.४.२ ब्राह्मण

ब्राम्हण म्हणजे ज्याला पारंपारिक व धर्मशास्त्रीय आधारान्वये पूजा–अर्चा करण्याचा अधिकार आहे. व तो जो करतो, तो सर्व धार्मिक विधी करीत असताना पुरोहितपणा करतो. समाजामध्ये ब्राम्हणाला उच्च स्थान दिले गेले आहे. ब्राम्हणाला वेद अध्ययन पठन करण्याचा अधिकार होता. ब्राम्हणाला वेद अध्यापन अथवा शिकविण्याचा अधिकार दिला गेला होता. ब्राम्हण हे विद्वान, पंडित व बुध्दीमान समजले जात असत, त्यामुळे ब्राम्हण वर्गाचा दर्जा समाजामध्ये वरचा होता. महाराष्ट्रात ब्राह्मणामध्ये सुमारे तीस पोटजाती आहेत. त्यापैकी सातारा शहरात देशस्थ कोकणस्थ, चित्पावन, देवरूखे, गुजराती, कनोजे, कऱ्हाडे, तेलंग, तिरगुळ, शेणवी इत्यादी पोटजाती आढळतात. या ब्राह्मणांचे नित्य व नैमत्तिक संस्कार कमीअधिक फरकाने सारखेच आहेत. ब्राह्मण लोकांना परंपरेने व धर्मशास्त्रीय पूजाअर्चा करण्याचा अधिकार होता. धार्मिक विधी करताना पौराहित्य करणारे, भजन, पूजन, वेदशास्त्र अध्ययन अध्यापन करणारे ब्राह्मण होते. हिंदू समाजात ब्राह्मणांना उच्च मान दिला जात होता. सातारा शहरातील ब्राह्मणांमध्ये कोकणस्थ, कण्व, कनोजे, कऱ्हाडे, गुजरात, गोलक, देवरूखे, देशस्थ, द्रविड,

तिरगुळ, तेलंग इत्यादी उपप्रकार होते.[१२]

कनोजे ब्राह्मण कष्टाळू, प्रामाणिक व स्वच्छताप्रिय होते. हे ब्राह्मण लोक हे शिवकाळात सैनिक किंवा दूत म्हणून काम करीत असत. तसेच स्थानिक, परदेशी किंवा इतर भारतीयांकडे पौराहित्य करतात. तसेच जातीच्या बैठकीत सामाजिक तंटे सोडवितात. कण्व ब्राह्मण हे वर्णाने काळे असून स्वच्छताप्रिय आहेत. ते शाकाहारी असून देशस्थ ब्राह्मणांसारखा पोषाख करतात. हे ब्राह्मण भिक्षुक, आचारी, जलवाहक आणि काही शासकीय सेवेत काम करताना आढळतात. ते यजुर्वेदी ब्राह्मण असून इतर ब्राह्मणांसारखी देवदेवतांची पूजा व उपवास करतात. पंढरपूर, तुळजापूर, वाराणशी, प्रयाग इत्यादी पवित्र तीर्थक्षेत्राला जातात.

जे ब्राम्हण कर्नाटक किंवा आंध्र या राज्यातून महाराष्ट्रात आले ते दक्षिणीय ब्राम्हण म्हणून ओळखले जात असे. कऱ्हाडे ब्राह्मण हे मूळचे सातारा जिल्हयातील कऱ्हाड या शहरातील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण होते. म्हणूनच त्यांना कऱ्हाडे ब्राह्मण असे म्हटले जात होते. या ब्राह्मणाचा उदय हा कोल्हापूर शिलाहार राजाच्या कारकिर्दीत उदयास आले. या ब्राह्मणांची कुलदेवता ही कोल्हापूरची महालक्ष्मी आहे. कऱ्हाडे व चित्पावन यांच्यात व्यवसायावरून संघर्ष निर्माण झाला. या संघर्षाने अन्नव्यवहार वर्ज्य, जाती बहिष्कार होण्यापर्यत आपले स्वरूप धारण केले होते. बहुतेक कऱ्हाडे हे खोत, इनामदार, सरदेसाई, सरदेशपांडे, देसाई, सरपोतदार, मुकादम, सबनीस, कारखानीस इत्यादी सरकारी कामे करणारे होते. त्यामुळे हे ब्राह्मण त्या गावतील किंवा भागातील ते प्रमुख होते.[१३]

कोकणस्थ ब्राह्मण कोकणातील असून ते चिपळूण या मूळगावचे आहेत. त्यामुळे त्यांना चित्पावन असे म्हटले जाते. देशस्थ ब्राह्मणापेक्षा चित्पावन ब्राह्मणांची आडनावे निराळी आहेत. यामध्ये कुंटे, केळकर, साठे, गद्रे, भट, मेहेंदळे, फडके, गोखले, रानडे, टिळक व कर्वे इत्यादी आडनावे आहेत. हे लोक इ.स.च्या १७व्या शतकाच्या अखेरीस रायगड जिल्हयातील श्रीवर्धन येथून देशावर आले. त्या घराण्यातील बाळाजी विश्वनाथ हा थोरल्या छत्रपती शाहू महाराजांचा १७ नोव्हेंबर १७१३ रोजी पहिला पेशवा झाला. तेव्हापासून हे ब्राह्मण लोक राजकारण, समाजकारण तसेच वैदिक, ग्रंथकार, मुत्सुद्दी, न्यायशास्त्री, फडणवीस म्हणून कर्तबगारी दाखवित आले होते. गुजरात ब्राह्मण महाराष्ट्रीय ब्राह्मणांप्रमाणे पोषाख करतात. ते कष्टाळू, काटकसरी व अतिथ्यशील आहेत. गुजरातमध्ये त्यांचे जाणेयेणे सुरू असते.[१४]

कास्त ब्राह्मण कष्टाळू, शांत सोज्वळ असून शेतकरी, व्यापारी आणि शासकीय सेवेत आहेत. गोलक, ब्राह्मण शेतकरी, सावकार, ज्योतिषी पुरोहित इत्यादी व्यवसाय करतात. हे ब्राह्मण देशस्थ ब्राह्मणासारखे दिसतात. त्यांची घरे, अन्न व पोशाख देशस्थांसारखाच असतो. ते ब्राम्हण बौध्दीक व्यवसाय करीत असत, अध्ययन व अध्यायन करण्यासाठी त्यांना राजांकडून जमिनी दान मिळत होत्या, ब्राम्हणांना कष्ट करण्याची दगदग सोसण्याची सवय नव्हती, म्हणुन ते आपली जमीन कुणबी कुळाकडे खंडाने देत असत. रत्नागिरी जिल्हयातील देवरूख या गावातून सातारा येथे देवरूखे ब्राह्मण स्थलांतरीत झाले आहेत. वि.का.राजवाडे यांच्या मते कराडच्या आग्नेयेस सुमारे १० कि.मी. अंतरावर देवराष्ट्रे नावाचे खेडे पूर्वी राजधानीचे शहर होते. तेथील कुबेर नावाच्या राजाच्या आश्रयाने जे ब्राह्मण राहत असत तेच देवराष्ट्रीय अथवा देवरूखे ब्राह्मण होत.[१५] देवरूखे ब्राह्मण, सावकारी, शासकीय नोकरी व इतर व्यवसाय करतात.

घाटमाथ्याच्या प्रदेशाला देश आणि तेथे राहणाऱ्यास 'देशस्थ' असे म्हणतात. सातारा शहरात इतर ब्राह्मणापेक्षा देशस्थ ब्राह्मणांच संख्या जास्त आहे. देशस्थ ब्राह्मणात ऋग्वेदी व यजुर्वेदी असे दोन भेद आहेत. देशस्थ ब्राह्मण, कोकणस्थ, कऱ्हाडे व देवरूखे ब्राह्मणांबरोबर विवाह करीत नाहीत. हे ब्राह्मण पूर्वी जमीनदार, सावकार, पुरोहित, भिक्षुक, लेखक इत्यादी व्यवसाय करीत असत. हे ब्राह्मण हिंदू धर्मातील सोळा नित्य संस्कार व चोवीस नैमित्तीक संस्कार कटाक्षाने पाळतात. काही तिरगुळ ब्राह्मण पानमळयांचा व्यवसाय करतात. सवाशा ब्राह्मण हे सातारा शहरात असून ते सावकारकीचा व्यवसाय करतात. तेलंग ब्राह्मण हे वर्णाने काळे असून त्यांना वेदाचे सखोल ज्ञान होते. ते भिक्षुकी करीत असून जानवे विकतात. याशिवाय मारवाड ब्राह्मण, शेणवी ब्राह्मण, द्रविड व तिरगुळ इत्यादी प्रकारचा ब्राह्मण वर्ग सातारा शहरात राहत आहे.[१६]

### ३.४.३ सुतार–

सुतार जातीमध्ये पांचाळ सुतार व गाडे सुतार हे दोन प्रकार आहेत. सुतार जातीचा व्यवसाय लाकडापासून विविध वस्तू तयार करणे व शेतकऱ्यानां शेतीसाठी लागणारे अवजारे उदाहरण लाकडी, नांगर, वखर, तुतारी, जू, चाके, बैलगाडी पाभार, कुळव, कोळपे, शिवळटी, रूमणे, दांताळे, मोटेचे सुळे, मोगरी, फावडी, मेखा, डांडे, खुंटे, मुठी, इत्यादी वस्तूंचा समावेश

होतो. याशिवाय लोहार व सोनार यांच्या ऐरणीचे खोद, घन व हातोडयांचे दांडे, चांभाराची फरांडी, कुंभाराच्या चाकांचे तळ, परटाची मोगरी इत्यादी वस्तू तयार करीत असे नादुरूस्त अवजारे दुरूस्ती करणे हा आहे. त्यांचा व्यवसाय खेडयात मोठया प्रमाणावर चालत असे. सुतार लाकडी वस्तूसह, लाकडाची खेळणीही तयार करीत असे. त्यांना बाजारात मोठी मागणी होती.[१७]

### ३.४.४ लोहार

पूर्वीच्या ग्रामव्यवस्थेमध्ये बारा बलुतेदारांपैकी 'लोहार' हे एक होते. शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारी लोखंडी अवजारे तयार करून पुरविणे हा त्यांचा व्यवसाय आहे. त्यामध्ये नांगराचा फाळ व वसू, कुळवाचे वसु, पाभरीचे फारोळे, कोळप्यांच्या गोल्या, मोटेचे कडे, कण्याच्या आऱ्या, कुऱ्हाड, कुदळ, खुरपे, विळा, उलथणे, विळी, जात्याचे खुंटे इत्यादी. सुताराचे वाकस, किंकरे, सामते, सोनाराची ऐरण, सांडस, चिमटे, हातोडे, चांभाराचा आऱ्या, राप्या, कुंभाराची कुदळ, खोरे, खुरपे, मुलाण्याचा सुऱ्या अशा वस्तू नवीन बनवतो तर जुन्या वस्तू शेवटण्याचे कामही लोहार करत असतो. त्यांच्यात जाधव, कावरे, निकम, पोवार, माने, थोरात, चव्हाण ही आडनावे आहेत.[१८] लोहारात मराठा लोहार, पांचाळ, कोकणी, गुजराती व कन्नड इत्यादी पोटजाती होत्या.[१९]

### ३.४.५ चांभार

चांभार या अतिशूद्र समजल्या जाणाऱ्या जातीचे तीन पोटभेद्द पडले होते. उदा. चामडयाचा धंदा करणाऱ्या अतिशूद्रांमध्ये मोची, चांभार, ढोर, इत्यादी होत.[२०]

चांभार हा मोची जिनगर इ. शब्दांनाही कागदपत्रात यांचे उल्लेख सापडतात.[२१] चांभार हे मेलेल्या जनावरांची कातडे काढून त्यांच्यापासून निरनिराळ्या वस्तू तयार करीत असत. जनावरांच्या कातडयापासून पाणी भरण्यासाठी मोटी बनवत असत. ढोर ही चांभाराची पोटजात होती. ढोर ही जात मेलेल्या ढोराची विल्हेवाट लावीत असत. कातडे या चांभारांना मिळत असत. या काळात चामडयाचा धंदा कापडाच्या खालोखाल भरभराटीचा होता. चामडयाच्या कातडयापासून विविध वस्तू बनवित असत. त्या चामडयाच्या कातडयापासून चप्पला, पिशव्या, बुट इ. वस्तू बनवित असत. चामड्याचा धंदा जसा गुजराथमध्ये भरभराटीचा होता तसा महाराष्ट्रामध्ये भरभराटीचा होता. चामडयापासून पाण्याच्या मोटी,पिशव्या, पखाली, इ. वस्तू

बनवित असल्याचे यादवकाळात दिसून येते. चामडयाचा उपयोग स्थानिक ठिकाणी खूप होत असे. कमावलेल्या कातडयाचे मऊ मऊ पट्टे विणून केलेले नक्षीकाम त्यावरच्या बेलपत्या, जनावरांची आणि पक्षांची चित्रे, इ. कलाकुसरीची कामे, दौलताबाद नंदूरबारचे कारगीर, अतिशय कल्पक व कुशल होते. अशी इब्नबतुताने त्यांची तारीफ केली आहे. चामडयापासून वस्तू तयार करण्यासाठी कमावलेले सर्व प्रकारचे कातडे ठाणे बंदरातून परदेशी पाठविले जात असत.

चांभार जातीतील लोक चामडयाच्या वस्तू मोठया प्रमाणात विकत असे. मोट शिवणे, तिला ढिगळ लावणे, गोफणीला टवळे लाणे, जुना जोडा, आसूड सांधणे इत्यादी कामे करीत असत. चांभार जातीमध्ये कुणबी, ढोर, मोची व परदेशी चांबार इत्यादी पोतजाती आहेत. मोची चांभार जोडे, चपला व इतर चामडयाच्या वस्तू तयार करतात. चांभार जातीत साळुंखे तांबे, काळे, कदम, गायकवाड, पवार, कारंडे, कांबळे, मोरे व दळवी इत्यादी आडनावे आहेत.[२२] **३.३.**

### ३.४.६ कुंभार

कुंभार जातीमध्ये लिंगायत कुंभार व मातीची भांडी बनविणारे कुंभार हे दोन प्रकार आहेत. कुंभार घागरी, दुधाणे, ताकाचा डेरा, सुगडे, वेळण्या, पणत्या, चिटकी, राजंण, कोथळी वगैरे लहानमोठया वस्तूही वस्तू बनवित असत. त्यांना धान्याच्या स्वरूपात मोबदला मिळत असे. याशिवाय विटा, मडके व घागरी इत्यादी मातीच्या वस्तू आणि मानव व प्राण्यांच्या मातीच्या मूर्ती तयार करून विकत होते. कुंभार हे रांजण, मडकी , मातीची इतर भांडी तयार करीत असत.[२३] पोटजाती एकूण १८ आहेत. उदा अहिर किंवा लहान चाके, बळदे , भांडू इ.[२४]

### ३.४. ७ न्हावी

सातारा शहरात न्हावी जातीचे लोक दाढी व हजाात करण्याचा व्यवसाय करीत असत. न्हावी काम मिळण्यासाठी रस्त्याच्या चौकात बसत असत. याशिवाय नागपंचमीच्या दिवशी मातीचे नाग बनवून सर्वाच्या घरी पूजनासाठी देत असत. याशिवाय मराठयांच्या घरी विवाहासारख्या उत्सवाप्रसंगी न्हावी हे लोकांना निमंत्रण देण्याचे कामही करीत असत.[२५]

### ३.४.८ माळी

माळी जातीमध्ये लिंगायत माळी व फुल माळी हे दोन प्रकार आहेत. माळी लोक हे फुलांचा व्यवसाय करीत असत. याशिवाय हे लोक फळे व भाजीपाल्यांची बागायती शेती करीत

असत. काही माळी बागायतदार शेतकरी होते. माळी स्त्रिया कपाळावर कुंकवाची रेघ ओढीत व गळयात चांदीची सरी घालतात. देशस्थ ब्राम्हण त्याचे धर्मगुरू होते. आळंदी, जेजूरी, पंढरपूर आणि तुळजापूरची यात्रा हे लोक करतात. संत सावतामाळी यांची पुण्यतिथी ते साजरी करतात.[२६]

### ३.४.९ जंगम

जंगम हे शैव पंथीय असून पौराहित्याच्या कामाशिवाय ते घरोघरी भिक्षा मागतात. हे लोक धातूची शिवमूर्ती असलेली डबी गळयात बांधतात. जंगमाच्या प्रमुखास स्वामी म्हणतात. स्वामी जेव्हा मरण पावतो तेव्हा त्याच्या शिष्यांमधून एखादा स्वामी होतो. तो कराडच्या मठात वास्तव्य करतो. स्वामी चारपाच वर्षातून एकदा आपल्या अनुयायांच्या घरी भेट देतो. तेव्हा त्याला धान्य व भेटवस्तू मिळतात. जंगम शाकाहारी असतात. मृतास पुरतात व समाधी बांधतात. समाधीवर शिवप्रतिमा तयार करतात.[२७]

### ३.४.१० कासार

कासार हे जैन धर्मिय असून ते स्त्रीयांच्या हातात बांगडया भरतात. बांगडया तयार करणाऱ्याच्या 'कासार आणि बांगड' या दोन पोटजाती आहेत. ते तांब्या पितळेची भांडी तयार करत असत. काही जण सुया व धागे यांची विक्री करतात. काही शेती व नोकऱ्या करतात. हे लोक सामाजिक तंटे जातपंचायतीमध्ये मिटवितात.[२८]

### ३.४.११ गवळी

'गवळी' हे गाई व म्हैशी पाळतात. ते गाई व म्हैशीचे दूध विकण्याचा व्यवसाय करतात. त्यांचे रितीरिवाज कुणब्यासारखे आहेत. काही गवळी शेतीचा व्यवसायही करीत असत.

### ३.४.१२ कोष्टी

हे लोक विणकराचा व्यवसाय करीत असत. त्यात मलमली, मखमली, रेशमी वगैरे सर्व प्रकारच्या कपडयाचे विणकाम करीत असत. फार पुरातन कालापासून कापड विणण्याची कला अवगत होती. महाराष्ट्रात कापड विणण्याची अनेक केंद्रे पैठण, नगर, ठाणे, चौल, इत्यादी प्रसिध्द ठिकाणे ओहत. तेथूनच हे लोक सातारा शहरासह जिल्हयात स्थलांतरीत झाले आहेत. त्यांच्यात मराठा कोष्टी व लिंगायत कोष्टी असे दोन पोटभेद आहेत.[२९] त्यांच्या घरी विणकामाचे साहित्य आहे. लिंगायत कोष्टी शाकाहारी असून मराठा कोष्टी मांसाहारी आहेत. दोन्हीही लोक

मराठयांसारखा पोषाख करतात. लिंगायत कोष्टी लिंग धारण करतात. हे लोक विणकामाबरोबरचशेती व शेतमजुरी करीत असत.[३०]

### ३.४.१३ गुरव

सातारा शहरात गुरव लोकांची संख्या मोठया प्रमाणावर आढळते. देवाच्या देवळात पुजा अर्चा, मंदिराची झाडलोट व दिवाबत्ती करण्याचे काम गुरवाचे होते.[३१] काही गुरव पत्रावळी व द्रोण तयार करण्याचे काम करीत असत. गुरवात देशकर, वऱ्हाड, झडे, वऱ्हाडे म्हणजे वऱ्हाडात राहणारे झडे, जंगलात राहणारे, या दोन पोट जाती होत्या लिंगायत गुरवासच नीळकंठ 'गुरव' म्हणत जैन गुरवही असत.[३२] मराठा गुरव म्हणजे मराठा जातीचे पुजारी गुरवाला शूद्राचा 'पुरोहित' म्हटले जात असे.

गावातील लोकांना देवपूजेसाठी दररोज बेल व तुळशीची पाने व फुले पुरवितात. विवाह व इतर समारंभात ते वाजंत्री म्हणून काम करतात. सातारा शहरात गुरव जातीच्या शैव, नीलकंठ, मराठा व लिंगायत अशा चार पोटजाती आहेत. लिंगायत गुरव गळयात लिंग बांधतात; तर शैव, नीळकंठ गळयात जानवे घालतात.. त्यांनी केलेल्या कामाच्या मोबदल्यात त्यांना देवस्थानच्या इनामी जमिनी आहेत. त्यास 'गुरवकी' म्हणतात. त्यांना सुगीच्या दिवसात धान्य मिळते. तर देवापुढे ठेवलेली दक्षिणाही मिळत होती. ज्या मानाने ज्या देवाच्या नवसाला पावण्याचा लौकिक त्या मानाने त्याच्या पुजाऱ्याला कुणब्याकडून पेंढीकाडी मिळत होती.[३३]

### ३.४.१४ धनगर –

महाराष्ट्रात धनगरांच्या तेवीस पोटजाती असून शासनाने त्यांचा भटक्या जमाती अंतर्गत समावेश केला आहे. त्यांच्या अहीर, अस्सल किंवा मराठा, बनजी, बरगेबंद किंवा मेढकरी, गडगे, गवळी, हटकर, होळकर, मंढे, म्हसकर इत्यादी पोटजाती आहे. सातारा शहरात यांना गावड असे म्हणतात. मराठेशाहीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात यांचा मोठया प्रमाणात भरणा होता. हे महाराष्ट्रातील परंपरागत मेंढपाळ होते. ते मेंढयाशिवाय शेळया, गाई व म्हैशी पाळतात यांच्याजवळ चांगल्या जातीची कुत्रे आहेत. सहयाद्रीच्या डोंगराळ भागात जे गुरे चारतात त्यांना डांगे म्हणतात. ते गुरांचा व्यापरही करतात. जे धनगर मेंढराचा कळप पाळतात त्यांना मेंढे म्हणतात. ते लोकर विकतात. शेतात खतासाठी बकऱ्या व मेंढया बसवून ते त्या मोबदल्यात शेतकऱ्याकडून धान्य किंवा पैसे घेतात. यासाठी ते गावोगाव भटकत असतात. ते

एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरत असत. त्यांचा पोशाख तांबडे पागोटे, खांद्यावर घोंगडी, काखेत एक पिशवी, कमरेस पुढच्या बाजूस त्रिकोणी पडदा सोडलेली लंगोटी, अंगात जाड कापडाचा कुडता, पायात वाजणाऱ्या जाड वहाना व हातात जाड काठी असते. स्त्रीया गुडघ्यापर्यंत बहुधा लालभडक रंगाचे लुगडे नेसतात. त्यांना चांदीच्या दागिण्यांची आवड आहे. त्या पुतळया, गजरटे, गोखरे, आंगठया, मासोळया, चांदीच्या सरी व बावटे इत्यादी दागिणे वापरीत असत.सातारा शहरातील धनगरांची आडनावे डोंबरे, धायगुंडे, कारंडे, विचुफळै, सूळ, बनगर, शिंगाडे, खोत, धडस, चौगुले, माने, हाके, थोरात, देवकाते, कोकरे, चोपडे, गावंदे जामळे, कोळेकर पांढरे इत्यादी आहेत.[३४]

### ३.४.१५ ओतारी

ओतारी हे कष्टाळू असून पितळी भांडी, देवदेवता व प्राण्यांच्या मूर्ती तयार करून विकतात. त्यांच्या बायका त्यांना कामात मदत करतात. या जातीचा समावेश भटक्या जमातीत होतो. ते अंधश्रध्देवर विश्वास ठेवत होते. त्यांची कुलदैवते औंधची अंबाबाई, कोल्हापूरचा जोतिबा, जेजूरीचा खंडोबा आणि म्हसवडचा सिदोबा ही आहेत.[३५]

### ३.४.१६ गोंधळी

गोंधळी लोक हे स्वतःला भवानी देवीचे भक्त समजून गळयात कवडयांची माळ घालतात. अंबाबाई व भवानी देवीचे नाचगाणे करतात. हिंदू लोक शुभप्रसंगी त्यांचेकडून आपल्या घरी कुलदेवतांच्या नावाने गोंधळ घालतात. गोंधळी हे जगदंबा, अंबाबाई, भवानी, यल्लमा, रेणुका इत्यादी देवतांची आराधना करून त्यांच्या नावांनी गोंधळ घालतात. गोंधळ तीन टप्प्यात पूर्ण करतात. पहिल्या टप्प्यात देवीला रंग लावतात. त्यावेळी चौक भरून त्यावर तांदूळ व कुंकू पसरतात. तांब्यावर नारळ व खण ठेवून त्यासमोर दिवटी पेटवितात. सभोवताली ऊस किंवा केळीचे खांब उभे करतात. दुसऱ्या टप्प्यात देवीच्या नावान रात्रभर जागरण करतात. त्यावेळी गोंधळी कथा, कीर्तन व गाणी गाऊन रात्रभर नाचतात. तिसऱ्या टप्प्यात देवीची आरती व भार उतरविण्याचा कार्यक्रम करतात. रेणुकराई गोंधळी गोंधळास जाताना धोटा व गुडघ्यामध्ये येईल अशा तऱ्हेने शेरवानी, अंगात मखमलीचा अंगरखा आणि गळयात ६४ कवडयांची माळ घालतो. कदमराई गोंधळी ३२ कवडयांची माळ घालतो. डोक्यावर कंगणीदार पगड्या, शोभिवंत दाढी, कानात भीकबाळया घालतात. देवीसमोर रात्रभर दिवटी

पेटती ठेवतात. त्यांना शिवकाळापासून इनामे किंवा वतने दिली होती. प्रत्येकास दहाबारा गावातून गोंधळ घालणयाची मुभा होती. इतरवेळी ते त्या गावातून भिक्षा मागत असत. एखाद्या गोंधळयास नेमून दिलेल्या बारा गावातून दुसऱ्यांनी परवानगीवना भिक्षा मागितली तर त्याला दंड आकारला जाई. त्यासाठी मूळ वतनदार गोंधळयास हिस्सा द्यावा लागत असे. त्यांनी तसे न केल्यास जातपंचायत दंड आकारीत असे. गोंधळासाठी संबळ, तुणतुणे, दिवटी व कवडयांची माळ ही साधने वापरतात. पूर्वी गोंधळास पाच जण जात असत. गोंधळात देवीची स्तुतीपर गाणी, गौळणी, कृष्ण–कथा, पोवाडे असे अनेक प्रकार असतात. घरातील मंगलकार्ये निर्विघ्नपणे पार पडल्याबद्दल देवीची स्तुती आणि पूजा करून तिच्या उपकारस्तवनाचा हा विधी असतो.[३६]

### ३.४.१७ ढोर

सातारा शहरात ढोर जातीचे लोक तुरळक प्रमाणात आहेत. याचे काम कातडी कमविण्याचे व विहीरीवरील मोट बांधणे हे काम मुख्य होते. त्याचबरोबर ते शेतात मजूर म्हणूनही काम करतात. चामडयाच्या धंद्याशी संबंधित असलेल्या चर्मकार आणि ढोर या दोन स्वतंत्र जाती आहेत. चांभार स्वतःला ढोर जातीपेक्षा उच्च समजतात. ही जात हिंदू समाजव्यस्थेमध्ये पूर्वी अस्पृश्य म्हणून ओळखली जात असे. सातारा शहरात ढोर जातीची तपासे, व्हटकर, खंदारे, कदम इत्यादी आडनावे आहेत.[३७]

### ३.४.१८ परीट

परीट लग्नकार्य, सोयर, सुतक वगैरे प्रसंगी गांवकऱ्यांचे धुणे धुतो. तो लग्नात नवरानवरी हयांच्यावर चांदवा धरतो, व पायघडया घालतो. शहरातील श्रीमंत घरचे कपडे धुण्याचे काम करीत असत. या कामाच्या मोबदल्यात त्यांना बलुते मिळत असे. परटाला कामात त्याची बायको मदत करीत असे. परीट हा समाज आर्थिकदृष्टया गरीब होता.[३८]

### ३.४.१९ करंजकार

करंजकार हे घोडयासाठी खोगीर तयार करीत असत. पूर्वी ते तलवारी, बंदुका, धातूची भांडी व पंखे तयार करीत होते. करंजकार हे मुघलकाळात विजापूरहून सातारा जिल्हयात स्थलांतरीत झालेले दिसतात. त्यांची बोलीभाषा मराठी आहे.[३९]

### ३.४.२० गोसावी

गोसावी हा शब्द 'गास्वामीन' या संस्कृत शब्दापासून आलेला आहे. 'गोसावी' हे स्वतःला कपील ऋषीचे वंशज मानतात. हे लोक शिवाची पूजा करतात. गोसावी मंत्र, तंत्र, व चमत्कार यासाठी प्रसिद्ध आहेत. त्यांच्यात गिरी गोसावी, बावा, भारती आणि बैरागी या पोटजाती आहेत. त्यांच्या पोटजातीत रोटीबेटी व्यवहार होतात. महाराष्ट्रातील गोसावी आपले स्थान गुजरात राज्यातील असल्याचे सांगतात. गोसावी जातीतील पुरूषाचा पोशाख भगवी वस्त्रे, काखेत झोळी, डोक्यास मुंडासे, हातात काठी असा असून ते अनवाणी चालतात. भस्म लावून रूद्राक्षांची माळ घालतात व भिक्षा मागतात. काही गोसावी लोक शेती व मजुरीही करतात.[४०]

### ३.४.२१ तेली

तेली हे तेल विकाण्याचा व्यवसाय करीत असत. तेलाचे माप कमी देणे व भाव जास्त लावणे, असा तेलाचा धंदा करून नफा मिळवीत होते. तेली कंजुषपणा करून पैसे साठवून ठेवत असे, शेतकऱ्याला नेहमी पैशाची टंचाई भासत होती, त्यावेळेस शेतकरी तेल्याकडून सवाई, दीडीने, व निम्मीने अशा प्रकारच्या व्याजाचे पैसे देत असत, पण काही शेतकरी फारच गरीब असत, त्यामुळे दिलेला पैसा परत येण्याची शक्यता नसे, त्यावेळी तेली शेतकऱ्यांची अवजारे, घर, भांडे, गहाण ठेवूनच त्यांना पैसा देत असे . पैसा परत केला नाही तर शेतकऱ्यांचे गहाण वस्तू तेल्याकडे राहात असत. अशा रितीने त्याकाळातील तेली फारच श्रीमंत झाले आहेत.[४१]

### ३.४.२२ पाथरवट

हे लोक सातारा शहरात आढळत असून त्यांचा पेहराव मराठी स्त्री व पुरूषाप्रमाणे आहे. हे लोक अतिशय कष्टाळू व अतिथ्यशील आहेत. हे दगड फोडण्याचे काम करतात. याशिवाय देव, प्राणी व मानवाच्या मूर्तीही तयार करतात. त्याशिवाय दगडी जाते, पाटे व वरवंटे इत्यादी तयार करतात. त्यांच्या बायका त्यांना कामात मदत करतात.[४२]

### ३.४.२३ घिसाडी

घिसाडी लोक हे फिरस्ते असून त्यांची दोन ते दहा बिऱ्हाडे मुक्कामाला येतात. ती बहुधा शहराजवळ बारदानाच्या पालातून उतरतात. दर बिऱ्हाडाला दोन ते दहा गाढवे आणि एक दोन

बिऱ्हाडे मिळून एखादी म्हैस असते. त्यांच्याजवळ तट्टे, बकरी, कोंबडया व मोठाले कुत्रे असतात. नांगराचा फाळ, कुऱ्हाडी, कुदळी, वसु, खुरपी, ऐरण, आंख, धावा, सुळे, पळया, विळे, नाचकंडे, शिवळांचा खुळखुळा, सुकत्या, फावडे वगैरे लोखंडकाम करतात. हे मूळचे राजस्थानातील असल्याने त्यांची भाषा मेवाडी असली तरी बहुतेक लोक मराठी बोलतात. यांच्यात चौहान, पडवळ, साळुंखे, सुर्यवंशी, शेलार अशी आडनावे आहेत.[४३]

### ३.४.२४ बुरूड

बुरूड हे सातारा शहराच्या बाहेर झोपडयात राहतात. बांबूच्या टोपल्या, धान्याच्या कणगी, कोंबड्याचा खुराडा, मुलांचे पाळणे आणि इतर घरगुती वापराच्या बाबूंच्या वस्तू तयार करतात. बांबूकाम करणारे लोक म्हणजेच बुरूड होत. या जातीत पोटजाती नाहीत.

### ३.४.२५ वाणी

तेल, मीठ, कापड इ वस्तुची गरज भागविण्यासाठी प्रत्येक गावात वाण्यांचे दुकान असे. या जातीमध्ये एकूण चार प्रकार आढळतात. पहिल्या प्रकारात गुजराती वाणी येत असून ते शाकाहारी आहेत. ते स्वच्छ, नीटनेटके, संयमी व कष्टाळू असून किराणा व्यापारी, सावकार, धान्य–कापड व्यापारी व इतर किरकोळ सामानांचे विक्रेते आहेत. ते वल्लभी वैष्णव असून आपणास वल्लभाचार्यांचे शिष्य मानतात. मराठा वाणी हे व्यापारी, दुकानदार व शेतकरी आहेत. पुरूष व स्त्रिया ब्राम्हणासारखा पोषाख करतात. ते ब्राम्हणाप्रमाणेच देवदेवतांची पूजाअर्चा व उपासतापास करतात. मारवाड वाणी हे गुजरात वाण्यापेक्षा जास्त हुशार असतात. ते सावकारकी, कापड, धान्य, तेल, तूप तसेच इतर किराणा मालाचा व्यापार करतात. लिंगायत वाणी हे वर्णाने काळै आणि मध्यम बांध्याचे असून घरी गाई, म्हैशी व घोडे पाळतात. पुरूष व स्त्रिया कपाळावर भस्म लावतात व गळयात लिंग धारण करतात. ते व्यापारी असून अनेक प्रकारचे व्यापार करतात. महादेवास ते प्रमुख देव मानतात.[४४]

### ३.४.२६ सोनार

सोनार हा सोन्यांच्या धातूपासून विविध स्त्रियांच्या सौदर्यांची विविध दागिने तयार करीत होते. विविध कलाकुसरीचे दागदागिने बनविण्याचे कौशल्य त्यांच्या अंगी होते. त्यामुळे त्यांच्या व्यवसासावरून सोनार ही जात निर्माण झाली असावी असे दिसून येते. पेशवे काळात सोनार हे पोतदारीचा व्यवसाय करीत होते. परंतु पेशवाई नष्ट झाल्यानंतर तो बलुत्यात

कुणब्यांचे व आलुत्याबलुत्यांचे रूप्याचे किरकोळ ठोसर डाग घडविण्याचे काम करीत आहेत. उदाहरणार्थ टांक, कान टोचणे, आंगठया, कडी, गोठ इत्यादी कलाकुसरीच्या व श्रमाच्या दागिन्याबद्दल तो मजुरी घेतो. स्त्री व पुरूषांना अलंकार बनविण्याचे काम करीत असत. सोन्या–चांदीचे दागिणे बनविणे हे सोनारांचे मुख्य काम होते. सातारा शहरात सोनारकाम मोठया प्रमाणावर चालत होते.[४५]

### ३.४.२७ भोई

सातारा शहरात भोई लोक आढळून येतात. त्यांचा मुख्य व्यवसाय मासेमारी हा आहे. मासेमारीशिवाय, शेती आणि मजुरीही करतात. मराठा काळात हे लोक पालख्या वाहून नेण्याचे काम करीत असत. ते वर्णाने काळे, शरीराने धडधाकट व कष्टाळू आहेत. भोई लोक हे कोळयापेक्षा खालच्या दर्जाचे समजले जातात. तथापि त्याम्चे रितीरिवाज कोळयांसारखेच आहेत.

### ३.४.२८ महार

हिंदू धर्मात महार या जातीचा समावेश होतो. महार या जातीच्या पोटजाती महार, मुरळी महार, गावकी महार आणि जोगती महार अशा आढळतात. महार या जातीला अतिशूद्र जात म्हणून ओळखले जात असे. मराठाकाळात महार जमातीतील लोकांकडे गावाच्या रक्षणाचे काम असे. म्हणून त्यांना वेसकर असे म्हणत. शेतामध्ये खळयाच्या वेळी महारांना खळयाचेही रक्षण करावे लागे. अशा लोकांना खळे वेसकर असे म्हणत. गावातील चोऱ्याबाबत महारावर जबाबदारी असल्यामुळै शेतकरी आपली कुडाची घरे बांधून निर्धास्तपणे शेतकामाला जात असत. महारांची वस्ती शहराबाहेर होती. ते छोटया झोपडयातून राहत. त्यांची राहणी साधी होती. ते गावचे सेवेकरी असल्याने गावजमिनीची राखण त्यांच्याकडे असे. तसेच गावपाटलाला मदत करणे, त्यांचा निरोप पोहचविणे, गावच्या सीमा लक्षात ठेवणे इत्यादी कामे त्यांना करावी लागत. त्यांच्यातील काही लोक ब्रिटीशांच्या लष्करात होते.[४६]

महारांना सार्वजनिक कामेही करावी लागत होती. महारांना गावच्या चावडीवर हजेरी लावावी लागत असे. चावडीची झाडलोट करणे, गावात गुन्हे घडले असतील तर त्याचा न्याय निवाडा देवाच्या देवळात देवाच्या साक्षीने न्याय दिला जात असे, पुराणपंडित आला तर त्यांची

चर्चा अगोदर महारांशी होत असे गावातील जनावरे मेले तर त्याची विल्हेवाट महारांना लावावी लागत असे.[४७]

महारांना थोडीशी शेती वतन म्हणून मिळालेली असे, महारांमध्ये एकत्र कुटूंब पध्दती असल्यामुळे घरची शेती घरातील लोक सांभाळत असत. महारांनी मेलेली जनावरांची कातडी काढण्यासाठी त्यांना थोडीशी जमीन मिळालेली असे, त्या जमिनीत महार शेती करीत असल्याचे दिसून येते.

### ३.४.२९ मांग

मांग अस्पृश्य असल्यामुळे त्यांना वेशीच्या बाहेर राहावे लागत असे. मांगाला कोणतेच हक्क व अधिकार नव्हते. या अतिशूद्र समजल्या जाणाऱ्या मागांवर अंध:श्रध्देचा पगडा लादला गेला होता. या अतिशूद्र मागांची शिवाशिव, विटाळ, चांडाळ केला जात असे. मांगाला अतिहीन लेखले जात होते. मांग लोकांचा परंपरागत व्यवसाय हा अंबाडी व वाखाचे दोर वळून विकणे हा आहे. त्याशिवाय टोपल्या, सुपे, केरसुण्या इत्यादी तयार करतात. या जातीतील लोक तमाशा कलावंत म्हणूनही काम करतात. विवाह व धार्मिक उत्सवाच्या प्रसंगी वाजंत्रयाची कामे करतात.[४८]

त्यांनी केलेल्या कामाच्या मोबदल्यात दिवाळीचा सण संपल्यानंतर त्यांना धान्य दिले जात असे. दिवाळीच्या सणाला केलेले सर्व खाद्यपदार्थ मांगाला दिले जात असे, मांग दिवाळीच्या सणाच्यावेळी घरोघरी रांगोळी आणून देत असत. त्या रांगोळीच्या बदल्यात दिवाळीला केलेले खाद्य पदार्थ दिले जात असे. मांगाला लोकांचे घरचे उष्टे अन्न खावे लागत होते, अशा रीतीने त्यांना अतिशय निकृष्ट दर्जाची कामे करावी लागत होती. गावात लग्न समारंभ असल्यास जेवणाच्या पत्रावळी उचलावी लागत असे. तरीही या जातीमध्ये त्यांच्या धंदयावरून अनेक पोटजाती पडल्या होत्या असे दिसून येते.[४९]

### ३.४.३० जोशी

जोशी हे उपाध्येपणाचे काम करतात. ते ग्रामदेवतेची पूजाअर्चा करतात. ज्योतिषाचे प्रश्न पाहणे, शहरातील लोकांची पत्रे लिहीणे, ब्राम्हणेत्तरांना ब्राम्हण घालणे झाल्यास स्वयंपाक करणे इत्यादी कामे तो करतो.

### ३.४.३१ मुलानी

मुलान्याचे काम बकरे कापणे हे होते. त्याने फात्या दिला नाही तर ते मुरदाड राहते, म्हणजे ते हलाल(शुद्ध) होत नाही. बकरे मारण्याबद्दल उपऱ्याकडून त्यांना एक आणा मिळत असे. तर कुणब्याकडून त्याला तीन पायल्या धान्य मिळत असे. शहरात फकीर नसेल अशावेळी तो गावचा गावूत मुलाना करत असे.[५०]

### ३.४.३२ कोळी –

कोळी जातीत दोन पोटभेद दिसून येतात ते साधे कोळी व डोंगरी कोळीही होते. यातही सोनकोळी व महादेव कोळी होते. उच्चवर्णीयांच्या घरी पाणी भरणे. मासे मारणे इ. धंदे करून पोट भरीत असत. कोळी म्हणजे एकूण ६ पोट जाती आहेत. उदा धुरिया, चौधरी, वारली कातकरी इत्यादी.[५१]

वरील जातीजमातीशिवाय सातारा शहरात जिनगर, नंदीवाले, शिकलगार, बेलदार, गवंडी, पिंजारी, हलालखोर, शिंपी, सनगर, कैकाडी, साळी, वंजारी, रामोशी, लोणारी वगैरे जाती असलेल्या दिसून येतात. हिंदू समाजात अतिशूद्र किंवा अस्पृश्य जात ही अस्तित्वात होती. या जातीला शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता, या जातीवर धर्मशास्त्रकारांनी निर्बंध व नियम घातले होते, या जातींना शिक्षणापासून वंचीत ठेवले जात होते, त्यामुळे ह्या जातीतील लोक परमेश्वराला देव मानत, या जाती समाजातील रूढी, परंपरा व अंधश्रध्दा यांनी चिकटून होत्या. अतिशूद्र जातीमध्ये महार, मांग, आणि चांभार या जातीचा समावेश होतो. समाजातील फार प्रतिचे , कनिष्ठ दर्जाचे , हीन दर्जाचे व निच कामे त्यांना करावी लागत असत.

### ३.४.३३ ख्रिश्चन धर्म

सातारा शहरात ख्रिश्चन धर्मिय लोक हे कॅथॉलिक पंथीय आहेत. सातारा जिल्हयात अमेरिकन मराठी मिशनचे काम इ.स.१८६४ मध्ये सुरू झाले. सातारा जिल्हयात ख्रिस्ती धर्माचे तत्वज्ञान आत्मसात करणारे लोक आढळतात. ख्रिस्ती धर्माची बैठक प्रेम, करूणा, सेवा या मुल्यांवर आधारलेली आहे. त्यांचे राहणीमान साधे असून चर्चमध्ये प्रार्थना करतात त्यांचे वेगळेपण म्हणजे ते मांसाहार मोठया प्रमाणात करीत होते.[५२]

सातारा शहरात ख्रिस्ती धर्माचे कॅथालिक चर्च अवर लेडी ऑफ हेल्थ चर्च सन १८९९ मध्ये रेव्हरंड ए.एस. लोबो यांनी बांधले आहे. मेरी, जोसेफ यांचे संगमरवरी पुतळे आहेत. त्यांचे मध्यभागी क्रॉस व येशु ख्रिस्ताचा पुतळा आहे. तसेच लेडी ऑफ हेल्थ हिचा पुतळा आहे. येशु

ख्रिस्ताचे जीवनावरील वेगवेगळे प्रसंग चित्रीत केलेल्या फोटो फ्रेमस लावलेल्या आहेत. दर रविवारी येथे प्रार्थना होते. श्री.स्मिथ यांनी अमेरिकन मराठी मिशनऱ्याच्या साहयाने हे चर्च बांधले.

रेव्हरंड नारायण वामन टिळक व सौ.लक्ष्मीबाई नारायण टिळक दांपत्याने अमेरिकन मराठी मिशन तर्फे ख्रिस्ती समाजाची भरपूर सेवा केली. त्यांचे वास्तव्य काही वर्षे सातारला होते. त्यांच्या सेवाकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी समाजाने या चर्चचे नामकरण टिळक मेमोरियल चर्च असे केले. या ठिकाणी मराठी भाषेत उपासना चालते.

सातारचे पूर्वीचे कलेक्टर सिरील जॉर्ज डॉडगसन यांचे स्मरणार्थ त्यांच्या येथील व परदेशीय मित्रांनी सन १९०१ मध्ये हे चर्च बांधले. इंग्लडमधील चर्च ॲगसीकन मिशनच्या रिवाजाप्रमाणे इथे इंग्रजी भाषेतून उपासना चालते. श्री. विल्यम बुथ यांनी स्थापना केलेल्या सॅलव्हेदान आर्मीचे चर्च सध्याच्या पोलीस परेड ग्राऊंडचे समोर आहे.

सातारा जिल्हयात अमेरिकन मराठी मिशनचे काम इ.स.१८६४ मध्ये सुरू झाले. सन १९४१ मध्ये ख्रिश्चनांची सातारा शहरातील लोकसंख्या १३० होती. त्यांचे राहणीमान साधे असून ते चर्चमध्ये प्रार्थना करीत शहरात त्यांच्या वस्त्या स्वतंत्र नसून सर्वत्र विखुरलेल्या परंतु साध्या झोपडीवजा होत्या. ख्रिश्चन स्त्रियांचा पोषाख चोळा व झगा असा होता. स्त्रिया चर्चला जाताना वर पांढरी वस्त्रे वापरीत तर पुरूष डोक्याला स्कार्फ आणि अंगावर ढगळा अंगरखा व कमरेला लुंगी वापरीत होते. त्यांचे राहणीमान साधे असून चर्चमध्ये प्रार्थना करीत असत. त्यांचे वेगळेपण म्हणजे ते मांसाहार मोठया प्रमाणात करीत होते. [५३]

### ३.४.३४ इस्लाम धर्म

कुराण हा इस्लाम धर्माचा पवित्र धर्मग्रंथ मानला जातो. या ग्रंथात महंमद पैंगबरानी परमेश्वराजवळ जाण्याचा दुःखापासून, पापापासून मुक्त होण्याचा आणि आदर्श जीवन जगण्याचा मार्ग कुराण ग्रंथात सांगितला आहे. सातारा शहरात इस्लाम धर्माचे लोक आहेत. मुसलमान व्यवसायानुसार पुढील पोटभेद आहेत. पठाण, मुगल, शेख, सय्यद, अत्तार कलाईगार, महावत, मणियार, नालबंद तसेच गुजरात व कच्छमधून आलेले बोहरा आणि मेहमान म्हैसूरमधून आलेले मुकरी व गायकसाब, बागवान, तांबोळी, धावड लोहार, धोंडफोडे गवंडी विटांचे बांधकाम करणारे, सोनाराकडील राख विकत घेऊन ती झारून त्यातून सोने व

चांदीचे कण गोळा करणारे झारस, मटण विकणारे बकर कसाब, विणकाम करणारे मोमीन, रेशीमकाम करणारे पटवेगार, कापुस पिंजणारे पिंजारी, रंगकाम करणारे रंगारी, हत्यारांना धार लावणारे शिकलगार, धोबी, हजाम आणि पखाली हे नोकरी करणारे तर नगारजी आणि गारूडी इत्यादी लोक होते. हे लोक उर्दू व मराठी भाषा बोलतात.[५४]

याशिवाय अत्तराचा व्यवसाय करणारे अत्तार, तांब्या पितळेच्या भांडयाना कलई करणारे कलाईगार, पूर्वी गाई कापणारे गायकसाब, गवंडी, गारूडयाचा खेळ करणारे गारूडी किंवा मदारी लोक, हिंदू व मुस्लिमांच्या विवाहप्रसंगी वाद्य वाजविणारे नगारजी, घोडे ब बैलांना नाला मारण्याचे काम करणारे नालबंद, पितळी भांडी तयार करणारे तांबट, शिवाजी महाराजांच्या काळात धावड लोखंडापासून हत्यारे तयार करणारे धावड, सातारा शहरात लॉंड्री व कपडे धुण्याचे काम करणारे धोबी, खाणीतील दगडी फोडणारे तसेच पाटे व वरवंटे बनविणारे धोंदफोडे किंवा टकार, पूर्वी बेलांच्या पाठीवरून चामडयांच्या पिशव्यातून पाणी नेऊन मुसलमान, ख्रिश्चन व हिंदू लोकांना पाणी पुरवणारे पखाली, रेशमी धागे तयार करणारे पटवेगार, लोकरीची व कापसाची पिंजाई करणारे पिंजारी, नगदी बागायती पिके घेणारे बागवान, बांगडया विकणारे मण्यार, पूर्वी हत्ती हाकण्याचे काम करणारे महावत, पिरांना पाणी घालणारा मुजावर, देवासाठी बळी दिले जाणारे बकरे कापण्याचे काम करणारा मुलानी, व्यापार करणारे मेमन, विणकाम करणारे मोमीन, सूत व कपडे रंगविन्याचा व्यवसाय करणारे रंगारी लोक मजुरी करून पोट भरणारे हज्ञाम लोक सातारा शहरात आढळतात.[५५]

सातारा जिल्हयात इस्लाम धर्मियांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. त्यामुळे सर्व शहरात व खेडयात मशिदी आहेत. सातारा शहरातील मशिदी पुढीलप्रमाणे आहेत. खतिबा मशीद, शाही मशीद, हेडक्वार्टर मशीद, खड्डा मशीद, पोवई नाका मशीद, बेगम मशीद, शनिवार मशिद, सदर बाजार मशीद, गुरूवार परज खाटिक मशीद, मंगळवार खाटिक मशीद या मशीदी आहेत. या मशीदींचा उपयोग मुस्लिम बांधवांना नमाज पढण्यासाठी होतो. मुस्लिम लोक सण व उत्सवाच्यावेळी या मशिदीत एकत्र जमत असतात.[५६]

### ३.४.३५ जैन

जैन लोकात श्वेतांबर व दिंगबर हे दोन पोटभेद आहेत. सातारा जिल्हयात जैन लोक कानडी व मराठी भाषा बोलतात. जैन लोक हे वर्धमान महावीरास मानतात. काही जैन लोक शेती करणारे शेतकरी होते. बहुतांशी जैन लोक काही व्यापार व दुकानदारी करतात.[५७]

सातारा शहरात ३४, सदाशिव पेठ, खणआळी येथे जैन श्वेतांबर पार्श्वनाथ मंदिर इ.स.१८५० मध्ये बांधलेले आहे. हे मंदिर दुमजली संगमरवरी असून त्यामध्ये जैन तिर्थकर कुथुनाथ भगवान ही मुख्य मूर्ती आहे. जैन धर्माचे पहिले तीर्थकर श्री.आदिनाथ यांचीही मूर्ती त्या मंदिरात आहे. तसेच सन १८२५ मध्ये ७१ रामाचा गोट येथे पार्श्वनाथाचे मंदिर बांधलेले आहे. यावरून जैन धर्माविषयीच माहिती मिळते.[५८]

### ३.४.३६ शीख धर्म

शीख धर्माने ईश्वराच्या एकतेवर भर दिला आहे. हिंदू धर्माप्रमाणेच शीख धर्मात आत्मा, शरीर, पुनर्जन्म, मोक्ष या धर्माचे तत्वज्ञान आचरणारे लोक सातारा शहरात आढळतात.

### ३.४.३७ पारशी धर्म

भारताप्रमाणे महाराष्ट्रात व साताऱ्यातही पारशी धर्माचे लोक राहतात. परंतु इतर धर्मियांपेक्षा त्यांची संख्या कमी आहे. २ जुलै १९९१ रोजी ईश्वराची स्थापना म्हणजे अग्नी प्रज्वलन या आगियारीत झाले. नवजाबाई दिनशाहजी खान आगियारी अशा नावाने पारशी समाजात ही आगियारी ओळखली जाते. कारण त्यांनीच ती सन १९११ मध्ये बांधलेली आहे.[५९]

अशाप्रकारे सातारा जिल्हयात अनेक धर्माचे लोक एकत्र राहत आहेत. हे लोक आपापले सण व उत्सव साजरे करीत आहेत. या लोकांचे धार्मिक श्रद्धास्थान हे भिन्न असले तरी हिंदू धर्माशी मिळते जुळते होऊन जीवन जगताना दिसतात. काही इतर धर्मीय हिंदू समाजातील सण व उत्सव साजरे करीत असताना दिसतात.

## ३.५ सातारा शहरातील लोकसंख्येचा आराखडा

सातारा शहराची लोकसंख्या (१८७२ ते १९४१)

| अ.नं | वर्ष | लोकसंख्या |
|---|---|---|
| १. | १८७२ | २४,४८४ |
| २. | १८८१ | २८,६०१ |
| ३. | १८९१ | २४,६०१ |
| ४. | १९०१ | २६,०२२ |
| ५. | १९११ | १९,१४५ |
| ६. | १९२१ | २२,४५४ |
| ७. | १९३१ | २६,३१९ |
| ८. | १९४१ | ३६,४०५[६०] |

भारतात इ.स.१८७१ पासून जनगणना सुरू झाली. सातारा शहराची जनगणना इ.स.१८७२ साली करण्यात आली. त्यावेळी ती २४,४८४ होती. ही लोकसंख्या दहा वर्षानी म्हणजे सन १८८१ मध्ये जवळजवळ ४ हजारापेक्षा जास्त वाढलेली आहे. परंतु सन १८९१ मध्ये ही लोकसंख्या इ.स.१८७२ एवढी पुर्ववत झाली. मात्र सन १९११ मध्ये ही लोकसंख्या बरीचशी घटली होती. ती १९,१४५ झाली होती. याचे कारण त्या वर्षी दुष्काळ पडला असून साथीचे आजार पसरले होते. त्यामुळे लोकसंख्या घटली होती. इ.स.१९२१ पासून ही लोकसंख्या दरदहा वर्षानी सातत्याने वाढत गेलेली दिसून येते. इ.स.१९४१ मध्ये ही लोकसंख्या ३६,४०५ एवढी झालेली दिसून येते.

## ३.६ सातारा शहरातील लोकसंख्येची धर्मनिहाय विभागणी, १९४१.

| एकुण लोकसंख्या | हिंदू | मुसलमान | बौध्द | जैन | ख्रिश्चन | शीख | इतर धर्म | धर्म न सांगितलेले |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३६,४०५ | २९,४१३ | ४,२७७ | १०१५ | ७४२ | ६३८ | – | ७८ | १४२[६१] |

## ३.६.१ सन १९४१ मधील खानेसुमारीचेवेळी उपलब्ध झालेली माहिती

| अ.न. | इतर माहिती | संख्या | |
|---|---|---|---|
| १. | शहरांतील एकूण राहती घरे | ५६४१ | |
| २. | शहरातील एकूण कुटुंबे | ८१८५ | |
| ३. | घरे नसलेले व संस्थातील लोक | पुरूष | स्त्रिया |
| | | ३०१ | ६८ |
| ४. | शिक्षित लोक | ११११०४ | ६२४३ |
| ५. | स्वतःची जमीन स्वतः करणारे लोक व त्यांचेवर अवलंबून असणारे लोक | ७१३ | ६६४ |
| ६. | दुसऱ्याची जमीन करणारे लोक व त्यांचेवर अवलंबून असणारे लोक | ७६ | ६६ |
| ७. | शेतीवर मजूरी करणारे लोक | १०६ | ८७ |
| ८. | जमिनीचे उत्पन्नावर व घराचे भाडयावर अवलंबून राहणारे लोक | ४९९ | ४६१ |
| ९. | व्यापार करणारे लोक | ४२४५ | ४१०३ |
| १०. | वाहतुकीचे व्यवसायातील लोक | ६६६ | ६७४ |
| ११. | शेती खेरीज इतर व्यवसाय करणारे लोक | ३४२१ | ३३४७ |
| १२ | इतर नोकऱ्या व उत्पन्नावर असणारे लोक | ९९०५ | ९४४८[६२] |

## ३.७ सन १९४१ च्या जनगणनेनुसार सातारा शहरातील पेठवार लोकसंख्या

| अ.नं. | पेठेचे नाव | पुरूष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | चिमणपुरा | २९९ | २९४ | ५९३ |
| २. | व्यंकटपुरा | ६५५ | ६१५ | १२७० |
| ३. | रामाचा गोट | ८४० | ८०३ | १६४३ |
| ४. | मंगळवार | १७८३ | १५३० | ३३१३ |
| ५. | यादोगोपाळ | १३९४ | १४५९ | २८५३ |
| ६. | भवानी | ७९० | ७८५ | १५७५ |
| ७. | सोमवार | १३६० | १२६० | २६२० |
| ८. | माची | १४२ | १२९ | २७१ |
| ९. | सदाशिव | ५४८ | ४९२ | १०४० |
| १०. | प्रतापगंज | ५६६ | ६३४ | १२०० |
| ११. | बुधवार | ५८० | ५९० | ११७० |
| १२. | शुक्रवार | ५६५ | ४९० | १०५५ |
| १३. | शनिवार | ४१९५ | २९१५ | ७११० |
| १४. | गुरूवार | १७१० | १८२९ | ३५३९ |
| १५. | दुर्गा | १७० | १३५ | ३०५ |
| १६. | मल्हार | १७५० | १५७५ | ३३२५ |
| १७. | राजसपुरा | ८१ | ८७ | १६८ |
| १८. | पंताचा गोट | २७० | २५१ | ५२१ |
| १९. | रविवार | ५०१ | ४१२ | ९१३ |
| २०. | केसरकर | २४० | ३०४ | ५४४ |
| २१. | बसाप्पा | ९९ | ८७ | १८६ |
| २२. | करंजे | ८०२ | ८५५ | १६५७ |
| २३. | रघुनाथपुरा | २४५ | २९९ | ५४४ |
| | एकूण | १८,५६५ | १७,८४० | ३६,४०५[६३] |

## ३.८ पोशाख

सातारा शहरात जातीनिहाय वेगवेगळे पोषाख परिधान करत असल्याचे दिसते. त्यामध्ये गोसावी लोक भगवी वस्त्रे, काखेत झोळी, डोक्याला मुंडासे व हातात काठी घेत असत. नंदीवाले लोक अंगात अंगरखा,कमरेला झेल्यासारखा गुंडाळलेला पंचा, डोक्याला लाल रंगाचा फेटा परिधान करत असत. मराठा लोकांचा पोषाख हा डोक्याला पागोटे किंवा पटका, अंगात

बाराबंदी अथवा सदरा व कमरेस धोतर आणि अंगावर उपरणे असा पोषाख करत असत. तर स्त्रीया उंची लुगडे व चोळी घालत असत. काही स्त्रिया सहावारी पातळ व चोळी घालत असत. रामोशी लोक धोतर सदरा गळयात काळया दोऱ्यात ओवललेले ताईत, कानात बाळया व एका हातात चांदीचे कडे घालीत असत. स्त्रिया नऊवारी हातमागाचे लुगडे व चोळी वापरतात.

मुसलमान लोक अंगावर शेरवानी, पैजामा, चुडीदार पैजामा, सलावार, लुंगी, शर्ट आणि ठराविक बांधणीची लांबट किंवा गोल टोपी हे पुरूषांचे जास्त प्रमाणात दिसतात. तर स्त्रिया अंगात चोळी ब्लाऊज घालतात व गोल साडी नेसतात. त्या डोक्यावरून साडीचा पदर घेऊन त्यावरून बुरखा घेतात. बोहरा स्त्रिया मात्र घागरा, चोळी किंवा ब्लाऊज व ओढणी असा पोषाख करतात. बोहोरा पुरूष डोक्याला मोठे सैल पागोटे, उंचशी गोल टोपी, अंगात बंडी किंवा अंगरखा व सैल विजार घालतात.[६४]

मराठा काळात हिंदु लोकांची वेशभूषा एकसारखीच होती. परंतु आर्थिक परिस्थितीनुसार कापडाच्या प्रतीमध्ये थोडाफार फरक असे. श्रीमंत माणसे घरी सदरा आणि उपरणे वापरीत असत. तर घराबाहेर जाताना सदरा, कोट व पागोटे असा पेहराव करीत असत. स्त्रिया घरात किंवा घराबाहेर रंगीत साडी, पोलके व कपाळावर कुंकू लावीत असत. श्रीमंत लोक तलम, सुताचे, रेशमी, पॉलिस्टर व कृत्रिम धाग्याचे कपडे व पटके वापरतात. स्त्रिया रेशीमकाठी, जरीकाठी, साडया अथवा लुगडी वापरतात. मराठा काळात पुरूष धोतर, चोळणा, लंगोटी, लेंगा, चड्डी, पंचा, सदरा, बाराबंदी, तुमान, पायजामा, सलवार, उपरणे, शेला, बंडी, कुडते, कोपरी, कबजा, अंगरखा, डगला, शेरवानी हे अंगात घालण्याचे कपडे वापरीत असत. डोक्याला टोपी, पागोटे, पगडी, मुंडासे, रूमाल व पटका घालीत असत. यातील पुष्कळ वस्त्रांचा व शिरस्त्राणांचा आता लोप झालेला आहे. सध्या टोपी व फेटा हे प्रचलित आहे. धोतर व सातारी शेमल्याचे फेटे घालत असत. शेतकरी आणि मजूर वर्गाचे कपडे जाडेभरडे आहेत. शेतकरी लोक पंचा, कबजा, सदरा व पायात वाहना वापरतात. पावसाळयात व हिवाळयात त्यांच्याजवळ घोंगडी असते. मध्यम वर्गातील लोक धोतर व सदरा वापरतात. शाळेतील मुले गांधी टोपी घालतात. प्रौढ स्त्रिया नऊवारी लुगडे, पाठ व पोट झाकणारी कोपरापर्यत पोहोचणारी खणाची चोळी असा पोशाख घालत असत. लहान मुलांना आंगडे, टोपडे, झबले, कुचळे किंवा कुंची घालत असत. तीनचार वर्षांच्या मुलांना चड्डी, तुमान, चोळणा व सदरा

घालत असत. मुलींना परकर व झगे घालतात. आठदहा वर्षाची मुले चड्डी, पैरण व पँट वापरतात. तर मुली फ्रॉक व लहान साडया वापरत असत.[६५]

## ३.९ अलंकार व दागदागिने

सातारा शहरात अलंकारात अलंकार वापरण्यात विविधता आढळते. स्त्रिया या सोन्याचे तसेच क्वचित हिरे, माणके गुंफलेले दागिने वापरतात. कानात चौकडी व कुडया मोत्याच्या घालतात. पायात तोडे व साखळया चांदीच्या वापरतात. स्त्रीया गळयात मंगळसूत्र चंद्रहार, जोंधळी पोत, बकुळी हार, पोहेहार, मोहनमाळ, बोरमाळ, पुतळयांची माळ, कोल्हापुरी साज इत्यादी दागिने घालतात. याशिवाय वज्रटीका, एकदाणी, सरी, तन्मणी, लफ्फा, पोत व पेंडे हेही रत्नमोत्याचे दागिणे वापरतात. हातात निरनिराळया बांगडया व पाटल्या घालतात. मोती व हिरे यांनी जडवलेल्या बांगडया श्रीमंत स्त्रिया वापरतात. नथ, मुरणी, फुली व मुगवट(चमकी) हे नाकात घालण्याचे दागिणे आहेत. काही पुरूषांमध्ये भिकबाळी, पोची, गोफ किंवा कंठा वापरताना आढळतात. अनेक पुरूष हाताच्या बोटात आंगठया वापरतात. याशिवाय गळयात सोन्याची चैन, हातात कडी वापरताना दिसतात. लहान मुलांना कडीतोडे, वाळे, तोरडया, साखळया, बिंदल्या, मनगटया, चाळ व चांदीचे करगोटे वगैरे घालतात.[६६]

## ३.१० भाषा

सातारा शहरातील मराठी ही प्रमुख भाषा आहे. त्याखालोखाल दुसऱ्या क्रमांकावर उर्दू भाषा बोलली जात होती. तर हिंदी भाषा बोलणाऱ्यांचा तिसरा क्रमांक असून एकूण लोकसंख्येच्या १.६८ टक्के लोक हिंदी भाषा बोलतात. याशिवाय कन्नड, तेलगु आणि गुजराथी या भाषाही बोलल्या जातात. सातारा शहरात बोलल्या जाणाऱ्या भाषांची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी पुढीलप्रमाणे सांगता येईल.

| अ.नं. | भाषा | एकूण लोकसंख्येशी टक्केवारी |
|---|---|---|
| १. | मराठी | ८२.०५ |
| २. | उर्दू | ८.३० |
| ३. | हिंदी | ५.३२ |
| ४. | बंगाली | अत्यल्प |
| ५. | गुजराथी | १.४९ |
| ६. | कन्नड | १.०६ |
| ७. | मल्याळम | ०.१३ |
| ८. | तेलगु | १.१२ |
| ९. | ओरिया | अत्यल्प[६७] |

## ३.११ घरे

सातारा शहरात स्वातंत्र्यपूर्व काळात सरदार, जहागीरदार व इनामदार लोकांचे वाडे दुमजली, चौक असलेले, कौलारू आणि भाजलेल्या विटाचे अथवा दगडी भिंतीचे होते. पाळीव प्राणी बांधण्याकरीता मागील बाजूला गोठा असे. घरासमोर तुळसी वृंदावन होते. मोठा दिंडी दरवाजा व देवडी अशी रचना होती. श्रीमंत लोकांची घरे दुमजली होती. त्यात चौक, ओटा, पडवी, भोजनगृह, स्वयंपाक घर, देवघर, स्नानगृह, कोठीघर, शयनगृह, अतिथीगृह असे प्रकार होते.

सातारा शहरात मध्यम वर्गीयांची घरे ही प्रामुख्याने भाजलेल्या विटांच्या भिंती व कौलारू छपरांची होती. सातारा शहरातील गरीब व भटक्या लोकांची घरे कापडाचे लहान तंबू अथवा गवताचे पाल आणि बांबूच्या कामटयापासून तयार केलेली होती.[६८]

## ३.१२ आहार

सातारा शहरातील शेतकरी, कारागीर व इतर श्रमिक वर्गाच्या रोजच्या भोजनात ज्वारी, बाजरी, गहू व भात यांचा वापर केला जातो. भाकरीबरोबर भाज्या, कांदे, ठेचा, डाळ रोजच्या आहारात घेतात. सण–उत्सवाच्यावेळी ते पुरणपोळी करतात. ब्राह्मण जैन व लिंगायत लोक लोक सोडून इतर सर्व जाती–जमातीचे लोक मांसाहारी असले तरी त्यांच्या रोजच्या जेवणात मांसाहार नसतो. गरीब लोक सणासुदीस मांसाहार करतात. सकाळी न्याहारीला पोहे, शिरा, दुध व चहा घेतात. श्रीमंत लोक आहारात गव्हाची चपाती, वरण, भात, तूप, भाजी, लोणचे व पापड इत्यादी पदार्थ असतात. मध्यम वर्गियात भाकरी, भात व आमटीचा समावेश असतो.

धार्मिक उत्सवाप्रसंगी मेजवानीत कुवतीनुसार पुरणपोळी, शिरा, जिलेबी, लाडू यापैकी एखादे मिष्टान्न व आमटीभात, भाजी या पदार्थाचा वापर करतात. मुस्लिमांच्या धार्मिक कार्याच्या प्रसंगी मांसाहारी जेवण असते.[६९]

## ३.१३ उपनयन(मुंज)

हा सोळा संस्कारापैकी एक संस्कार होता. ब्रह्मचर्याश्रमाला म्हणजे विद्याभ्यासाला प्रारंभ करण्याचा संस्कार म्हणजे उपनयन संस्कार होय. मुलाने आठव्या वर्षी गुरूगृही जाऊन बारा वर्षे ज्ञानार्जन करावे ही त्यामागील कल्पना आहे. सातारा शहरातील उच्चवर्णीय लोक हा संस्कार खास मुहूर्त साधून समारंभपूर्वक साजरा करतात. या समारंभासाठी घरासमोर मंडप घालून त्यात बोहले तयार करतात. मुहूर्ताची वेळ झाल्यानंतर हा संभारंभ पार पाडला जातो. मुलाला उपनयन विधीसाठी सिद्ध करण्यात येते. बोहल्यावर एका पाटावर बटूला व दुसऱ्या पाटावर त्याच्या पित्याला समोरासमोर उभे करून त्यांच्यामध्ये आंतरपाट धरतात. इष्टमित्र व उपाध्याय केवळ मुंज या विधीसाठीच असलेली मंगलाष्टके म्हणून मंगलअक्षता टाकतात. नंतर आंतरपाट काढून घेतला जातो. नंतर पिता मुलाला आपल्या उजव्या मांडीवर बसवितो. जमलेल्या लोकांना अत्तर, गुलाब, पानसुपारी व नारळ देण्यात येतो.

त्यानंतर उपनयन विधी सुरू होतो. उपाध्याय व इतर ब्राम्हण बटूच्या मस्तकावर मंगलअक्षता टाकून त्याला व त्याच्या पित्याला पाटावर बसवितात. मुलाला लंगोटी व पंचा असा पोशाख घालतात. मुलाच्या गळयात हरणाचे कातडे एका सुतळीत गुंफून अडकवितात. धृत व समिधा होमात टाकतात. मुलगा होमाभोवती फिरतो त्यावेळी ब्राह्मण मंत्रोच्चार करतो. मुलगा उपाध्यायाला नमस्कार करून विनंती करतो की, मला ब्रह्मचर्याश्रमाची दीक्षा द्यावी. आचार्य त्यांची विनंती मान्य करतो. त्याला यज्ञोपवित व दंडा देतो आणि विद्या संपादन करण्यासाठी काय केले पाहिजे? ते सांगतो. त्याला सुर्यदर्शन करवितात व गायत्रीमंत्र शिकवितात. शेवटी ब्राह्मण त्याला आशीर्वाद देऊन हा धार्मिक विधी संपवितात. गुरूगृही बारा वर्षे राहून विद्याभ्यास संपवून गृहस्थाश्रमाची दीक्षा घेण्यासाठी करण्याचा जो विधी असतो. त्यास समावर्तन किंवा सोडमुंज असे म्हणतात. परंतु सध्या उपनयनानंतर दोनचार दिवसाचा विधी उरकून घेतात. बटूला नवा पोशख, छत्री व पादत्राणे देतात व काशीयात्रेला जाण्याचा तो बहाणा करतो. परंतु त्याचा मामा त्याला अडवितो व गृहस्थाश्रम स्वीकारण्यास विनंती करतो.[७०]

## ३.१४ विवाह

विवाह या संस्कारास समाजात धार्मिक महत्त्व आहे. स्त्रीपुरूष, पतीपत्नी या नात्याने एकत्र आणण्याचा कार्यक्रम म्हणजे विवाह सोहळा होय. हा विवाह सोहळा पाच दिवस चालत असे. सातारा शहरात थाटामाटात विवाहविधी करण्याची प्रवृत्ती आढळते. हिंदू धर्मातील सर्व जातीमधील महत्त्वाचा विवाहविधी जवळपास सारखाच आहे. विवाह विधी वैदिक तसेच पौराणिक पद्धतीने करतात. विवाहप्रसंगी वधू पक्षाकडून वर पक्षाला हूंडा देण्याची प्रथा होती. या समारंभात दागदागिने भेट दिले जात होते. तर काही जातीमध्ये वराकडून वधूला हूंडा दिला जात होता. विवाहविधी हा पुरोहित पार पाडत असे. प्रत्येक जातीजमातीमध्ये विवाह विधीमध्ये फरक असल्याचे दिसून येत होते.

## ३.१५ अंत्यसंस्कार

सातारा शहरात विविध धर्मानुसार अंत्यसंस्कार विधी करीत होते. हिंदू लोक प्रेताचे दहन करतात. हिंदूमध्ये त्याचा मुलगा डोके आपल्या मांडीवर घेऊन त्याच्या मुखात गंगाजल व तुलसीपत्र घालतो. मृतास स्नान घालून पांढरे कापड नेसवून बांबूच्या तिरडीवरून स्मशानात नेतात. त्यावेळी हिंदू रितीरिवाजाप्रमाणे मृताचा थोरला मुलगा ते प्रेत नेत असताना हातात मडके घेऊन पुढे चालत असतो. स्मशानात प्रेत गेल्यानंतर तो मुलगा पाण्याने भरलेले मडके खांद्यावर घेऊन त्या चितेस तिन प्रदक्षिणा घालतो. तो प्रदक्षिणा घालत असताना त्या मडक्यास छिद्र पाडले जाते व शेवटच्या प्रदक्षिणा झाल्यानंतर तो मुलगा मडके खाली सोडून मोठयाने आक्रोश करतो. स्मशानात गोवऱ्या किंवा लाकडे यामध्ये त्या प्रेतास अग्नी देतात. ज्या दगडाने त्या मडक्यास छिद्र पाडले जाते तो दगड संपूर्ण विधी होईपर्यंत जपून ठेवला जातो. तिसऱ्या दिवशी अस्थी मडक्यात ठेवून बाकीच्या अस्थी व रक्षा पाण्यात विसर्जित केली जाते. दहाव्या दिवशी पिंडदानाचा कार्यक्रम होतो. तेराव्या दिवशी श्राद्ध करतात व सर्वांना जेवण घालतात. नंतर दरवर्षी मुृत्यू तिथीला श्राद्ध व भाद्रपदाच्या वद्य पक्षात मृत्यूतिथीला पक्षश्राद्ध करतात.

मुसलमान धर्मात मरत व्यक्तीच्या तोंडात सरबत किंवा मक्केच्या पवित्र विहिरीचे पाणी घालतात. नंतर त्यास स्नान घातल्यावर शरीरास सुंगधी द्रव्ये लावतात. त्या मरत व्यक्तीच्या शरीरावर 'अल्ला हा एकमेव देव आहे व मुहम्मद त्याचा प्रेषित आहे.' असे मौलाना त्या प्रेताच्या छातीवर व कपाळावर लिहितो. हे प्रेत पांढरे वस्त्र गुंडाळून शवपेटीतून नेतात. नंतर कबरीत

त्या प्रेताचे तोंड मक्केकडे करून ठेवून प्रेतावर सर्वजण माती टाकतात. त्यावेळी ‘तू मातीतून निर्माण झाला आहेस, मातीतच मिळून जात आहेस व अंतिम निवाडयाच्या दिवशी तुला मातीतूनच उठविण्यात येईल.’ अशा अर्थाचा मंत्र म्हणतात. दफनानंतर मुल्ला, मौलवी कुराण ग्रंथ वाचतात. दहाव्या व बाराव्या दिवशी मृताच्या नावाने स्मृतीसाठी मेजवान्या देतात.विसाव्या व चाळीसाव्या दिवशी एका मोठय तबकात पक्वान्ने ठेवून त्याच्यापुढे धूप जाळून मृताच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून प्रार्थना करतात.[७१]

## ३.१६ स्त्रीजीवन

तात्कालिन काळात सातारा शहरात समाजातील स्त्रियांची परिस्थिती एकंदरीत दयनीय होती. स्त्रिया या सर्व बाबतीतच कमी दर्जाच्या मानल्या जात होत्या. बालविवाहाची चाल सर्रास रूढ होती. मुलीचे लग्न आठवे वर्षे संपण्याच्या अगोदर उरकले जाई. अर्थात मुलाचे लग्नही साधारणपणे बाराव्या तेराव्या वर्षी होत असे. परंतु एकापेक्षा अधिक विवाह करण्याची पद्धत त्या काळी रूढ असल्यामुळे दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या विवाहाच्यावेळी वराचे वय वाढलेले असे. मुलीचे वय मात्र नऊ वर्षाच्या आसपास असे. प्रतिष्ठित लोकही अनेक विवाह करतीत असत. किंबहुना बहुविवाह करणे हे प्रतिष्ठेचे मानले जात होते. श्रीमंत लोक आपल्या पदरी कुणबिणी किंवा बटकी बाळगत असत. गरीब लोक व्यंग असलेल्या मुली लहानपणीच दलालाना विकत असत. त्याच मुली मोठया झाल्यावर कुणबिणी म्हणून विकल्या जात होत्या. नायकिणीचा व्यवसाय करणाऱ्या अनेक स्त्रिया त्या काळात होत्या. त्या नृत्यगायन पेशा करून चरितार्थ चालवित असत.

स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. मात्र उच्चकुलीन स्त्रियांना शिक्षण दिले जात होते. तसेच या स्त्रिया राजकारणातही भाग घेत असत. सर्वसामान्य समाजातील स्त्रियांना शिक्षण दिले जात नव्हते. या स्त्रिया कुटुंबाचा चरितार्थ चालावा म्हणून कुटुंबातील पुरूषांबरोबर कष्टाची कामे करीत असत. स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रिला फक्त ‘चुल आणि मूल’ एवढाच अधिकार असलेला दिसून येतो.[७२]

## ३.१७ धार्मिक श्रद्धा व चालीरीती

धार्मिक बाबतीत पौराणिक देवदेवताचे माहात्म्य या काळात वाढलेले दिसते. व्रतवैकल्य आणि धार्मिक कल्पनांचा प्रभाव लोकांच्यावर पडलेला होता. सातारा शहरातील हिंदू, जैन,

वाणी, लिंगायत, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी लोकांचे आपल्या घरात जातीधर्माप्रमाणे देव असत. ख्रिश्चन लोक चर्चमध्ये प्रार्थना करत. मुस्लिम लोक शहरातील मशिदीमध्ये नमाज पडत. वाणी लोक, शिव, राम, विठोबा देवाची पूजा करीत. हिंदू लोक विठ्ठल, मारूती, गणपती, मुरलीधर, दत्त लक्ष्मीनारायण वेताळ, शंकर यांची पूजा करीत असत. सातारा शहरात हिंदु धर्मियाची सुमारे २०० मंदिरे होती. मुसल्मान धर्मियांच्या तीस मसिदी, ख्रिश्चनांची चार चर्च, जैन लोकांची तीन, पारशी एक व विश्वसमाज धर्माचे बहाई भवन अशी प्रार्थना स्थळे होती.[७३]

व्रते, दान, अनुष्ठाने व तुला केल्याने ईश्वराची व ग्रहांची कृपा हो असी समजूत होती. संकट आले तरी ते प्रयत्नापेक्षा मंत्र–तंत्राने दूर करण्याचे धडपड चालत असे. अनुष्ठानावर तत्कालिन समाजाचा कमालीचा विश्वास होता. महामारीचे अनुष्ठान, प्रदक्षिणेचे अनुष्ठान, पर्जन्यासाठी अनुष्ठान अशा प्रकारची अनेक अनुष्ठाने केली जात व त्यावर खर्च ही केला जात असे. ग्रहण हे अरिष्ठ समजले जाई. ग्रहणाच्या अगोदर व नंतर चार दिवस प्रवास वर्ज्य मानला होता. ग्रहणप्रसंगी आपल्यावर ग्रहांचा कोप होऊ नये म्हणून प्रतिष्ठित लोक स्वतःची तुला करून दान करीत असत. तसेच उच्च लोक सणवार ग्रहणे पर्वकाळ अशा प्रसंगी मोठया प्रमाणावर दानधर्म करीत असत. ब्राम्हणभोजनेही त्या काळात घातली जात होती.[७४]

## ३.१८ मुहूर्त

सातारा शहरात धर्मभोळे लोक मुहूर्त पाहूनच कोणतेही मोठे कार्य करीत असत. मुहूर्त काढणाऱ्या जोतिषाला दोष देत. मुहूर्त सांगणाऱ्या जोश्यांचा धंदा या काळात चांगलाच भरभराटीस आलेला होता. जोतिषाने काढलेल्या शुभ मुहूर्तावर एखाद्या कार्यास यश मिळाले तर त्या जोतिषास मोठे बक्षीस दिले जात असे. विवाह करण्यासाठी, नाव ठेवण्यासाठी, दत्तक घेण्यासाठी, गृहप्रवेशासाठी मुहूर्त पाहिला जात असे. लोकांचा ज्योतिषावर विश्वास होता.[७५]

## ३.१९ सण व उत्सव

सातारा शहरात लोक दरवर्षी अनेक सण साजरे करीत असत. हिंदू लोक गुढीपाडवा, रामनवमी, दसरा, दिवाळी, मकरसंक्रांत, होळी, शिवरात्र, गोकुळाष्टमी, नारळी पौर्णिमा व गणेश चतुर्थी इत्यादी सण साजरे केले जातात.

### ३.१९.१ गुढीपाडवा

चैत्र शुद्ध प्रतिपदा या शालिवाहन शकाच्या नववर्ष दिनी रामाने चौदा वर्षे वनवास अअणि लंका विजय मिळवून याच दिवशी अयोध्येत प्रवेश केला अशी कथा रूढ आहे. या दिवशी घराच्या दाराशी वेळूच्या काठीवर एखादे नवीन वस्त्र, चांदीचा किंवा अन्य धातूचा व फुलांची माळ घालून ती गुढी उभारतात. गुळ, चणे व कडुनिंबाच्या झाडाच्या पानांचे मिश्रण कुटुंबातील सर्व मंडळी भक्षण करतात. या शुभदिवशी नवीन कामाचा आरंभ करतात. वर्षातील साडेतीन मुहूर्तांपैकी हा एक शुभमुहूर्त मानला जातो. यादिवशी घरोघरी पुरणपोळीचे जेवण करतात.

### ३.१९.२ रामनवमी

चैत्र शुद्ध नवमीला दुपारी बारा वाजता राममंदिरात रामजन्मोत्सव साजरा करत. त्यावेळी रामाला पाळण्यात घालून कीर्तनकार आईची भूमिका बजावुन त्याला झोके देत असे. सर्व भक्तंन सुंठवडा व तीर्थप्रसाद देण्यात येत असे.

### ३.१९.३ गौरीपूजा

चैत्रशुद्ध तृतीयेपसून वैशाख शुद्ध तृतीयेपर्यत कोणत्याही सोयीस्कर दिवशी ब्राम्हण सुवासिनी मोठया थाटात गौरीपूजा करतात. त्यावेळी स्त्रियांना हळदीकुंकू लावण्यासाठी बोलावत असत. गौरीसमोर मोठी सजावट करत असत. अक्षयतृतीया हाा दिवशी हळदी कुंकूवाचा शेवटचा दिवस असे. यानंतर गौरी आपल्या माहेरी जाते अशी लोकांची समजूत असे.

### ३.१९.४ बसवजयंती

वैशाख महिन्यात शैवपंथीय लिंगायत लोक बसवजयंती साजरी करतात.

### ३.१९.५ अक्षयतृतीया

हिंदू लोक अक्षयतृतीया हा सण साजरा करतात. हा सण वैशाख शुद्ध तृतीयेस येत असून साडेतीन मुहूर्तांपैकी अर्धा मुहूर्त समजतात. या दिवशी पितराची पूजा करून कलश दान देतात. शेतकरी कामाचा शुभारंभ या दिवशी करतात.[७६]

### ३.१९.६ वटपौर्णिमा

ज्येष्ठ महिन्यात हिंदू लोक वटपौर्णिमा हा सण साजरा करतात. या दिवशी हिंदू स्त्रिया उपवास करून वडाची पूजा करतात.

### ३.१९.७ आषाढी एकादशी

या महिन्यात आषाढ शुद्ध एकादशीला वारकरी पंथाचे लोक उपवास करतात. विठोबाच्या दर्शनासाठी पंढरपूरला जातात.

### ३.१९.८ बेंदूर

बेंदूर हा सण याच महिन्यात साजरा केला जातो. बेदूर सणाच्या आदल्या दिवशी बैलांना बाजरीच्या पीठाचे उंडे खाण्यास देतात. रात्री बैलांची मान तेल हळदीने मळतात. यास खांदामळणी म्हणतात. बेदंराच्या दिवशी सकाळी बैलांना नदी किंवा ओढयावरून धुवून आणून त्यांच्या अंगावर निरनिराळया रंगाचे छाप किंवा विविध प्रकारची नक्षी काढतात. शिंगे रंगवितात. शिंगाना बेगडीचे कागद, पताका लावतात. बैलाच्या कपाळावर बाशिंग लावून पाठीवर झूल घालतात. ही बैले गटागटाने वाजतगाजत त्यांचि मिरवणूक काढतात. त्यानंतर बैलाची व त्यांच्या मालकाची घरी ओवाळणी करतात व बैलास पुरणपोळीचा नैवद्य खाण्यास देतात.

### ३.१९.९ श्रावण

या महिन्यात हिंदू लोक अनेक उपवास, उत्सव व व्रते करतात. या महिन्यातील सोमवारी शिवभक्त उपवास करतात. नववधू शिवामूठ वाहतात. या महिन्यात मांस व मासे खाणारे लोकही केवळ शाकाहार करतात.

### ३.१९.१० नारळी पौर्णिमा

श्रावण शुद्ध पौर्णिमेला नारळी पौर्णिमा साजरी करतात. या दिवशी नदी किंवा तलावात नारळ अर्पण करतात. यजुर्वेदी किंवा अथर्ववेदी या दिवशी उपाकर्म म्हणजे श्रावणी करीत. सातरारा शहरातील कुणब्यांमध्ये हा दिवस पोवत्याची पौर्णिमा म्हणून ओळखला जातो. कापसाचे सूत काढून त्यास हळद लावून स्त्री पुरूषांच्या गळयात बांधत असत.

### ३.१९.११ गोकुळाष्टमी

श्रावण वद्य अष्टमीला श्रीकृष्ण जन्माप्रित्य्थ जन्माष्टमी किंवा गोकुळाष्टमी साजरी करतात. या दिवशी श्रीकृष्णाची पूजा विशेष प्रकारे करतात. बरेच लोक उपवास करतात. जन्मेत्सव मध्यरात्री होतो. यावेळी कृष्ण स्तुतीपर भजने, गौळणी व अभंग म्हणतात. रात्री बारा वाजता लहानशा पाळण्यात कुंचीत नारळ घालून पाळणा गीत म्हणतात. नंतर सुंठवडा वाटतात.

दुसऱ्या दिवशी दहीकाला होतो. श्रावण महिन्याच्या सुरूवातीपासून महाभारत, पांडव–प्रताप यासारख्या ग्रंथाचे वाचन करतात व त्याची समाप्ती जन्माष्टमीच्या दिवशी करतात.

### ३.१९.१२ गणेश चतुर्थी

भाद्रपद महिन्यात शुद्ध चतुर्थीपासून ते अनंत चतुर्दशीपर्यंत गणेशोत्सव साजरा करतात. गणेशचतुर्थीला रंगीत आणि आकर्षक अशा गणपतीच्या मातीच्या मुर्तीची मोठया समारंभाने घरात स्थापना करून तिचे पूजन करतात. दहा दिवसाच्या गणपतीचे अनंतचतुर्दशीला विसर्जन करतात. सातारा शहरात दहा दिवस सार्वजनिक गणेशोत्स मोठया प्रमाणावर साजरे करतात. तेव्हा लोकरंजनाचे व लोकशिक्षणाचे कार्यक्रम करतात. गणेशचतुर्थीनंतर तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशी पितळेची अथवा मातीचा मुखवटा घालून गौरीची स्थापना करतात तीन दिवसानंतर विसर्जन करतात. तर गणपतीचे दहा दिवसानंतर विसर्जन करतात.

### ३.१९.१३ ऋषीपंचमी

हा सण भाद्रपद शुद्ध पंचमीला साजरा करतात. या दिवशी सुवासिनी उपवास करतात. बैलांच्या परिश्रमाने काढलेले कोणतेही धान्य, भाज्या अथवा फळे या दिवशी स्त्रियांना वर्ज्य असतात.

### ३.१९.१४ विजयादशमी किंवा दसरा

नवरात्रोत्सवाचा प्रारंभ आश्विन शुद्ध प्रतिपदेला होऊन दहाव्या दिवशी म्हणजेच विजयादशमीला समाप्ती करतात. यास दसरा असेही म्हणतात. नवरात्रौत्सवात महालक्ष्मीची पूजा करतात. गावसीमेवर शमी व आपटयाची पाने लुटून सोने म्हणून ते एकमेकांना वाटण्याचा समारंभ होतो.

### ३.१९.१५ दिपावली

दिवाळी हा सण आश्विन महिन्याच्या वद्य त्रयोदशीपासून सुरू होऊन कार्तिक शुद्ध द्वितीयेला संपतो. या पाच दिवसात घरोघरी आकाश कंदील व मातीच्या पणत्या लावतात. धनत्रयोदशीपासून लाडू, करंज्या वगैरे फराळाचे पदार्थ तयार करतात. दुसऱ्या दिवशी नरक चतुर्दशीला घरातील सर्व माणसे अभ्यंग स्नान करतात. अमावस्येला लक्ष्मीपूजन होते. व्यापारी व कारखानदार लक्ष्मीपूजना दिवशी वहया पूजतात. त्याप्रसंगी मिठाई आणि भेटवस्तू देतात. कार्तिक शुद्ध प्रतिपदेला 'बलिप्रतिपदा' म्हणतात. त्यानंतर भाऊबीज हा दिवाळीचा शेवटचा

दिवस मानतात. या दिवशी बहिण भावाला आपल्या घरी जेवणाला बोलावून त्याला ओवाळते व भाऊ तिला भेटवस्तू देतो. [७७]

### ३.१९.१६ तुळसीचे लग्न

कार्तिक शुद्ध द्वादशीला तुळसीचे विष्णुबरोबर लग्न लावतात. चुरमुरे व खोबरे प्रसाद म्हणून वाटतात. तुळसीच्या लग्नानंतर लग्नकार्याचा प्रारंभ होतो.

### ३.१९.१७ मकरसंक्रात

१४ जानेवारी या दिवशी सूर्य मकर राशीत प्रवेश करतो. मकरसंक्रांत हा सण पौष महिन्यात साजरा केला जातो. या दिवशी तिळगुळ वाटले जाते. या दिवशी कुंभाराकडून आणलेल्या मातीच्या सुगडांची सुवासिनी पूजा करतात. त्यात ऊसाचे तुकडे, हरभऱ्याचे घाटे, बोरे, गाजराचे तुकडे इत्यादी ठेवतात. सुवासिनी सुगड कडेवर धरून मंदिरात जातात व एकमेकांना भेटवस्तू देतात.धान्य तिळाच्या पोळया, तिळाचे लाडू सेवन करून एकमेकांना तिळगूळ वाटतात. संक्रातीच्या आदल्या दिवशी भोगी असते.

### ३.१९.१८ महाशिवरात्र

माघ वद्य चतुर्दशीला शिवोपासक उपवास धरतात. सातारा शहरातील शिव मंदिरात जाऊन त्याची पूजा करतात. रात्री नाचण्याचा व कीर्तनाचा कार्यक्रम होतो.

### ३.१९.१९ होळी

फाल्गुन शुद्ध पौर्णिमेला रात्री होळीची पूजा केल्यानंतर ती पेटवितात. या दिवशी उपवास करण्याचाही काही लोकामध्ये प्रघात आहे. या दिवशी पुरणपोळी हे मिष्टान्न करतात. दुसऱ्या दिवशी धुलीवंदनाचा सण असतो. पूर्वी एकमेकांच्या खोडया करणे, रंग खेळणे, होळीची राख अंगावर फेकणे असे अनेक प्रकार लोक करीत. सध्या त्याचे प्रमाण कमी झाले आहे. [७८]

मुस्लिम लोक मुहर्रम, बकरी ईद, ईद–ए–मिलाद व ख्रिश्चन लोक नाताळ, गुड फ्रायडे, इस्टर डे हे सण साजरे करीत. यामध्ये २५ डिसेंबर या दिवशी लोक नाताळ(ख्रिसमस) हा सण असतो. तो मोठ्या प्रमाणात साजरा केला जात असे.

## ३.२० खेळ व करमणूक

सातारा शहरातील लोकांना खेळ व करमणुकीची आवड होती. शहरात सामान्य वर्गातील प्रौढ लोक व मुले खोखो, क्रिकेट, कबड्डी, हुतूतू, आटयापाटया, आंधळी कोशिंबीर

वगैरे खेळ खेळत असत. उच्च वर्गीय प्रौढ लोक बुद्धीबळ, फासे, गंजिफा व सोंगटया इत्यादी खेळ खेळत. तर मुले विटीदांडू, लगोऱ्या तर मुली झिम्मा, फुगडी, लंगडी हा खेळ खेळत याशिवाय करमणुकीसाठी दशावतारी, कळसूत्री बाहुल्यांचे खेळ, पोहणे, भजन, कीर्तन, जलसे व करमणुकीचे इतर कार्यक्रम साजरे केले जात.[७९]

## ३.२१ रोगराई व आरोग्य सुधारणा

छत्रपती आप्पासाहेब महाराज यांनी १८४० मध्ये सातारा शहरातील देवी, प्लेग, कॉलरा, हिवताप, क्षयरोग व मलेरिया यासारख्या रोगांच्या साथीच्या निवारणासाठी जिल्हा नागरी रूग्णालयाची स्थापना केली होती. सन १८७४ मध्ये सातारा नगरपालिकेने लस टोचणीचे काम सुरू केल्याने येथील लस टोचणी विभाग बंद करण्यात आलेला आहे. सन १८८२ मध्ये या रूग्णालयात ६,८१८ बाहय व ३१७ आंतररूग्णांवर उपचार करण्यात आले.[८०]

सातारा शहरात इ.स. १८८३–८४ मध्ये फिरते लसटोचक कार्यरत होते. नागरी रूग्णालयातही लसीकरणाचे काम चाले. सन १९००–१९०१ मध्ये नागरी व ग्रामीण भागात मिळून ३२,१७३ व्यक्तींचे यशस्वी लसीकरण केले होते.[८१] तर सन १९१२–१३ मध्ये एकूण ३१, ६७९ व १९२१–२२ मध्ये २८,८९९ इतके लसीकरण यशस्वी केले होते.[८२]

सन १८९७–९८ मध्ये सातारा शहरात प्लेगची साथ आली होती. सन १९४४ ते १९४८ पर्यत प्लेगच्या रोगामुळे मरण पावलेल्यांची संख्या २०१ होती.[८३] सातारा शहरात सन १९१८ मध्ये एन्फ्लुएंझाची साथ पसरली. यामध्ये सुमारे ७१० लोक मरण पावले. ही साथ आटोक्यात आणण्यासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न केला होता. त्यामध्ये यश मिळविले.[८४]

देवी रोगामुळे मरण पावलेल्या व्यक्तींची संख्या १९४३–४४ मध्ये ७, १९४४–४५ मध्ये १० तर १९४५–४६ मध्ये ३ होती.[८५]

२० व्या शतकात सातारा शहरात कॉलरा रोगाचा मोठया प्रमाणावर प्रसार झाला. या रोगामुळे १९४३–४४ मध्ये ७, १९४४–४५ मध्ये १०, १९४५–४६ मध्ये ३, १९४६–४७ मध्ये ५०, १९४७–४८ मध्ये २५ मरण पावले होते.[८६]

## रोगांमुळे मृत्यु (सन १९४३ते १९४८)

| वर्ष | उप जत | प्लेग | श्वास | निमो निया | क्षय | ताप | अपघात | इन्फ्ल्यु. | टायफा | मले रिया | हग वण | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४३-४४ | ११ | -- | ३२ | १६ | ४० | १८० | ११ | -- | -- | -- | - | ४८४ |
| १९४४-४५ | २२ | ५१ | ३० | ३४ | ७३ | २१४ | २४ | -- | ०१ | ०३ | ५१ | ४४७ |
| १९४५-४६ | २१ | ८३ | ३६ | ३५ | ९६ | १९१ | १६ | -- | -- | -- | - | ५३५ |
| १९४६-४७ | २० | १४ | ४७ | ४१ | ८६ | १७१ | २९ | -- | -- | -- | - | ५१० |
| १९४७-४८ | २७ | ५३ | ४४ | २६ | ८२ | १३६ | ३० | -- | -- | -- | - | ५५५[८७] |

## रोगामुळे मृत्यु (सन १९४३ते १९५३)

सातारा शहरात हिवतापाच्या निर्मूलनासाठी प्रत्येक घरात वर्षातून किमान दोनदा डी.डी.टी.चा फवारा मारला जात असे. सातारा येथे इ.स. १९४५ मध्ये हिवताप नियंत्रक पथक स्थापन करण्यात आले होते. देवी रोगामुळे १८६८ व १८७२ मध्ये अनुक्रमे १८९६ व २५१८ व्यक्ती या रोगामुळे मरण पावल्या होत्या. तर १८७९, १८८० व १८८२ या वर्षामध्ये सरासरी ५ पेक्षाही कमी मृत्यू झाले होते.[८८] कॉलरा या रोगाचा १९व्या शतकात सातारा येथेही प्रादुर्भाव झाला होता. या रोगामुळे सन १८६६, १८८१ व १८९३ मध्ये अनुक्रमे १,१३४, ८६६ व १,८६५ रोगी मृत्यू पावले. तर १९०१ मध्ये केवळ ५० रोगी दगावले होते.[८९] १८८२ मध्ये सातरा शहरात सर्वत्र कॉलरा प्रतिबंधक लस टोचण्यात आली होती.

वरील रोगाशिवाय क्षयरोग नियंत्रण, कुष्ठरोग, अंधत्व पटकी, प्लेग, बद्धकोष्ठता, श्वसनरोग, डांग्या खोकला, आमांश, हृदयविकार, काविळ, कॅन्सर व गॅस्ट्रो इत्यादी रोगांच्या निर्मूलनासाठी वाई शहरातील आरोग्य विभागाने महत्त्वपूर्ण काम केले. सन १९११ पासून हे प्रमाण एकदमच कमी झाले.[९०]

## ३.२२ सातारा शहरातील सामाजिक संस्था व उपक्रम

सातारा शहरात १९व्या व २० व्या शतकात ज्या सामाजिक संस्था अस्तित्त्वात होत्या. त्या सामाजिक संस्थानी शहरात सामाजिक बदल घडवून आणले होते. या सामाजिक संस्थामध्ये सत्यशोधक समाज, गणेश मेळा चळवळ, आयुर्वेद प्रसारक मंडळ, अंत्यसंस्कार सहाय्यक मंडळ, डिस्ट्रिक्ट ॲण्ड आफ्टर केअर असोशिएशन, युनियन क्लब, सातारा महिला

मंडळ, महिला मंडळ कन्याशाळा व एकविचार कोऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी इत्यादी सामाजिक संस्थानी फार मोठे कार्य केले आहे. त्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे

### ३.२२.१ सत्यशोधक समाज

सामाजिक व धार्मिक परिवर्तनाचा पुरस्कार करणारी विचारसरणी प्रसारित करण्यासाठी महात्मा जोतिबा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. कर्मठ व सनातनी विचारसरणी आणि अन्याय रूढी, आचारधर्म व पुरोहित वर्गाचे वर्चस्व अमान्य करणारा हा एक विचारमंच होता. वैदिक धर्माचे अंधानुकरण व अपभ्रष्ट कर्मठपणा यावर चढाई करण्याचा हा क्रांतिकारी विचार होता. स्वातंत्र्य समतावादाच्या व वैचारिक अधिष्ठानावर सामाजिक संबंध प्रस्थापित करण्यास्तव महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाचे हत्यार वापरले. या हत्याराचा रोख ब्राम्हणावर नसून ब्राम्हणशाहीवर होता. फुले यांच्या सत्यशोधक समाजाचा प्रभाव साताऱ्यावर अगोदरपासूनच दिसू लागला होता.[११]

मूलतः धार्मिक व सामाजिक सुधारणांचा अग्रह धरनारी महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाची चळवळ नंतरच्या काळात थंडावली होती. सन १९१०११ च्या सुमारास थंड अवस्थेत असलेल्या सत्यशोधक चळवळीस पुन्हा चैतन्य देणयसाठी भास्करराव जाधव, अण्णासाहेब लट्ठे व महादेव डोंगरे या कोल्हापूरच्या अधिकाऱ्यांनी प्रयत्न केला. सातारा व संस्थानात त्यांनी सत्यशोधक समाजाच्या कामाला चालना दिली. कोल्हापूर संस्थानात सत्यशोधक चळवळ बंद पडल्यावर तेथून कर्मवीर भाऊराव पाटील व भास्करराव जाधव हे सन १९१७ मध्ये साताऱ्यात आले. त्यावेळी सातारा शहरात सत्यशोधक चळवळीने जोर धरला होता. मुळात कोल्हापूरला स्थापन झालेल्या ब्राम्हणेतर पक्षात सर्व सत्यशोधक सामील झाले होते. तथापि ब्राम्हणेत्तर पक्षात जे जे सामील झाले होते ते सर्वजण सत्यशोथक विचारसरणीचे नव्हते. खऱ्या सत्यशोधकांना ब्राम्हणाचे वावडे नव्हते. त्यांचा विरोध होता

सातारा जिल्हा सत्यशोधक समाजाचे चिटणीस बाळकष्ण नानासाहेब फाळके होते. केशवराव विचारे हे देखील एक पुढारी होते. ऑक्टोबर १९२० च्या सुमारास या जिल्हयात सत्यशोधक चळवळीचा जोर वाढलेला होता. भाऊराव पाटीला यांचा सत्यशोधकी जलसा शेकडो लोकांचा जमाव खेचित होता. सत्यशोधक विचार, लोकहित आणि धर्मनिरपेक्षता यांचा पुरस्कार करणारे भाऊराव पाटील आणि त्यांचे सहकारी सत्यशोधक चळवळ जोमाने चालवित

होते.  स्वाभाविकपणे वलिष्ठ असे हितसंबंधीय आणि सामाजिक अधिकार प्राप्त झालेले काही कर्मठ ब्राम्हण यांच्याशी त्यांना मुकाबला करावा लागला. समाजातील कोणताही स्तर आपले स्थान व अधिकार सोडण्यास सहजासहजी तयार नसतो. म्हणूनच सत्यशोधक चळवळीला काहीसे लढाऊ स्वरूप आले होते. त्यातून एकमेकावर आरोप प्रत्यारोपांचे काहूर माजले होते. महात्मा फुले यांना यापेक्षाही अधिक विरोधाला तोंड द्यावे लागले होते. फुलेंनी जेव्हा आपले कांतिकार्य सुरू केले तेव्हा कोणत्याही संस्थेचे किंवा पैशाचे त्यांना पाठबळ नहते. जन्माधिष्ठित वर्णवाद व जातीयवाद समाजाच्या सर्व स्तरावर भिनलेला होता. ज्या बहुजन समाजासाठी हे कार्य फुले यांणी हाती घेतले होते., त्या बहुजन समाजाचाही सक्रिय पाठींबा त्यांना नव्हता. त्यामुळे त्यांचे कार्य हा एक भयंकर काटेरी मार्ग होता. कर्मवीर भाऊराव पाटील यांना देखील अशाच काटेरी मार्गावरून जावे लागले होते.  मा.छत्रपती शाहू राजांच्या प्रयत्नामुळे परिस्थिती थोडी बदलली होती. या काळात भास्करराव जाधवांसारखा पहिला पदवीधर मराठा पुढारी या चळवळीला लाभलेला होता.

सातारा येथील सत्यशोधकांनी ब्राम्हणांशी असहकार करण्याच्या धोरणाचा अवलंब केल्याने ब्राम्हणेत्तर कुळे, ब्राम्हण जमीन मालकीची शेती खंडाने करण्यास नकार देत होते. एकूण उत्पन्नापैकी निम्म्यापेक्षा जास्त उत्पन्न जमीन मालकांना देण्यास कुळांचा विरोध होता. घरगुती धार्मिक विधी पार पाडण्यास अनेकांनी ब्राम्हण पुरोहितांना बोलावण्याचे बंद केले होते. या धार्मिक सामाजिक संघर्षात आर्थिक व राजकीय परिणामही प्राप्त झाले. कुंभार, न्हावी, परीट या बलुतेदारांनी ब्राम्हणावर बहिष्कार घालावा असा प्रयत्न करण्यात आले. सातारा शहराच्या आसपास फेब्रुवारी १९२१ मध्ये सत्यशोधकी जलसा झाल्यावर सामाजिक तणाव निर्माण झाला. त्यामुळे परिस्थिती इतकी बिघडली की, सरदार मुतालिक, दादासाहेब र.पां करंदीकर, भाऊसाहेब रा.ग.सोमण, सदाशिव आळतेकर आणि सीताराम गोपाळ पाटील या पाच प्रतिष्ठित पुढाऱ्यांना तणावाबद्दल चौकशी करावी लागली. या जिल्हयात काही ठिकाणी ब्राम्हणांची शेती कसणाऱ्या शेतकऱ्यांना मारहाण करून पिके जाळण्याचेही प्रकार घडले होते. अशा प्रकरणाकडे दुर्लक्ष करणारा जिल्हाधिकरी मॉयसी व पाटणचा मामलेदार यांची बदली करण्याची केसरी वर्तमानपत्राने मागणी केली होती.  सत्यशोधकांनी केलेल्या कृत्यांसंबंधी रावजी रामचंद्र काळे यांनी मुंबई विधिमंडळात एक प्रश्न उपस्थित केल्यावर गारवडे गावातील

ब्राम्हणाकदून ब्राम्हणेत्तरांनी जबरीने घेतलेल्या रक्कमा परत देण्यासाठी शासनाला कारवाई करावी लागली होती.[९२]

कालांतराने काही सत्यशोधकी जलशांनी पातळी सोडलेली होती असे दिसते उच्च वर्णीया व्यतिरिक्त मारवाडी लोक व त्यांच्या महिलाबद्दलही अशोभनीय पदे व संवाद म्हटले जात. आक्रमक धोरण व त्याबद्दलच्ही अशोभनीय पदे व संवाद म्हटले जात. आक्रमक धोरण व त्याबद्दलची नापसंती यांचा बराच संघर्ष झालेला दिसतो.

सत्यशोधकांनी सातारा जिल्हयात ब्राम्हणांच्या शेतीतील उभी पिके लुटली किंवा जाळली. ब्राम्हण स्त्रियांची विटंबना केली. याबद्दल त्यांचा गांधीजीनी निषेध केला होता. वाई, सातारा, निपाणी, बेळगाव वगैरे ठिकाणच्या सभांतून गांधीजींनी ब्राम्हणाच्या तपस्येचे व त्यागाचे गुणगान केले होते. काही ब्राम्हणांनी केलेल्या पातकांचे खापर सर्व ब्राम्हण जातीवर न फोडण्याचे आवाहन श्रोत्यांना करून गांधीजींनी त्यांना बजावले की, जगात आजवर ब्राम्हणाइतके बलिदान अन्य कोणीही केलेले नाही.[९३]

सत्यशोधक समाजामार्फत सन १९१५ पासून तमाशे निघाले. त्या तमाशाचे संघटक मराठे असले तरी न्हावी, सोनार व ब्राम्हण या जातीतील प्रत्येकी एक जण सत्यशोधकी तमाशाचा संघटक होता. सर्व सत्यशोधकी तमाशे पारंपारिक पद्धतीचे असले तरी त्यातून नवीन आशय व्यक्त केला जात असे. त्यात म्हणावयाची गीते व संवाद समकालीन कवी अथवा लेखकांनी लिहिलेले होते. पारंपारिक धर्मग्रंथ तसेच वारकरी पंथासारखे संप्रदाय यांच्यावर टिका करण्यात येई. मात्र बऱ्याच सत्यशोधकांनी वारकरी पंथाचा पुरस्कारही केला होता. सर्वसाधारणपणे या तमाशामधून आधुनिक शास्त्र व शिक्षण यांचा पुरस्कार करण्यात येई. काही तमाशामधून अस्पृश्यतेच्या प्रथेवर हल्ला केल्याचेही दिसून येते.[९४]

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी एक वेगळाच रचनात्मक कार्यक्रम हाती घेतल्यामुळे त्यांच्या कार्यास विशेय महत्त्व आहे. प्रारंभी सत्यशोधक तमाशाच्या माध्यमाद्वारे भाऊरावांनी अस्पृश्यता निवारण कार्यास चालना दिली. त्यासाठी सामुदायिक शिक्षण देणे गरजेचे आहे. म्हणूनच भाऊराव पाटील यांनी या कार्यास वाहून घेण्याचे ठरविले. तेव्हा त्यांनी ग्रामीण भागामध्ये वसतिगृहे स्थापान करून या कार्याचा त्यांनी शुभारंभ केला. 'मुष्टी फंड' ही त्यांची एक अभिनव कल्पना. मुष्टी फंडासाठी गावातील घरोघरी त्यांनी पिशव्या वाटल्या. प्रत्येक

घरातील व्यक्तीला त्यांनी विनंती केली की, कुटुंबातील दळण दळण्याआधी एक मुठभर धान्य या पिशवीत टाकावे. प्रत्येक आठवडयात वसतिगृहातील विद्यार्थी सर्व घरांना भेटी देऊन त्या पिशवीतील धान्य गोळा करून वसतिगृहाचा उदरनिर्वाह चालवित असे. या फंडास लोकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यामुळे विद्यार्थी व खेडूत यांच्यात आपलेपणा निर्माण झाला. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या महान कार्यात आपण सहभागी आहोत अशी भावना ग्रामीण जनतेमध्ये रूजू लागली. त्याचा पुढील राजकीय चळवळीवर चांगला परिणाम झाला होता. अशाप्रकारे त्यांनी ग्रामीण सामुदायिक शिक्षणाची मोहिम उभारली. दक्षिण महाराष्ट्रभर त्याचा प्रसार केला.

गरीब ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी धर्मनिरपेक्ष वसतिगृहे निर्माण करून त्या साधनामधून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ब्राम्हणेत्तर चळवळीच्या संघर्षात्मक आणि लढाऊ पवित्र्यापासून सामुदायिक शिक्षणाच्या विधायक कार्यात रूपांतर केले. वसतगृिह, स्वावलंबी शिक्षण आणि सहजीवन हे त्या संक्रमणाचे माध्यम म्हणुन त्यांनी वापरले. त्यातूनच धर्मनिरपेक्षतेचा विचार पसृत केला. अशाप्रकारे यशस्वी केलेल्या संक्रमणावस्थेतून बहुजन समाजाची उन्नती घडवून आणण्याचा त्यांनी मोठा प्रकल्प आखला. त्यानुसार शैक्षणिक कार्यालयाचा प्रचंड विस्तार केल्यानंतर देखील वसतिगृहातील सहजीवन, बंधूभाव निर्मिती आणि शारीरिक श्रमाद्वारे भर घालावी यावर त्यांचा कटाक्ष होता. भाऊराव पाटील यांची ग्रामीण सामुदायिक शिक्षण चळवळ प्रामुख्याने आत्मनिर्भरता, शारीरिक श्रम आणि धर्मनिरपेक्षतेच्या तत्वावर आधारित होती. या तत्वाचा उगम निश्चितपणे महात्मा गांधीच्या तत्त्वज्ञानात सापडतो. सन १९२० पासून कर्मवीर या तत्वज्ञानाचे बारकाईने निरीक्षण करीत होते. आपल्या आयुष्यातील तीस वर्षे भाऊरावांनी या तत्त्वांची यशस्वीरित्या अमंलबजावणी केली होती.[९५]

सत्यशोधक च ब्राम्हणेत्तर पक्षामध्ये वेळप्रसंगी वाद निर्माण होत असत.महात्मा गांधीजींच्या असहकार चळवळीत सत्यशोधक नेत्यांनी सहभाग घेतला. पुढे अस्पृश्यता निवारण कार्यात त्यांनी भाग घेतला. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सर्व जाती धर्माच्या मुलांसाठी सन १९२४ मध्ये स्थापन केलल्या वसतिगृहात सन १९२७ मध्ये महात्मा गांधीजीनी भेट दिली होती व मोठा गुणगौरव केला होता. भाऊराव पाटील यांच्या वसतिगृहातून पुढील काळासाठी बहुजन समाजाच्या नेत्यांची व कार्यकर्त्यांची एक पिढी महाराष्ट्रात उदयास आली.[९६]

### ३.२२.२ गणेश मेळा चळवळ

लोकमान्य टिळक यांनी सार्वजनिक गणेशोत्सव चळवळीचा कल्पकतेने उपयोग करून जजजागृती व राष्ट्रवादी आंदोलनाचे एक प्रभावी साधन म्हणून उपयोगात आणले होते. सार्वजनिक वर्गणी गोळा करून मनोरंजनाबरोबरच लोकशिक्षणासाठी साार्वजनिक गणेश मंडळांना कार्यरत केले. या चळवळीला गणेश मेळे नामक कला पथकांची जोड देऊन मेळयाच्या माध्यमातून राष्ट्रीय गीते, पोवाडे, पथनाय व नाटकांचे प्रयोग करून लोकांची देशभक्ती जागृत करण्याचा उपक्रम हाती घेतला. टिळकांच्या आवाहननुरूप पुणे–मुंबई व्यतिरिक्त इतर शहरामध्येही मेळयाचे कार्यक्रम होऊ लागले. सन १९०५ मध्ये पुण्याव्यतिरिक्त ७२ शहरामध्ये टिळकांच्या पद्धतीनुसार गणेशोत्सव साजरा होत असल्याचे आढळते. पुण्यतील मेळयाच्या धर्तीवर सातारा येथेही मेळे संघटित होऊ लागले. यातून सरकारविरोधी वातावरण निर्माण होत असल्याने मेळयांना सरकारी परवाने काढण्याचे बंधन होते. पोवाडे व गीतांचे गायन करण्यात येई. मिरवणुकावर कडक निर्बंध असत. त्यातील घोषणा व मिरवणुकींच्या मार्गासाठी दंडाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घ्यावी लागत होती.[१७]

### ३.२२.३ अंत्यसंस्कार सहाय्यक मंडळ सातारा

सातारा शहराची दहनभुमी साताराच्या मध्यवर्ती ठिकाणापासून चार मैल दूर असलेल्या कृष्णा व वेण्णा या पवित्र नद्यांच्या संगमावर आहे. दहनभूमी फार दूर असून तेथे कोणत्याही स्वरूपाची सोय नव्हती. पावसाळयात तर भिजत चिखल तुडवित जायला लागत होते. दहनास निवाऱ्याची जागा नाही. शहरातही अंत्यसंस्काराचे सामान मोठय कष्टाने दोन ते तीन तासांनी मिळायचे. यामुळे या संस्कारास मनुष्य बळ मिळणे शक्य नव्हते. काही समाजसेवा करणाऱ्या लोकांच्यावर ही जबाबदारी येऊन पडत होती. एखादी संस्था स्थापन करून या सर्व अडचणी दूर करव्यात असी नेहमी चर्चा होई पण सर्व कल्पनांना मूर्त रूप मिळत नव्हते. अखेरीस कार्यकारी मंडळाची स्थापना होऊन त्याच्या चिटणीसांनी सन १९४५ मध्ये या कार्याला सुरूवात केली. या कामासाठी पंचवीस हजार रूपये जमवून अत्यसंस्कारासंबंधी बहुतेक सोयी केल्या आहेत. त्यामध्ये अत्यविधीसाठी लागणाऱ्या साहित्याचे सर्व सामान माफक दरात मिळण्याची व्यवस्था केली. महुली क्षेत्रास असलेल्या दहनभूमीस शव नेण्यासााकरिता व सोबत गेलेल्या मंडळीस परत आणण्याकरीता अल्प खर्चात मोटारीची सोय केली आहे. माहुलीस प्रेत

दहनास लागणारे सरपण योग्य दरात देण्याची व्यवस्था केली आहे. पावसाळयाच्या दिवसात प्रेत दहानास निवऱ्याची जागा दहनभूमीवर नदीकाठी बांधली आहे. अंत्ययात्रेस गेलेल्या मंडळीस वेळी अवेळी बसण्यास उपयोगी पडेल असे निवाऱ्याचे विश्रांतीगृह दहनभूनी जवळच बांधले आहे. अंत्यसंस्कारास लागणारा खर्च देण्याची ज्यांस ऐपत नाही अशा लोकांस शहरवासी मदत करतातच. मंडळानेही अशा लोकांस काही सवलती देऊन मदत केली आहे.

मंडळाने केलेल्या योजनामुळे शहरवासीयंची अनेक स्वरूपाची सोय होऊन आर्थिक बचतही झाली आहे सर्व सामान एकत्र व माफक मिळण्याची सोय झाल्यामुळे वेळेची बचत व आर्थिक फायदा झाला आहे. प्रेत दहनास लागणारा खर्च जवळ जवळ निम्म्यावर आला आहे. मोटारीची सोय झाल्यामुळे शारीरिक कष्ट वाचले आहेत. व वेळेची मोठीच बचत झाली आहे. येथे कापड, रॉकेल हे पदार्थ केव्हांही मिळतात. शिवाय नियंत्रित दरात मिळतात. मंडळाने केलेल्या सर्व योजना शहरवासियांसाठी राबविल्या आहेत. सातारा शहर नगरपालिकेनेही त्याला देणगी देवून व मंडळाचे दुकानास मध्यवर्ती जागा देऊन शहरवासीयांची सोय केली आहे.[९८]

### ३.२२.४ आयुर्वेद प्रसारक मंडळ सातारा

आयुर्वेद या प्राचीन भारतीय वैद्यक शास्त्राला सुसूत्र असे स्वरूप देण्यासाठी सातारा येथे सन १९१३ मध्ये या मंडळाची स्थापना झाली. आयुर्वेदाच्या पुनरूत्थानाचा हा महाराष्ट्रातील पहिला प्रयत्न होता. सन १९१७ मध्ये आयुर्वेद व नवीन वैद्यकीय शास्त्राच्या अभ्यासाद्वारे रूग्णास विनामूल्य वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यासाठी आयुर्वेद प्रसारक मंडळ या संस्थेची स्थापना झाली होती. या संस्थेमार्फत सातारा शहरातील सर्व जातीजमातीच्या रूग्णांना मोफत वैद्यकीय सुविधा पुरविण्यात येतात.[९९]

### ३.२२.५ डिस्ट्रिक्ट ॲण्ड आफ्टर केअर असोशिएशन

मुंबई मुलांचा कायदा १९२४ अन्वये १९३१ साली स्थापन झालेल्या या संस्थेने सातारा जिल्हयातील व बाहेरच्या जिल्हयातील मिळून एकूण ८२५ चे वर बालबालिकांना सातारा रिमांड होमद्वारा संरक्षण ज्युव्हेनाइल कोर्टाचे मार्गदर्शनाखाली पुनश्च सामाजिक सहाय्य केले आहे.[१००]

### ३.२२.६ युनियन क्लब

ही संस्था सन १८८९ साली स्थापन झाली व त्यावेळी सदर युनियन क्लब सध्या असलेल्या सरकारी हायस्कूलचे मागील जागेत होता. तेथे युनियन क्लबचे सभासद टेनीस व

बैठे खेळ खेळत असत. सदर क्लब त्यावेळचे ऑनरवेल गणपत पानसे यांचे अध्यक्षतेखाली स्थापन झाला. सन १८९३ मध्ये या क्लबच्ची इमारत पूर्ण होऊन तेथे क्लब सुरू झाला. त्यावेळी सरकारी हायस्कूलचे पश्चिमकडील भिंतीत दरवाजा होता. हल्लीचे युनियन क्लबची इमारत आहे. त्याखालील व आसपासची जागा खरेदी करून सध्याची क्लबची इमारत रू.४०५१ रूपाये खर्च करून बांधलेली आहे. टेनीस कोर्टाच्या पश्चिमेकडील बाजूस संध्याश्रम म्हणून दगडी हौद बांधला आहे. त्याठिकाणी सभासद सायंकाळची संध्या करीत असत व क्लबमध्ये सभासद बैठे खेळ खेळत असत व महिन्यातून ३ ते ४ दिवशी शास्त्रीय, सामाजिक, साहित्य वगैरे विषयावर व्याख्याने व चर्चा होत असे.

सन १९०३ चे सुमारास या क्लबमध्ये लोकमान्य टिळकांचा फोटो लावला होता. सन १९०८ नंतर जिल्हयाचे कलेक्टर व इतर सरकारी नोकर हे क्लबमध्ये येईनासे झाले, व कलेक्टर हे युनियन क्लबचे अध्यक्ष असण्याची प्रथा बंद झाली. त्यानंतर आता अध्यक्षांची निवड सभासदांमधूनच होते. लोकमान्य टिळकांचा फोटो श्री.ल.मो.आपटे वकील यांनी स्वतःचे खर्चाने दिला व तो क्लबमध्ये लावला. सदर संस्थेचा सातारा शहरातील लोकांना फायदा झाला आहे.[१०१]

### ३.२२.७ सातारा महिला मंडळ

हे मंडळ १९३५ साली सातारा येथे स्थापन केले व ते इंडिया वुइमेन्स ॲसोसिएशनला जोडून घेतले. त्यांच्या रीतीने त्यावेळी या मंडळाच्या दीडशे सभासद व नंतर हे मंडळ बंद पडले. ते १९३९ मध्ये महाराष्ट्र महिला मंडळ स्थापन झाले. त्यावेळी सातारा येथील बऱ्याच भगिनींनी यात सहभाग घेतला. मंडळाच्या बऱ्याच सभासद भगिनी ज्या ज्या ठिकाणी अधिवेशन त्यास जात असत. सन १९४० मध्ये सातारा येथे महाराष्ट्र महिला मंडळाचे अधिवेशन घ्यायचे ठरवून त्याप्रमाणे आमंत्रण दिले. व १९४० मध्ये सभासद महिला १०० होत्या. दोन वेळा सातारा महिला मंडळाने आपल्या मंडळाचे वार्षिक अधिवेशन येथे भरविले. अडाणी, निरक्षर स्त्रियांना साक्षर करणे. गरीब स्त्रियांना व मुलांना फुकट वैद्यकीय सल्ला देणे व कुठेही गरिबांना मदत ही कामे मंडळात चालू झाली. गरीब विद्यार्थ्यांना मॅट्रिकच्या परीक्षेचे वेळी फी वगैरे सारख्या गरजा मंडळाने कित्येक वेळा भागविल्या आहेत. त्याचप्रमाणे सातारा येथील रिमांड होम मधील लहान मुलांना दुधाचे डबेही तीन चार वर्षे मंडळाकडून पुरविले गेले आहेत. सन

१९४८ साली महाराष्ट्र महिला मंडळाने कामाच्या सोईकरिता जिल्हावार शाखांची वाटणी करून जिल्हयात स्वतंत्र काम करू लागला. तेव्हा त्यावर्षी सातारा येथे सातारा जिल्हा महिला परिषदेचे पहिले अधिवेशन पुण्याच्या सौ.इंदिराबाई देवघर यांचे अध्यक्षतेखाली भरले.

### ३.२२.८ महिला मंडळ कन्याशाळा

सन १९३६ च्या ऑगस्टमध्ये महिला मंडळाची महिला सदनची उपशाखा स्थापन झाली. हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेनेच सदर महिला सदन चालविते. या महिला मंडळाचा उद्देश्य स्त्रियांची संघटना करुन त्यांची शारीरिक, मानसिक व बौद्धिक उन्नती करणे हा आहे. सुरूवातीस फक्त सहाच सभासद होते. परंतु सभासदत्वाची मासिक वर्गनी फार माफक असल्यामुळे व मंडळाला मध्यवर्ती चांगली जागा लाभल्यामुळे सुमारे ८० ते १०० भगिनी सध्या मंडळाच्या सभासद झाल्या आहेत. महिला मंडळाकडून सदनकडून काही ठराविक रक्कम दरवर्षी देण्यात येते.

या मंडळाद्वारे बैठे खेळ नित्य चालतात. शिवाय हंगामामध्ये बॅडमिंटन चालते. मंडळापुरते खेळांच्या स्पर्धाचे प्रकारही वाढू लागले. त्यात बौद्धिक विषयांच्या चढाओढीची भर पडली. बौद्धिक स्पर्धा म्हणजे वक्तृत्त्व निंबध, गीतापठन, स्मरणशक्ती चाचणी, काव्यगायन वगैरे असून खेळांच्या स्पर्धा म्हणजे कॅरम, दोरीवरच्या उडया, लिंबुचमचा व बॅडमिंटन, जुन्या स्त्रीयांना भाग घेण्यासारख्या स्पर्धा सुद्धा ठेवल्या जातात. गव्हले, फुलवाती, जुनी गाणी, फुगडया इत्यादी मुद्दाम सर्व स्पर्धासाठी अल्प प्रवेश फी घेऊन छोटी पण उपयुक्त अशी पारितोषिके दिली जातात.

अंदाजे सन १९४४ पासून मंडळाने स्वतंत्र वाचनालय सुरू केले आहे. आज त्यात १५० ते २०० पुस्तके आहेत. एक स्त्री मासिकही चालू आहे. हस्तलिखितही काढण्याचा उपक्रम केला आहे. वाचनालयातील पुस्तके बऱ्याच भगिनी हौसेने वाचतात. हे मंडळ कन्याशाळेच्या इमारतीत असून याची रोजची वेळ सायंकाळी ५.३० ते ७.३० आहे.

मंडळात दरसाल सौ.सत्यभामाबाई काळे पुण्यतिथी, टिळक पुण्यतिथी, म. गांधी पुण्यतिथी आदि साजऱ्या केल्या जातात. तसेच कोजागिरी, गीताजयंती, वासतिंक हळदी–कुंकू व तिळगूळ समारंभ हेही साजरे केले जातात. अधून मधून सहल निघते. १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दिवशी परगावचे सन्माननीय लोकांची व्याख्याने ठेवली जातात.

या मंडळामुळे आपल्या गावात स्त्रियांची एक नमुनेदार संघटना तयार होत आहे. संघशक्ति या उक्तीप्रमाणे या संघटनेमध्ये सामर्थ्य निर्माण होत आहे. या सामर्थ्याचा स्त्रियांची उन्नति व निरनिराळया प्रकारची समाजसेवा यामध्येच व्हावा अशी मंडळाची उत्कट इच्छा अशून ती सफल होईल यात शंका वाटत नाही.[१०२]

अशाप्रकारे सातारा शहरात विविध सामाजिक संस्थानी सामाजिक परिस्थिती सुधारण्यास मोठया प्रमाणावर मदत केली आहे. समाजसुधारकांनी जुन्या परंपरा, अंधश्रद्धा व रूढीविरूद्ध लढा दिला. परंपरावादी समाजावर आघात करण्याचे काम समाजसुधारकांनी केले होते. इंग्रजी राजवटीतील गुलामगिरी आणि सनातनीवृत्तीच्या लोकानी आपली परंपरा टिकविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. बालविवाह कायदा, सतीप्रथा बंदी कायदा इत्यादिमुळे सातारा शहरात बालविवाह सतीप्रथा बंद झाली आहे.

## ३.२३ सातारा शहरातील ऐतिहासिक व सामाजिक घराणी

सातारा शहरात काही ऐतिहासिक घराणी प्रसिद्ध होती. या घराण्यांनी मराठा काळापासून इतिहासात फार मोठी कामगिरी केली आहे. तेव्हा त्या घराण्यांनी सातारा शहराचे ऐतिहासिक महत्त्व वाढले आहे.

### ३.२३.१ मंत्री

मंत्री हे मूळचे इस्लामपूर या गावच होते. मंत्री हे अष्टप्रधानांपैकी होते. ढोल्या गणपतीशेजारी त्यांचा वाडा होता. तो आता नष्ट झाला आहे.

### ३.२३.२ अभ्यंकर

हे घराणे विद्वान शास्त्री यांचे असून गारेच्या गणपतीजवळ त्यांचे घर आहे. या घराण्यातील भास्करशास्त्री हे अत्यंत विद्वान व प्रसिद्ध गृहस्थ होऊन गेले. रामशास्त्री गोडबोले हे प्रसिद्ध शास्त्री भास्करशास्त्री यांचे विद्यार्थी होते. भास्करशास्त्री यांच्या दोन मुलांचा मृत्यू झाला तेव्हा भास्करशास्त्री यांना शंका पडली की माझ्या नातवाचे शिक्षण कोण करील. तेव्हा भास्करशास्त्री यांचे शिष्य रामशास्त्री गोडबोले यांनी दहाव्या दिवशी पिंडास कावळा शिवेना म्हणून प्रतिज्ञा केली की, प्रपंचाचे सर्व पाश सोडून व जरूर पडल्यास माधुकरी मागून तुमच्या नातवाचे संपूर्ण अध्ययन करुन घेईन व ही प्रतिज्ञा त्यांनी पाळली. गोडबोले माहुलीचे असल्यामुळे रोज ते तेथून तीन मैल जाता येता सहा मैल चालत येत असत. गोडबोले यांनी

दिलेला शब्द पाळला. अभ्यंकर घराण्यात पुढे वासुदेवशास्त्री हे अत्यंत विद्वान निघाले. ते फर्ग्युसन महाविद्यालयांत अध्यापनाचे काम करीत. वासुदेवशास्त्री व्याकरण, अलंकार व वेदान्त यात निष्णात होते. त्यांनी विद्वत्तापूर्ण ग्रंथ लिहिले आहेत. या घराण्याला साताराच्या व बडोद्याच्या राजघराण्याचा आश्रय होता.[१०३]

### ३.२३.३ देवस्थळी

चिमणपुऱ्यात हे उत्तम श्रौती राहात असत. त्यांना दुसऱ्या बाजीरावाकडून दहा हजाराची नेमणूक होती.

### ३.२३.४ गजेंद्रगडकर

येथील विद्वान घराण्यामध्ये हे घराणे सर्वात प्रसिद्ध व विद्वान होते. सातारचे ते भूषणच होते. गजेंद्रगडकर मंगळवार पेठेत नागाच्या पाराजवळ राहात असून तेथे त्यांचा वाडा होता. या घराण्याचे ज्ञात पूर्वज राघवाचार्य हे पुण्याच्या अत्यंत विद्वान नीलकंठशास्त्री थत्ते यांचे शिष्य होते. राघवाचार्यांना त्यांच्या चुलत्यांनी कौमुदी, उपनिषदे वगैरे ग्रंथ लिहिले. प्रतापसिंह महाराजांचा राघवाचार्यांना आश्रय होता.रृाघवाचार्यांच्या शिष्यांपैकी अनंतशास्त्री पेंढारकर, विष्णूशास्त्री पंडित, व्यंकटशास्त्री माटे हे प्रसिद्ध पावले. राघवाचार्यांना सहा मुले होती. ती सर्व मुले विद्वान म्हणून प्रसिद्ध होते. राघवाचार्यांचे तीन विद्वानकर्ते मुलगे मृत्यू पावल्याने ते विरागी म्हणून ब्रम्हवर्तात दुसऱ्य बाजीरावाच्या आश्रयास जाऊन राहिले तेथेही त्यांचे अध्यापन कार्य चालू होते दिल्लीच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश प्र.बा.गजेंद्रगडकर सातारच्या या घराण्यातील सुपुत्र होत. राघवाचार्यांचा नातू अनंतचार्य यांनी वडिलाजवळ व्याकरण, न्याय, वेदांत यांचा अभ्यास केला.

### ३.२३.५ माटे

हे सातारा शहरातील एक विद्वान घराणे आहे. यांच्या दोन वाडयापैकी वरच्या वाडयापैकी व्यंकटेशशास्त्री विशेष प्रसिद्ध होते. खालच्या वाडयातील त्र्यबंकशास्त्र्यांना प्रतापसिंह महाराजांचा आश्रय होता. हे राम मंदिरातील त्र्यंबक शास्त्री माटे फार प्रसिद्ध असून त्यांनी अकरा संस्कृत ग्रंथ लिहिले आहेत. त्यापैकी फक्त एकच पुण्याच्या आनंदश्रमाने प्रसिद्ध केला आहे. यांच्या ग्रंथाचा उपयोग पं.महादेवशास्त्री जोशी यांनी संस्कृतीकोश ग्रंथ लिहिताना केला आहे. हे ग्रंथ पुण्याच्या भांडारकर संशोधन मंदिरात आहेत. या घराण्यात कीर्तनकार, पुराणिक

झाले. त्यांनी रामोपासनेचा त्याचबरोबर स्वदेशीचाही प्रसार केला. त्र्यंबकशास्त्र्याचे थोरले बंधू हरभटजी यांनी सन्यास घेऊन राघवेंद्रस्वामी हे नाव धारण केले. त्यांची समाधी व त्यामुळे झालेले राममंदिर हे दोन्हीही त्यांच्या वाडयात आहेत. राघवेंद्रस्वामी यांच्या प्रेरणेने कराड जवळील कडेगाव येथे राममूर्ती स्थापल्या जाऊन तेथे रामनवमीचा उत्सव नऊ दिवस मोठया थाटाने होतो. हयांच्या पिढीत तिघा भावानी संन्यास घेतला आहे.[१०४]

### ३.२३.६ दीक्षित चिपळूणकर

डफळे यांच्या पागेस पश्चिम बाजूस हे भाऊ दीक्षित चिपळूणकर हे मोठे पंडित होते. त्यांनी भारतचंपू, लक्ष्मीसहस्त्रनाम यावर टिका लिहिली आहे.

### ३.२३.७ भागवत

यांचा वाडा चिमणपुरा येथे आहे. यांनीच गारेचा गणपतीचे मंदिर बांधून त्याला सोन्या रूप्याच्या जिनसा दिल्या. या घराण्याचे मूळ पुरूष वैजनाथ भट कोकणात राहत होते. तेथून घाटावर येताना पेशव्यांची गाठ पडली. त्यांच्या सांगण्यावरून पेशव्यांनी पूजा केली. त्यांचे कार्य पूर्ण झाले. भागवतांचे मूळ आडनाव कुंटे होते. पेशव्यांनी कागदपत्रात भाग्यवान असे त्यांचे नाव लावले. त्यावरून भागवत हे नाव झाले. पेशव्यांबरोबर ते पुण्यास गेले. पुढे ते सातारचे पेशव्यांचे वहिवाटदार झाले. पुढे सातारच्या महाराजांना कैदेत ठेवल्यावर त्यांच्यावर देखरेख ठेवण्याचे काम त्यांच्याकडे होते. पुढे रामोश्यांनी बंड केल्यावर गेंडामाळावर वैजनाथ भटांनी त्याना ठार करून ते बंड मोडून टाकले.

### ३.२३.८ तांबवेकर

शनीवार पेठेत शनीवार चौकात यांचा वाडा होता. हे मुळेच तांबवे गावचे असून त्यांचा मुळ पुरूष गोपाळनाईक तांबवेकर हे सावकारी करीत होते. त्यांनी पेशवे व बडोद्याचे गायकवाड यांना कर्जे दिली होती. त्यांच्या फेडीबद्दल गायकवाडांनी त्यांना सोळा हजार रूपये इनामाचा गाव दिला होता. गोपाळ नाईकांनी या गावचे उत्पन्न गुजराथेतील डाकूरजीकडे लावून दिले व त्याची व्यवस्था तांबवेकरांच्या मार्फत होते. कराड तालुक्यातील मालखेड गाव तांबवेकरांनी शिराळकर भोसल्याकडून विकत घेऊन ५३ ब्राम्हणांना दान दिला.[१०५]

### ३.२३.९ जोशी

मूळ पुरूष सोमजोशी हे पावसचे राहणारे होते. सोमजोशी यांचे पणतू रघुनाथ शंकर असून ते गणपती  भक्त असून त्यांना वाचासिद्धी होती. या घराण्यातील चिंतामणबाबा हे छ.प्रतापसिंह महाराजांच्या काळात समाधिस्त झाले. या घराण्यातील नारायण नानासाहेब पेशव्यांच्या पदरी कारकून असून १७ वर्षे त्यांनी अग्नी सेवा केली व एक मोठा यज्ञ केला. वासुदेव सदाशिव हे कल्याणचे सुभेदार होते. दाजिबा दादा सातारा येथे दप्तरदार होते. ते पुढे सरसुभेदार झाले. त्यांनी मंगळवार पेठेत काशीविश्वेश्वराचे मंदिर बांधले. तसेच एक वाडा बांधला  त्यावेळी प्रतापसिंह महारांजांनी तेथे एक हौद बांधला. दाजीबा दादानी हौदाजवळ एक धर्मशाळा बांधली. ते १८४५ मध्ये मरण पावले.

### ३.२३.१० मुतालिक

जावली तालुक्यातील बामणोली येथील शिवदेव यांना अंताजी व यमाजी  ही दोन मुले होती. दोघेही पंतप्रतिनिधी परशुराम त्रिंबक यांच्या हाताखाली राजाराम महाराजांच्यावेळी नोकरीस होती. आपल्या कर्तबगारीने यमाजी पंतप्रतिनिधीचे मुतालिक झाले. यांचे मूळ आडनाव चावरे होते ते जाऊन मुतालिक पडले. यमाजी शिवदेव मुत्सद्दी असून शिपाईही होते. शाहु महाराजांच्या मृत्यूनंतर जगजीवनराव प्रतिनिधी व यमाजी शिवदेव पेशव्यांच्या विरूद्ध सकवारबाईनी केलेल्या कारस्थानात  सामील झाले. म्हणून नानासाहेब पेशव्यांनी दोघांनाही बेडया घालून  किल्ल्यावर कैदेत ठेवले. यमाजी शिवदेवांना चौघडा, पालखी, चवरी, हत्ती वगैरे सन्मान होता. यमाजी शिवदेवांचा पुतण्या पेशव्यांच्या बाजूने असल्याने माधवराव पेशव्याने त्याला पुन्हा मुतालिक केले. पुढे रावबाजी व प्रतिनिधी यांच्यामध्ये बेबनाव झाला. तेव्हा रावबाजीने १८६० मध्ये प्रतिनिधी व मुतालिक या दोंघाच्याही जहागिरी जप्त केल्या. पुढे पाच वर्षाने त्यांना दोन लाखाची जहागीर मात्र परत दिली. प्रतापगंज पेठेत त्यांचा वाडा आहे.[१०६]

### ३.२३.११ नातू

शनिवार पेठेत नातूचे दोन वाडे होते. प्रतापसिंह महाराजांनी राज्य मिळविण्याच्या कामी मदत केल्याबद्दल त्यांना आपला जुना वाडा बक्षीस दिला होता. नाना फडणीस साताऱ्यास आले म्हणजे या वाडयात उतरत असत. येथून पेशव्यांस पत्रे जात होती. त्यांत 'राजमंडल डौल सातारा स्वामी महाराज श्री पंतप्रधान याजंकडे' असा मायना असे. जुना वाडा पुरेना म्हणून

आप्पासाहेबांनी नवा वाडा बांधून दिला. त्याचवेळी वाडयातील पूलही बांधण्यात आला. बाळाजीपंत हे लहानपणी पुण्यास माधुकरी मागून निर्वाह करीत होते. सामान्य शिक्षण झाल्यावर त्यांनी शिपाईगिरीचे शिक्षण घेतले. नंतर ते रास्ते यांच्याकडे वाकनिशीच्या कामावर राहिले. त्यांची हुशारी व चोख कामगिरी पाहून रास्त्यांनी त्यांना आपले मुख्य कारभारी नेमले. रास्ते एल्फिन्स्टन साहेबास भेटावयास जात असत. त्यांच्याबरोबर बाळाजीपंतही जात असे. तेव्हा नातूची हुशारी पाहून एल्फिन्स्टन साहेबाने त्यांना आपल्या हाताखाली नोकरी दिली. इंग्रज सरकारच्या फार उपयोगी पडल्याने इंग्रजांनी त्यांना खेड व मावळ तालुक्यात बारा हजाराची इनाम गावे दिली. शिवाय प्रतापसिंह महाराजांनी दोन हजारांचा पाचवड गाव, शहाजी महाराजांनी उडतरे, चिंधवली वगैरे आठ हजाराची गावे पंत सचिवांनी दोन हजाराची गावे व कोल्हापूरच्या महाराजांनी साडेतीन हजाराची गावे इनाम म्हणून दिली. पुण्यातील शनिवारवाडयावर यांनीच इंग्रजांचे निशाण लावले. पुढे अपमानास्पद स्थितीत ते काशीस गेले व तेथे त्यांनी संन्यास घेतला.[१०७]

### ३.२३.१२ भोसले

हे मूळ वाईजवळील पांडववाडीचे होते. छत्रपतींच्या घराण्याशी यांचा निकटचा संबंध होता. राजाराम महाराजांनी परसोजी भोसले यास सेनासाहेब सुभा किताब देऊन वऱ्हाड, गोंडवन, बंगाल प्रांतावर स्वारी करून खंडणी वसूल करण्यास सांगितले. रघूजी भोसले यांनी बंगालवर स्वाऱ्या करून नागपूरास आपले स्वतंत्र राज्य स्थापन केले. हे बाजीराव व नानासाहेब यांच्याविरूद्ध होते. नागपूरकडे यांचे कोट दीडकोट रूपयांचे उत्पन्न होते.[१०८]

याशिवाय सातारा शहरात आगटे, बाळ जोशी चंद्रशेखर, किबे, कान्हेरे, दिवाण, फडणीस, अनगळ, सुमंत, पंडितराव, पंडित पिंगळे, पंत प्रतिनिधी, पंत सचिव, काकडे, शिर्के, राजज्ञा इत्यादी होती.

## ३.२४ समारोप

सातारा शहरात समाजजीवनामध्ये अनेक जाती धर्माच्या लोकांचा समावेश होता व आहे. शहरात जातीयता होती. जातीद्वेष दूर करण्यासाठी किंवा समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी अनेक उपक्रम राबविले होते. त्यासाठी सातारा शहरातील संस्थाही कार्य करीत होत्या. सातारा शहारातील लोकजीवन हे सुसंस्कृत व उच्च प्रतीचे होते. समाज हा

परंपरा व रूढीप्रिय होता. इंग्रजी राजवटीतील गुलामगिरी आणि सनातनीवृत्ती शहरात होती. वकिल, डॉक्टर आणि वेदविद्या पारंगत व्यक्ती श्रेष्ठ व्यक्तिमत्वात गणल्या जात होत्या. पण शेतकरी, कामकरी, बारा बलुतेदार यांची अवस्था दयनीय होती. सर्व जातीजमातीचे लोक एकमेकांच्या सणसमारंभात सहभागी होत होते. तसेच सर्व समाज सर्वधर्मसमभावाने राहत असे व हिंदू–मुस्लिम वादही साताऱ्यात झालेला आढळत नाही. काळाच्या ओघात सामाजिकदृष्टया अनेक स्थित्यंतरे झाली आहेत. पूर्वीची सामाजिक बंधने व प्रथा यांच्यात बदल होऊन पाश्चिमात्य पद्धतीनुसार सुधारणा झालेल्या दिसतात. याशिवाय सातारा शहरातील काही घराणी ही ऐतिहासिक असून त्यांनी सातारा शहराच्या इतिहासात फार मोलाची भर घातली आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्यामुळे सातारा शहराचा ऐतिहासिक वारसा जपण्यास मदत झाली आहे.

## संदर्भ

१) शेणोलीकर ह.श्री.व देशपांडे प्र.न., महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९७३, पृ.१३, १४

२) काळदाते सुधा, भारतीय समाजरचना, १९७६, पृ.१२

३) कित्ता, पृ.१९०

४) आत्रे त्रिंबक नारायण, गांवगाडा, नाग नालंदा प्रकाशन, इस्लामपूर, १७ सप्टेंबर २०११, पृ.१०१

५) चव्हाण रामनाथ, जाती आणि जमाती, १९८२, प्रस्तावना

६) दिसले नलिनी, सातारा शहराचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास(सन १९०० ते १९४७), एम.फिल लघु शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, जून २००५, पृ.४४

७) Gazetter Of Satara District, 1885, P. 416.

८) शेणोलीकर ह.श्री., देशपांडे प्र.न., महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९७२, पृ.२८१

९) डॉ. पानसे मुरलीधर गजानन, यादवकालीन महाराष्ट्र पृ. ८४

१०) डॉ. पानसे मुरलीधर गजानन, यादवकालीन महाराष्ट्र पृ. ७८

११) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९९९, पृ.२८७ ते २९१

१२) जोशी महादेवशास्त्री(संपा.) भारतीय संस्कृतिकोशखंड ३, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, १९६५, पृ.४०२

१३) कित्ता, पृ.४०२

१४) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.२८४

१५) रायगड जिल्हा गॅझेटियर १९९३, पृ.२२०, २२१

१६) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.२८५, २८६

१७) शेणोलीकर ह.श्री.व देशपांडे प्र.न., उपरोक्त, पृ.२८१

१८) आत्रे त्रिंबक नारायण, गांवगाडा, नाग नालंदा प्रकाशन, इस्लामपूर, १७ सप्टेंबर २०११, पृ.१०९

१९) चाफेकर ना.गो., ‘पेशवाईच्या सावलीत’, आ. पहिली, लेख २७४

२०) डॉ. पानसे मुरलीधर गजानन, यादवकालीन महाराष्ट्र, पृ. ६०

२१) कित्ता, पृ. ६०

२२) कित्ता, पृ.११०

२३) पेशवेदप्तर सा.प. लेख –७५

२४) केतकर श्री.व्य., ‘महाराष्ट्रीय ज्ञानकोश’ लि., नागपूर, विभाग २१, पृ.११, पृ. ४४३

२५) कित्ता, पृ.११०

२६) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.२८७

२७) कित्ता, पृ.२७७

२८) काळदाते सुधा, भारतीय समाजरचना, १९७६, पृ.१२

२९) डॉ. पानसे मुरलीधर गजानन, यादवकालीन महाराष्ट्र, पृ. ६०

३०) कित्ता, पृ.१५

३१) चाफेकर ना.गो., ‘पेशवाईच्या सावलीत’, आ.प्रथम. लेख ७५, पृ.५५

३२) जोशी रा.ना., ‘मराठेकालीन समाजदर्शन’, पृ.१६९

३३) आत्रे त्रिंबक नारायण, उपरोक्त, पृ.११०

३४) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.२८०

३५) कित्ता, पृ.२५४

३६) जोशी सु.ह. महाराष्ट्र दर्शन, समाजदर्शन, पुणे १९८६, पृ.४५

३७) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.२७७

३८) आत्रे त्रिंबक नारायण, उपरोक्त, पृ.११०

३९) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.२५४

४०) कित्ता, पृ.२७२

४१) कित्ता, पृ.२७९

४२) कित्ता, पृ.२७९

४३) आत्रे त्रिंबक नारायण, उपरोक्त, पृ.११४

४४) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.२९५, २९६

४५) आत्रे त्रिंबक नारायण, उपरोक्त, पृ.१०८

४६) आत्रे त्रिंबक नारायण, उपरोक्त, पृ.१०८

४७) राजवाडे वि.का., 'मराठयांच्या इतिहासाची साधने' मोदवृत्त छापखाना वाई, १८९८

४८) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.२९१, २९३

४९) शेणोलीकर ह.श्री., देशपांडे प्र.न., उपरोक्त, पृ.२८२

५०) राजवाडे वि.का., 'मराठयांच्या इतिहासाची साधने' मोदवृत्त छापखाना वाई, १८९८

५१) Russel and Hirala caste and tribes in central India vol III p – 177

५२) Gazetter Of Satara District, 1885, P.418-421.

५३) उपाख्य महादेव चिंतामण, बहुलेकर बाळासाहेब, आपला सातारा, मावळा प्रकाशन,सातारा, ६ मार्च १९९४, पृ.१६०, १६१

५४) Sensex Of India 1991, Series 14 Maharashtra, Port 4(B)(2) Religion Table C 9, P.127-132.

५५) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९९९, पृ.३०६ ते ३१०

५६) कित्ता, पृ.९०९

५७) Sensex Of India 1991, Op. Cit., P.129.

५८) उपाख्य महादेव चिंतामण, बहुलेकर बाळासाहेब, उपरोक्त, पृ.१६२

५९) उपाख्य महादेव चिंतामण, बहुलेकर बाळासाहेब, उपरोक्त, पृ.१६१

६०) Imperial Sensus and Sensus of India 1872 to 1941

६१) सातारा जिल्हा जनगणना अहवाल, १९४१, पृ.५

६२) कित्ता, पृ. ७

६३) कित्ता, पृ. ८

६४) सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, उपरोक्त, पृ.२५४ ते ३१०

६५) कित्ता, पृ.२४४

६६) कित्ता, पृ.२५०

६७) कित्ता, पृ.२३१

६८) कित्ता, पृ.२५१

६९) कित्ता, पृ.२५२

७०) कित्ता, पृ.२४६, २४७

७१) कित्ता, पृ.२४९, ३०५

७२) शेणोलीकर ह.श्री.व देशपांडे प्र.न., उपरोक्त, पृ.३१४

७३) उपाख्य महादेव चिंतामण, बहुलेकर बाळासाहेब, उपरोक्त, पृ.१५५

७४) शेणोलीकर ह.श्री.व देशपांडे प्र.न., उपरोक्त, पृ.३१०

७५) कित्ता, पृ.३११

७६) सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, उपरोक्त, पृ.२५०, २५१

७७) केतकर श्री.व्य., 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' लि., नागपूर, विभाग २१, पृ.११, पृ. ४४३

७८) कित्ता, पृ. २५२, २५३

७९) कित्ता, पृ. २५३

८०) Gazetter Of Satara District, 1963, P.736.

८१) सातारा डिस्ट्रिक्ट सप्लिमेंट, १९०४, पृ.३८

८२) सातारा डिस्ट्रिक्ट सप्लिमेंट, १९२६, पृ.५४

८३) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, पृ.३९

८४) कित्ता, पृ.५९

८५) कित्ता, पृ.५९

८६) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, उपरोक्त, पृ.५९

८७) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, उपरोक्त, पृ.५९

८८) जिल्हा आरोग्य अधिकारी, सातारा यांचेकडून मिळालेल्या माहितीनुसार.

८९) सातारा डिस्ट्रिक्ट सप्लिमेंट, १९०४, पृ.३८

९०) सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, पृ.६९७

९१) फडके य.दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड १, १९८९, पृ.५९

९२) दै.केसरी, ६ डिसेंबर १९२१, पृ. ५

९३) फडके य.दि., खंड २, पूर्वोक्त, पृ.२९४, ९५

९४) गेल ऑमवेट, कल्चरल रिव्होल्ट इन ए कलोनिअल सोसायटी, सायंटिफिक सोशालिस्त एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई, १९७६, पृ.२११ ते २१३

९५) चौधरी कि.का., धर्मनिरपेक्षता आणि कर्मवीर, लोकाराज्य, १ जुलै १९८७, पृ.२३, २४.

९६) सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, पृ.२१५

९७) रिचर्ड कॅशमन, दि मिथ ऑफ द लोकमान्य : टिळक अॅड मास पॉलिटिक्स इन महाराष्ट्र, पृ.८१,२२६

९८) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, पृ.८१, ८२

९९) कित्ता, पृ.७९

१००) कित्ता, पृ.८२

१०१) कित्ता, पृ.८३, ८४

१०२) कित्ता, पृ.८७, ८९

१०३) माटे गो.रा., असा घडला सातारा जिल्हा, सातारा, जानेवारी १९८८, पृ. ३८

१०४) कित्ता, पृ.३९, ४०

१०५) कित्ता, पृ.४२

१०६) कित्ता, पृ.४४

१०७) कित्ता, पृ.४७

१०८) कित्ता, पृ.४९

# प्रकरण चौथे

# सातारा शहराचा आर्थिक इतिहास

## ४.१ प्रास्ताविक–

प्राचीन काळापासून भारताचा आर्थिक विकास हा शेती, व्यापार व उद्योगधंदे यावर अवलंबून होता. पूर्वीपासून खेडी ही स्वयंपूर्ण होती. खेडयातील गरजा या खेडयातच भागविल्या जात होत्या. त्यामुळे एकदा का सरकारचा महसूल भरला की, सरकारचा व त्या खेडयाचा संबंध संपुष्टात येत होता. त्यामुळे त्यावेळी आर्थिक संपन्नता होती. व्यापाराबाबतही अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापार त्या काळात चालत असलेला दिसून येत होता. त्यावेळच्या सत्ताधिशांनी आपापल्या परीने व्यापारास उत्तेजन दिले होते. तसेच उद्योगधंद्याबाबतही खेडयातील लोकांचा जातीनुसार व्यवसाय ठरलेला होता. त्यामुळे खेडयातील लोकांच्या गरजा भागवून उरलेल्या वस्तू हे कारागीर पेठेच्या ठिकाणी विक्रीसाठी आणीत होते. त्यामुळे उद्योगधंद्यास चालना मिळत होती. याशिवाय सरकारी कारखान्यातून विविध उद्योगधंदे मध्ययुगीन काळात चालू होते.

सातारा शहरात मध्ययुगीन कालखंडापासून शेती, व्यापार व उद्योगधंदे भरभराटीस आले होते. तेव्हा या प्रकरणात प्रतापसिंह महाराजांच्या काळापासून ते भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यतच्या काळात शेती, व्यापार व उद्योगधंदे याची कशी भरभराट झाली यविषयी माहिती घेणार आहे. तसेच नगरपरिषदेमार्फत शहरातील लोकांना पुरविलेल्या सुविधा त्यासाठी होणारा खर्च व त्या मोबदल्यात लोकांच्याकडून विविध मार्गाने जमा होणारे उत्पन्न, जकातीद्वारे मिळणारे उत्पन्न यांचाही अभ्यास या प्रकरणात केला आहे.

## ४.२ प्राचीन काळातील आर्थिक परिस्थिती –

प्राचीन काळात वेगवेगळे व्यवसाय केले जात होते. यामध्ये शेती, उद्योगधंदे व व्यापार यावर आधारित अर्थव्यवस्था होती. वेदोत्तर काळात शेतीतून कापूस, गहू, बार्ली, तांदूळ, भाजीपाला या पिकांचे उत्पादन काढले जात होते. शेतीला पाणीपुरवठा व्हावा यासाठी बंधारे बांधले जात होते. शेतीच्या जोडीला पशुपालनाचा व्यवसाय केला जात होता.

वेदोत्तर काळात व्यापारात भरभराट झाली होती. विविध वस्तूंचा व्यापार करणाऱ्या लोकांचा संघ निर्माण झाले होते. परदेशांशी खुष्कीच्या व समुद्राच्या मार्गाने व्यापार चालू झाला होता. या व्यापारात शेळयांची कातडी, वस्त्रे, अलंकार इत्यादी वस्तूंचा व्यापार मोठया प्रमाणात चालत होता. जातिव्यवस्था दृढ झाली होती. अनेक व्यवसाय वंशपरंपरेने चालू राहिले होते. त्यामुळे व्यवसायात बदल करणे शक्य होत नव्हते.[१]

मौर्य काळात शेती हा प्रमुख व्यवसाय होता. शेतीतून गहू, बार्ली, तांदुळ, मका, कापूस व कडधान्ये ही पिके घेतली जात होती. कापसापासून सूतकाम, विणकाम, ज्यूट विणकाम हे व्यवसायही चालू होते.मौर्यकालीन व्यापार हा अंतर्गत व परदेशांशी केला जात होता. या व्यापरी वस्तूमध्ये मिरची, मौल्यवान खडे, औषधे, नीळ, सुती कापड व साखर इत्यादीची निर्यात तर काचसामान, सोने, मद्य, सुंगधी द्रव्य इत्यादी वस्तूंची आयात केली जात होती. मोर्यात्तर काळात व्यापार भरभराटीस आला होता. अर्थव्यवस्थेत चलनी नाण्याचा वापर, हस्तकला व्यवसायाचा विकास आणि खुला शेती व्यवसाय ही या काळाची वैशिष्टये होती.[२]

सातवाहन सम्राटांनी शिसे व तांबे या धातूची नाणी वापरात आणली होती. चालुक्य व पल्लव काळातील अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने शेती उत्पादनावर आधारलेली होती. व्यापारास गौण स्थान होते. कराचे समप्रमाण नसून त्यातून मुख्यतः राज, राजपरिवार आणि युद्धलष्कर यावरच खर्च केले जात होते. राज्याच्या उत्पन्नातून लोककल्याणाची काही कामे केली जात होती.[३]

अशाप्रकारे प्राचीन काळात आर्थिक परिस्थिती ही शेती उत्पादनावरच अवलंबून होती. शेती व्यवसायानंतर व्यापार व उद्योगधंदे यांना स्थान होते. सुती, लोकरी व रेशमी कापडाचे उत्पादन घेतले जात होते. कापड रंगविण्याचे व शिलाईचे कामही मोठया प्रमाणावर चालत होते. सोनेचांदीचे दागिने तयार करणारे व्यवसायही होते. श्रीमंत लोक हिरे व जडजवाहिर वापरत असत. उत्कृष्ट काम करणाऱ्या सुवर्णकारांचा व्यवसायही चालत होता. तांबे हस्तिदंत कारागिरसुद्धा होते. याशिवाय परीट, सुतार, लोहार, कुंभार, शिंपी, इत्यादी लोकही काम करीत होते.

## ४.३ मध्ययुगीन कालखंड

यादव कालखंडात नागरी आणि ग्रामीण भागातील आर्थिक जीवन विभिन्न प्रकारचे होते. खेडयात राहणाऱ्या लोकांचा शेती आणि पशुपालन हा प्रमुख व्यवसाय होता. दुष्काळ पडल्यास ग्रामीण भागातील आर्थिक जीवनात मोठी समस्या निर्माण होत असे. त्यासाठी राजे, सामंत व श्रीमंत लोक पाणीपुरवठयाच्या योजनांना आर्थिक साहाय्य करीत असत. जलाशयाची दुरूस्ती करण्यासाठी कोरीव लेखातून आदेश दिलेले आढळतात. कालवे, पाटबंधाऱ्याच्या योजना बाराव्या व तेराव्या शतकात दक्षिण भारतात  मोठया प्रमाणावर राबविल्या जात होत्या. पिकाचे रक्षण करण्याचे कामही शेतकरी चांगल्याप्रकारे करीत असत.[४]

पशुपालनात गाय, बैल, म्हैस, शेळया, मेंढया इत्यादी प्राण्यांचे पालन करून त्यापासून दुध व मांसांचे उत्पादन घेतले जात होते. पाटलापासून कुंभारापर्यत सर्व स्तरावरील लोक हा व्यवसाय करीत होते. याशिवाय फळवळावळीचे उत्पादन, लाकडाच्या मोठीपासून ते सोन्यामोत्यापर्यतचे सर्व उद्यागेव्यवसाय खेडेगावात केले जात होते.

यादवकाळात मोठयाप्रमाणावर आर्थिक उलाढाल शहरामधून होत असे. मार्को पोलो, मान्टे कार्विनो, निकितान इत्यादी परकीय प्रवाशांनी बाराव्या व तेराव्या शतकातील व्यापारी उलाढालीविषयी माहिती दिलेली आहे. कापड उत्पादनाकरिता पैठण, ठाणे व चौल प्रसिद्ध होते. देवगिरी येथे सोन्याचांदीचे अलंकार तयार केले जात होते. उद्योगधंद्यामध्ये कातडीपासून मोटा, पखाली, पादत्राणे तयार करणे, कातडी व कापडावरील नक्षीकाम, सोन्याचाांदीचे अलंकार याशिवाय बलुतेदार लोकही आपले व्यवसाय करून आर्थिक उत्पादनास हातभार लावत असत.[५]

व्यापारामध्ये कर्नाटक, गुजराथ, तेलंगण, माळवा या प्रदेशांशी महाराष्ट्राचा व्यापारी संबंध होता. परदेशाबरोबरही कोकणातील बंदराद्वारे व्यापार केला जात होता. व्यापार सुलभ व संपन्न होण्यासाठी वेगवेगळया श्रेणी एकमेकांचे साहाय्य घेत असत. या व्यापारी श्रेण्या संरक्षणासाठी स्वःची फौज बाळगीत असत. यादव राजांनी परदेशांशी व्यापारात वाढ व्हावी यासाठी देशी व्यापाऱ्यांना अनेक सवलती दिलेल्या आढळतात.[६]

मराठा काळात खेडयातील कारभार गावकरी पाहत असत. राज्यकर्त्यानी ठरवून दिलेला कर एकदा जमा केला की, सरकारचा त्या गावशी संबंध येत नव्हता. बारा बलुतेदार

वंशपरंपरेने गावाच्या गरजा भागवीत होते. यात लोहार, सुतार, महार, माम्ग, कुंभार, चांभार, परीट, न्हावी, भट, गुरव, मुलाणा, कोळी, जंगम, कुळवंत, डवऱ्या ठाकर, घडशी, तराळ, सोनार व चौगुला यांचा समावेश होत होता. या सर्वांनाच कामाचा मोबदला वस्तुविनिमय पद्धतीप्रमाणे धान्य रूपात मिळे. गावातील लोकसंख्येचे दोन वर्गात विभाजन केले जात होते. ते म्हणजे शेतकरी व बिगर शेतकरी पाटील कुलकर्णी या सरकारी अधिकाऱ्यांच्या मदतीला महार असे. शेतकऱ्याला शेतीतून येणाऱ्या उत्पन्नाच्या वाटेकऱ्यांच्या विचार अगोदर करावा लागे. त्यामुळे शेतकऱ्याला फार कमी प्रमाणात धान्य शिल्लक राहत होते. याचा परिणाम असा झाला की, या कालखंडात शेतीसुधारणांकडे कोणीचे लक्ष दिले नाही. त्यामुळे उत्पन्नाच्या वाढीवर नैसर्गिक मर्यादा आल्या. या कुटुंबानीच मराठी सैन्याला लष्कर पुरविले. स्वारीतून मिळालेले धन, शेतीचे काम, दागदागिने, घरगुती गरजा यात खर्च होऊ लागले. हाती आलेला जादा पैसा शेतीला मजूर लावण्यात खर्च होऊ लागला.[७]

मराठा काळात भिन्न व्यवसाय करणाऱ्यांची संख्या जास्त होती. बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार आपले कारागिरीचे व्यवसाय करीत होते. हे सर्वच व्यावसायिक एखाद्या गावी वस्ती करीत नसत तर कसब्याच्या ठिकाणी ते राहत होते. कसब्यात आठवडयाचा बाजार भरत असे या बाजारात हे लोक आपल्या वस्तू विक्रीसाठी आणत असत.आसपासच्या गावातील लोक या वस्तू गरजेप्रमाणे खरेदी करण्यासाठी येत असत.

मराठा काळातील समाजाचे एक वैशिष्टये म्हणजे विविध व्यवसाय करणाऱ्या भिन्नभिन्न जाती होत्या म्हणजे एखादी जात विशिष्ट असाच व्यवसाय परंपरेने करीत आलेली होती. जातीबाहेर जाऊन दुसऱ्या जातीचा व्यवसाय लोक करीत नसत व तत्कालिन समाज त्यास मान्यताही देत नसे.[८]

मराठाकाळात व्यापार हा अंतर्गत व परराष्ट्राशी केला जात होता. या व्यापारी वस्तूमध्ये विविध प्रकारचे कापड, धातूच्या वस्तू, मीठ व मासे लाकूड, रेशीम, अन्नधान्य, कडधान्य, मसाल्याचे पदार्थ, विडयाची पाने इत्यादी वस्तूंचा समावेश होता.[९]

अशाप्रकारे मध्ययुगीन काळातील आर्थिक व्यवस्था ही शेतीवर अवलंबून होती. जरी उद्योगधंदे निर्माण झाले असले तरी ते प्रगत नव्हते. हे उद्योगही शेतीवर आधारित होते. त्यामुळे उत्पन्नाचे मुख्य साधन शेती हेच होते. व्यापारास त्या काळात दुय्यम स्थान होते. परकीय

व्यापारी भारतात व्यापारासाठी आलेले होते. त्यामुळे आयात व निर्यातीत वाढ झाली असली तरी व्यापारातून फारसे उत्पन्न मिळत नव्हते. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतीमध्ये अनेक सुधारणा केल्या होत्या. व जास्तीत जास्त उत्पादन काढण्यासाठी प्रोत्साहन दिले होते.

## ४.४ आधुनिक काळातील आर्थिक परिस्थिती

### ४.४.१ शेती

प्राचीन काळापासून मानवी जीवनास शेतीला अत्यंत महत्त्वाचे स्थान असून आजही जवळपास ७० टक्के लोक शेतीवर आपली उपजिविका करीत आहेत. राष्ट्रीय उत्पन्नात देखील शेती उत्पादनाचा फार मोठा वाटा आहे. म्हणूनच भारताला पूर्वीपासून कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. अर्थव्यवस्थेमध्ये प्रामुख्याने शेतीच्या उत्पादनांनी फार मोलाची मदत केलेली आहे. सातारा शहरातील शेती अर्थव्यवस्थेविषयी माहिती पाहत असताना यामध्ये शेतजमिनीचे प्रकार, शेतीचा हंगाम, बागायत व जिरायत जमिनीचे एकूण क्षेत्र, शेतीतील पिके, कृषी उत्पन्न, जलसिंचन, रेवडी बंधारा प्रकल्प, कुळवहिवाट व भूधारणा पद्धती, तुकडेजोड योजना, कृषी अवजारे, कृषी शिक्षण व संशोधन केंद्र, दुष्काळ, पूर व गारपीट, टोळधाड, उंदरांचा उपद्रव व पशुधन व दुग्धव्यवसाय इत्यादीची माहिती घेणार आहोत.

#### ४.४.१ .१ सातारा शहरातील शेतजमिनीचे प्रकार

सातारा शहराच्या पश्चिमेकडील भाग हा सहयाद्रीच्या बेसॉल्टीक खडकांच्या रांगानी व्यापलेला आहे. तेथील जमीन ही पूर्वेकडे लहानमोठया टेकडयासह उताराची होत गेलेली आहे. स्वाभाविक रचनेमुळे जमिनीचा मगदूर भूभागानुसार भिन्न भिन्न आढळतो. त्यामुळे जमिनीचे पुढील प्रकार आढळून येतात.

**१) मध्यम काळी जमीन**

मध्यम काळी, काळीभोर व गाळाची जमीन कृष्णा व वेण्णा नदीकाठालगत आढळून येते. या जमिनीत काही फूट खोलीवर चुनखडीचे थर आढळतात. अशा जमिनीस जलसिंचनाची सोय असल्यास भरपूर उत्पादन निघते. या जमिनीत नायट्रोजन व कार्बनचे प्रमाण भरपूर असून दरवर्षी तिची मशागत न झाल्यास अल्कलीचे प्रमाण वाढून ती क्षारयुक्त होते. या जमिनीतून वर्षभर पिके काढली जातात.

**२) हलकी जमीन**

या जमिनीस माळरान किंवा मुरमाड म्हटले जाते. ही जमीन कठीण व खडकाळ असून रंग तांबूस असतो. सातारा शहराच्या पश्चिमेकडील बाजूस डोंगरालगत असून या जमिनीतून बाजरी व कडधान्याचे उत्पादन निघते. भरपूर खत घातल्याखेरीज या जमिनीतून चांगले उत्पन्न येत नाही.

**३) लॅटेराईट जमीन**

तांबडमाती या नावाने ही जमीन ओळखली जाते. या जमिनीत काही ठिकाणी काळया व तांबडया मृदेचे मिश्रण आढळते. अशा प्रकारची जमीन सातारा शहराच्या पश्चिम व उत्तर दिशेस असणाऱ्या डोंगर उतारावर आढळते. या जमिनीची पावसाळयात मोठया प्रमाणावर धूप होते. त्यामुळे तिच्यातील विद्राव मिठाचा अंश कमी होऊन लोहाचे प्रमाण वाढते. या जमिनीतून रागी, नाचणी, वरी व सावा ही पिके येतात. काही ठिकाणी भाताचे पिक काढले जाते.[१०]

### ४.४.१ .२ शेती हंगाम

खरीप हंगाम हा जूनमध्ये प्रारंभ होणाऱ्या नैऋत्य मोसमी पावसावर अवलंबून असतो. क्वचित प्रसंगी पडणाऱ्या रोहिणी नक्षत्रातील सरींचा उपयोग शेतीच्या पूर्व मशागतीस होतो. या हंगामात ज्वारी, बाजरी, भात, नाचणी, वरी, सावा, राळा, भुईमूग, कापूस व तंबाखू ही पिके घेतली जातात. खरीप पिकांची पेरणी ही जून–जुलैच्या मध्यापर्यत व कापणी सप्टेंबरच्या मध्यापासून नोव्हेंबर अखेरपर्यत केली जाते. काही खरीप पिकांची कापणी व मळणी जानेवारीपर्यत असते. रब्बी हंगाम ऑक्टोबरमध्ये सुरू होऊन मार्चमध्ये संपतो. या हंगामात रब्बी ज्वारी, हरभरा व गहू ही महत्त्वाची पिके घेतली जातात.[११]

### ४.४.१ .३ बागायत व जिरायत जमिनीचे क्षेत्र

सातारा शहरातील पिकाखालील क्षेत्रापैकी ७७.०८ टक्के जमीन जिरायत पिकाखाली व २२.९२ टक्के जमीन बागायत पिकाखाली होती. विहिरीपासून बागायत होणाऱ्या क्षेत्राचे प्रमाण निव्वळ बागायतीखाली असणाऱ्या क्षेत्राच्या ७३.०३ टक्के होते. एकूण बागायत क्षेत्रापैकी ज्वारीखालील बागायत क्षेत्र सर्वात जास्त म्हणजे ३१.८६ टक्के होते. ऊसाखाली १०.७९ टक्के, भाताखाली ६.१९ टक्के व गव्हाखाली ३.६४ टक्के व बाजरीखाली २०.५५ टक्के होते.[१२]

### ४.४.२ शेतीतील पिके

सातारा शहराच्या पूर्व भागात जमीन काळी व सुपीक आहे. या जमिनीतून वर्षातून चार पिके तर जिरायत जमिनीत दोन पिके घेतली जातात. पश्चिमेकडील डोंगराळ भागात भात नाचणी, व डोंगर पायथ्याजवळ गव्हाचे पिक घेतले जात असे. यासाठी शेतीची खूप मशागत करावी लागत होती. याचे उत्पन्न बागायती पिकापेक्षा जास्त मिळत असे. सन १८५०–५१ मध्ये स्थानिक ऊसाखाली ५२ हेक्टर व मॉरिशस ऊसाखाली ४० हेक्टर क्षेत्र होते. जमीन शासकीय जमिनीत व शेतमळ्यावर फळझाडांची लागवड केली जात असे. डोंगर व पायथ्याशी काही प्रमाणात जंगल होते. या जंगलात बाभूळ व चंदनाची झाडेही होती.[१३] एकूण लागवडीखालील क्षेत्राच्या सुमारे ७५ ते ८० टक्के क्षेत्र तृणधान्य ज्वारीचे प्रमाण कमी असून त्याखालोखाल बाजरीचा क्रमांक लागतो. कडधान्य लागवडीचे प्रमाण कमी असून कडधान्यात हरभरा लागवडीचे प्रमाण अधिक होते. गळिताच्या पिकांत भुईमूग अधिक घेतला जात होता.

#### ४.४.२ .१ भात

सातारा शहराच्या पश्चिमेकडील डोंगराळ भागात व वेण्णा व कृष्णा नदीच्या काठावरील दलदलीच्या किंवा गाळाच्या जमिनीत हे पीक घेतले जात होते. इ.स.१८८१–८२ मध्ये या पिकाखालील एकूण क्षेत्र १,२०० हेक्टर होते. तर सन १९४१–४२ मध्ये या पिकाखालील क्षेत्र १३२० हेक्टर होते.[१४] सन १८८१–८२ च्या सुमारास शहराच्या आसपास दोडका जातीचा भात घेतला जाई. सन १९४१–४२ च्या सुमारास चिमणसाळ, आंबेमोहोर, कोळंब, वारंगळ, आष्टा, पाटनी या भाताच्या जाती घेतल्या जात होत्या. हे पीक बी फेकून, पेरणीकरून किंवा लावणी करून घेतात. यातील ४० टक्के भात लावणी पद्धतीने घेतले जाते.

लावणी व पेरणीच्या भाताची मशागत वेगळी असते. हे पीक ७.५ ते १० सेमी उगवून आल्यावर त्याची कोळपणी करतात. त्यानंतर दोनवेळा खुरपणी करतात. लवकर तयार होणारी जात तीन ते चार महिन्यात तर उशिरा तयार होणारी जात पाच महिन्यानंतर कापणीस येते.

#### ४.४.२.२ ज्वारी

हे महत्त्वाचे पीक खरीप व रब्बी हंगामात सातारा शहरात घेतले जाते. इ.स.१८८१–८२ मध्ये या पिकाखालील एकूण क्षेत्र २९०० हेक्टर होते. तर सन १९४१–४२ मध्ये या पिकाखालील क्षेत्र ३४०० हेक्टर होते.[१५] सन १८८४ च्या सुमारास येथे दूधमोगरा, काळबोंडी,

शाळू, तांबड, उतावळी व अरगड या प्रमुख जाती होत्या. यापैकी काळबोंडी व उतावळी ही जात खरीप हंगामात घेतली जात होती.

हे पिक मध्यम व उच्च जमिनीत घेतले जात होते. जमीन तीन वर्षातून एकदा नांगरल्यावर दोनतीन वेळा कुळवतात. खरीप ज्वारीची पेरणी जून–जुलैमध्ये करतात. या पिकाबरोबराच तूर, मुग, उडीद व चवळी ही मिश्रपीकेही घेतात. कापणी ऑक्टोबर नोव्हेंबर केली जाते. रब्बी ज्वारीची पेरणी सप्टेंबरऑक्टोबर मध्ये करून फेब्रुवारी मार्चमध्ये कापणी करतात.[१६]

### ४.४.२.३ बाजरी

हे पीक सातारा शहराच्या पश्चिम भागात मध्यम काळया व रेताड जमिनीत घेतले जात होते. इ.स.१८८१–८२ मध्ये या पिकाखालील एकूण क्षेत्र २४०० हेक्टर होते. तर सन १९४१–४२ मध्ये या पिकाखालील क्षेत्र २,९१० हेक्टर होते.[८] या पिकाबरोबर राळा, अंबाडी, तूर व तीळ ही मिश्रपिके घेत. परंतु ही पिके चौथ्या ओळीत चौथ्या ओळीत पेरतात. ऑक्टोबर नोव्हेंबरमध्ये कापणी करतात. बाजरी पिकात एच.बी. ३ व सजगुरी ही स्थानिक जात घेतात.

### ४.४.२.४ गहू

हे रब्बी पीक प्रामुख्याने बागायती जमिनीत होत असले तरी जिरायत जमिनीतही घेतले जात होते. थंड हवामानात चांगले येते. जिल्हयात कमी जास्त प्रमाणात सर्वत्र होते. इ.स.१८८१–८२ मध्ये या पिकाखालील एकूण क्षेत्र ३३७५ हेक्टर होते. तर सन १९४१–४२ मध्ये या पिकाखालील क्षेत्र ३९५७ हेक्टर होते.[१७] पाण्याचा चांगला निचरा होणाऱ्या मध्यम ते भारी जमिनीत बागायती गहू चांगला येतो. चोपान व क्षारयुक्त जमिनीत गहू चांगला येत नाही. पेरणी ऑक्टोबरच्या मध्यास ३० ते ४५ से.मी.च्या पाभरीने करतात. जिरायत गव्हाची पेरणी झाल्यानंतर बी झाकण्याकरिता फळी फिरवत नाहीत. परंतु बागायत गव्हासाठी कुळवाच्या दिंडाने १.८ मी.रूंदीचे सारे करतात. बागायती गव्हास १० ते १५ दिवसांच्या अंतराने पाणी देतात. फेब्रुवारी मार्चमध्ये कापणी करून मळणी करतात.[१८]

### ४.४.२.५ मका

ऊस, गहू, भात व हळद या पिकांमध्ये मका हे मिश्रपिक घेतात. मका पिकाची लागवड वेण्णा व कृष्णा नदीकाठी मोठया प्रमाणात करतात. इ.स.१८८१–८२ मध्ये या पिकाखालील

एकूण क्षेत्र १२१२ हेक्टर होते. तर सन १९४१–४२ मध्ये या पिकाखालील क्षेत्र १६३३ हेक्टर होते. हे जरी बारमाही पीक असले तरी रब्बी हंगामात जास्त प्रमाणात घेतात.

### ४.४.२.६ नाचणी

सातारा शहराच्या पश्चिमेकडील डोंगराळ भागात नाचणी हे पीक घेतले जाते. इ.स.१८८१–८२ मध्ये या पिकाखालील एकूण क्षेत्र २,२५२ हेक्टर होते. तर सन १९४१–४२ मध्ये या पिकाखालील क्षेत्र २५४३ हेक्टर होते.[१९] या पीकाची पेरणी जून मध्ये तर कापणी ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये करतात.

### ४.४.२.७ वरी

हे पीक सातारा शहराच्या पश्चिम भागात थोडयाफार प्रमाणात घेतात. सन १९४१–४२ मध्ये या पिकाखालील क्षेत्र २३ हेक्टर होते.[२०] या पीकाची पेरणी जूनमध्ये तर कापणी ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये करतात.

### ४.४.२.८ राळा

हे पीक सातारा शहराच्या आसपास सर्वत्र घेतले जात होते. या पिकाखालील सन १९४१–४२ मध्ये क्षेत्र १,३३३ हेक्टर होते.[२१] या पीकाची पेरणी जून मध्ये तर कापणी ऑक्टोबर नोव्हेंबरमध्ये करतात.

### ४.४.२.९ हरभरा

या पिकाची पेरणी रब्बी हंगामात केली जाते. सन १९४१–४२ मध्ये या पिकाखालील क्षेत्र २,३१२ हेक्टर होते.[२२] या पीकाची पेरणी ऑक्टोबर नोव्हेंबरमध्ये करून कापणी फेब्रुवारी मार्चमध्ये करतात. उच्च व मध्यम प्रतीच्या जमीनीमध्ये किंवा मिश्रपीक म्हणूनही या पिकाची पेरणी केली जाते.

### ४.४.२.१० भुईमुग

तेलबियांचे महत्त्वाचे नगदी पीक म्हणून हे घेतले जात होते. ज्वारी व भाताच्या खालोखाल भुईमूगाचे उत्पन्न घेतले जात होते. सन १९१०–११ पर्यत सातारा येथे भुईमूगाचे उत्पन्न घेतले जात नव्हते. सन १९३९ पासून या पिकाचे उत्पादन घेतले जाऊ लागले. सन १९४०–४१ मध्ये या पिकाचे उत्पन्न १,११२ हेक्टर एवढे क्षेत्र होते. हे पीक खोल मध्यम काळया जमिनीत घेतात. खरीप भुईमुगाची पेरणी जून–जुलैमध्ये व काढणी ऑक्टोबर

नोव्हेंबरमध्ये करतात. उन्हाळी भुईमुगाची पेरणी जानेवारी–फेब्रुवारीमध्ये करतात. काढणी मे–जूनमध्ये करतात. यामध्ये उपटया, पसऱ्या, जपानी, देशी घुंगरी इत्यादी स्थानिक जाती आहेत.

### ४.४.२.११ ऊस

या नगदी पिकावर सातारा शहराची अर्थव्यवस्था आधारलेली होती. सन १८८१–८२ मध्ये सातारा येथे या पिकाखाली फक्त ३९५ हेक्टर क्षेत्र होते. ऊसाच्या क्षेत्रात सतत वाढ होत असल्याने पुढे साखर कारखानेही वाढू लागले. ऊस लागवडीचे आदसाली, पूर्व हंगामी व सुरू असे तीन हंगाम होते.[२३]

ऊसामुळे जमिनीची उत्पादकता कमी होऊ नये म्हणून शेणखताचा जास्त वापर करतात. तसेच आळीपाळीने पिके काढतात. सन १८६० मध्ये चिनी ऊसाची लागवड केली होती. हा प्रयोग अयशस्वी झाल्याने कालांतराने त्याची लागवड बंद झाली. त्यानंतर पुंडिया ऊसाची लागवड सुरू झाली.[२४]

### ४.४.२.१२ तंबाखू

सातारा येथे या नगदी पिकाखाली अत्यल्प क्षेत्र होते. सन १८८१–८२ मध्ये सातारा येथे या पिकाखाली फक्त ५७ हेक्टर क्षेत्र होते. भारतात तंबाखूचे पीक पोर्तुगीजांनी सन १६०५ मध्ये आणले होते.[२५]

### ४.४.२.१३ मिरची

हे मसालेवर्गीय पिकामध्ये नगदी पीक असून सातारा येथे हे पीक मोठया प्रमाणात उत्पादित केले जात होते. सन १८८१–८२ मध्ये सातारा येथे या पिकाखाली १२९ हेक्टर क्षेत्र होते. संकेश्वरी जातीच्या मिरचीची मोठया प्रमाणावर लागवड केली जात होती.

### ४.४.२.१४ हळद

हळद हे पीक मसालेवर्गीय पिकामध्ये दुसऱ्या क्रमांकाचे पीक आहे. हळदीची लागवड सातारा येथे अल्प प्रमाणात लागवड केली जात होती. हळदीची लागवड मे महिन्यात केली जात असून डिसेंबर जानेवारीमध्ये हे पीक काढले जात होते.[२६]

### ४.४.२.१५ आले

हे पीक सातारा परिसरात नागठाणे व आसपास घेतले जात होते. या पिकासाठी मध्यम हलकी व पाण्याचा निचरा होणारी जमीन लागते. हे पीक घेण्याआधी शेतात हरभऱ्याचे पिक घेतात. या पिकाची लागवड ही प्रमुख्याने एका वाफ्यात ५५ ते ६० कुडया लावून करतात. जोमदार व निरोगी वाढ झालेल्या आल्याच्या पिकातून बियाण्याचे आले काढून ते थंड ठिकाणी साठविले जाते. त्यास स्थानिक भाषेत ‘आडी’ असे म्हणतात.

### ४.४.२.१६ करडई

गळीत पिकांमध्ये हे दुसऱ्या क्रमांकाचे पीक असून गहू व ज्वारीबरोबर मिश्रपीक म्हणून घेतले जाते. करडईच्या दोन जाती असून एकाचा तेल काढण्यासाठी व दुसऱ्याचा रंगद्रावण बनविण्यासाठी उपयोग करतात. पेरणी ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये व कापणी मार्च–एप्रिलमध्ये करतात.[२७]

वरील गळितांच्या पिकाशिवाय सातारा येथे तीळ, जवस व कारळे ही पिके कमी–जास्त प्रमाणात घेतली जात होती. याशिवाय वरील पिकांशिवाय सातारा येथे मटकी, चवळी, उडीद व अंबाडी वगैरे पीके घेतली जात होती.

### ४.४.२.१७ फळे व भाज्या

पहिले छत्रपती शाहू महाराज साताऱ्याला येण्यापूर्वी शहरात फुलबागा व फळबागा नगण्य होत्या. छत्रपती शाहू महाराजांना फळबगा व फुलबागा करण्याचा मोठा छंद होता. तेव्हा औरंगबादहून विविध फळाफुलांची रोपे मागविण्यात येत होती. त्याची लावणी सातारा व आसपास पाण्याची सोय पाहून इतरत्रही करण्यात आली. आरळे येथे छत्रपती शाहू महाराजांनी विही, शेव अळू, शफताळू, बेदाणा, नासपती, गलगल, चकोतरा, कौल, संगतरा, कमंरद, फणस, बदाम ही झाडे तसेच केतकी, मोदपोय, बटमोगरा, सुरू व बनमजलसी ही फुलझाडे लावली होती.[२८]

धावडशी, नुने, लिंब या ठिकाणी फळबागा होत्या. धावडशीला बम्हेंद्रस्वामीने अनेक प्रकारची फुलझाडे लावून उत्तम बाग बनवली होती. येथे बनसोड जातीच्या आंब्याची लागवड केली होती. नुने येथील बागेत साखर लिंबे, नारिंगे व पेरू लावले होते. लिंब येथे पेरू, साखर लिंबे, नारिंगे यांची लागवड केली होती. या गावास येथे पिकणाऱ्या लिंबावरून लिंब हे नाव

पडले होते. येथील पेरू खूपच प्रसिद्ध आहेत.[२९]

फळे व भाजीपाल्याच्या लागवडीखाली सातारा येथे १८८१–८२ मध्ये २,५४७ हेक्टर होते. सन १९४१–४२ मध्ये ८,३२४ हेक्टर क्षेत्र होते. फळामध्ये आंबा, पेरू, पपई, मोसंबी, द्राक्षे व रासबेरी ही फळे घेतली जात होती. कांदा, रताळी, बटाटे, वांगी, गवार, मेथी, घोसाळे, दोडका, भोपळा, काकडी, भेंडी, गाजर, मुळा, वाटाणा, टोमॅटो, कोबी, कलिंगड, खरबूज, चवळी इत्यादी फळभाज्या व पालेभाज्या घेतल्या जात होत्या. सातारा येथे सन १९४५–४६ पर्यत मोठया प्रमाणावर केळीच पीक घेतले जात होते.[३०]

### ४.४.३ कृषी उत्पन्न

इ.स.१९४१–४२ मधील मुख्य पिकांचे दर हेक्टरी उत्पादन व एकूण उत्पादन खाली दिले आहे.

| अ.क्र. | पीक | दर हेक्टरी उत्पादन(कि.ग्रॅ) | अ.क्र. | पीक | दर हेक्टरी उत्पादन(कि.ग्रॅ) |
|---|---|---|---|---|---|
| १. | तांदूळ | १,८०३ | १४. | मूग | ४३७ |
| २. | गहू | १,६१४ | १५. | इतर कडधान्ये | १९३ |
| ३. | ज्वारी | १,००७ | १६. | एकूण कडधान्ये | ३७१ |
| ४. | बाजरी | ४१२ | १७. | तीळ | ५०० |
| ५. | बार्ली | १,००० | १८. | भुईमुग | १,१४५ |
| ६. | मका | १,१८४ | १९. | मोहरी व राई | १४३ |
| ७. | नाचणी | ९४६ | २०. | ऊस | ८२,५३४ |
| ८. | इतर कडधान्ये | ८३० | २१. | कापूस | ३८९ |
| ९. | एकूण कडधान्य | ९७२ | २२. | तंबाखू | १,००० |
| १०. | हरभरा | ५४१ | २३. | सुंठ | ९६३ |
| ११. | तूर | ४२३ | २४. | मिरची | ७७८ |
| १२. | उडीद | ५०० | २५. | हळद | १,५९८[३१] |
| १३. | बटाटा | ४,९०७ | | | |

### ४.४.४ बी–बियाणे

बी–बियाणे उत्पादन व साठविण्याच्या निरनिराळया पद्धती अस्तित्त्वात होत्या. त्यापैकी प्रचलित पद्धत म्हणजे हंगामात चांगल्या प्रतीचे बियाणे निवडून ते पुढच्या हंगामासाठी वापरणे ही होय. रब्बी ज्वारीचे बियाणे कराड तालुक्यातील सैदापूर येथून आणले जात होते. बाजरीचे

बियाणे एनकूळ ता. खटाव व शिरवली ता.माण आणि हुमदी ज्वारीचे बियाणे देवापूर, म्हसवड व लोधावडे ता.माण येथून आणले जाते होते. ऊसाचे बियाणे पाडेगाव ता. खंडाळा येथून तर बटाटा बियाणे खेड मंचर(पुणे) व थोडया फार प्रमाणात सिमल्याहून आयात केले जात होते.[३२]

### ४.४.५ जलसिंचन

शेती ही पावसावरच अवलंबून होती. विहिरीवरील बागायती शेतीचे प्रमाण अत्यल्प होते. पावसाचे प्रमाण विषम  व अनिश्चित असल्यामुळे शेतीतून पुरेसे उत्पन्न निघू शकत नव्हते. त्यावर मात करण्यासाठी जलसिंचनाच्या विविध योजना राबविण्यात आल्या. सातारा शहराजवळील वसना नदीवर वसना व कृष्णा संगमाच्या वरील बाजूस १६ कि.मी. अंतरावर रेवडी ता. कोरेगाव येथे रेवडी बंधारा आहे. सन १७८१ च्या सुमारास या बंधाऱ्याचे बांधकाम पाडळीचे वंशपरंपरागत कुलकर्णी नारो अप्पाजी यांनी सुरू केले. हे पेशव्यांच्या पदरी अधिकारी म्हणून काम करीत होते. त्यांच्या कारकिर्दीत बंधाऱ्याच्या भिंतीचे काम झाले परंतु कालव्याचे काम झाले नव्हते. हा विभाग ब्रिटिशांच्या अधिकाराखाली आल्यानंतर १८४९ मध्ये बंधाऱ्याचे उर्वरित काम पूर्ण झाल्यानंतर त्यामधून पाणी सोडण्यात आले. परंतु कालव्यास पाहिजे तेवढा उतार नसल्याने व कालव्यावरील दोन बोगदे अतिशय लहान असल्याने त्यात मध्येच पाणी थांबत असे. त्यामुळे पाणी सोडण्याचे बंद केले. सन १८६३ मध्ये पाटबंधारे विभागाने बंधाऱ्याच्या दुरूस्तीचा प्रस्ताव मांडला. नारो अप्पाजीच्या वंशजाने नऊ एकर शेतील मोफत पाणी देण्याच्या अटीवर बंधाऱ्याच्या ताबा शासनास दिला. यानुसार नदीच्या पात्रातील बांधकामाची व कालव्याची दुरूस्ती करण्यात आली. याला एकच कालवा असून त्याची लांबी १० कि.मी. आहे. सन १८६५–६६ मध्ये कालव्यातून पाणी सोडण्यात आले. पाण्याचे वितरण सुरू झाल्यानंतर त्यातील काही पाणी कृष्णा खोऱ्यापर्यत नेण्यात आले. याकरिता लागणाऱ्या पाटाचे काम गावकऱ्यांनी केले. कालव्यातून दर सेंकदाला १५ घनफूट पाणी सोडले जात होते. त्या वर्षी याचे जलप्रदाय क्षेत्र २,४२८ हेक्टर होते. त्यात २,१६१ हेक्टर क्षेत्र कृषी योग्य होते. यापैकी १, ४८३ हेक्टर क्षेत्र लागवडीखाली होते. कोरेगाव तालुक्यातील सात गावांची २१० हेक्टर जमीन भिजत होती. सिंचन झालेल्या क्षेत्रापैकी ६५ हेक्टर खरीप व १४५ हेक्टर रबी पिकाखाली होते. त्यापैकी ज्वारीखाली ४९, गव्हाखाली ४४, भुईमुगाखाली ८७ व ऊसाखाली १२ हेक्टर क्षेत्र होते. त्यावर्षी पाणीपट्टीचा एकरी दर वर्षासाठी १८ रूपये, आठ महिन्यासाठी ४

रूपये, चार महिन्याकरिता २ रूपये व हंगामी कोरडवाहू पिकांसाठी १ रूपया होता.[३३] सन १९२५ मध्ये या बंधाऱ्याचे जलसिंचनाचे क्षेत्र १, ५४३ हेक्टर, कृषी योग्य क्षेत्र १,४६७ हेक्टर व सिंचनक्षेत्र ७७७ हेक्टर होते.[३४]

याशिवाय सातारा येथील जमीन ही कृष्णा व वेण्णा नदीच्या पाण्याने भिजवली जात होती. तसेच सातारा परिसरात अनेक लहानमोठया विहिरीद्वारेही जमीनीचे सिंचन केले जात होते. डोंगर उतारावरील पाणी अडवून त्याठिकाणी छोटे मोठे अनेक बंधारे बांधले जात होते व त्याद्वारे त्या ठिकाणी येणारे क्षेत्र भिजविले जात होते.

### ४.४.६ कुळवहिवाट व भूधारणा पद्धती

इ.स.१८६५ पासून सातारा जिल्हयात भूधारणा पद्धतीच्या दुमाल, मिरास, उपरी, शेरी व इस्तावा या पद्धती अस्तित्त्वात होत्या. दुमाला सुधारणा पद्धतीचे इनाम व देणग्या असे प्रकार होते. इनामामध्ये धर्मादाय देणग्या, देवस्थानास दिलेल्या देणग्या, राज्यविषयक देणग्या व सेवेच्या बदल्यात दिलेल्या देणग्यांचा समावेश होता. या बहुतेक देणग्या १६१८ ते १८३८ या कालावधीत होत्या.

मिराशी जमिनी म्हणजे वंशपरंपरेने चालणारा कायम रयतावा होता. मिराशी जमिनीचा मिरासदार विहित सारा सरकारला भरत असे. मिरासदारांना स्थळकरी किंवा थळकरी म्हणत असत. यांना आपल्या जमिनीचे हक्क विकता किंवा गहाण ठेवता येत होते. मिरासदार वसूल झालेल्या साऱ्यामधून ठरलेला विहित सारा सरकारला भरीत असत. सन १८८२ मध्ये संपूर्ण सातारा जिल्हयात मिराशी भूधारणाधिकार चालू होता.[३५]

उपरी लोक हे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जमीन कसण्याकरिता येत असत. उपऱ्या कुळांना वर्ष संपताना जमिनी भाडेपट्टयाने दिल्या जात होत्या. या जमिनीचा खंड मक्ता नियमित जमीन आकारणीपेक्षा कमी असे. ज्या उपरी जमिनीवर संपूर्ण कर आकारला जात होता. त्यास चाली जमीन संबाधले जात होते. मिरास जमिनीप्रमाणे या जमिनीस विशेष अधिकार नसत. शेरी जमिनी या राजेराजवाडयांच्या खाजगी उपयोगासाठी ठेवलेल्या असत. या जमिनीवर मामलेतदार कारभार पाहात असे. तो या जमिनी लिलाव पद्धतीने ठराविक मुदतीमध्ये लागवडीस देत असे. लिलावामध्ये जो जास्त मोबदला देणयचे मान्य करील त्यास ती जमीन लागवडीस मिळत असे.

जी पडीक जमीन लागवडीखाली आणले जाते त्या जमिनीस इस्तावा वहिवाट म्हणतात. ही पाच ते सात वर्षाच्या भाडेपट्टयाने कसण्यास दिली जाते. जोपर्यत ही जमीन पूर्ण पिकाऊ होत नाही तोपर्यंत तिच्या भाडयामध्ये थोडी थोडी वाढ होते. काही काळाने ती चांगली जमीन बनते. त्यानंतर तिचे उपरी व मिरासी जमिनीत रूपांतर होते.

इ.स.१८६५ च्या भूमापन अधिनियमाने वरील सर्व धारणाधिकार नष्ट झाले आणि वारसाने आणि हस्तांतराने मिळणाऱ्या अधिकाराची रयतवारी पद्धत चालू झाली. सरकारने दिलेल्या जमिनीवर हस्तांतरण आणि विक्री या संबंधीचे काही निर्बंध घातले. अशा नवीन अधिकारांना नवीन धारणाधिकार असे म्हणतात.[३६]

## ४.४.७ तुकडेजोड योजना

निरनिराळया कारणामुळे शेतीचे लहान लहान तुकडे होऊन ते इतस्ततः विखुरलेले होते. लहान तुकडे कसण्यास अनेक अडचणी येत होत्या. व उत्पादनात घट होत होती. हा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने तुकडेबंदी व तुकडेजोड अधिनियम १९४७ संमत केला होता. या अधिनियामानुसार किफायत शीर शेतीसाठी किमान आवश्यक म्हणून जमिनीच्या प्रकारानुसार जिरायत जमिनीसाठी ०.८१ हेक्टर, बागायत जमिनीसाठी ०.४१ हेक्टर व केवळ रब्बी हंगाम येणाऱ्या जमिनीसाठी ०.२७ हेक्टर असी प्रमाणक्षेत्रे ठरविण्यात आली होती.

वरील प्रमाणक्षेत्राहून कमी असलेल्या सर्व शेतजमिनी तुकडे म्हणून समजले जातील. असे तुकडे त्यांना लागून असलेली शेते ज्यांच्या ताब्यात आहेत अशा व्यक्तीखेरीज इतरांच्या नावावर करून देण्यास बंदी घालण्यात आली.[३७]

## ४.४.८ कृषी अवजारे

विसाव्या शतकात शेतीसाठी नांगर, कुरी, कुळव, कोळपे व चिखलाचे औत ही अवजारे होती. नांगरामध्ये थोरला नांगर व नांगरी(लहान नांगर) असे प्रकार होते. त्यावेळी दोन बैलांनी ओढण्याच्या नांगराची किंमत फक्त एक रूपय होती. जमिनीच्या मगदुरानुसार पाभरीस दोन ते आठ बैले लागत असत. पाभरी किंमत दोन रूपये होती. कुळवाची किंमत एक रूपया चिखलाच्या औताची किंमत ८ ते १२ आणे होती. लहान अवजारांमध्ये कुदळ, फावडा, कुऱ्हाड, कोयती, दाताळे, खुरपे यांचा समावेश होत होता.[३८]

### ४.४.९ दुष्काळ

भारतातील बऱ्याच भागात इ.स.९४१, १०२२ व १०३३ या वर्षामध्ये दुष्काळ पडला होता. यात असंख्य लोक मृत्यूमुखी पडून मानव कलेवर भक्षणापर्यंत पाळी आली होती. सन ११४८ ते ११५९ या कालावधीत भारतातील काही भागात सतत ११ वर्षे दुष्काळ पडला होता. असंख्य लोक मृत्युमुखी पडले होते.[३९] भारतात सन १३९६ ते १४०७ या काळात सतत १२ वर्षे दुष्काळ पडला होता. पुढे १४२१ व १४२२ ही दोन वर्षे मोठया प्रमाणावर कोरडा दुष्काळ पडला होता.[४०] सन १४६०, १४७२ व १४७३ या वर्षीही पाऊस न पडल्याने दुष्काळ पडला होता. सन १५२० मध्ये सैन्याच्या आक्रमणामुळे पिकांची नासधूस झाल्याने दुष्काळ पडला होता.[४१]

शिवजन्माच्यावेळी (इ.स.१६३० ते १६३२) महाराष्ट्रात प्रचंड दुष्काळ पडला होता. या दोन वर्षात महाराष्ट्रात मोठे अवर्षण पडून प्रातांत अन्नानदशा झाली. त्यामुळे एवढ्या प्रचंड फौजांना अन्न पुरविणे अशक्य होऊन शहाजहान बादशहास विमनस्कतेने आग्र्याला परत जाणे भाग पड्ले. पुढे सन १६५३ पर्यत मुघल बादशहाच्या खजिन्यात दक्षिणेतून एकही पैसा जमा झाला नाही. एवढेच नव्हे तर स्थानिक प्रशासनाचा खर्चही या भागाला करता येत नव्हता. बादशहानामा या ग्रंथात दुष्काळाचे भेदक वर्णन आलेले आहे. इंग्लिश फॅक्टरी रेकॉर्डमध्ये असे म्हटले आहे की, हा दुष्काळ इतका भीषण होता की, देशाच्या इतिहासात त्याला तोड सापडणार नाही.[४२] याशिवाय महाराष्ट्रात सन १७०२–१७०४, १७१४–१५, १७९१–१७९२, १८०२–०३ या काळातही मोठे दुष्काळ पडलेले होते.[४३]

सातारा शहर व परिसरात अल्प प्रमाणात दुष्काळ पडले होते. मात्र सातारा शहराच्या पूर्वेकडील माण, खटाव, फलटण व खंडाळा तालुक्यामध्ये अवर्षण किंवा अनियमित पावसामुळे वारंवार दुष्काळ पडत होते. सर्वसाधारणपणे मुंबईपुणेबंगळुर राष्ट्रीय महामार्गाच्या पूर्वेकडील भूभाग कमी पावसाचा भाग मानला जातो.

#### ४.४.९.१ सन १८०२–०३ मधील दुष्काळ

सन १८०२ मध्ये पाऊस कमी पडलेला होता. याची तीव्रता सातारा येथे कमी प्रमाणात होती. इतरत्र म्हणजे सोलापूर, खानदेश, अहमदनगर व विजापूर येथे याची मोठी तिव्रता जाणवत होती. सातारा परिसरातील पीके चांगल्या प्रकारची असूनदेखील त्याकाळात यशवंतराव

होळकर यांचे सैन्य व त्याच्या संस्थांनातील पेंढाऱ्यांनी तयार केलेल्या खरीप पिकांची नासधूस केली. त्यानंतर रब्बी पिकांची पेरणी झाली, परंतु अवर्षणाने त्या पिकांचेही नुकसान झाले. उत्तरेकडील दुष्काळी भागातून लोक साताऱ्यामध्ये आल्याने जिल्हयात दुष्काळची तीव्रता वाढली. सन १८०३ मध्येही पाऊस पडल नाही. त्यामुळे परिस्थिती आणखीनच भीषण बनली. स्थानिक लोकांच्या सांगण्यानुसार या काळात माणुस माणसाचे मांस खाऊन जगत होता. यावेळी एका रूपयाला एक शेर धान्य मिळत होते या काळात भुकेने व्याकूळ झालेली या भागातील २५,००० माणसे पंतप्रतिनिधी, सरदार रास्ते व काही सुखवस्तू घराण्यांकडून काही अन्न मिळेल या हेतून वाईला जमली होती. त्यातील १०,००० लोक वाईतच मृत्यू पावले.[४४]

### ४.४.९.२ सन १८२४–२५ मधील दुष्काळ

या वर्षी मान्सूनचा पाऊस कमी पडल्याने पीके वाळून गेली होती. यावेळी धान्याच्या किंमती वाढल्या होत्या. एका रुपयास ५.५९ कि.ग्रॅ.(६ शेर) ज्वारी मिळत होती. यावेळी ज्या सरकारी नोकरांचा पगार २०० रूपयापेक्षा कमी होता अशांना धान्यरूपाने नुकसान भरपाई दिली होती. सन १८६० मध्ये एक मण गव्हाची किंमत २ रूपये १ आणा ६ पै होती. ती १८६२ मध्ये ४ रूपये झाली. सन १८६०–६१ मध्ये बाजरीची किंमत एक मणास एक रूपया आठ आणे होती, ती ऑक्टोबर १८६२ मध्ये तीन रूपये पंधरा आणे झाली.[४५]

### ४.४.९.३ सन १८७६–७७ चा दुष्काळ

सन १८७६ मध्ये सरासरी ९७५ मि.मी.पाऊस पडला होता. शिवाय पर्जन्याची विभागणी अत्यंत प्रतिकूल होती. त्यामुळे दुष्काळ पडून अर्ध्याहून अधिक जिल्हा आपदाग्रस्त झाला. जिल्हयाच्या पूर्व व आग्नेय भागात दुष्काळाची तीव्रता अधिक होती. यामध्ये संपूर्ण माण व खटाव तालुके तसेच खानापूर व तासगाव तालुक्यातील पिकांचे नुकसान झाले. धान्याच्या किंमती वाढल्या. ज्वारी एका रूपयास १६ कि.ग्रॅ. वरून ८ कि.ग्रॅ. झाली. शेतीचे काम नसल्याने मजुरांचे हाल होऊ लागले. ऑक्टोबरमध्ये सरकारी मदतीची निकड भासू लागली. धान्य व्यापाऱ्यांनी साठेबाजी केल्यामुळे धान्य उपलब्ध होत नव्हते. शहरातील गरीब लोकासाठी जिल्हाधिकाऱ्याने ८,५६० रूपयांची ज्वारी मुंबईहून मागविल्याने व्यापाऱ्यांनी धान्य विकावयास सुरूवात केली. परिणामतः डिसेंबरपासून मार्चपर्यत धान्यटंचाईची तीव्रता कमी भासली. उन्हाळयात मात्र दुष्काळाची तीव्रता वाढून धान्याच्या किंमती अधिकच वाढल्यामुळे आपदाग्रस्त

लोक हवालदिल झाले.

जानेवारी १८७७ मध्येही पाऊस पडला नाही. धान्याची आयात झाल्याने पुरवठा पुरेसा होता. नेर तलावाच्या कामावरील मजुरांमध्ये देवीची साथ सुरू झाली. सातारा येथेही कॉलेऱ्याची साथ पसरत होती. त्यामुळे अनेक लोक मृत्युमुखी पडत होते. मे महिन्याच्या शेवटी सातारा येथे पाऊस पडू लागल्याने लोक पुन्हा सातारा येथे येऊ लागले. जूनच्या दुसऱ्या आठवडयात पूर्वेकडून जोरदार वारे वाहू लागल्याने मान्सूनचा पाऊस २२ जूनपासून चांगला पडला होता. या महिन्यात सरासरी १०.८१ इंच इतका पाऊस पडला होता. त्यामुळे स्थलांतरित लोक पुन्हा हळूहळू परतू लागले. शेतकऱ्यांनी पेरणी केली. पिकेही सर्वसाधारणपणे चांगली होती. परंतु मध्येच पाऊस थांबल्याने पुन्हा पिके सुकून जाऊ लागली. शेवटी पाऊसच न पडल्याने धान्याच्या किंमतीत मोठया प्रमाणावर वाढ झाली होती. नोव्हेंबर १८७६ ते नोव्हेंबर १८७७ या कालावधीत सातारा येथे दुष्काळी छावणी उभारण्यात आली होती. छावण्यामधील लोकांच्या निवासाची व्यवस्था धर्मशाळा, चावडया व देवळामध्ये करण्यात आली होती. काही ठिकाणी तंबू अथवा झोपडया उभारल्या होत्या.  सन १८७६–७७ च्या दुष्काळात एकूण २,१८,२७४ जनावरे मृत्युमुखी पडली होती.

दुष्काळी परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या डेक्कन रॉयटस कमिशन नेमणे सरकारला भाग पडले. या कमिशनच्या अहवालानुसार डेक्कन ॲग्रिकल्चरिस्टस रिलिफ ॲक्ट(१८७९ चा अधिनियम क्र.१७) हा कायदा सातारा जिल्हयाला लागू करणेही शासनला भाग पडले. कर्ज निवारणासाठी शेतकरी ऋणकोंना थोडाफार दिलासा मिळाला.[४६]

### ४.४.९.४ सन १८९१–९२ चा दुष्काळ

सन १८९१ मध्ये मान्सूनच्या पावसाला उशिरा सुरूवात झाल्याने पेरण्या उशिरा झाल्या. पिकांची वाढ न झाल्याने दुष्काळी परिस्थिती पसरली होती.

### ४.४.९.५ सन १८९६–९७ चा दुष्काळ

सन १८९६ मध्ये प्रारंभी मान्सूनचा पाऊस पडला होता. परंतु सप्टेंबरमध्ये पाऊस थांबल्याने पिके सुकून जाऊ लागली. थोडी खरीप पीके आली परंतु रब्बी पीकांचे नुकसान झाले. पश्चिम भागात वादळी पावसामुळे खरीप पिकांचे फार मोठ नुकसान झाले होते. त्यामुळे दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण झाली होती.[४७] सन १८९६ च्या ऑक्टोबर व नोव्हेंबरमध्ये

अन्नधान्याचा तुटवडा भासू लागला. कराडमधील लोकांनी धान्य व्यापाऱ्यांची दुकाने लुटली होती. सरकारने जमीन महसूलात सुट दिली होती.[४८]

### ४.४.९.६ सन १८९९ चा दुष्काळ

सातारा येथे या वर्षी पाऊस न पडल्याने पिके वाळून गेली होती. या काळात या भागात दुष्काळी कामे सुरू झाली होती.

### ४.४.९.७ सन १९०५–०६ मधील दुष्काळ

सन १९०५ मध्ये रब्बी हंगामात व १९०६ च्या खरीप हंगामात पाऊस न झाल्याने पिके नष्ट झाली. यावेळी रेल्वेने धान्य इतर राज्यातून आणल्याने धान्याच्या किंमती वाढल्या नाहीत. बऱ्याच लोकांनी मुंबईस व इतरत्र स्थलांतर केले होते. दुष्काळी कामे सुरू करण्यात आली. जमीन महसुलात सुट देण्यात आली होती.[४९]

### ४.४.९.८ सन १९१३ चा दुष्काळ

या वर्षी जूनमध्ये मोठा पाऊस झाला होता. जुलैमध्ये थोडासा झाला. त्यानंतर सप्टेंबरमध्ये पाऊसच पडला नाही. त्यामुळे संपूर्ण खरीप पिके नष्ट झाली. रबी पिकांची पेरणीच झाली नाही.

### ४.४.९.९ सन १९१८ ते १९२१ चा दुष्काळ

या वर्षी फारच कमी पाऊस पडला. जूनच्या सुरूवातीस थोडासा पडला. साताऱ्याच्या पूर्व भागात पाऊस पडला नाही. त्यामुळे संपूर्ण खरीप पिके नष्ट झाली. शरद ऋतुतील पाऊस कमी पडल्याने रबी पिके चांगली नव्हती. नोव्हेंबर–डिसेंबरच्या सुरूवातीला थोडासा पाऊस झाल्याने पिकात थोडीशी सुधारणा झाली होती. पहिल्या महायुद्धाच्या काळात आर्थिक मंदीमुळे या दुष्काळाची तीव्रता जाणवली.[५०]

### ४.४.९.१० १९२५–२६ चा दुष्काळ

या वर्षी सातारा व परिसरात पाऊस न झाल्याने खूपच बिकट अवस्था झालेली होती. यावेळी सातारा–पंढरपूर रस्त्याच्या दुरूस्तीच्या कामावर ४०० दुष्काळग्रस्तांवर १५,७०० रूपये खर्च आला. विकलांग दुष्काळग्रस्तांसाठी ७,८४३ रूपयांची आर्थिक मदत देण्यात आली. जनावरांसाठी वैरण मोफत वाटण्यात आले होते.[५१]

### ४.४.९.११ १९४०–४१ चा दुष्काळ

या वर्षी पाऊस न पडल्याने प्रचंड दुष्काळ पडला होता. या काळात आपदाग्रस्तांना रस्त्याची कामे देऊन रोजगार उपलब्ध करून दिला होता. तसेच त्यांना १,०२० रूपयांची आर्थिक मदत व जनावरासाठी वैरणीचे मोफत वाटप केले होते.

### ४.४.९.१२ सन १९४२–४३ चा दुष्काळ

यावर्षी बेताचा पाऊस पडल्याने खरीप व रब्बी पीके नष्ट झाली. आपदाग्रस्तांना धान्य व बेकार भत्ता देणयसठी ४३,३००रूपये खचे करण्यात आला होता. शेतकऱ्यांना बैल, जनावरांचे खाद्य, बियाने इत्यादी घेण्यासाठी ६०,७६८ रूपये तगाई कर्ज दिले होते.

### ४.४.९.१३ सन १९४५–४६ चा दुष्काळ

या वर्षी अपुरा पाऊस पडल्याने खरीप व रब्बी पीके नष्ट झाली. लोकांना पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी २१,११३ रूपये खर्च करण्यात आले होते. सातारा शहरातील लोकांना २३,००० रूपयाची मदत केली होती. या भागातील जमीन महसूल माफ करण्यात आलेला होता. या काळात लोकांना धान्य, व जनावरांसाठी पेंड, गवत, मोफत वाटप केले होते.[५२]

### ४.४.१० पूर व गारपीट

७ एप्रिल १८५० रोजी सातारा शहराजवळील कोंडवे या गावी नारळाएवढया गारांचा पाऊस पडला होता. या गारामुळे बरीच घरे पडली व गुरे मृत्युमुखी पडली. एवढेच नव्हे तर नद्यामधील मासेसुद्धा मेले होते. बराच वेळ गावाशेजारील टेकडी गारांनी आच्छादली होती.[५३]

जुलै १८५३ मध्ये भरपूर पाऊस पडल्याने कृष्णा व वेण्णा नदीस पूर आलेला होता. नदीकाठावरील काही गावातील घरे वाहून गेली होती. सन १९१३ मध्येही असाच पूर या नद्यांना आलेला होता. सन १९१४ मध्ये असाच पूर या नद्यांना येऊन काठावरील गावांचे नुकसान झाले होते.[५४]

### ४.४.११टोळधाड

सन १८८३ टोळधाडीने खरीप पिके फस्त केली होती. टोळ नावाचा हा एक किटक असून हे किटक समूहाने पिकावर धाड टाकीत असत. सर्व पिक फस्त करीत असत. यावेळी शासनाने महसुलात १,३८० रूपयांची सूट दिली होती. नाव्हेंबर १९०३ टोळधाड आली ती मार्च १९०४ पर्यत होती. या धाडीने संपूर्ण पिके फळे नष्ट केली. सन १९०५, १९२८–२९,

१९२९–३० व १९४७–४८ मध्ये अशाच प्रकारची टोळधाड आली होती.

### ४.४.१२ उंदराचा उपद्रव

सन १८७८ मध्ये सातारा परिसरात उंदरांची संख्या मोठया प्रमाणावर वाढली होती. रबी हंगामातील पिके उंदरांनी फस्त केली होती. सन १८७९ मध्ये उंदरानी पिकांचे नुकसान केले होते. उंदरांना मारण्याकरिता शासनाने २०० रूपये बक्षिस म्हणुन वाटले होते. मात्र पाऊस पडल्याने उंदरांचा नाश झाला होता.[५५]

## ४.५ पशुधन व दुग्धव्यवसाय

शेतीबरोबरच एक पुरक व्यवसाय म्हणून या व्यवसायाकडे पाहिले जाते. सातारा शहरात त्या काळात खिल्लार गाई पाळल्या जात होत्या. त्याचे मोठे कळप होते. त्याचबरोबर मेंढरांचेही कळप असत. खिल्लार गाई पाळण्याचा मुख्य उद्देश जातिवंत बैल शेतीच्या व इतर कामासाठी मिळत असत. उत्तम बैल व दुभत्या गायी उत्पन्न व्हाव्या आणि खतांचा व दुधाचा उपयोग लोकांना व्हावा हा आहे.[५६]

पशुधनाचा अभ्यास, संशोधन अणि संवर्धन करण्याच्या हेतूने शासनाने सन १८८२ मध्ये पशुवैद्यक विभाग निर्माण केला. सन १८८६ मध्ये मुंबईत पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय सुरू केले त्यावेळी महाविद्यालयातूनच बाहेर पडलेल्या पदवीधरांना लष्करी सेवेत घेतले जात होते. मुंबई इलाख्यातील पहिले पशु पैदास केंद्र छारोडी(गुजरात) येथे सुरू झाले होते. सन १९१८ मध्ये पशुसंवर्धनाचे कार्य कृषी संचालकाकडे सोपविन्यात आले. सन १९३२ मध्ये पशुजैव पदार्थ निर्मिती सुरु झाली सन १९३७ मध्ये मेंढी विकास विभाग सुरू होऊन सन १९४३ मध्ये जनावरांचे सांसर्गिक रोग निर्मूलन कार्य हाती घेण्यात आले. सन १९४७ मध्ये पशुसंवर्धन काम कृषी संचालकाकडे पशुवैद्यक विभागाकडे हस्तातंरित करण्यात आले.[५७]

सातारा येथील पशुधन चांगल्या दर्जाचे असून जनावरांचा चाराही मुबलक मिळतो. या भागात बागायती क्षेत्र मोठया प्रमाणावर असल्याने हिरव्या चाऱ्याचा चांगला पुरवठा होत होता. दूध उत्पादनही चांगले होते. सन १८८२–८३ मध्ये सातारा येथे ३५,००० बैल, ५५,००० गायी, २७,००० म्हैशी, ३२०० रेडे, ५१५ घोडे, ६९० गाढवे, ३५०० शेळया–मेंढया, २३ उंट व ३ हत्ती होते.[५८]

**सन १९०१–१९१० ते १९३९–४० या दरम्यानची पशुधनगणनेनुसार पशुधनाची आकडेवारी**

| अ.न. | वर्ष | बैल | गायी | वासरे | रेडे | म्हैशी | रेडके |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १९००–०१ | ७,५०० | ९,०४४ | माहिती नाही | ३३० | ३,९१४ | ३,२११ |
| २. | १९०९–१० | ८,९०० | १२,३८७ | माहिती नाही | ५४३ | ४,९१७ | ४,११२ |
| ३. | १९१९–२० | ९,३०० | १३,१०० | १,९१० | ६४० | ५,३१२ | ४,६१०१ |
| ४. | १९२९–३० | १०,१०१ | ७,६१८ | २,२२१ | ७५४ | ५,६१८ | ४,९१८ |
| ५. | १९३९–४० | ११,४४४ | १३,२३४ | ७,५८५ | १,२२२ | ७,७१९ | ५,७०० |

**सन १९०१–१९१० ते १९३९–४० या दरम्यानची पशुधनगणनेनुसार पशुधनाची आकडेवारी**

| अ.न. | वर्ष | मेंढया | शेळया | घोडे | इतर पशुधन | कोंबडया | बदके |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १९००–०१ | २१,२१२ | २०,५१२ | ७३३ | ५१२ | माहिती नाही | माहिती नाही |
| २. | १९०९–१० | २३,४३३ | २१,७०० | ५०५ | ४८६ | माहिती नाही | माहिती नाही |
| ३. | १९१९–२० | २५,७१३ | ८,११० | ४९४ | ४५० | माहिती नाही | माहिती नाही |
| ४. | १९२९–३० | २७,४४४ | २३,५४८ | ४५१ | ४१२ | माहिती नाही | माहिती नाही |
| ५. | १९३९–४० | २९,३११ | २८,२१३ | ४४८ | ३९६[९९] | माहिती नाही | माहिती नाही |

अशा प्रकारे सातारा शहर व परिसरात वरीलप्रमाणे पशुधन असून यातील काही प्राणी दुधासाठी उपयुक्त असल्याने सातारा शहरात आर्थिक साधन म्हणून होते. तेव्हा या प्राण्याच्या चांगल्या जातीची पैदास करण्यासाठी शासन व समाज नेहमीच प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते.

## ४.६ व्यापार

### ४.६.१ साप्ताहिक बाजार

आठवडे बाजाराची पद्धती फार प्राचीन काळापासून अस्तित्त्वात होती. अन्नधान्य, डाळी, तेल, मिरची, मसाले, गूळ, कापड, फळे, भाज्या, तांबे–पितळीची भांडी इत्यादी वस्तू बाजारात विक्रीसाठी आणल्या जात होत्या. पूर्वीच्या बाजारामध्ये स्थानिक वस्तूंची विशेषतः शेतमालाची विक्री होत असे. हे बाजार म्हणजे मालाचे वितरण करणारी केंद्रे होती. बाजाराच्या

दिवशी फेरीवाले व व्यापारी आपापली दुकाने बाजारात लावतात. जवळपासच्या खेडयातील शेतकरीही शेतीमाल विक्रीस आणतात. सन १८८२ मध्ये साप्ताहिक आणि द्विसाप्ताहिक असे ३ बाजार होते.[६०]

### ४.६.२ व्यापारी पेठ

मध्ययुगीन काळापासून सातारा येथे व्यापारी पेठ अस्तित्त्वात आली होती. या बाजारपेठेत स्थानिक मालांच्या विक्रीबरोबरच परप्रांतातून आयात मालाची विक्रीही होत होती. या पेठेतून भुईमूगशेंगा, हळद, मिरची, गूळ, तांदूळ, तंबाखू, धणे, घोंगडी इत्यादी माल प्रामुख्याने मुंबई, पुणे व कोकणात पाठविला जात होते. मुंबई व पुण्याहून विदेशी कापड नागपूर व सोलापूरहून कापड, चिपळूण, महाड व रत्नागिरीहून नारळ, खजूर, खारीक, सुपारी, मीठ व मसाल्याचे पदार्थ याची आयात होत असे. तसेच येथे तयार होणारे महिलांचे झगे, चोळखण, हातमागावरील कापड आणि आयात केलेली लुगडी यांची विक्री स्थानिक बाजारात तसेच कोष्ती, कासार, तेली, तांबोळी, लिंगायत वाणी, मराठा कुणबी व मुसलमानांचा समावेश होता. सन १८८४ मध्ये सातारा येथे ५०० व्यापारी होते. प्रारंभी सातारा येथील बाजारपेठेतून काळी काकवी, धान्य, भुईमूग शेंग, हळद, मिरची, कापूस, लाकूड व कापडाची निर्यात होत असे. ज्वारी गहू, हळद व तंबाखू सातारा येथून चिपळूण मार्गे मुंबईस पाठविण्यात येत होती.[६१]

### ४.६.३ व्यापारी मार्ग

मराठयांच्या काळात सहयाद्रीच्या घाटमाथ्यावर दोन प्रमुख मार्ग होते. त्यापैकी पुणेकोल्हापुर आणि कर्नाटक हा मार्ग पुणे जिल्हयातील बोर घाटातून निघून कोरेगावच्या क्रमशः ईशान्येस व आग्नेयेस असलेल्या सालपे घाटातून पुढे सातारा–तासगावमार्गे मिरजला किंवा तारगाव व मसूरहून कराडला जात होता. सातारा शेजारील देऊर गावच्या नैऋत्येस सालपे घाटातून बैलगाडयांची वाहतूक केली जात होती.

इ.स.१८२६ मध्ये सातारा जिल्हयात रहदारीचे प्रमुख दहा मार्ग होते. त्यापैकी दोन उत्तरेकडून दक्षिणेस पुण्याहून बेळगावला जाणारे, दोन साताऱ्याहून ईशान्येस पुणे जिल्हयातील शिरूर व अहमदनगरला जाणारे, दोन साताऱ्याहून पुर्वेस सोलापूरकडे जाणारे होते. सातारा येथून खंबाटकी घाटातून जाणारा एक रस्ता होता. त्या रस्त्याने जनावरे वाहतूक केली जात होती. साताऱ्याहून ईशानयेस जाणाऱ्या दोन मार्गापैकी पुणे जिल्हयातील शिरूरला जाणाऱ्या

मार्गाची लांबी १४० कि.मी. होती. तर अहमदनगरला जाणाऱ्या रस्त्याची लांबी १९३.१ कि.मी.होती. हे दोन्ही मार्ग सातारा ते शिरवळपर्यंत खंबाटकी घाटातून पुणे बेळगाव मार्गावरून एकत्रित जात होते. साताऱ्याहून पूर्वेस पंढरपूरमार्गे सोलापूरला जाणाऱ्या दोन रस्त्यापैकी त्रिपुटी, विसापूर, खातगुन व पिंगळीवरून जाणाऱ्या मार्गाची लांबी २०९.२ कि.मी. होती. दक्षिण बाजूने रहिमतपूर पुसेसावळी मायणी व कलेढोण घाटमार्गाने जाणाऱ्या मार्गाची लांबी २३८.१८ कि.मी. होती.[६२]

इ.स.१८४० पूर्वीची बैलगाडयांच्या मार्गाची माहिती उपलब्ध नाही. त्या सुमारास सालपे घाटातून धावणारा पुणे–सातारा हा पहिला बांधलेला मार्ग होय. सन १८४१ मध्ये तो बैलगाडयासाठी योग्य करण्यात आला. १८४८ मध्ये जुना पुणे आणि सातारा महाबळेश्वर हे जुने मार्ग वगळता इतरत्र मालाची वाहतूक बैलांच्या पाठीवरून केली जात होती. सातारा ते कोल्हापूर हा मार्ग मसूर, कराड व कासेगाव नंतर वारणा नदी ओलांडून जात असे. हे दोन्ही मार्ग बैलगाडयांसाठी अंशतः योग्य होते. इ.स.१८४८ मध्ये सालपे घाटातून जुन्या पुणे मार्गावरून बैलगाडयाची मासिक सरासरी वाहतूक ३००० होत होती. इ.स.१८४९ मध्ये साताऱ्याचा तात्कालिन कमिशनर सर बार्टल फ्रिअर याने नमूद केले आहे की, साताऱ्यातील प्रमुख बाजारपेठेतून समुद्रकिनाऱ्यापर्यंतचे सरळ अंतर साधारणतः ५६.३ ते ९६.५ कि.मी.होते, तर दख्खन व खानदेशातील इतर बाजारपेठांशी ते साधारणतः ८०.४ ते २०१.१ कि.मी. होते.

सन १८४९ मध्ये सातारा जिल्हयातून सहयाद्री पर्वतामधून कोकणात जाणारे घाटमार्ग ओझी लादलेल्या गुरांसाठीच योग्य होते. असे अनेक मार्ग त्यावेळी अस्तित्त्वात होते दोन घाटमार्गामधील अंतर अंदाजे २४.१४ ते ४८.२८ कि.मी. होते इ.स.१८४९ मध्ये कुंभार्ली घाटातून बैलांची वाहतूक मासिक सरासरी १,४४, ६६४ होती. सन १८५७ मध्ये वरंधा घाट बांधल्यामुळे महाडकडून वाईकडे सन १८७६ मध्ये फिट्झगेराल्ड घाट बांधल्यामुळे महाडहून वाईमार्गे सातारा अवघ्या ८०.४ कि.मी.एवढया अंतरावर होता.[६३]

ब्रिटिश काळात सातारा जिल्हयातील रस्ते मुंबई इलाख्यातील इतर जिल्हयापेक्षा चांगले होते. त्यावेळी एकूण ५१ मार्ग होते. त्यापैकी साताऱ्याशी संबधित मार्ग म्हणजे सातारा–लोणंद–पुणे, सातारा–तासगाव, सातारा–महाबळेश्वर, सातारा–पंढरपूर असे होते.[६४]

## ४.७ वाणिज्य बँक

अण्णासाहेब चिरमुले यांनी २० ऑगस्ट १९०७ रोजी सातारा स्वदेशी कमर्शियल बँकेची स्थापना केल्यापासून वाणिज्य बँकांच्या जिल्हयातील व्यवहाराचा प्रारंभ झाला. साताऱ्यास सन १९३६ मध्ये युनायटेड वेस्टर्न बँक ऑफ इंडियाची स्थापना झाली. फलटणला मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी सन १९१८ मध्ये फलटण बँकेची स्थापना झाली. सन १९३८ मध्ये औंधला बँक ऑफ औंधची स्थापना झाली होती. पुढे या बँकाच्या अनेक शाखा निघाल्या.[६५]

## ४.८ आयुर्विमा

सन १९१३ मध्ये साताऱ्यास बा.ग.चिरमुले उर्फ नानासाहेब यांनी वेस्टर्न इंडिया लाईफ इंश्युरन्स कंपनी स्थापन केली. कंपनी विमा निधी १९४९ मध्ये ३,२५,३६,८३६ रूपये होता. कंपनीचे एकंदर खर्चाचे प्रमाण अत्यल्प म्हणजे उत्पन्नाच्या केवळ २३.०९ टक्के होते.[६६]

## ४.९ उद्योगधंदे

सातारा येथील उद्योगधंदे पाहत असताना प्रामुख्यने औद्योगीकरणाचा इतिहास पाहावा लागतो. हा इतिहास सन १९०१ ते १९४७ पर्यतचा सविस्तर दिलेला आहे. त्याचबरोबर सातारा येथील लहानमोठया कंपनीची माहितीही घ्यावी लागते यामध्ये वीज निर्मिती व वितरण, खाद्यपदार्थ उत्पादन, पेये, तंबाखू व तंबाखूचा पदार्थाचे उत्पादन, रसायने व रासायनिक पदार्थ, औषधे उत्पादन, रबर, प्लास्टिक, पेट्रोलियम आनि दगडी कोळशापासून होणारे उत्पादन, अधातू खनिज पदार्थ, काच व काचेच्या वस्तूंचे उत्पादन, धातूच्या वस्तू व सुटे भाग, यंत्रसामग्री, यांत्रिक अवजारे व सुटे भाग, वस्त्रोद्योग, लोकर, रेशीम व कृत्रिम कापड, कुटीरोद्योग, कमगार चळवळ इत्यादीची माहिती घेतलेली आहे.

### ४.९.१ सातारा येथील औद्योगीकरणाचा इतिहास

सातारा जिल्हयातील कुटिरोद्योग व गूळ तयार करणे हे प्राचीन काळापासूनचे व्यवसाय आहेत. सातवाहन काळात कराड हे समृद्ध व्यापारी केंद्र होते. प्रतापसिंह महाराजांनी साहित्य प्रकाशित व्हावे यासाठी सातारा येथे एक छापखाना सुरू केला इंग्रजी सत्ता रूढ झाल्यावर स्वयंपूर्ण अर्थव्यवस्थेचा ऱ्हास होण्यास प्रारंभ झाला. सन १८८७ मध्ये पुणे–मिरज लोहमार्ग कार्यान्वित झाल्यावर पाश्चिमात्य पद्धतीची औद्योगिक संरचना उपलब्ध होण्यास प्रारंभ झाला. लोहमार्गाच्या सुविधाबरोबर मुंबई व पुण्याशी निकटचा संबंध आल्यामुळे या जिल्हयात उद्योग

सुरू झाले जिल्हयाचा सन १९०१ पासूनचा औद्योगीकरणाचा इतिहास पुढीलप्रमाणे आहे.

### ४.९.१.१ इ.स.१९०१ ते १९१० चा कालखंड

सातारा येथे १९०६-०७ मध्ये धातूपासून निरनिराळया वस्तू तयार करण्याचा व १९०९ मध्ये कराडला आगपेटी तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. य कारखान्याच्या विकासासाठी कराड नगरपालिकेने बहेरच्या आगपेटयावर जकात वाढ करून संरक्षण दिले. सन १९१० मध्ये लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी औंध संस्थानातील किर्लोस्करवाडीस नांगर व शेतीची अवजारे तयार करण्याचा कारखाना सुरू केला.

### ४.९.१.२ इ.स.१९११ ते १९२० चा कालखंड

सन १९११-१२ मध्ये सातारा येथे काही तेलगिरण्या होत्या. सन १९१५-१६ मध्ये शासनाने स्थानिक उद्योगाच्या विकासासाठी एका सल्लागार समितीची स्थापना केली. समितीच्या अहवालानुसार खाद्यतेल उद्योगाच्या विकासासाठी प्रयत्न केले होते. नंतर तेलगिरण्या उत्तम स्थितीत सुरू झाल्या होत्या. सन १९२० मध्ये सातारारोडला धनजीशाह कूपर यांनी डिझेल इंजिन बनविणारा देशातील पहिला कारखाना सुरू केला.

### ४.९.१.३ इ.स.१९२१ ते १९३० चा कालखंड

सन १९२२ मध्ये सातारारोडला कूपर इंजिनियरिंग हा शेतीची अवजारे व नांगर तयार करण्याचा कारखाना सुरू केला होता. सन १९२५ मध्ये सातारा येथे एक छापखाना सुरू केला होता. सन १९२६ मध्ये सातारा येथे मो.ना.आगाशे यांनी आयुर्वेदीय अर्कशाळा सुरू केली. सन १९२९ मध्ये सातारा येथे रेशमाला पीळ देणे, गुंडाळणे व त्याला रंगविण्याचा एक कारखाना सुरू झाला. सन १९३० मध्ये साताऱ्याला जर्दा तंबाखूचा कारखाना सुरू झाला होता.

### ४.९.१.४ इ.स.१९३१ ते १९४० चा कालखंड

सन १९३३ मध्ये सातारा येथे सातारा इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी सुरू होऊन वितरण सन १९३५ मध्ये सुरू झाले.

### ४.९.१.५ इ.स.१९४१ ते १९५० चा कालखंड

सन १९४७ मध्ये सातारा येथे फेनॉल फॉर्मलडिहाईड मोल्डिंग पावडर तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. सन १९४८ मध्ये मुंबई राज्य परिवहन मंडळाने सातारा येथे एक वर्कशॉप सुरू केले होते. तसेच सातारा येथे दोन छापखाने व पाच भातगिरण्या सुरू झाल्या

होत्या. सन १९४८ मध्ये लिंब येथील यंत्रमाग कारखाना सातारा येथे स्थलांतरित झाला होता.[६७]

### ४.९.२ सातारा येथील वीज निर्मिती व वितरण

सन १९३३ मध्ये सातारा येथे सातारा इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी सुरू होऊन वितरण सन १९३५ मध्ये सुरू झाले. सन सातारा नगरपालिकेने कास तलावातून बिडाचे नळ घालून विशिष्ट उंचीवरुन पाणी खाली पडेल अशी व्यवस्था करून दिल्याने तेथे सातारा इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीने वीज निर्मिती सुरू केली. सातारा जिल्हयातील हे पहिले लहान जलविद्युत केंद्र होय. पुढे वीजेची मागणी वाढल्याने हे केंद्र कंपनीने बंद करून डिझेल जनित्र सुरू केले. या केंद्रातून सातारा शहर व सोळा कि.मी.परिसरातील खेडयांना वीज पुरविली जात असे. पुढे १ फेब्रुवारी १९५७ रोजी मुंबई राज्य विद्युत मंडळाची स्थापना झाली. त्यात हे विद्युत केंद्र विलीन करण्यात आले.[६८]

### ४.९.३ खाद्यपदार्थ उत्पादन

खाद्यपदार्थामध्ये साखर, गूळ, खाद्य तेल, मिरची व मसाला पावडर, बेकरी, बिस्किट व गोळया, बर्फ, लोणची, दुग्धजन्य पदार्थ इत्यादी तयार करणाऱ्या कारखान्यांचा समावेश होतो. साताऱ्यासह संपूर्ण जिल्हयात याचे उत्पादन मोठया प्रमाणात घेतले जात होते.

### ४.९.३.१ साखर उद्योग

अर्थव्यवस्थेला कलाटणी देणारा हा महत्त्वाचा उद्योग होता. सन १९३३ मध्ये साखरवाडीस फलटण सुगर वर्क्स या पहिल्या आधुनिक साखर कारखान्याची स्थापना झाली. यापूर्वी जिल्हयातील बहुतांश ऊसापासून गूळ निर्मिती होत असे. दुसऱ्या महायुद्ध काळात साखर कारखान्याचा हळूहळू विस्तार झाला. या कारखान्यातील गुंतवणूक व उत्पादन पुढीलप्रमाणे

| अ.न. | बाब | १९३७–३८ | १९४६–४७ |
|---|---|---|---|
| १. | गुंतवणूक(रू.) | ५०,८५,१९१ | ९४,९०,६२५ |
| २. | ऊस (टन व किंमत) | ८०,१५३ (रू.८,११,७६५) | ७५,९७१(रू.२४,७४,४४६) |
| ३. | साखर (पोती व किंमत) | ९१,९४३ (रू.२०,२०,९८९) | ७९,६२०(रू.४६,१९,१६२)[६९] |

अशाप्रकारे सातारा भागात साखरेचे उत्पादन होत होते. त्यामुळे साखर ही सातारा जिल्हयातील लोकांच्या गरजा भागवून शिल्लक राहिलेली साखर निर्यात केली जात होती.

### ४.९.३.२ गूळ उत्पादन

गूळ निर्मिती हा जिल्हयातील फार जुना उद्यागे असून १९व्या शतकाच्या उत्तरार्धात तो महत्त्वाचा लघुद्योग होता. दुसऱ्या महायुद्धाच्या काळातही या उद्योगाची भरभराट झाली होती. सन १९४७–४८ मध्ये जिल्हयात गूळ उत्पादनाचे सहा कारखाने होते.[७०]

### ४.९.४ खाद्य तेलाचे उत्पादन

तेल गाळणे हा जिल्हयातील फार जुना उद्योग असून सन १९११–१२ मध्ये ६२ तेल गिरण्या सुरू होत्या. सन १९१५–१६ मध्ये शासनाने स्थानिक उद्योगाच्या विकासासाठी एक सल्लागार समिती नेमून समितीच्या अहवालानुसार खाद्यतेल उद्योगाच्या विकासासाठी प्रयत्न केले होते. सन १९१६–१७ पासून जिल्हयातील तेल गिरण्या उत्तम स्थितीत सुरू होत्या. सन १९२१ मध्ये त्यात ४,८९५ कामगार होते.[७१] ते मुख्यतः शेंगदाणा तेल व करंजीचे तेल गाळीत असत. सन १९२८ मध्ये कराडला भुईमूग शेंग फोडण्याचा कारखाना सुरू झाला होता.

### ४.९.५ पेये, तंबाखू व तंबाखूच्या पदार्थाचे उत्पादन

यामध्ये विडी, जर्दा, पेये, व मद्य उत्पादन कारखान्याचा समावेश होतो. सन १९३० मध्ये सातान्याच्या विश्वनाथ नारायण चिपळूणकर यांनी दहा रूपयाच्या भांडवलावर जर्दा व्यवसाय सुरू केला. आज त्याची सव्वा दोन कोटीची उलाढाल आहे. कारखान्यांना लागणारा तंबाखू गुजरातमधील भादरन येथून मागविला जातो. स्थानिक मागणी व्यतिरिक्त नाशिक, जळगाव, सांगली, कोल्हापूर, सोलापूर जिल्हयातही येथील जदर्याला चांगली मागणी होती. याशिवाय सातारा येथे साखर कारखान्यातील मळीपासून अल्कोहोल काढण्याचे काम सुरू होते. तसेच विदेशी दारूचे उत्पादनही घेतले जात होते. [७२]

### ४.९.६ रसायने व रासायनिक पदार्थ

या उद्योगातंर्गत सातारा येथे मूलभूत सेंद्रिय तसेच असेंद्रिय रसायन व वायू उत्पादन उदा.आम्ल, अल्कली व त्यांचे द्रावण, ॲसेटिलीन, प्रानवायू व नायट्रोजनवायू, खते व कीटकनाशके, तंग, वार्निश व तत्सम उत्पादन, औषध उत्पादन, सुंगधी द्रव्ये, सौंदर्य प्रसाधने, केशभूषा साहित्य व सर्व प्रकारचे साबण व इतर रासायनिक उत्पादने करणारे मोठे, मध्यम व

लघु कारखाने मुख्यत्वे सातारा व इतरत्र सुरू होते.

जिल्हयात रासायनिक उद्योगाची सुरूवात १९०९ मध्ये कराडला आगपेटी तयार करण्याच्या कारखान्याने झाली. या कारखान्यास संरक्षण देण्यासाठी कराड नगरपालिकेने आयात होणाऱ्या आगपेटयावर पन्नास ग्रोसला चार रूपये जकात आकारली.[७३] सन १९१५–१६ मध्ये जपानी मालाची स्पर्धा व पहिल्या महायुद्धामुळे फॉस्फरसच्या कमतरतेमुळे कारखान्यास मोठी झळ पोहचून हा कारखाना सन १९१७ मध्ये बंद पडला. सन १९२२–२३ मध्ये तो पुन्हा सुरू झाला होता.[७४]

### ४.९.७ औषध उत्पादने

सन १९२६ मध्ये साताऱ्याला मो.ना.आगाशे यांनी आयुर्वेदीय अर्कशाळा सुरू केली. सन या कंपनीने औषधांची फार मोठया प्रमाणावर विक्री केली होती. विक्रीच्या क्षेत्रात सयुक्तिक नियम सहकार्याचे व सौजन्यशील धोरण आणि आधुनिक विक्री कल्पनांचे सहाय्य ही वैशिष्ट्ये कंपनीने अवलंबिली होती. मुंबई प्रांत, कर्नाटक, मध्यप्रदेश आणि हैद्राबाद प्रांत एवढया क्षेत्रांत कंपनीच्या विक्रीचा व्याप वाढलेला आहे. सन १९४१ पर्यत अर्कशाळेत औषधी उत्पादन मर्यादित स्वरूपाचे होत असे कारण भांडवलाची मर्यादा होती. सन १९४१ मध्ये वाढते उत्पादन व्हावे व विक्रीचा व्याप वाढवून आयुर्वेद कार्यासाठी पैसा निष्पन्न व्हावा या हेतूने अर्कशाळेचे प्रायव्हेट लि. कंपनीत रूपांतर करण्यात आले. यावेळी कारखान्याची मालकी कंपनीकडे देताना कारखान्याच्या किंमतीपेक्षा निम्म्या रक्कमेचे शेअर्स आयुर्वेद महाविद्यालय या आयुर्वेद संशोधन कार्याना मदत देण्यासाठी ट्रस्ट करून वेगळे राखून ठेवले होते. तसेच त्याच वेळी कंपनीच्या व्यापाला आर्थिक तज्ञांचे सहकार्य मिळाले.

सन १९४१ ते ४७ या कालावधीत कंपनीने महाराष्ट्रात आणि कर्नाटकात विक्रेत्यांचे जाळे निर्माण केले होते. सन १९४५ मध्ये मुंबई येथे गिरगाव भागात दुकान उघडले. कोल्हापूर हुबळी या शहरातही शाखा उघडल्या होत्या. फिरते प्रतिनिधी नियुक्त केले आणि उत्पादन व विक्री यांची क्रमाक्रमाने वाढ केली होती. सन १९४१ मध्ये उभारलेले एक लाख रूपयांचे भांडवल कंपनीची प्रारंभिक उभारणी करण्यात खर्ची पडले होते. इमारत, औषधी करणाची व साधनात ही रक्कम खर्च झाली होती. तेव्हा भांडवल मिळविण्यासाठी सन १९४७ मध्ये आणखी चार लक्षाचे भांडवल उभारून कंपनीचे रूपांतर पब्लिक लिमिटेडमध्ये करण्यात आले.[७५]

### ४.९.८ रबर, प्लॅस्टिक, पेट्रोलियम आणि दगडी कोळसा यापासून होणारे उत्पादन

सन १९४७ मध्ये सातारा येथे फेनॉल फॉर्मलदिहाईड मोल्डिंग पावडर करण्याचा कारखाना निघाला होता. परंतु तो कारखाना सन १९५४ म्ध्ये बंद पडला. या कारखान्यातून फेनॉल फार्मलडिहाईड मोल्डिंग पावडर तयार केली जात होती. तसेच प्लॅस्टिक, रबर पेट्रोलियम आणि दगडी कोळसा यापासून होणारे उत्पादनही निघत होते.

### ४.९.९ अधातू खनिज पदार्थ

### ४.९.९.१ काच व काचेच्या वस्तूचे उत्पादन

ओगले यांनी कराड जवळील ओगलेवाडीमध्ये सन १९१६ मध्ये ग्लास वर्क्स सुरू केले. सुरूवातीला या कारखान्यात काचेच्या बांगडया व चिमण्या तयार होत असत. सन १९१७ ते १९१९ मध्ये कोळसा व कच्च्या मालाचा तुटवडयामुळे हा कारखाना अत्यंत कठीण परिस्थितीत सुरू होता.[७६] सन १९१९ मध्ये या कारखान्याचे लिमिटेड कंपनीमध्ये रूपांतर झाले. सन १९२० मध्ये त्यात उत्तम प्रकारच्या चिमण्याचे उत्पादन सुरू झाले. सन १९२५ मध्ये त्यात हरिकेन कंदिलाचे उत्पादन सुरू झाले. कंदिलाचा दर्जा चांगला असल्याने याकारखान्याचा झपाटयाने विस्तार झाला. सम १९३० मधील चलनाच्या अवमूल्यनाने कारखान्यास पुष्कळ बाजारपेठांना मुकावे लागले. त्यानंतर या कारखान्यात प्रभाकर सेफ्टी स्टोव्ह व स्टेनलेस स्टील भांडयाचे उत्पादन सुरू झाले. दुसऱ्या महायुद्धामुळे कारखान्याचा विस्तार होऊन अन्य काचेच्या वस्तूंचे उत्पादन सुरू झाले. सन १९४८ मध्ये या कारखान्यात १,२५९ एवढे कामगार होते.[७७]

### ४.९.९.२ मूलभूत व मिश्र धातू

लोखंड व पोलादाचे कास्टिंग व फोर्जिग फौंड्री, लोहमिश्र धातूचे उत्पादन व इतर धातूचे कारखाने सातारा येथे सुरू झाले होते. या प्रवर्गातील पहिला कारखाना वालचंदनगर इंडस्ट्रिज लिमिटेड(इंजिन अँड फौंड्री) सन १९३३ मध्ये सातारारोड येथे सुरू झाला होता.[७८]

### ४.९.९.३ धातूच्या वस्तू व सुटे भाग

टिनप्लेट किंवा इनॅमल्ड शीटमेटलपासून तयार केलेली भांडी, कॅन, मेटल, शिपिंग बॅरल, ड्रम, पिंजरे, धातूच्या वस्तू, अवजारे, हार्डवेअर, भांडी तयार करण्याचे कारखाने सातारा व सातारारोड येथे होते. सन १९०६–०७ मध्ये सातारा येथे धातूपासून वस्तू बनविण्याचा

कारखाना सुरू झाला. सन १९१० मध्ये लक्ष्मणराव किर्लोस्करांनी औंध संस्थानात किर्लोस्करवाडीस नांगर व शेतीची इतर अवजारे बनविण्याचा कारखाना सुरू झाला. या कारखान्यातून सन १९१३–१४ मध्ये ५०० आधुनिक नांगरांची विक्री झाली. सन १९१६–१७ मध्ये भाडेवाडीमुळे इंग्लंडमधून लोखंडी नांगरांची आयात कमी झाली. व अमेरिकेकडून आयात झालेले नांगर कमी पडल्यामुळे या कारखान्यास उत्पादन वाढवावे लागले. सन १९२१–२२ मध्ये तेथे सर्व प्रकारच्या शेती अवजारांचे उत्पादन सुरू झाले. सन १९२१ मध्ये कराडला फडके इंडस्ट्रिअल वर्क्स सुरू झाले. त्यात नांगर व पलंग तयार केले जात होते. सन १९२२ मध्ये सातारारोड येथे सुरू झालेल्या कूपर इंजिनिअरिंगमध्ये प्रथम शेतीची अवजारे व नांगर उत्पादित होत असत.[७७९]

### ४.९.९.४ यंत्रसामग्री, यांत्रिक अवजारे व सुटे भाग

या उद्योगतंर्गत शेतीला लागणारी अवजारे, बांधकाम व खाणकाम उद्योगात वापरल्या जाणाऱ्या इतर जड यंत्रसामग्रीचे उत्पादन व दुरूस्ती, डिझेल इंजिन व त्याच्या सुटया भागांचे उत्पादन, साखर व कापड उद्योगातील यंत्रसामग्री, रेफ्रिजरेटर करणारे व वातानुकूलित यंत्रासाठी लागणारी उपकरणे उत्पादन करणारे कारखाने सातारा व सातारारोड येथे होते.

सन १९२० मध्ये सातारा रोडला धनजीशाह कूपर यांनी डिझेल इंजिन बनविणारा देशातील पहिला कारखाना सुरू केला. सन १९४७ मध्ये तो वालचंद इंडस्ट्रिजला विकला. या कारखान्यात शेती अवजारे, प्लेन कॅलिको लुम्स, स्वयंचलित माग, पाच ते चाळीस हॉर्स पॉवरची इंजिने तयार होतात. सन १९२१ मध्ये कराड येथे फडके इंडस्ट्रिअल वर्क्स हा लोखंडी नांगर, ऊसाचे चरक व लोखंडी पलंग तयार करण्याचा कारखाना सुरू झाला होता.[८०]

### ४.९.१० छापखाना उद्योग

छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी उत्कृष्ट साहित्य प्रकाशित व्हावे यासाठी सातारा येथे एक छापखाना काढला होता. सन १८५८ मध्ये सातारा येथे शिळाप्रेसवर शुभसूचक साप्ताहिकाची छपाई होत असे. सन १८६७ मध्ये साताऱ्यात आणखी एक छापखाना सुरू झाला. याशिवाय सन १९२५ मध्ये तिसरा छापखाना सुरू झाला. या छापखान्यात लागणारा कागद, शाई, टाईप, स्टेशनरी आणि बाईंडिंगसाठी लागणारा बहुतांश माल पुणे व मुंबईहून खरेदी केला जात होता.[८१]

### ४.९.११ यंत्रमाग उद्योग

सन १९४६ मध्ये सातारा भागात ३८ यंत्रमाग होते. सन १९४७–४८ मध्ये लिंब येथील यंत्रमाग कारखाना साताऱ्याला स्थलांतरित झाला त्यात धोतर, लुगडे, साडया व इतर प्रकारचे कापड तयार होत होते.[८२] सन १९४५ मध्ये अतीत येथे अतीत यंत्रमाग ही पहिली सहकारी विणकर संस्था सुरू झाली.[८३]

### ४.९.१२ रेशीम कापड उद्योग

सन १९२९ मध्ये सातारा येथे कापड कारखाना सुरू झाला. त्या कारखान्यात रेशमाला पीळ देणे, गुंडाळणे व रंगविण्याचे काम केले जात होते. सन १९३४–३५ मध्ये कराड येथे दुसरा कारखाना सुरू झाला. हे कारखाने इटली, जर्मनी, जपान व स्वित्झर्लंडकडून कृत्रिम रेशीम मागवत होते.[८४]

### ४.९.१३ कुटीरोद्योग

हातमाग, लोकर विणकाम, सुतारकाम, चर्मोद्योग, कुंभार उद्योग, बांबू वेतकाम, तांबे व पितळी भांडी, तेलघाणी हे प्रमुख कुटिरोद्योग होते. त्यांची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे

### ४.९.१४ हातमाग उद्योग

सन १८८५ च्या गॅझेटियरनुसार सातारा जिल्हयातील सर्व शहरामध्ये विणकर राहत होते. सातारा शहरात विणकरांची २०० कुटुंबे राहत होती. त्यात कोष्टी, साळी व मोमीन लोक कार्यरत होते. जाडेभरडे कापडासाठी लागणारे सूत तासगाव, जत व अथणीहून आणि लुगडयासाठी लागणारे मुलायम सूत मुंबईहून मागवित असत. बहुतांश विणकर गुजर आणि मारवाडी व्यापाऱ्याकडून सूत खरेदीसाठी कर्ज घेत होते आणि विणलेल्या कापडाची विक्री करून परतफेड करीत होते. कोष्टी व साळी, लुगडी, धोतर, पंचे, चोळयांचे कापड, जाडेभरडे कापड व चादरी विणत होते. मोमीन हलक्या प्रतीचे पागोटे विणत होते. गिरणीतील कापडाच्या स्पर्धेमुळे स्थानिक कारागिरांना वर्षभर काम करूनसुद्धा पुरेसा मोबदला मिळत नसे. कारागिरांची वार्षिक मिळकत फक्त ६० ते १५० रूपये होती. पहिल्या महायुद्धामुळे रंगाचा तुटवडा व सुताच्या वाढलेल्या किमंतीमुळे हातमाग व्यवसाय अडचणीत आल्याने विणकरांना रोजगारासाठी मुंबईला स्थलांतर करावे लागले होते. शासनाच्या मदतीमुळे १९२२–२३ ते १९२५–२६ या काळात व्यवसाय सुस्थितीत होता. सन १९३६–३७ मध्ये पुन्हा गिरणीतील

कापडाबरोबर तीव्र स्पर्धा करावी लागली होती. सन १९४६ मध्ये सातारा व परिसरात एकूण १,८२८ विणकर व २,३३० माग होते.[८५]

### ४.९.१५ लोकर विणकाम

या व्यवसायात लोकर काढणे पिंजणे, ताणणे व घोंगडया विणण्याची कामे केली जातात. सनगर, धनगर जातीचे लोक हा व्यवसाय करतात. हा व्यवसाय सातारा जिल्हयातील काही गावात चालत होता. या मालास रायगड, रत्नागिरी व सिंधुदर्ग जिल्हयात मागणी होती. हा जुना उद्योग असून सन १८२७ मध्ये कराडाला या व्यवसायात २५ कुटुंबे कार्यरत होती. सन १८८५ च्या गॅझेटिअरनुसार सातारा शहरासह जिल्हयात सर्वत्र आढळणारे सनगर स्वस्त घोंगडया विणत होते. ते ऑक्टोबर–नोव्हेंबर महिन्यात या कामात व्यस्त असत. महिला देखील या सर्व प्रक्रियेत मदत करीत होत्या. सनगराची वार्षिक मिळकत ५० ते२०० रूपये होती. घोंगडीची किमंत ७५ पैसे ते ३ रूपये होती.[८६]

### ४.९.१६ सुतारकाम

शेतीची औजारे व हत्यारे बनविणे व दुरूस्त करणे यासाठी सुतार व लोहारांना सुगीच्या दिवसात शेतकऱ्यांकडून बलुते दिले जात होते. सन १८८५ च्या सुमारास बलुतेदारीने शेतीची अवजारे तयार केली जात होती. त्यात हिंदू तसेच मुसलमानही होते. सुताराला ७५ ते १२० रूपये वार्षिक उत्पन्न मिळत होते. सन १९२१ मध्ये सातारा व परिसरात एकूण १२३ सुतार होते.[८७]

### ४.९.१७ लोहारकाम

१९ व्या शतकात महाबळेश्वरजवळ कुरूदी दगडापासून अशुद्ध लोखंड काढून घेऊन त्यापासून घिसाडी लोक शेतीची अवजारे तयार करीत होते. पुढे त्यांना इंधन न मिळाल्याने व आयात लोखंड स्वस्त दराने उपलब्ध होऊ लागल्याने त्यांनी लोखंड गाळण्याचे काम बंद केले. सन १८८५ च्या गॅझेटियरनुसार या व्यवसायात लोहार व घिसाडी होते. ते मुख्यतः शेतीची अवजारे, स्वयंपाकाची भांडी व भांडयाची दुरूस्ती करीत होते. पावसाळयात तवे खिळे आणि बादल्या तयार करीत होते. त्यांचे दरडोई वार्षिक उत्पन्न ६० ते १५० रूपये होते. सन १९२१ मध्ये या व्यवसायात ४,०६३ कारागीर होते.[८८]

### ४.९.१८ कुंभार उद्योग

मडकी, विटा व कौले करण्याच्या व्यवसायात प्रामुख्याने कुंभार लोक असत. सातारा येथेही काही ठिकाणी कौले बनविली जात होती. सन १९२१ मध्ये या व्यवसायात ७८० लोक होते.[८९]

### ४.९.१९ चर्मोद्योग

सातारा येथे हा उद्योग मोठया प्रमाणावर सुरू होता. त्यात प्रामुख्याने मोची व चांभार जातीचे लोक गुंतलेले होते. सन १८८५ च्या गॅझेटियरनुसार ढोर व चांभार कामगार जोडे, चपला, लगाम, मोट व पखाली तयार करीत होते. परंतु ढोर चांभारइतके कुशल नव्हते. कामगाराला वर्षाकाठी ७५ ते १०० रूपये मिळत होते.[९०]

### ४.९.२० कातडे कमविणे

सन १८८५ च्या सातारा गॅझेटियरनुसार या व्यवसायात प्रामुख्याने ढोर जातीचे कामगार होते. परंतु मिळकत वाढल्यामुळे काही चांभारांनीही हा व्यवसाय सुरू केला. सन १९३१ मध्ये या व्यवसायात ५३६ लोक काम करीत होते.[९१]

### ४.९.२१ तेल घाणा

तेल गाळण्याचा व्यवसाय सातारा येथे सुरू होता. भुईमूग, सुर्यफूल व करंजीचे तेल गाळले जात होते. सन १८२७ मध्ये सातारला तेलघाणा होता. सन १९२१ मध्ये या व्यवसायात १९५ लोक गुंतलेले होते.[९२]

### ४.९.२२ तांबे व पितळी काम

एकोणिसाव्या शतकात हा महत्त्वाचा कुटीरोद्योग होता. तांबट व कासार जातीचे लोक हा व्यवसाय करीत होते. व्यापारी लोक धातूचे पत्रे पुणे व मुंबईहून मागवित होते. कारागिरांनी बनविलेल्या भांडयांना स्थानिक तसेच पुणे व मुंबईस मोठया प्रमाणावर मागणी होती. शिराळा ता.वाळवा येथील पितळेची भांडी प्रसिद्ध होती. सातारा येथील कारागिरांचे सरासरी वार्षिक उत्पन्न ५० ते ५०० रूपये होते. सन १९२१ मध्ये ७५४ कासार कारागीर होते. कासाराशिवाय मराठा, माळी व मुसलमान लोक हा व्यवसाय करीत होते. सन १९२१ मध्ये सातारा जिल्हयात या व्यवसायाचे ४० घटक होते. एक कारागीर दररोज २९३० रूपये किमंतीचे ७.२६ किलोग्रॅम वजनाची दोन तपेली तयार करीत होता. कारागिरास ७.४७ किलोग्रॅम वजनाच्या तांब्याच्या

तपेली ४ रूपये ७.४७ किलोग्रॅम वजानच्या तांब्याच्या घागरीस किंवा हंडयास ५.५० रूपये व ७.४७ किलोग्रॅम वजनाच्या पितळी घागरीस किंवा हंडयास ७ रूपये मजुरी होती.[९३]

अशाप्रकारे सातारा शहर व परिसरात वरील उद्योग व्यवसाय चालत होते. यामध्ये कापड उद्योग, धातू उद्योग, औषध उत्पादने, खाद्य उत्पादने, कातडी कमावणे, चर्मोद्योग, कुंभार उद्योग, लोहार, सुतार, लोकर विणकाम व हातमाग उद्योग मोठया प्रमाणावर विस्तारले होते. त्यामुळे शहरातील लोकांच्या गरजा भागविण्यास मदत होत होती. ज्या वस्तू शहरातील गरजा भागवून शिल्लक राहत होत्या त्या वस्तू शहराबाहेर निर्यात केल्या जात होत्या व शहरात तयार न होणाऱ्या वस्तू व्यापारी शहरात विक्रीसाठी आणत होते. त्यामुळे लोकांना हव्या असणाऱ्या वस्तू मिळण्यास मदत झाली होती.

## ४.१० सातारा नगरपरिषदेचे उत्पन्न व खर्च

सातारा नगरपरिषदेस पुढील मार्गाने उत्पन्न मिळत होते.

### ४.१०.१ सातारा नगरपालिकेचे उत्पन्न

सन १८५३ मध्ये सातारा नगरपालिकेची स्थापना झाली. तेव्हापासून सन १९४७ पर्यंत नगरपालिकेचा विकास झालेला दिसून येतो. सर्व लोकांना सोयी–सुविधा पुरविण्यासाठी सातारा नगरपालिकेने आपला वसूल निरनिराळया मार्गाने वाढविला होता. सन १८५३ ते १९४७ या काळातील नगरपालिकेच्या उत्पन्नाचा अभ्यास केला तर याचे प्रमाण वाढतच गेलेले दिसते.

**सातारा नगरपालिकेचे सन १८५३ ते १९४३ पर्यतचे एकूण उत्पन्न**

| अ.नं. | वर्ष | उत्पन्न(रुपयामध्ये) |
|---|---|---|
| १. | १८५३ | ११,००० |
| २. | १८६२–६३ | १९,३१० |
| ३. | १८७२–७३ | ३२,७२५ |
| ४. | १८८२–८३ | ५१,२७० |
| ५. | १८९२–९३ | ५०,००० |
| ६. | १९०२–०३ | ७५,८४८ |
| ७. | १९१२–१३ | २,३४,०८७ |
| ८. | १९२२–२३ | ७,५३,९६३ |
| ९. | १९३२–३३ | १,२७,०६९ |
| १०. | १९४२–४३ | ३,१४,५०७[९४] |

सातारा नगरपालिकेच्या उत्पन्नाच्या बाबी खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१) नगरपालिका करापासून मिळणारे उत्पन्न.**

यामध्ये जकात व घरपट्टी, पथकर(गाडीकर), एकत्रित कर, हॉटेल कर, जाहिरात कर, कुत्र्यांवरील कर, वृक्षकर, करमणूक कर, पाणीपट्टी, भंगीपट्टी, प्राथमिक शिक्षण अनुदान, शिक्षण कर इत्यादीचा समावेश केला होता.

**२) विशेष अधिनियमाखाली वसुलीचे मिळणारे उत्पन्न**

**३) कराव्यतिरिक्त नगरपालिकेच्या मालमत्ता व उपयोगितापासूनचे उत्पन्न.**

**४) अनुदाने व अंशदाने.**

**५) इतर उत्पन्न–**

यामध्ये पुढील बाबींचा समावेश केला जात होता.[९५]

**अ) जकात**

सन १८५३ पासून सातारा नगरपालिका जकात कर वसूल करत आहे. जकातीच्या दरामध्ये नगरपालिकेने वेळोवेळी बदल केल्याचे दिसून येते.[९६]

जकातीचे दर पुढीलप्रमाणे सर्व कडधान्ये, साखर, तुप, कोळसा, सोने–चांदी, रासायनिक खते, सिमेंट यावर २ पैसे जकात लादली जात होती. कापड, लोखंड व पोलाद, रंगविषयक वस्तू व फर्निचर यावर ३ पैसे जकात लादली जात होती. तपकिरी, तंबाखू, सिगारेट यावर ४ पैसे जकात लादली जात होती. मेंढया, बकऱ्या दरडोई ३० पैसे, बैल, गाई, म्हैसी, घोडे, गाढव, रेडे, वासरे दरडोई ५० पैसे तर कुत्री, मांजरे, पोपट यावर दरडोई २० पैसे जकात लादली जात होती.[९७]

**ब) जकात उत्पन्न**

सन १९३८–३९ मध्ये जकातीचे उत्पन्न हे ४५,००० रूपये एवढे होते.[९८] ते पुढे १ मे १९९९ पासून महाराष्ट्र शासनाने कायद्याने जकात बंद केली त्यामुळे सातारा नगरपलिकेस जकातीपासून मिळणारे उत्पन्न बंद झाले आहे.

**क) घरपट्टी**

नगरपालिकेने सन १८६६ मध्ये शहरातील प्रत्येक घरावर घरपट्टी बसविली. यावेळी घराच्या स्वरुपावरुन चार वर्ग केले. त्यावर वार्षिक अनुक्रमे ८ रू., ४ रू., २ रू. आणि १

रूपया याप्रमाणे घरपट्टी बसविली. पुढे सन १८९१ पासून कायद्यात तरतूद करून घरपट्टी हा कर वार्षिक भाडयाच्या अंदाजावर आकारण्यात येवू लागला. ही घरपट्टी नगरपालिकेचे कमिशनर स्वतः वसूल करत असत.[९९]

**सन १८३३ मधील घरपट्टी**

| अ.नं. | घराची किमंत | घरपट्टी दर रू. पैसे आणे |
|---|---|---|
| १. | ० ते ६ रूपये | नाही |
| २. | ६ ते १२ रूपये | ८ आणे |
| ३. | १२ ते १८ रूपये | १ रूपया |
| ४. | १८ ते २४ रूपये | १ रूपया ८ आणे |
| ५. | २४ ते ३० रूपये | २ रूपये |
| ६. | ३० ते ३६ रूपये | २ रूपये ८ आणे |
| ७. | ३६ ते ४८ रूपये | ३ रूपये |
| ८. | ४८ ते ६०रूपये | ४ रूपये |
| ९. | ६० ते ७२ रूपये | ५ रूपये |
| १०. | ७२ ते ८४ रूपये | ६ रूपये |

**ड) पथकर/गाडीकर**

सातारा शहरात नगरपालिकेच्या हद्दीबाहेरुन येणाऱ्या वाहनावर दर दिवशी प्रत्येकी ४ आणे टोल टॅक्स वसूल करण्याचा ठराव नगरपालिकेने सन १९४७–४८ मध्ये केला होता.[१०१]

**सन १९४७–४८ मधील वाहनांवर वार्षिक कर**

| अ.न. | वाहन प्रकार | भाडे(रूपयामध्ये) |
|---|---|---|
| १. | बैलगाडी | १५ |
| २. | हातगाडी | ०६ |
| ३. | छकडा | १२ |
| ४. | टांगा (दोन चाकी) | १५ |
| ५. | सायकल रिक्षा | १२ |
| ६. | चार चाकी घोडा गाडी | १५ |
| ७. | सायकल सोडून वरील प्रकारात न मोडणारे मोटार वाहनाशिवाय अन्य वाहन | ०६[१०२] |

## इ) एकत्रित कर

नगरपालिकेने सरकारी ठराव नं.४१०४/३३ २८ मे १९४८ पासून घरपट्टी, सार्वजनिक भंगीपट्टी, सार्वजनिक पाणीपट्टी, दिवाबत्ती कर व शिक्षण कर असे एकत्रितपणे वार्षिक भाडयाच्या अंदाजाच्या रक्कमेवर शेकडा १५ ५/८ दराने एकत्रित कर आकारण्यास नगरपालिकेने ठराव मान्य केला होता.[१०३]

## ई) पाळीव जनावरावरील कर

सन १८८२ सालापासून जनावरावर कर बसविण्यास सुरूवात झाली. सन १९२७ मध्ये शहरातील कुत्र्यावर सालीना १ रू. कर बसविण्यास नगरपालिकेने ठराव मंजूर केला होता.[१०४]

## उ) करमणूक कर

सन १९४४ मध्ये करमणूक कराचे दर

| अ.न. | प्रयोग | प्रत्येक प्रयोगास दर |
|---|---|---|
| १. | नाटक किंवा गाण्याचा जलसा | ३ रू. |
| २. | सर्कस | ३ रू. |
| ३. | सिनेमा | १ रू. |
| ४. | तमाशा | १ रू. |
| ५. | इतर रंगभूमीवर करमणुकीचे प्रकार | १ रू.[१०५] |

## ऊ) पाणीपट्टी

सन १८९३ सालापासून खाजगी पाणीपट्टी घेण्यास सुरूवात झाली त्यावेळी एक इंची नळीला दीड रूपया, पाऊण इंची नळीला १ रू. व अर्धा इंची नळीला दरमहा १२ आणे याप्रमाणे कर आकारला जात होता.[१०६]

**सन १९३४ मधील खाजगी पाणीपट्टी (वार्षिक)**

| अ.नं. | कनेक्शन | पूर्वीचा दर | नवीन दर |
|---|---|---|---|
| १. | अर्धा इंची(घरासाठी) | १५ | २० |
| २. | अर्धा इंची(व्यवसायासाठी) | १५ | २४ |
| ३. | पाऊण इंची | ३६ | ४८ |

**सार्वजनिक पाणीपट्टी (वार्षिक)**

१) सार्वजनिक पाणीकर ५ आणे

२) बाकीचे सर्व सार्वजनिक पाणी कराचे दर दीड पटीने वाढविले.[१०७]

**ए) भंगी पट्टी**

सन १९१९–२० मध्ये नगरपालिकेने शहरातील शौचकुपावर भंगीपट्टी घेण्यास सुरूवात केली. सन १९४२ मध्ये खाजगी भंगीपट्टीचे दर पुढीलप्रमाणे होते. पहिल्या सिटला ६ रूपये दुसऱ्या सिटला ४ रूपये तर पुढील प्रत्येक सिटला ३ रूपये वार्षिक भंगीपट्टी बसविण्यात आली. थिएटरमधील शौचकुपासाठी सहा महिन्यासाठी ९ रुपये भंगीपट्टी आकारण्यात आली होती.[१०८]

## ४.१०.२ खर्च

सातारा नगरपालिकेला शहर स्वच्छ ठेवण्यासाठी व लोकांना सोयीसुविधा पुरविण्यासाठी खर्च करावा लागत होता. या सुविधांमध्ये दवाखाने चालविणे, रस्ते दुरूस्ती व नवीन रस्ते बांधणे, दिवाबत्तीची सोय करणे, मुलांना व प्रौढांना शैक्षणिक सुविधा पुरविणे, शहरातील वाढत्या लोकसंख्येबरोबर वाढत्या समस्यांचे निराकरण करणे व वाढत्या गरजा भागविण्याचे काम करावे लागते. ही सर्व कामे नियोजनबद्ध पार पाडावी लागत होती. त्यासाठी पैसा उपलब्ध करण्यासाठी अनेक कार्यक्रम नगरपालिका पार पाडत असे. तेव्हा सातारा नगरपालिकेने सन १८५३ ते १९४७ या काळात ज्या बाबीवर खर्च केलेला आहे त्याची माहिती पुढीलप्रमाणे–

सार्वजनिक आरोग्य व सोयीवरील खर्च, सामान्य प्रशासन व वसुली खर्च, सार्वजनिक सुरक्षितता खर्च, अंशदाने खर्च, असाधारण खर्च, शिक्षण खर्च, अग्निशमन खर्च, दिवाबत्ती खर्च, पाणीपुरवठा खर्च, सार्वजनिक तारतखाने व मुताऱ्यावरील खर्च, साफसफाई व सोयीवरील खर्च, बांधकामावरील खर्च, जलनिःसारण खर्च व इतर खर्च इत्यादी.

नगरपालिकेचा शिक्षण खर्च (सन १८८५–८६ ते सन १९४६–४७)

| अ.नं. | वर्ष | शिक्षण खर्च(रुपयामध्ये) |
|---|---|---|
| १. | १८८५–८६ | ७५० |
| २. | १९१८–१९ | १५,३४८ |
| ३. | १९२६–२७ | ३८,५७५ |
| ४. | १९२८–२९ | ४५,४२१ |
| ५. | १९२९–३० | ४१,३२८ |
| ६. | १९३०–३१ | ४१,३२८ |
| ७. | १९३१–३२ | ४४,२०५ |
| ८. | १९३२–३३ | ४५,८१६ |
| ९. | १९३३–३४ | ४२,५७६ |
| १०. | १९३४–३५ | ४२,८८५ |
| ११. | १९३५–३६ | ४५,६०३ |
| १२. | १९३६–३७ | ४८,००० |
| १३. | १९३७–३८ | ५३,००० |
| १४. | १९३८–३९ | ५९,१३५ |
| १५. | १९३९–४० | ६३,३५९ |
| १६. | १९४१–४२ | ६०,१४१ |
| १७. | १९४६–४७ | ९०,१८६[१०९] |

वरील तक्त्यांवरून असे स्पष्ट होते की, सन १८८५–८६ मध्ये नगरपालिकेचा शिक्षण खर्च हा ७५० रूपये एवढे होता. तो पुढे वाढत जाऊन सन १९४६–१९४७ मध्ये ९०,१८६ रूपये एवढा झाला होता. यावरून हे स्पष्ट होते की नगरपालिकेचा शिक्षण खर्च हा दरवर्षी उत्पनाच्या प्रमाणात वाढत गेला आहे.

## सातारा नगरपालिकेचे सन १८५३ ते १९४७ पर्यंतचा एकूण खर्च

सातारा नगरपालिकेने आपल्या स्थापनेपासून अनेक लोकोपयोगी कामे केली. त्यासाठी नगरपालिकेने जो खर्च केला त्याचा एकूण खर्चाचा तपशील पुढीलप्रमाणे दिलेला आहे. तेव्हा सन १८५३ ते १९४७ पर्यंतचा नगरपालिकेचा एकूण दशवार्षिक खर्च पुढीलप्रमाणे.

| अ.नं. | वर्ष | खर्च |
|---|---|---|
| १. | १८५३ | ११,०००/– |
| २. | १८६२–६३ | २१, ४६७/– |
| ३. | १८७२–७३ | ३२,४०९/– |
| ४. | १८८२–८३ | ९३,०८०/– |
| ५. | १८९२–९३ | ५७,०००/– |
| ६. | १९०२–०३ | ७४,३०५/– |
| ७. | १९१२–१३ | १,९७,५०६/– |
| ८. | १९२२–२३ | ७,१४,३६०/– |
| ९. | १९३२–३३ | १,२४,७७८/– |
| १०. | १९४२–४३ | ३,०७,९०८/–[११०] |

–

वरील तक्त्यांवरून सन १८५३ ते १९४२–४३ पर्यंत एकूण खर्च कसा वाढत गेला. या विषयीची पूर्ण माहिती मिळते. सन १८५३ साली एकूण खर्च ११,००० झालेला होता. पुढे त्यात वाढ होऊन तो दर दहा वर्षांनी वाढत जाऊन १९२२–२३ साली ७,१४,३६० रूपये एवढा झालेला आहे तर सन १९४२–४३ मध्ये त्याच्यात मोठया प्रमाणात वाढ होऊन तो ३,०७,९०८/– रूपये एवढा झालेला आहे. असा खर्च वाढण्याचे कारण म्हणजे शहरातील वाढत्या लोकसंख्येला सोयी व सुविधा पुरविण्याकामी नगरपालिकेने लक्ष दिलेले दिसते. त्या सोयीमध्ये प्रामुख्याने रस्ते, शाळा, दवाखाने व इतर सुविधा यांचा समावेश झालेला होता.

## ४.११ समारोप

सातारा शहराचा आर्थिक इतिहास पाहत असताना असे दिसून येते की, सन १८४८ पर्यंत साताऱ्यातील व्यापार व संपत्तीत बरीच वाढ झाली होती. तरीही भूधारकांचा कर्जबाजारीपणा वाढलेला होता. परंतु साताऱ्याच्या राजाच्या नियमानुसार भूधारकांना संरक्षण

मिळाले होते. त्यामुळे कर्जापोटी त्यांची जमीन सावकारास विकत घेता येत नसे. ब्रिटिश सत्तेच्या प्रस्थापनेनंतर १८४९ मध्ये सातारा प्रदेशाला राजकीय स्थिरता लाभली. दुष्काळी स्थितीशी मुकाबला करण्यासाठी या सरकारने काही उपाययोजना केल्या. तथापि इंग्रज सरकार इंग्लडच्या आर्थिक स्वार्थाच्या मर्यादेत राहूनच उपाययोजना करीत असे. दुष्काळ निवारणार्थ उपाय होत असत. मात्र ते तत्कालिक होते.

सन १८७५–७६ व १८७६–७७ ही दोन्ही वर्षे आर्थिक स्थिती हलाखीची होती. यावेळी दख्खनच्या बऱ्याच भागात अवर्षण झाल्याने जनता इंग्रज सरकारविरूद्ध बंद करून उठली होती. अनेक ठिकाणी दंगे झाले होते. हा उद्रेक 'दख्खनचे दंगे' या नावाने प्रसिद्ध आहे. पुढील वर्षी खरीप व रबी हंगाम चांगले आल्याने आर्थिक स्थितीत थोडी सुधारणा झाली. पुढे सन १९०७–०८ मध्ये अपुरा व अनियमित पावसामुळे पिकांची आनेवारी सरासरीपेक्षा चार आणे कमी आली होती. कृषी विभागाने जिल्हयात भुईमूगाची विदेशी जातीची लागवड सुरू केली. शेतकऱ्यांना बी–बियाणे, पशुधन खरेदी व कृषी विकासासाठी वाढ केली. सन १९०९–१० मध्ये कापसाचा वाढत्या किंमतीमुळे त्याखालील क्षेत्रात वाढ झाली होती. अशीच परिस्थिती सन १९४७ पर्यत शेतीतील उत्पादनात कधी चढ तर कधी उत्पन्नच नाही अशी अवस्था झालेली दिसून येत होती.

महात्मा गांधीजीनी असहकार आंदोलन सुरू केले त्यावेळी स्वदेशी वस्तू बनविण्यावर भर देण्यात आलेला होता. त्यानुसार सातारा येथे खादी विणकरांना चांगले दिवस आले होते. काच उद्योग, आयात रेशिम प्रक्रिया उद्येग, लोकर विणणे, दोर तयार करणे इत्यादी कुटीरोद्योगही चांगल्या स्थितीत सुरू होते. पुढे कूपर कंपनी सुरू झाल्याने उद्योगात वाढ झाली होती. सन १९२५ ते १९२८ पर्यत शेती अर्थव्यवस्था चांगली नव्हती. उत्पादन कमी होऊनही शेतकऱ्यांच्या मालाला किमंत नव्हती. जागतिक आर्थिक मंदीचे वेध प्रत्यक्ष मंदी येण्यापूर्वीच लागलेले होते. हीच परिस्थिती पुढे सन १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीच्या वेळेस चालू राहिली होती.सन १९३७ ते ३९ दरम्यान कॉंग्रेस मंत्रिमंडळाने शेतसाऱ्यास सूट, ग्रामीण पाणीपुरवठा, कुटीरोद्योगास अर्थसहाय्य, कृषी विकास, ग्रामीण विकास व सहकारी चळवळीस मदत केल्याने जनतेस बराच दिलासा मिळाला होता. या पार्श्वभूमीवर या काळात शेती हंगाम समाधानकारक आल्यामुळे आर्थिक स्थिती बरी होती.

सप्टेबर १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाल्याने त्याचे अर्थव्यवस्थेवर मोठया प्रमाणावर परिणाम झालेले दिसून येतात. युद्धजन्य परिस्थिती व अमेरिका आणि रशियाच्या युद्धातील प्रवेशाने जागतिक बाजारपेठेमध्ये उत्साह निर्माण झाला. तथापि त्याचा भारतातील व्यापारावर काहीही परिणाम झाला नाही. अन्नधान्याच्या किमंती वाढल्या परंतु कापूस व भुईमूगाच्या किमंतीत घट झाली. त्यामुळे शेतकऱ्याची आर्थिक स्थिती सुधारली नाही. ऑगस्ट १९४२ मध्ये सुरू झालेल्या 'छोडो भारत' आंदोलनामुळे राजकीय परिस्थितीत तणाव निर्माण होऊन जनजीवन विस्कळीत झाले. पिके सर्वसाधारण आली होती. 'अधिक धान्य पिकवा' या मोहिमेमुळे अन्नधान्याखालील क्षेत्र वाढून कापूस व भुईमूगाखाली क्षेत्र कमी झाल्याने व्यापारात मंदी आली होती.अधिक धान्य पिकवा मोहिमेमुळे एकूण लागवडीखालील क्षेत्र वाढून उत्पादनही वाढले. पण त्याचा फायदा शेतकऱ्यांना न मिळता महायुद्ध करणाऱ्या इंग्लडला मिळाला होते. सातारा येथील सर्व उद्योग सुरळीतपणे सुरू होते.

सातारा नगरपालिकेने वेगवेगळया बार्बीपासून मिळणारे उत्पन्न, जकात कर व शासकीय अनुदान हे सातारा शहरातील लोकांच्या शैक्षणिक व आरोग्य या नागरी सुविधा पुरविणेसाठी पैसा खर्च केला आहे. शहरातील रस्ते साफसफाई, बालवाडया, पिण्याचे पाणी, इत्यादी बाबीवर खर्च करून इतर नगरपालिकांना एक आदर्श घालून दिलेला आहे. विशेष म्हणजे सातारा नगरपालिकेचे उत्पन्नही जास्त होते. त्यामुळे त्याचा विनियोग सातारा नगरपालिका प्रशासनाने शहरातील लोकांना सर्व प्रकारच्या सुविधा पुरविण्यासाठी केलेला दिसून येतो.

## संदर्भ


१) गायधनी रं.ना., राहुरकर व.ग., प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९५५, पृ. ७४

२) कित्ता, पृ. १६४, १६५

३) कित्ता, पृ. २८०

४) शेणोलीकर ह.श्री., देशपांडे प्र.न., महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, मोघे प्रकाशन कोल्हापूर,७ सप्टेबर १९७३, पृ. ९५

५) कित्ता, पृ.९७

६) कित्ता, पृ.९८

७) राऊत गणेश, राऊत ज्योती, मराहाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास इ.स.१८१८ ते १९६०, डायमंड पब्लिकेशन्स पुणे, २००५, पृ.२१९

८) कित्ता, पृ.२२०

९) कित्ता, पृ.२२६

१०) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९९, पृ.३३९

११) कित्ता, पृ.३३९

१२) Gazetteer of the Bombay Presidency, Satara, Government Central Press, Bombay, 1885, P. 149

१३) Ibid¸ P.34¸ 347

१४) महाराष्ट्र कृषि सांख्यिकीयविषयक जिल्हावार माहिती, भाग २, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, १९४१ ४२, पृ. ७

१५) महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, १९४१–४२, पृ.११

१६) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.३४४

१७) महाराष्ट्र कृषि सांख्यिकीयविषयक जिल्हावार माहिती, भाग २, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, १९४१ ४२, पृ. ८

१८) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.३४५

१९) महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, १९४१–४२, पृ.१२

२०) कित्ता, पृ.१२

२१) कित्ता, पृ.१३

२२) कित्ता, पृ.१४

२३) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.३४७

२४) Gazetteer of the Bombay Presidency, Satara, Government Central Press, Bombay, 1885, P. 167

२५) Sawloman S., Crops Of the Bombay State : Their Cultivation and Statistics, 1953, P.121

२६) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.३४८

२७) कित्ता, पृ.३४७

२८) भावे वा.कृ, पेशवेकालीन महाराष्ट्र, १९७६, पृ.१४१

२९) कित्ता, पृ.१४२

३०) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.३५३

३१) महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, १९४१–४२, पृ.२४

३२) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.३५२

३३) Gazetteer of the Bombay Presidency, Satara, Government Central Press, Bombay, 1885, P. 151, 152

३४) Statistical Atlas, Of Bombay State(Provishal) Part, 1925, P.114.

३५) Gazetteer of the Bombay Presidency, Satara, Government Central Press, Bombay, 1885, P. 322

३६) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.३६४

३७) कित्ता, पृ.३६७

३८) कित्ता, पृ.३६८

३९) केतकर व्यं.श्री., महाराष्ट्रीय ज्ञानकोश, खंड १५, १९२५, पृ.१३४

४०) Gazetteer of the Bombay Presidency, Satara, Government Central Press, Bombay, 1963, P. 69

४१) Gazetteer of the Bombay Presidency, Satara, , Government Central Press, Bombay, 1885, P. 168

४२) कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र, मराठयांचा इतिहास, खंड १, १९८४, पृ.३४५

४३) Gazetteer of the Bombay Presidency, Satara,, Government Central Press, Bombay, 1885, P. 168-169

४४) Ibid, P. 168-169

४५) Bhatia B.M., Famis In India, 1963, P.64

४६) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.३७८

४७) Statistical Atlas, Of Bombay State(Provishal) Part, 1925, P.112

४८) Cashman Richard, The Mith Of the Lokmanya, 1975, P.123

४९) Bhatia B.M., Loc.Cit., P.262

५०) Statistical Atlas, Of Bombay State(Provishal) Part, 1925, P.112

५१) Gazetteer of the Bombay Presidency, Satara, Government Central Press, Bombay, 1963, P. 378

५२) Ibid, P. 168-169

५३) Gazetteer of the Bombay Presidency, Satara,, Government Central Press, Bombay, 1885, P. 27

५४) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.३७८

५५) कित्ता, पृ.३८२

५६) भावे वा.कृ., उपरोक्त, पृ.३७२,३७३

५७) लोकराज्य, सप्टेंबर १९८४, महाराष्ट्र शासन, पृ.१२ १४

५८) महाराष्ट्र राज्य, पशुधन जनगणना अहवाल सन १८८२–८३, पृ.१०

५९) महाराष्ट्र राज्य, पशुधन जनगणना अहवाल सन १९००१९०१ ते १९३९–४०, पृ.१२

६०) Senses Of India, 1961,Vol.10, Part 7-C, Maharashtra, P.15

६१) Report On The Administration Of the Bombay Presidency, 1923-24, P.83

६२) Gazetteer of the Bombay Presidency, Satara,, Government Central Press, Bombay, 1885, P. 194

६३) Ibid, P. 169

६४) Gazetteer of the Bombay Presidency, Satara, Government Central Press, Bombay, 1963, P.506

६५) Banking Statistics, Basic Statistical Returns, Vol.20, Reserve Bank Of India, March 1991, P.95

६६) कणगली एस.एम., पुण्याचा माहितीगार, १९४९, पृ.१०

६७) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.४०९ ४१०

६८) Gazetteer of the Bombay Presidency, Satara, Government Central Press, Bombay, 1963, P.390

६९) Ibid, P. 171

७०) Statistical Atlas, Of Bombay State, 1950, P.84.

७१) Report On The Administration Of the Bombay Presidency, 1911-12, P.80

७२) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.४१९

७३) कराड नगरपालिका, शतसांवत्सारिक स्मृति ग्रंथ, १८५५–१९५५, पृ.७१

७४) Report On The Administration Of the Bombay Presidency, 1911-12, P.233

७५) सातारा शहर नगरपालिका, सप्तर्षी आमची शाहूनगरी, शताब्दी महोत्सव स्मृतिग्रंथ, २९ जानेवारी १९५४,पृ.८०, ८१

७६) Report On The Administration Of the Bombay Presidency, 1911-12, P.230

७७) Statistical Atlas, Of Bombay State, 1950, P.89.

७८) महाव्यवस्थापक, सातारा जिल्हा उद्योग केंद्र यांच्याकडून मिळविलेल्या माहितीनुसार

७९) कित्ता

८०) कित्ता

८१) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.४२९

८२) Statistical Atlas, Of Bombay State, 1950, P.89.

८३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था सातारा

८४) आमचा सातारा, सातारा शहर नगरपालिका स्मरणिका, ३० जून १९६७, पृ ४५

८५) Statistical Atlas, Of Bombay State, 1950, P.71

८६) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.४३५

८७) Statistical Atlas, Of Bombay State, 1950, P.111

८८) Ibid, P. 11

८९) Ibid, P. 111

९०) Gazetteer of the Bombay Presidency, Satara, Government Central Press, Bombay, 1885, P. 223

९१) Statistical Atlas, Of Bombay State, 1950, P.91

९२) Gazetteer of the Bombay Presidency, Satara, Government Central Press, Bombay, 1963, P.812

९३) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.४३५

९४) सातारा नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सवी अंक १९५४, जनरल प्रोसिडिंग बुक, १८५३–१९७३ जमा खर्च अंदाज पत्रक, १९८२–२००३.

९५) सातारा नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सवी अंक १९५४, उपरोक्त, पृ.४९

९६) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं. १६, दि.३० जानेवारी १९५८, पृ.४५

९७) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, ठराव नं. ३१०, विषय नं.२१, दि.२५ ऑगस्ट १९६८, पृ.५६

९८) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १९३८–८०, जमाखर्च अंदाज पत्रक, १९८०– २०००

९९) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, पृ.६३१

१००) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, ठराव नं ३, दि. २४ ऑगस्ट १८८३, पृ.३५

१०१) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडींग बुक, ठराव ६, १८ जुलै १९३३, पृ.६

१०२) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडींग बुक, ठराव १९८, २४ फेब्रुवारी १९७६, पृ.२१, २२

१०३) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.९, १४ सप्टेंबर १९४८, पृ.११८

१०४) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं. ४, विषय नं.४, ३० सप्टेबर १९२७, पृ.२

१०५) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं. ६, विषय नं.६, २५ ऑगस्ट १९४४, पृ.२५

१०६) सातारा नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सवी अंक १९५४, पृ.३५

१०७) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, ठराव नं.३, १२ फेब्रुवारी १९३४, पृ.७२

१०८) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, ठराव नं.४, ११ जुलै १९४२, पृ.१३६

१०९) सातारा नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सवी अंक १९५४, जनरल प्रोसिडिंग बुक १९५४–१९८०, जमाखर्च अंदाजपत्रक १९८०–२००३, पृ.७

११०) सातारा नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सवी अंक १९५४, सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १८५३–१९८०, जमाखर्च अंदाज पत्रक, १९८०–२००३, पृ.७

## प्रकरण पाचवे

# सातारा शहराचा सांस्कृतिक इतिहास

### ५.१ प्रास्ताविक

सातारा शहरात विविध जाती धर्माचे लोक राहतात. साताऱ्यातील सर्व धर्माचे लोक आपापले धार्मिक उत्सव, चालीरिती व परंपरा निष्ठेने पार पाडतात. सातारा शहरातील देवालये, मंदिरे, मशिदी, चर्च, अग्यारी यावरून शहरात सर्वच जातीचे लोक राहत होते, हे स्पष्ट होते. सातारा शहरास मराठयांच्या काळापासून ऐतिहासिक महत्त्व होते हे तेथे असलेल्या स्थळावरून समजते. त्यामुळेच सातारा शहर हे एक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे असलेले एक पर्यटन स्थळ समजले जात होते. त्यामुळे या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांच्या आधारे तत्कालीन सांस्कृतिक स्थितीची माहिती मिळते. सातारा शहराचा सांस्कृतिक इतिहास पाहत असताना मुर्तीकला व मंदिरशैली यांचीही माहिती घ्यावी लागते. तसेच सातारा शहरातील धार्मिक स्थळामध्ये संगम माहुली, नटराज मंदिर व विविध प्रकारची मंदिरे, मशिदी व सातारा शहरातील ऐतिहासिक स्थळामध्ये चारभिंती, छत्रीचा हौद, अदालतवाडा, जुना राजवाडा, नवा राजवाडा, जलमंदिर व अंजिक्यतारा किल्ला इत्यादी त्यांचे ऐतिहासिक महत्त्व अभ्यासणार आहे.

शिक्षण ही मानवी संकल्पना असल्यामुळे गतिमान करणे काळाची गरज आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. राष्ट्राच्या विकासासाठी व्यक्तिच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण आवश्यक आहे. शालेय शिक्षण म्हणजे शिक्षण, साक्षरता म्हणजे शिक्षण असा सर्वसाधारण समज प्रचलित असतो. परंतु शिक्षणाची व्याप्ती इतकी मर्यादित नाही. व्यक्ती जन्मापासून अनेक माध्यमातून शिक्षण घेत असतो. यामध्ये कुटुंब, प्रसार माध्यमे, कीर्तने व प्रवचन इ.व्यक्तिच्या शिक्षणाची ही सहज प्रवृत्ती झाली. यातूनच ज्ञानाचा विस्तार झाला तसे हे समाजशिक्षण कमी पडू लागले. विशिष्ट उद्देश्य डोळयासमोर ठेवून व्यक्तिचे शिक्षण होणे गरजेचे झाले. त्यातूनच औपचारिक शिक्षण सुरू झाले. सातारा शहरातील शिक्षण व्यवस्थेची माहिती घेत असताना यामध्ये शैक्षणिक संस्था, मराठी पाठशाळा, पूर्व प्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण इत्यादीची माहिती घेणार आहोत .

## ५.२ सातारा शहराच्या सांस्कृतिक इतिहासाची पार्श्वभूमी

मौर्य व सातवाहन काळात लेणी खोदण्याची कला उदयास आली. वाकाटक आणि राष्ट्रकूट यांच्या राजवटीत ही कला परिणत अवस्थेला पोहचली. सहयाद्रीचा कातळ लेणी कोरण्यास उपयुक्त ठरल्यामुळे असंख्य लेणी महाराष्ट्रात कोरली गेली. यामध्ये बौद्ध लेणी, घारापुरीची हिंदु लेणी, धाराशीव येथील जैन लेणी यांचा समावेश होतो. लेणी खोदण्याची कला यादवकालात लुप्त झाली. त्याची जागा मंदिरांनी घेतली. हेमाडपंती या नावाने प्रसिद्ध असलेली कितीतरी मंदिरे या काळात बांधली गेली.

यादवकालानंतर बहमनी राजवटीत वास्तुशिल्पाकडे दुर्लक्ष झालेले आढळते. मात्र संरक्षणाच्या दृष्टीने भरभक्कम स्वरूपाचे किल्ले या काळात बांधले गेले. विजापूरच्या आदिलशहाच्या काळात स्थापत्यशास्त्राचा विकास होऊन गोलघुमट, जुम्मा मशीद, जामे मशीद यासारख्या वास्तु विजापूर येथे निर्माण झाल्या. निजामशाहीच्या काळात अहमदनगर वगळता महाराष्ट्रात भव्य वास्तु उभारल्या गेल्या नाहीत.[१]

शिवकालात किल्ले उभारणे आणि किल्ल्याची डागडुजी करणे हे स्थापत्य प्रकारच विशेषत्वाने प्रचारात होता. तरीही छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापत्यकलेकडे लक्ष दिलेले दिसून येते. रायगडावरील मंदिर व वास्तू या आजही त्याची साक्ष देतात. त्याच काळात सातारा परिसरात काही मंदिरे बांधली गेल्याचे दिसते. पेशवेकाळात मंदिरे, घाट, वाडे मोठया प्रमाणावर बांधले जाऊ लागले. मराठयांच्या सरदारांनी ठिकठिकाणी वाडे बांधले. परंतु पेशवेकालात स्वतंत्र असा वास्तुप्रकार निर्माण झाला नाही. मोगलांच्या स्थापत्यविषयांचाच अनुकरण करण्याचा प्रयत्न झाला. मंदिराच्या बाबतीत हेमाडपंती मंदिराचा आदर्शच पेशवाईतील स्थापत्यशास्त्रज्ञापुढे होता.[२]

सातारा परिसरात प्राचीन काळी दोन प्रकारच्या वास्तुस्थापत्याची निर्मिती झाली. त्यापैकी एक म्हणजे लेणी. सातवाहन काळातील लेणी कराड, वाई, भोसे व शिरवळ येथे आढळतात. ही हिनयानपंथीय बौद्धलेणी आहे.[३] या ठिकाणी प्राचीन काळातील राजांनी लेणींची देणगी दिल्याचा उल्लेख काही ब्राम्ही लिपीतील अभिलेखात आहेत. तर दुसरी गोष्ट म्हणजे सातारा परिसरात अनेक ठिकाणी उभारली गेलेली आणि हेमांडपंथी मंदिरे. परळी, चिमणगाव व फलटण येथे अशी मंदिरे पाहावयास मिळतात.[४] चुन्याचा वापर न करता, खोबण्या करून,

दगडावर दगड रचून, कौशल्यपूर्ण संतुलन साधनलेले या मंदिराच्या रचनेत आढळते. मोठया दगडाच्या छताचे ओझे पेलण्यासाठी या मंदिराच्या भिंती खूप रूंद केलेल्या आहेत. त्यांचा आतील व बाहेरचा दर्शनी भाग घडीव दगडाचा असला तरी दोहोमधील जागा दगडगोटयांनी भरून टाकलेली असते. रामचंद्र यादव यांच्या वेळापूरच्या शिलालेखावरून हे स्पष्ट होते की, सातारा परिसरातील मंदिराची शिखरावर कूट स्तंभ रचनेची होती. या शिखरावर कळस बसवून त्यावर ध्वजारोहन केले जात होते.परंतु ही शिखरे आज पाहावयास मिळत नाहीत. परंतु अशी शिखरे लाभलेल्या मंदिरांना भुमिज मंदिरे असे म्हणतात.[५]

सातारा येथील मंदिरे मध्यम आकाराची आहेत. मुखमंडप, सभामंडप आणि गर्भगृह हे भाग मंदिरांना आहेत. मंडप उघडा किंवा बंदिस्त आहे. सभामंडपाच्या मध्यभागी थोडया उंचीची एक मोठा चौकोनी किंवा दगड  असे. तिच्या चार कोपऱ्यास चार स्तंभ आहेत. या दगडांना रंगशिळा म्हणतात. कारण कलाकारांनी किंवा नृत्यांगनांनी येथूनच देवतेच्या उपासनेप्रित्यर्थ कला सादर करायची असे. छताच्या तुळयांच्या मंडपांना नवरंग मंडप म्हणतात. सातारा परिसरातील बहुतेक मंदिरांची रचना याच प्रकारची दिसून येते. क्वचित ठिकाणी रंगशिळेवर छतच फक्त सपाट असण्याऐवजी एकावर एक निमुळत्या होत जाणाऱ्या एक केंद्रक आढळते.

अशा मंदिराच्या अंतराळात डाव्या व उजवीकडील भिंतीत एकेक देवकोष्ठ आहे.त्यातील मूर्ती आज दिसत नाहीत. मदिराच्या गाभाऱ्याचे प्रवेशद्वार तीन किंवा पाच शाखांचे आहे. तुळईवर गणेशप्रतिमा कोरलेली आहे. गाभाऱ्याच्या आतील भिंतीवर चित्रे काढलेली असून ती अस्पष्ट दिसत आहेत. या मंदिराचे छत समतल व गाभाऱ्यात देवाची मूर्ती अशी रचना दिसते.[६]

## ५.३ सातारा  मंदिर वास्तुशिल्पशैली व मुर्तीकला

सातारा व परिसरात लहानमोठी अनेक मंदिरे आहेत. यातील काही मदिरांची पडझड झालेली आहे तर काही मंदिरे अजूनही सुस्थितीत आहेत. सातारा शहरात हिंदू धर्मियांची मंदिरे सुमारे २०० आहेत.[७] या मंदिरातून गर्भगृह व सभामंडप ही दोन दालने आढळतात. मोठया मंदिरातून गर्भगृह, अंतराळ, रंगमंडप, सभामंडप आणि नंदीमंडप ही प्रमुख दालने आढळतात. काही मंदिरे फक्त गर्भगृह व पुढे छोटा सोपा एवढीच आहेत. हेमाडपंथी शैलीनंतरच्या अवनत काळातील ही ओबडधोबड वास्तुशैली आहे. बांधकामात मंदिराच्या छतापर्यंत वालुकाश्म वापरलेला आहे. परंतु शिखरे विटा व चुन्यात बांधलेली आहेत.  शिखरे स्तरांवर स्तर अशी

निमुळती होत वर गेलेली उपशिखरांनी वेढलेली असून काही मंदिराची शिखरे शंक्काकार तर काहींची समोच्चतादर्शक रेषात वर निमुळती होत जाणारी आहेत. स्तरावर स्तर रचून बांधलेल्या शिखरावर मूर्तीसाठी चुनेगच्चीतील देवळया ठेवलेल्या असून बहुतांशी मंदिरावर वैशिष्टयपुर्ण पेशवेकालीन मूर्तीकाम आढळते. या शिखराच्या वर उत्फुल्ल कमळात कुंभ आणि त्यावर उपडे उत्फुल्ल कमळ व त्याच्या देठातून वर कळस ही मराठाकालीन मंदिर शिखराची वैशिष्टयपूर्ण रचना सातारा शहरातील सर्व मंदिर शिखरातून प्रकर्षाने जाणवते. यातील कुंभाची रचना इस्लामी वास्तुशैलीतील घुमटाप्रमाणे आहे. संगम माहूलीतील मंदिराची रचना ही कुंभावर कमळ व त्यात कुंभ व पुन्हा कमळ व त्यावर कुंभ अशी कुंभावर कुंभ पद्धतीची आहे.[८]

सातारा शहरातील मंदिरे ही वास्तुशिल्पशैलीच्या दृष्टिने नागरशैलीत बांधलेली आहेत. ही शैली प्रथम यादव व शिलाहार वंशातील राजांनी विकसित केली. पुढे त्यात हेमाडपंथ या यादवांच्या करणाधिप मंत्रयाने काही बदल केले. या बदलामुळे मंदिर वास्तुतील शिल्पकला जवळजवळ संपुष्टात येऊन त्यास वास्तुरूप प्राप्त झाले. ती वास्तु हेमाडपंथी शैली या नावाने प्रसारित झाली आहेत. या सर्व मंदिरात महादेवाच्या मंदिराचे प्रमाण जास्त आहे.[९]

## ५.४ सातारा शहरातील मंदिरे

या मंदिरामध्ये भाटे यांचे राम मंदिर, विश्वेश्वर मंदिर, अभ्यकरांचे विष्णू मंदिर, कृष्णेश्वर मंदिर, सातारा शहरातील गणपतीची मंदिरे, शंकराची मंदिरे, रामाची मंदिरे, देवीची मंदिरे, दत्ताची मंदिरे, विठ्ठल मंदिरे, संताची मंदिरे, शनीची मंदिरे, पेढयाचा भैरोबा मंदिर व संगम माहुलीतील महादेव मंदिरे आदि मंदिरांचा समावेश होतो. काही निवडक मंदिरांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

### ५.४.१ भाटे यांचे राम मंदिर

सातारा शहरातील फुटक्या तळयाजवळील सीतारामबुवा भाटे यांनी बुधवार फाल्गुन कृष्ण पंचमी शके १७८० म्हणजेच सन १८५५ मध्ये हे मंदिर बांधले आहे. सीताराम बुवा माटे यांचे वडील हरभटजी माटे यांनी संन्यास घेतल्यानंतर शके १७७७ फाल्गुन अमावस्येस समाधी घेतली. त्या समाधीजवळ त्यांचे चिरंजीव सीतरामबुवा यांनी रामलक्ष्मणसीता यांच्या मूर्ती स्थापन करून मंदिर बांधले आहे.[१०]

### ५.४.२ जोशी यांचे विश्वेश्वर मंदिर

हे मंदिर मंगळवार पेठेत असून त्याची स्थापना शके १७५८ म्हणजे सन १८३६ मध्ये केली आहे. हे मंदिर पावसचे रामचंद्र गंगाधर जोशी यांनी केली आहे. रामचंद्र जोशी हे पावसहून कायमचे राहण्यासाठी सातारा येथे आले त्यावेळी त्यांनी आपले दैवत विश्वेश्वर याचे कायम स्मरण राहवे यासाठी हे मंदिर बांधले आहे.[११]

### ५.४.३ अभ्यंकरांचे विष्णू मंदिर

सदाशिव वामन अभ्यंकर यांच्या निधनानंतर त्यांची पत्नी १७९८ मध्ये सती गेली होती. तिच्या स्मरणार्थ काशी विश्वेश्वर लिंग व या सदाशिव वामन अभ्यंकर यांच्या पादुका आणि सतीचा वरदहस्त असलेले मंदिर बांधले होते. या मंदिराच्या सान्निध्यात विष्णू मंदिर असल्यामुळे त्यास अभ्यंकरांचे विष्णू मंदिर असे नाव मिळाले आहे.[१२]

### ५.४.४ कृष्णेश्वर मंदिर

हे मंदिर पहिल्या बाजीराव पेशव्याचे मामा कृष्णाजी चासकर यांनी बांधले आहे. ते सातारचे मामलेदार असताना सातारा शहराच्या पश्चिम टोकास यवतेश्वराच्या पायथ्याशी शके १६४५ (२७ जानेवारी १७२४) मध्ये बांधले आहे. तेंव्हा या भागास सदाशिवपुरा असे नाव होते. हे मंदिर बांधल्यावर पाच वर्षानी व्यंकटराव घोरपडे या भागात वाडा बांधून राहू लागले. तेव्हापासून यास व्यंकटपुरा नाव प्राप्त झाले. या देवालयात गाभाऱ्याच्या बाहेरील दगडी स्तंभावर खालील शिलालेख आहे.

"श्रीकृष्णेश्वरं नामक पशुपतेलिंग शिव नार्मर्द
ज्योतिर्वित्कुलदीपकृष्णजमहादेवेत स्थंस्थापित ।
स श्रीशाहुनृपात्सदाशिव इति प्राप्यभिधानं नव्रं
लिंगाग्रां कृतवान्सदाशिवपुरीमित्युचिवान, चास्कर ः ।।
शके १६४५ शोभंकृत संवत्सेर, माघ शु।। त्रयोदशी सोमः ।
कृष्णाजी जनार्दनपंत."[१३]

**५.४.५ सातारा शहरातील गणपतीची मंदिरे**

**५.४.५.१ सातारच्या खिंडीतील कुरणेश्वर गणपती मंदिर**

सातारा शहरातून अंजिक्यतारा व यवतेश्वर डोंगर यांच्यामधून कुरणेश्वरला जाताना एक बोगदा लागतो. हा बोगदा सन १८५५ मध्ये कॅ.पी.हिल यांच्या मार्गदर्शनाखाली बांधला गेला आहे. या बोगद्यातून बाहेर गेल्यानंतर डाव्या बाजूला कुरणेश्वर गणपतीचे मंदिर आहे. या मंदिरास खिंडीतील गणपती असेही म्हणतात. हे मंदिर पहिले बाजीराव पेशवे यांचे मेहुणे चासकर यांनी सन १७२३ मध्ये बांधले आहे. आजच्या युगात हे मंदिर निश्चितच मानसिक समाधान व शांती मिळवून देते. या मंदिरात भाद्रपद शुद्ध चतुर्थी व माघ शुद्ध चतुर्थीच्या वेळी पाच दिवस उत्सव साजरा केला जातो.[१४]

**५.४.५ .२ घिसाडयाच्या पाराजवळील गणपतीचे मंदिर**

या गणपतीस फार वर्षापूर्वी लग्न मुंजीची अक्षदा देत असत.

**५.४.५.३ ढोल्या गणपती**

हा मालशांचा गणपती असून ढोल्या गणपतीचे मंदिर अजिंक्यतारा किल्ल्याच्या उत्तरेला पायथ्याशी बांधलेले आहे. या गणपतीस साताऱ्याचे ग्रामदैवत मानले जाते.

**५.४.५.४ व्यंकटपुऱ्यातील गणपती**

हा गणपती व्यंकटपुऱ्यात आहे.

**५.४.५.५ गारेचा गणपती**

हा गणपती चिमणपुरा पेठेत असून या गणपतीस शाहू महाराजांनी देणगी दिली होती.[१५]

**५.४.६ शंकराची मंदिरे**

**५.४.६.१ यवतेश्वरचे शिवमंदिर**

सातारा शहराच्या नैऋत्येस पाच कि.मी.अंतरावर कासबामणोली या घाटाच्या रस्त्यावर हे शिवमंदिर आहे. या मंदिराची समुद्रसपाटीपासूनची उंची १२३० मी. आहे. हे मंदिर छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीत बांधलेले आहे. मंदिराच्या व्यवस्थेकरिता या गावाचा महसूल नेमून दिला आहे. मंदिराच्या पश्चिमेस पिण्याच्या पाण्याचे तळे असून त्यास देवाचे तळे म्हणतात. मंदिराच्या सभोवती धर्मशाळा असून दक्षिणेस रामेश्वराचे व मारूतीचे, उत्तरेस काळभैरवाचे व घाटाईदेवीचे आणि समोर गणपतीचे मंदिर आहे. मंदिराच्या आवारात दीपस्तंभ

आहे. या मदिरावे बांधकाम हेमाडपंथी शैलीतील आहे. मंदिराचे एकूण तीन भाग असून मुख्य गाभारा जमिनीच्या सपाटीपासून खाली आहे. बाहेरील सभामंडप काळया दगडामध्ये बांधलेला असून स्तंभावर उत्कृष्ट कोरीव काम आहे. येथे कार्तिक शुद्ध प्रतिपदेला यात्रा भरते. तसेच श्रावणी सोमवारी भाविक दर्शनासाठी येतात. महाशिवरात्रीला येथे मोठा उत्सव भरतो.[१६]

### ५.४.६.२ पाटेश्वर मंदिर

सातारा शहराच्या आग्नेयेस डोंगरावर पाटेश्वराचे ठिकाण आहे. या ठिकाणी एकूण आठ प्राचीन गुहा आहेत. पाटेश्वर मंदिर हे १६ व्या शतकाच्या उत्तरार्धात व १७व्या शतकाच्या पूर्वार्धात बांधले गेले आहे. हे मंदिर तटबंदीनी युक्त असून या तटबंदीतील मुख्य द्वार उत्तराभिमुख आहे. मुख्य मंदिर पूर्वाभिमुख आहे. मुख्य दरवाजातून आत गेल्यावर डाव्या बाजूस पुष्करिणी लागते. तटबंदीच्या आत एक लहान मंदिर, नंदीमंडप व मुख्य प्रांगणात दोन मोठया आकाराच्या दीपमाळा आहेत. मुख्य मंदिराच्या सभामंडपास पुढील बाजूने वामनभिंत आणि कक्षासन आहे. मंडपाच्या मागच्या भिंतीत दोन देवकोष्ठे आहेत.[१७] मंडपाच्या मागील भिंतीतील बाजूच्या छोटया मंदिरामध्ये शेषशायी विष्णू व गणेशाची मूर्ती आहे. तर बाजूच्या देवकोष्ठामध्ये भैरवी, सिद्धसाधू आणि भक्त आहे. मंडपाच्या जमिनीवरील मध्यभागी कूर्मशिला आहे. मुख्य गर्भगृहात जाण्यासाठी मराठा शैलीतील द्विशाखा प्रकारचे द्वार आहे. ललाटावर गणेश आहे. गर्भगृहात शिवलिंग आहे. गर्भगृहाच्या मागील भिंतीत देवकोष्ठे असून त्यात सरस्वतीची बैठी मूर्ती आहे. तिच्या चार हातात माला, पाश, वीणा आणि पुस्तक आहे.[१८]

अलिकडील बहुलेश्वर मंदिर, यादोगोपाळ पेठेतील खडकेश्वर मंदिर, न्यु इंग्लिश स्कुलजवळील टेकाळे यांचे टेकाळेश्वर मंदिर, कमानी हौदाजवळील गुरूवार पेठेतील राजेश्वर महादेव मंदिर व शुक्रवार पेठेतील कोटेश्वर मंदिर, खिंडीच्या गणपतीजवळचे कुरणेश्वर मंदिर, डफळे यांचे मंदिर, सोमवार पेठेतील लिंगायत समाजाचे चंद्रशेखर मंदिर, गुरूवार पेठेतील योगेश्वर मंदिर व कान्हेरे यांच्या वाडयाजवळील बोळात मशिदीसारखे दिसणारे शंकरावे एक लहानसे मंदिर आहे. या मंदिरातील पिंडीचे तोंड नेहमीप्रमाणे उत्तरेकडे नसून पश्चिमेकडे अहे. तेथे एक अस्पष्ट शिलालेख आहे. मंदिराचे दोन भाग स्पष्ट दिसतात.[१९]

### ५.४.७ रामाची मंदिरे

१) प्रतापगंज पेठेतील आगटे यांचे गोरा राम मंदिर

२) मंगळवार पेठेतील गुजर मंडळीचा काळा राम मंदिर

३) फुटक्या तळयाजवळील माटे यांचे राम मंदिर

४) शनिवार पेठेतील शहांचे राम मंदिर

५) व्यंकटपुऱ्यातील दिवेकरांचे राम मंदिर

६) समर्थ मंदिराजवळील दामले यांचे राममंदिर

७) खण आळीतील मारवाडी समाजाचे राममंदिर.[२०]

सातारा शहरात वरील राम मंदिरे आहेत.

### ५.४.८ देवीची मंदिरे

१) महाराजांची जलमंदिरातील भवानी देवीचे मंदिर

भोसले घराण्याचे कुलदैवत श्री. भवानी देवीचे मंदिर छत्रपती शाहू महाराजांनी जलमंदिरात बांधले होते. छत्रपती घरण्याचे हे खाजगी मालकीचे मंदिर आहे.

२) प्रतापगंजपेठेतील गोऱ्या रामासमोरील देवीचे मंदिर

३) शनिवार चौकातील कासारांचे देवी मंदिर

४) यादोगोपाळ पेठेतील महाजनी देवी मंदिर

५) माटे यांच्या वरच्या वाडयातील देवी मंदिर

६) मंगळवार तळयाजवळील कोपऱ्यावरील देवी मंदिर

७) किल्ल्यावरील मंगळाई देवी मंदिर

८) किल्ल्याच्या पूर्व उताराच्या खालचे देवी मंदिर

९) कलेक्टर कचेरीजवळील फोडजाई देवीचे मंदिर.[२१]

सातारा शहरात वरील देवीचे मंदिर असून नवरात्र उत्सवाच्यावेळी या सर्व देवीच्या मंदिरात नऊ दिवस सोहळा चालत असे.

### ५.४.९ श्री.दत्ताची मंदिरे

१) मंगळवार पेठेतील वैद्यांचे दत्त मंदिर या मंदिराची स्थापना गोंदवलेकर महाराजांच्या हस्ते केली गेली आहे.

२) प्रतापगंज पेठेतील मुतालिकांचे दत्त मंदिर

३) गेंडामाळावरचे दत्त मंदिर

४) सोमवार पेठेतील दत्त मंदिर हे एका वारांगनेने स्थापन केले आहे.

५) बेणारे यांचे भोरकर वाडयाजवळील दत्त मंदिर

**५.४.१० श्री.विठ्ठल मंदिरे**

१) अभ्यंकरांचे विष्णू मंदिर

२) यादोगोपाळ दिवशीकरांचा मुरलीधर

३) अत्रे यांचे विठ्ठल मंदिर

४) विठोबाच्या नळाजवळील विठोबा मंदिर

५) पुराणिकांचा कमानी हौदाजवळील विठोबा

६) कान्हेरे वाडयासमोरील बालाजी

७) मारवाडी समाजाचा सत्यनारायण

८) मारवाडी लोकांचा न्यू इंग्लिश स्कूलच्या उत्तरेकडील बालाजी.[२२]

**५.४.११ संताची मंदिरे**

**५.४.११ .१ भटजी महाराजांचा मठ**

मंगळवार पेठेत भटजी महाराजांचा मठ असून तो सन १८६५ मध्ये बांधला आहे. भटजी महाराज हे संगमेश्वरचे राहणारे असून त्यांचे नाव सदाशिव जोशी हे होते. ते उत्तम वैदिक होते. हे निरिच्छ व विरक्त होते. त्यांचा मृत्यू इ.स.१८६५ च्या सुमारास झाला व नंतर मठ अस्तित्त्वात आला.

**५.४.११.२ ज्ञानेश्वर महाराजांची समाधी**

प्रतापसिंह महाराजांचा विठोबा शेडगे म्हणून एक नोकर ज्ञानेश्वर महाराजांचा भक्त होता. एकदा त्याला आळंदीस जाण्यास महाराजांनी रजा दिली नाही. तरीही तो तसाच गेला परत आल्यावर त्याला असे दिसून आले की, आपली गैरहजेरी कोणासच भासली नाही. व आपले कामही आपल्या सारखाच कोणीतरी मनुष्य करीत होता. प्रतापसिंह महाराज रागावले नाहीत. हा चमत्कार ज्ञानेश्वर महाराजांच्या कृपेने झाला असे वाटून त्याने सोमवार पेठेत ज्ञानेश्वर महाराजांची समाधि स्थापन केली. पुष्कळ वर्षे ही समाधी निवडुंगामुळे अज्ञात राहिली होती. ती आता तेथे विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती स्थापून मंडप बांधला आहे.

### ५.४.११.३ शंकराचार्यांचा मठ

संकेश्वर मठपतीनी आपले शिष्यस्वामी श्रीमद् जगद्गुरू श्रीशंकराचार्य विद्याशंकर भारती जेरेस्वामी यांना सन १९३९ मध्ये हा मठ बांधून दिला. येथे प्राचीन वैदिक विद्या शिकवली जाते. भगवद्गीता भाष्यवादि धर्मग्रंथावर प्रवचने होतात.[२३]

### ५.४.११.४ महानुभव मठ

सन १९१२ मध्ये कैवल्यवासी बाबा मोतीवाले यांनी हा मठ स्थापन केला. महानुभावी पंथाप्रमाणे एकेश्वरी अनन्य भक्तीचे हेतूसाठी या मठात स्त्री पुरूष भक्तीमार्ग अनुसरत आहेत. नामस्मरण, पठण, प्रश्नोत्तरे चर्चा आदि. महानुभावी पंथीय कामे येथे चालतात.[२४]

### ५.४.१२ शनीवार हौदाजवळ वरच्या बाजूला शनिमारूतीचे मंदिर

कोंडवे गावात तलावासाठी खणत असताना मारूतीची मूर्ति सापडली होती. ती गाडीतून सातारला आणीत असता गाडीचा कणा मोडला. त्यामुळे मारूतीची पुढे जाण्याची इच्छा नाही असे समजून तेथेच त्याचे देऊळ बांधण्यात आले. त्याच्या आवारांत शनिचे मंदिर आहे. हे मंदिर शनिवार चौकातून कासारदेवीकडे जाताना वाटेत आहे. तेथे एक शिलालेख आहे.[२५]

### ५.४.१३ भैरोबा मंदिर

गेंडामाळावरून गडकर आळीकडे येताना उजव्या टेकडीवरील पठारावर एक भैरोबाचे देवालय आहे. या मंदिरास पेढयाचा भैरोबा म्हणतात. याच देवाची स्थापना करंजे गावी झालेली आहे. या देवाची यात्रा अगोदर होते व मग येथून उत्सव मूर्ति करंजे गावी जाते. नंतर तेथील यात्रा होते. या रिवाजावरून या पेढयावर पूर्वी वस्ती असावी असा अंदाज करता येतो.[२६]

कालभैरवनाथाचे मंदिर करंजे पेठेत आहे. करंजे येथील मंदिर कोणी व कधी बांधले हे ज्ञात नाही. येथे चैत्र वैद्य अष्टमीला उत्सव साजरा करतात. नवमीला पहाटे ५.०० वाजता ९ फूट लांबीचे व ३ तुट रूंदीचे चरातून धगधगीत निखाऱ्यावरून प्रथम मंदिराचा गुरव चालत जात असे आणि नंतर नवस केलेले लोक चालत जातात. कुणाचेही पाय भाजत नाहीत. यानंतर पालखी निघून देवाची जत्रा सुरू होते. जवळच एक रूचकर पाण्याचे सुंदर बांधलेले तळे आहे.[२७]

### ५.४.१४ संगम माहुली –

संगम माहूली या ठिकाणी कृष्णा व वेण्णा नद्यांचा संगम झालेला आहे. हे गाव कृष्णा नदीच्या पश्चिम काठावर आहे. तर कृष्णा नदीच्या पूर्व काठावर क्षेत्र माहुली आहे. संगम माहुलीची स्थापना पंतप्रतिनिधीनी सन १७१९ च्या सुमारास केली. प्रतिनिधी घराण्याने अठराव्या शतकात संगम माहुलीत दहा मंदिरे बांधली. छ. शाहू महाराजांनी श्रीपतराव प्रतिनिधीने संकल्प सांगितल्याबद्दल अर्धा चाहूर जमीन दान दिली होती. या जागेत प्रतिनिधीनी वस्ती केली.[२८]

### ५.४.१४.१ संगमेश्वर महादेव मंदिर–

श्रीपतराव पंतप्रतिनिधीनी यांनी मंदिराचे बांधकाम इ.स.१७४२ मध्ये केले. कृष्णा नदीच्या काठापासून मंदिराच्या दरवाजापर्यंत दगडी पायऱ्या आहेत. मंदिराच्या आतमध्ये गाभाऱ्यात महादेवाची पिंड आहे. मंदिरासमोर नंदी असून त्यावर मेघडंबरी आहे. नंदीच्या चौथऱ्यावर व घुमटाच्या वरच्या भागावर फुलपाखरांची चित्रे कोरलेली आहेत. या मंदिराच्या आवारातील भिंतीवर लक्ष्मीचे चित्र कोरलेले आहे. मंदिराच्या जवळच बनशापूरी साधू व त्यांच्या शिष्यांची समाधी आहे.[२९]

### ५.४.१४.२ बिल्वेश्वर मंदिर–

श्रीपतराव पंतप्रतिनिधी यांनी हे मंदिर इ.स.१७४२ मध्ये बांधले. या मंदिराचे बांधकाम दगडात केलेले आहे. या मंदिराला देवडी असून मंदिराच्या गाभाऱ्यात महादेवाची पिंड आहे. या मंदिराच्या गाभाऱ्यासमोर कमानीची मेघडंबरी असून त्यात एक नंदी आहे. या मंदिराच्या पलीकडे अंगापूरचे आनंदराव देशमुख यांनी इ.स.१७३८ मध्ये बांधलेला घाट आहे.[३०]

### ५.४.१४.३ राधाशंकर मंदिर–

बापूभट गोविंदभट यांनी इ.स.१७८० मध्ये कृष्णा नदीच्या पूर्व तीरावरील गिरी घाटावर हे मंदिर बांधले आहे. शिखरावरील देवळयामध्ये देव–देवतांच्या मूर्ती आहेत. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला दोन दीपमाळा आहेत. या दीपमाळा भोरच्या पंतसचिवांच्या घराण्यातील ताईसाहेबांनी सन १८२५ मध्ये बांधल्या आहेत. मंदिराचे संपूर्ण बांधकाम दगडी आहे.[३१]

### ५.४.१४.४विश्वेशर महादेव मंदिर–

श्रीपतराव पंतप्रतिनिधीनी इ.स.१७४२ मध्ये या मंदिराचे बांधकाम केले. हे मंदिर गर्भगृह, अंतराळ व सभामंडप यात विभागले आहे. या मंदिराच्या गाभाऱ्यात शिवाची पिंड आहे. अंतराळ चार स्तंभावर उभारलेले आहे. सभा मंडपाच्या खांबाच्या वरील भागावर पुष्पवेली कोरलेल्या आहेत. खांब पायाला चौकोनी तर मध्यभागावर दंडगोलाकृती आहेत. सभामंडपातील घंटा इ.स.१७३९ मध्ये मराठयांनी वसई जिंकल्यानंतर पोर्तुगीज चर्चमधून आणलेली आहे. मंदिरासमोर नंदीमंडप असून यावर अष्टकोनीय शिखर आहे. मुख्य मंडपाच्यावर तिन्ही बाजूस मेघडंबरी उभारलेली आहे. मंदिराच्या शिखरावर देवकोष्ठे असून त्यामध्ये पौराणिक चित्रे कोरलेली आहेत.[३२]

### ५.४.१४.५ रामेश्वर मंदिर–

देगावच्या परशुराम नारायण अनगळ यानी हे मंदिर इ.स.१७०० मध्ये बांधले आहे. मंदिरासमोर नंदी असून त्याच्या पायाजवळ एक लिंग आहे. या लिंगावरील फणाधारी नागाची पूजा करणाऱ्या दोन स्त्रिया शेजारी उभ्या आहेत. या मंदिराच्या प्रांगणात दोन दीपमाळा आहेत. मंदिराच्या उजव्या बाजूला दत्तात्रेय महाराजांची मूर्ती आहे. मंदिराच्या आत गाभाऱ्यामध्ये शिवपार्वतीची मूर्ती असून अन्य काळया पाषाणातील पाच मूर्ती आहे.[३३]

### ५.४.१४.६ विठोबा मंदिर–

चिंचणेर येथील जोतिपंत भागवत यांनी इ.स.१७३० मध्ये हे मंदिर बांधले आहे. मंदिराच्या सभामंडपामधून गाभाऱ्यात जाताना प्रवेशद्वारावर कमान आहे. या मंदिराच्या आत गाभाऱ्यामध्ये विठोबाची मूर्ती आहे.

### ५.४.१४.७ भैरव मंदिर–

हे मंदिर कृष्णभट टाळके यांनी इ.स.१७७० मध्ये बांधले आहे. या मंदिराच्या गाभाऱ्याच्या पुढे तीन लहान कमानी आहेत. या मंदिराच्या आत गाभाऱ्यामध्ये भैरवाची मूर्ती आहे.

### ५.४.१४.८ रामचंद्र मंदिर–

त्रिंबक विश्वनाथ पेठे यांनी इ.स.१७७२ मध्ये हे मंदिर बांधले. या मंदिराच्या गाभाऱ्यात पितळी पत्र्याच्या राम, लक्ष्मण व सीता यांच्या मूर्ती आहेत. मूर्तींच्या पाठीमागील भिंतीत कमानीवर विविध फुले व वेलींची चित्रे कोरलेली आहेत.

### ५.४.१४.९ कृष्णेश्वर महादेव मंदिर–

कृष्णा दीक्षित यांनी इ.स.१७९० मध्ये कृष्णेश्वर महादेव मंदिर बांधले आहे. राणी सगुणाबाईनी या ठिकाणी इ.स.१८६५ मध्ये एक इमारत बांधली आहे. या इमारतीच्याा मध्यभागी असलेल्या मैदानातील उंच चौथऱ्यावर या मंदिराची निर्मिती करण्यात आली आहे. या मंदिराच्या गर्भगृहात जाताना सभामंडप आहे. मंदिरात जाणाऱ्या मुख्य प्रवेशद्वारावर दोन्ही बाजूला दुमजली इमारत आहे. या मंदिराच्या आत गाभाऱ्यामध्ये शिवपिंड असून त्यामागे कोनात्मक संगमरवराची ध्यानस्थ बसलेली एक मानवी मूर्ती आहे.[३४]

### ऐतिहासिक महत्त्व

संगम माहुली येथील कृष्णा नदीच्या पात्रात व किनाऱ्यावर सातारा येथील भोसले राजघराण्यातील कर्तबगार व्यक्तींच्या समाध्या आहेत. नदीच्या पात्रात छत्रपती संभाजी महाराजांची पत्नी महाराणी येसूबाई यांची समाधी आहे. या समाधीवर छत्रपती शाहू महाराजांनी मेघडंबरी बांधली होती. या मेघडंबरीचा शोध घेण्याचा वा.सी. बेंद्रेनी प्रयत्न केला, पण त्यांना यश आले नाही.[३५] महाराणी ताराबाई १० डिसेंबर १७६१ रोजी सातारा येथे मृत्यू पावल्या. त्यांचे क्रियाकर्म छत्रपती रामराजा यांनी संगम माहुली येथे केले आहे.[३६] छत्रपती शाहू महाराजांची समाधी येथे आहे. संगम माहुली या गावात प्रवेश करतेवेळी डाव्या बाजूस छत्रपती शहाजी उर्फ आप्पासाहेब महाराजांचे स्मारक आहे. परशुराम त्रिंबक प्रतिनिधीचे वृंदावन विश्वेश्वर मंदिर व शाहू स्मारकाच्यामध्ये आहे.[३७]

८ जानेवारी १७३४ रोजी राघोबादादांचा जन्म याच गावी झाला. क्षेत्र माहुली हे रामशास्त्री प्रभुणे यांचे गाव आहे. सन १९७९ मध्ये येथे त्यांचा अर्धपुतळा उभारला आहे. सन १८१७ मध्ये दुसरा बाजीराव पेशवा पंढरपूरहून येथे आल्यावर अधिक श्रावण महिन्यात बराच काळ येथे राहिला असताना त्याची व ब्रिटिश अधिकारी सर जॉन माल्कमची येथे भेट झाली होती.[३८] नोव्हेंबर १८१८ मध्ये दुसरा बाजीराव येथे काही दिवस मुक्कामास होता. आज या

गावात एक प्रशस्त वाडा असून त्या वाडयाच्या पहिल्या मजल्यावरील दिवाणखान्यात मराठा शैलीतील भित्तिचित्रे काढलेली आहेत.[३९]

### ५.४.१५ धावडशीचे ब्रह्मेंद्रस्वामीचे मंदिर

सातारा शहराच्या वायव्येस ९ कि.मी. अंतरावर धावडशी हे गाव आहे. हे गाव ब्रम्हेंद्रस्वामींना सन १७२८ मध्ये छत्रपती शाहूकडून इनाम मिळाले होते. ब्रम्हेंद्रस्वामी छत्रपती शाहू महाराजांचे राजगुरू व पेशव्यांचे गुरू होते. स्वामी मुळचे जालना जिल्हयातील दुधड गावचे होते. वेदशास्त्राचे अध्ययन संपल्यानंतर ते भ्रमण करीत कोकणातील परशुराम क्षेत्री आले. तेथे त्यांनी आश्रम स्थापन केला. इ.स.१७२६ नंतर सिद्दीसात (जंजिऱ्याच्या सिद्दीचा नातेवाईक व अंजनवेलचा किल्लेदार) याचा व ब्रहमेंद्रस्वामींचा हत्तीवरुन तंटा सुरु झाला. त्यामुळे ब्रहमेंद्रस्वामींना कोकण सोडून साताऱ्याजवळ धावडशी येथे येऊन रहावे लागले व सन १७२८ मध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या आग्रहावरून ते धावडशीला येऊन कायम स्थायिक झाले. ब्रम्हेंद्रस्वामीनी खूप सामाजिक, राजकीय व धार्मिक कार्य केले. त्यांच्या समाधीवर छ.शाहू महाराजांनी ब्रम्हेंद्र स्वामीचे उर्फ भार्गवराम मंदिर आहे.

सन १७४५ मध्ये ब्रम्हेंद्रस्वामी निवर्तल्यानंतर छत्रपती शाहू महाराजांनी धावडशीस त्यांच्या समाधीवर ब्रम्हेंद्रस्वामी उर्फ भार्गवरामाचे मंदिर बांधले. या मंदिरास तीन प्रशस्त गाभारे आहेत व पुढे सभामंडप आहे. मुख्य गाभाऱ्यात भार्गवरामाची काळया पाषाणाची रेखीव मूर्ती आहे. तिच्या दोन्ही बाजूस काळ व काम या परशुरामाच्या दोन भावाच्या छोटया मूर्ती आहेत. या मूर्ती पितळेच्या असून त्या ९१ से.मी. ते १.७ मी. उंचीच्या आहेत. समाधीचा गाभारा प्रशस्त असून त्याच्या प्रवेशद्वारावर उत्तम शिल्पाकृती आहेत. मंदिराच्या महाद्वाराच्या शिरोभागी मराठी शिलालेख आहे.[४०]

हा शिलालेख सन १७४५ मध्ये कोरलेला आहे. तो पुढीलप्रमाणे

श्री.भार्गवराम

श्री.भार्गवाचा अवतार साचा । ब्रह्मेद्रस्वामी बहुता दिसांचा ।।

अवतार त्याचा समाप्त झाला । संवत्सरा जाणही क्रोधनाला ।। १।।

श्रावण शुक्ल नवमी भृगुवार होता । अरूणोदंई प्राण प्रयाण होता ।।

कृष्णातिरी मुख्य समाधिस्थानी । वैकुंठवास मुनिला बहु लोक मानी ।। २ ।।

प्रारंभ कामासि तेयेचि काली । वर्षे समाप्ती सहिशास्त्र झाली ।

शाहू नृपालभजतो निजपूर्ण भावे । सर्वत्र लोक भजती बहूपण भावे ।। ३।।

तयाचा जगन्नाथ भक्त प्रशील । समाधिस्थळ बांधिले हे सुनील ।

महाबुद्धीने योजिला जो सुशिल्पी । तया शंकरे बांधिले आत्मकल्पी ।। ४।।

शके १६७२ प्रमोदनाम संवत्सरे

या शिलालेखावरून ब्रम्हेंद्रस्वामींचे चरित्र थोडक्यात देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

मुख्य गाभाऱ्यात मध्यभागी मोठी रंगशिला आहे. तिसरा भागात प्रशस्त व दगडी फरशीचा आहे. त्यात उजव्या बाजूला अष्टभूजा देवीची मूर्ती असून सर्व बाजूंनी दशावतार कोरलेले आहेत. तर शिखराव ठिकठिकाणी नक्षीकाम कोरलेले आहे. शिखराच्या पुढील भागात चौकोनी मनोरे आहेत. मंदिरापुढील सभामंडपात सुमारे १०० वर्षापुर्वी मुळ बांधकामावर कलाकुसरीचे लाकडी स्तंभ व तुळया जोडण्यात आल्या आहेत. मंडपाच्या चोहोबाजूनी दगडी भुयार असून त्यात शिवलिंग व नंदी आहे. जलकुंडातून पडणाऱ्या पाण्याने शिवलिंगास स्नान घडते. येथे श्रावण शुद्ध प्रतिपदा ते नवमीपर्यत स्वामींच्या पुण्यतिथीचा उत्सव असतो. तसेच अक्षय तृतियेस परशुराम जयंती उत्सव तीन दिवस असतो.[४१]

ब्रह्मेंद्रस्वामी एक थोर आध्यात्मिक व्यक्ती मानले जात. छत्रपती शाहू, पेशवे, सरखेल आंग्रे व इतर सरदार त्यांचा खुप आदर करत. धावडशी हे गाव ब्रम्हेंद्रस्वामींना सन १७२८ मध्ये छत्रपती शाहूकडून इनाम मिळाले होते. इ.स.१७२६ नंतर सिद्दीसातचा व ब्रहमेंद्रस्वामींचा हत्तीवरुन तंटा सुरु झाला. त्यामुळे ब्रहमेंद्रस्वामींना कोकण सोडून साताऱ्याजवळ धावडशी येथे येऊन रहावे लागले व सन १७२८ मध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या आग्रहावरून ते धावडशीला येऊन कायम स्थायिक झाले.

सावनूरच्या नवाबाने सिद्दी याकुबखानचा अंजनवेल व गोवळकोटचा सुभेदार सिद्दीसात यास भेट दिलेला हत्ती मराठयांच्या चौक्यातून अंजनवेलपर्यंत सुरक्षित आणण्याची जबाबदारी ब्रम्हेंद्रस्वामी यांच्यावर सोपविली. आंग्र्यांच्या चौकीदारांनी जयगडवरुन मदत मागवून हत्ती जप्त केला. हा हत्ती जयगडला पाठवून दिला. स्वामीनी जयगडच्या हवालदाराला निरोप व कान्होजींना पत्र पाठविले. कान्होजीने पत्र पाठवून हत्ती परत देण्याची आज्ञा केली. कान्होजीने जयगडावरील आपल्या अधिकाऱ्याना आदेश देऊन हत्ती सोडून दिले. तोपर्यत सिद्दीसातने

आपले सैन्यानिशी आंग्र्यांच्या सैन्यावर हल्ला केला. परंतु त्यात सिद्दीसतचा पराभव झाला. त्यावेळी त्याने परशुराम मंदिराची नासधूस केली. तेथील ब्राम्हणांना पळवून लावले. शेवटी त्याच्या छळास कंटाळून ब्रम्हेद्र स्वामी यांनीही धावडशी येथे येण्याचा निर्णय घेतला. अशाप्रकारे सिद्दीसातच्या छळास कंटाळून ब्रम्हेंद्रस्वामी धावडशी येथे आले होते.

**५.४.१६ मशीद–**

सातारा शहरात इस्लाम धर्मिय लोक राहत असल्याने प्रार्थना करण्यासाठी त्यांनी मशिदी बांधलेल्या आहेत. त्या मशिदी पुढीलप्रमाणे–

**५.४.१६.१ शनिवार मशीद–**

अरबी अवलिया शेर अलीमौद्दिन यांनी १५० वर्षापूर्वी ही मशीद बांधली आहे. या मशिदीची देखरेख सातारा शहरातील मुस्लिम बागवान समाजाकडे आहे.

**५.४.१६.२ शाही मशीद–**

छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी कलावंतीण अमिना हिच्या सुचनेनुसार १८२१ मध्ये दुर्गा पेठेत ही मशीद बांधली. या मशिदीच्या बांधकामासाठी एक लाख रूपये खर्च आला होता.[४२]

**५.४.१६.३ खड्डा मशीद–**

ही मशीद ज्या ठिकाणी बांधली आहे. त्याठिकाणी खड्डा होता म्हणून त्या मशीदीस खड्डा मशीद असे म्हणतात. ही मशीद साताऱ्याच्या न्यायालयातील एका दादामिया नावाच्या बेलिफाने गुरूवार पेठेत ही मशीद सन १८८५ मध्ये बांधली.

**५.४.१६.४ खतिबा मशीद–**

औरंगजेबची मुलगी झेबुन्निसा हिने छत्रपती शाहूचा चांगला सांभाळ केला होता. तिने छत्रपती शाहूचे धर्मातंर होऊ दिले नाही. म्हणून छत्रपती शाहूने तिच्या स्मरणार्थ मोहरमध्ये डोला सुरू करून ही मशीद १७१९ मध्ये बांधली. हा डोला राजघराण्यांने अजूनही चालू ठेवला आहे. राजघराण्याचा ताबूत अजूनही अग्रभागी असतो.

**५.४.१६.५ पोवई नाका मशीद–**

दौलतखानाचा मोठा मुलगा सरदारखान याने रविवार पेठेत सन १८४५ च्या सुमारास आपल्या वडीलांचे स्मारक व मशिद बांधली. येथे त्याच्या वंशजाच्या काही कबरी आहेत.

### ५.४.१६.६ बेगम मशीद–

छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी सन १८३५ च्या सुमारास मुस्लिम बांधवासाठी बेगम मशिद बांधून दिली.

### ५.४.१६.७ हेडक्वार्टर मशीद–

छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा विश्वासू सेवक दौलतखान याने सन १८३५ ते ४० च्या सुमारास ही मशीद बांधली. या मशिदीच्या आवारात दौलतखानाच्या वंशजांच्या काही कबरी आहेत.

याशिवाय सातारा शहरात सदर बाजार मशीद, गुरूवार परज खाटिक मशीद, मंगळवार खाटिक मशीद या मशीदी आहेत. या मशीदींचा उपयोग मुस्लिम बांधवांना नमाज पढण्यासाठी होतो. मुस्लिम लोक सण व उत्सवाच्यावेळी या मशिदीत एकत्र जमत असतात.[४३]

### ५.४.१७ ख्रिस्ती धर्माचे चर्च

सातारा शहरात ख्रिस्ती धर्माचे कॅथालिक चर्च अवर लेडी ऑफ हेल्थ चर्च सन १८९९ मध्ये रेव्हरंड ए.एस. लोबो यांनी बांधले आहे. मेरी, जोसेफ यांचे संगमरवरी पुतळे आहेत. त्यांचे मध्यभागी क्रॉंस व येशु ख्रिस्ताचा पुतळा आहे. तसेच लेडी ऑफ हेल्थ हिचा पुतळा आहे. येशु ख्रिस्ताचे जीवनावरील वेगवेगळे प्रसंग चित्रीत केलेल्या फोटो फ्रेमस लावलेल्या आहेत. दर रविवारी येथे प्रार्थना होते. श्री.स्मिथ यांनी अमेरिकन मराठी मिशनऱ्याच्या साहयाने हे चर्च बांधले.

रेव्हरंड नारायण वामन टिळक व सौ.लक्ष्मीबाई नारायण टिळक दांपत्याने अमेरिकन मराठी मिशन तर्फे ख्रिस्ती समाजाची भरपूर सेवा केली. त्यांचे वास्तव्य काही वर्षे सातारला होते. त्यांच्या सेवाकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी समाजाने या चर्चचे नामकरण टिळक मेमोरियल चर्च असे केले. या ठिकाणी मराठी भाषेत उपासना चालते.

साताऱचे पूर्वीचे कलेक्टर सिरील जॉर्ज डॉडगसन यांचे स्मरणार्थ त्यांच्या येथील व परदेशीय मित्रांनी सन १९०१ मध्ये हे चर्च बांधले. इंग्लडमधील चर्च ॲगसीकन मिशनच्या रिवाजाप्रमाणे इथे इंग्रजी भाषेतून उपासना चालते. श्री. विल्यम बुथ यांनी स्थापना केलेल्या सॅलव्हेदान आर्मीचे चर्च सध्याच्या पोलीस परेड ग्राऊंडचे समोर आहे.[४४]

## ५.५ सातारा शहरातील ऐतिहासिक स्थळे

सातारा शहरात प्राचिन ऐतिहासिक स्थळे नसली तरी सातारचा किल्ला मात्र अस्तित्त्वात होता. सातारा शहरातील ऐतिहासिक स्थळे ही विशेषत: मराठ्यांच्या काळात मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली आहेत. कारण मराठ्यांचे छत्रपती राजाराम महाराज यांनी सातारा येथे राजधानी बनवली. त्यानंतर महाराणी ताराबाई व छत्रपती शाहू महाराज यांच्या काळात सातारा शहरात ऐतिहासिक स्थळांची निर्मिती मोठ्या प्रमाणावर झाली. ब्रिटिश काळात सातारा शहरास महत्त्वाचे स्थान होते. सातारा येथे चारभिंती, अदालतवाडा, जुना राजवाडा, नवा राजवाडा, रंगमहाल, जुने जलमंदिर, नवे जलमंदिर व फाशीचा वड व अंजिक्यतारा किल्ला इ. चा ऐतिहासिक स्थळे आहेत.

### ५.५.१ चारभिंती–

चारभिंती हे ठिकाण अजिंक्यतारा किल्ल्याच्या पायथ्यास पूर्वेकडील बाजूस आहे. प्रारंभी या टेकडीचा वापर टेहळणीसाठी केला जात असे. छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी या टेकडीवर चारभिंतीचे ठिकाण बांधले आहे. भिंतीचा वापर राजघराण्यातील स्त्रिया दसऱ्याची मिरवणूक पाहण्यासाठी करीत असत.[४५] इ.स.१८५७ च्या उठावात ब्रिटिशांनी तोफाच्या साहाय्याने चारभिंती या इमारतीचे छप्पर उडविले होते. त्यामुळे त्याठिकाणी फक्त चारभिंतीचे अवशेष उरले आहेत. इ.स.१८५७ च्या उठावाच्या शताब्दिनिमित्त सन १९५७ मध्ये या ठिकाणी स्मारक स्तंभ उभारण्यात आला आहे. या स्मारकाच्या मधोमध चौकोनी स्तंभ असून त्याच्या दक्षिणेकडील बाजूवर झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचा अर्धपुतळा बसविलेला असून त्याखाली त्यांचे चरित्र लिहीलेले आहे. [४६] भिंतीच्या उत्तरेकडील बाजूवर प्रतापसिंह महाराजांचे वकील रंगो बापूजी गुप्ते यांचा अर्धपुतळा असून त्याखाली त्यांच्या कामगिरीचे वर्णन केले आहे.[४७]

स्मारकस्तंभाच्या पश्चिम बाजूवर सन १८५७ च्या उठावातील हिंदुस्थानचा नकाशा व भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील ठळक घटना दिल्या आहेत. [४८] सन १८५७ च्या लढयात सातारा परिसरात ज्यांनी मोठे योगदान दिले होते. त्यांची कोरीव चित्रे असणारा स्मृतीस्तंभ उभारण्यात आलेला होता.[४९]

### ५.५.२ अदालतवाडा–

छत्रपती शाहू महाराजांनी सन १७२० मध्ये अजिक्यतारा किल्ल्याच्या उत्तरेकडील पायथ्यास अदालतवाडा बांधलेला आहे. हा वाडा उंच जोत्यावर असून त्याचे प्रवेशद्वार साधे आहे. या वाड्यातील न्यायासन आजच्या व्यासपीठासारखे आहे. या वाड्याच्या भोवताली मोठया आयताकृती पायऱ्या आहेत. ही इमारत दगडी असून तिची लांबी ६७.५ मी.लांब व ४८ मी. रूंद आहे. इ.स.१८७६ पर्यत या वाडयाचा उपयोग दिवाणी न्यायालय म्हणून करण्यात येत असे. छत्रपती शाहू महाराजांनी सर्व जनतेला न्याय देता यावा या हेतूने न्यायालयासारखा दिसणारा हा वाडा बांधलेला दिसून येतो. छत्रपती शाहू महाराज, पंतप्रधान पेशवे व मुख्य न्यायाधीश नियमितपणे रयतेची गाऱ्हाणी ऐकून घेण्यासाठी या वाडयात बसत असत. खटल्याची पूर्ण चौकशी करून निकाल देत असत. पेशव्यांनी या वाड्याचा उपयोग स्वत:च्या खाजगी वापरासाठी केला होता. आज या वाडयात राजकुळातील वंशज राहत आहेत.[५०]

### ५.५.३ जुना राजवाडा–

छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी हा राजवाडा इ.स.१८२४ मध्ये बांधला. या वाडयाचा दरवाजा फार मोठा आहे. या वाडयाच्या पहिल्या मजल्यावर सभागृहात भित्तिचित्रे काढलेली आहेत. या भित्तिचित्रात फुले, वेली व फुलदाण्या काढलेल्या आहेत. या वाड्यातील भिंतीच्या वरील बाजूस पिसारा फुलविलेली मोरांची जोडी काढलेली आहे.[५१]

### ५.५.४ नवा राजवाडा–

आप्पासाहेब महाराजांनी इ.स.१८४४ मध्ये हा राजवाडा बांधला. हा राजवाडा अजूनही चांगल्या स्थितीत आहे. नवीन राजवाडयाच्या दरबारात सभागृहात भित्तिचित्रे आहेत. यामध्ये पुराणातील कथा, रामायण व महाभारत या महाकाव्यातील कथा यांचा समावेश आहे. हे सभागृह अकरा खणी असून त्यामध्ये कोरीव काम केलेले लाकडाचे स्तंभ आहेत. छत्रपती आप्पासाहेब महाराजांनी हे सभागृह रंगमहालापेक्षा सुंदर करण्याचे ठरविले होते. या वाडयाच्या पुढे लहान मंडप असून त्याची रूंदी १२.५ मीटर, लांबी २५ मीटर व उंची ७.५ मीटर आहे. वाडयात दोन्ही बाजूस दोन कारंजे तयार करण्यात आले होते. सभागृहाच्या दक्षिणेकडील भिंतीत खिडक्या व प्रवेशद्वार बांधून भित्तिचित्रावर प्रकाशाची योजना केली आहे.[५२]

या राजवाडयातील भित्तिचित्रे ही वाई व मेणवलीच्या भित्तिचित्रासारखी दिसत असली किंवा येथील रंगही वाई मेणवलीतील भित्तिचित्रांच्या रंगाप्रमाणे वापरलेले आहेत. तरीही ती वेगळ्या शैलीची आहेत. या भित्तिचित्रामधील मांडणी, सामग्री व रेखाटन पूर्ण मराठा शैलीची आहेत.[५३]

### ५.५.५ रंगमहाल–

रंगमहाल ही वास्तू अदालतवाडयाच्या पूर्वेस सुमारे २०० मी. अंतरावर आहे. छत्रपती शाहू महाराजांनी ही रंगमहाल वास्तू १७३४ मध्ये बांधली. ही इमारत ३० मी. लांब व १५ मी. रूंदीची असून नवीन इमारत जोडून बांधली आहे. ही इमारत तीन मजली होती. छत्रपती शाहू महाराजांच्या राण्यांचा राणीवसा येथे होता म्हणून या इमारतीस रंगमहाल असे नाव देण्यात आले आहे. छत्रपती शाहू महाराजांचे या वाडयातच निधन झाले. इमारतीसमोर सेनापतीचा वाडा होता. रंगमहालाच्या उत्तरेस दोन शाखा असलेली आयताकृती इमारत आहे. त्यातील एका इमारतीचा वापर राजांचे हत्ती बांधण्यासाठी केला जात असे. सन १८५७ च्या उठावात शिर्क्यावर आरोप ठेवून ती इमारत सरकारजमा करण्यात आली. सन १८७४ मध्ये या रंगमहालास आग लागली. त्यामध्ये ही वास्तू भस्मसात झाली होती. ती नंतर दुरूस्त करण्यात आली. सध्या या इमारतीचा अर्धा भाग कूपर कारखान्याच्या ताब्यात आहे. इमारतीसमोर सेनापतीचा वाडा होता. रंगमहालाच्या उत्तरेस दोन शाखा असलेली आयताकृती इमारत आहे. त्यातील एका इमारतीचा वापर राजांचे हत्ती बांधण्यासाठी केला जात असे. याच्या उत्तरेस मामलेदार कचेरी होती. तिचा पूर्वेचा भाग शिर्के यांच्या मालकीचा होता.[५४]

### ५.५.६ जुने जलमंदिर–

छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी सन १८२४–२५ मध्ये हे जलमंदिर बांधले. प्रारंभी या इमारतीला गोल बंगला म्हणत. ही इमारत एकमजली आहे. या इमारतीत एका खोलीच्या छतात व भिंतीत आरसे बसविले आहेत. तसेच इमारतीच्या सभोवती अनेक कारंजे बसविले आहेत. या इमारतीजवळ एक बगीचा असून त्याच्याजवळ तलाव आहे.[५५]

### ५.५.७ नवे जलमंदिर

छत्रपती आप्पासाहेब महाराजांनी इ.स.१८४५ मध्ये नवे जलमंदिर बांधले. या नवीन जलमंदिरात एक खोली आहे. या खोलीच्या चारही बाजूस आरसे बसविले असल्याने त्याला

आरसे महाल असेही म्हणतात. जलमंदिराच्या पाठीमागील बाजूस बदामाच्या आकाराची एक विहीर आहे. या विहिरीत गणपतीची मूर्ती आहे. उत्तरेच्या बाजूस एक मोठी विहिर आहे. तिला बाजीरावाची किंवा पेशव्यांची विहीर असे म्हणतात. या वाडयाजवळ छत्रपतीचे दैवत भवानीदेवीचे मंदिर आहे. २३ जुलै १९५२ रोजी जलमंदिरातील ४३५ भार वजनाच्या सोन्याच्या मूर्ती चोरीस गेल्या. नंतर सुमित्राराजे भोसले यांनी चांदीच्या मूर्ती करून त्यांची मंदिरात स्थापना केली.[५६]

### ५.५.८ फाशीचा वड–

सातारा शहरात शाहूपुरी रस्त्यावर स्वातंत्र्य लढयातील घटनांचा साक्षीदार म्हणून एक स्तंभ उभारला आहे. त्यास फाशीचा वड असे म्हटले जाते. सातारा शहरात शाहूपुरी रस्त्यावर स्वातंत्र्य लढयातील घटनांचा साक्षीदार म्हणून एक स्तंभ उभारला आहे. त्यास फाशीचा वड असे म्हटले जाते. ८ सप्टेबर १८५७ रोजी सातारा येथे १७ क्रांतिवीरांना ठार मारण्यात आले. या क्रांतिकारकामध्ये सातारा शहरातील गेंडा माळावर फाशी देण्यात आलेले श्री. नारायण(नाना) बापू पावसकर(सोनार),केशव नीलकंठ चित्रे, शिवराम मोरेश्वर (बहुश्रुत) कुलकर्णी, विठ्ठल कोंडी (तात्या) वाकणीस, सीताराम रंगो गुप्ते या दोघांचा समावेश होता व तोफेच्या तोंडी दिलले क्रांतिकारक मुनाजी उर्फ बापू(नारायण) बाबर उर्द भांदिर्गे, सखाराम बळवंत शेट्ये(चव्हाण), बाब्या नाथ्या गायकवाड, गणेश सखाराम कारखानीस व नाना उमाजी रामोशी(मुडके) यांचा समावेश होता. इंग्रज अधिकाऱ्यांनी समोरासमोर गोळया घालून ठार केलेले क्रांतिकारक म्हणजे रामजी बापूजी उर्फ रामसिंग चव्हाण, बाब्या हणंगू शिरतोडे, नाम्या नाईक चव्हाण, शिवाजी सोमाजी पाटोळे पर्वती विठोबा सांळुखे व पाटलू येसू घाडगे या दोघांचा समावेश होता. या लोकांना फाशी दिलेला जुना वड कोसळल्यानंतर तेथे नवीन वड लावण्यात आला. तसेच तेथे एक स्तंभ उभारण्यात आला आहे.[५७]

### ५.५.९ अंजिक्यतारा–

मराठयांच्या इतिहासात अजिंक्यतारा किल्ला हा सातारचा किल्ला म्हणून प्रसिद्ध होता. हा किल्ला सातारा शहरास लागूनच आहे. या किल्ल्याचे जुने नाव सप्तर्षी हे होते.[५८] हा किल्ला शिलाहार वंशीय राज दुसरा भोज याने बांधला असल्याची माहिती मिळते. राजा भोज याचे कोल्हापूर व पन्हाळा येथे राज्य होते. त्याने सातारा परिसरात जे १५ किल्ले बांधले होते. या

१५ किल्ल्यात सातारच्या किल्ल्याचा उल्लेख सापडतो.[५९] या किल्ल्यावरूनच या किल्ल्याखालील असणाऱ्या वस्तीस सातारा हे नाव मिळाले आहे. या किल्ल्यास मंगळाई, सप्तर्षी व सतारे ही नावे प्राचीन काळातील आहेत. तर उकाबैन हे नाव बहामनी काळ व आदिलशाही राज्यातील आहे. अहमदनगरच्या निजामशहाची मुलगी व विजापूरचा अली आदिलशहा याची पत्नी चांदबिबी होती. तिचा वजीर किशवरखान याने इ.स.१५८२ मध्ये सातारच्या किल्ल्यावर चांदबिबीस कैदेत ठेवले होते. त्यावेळी सातारच्या किल्ल्यास इसमतारा हे नाव मिळाले. औरंगजेब बादशहाने इ .स. १७०० मध्ये हा किल्ला जिंकून घेतला. हा किल्ला औरंगजेब बादशहाचा मुलगा आझमशहा याने जिंकला असल्याने आझमशहाच्या नावावरून या किल्ल्याचे नाव आझमतारा असे ठेवले होते.[६०]

**किल्ल्याचे वर्णन**

अजिंक्यतारा किल्ल्याची समुद्रसपाटीपासूनची उंची १०६७ मी. आहे. अजिंक्यतारा किल्ल्याच्या तटबंदीत पश्चिमेकडे बाजूस महादरवाजा आहे. हा लाकडी दरवाजा असून चौकट मजबूत आहे. या दगडी चौकटीवर वाली आणि सुग्रीव यांची कथा कोरलेली आहे. या दरवाजाच्या पुढे आतमध्ये दुसरा दरवाजा आहे. त्यापुढे उजव्या बाजूस हनुमानाचे मंदिर आहे. पुढे गडावरील पठार आहे. गडावर सभोवती १० फूट रूंदीची भक्कम तटबंदी आहे. सातारा किल्ल्यावर दूधबावी, सागरी सुलतान पीर, मंगळाई, शिवसागर, सप्तऋषी, कोटी व भवानी नावाची सात तळी आहेत. त्यांचाही साताऱ्याच्या उत्पत्तीविषयी संबंध आहे.[६१]

या किल्ल्यावर तीन तलाव, विहीर आणि पडक्या इमारती आहेत. त्यामध्ये महाराणी ताराबाईचा वाडा पडलेल्या स्थितीत आहे. या वाडयाजवळ पाण्याचे रांजण आहेत. वाडयाच्या उत्तरेस महादेवाचे, ईशान्येस मंगळाईचे मंदिर चांगल्या अवस्थेत आहे. गडाच्या दक्षिणेस कडेलोटाची जागा, बुरूज व बुलंद दरवाजा आहे. पश्चिमेस विहीर व बांधीव तळी आहेत.[६२]

**ऐतिहासिक महत्त्व**

पन्हाळयाचा राजा दुसरा भोज याने हा किल्ला बांधला आहे. इ.स.११७८ ते ११९३ या काळात या किल्ल्यावर भोज राजाची सत्ता होती. त्याच्याकडून हा किल्ला देवगिरीच्या सिंघणदेव यादव राजाने जिंकला. त्यानंतर बहामनी सत्ताधीश मुहम्मदशाह याने इ.स.१३५८ मध्ये जिंकला. ते या दरम्यान जिंकला. पुढे १५७० मध्ये विजापूरच्या आदिलशहाने जिंकला. इ.स.१५७९ मध्ये

विजापूरच्या अली आदिलशहाची पत्नी चांदबिबी हिला वजीर किशवरखानाने आरोप ठेवून तिला सातारा किल्ल्यावर कैद करून ठेवले.[६३] परंतु त्याचवर्षी किश्वरखानाचा पाडाव झाल्याने चांदबिबीची सुटका झाली. सन १५९२ मध्ये विजापूरचा वकील दिलावरखान यास सातारा किल्ल्यावर बंदी म्हणून पाठविण्यात आले होते. काही दिवसानंतर तो येथे मरण पावला.[६४]

छत्रपती शिवाजी महाराजांनी २७ जुलै १६७३ रोजी विजापूरच्या आदिलशहाच्या ताब्यातून हा किल्ला जिंकून घेतला.[६५] शिवाजी महाराज आजारी पडले त्यावेळी डिसेंबर १६७५ ते जानेवारी १६७६ या दरम्यान राहण्यासाठी या किल्ल्यावर आले होते. त्यांनी आयुर्वेदीक औषधे, अनुष्ठाने व दानधर्म या किल्ल्यावरून केला होती. त्यातूनच त्यांची प्रकृतीत सुधारणा झाली होती.[६६] छत्रपती राजाराम महाराजांनी १६९८ मध्ये स्वराज्याची राजधानी विशाळगड किल्ल्यावरून राजधानी अजिंक्यतारा किल्ल्यावर आणली.[६७] औरंगजेब बादशहाने ८ डिसेंबर १६९९ ते २१ एप्रिल १७०० या काळात या किल्ल्यास वेढा दिला होता. औरंगजेब बादशहाने इ.स. १७०० मध्ये हा किल्ला जिंकून घेतला होता.[६८]

महाराणी ताराबाईच्या काळात मराठा प्रतिनिधी परशुराम त्रिबंक याने इ.स.१७०६ मध्ये हा किल्ला पुन्हा काबीज केला. ८ मे १७०७ रोजी संभाजीपुत्र शाहूची मुघलांच्या कैदेतून सुटका झाली. त्यावेळी त्याने सातारा किल्ला आपल्या ताब्यात द्यावा असे प्रतिनिधींना सांगितले. महाराणी ताराबाई प्रतिनिधीकडे किल्ला सोपवून पन्हाळयाकडे निघून गेल्या. त्यावेळी सातारा किल्ल्याचा किल्लेदार वाईचा शेखमिरा होता. तो किल्ला छत्रपती शाहू महाराजांना देण्यास तयार नव्हता म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी त्याच्या मुलास वाईहून पकडून आणून तोफेच्या तोंडी देण्याची धमकी दिली. तेव्हा शेखमिराने प्रतिनिधीस किल्ला छत्रपती शाहूचे स्वाधीन करण्याचा सल्ला दिला. प्रतिनिधीने तो सल्ला न मानल्यामुळे शेखमिराने प्रतिनिधीस पकडून कैद केले व किल्ला छत्रपती शाहू महाराजांना दिला.[६९]

छत्रपती शाहू महाराजांनी सातारा जिंकून घेऊन हे ठिकाण आपल्या स्वराज्याची राजधानी बनवले. छत्रपती शाहू महाराज यांनी १२ जानेवारी १७०८ रोजी आपला राज्याभिषेक केला. छत्रपती शाहू महाराजांनी किल्ल्याच्या पायथ्याशी शाहूनगर नावाची वस्ती वसवली. त्यातूनच सातारा शहराची निर्मिती झाली.[७०]

छत्रपती शाहू महाराजांच्या काळात २१ नोंव्हेंबर १७४६ रोजी या किल्ल्यावर श्रीपतराव प्रतिनिधींचा मृत्यू झाला. छत्रपती शाहू महाराजांचा मृत्यू १५ डिसेंबर १७४९ रोजी या किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या रंगमहालात झाला. छत्रपती रामराजा हे ४ जानेवारी १७५० रोजी सातारच्या राजे बनले. परंतु त्यांनी पेशव्यांच्या हाती कारभार दिला. ही गोष्ट महाराणी ताराबाई यांना आवडली नाही. तेव्हा महाराणी ताराबाई यांनी २४ नाव्हेंबर १७५० रोजी रामराजास अजिंक्यतारा किल्ल्यावर बोलावून कैद केले. येथे तो बारा वर्षे कैदेत होता. सातारा येथे १० डिसेंबर १७६१ रोजी महाराणी ताराबाईचे देहावसन झाले.[७१]

छत्रपती रामराजांचा मृत्यू ९ डिसेंबर १७७७ रोजी झाला. सातारच्या गादीवर त्याचा दत्तक पुत्र धाकटे शाहू यांना बसविण्यात आले. छत्रपती दुसऱ्या शाहूनंतर ४ मे १८०८ रोजी गादीवर छत्रपती प्रतापसिंह महाराज आले. गव्हर्नर एल्फिन्स्टन सातारा येथे १० फेब्रुवारी १८१८ रोजी आला असता ब्रिटिशांनी अजिंक्यतारा किल्ला हस्तगत केला. दुसऱ्या दिवशी एल्फिन्स्टनने दरबार भरवून प्रतापसिंह महाराजांच्या छत्रपती पदाचा जाहीरनामा काढून त्याच्या मदतीस ग्रॅण्ट डफची नेमणूक केली. १३ फेब्रुवारी १८१८ पासून छत्रपती प्रतापसिंह महाराज अजिंक्यतारा किल्ल्यावर राहण्यासाठी गेले. २५ सप्टेंबर १८१८ रोजी छत्रपती प्रतापसिंह महाराज व इंग्रज यांच्यात झालेल्या तहानुसार २३ लाख रूपयांचा महसूल असलेला साताऱ्याचा मुलूख प्रतापसिंह महाराजांच्याकडे ठेवून त्यास ब्रिटिशांनी कडक नियमामध्ये जखडून ठेवले. ६४ लाखाचा पेशव्यांचा मुलूख व २५ लाखांचा जहागिरदारांचा मुलूख ब्रिटिशांनी बळकावला.

पुढे छत्रपती प्रतापसिंह महाराज व ब्रिटिश यांच्यात मतभेद झाले. मुंबईचा गव्हर्नर रॉबर्ट ग्रॅण्ट याने प्रतापसिंह महाराजांच्या ब्रिटिश निष्ठेबाबत संशय व्यक्त केला. प्रतापसिंह महाराजांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला. ४ सप्टेंबर १८३९ रोजी छत्रपती प्रतापसिंह महाराजांना पदावरून दूर करून छत्रपती म्हणून आप्पासाहेब महाराजांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी इंग्रजानी आप्पासाहेब महाराजांच्याबरोबर तह करून छत्रपतीचे सर्व अधिकार काढून घेतले. तसेच १६ मे १८४९ रोजी सातारा राज्य दत्तकविधान नामंजूर करून वारसा अभावी खालसा केले. [७२]

### ५.५.१० श्री.छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय–

श्री छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय याची स्थापना १३ जानेवारी १९६६ रोजी झाली. या वस्तुसंग्रहालयाच्या इमारतीचे बांधकाम सन १९६६ पासून सुरू झाले होत. तर या वस्तूसंग्रहालयाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा.श्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाले आहे. त्यावेळी त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीमंत छत्रपती सुमित्राराजे भोसले या होत्या. संग्रहालयाच्या उभारणीमध्ये माजी संचालक मा.मो.ग.दीक्षित व माजी सहाय्यक अभिरक्षक श्री मधुकर इनामदार यांनी चांगली कामगिरी बजावली होती. संग्रहालयामध्ये असलेल्या वस्तू सातारा परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे देणगी स्वरूपात दिलेल्या आहेत. या संग्रहालयामध्ये मराठेकालीन पोषाख, वस्त्रे, अलंकार, भित्तीचित्रे, कोरीव कला, नक्षीकाम व भांडी या वस्तू पाहावयास मिळतात. या वस्तुसंग्रहालयात शस्त्र विभाग, अभिलेख विभाग, रंगचित्र विभाग व वस्त्र विभाग असे चार भाग पडतात.[७३]

श्री छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयामध्ये प्रवेश करण्यापूर्वी मुख्य दरवाजातून आत जाण्यापूर्वी प्रवेशद्वारालगतच, परिसरात सापडलेले शिल्पावशेष व शिलालेख ठेवलेले आहेत. नळदुर्ग किल्ल्यावरून आणलेल्या दोन तोफा ठेवलेल्या आहेत. या तोफावर वाघ, मासे, रानडुक्कर व सर्प इत्यादी प्राण्यांची चित्रे आहेत. याशिवाय या प्रवेशद्वाराजवळ जात्याच्या अनेक चाकापासून आगळवेगळी सजावट केलेली आहे. तेथेच शेजारी अनेक प्रकारचे वीरगळ आहेत.[७४]

#### ५.५.१०.१ शस्त्र विभाग :

या विभागातील प्रवेशद्वारावर दोन्ही बाजूस कापडावर चितारलेली जयविजय यांची चित्रे आहेत. या विभागात प्रवेशद्वाराच्या समोरच छत्रपती शिवाजी महाराजांचे तख्त(गादी) ठेवलेली आहे.[७५] या तख्तावरील विणकाम इराणी शैलीचे असून त्यावर सोने, चांदी व रेशीम यांच्या धाग्यानी विणलेले आहे. त्यावर वाघ, सिंह, मोर इत्यादी प्राण्यांची चित्रे काढलेली आहेत. या तख्ताच्या पाठीमागील बाजूस दोन मोरचेल ठेवलेले आहेत. त्याच्या मुठी चांदीच्या असून वरील भाग काचेचा व खालील भाग चांदीचा आहे. तख्ताच्या पुढील बाजूस ३ फूट उंचीच्या पितळी समई ठेवल्या आहेत. या तख्ताच्या पाठीमागील भिंतीवर लावलेले फ्रेंच कलाकाराने प्रथम शिवाजीराजांचे काढलेले तैलचित्र जे 'प्रिन्स ऑफ वेल्स' या मुंबई वस्तुसंग्रहातील प्रतिकृती श्री आठवले गुरूजी यांनी काढलेली आहे.[७६]

या संग्रहालयातील शस्त्रदालन परिपूर्ण आहे. यामध्ये मराठेकालीन शस्त्रांचे प्रदर्शन या विभागात करण्यात आलेले आहे. या शस्त्रास्त्रामध्ये भाले, ढाल, अंकुश, कट्टयारे, जांबिया, उष्टरनळा, फिलनळा, हातनळा, शिरस्त्राण, मानाची चिन्हे, वाघनखे, बिचवा, तलवार, जेडची मूठ, गुर्झ व धनुष्यबाण, परशु, सोनसळी पट्टे, तोफगोळे, फिरंगी, रणशिंग, गुप्ती, विटा, चिलखत, जिरेटोप, खंजिर, कुकरी, अडकित्ता, बंदुका, पिस्तुल व काडतुसे, संगीन व शिंगाडा इत्यादी शस्त्रास्त्रे ठेवलेली दिसून येतात.[७७]

### ५.५.१०. २ अभिलेख किंवा व्हरांडा विभाग–

श्री.छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयमधील या विभागात मराठाकालीन राजकीय, सामाजिक व धार्मिक माहिती मिळते. तेथील अभिलेख विभागाची सुरूवात मिनीचर पेन्टिंगने सुरू होते. हे पेन्टिंग मराठाकालीन जी प्राथमिक साधने आहेत. त्यांच्या आधारेच बनविली गेलेली आहेत. त्यामुळे मराठाकालीन सत्य मिहिती समजण्यास त्याचा उपयोग होतो.

या पेन्टींगमध्ये श्री.छत्रपती शिवाजी महाराजांची कुंडली, वंशावळ, शिवाजी महाराजांचा जन्ममृत्यूपर्यतचा कालखंद व शिवाजी महाराजांची राजमुद्रा इत्यादीचा समावेश होतो.[७८] ही सर्व माहिती मराठी शिलालेखातील निवडक लेखांच्या प्रतिकृती, त्यांची स्थळ, काळ व वर्णनाच्या माहितीसह प्रदर्शित केली आहे. या विभागात पुढे श्री.बजाबा नेने यांची १८ व्या शतकातील काढलेलि प्रसिद्ध स्थळांची रेखाचित्रे आहेत. त्याप्रमाणे चैत्रगौरी पडदा, शिवकालीन किल्ल्यांची छायाचित्रे, शिवाजी महाराज व संभाजी महाराजांच्या जीवनातील विविध प्रसंगांची छायाचित्रे रेखाटण्यात आलेली आहेत. याशिवाय पुंडलिकाच्या देवालयाचा देखावा, फलटण, आबासाहेब भोईटयांचे हिंगणगाव, माढयाचा किल्ला, लक्ष्मण कुंड, श्रीक्षेत्र रामेश्वर, तिरमळ नाईकाचा वाडा, कुरूंदकरांचा वाडा, मधुरा, देवराम बाबा देशमुख यांचा वाडा, जटायु तिर्थ, समुद्रतीरावर रामेश्वराच्या दक्षिणेस एक कोस, कुरूंदवाडकरांचा वाडा, कुरूंदवाडा, मातृभुतेश्वर दक्षिणेकदून त्रिचनापल्ली या चित्रात २४० ते २५० फूट उंच टेकडी दाखवली आहे. शिवणे मोगलाई शिवबाईच्या देवालयाकडून पश्चिमेकडे हे चित्र काढले आहे.

तसेच पाँडेचरीचे चित्रही रेखाटले आहे. जटायु तीर्थ, नरसोबाच्या वाडीचे चित्र व गिरीचा बालाजी इत्यादी चित्रे लावण्यात आली आहेत.[७९]

अभिलेख विभागातील दुसऱ्या बाजूला १६ ऐतिहासिक चित्रे लावलेली आहेत. त्यामध्ये पुणे येथील शनीवारवाडा, रायगड किल्ला, विजयदुर्ग, आग्राभेटीमधील औरंगजेब बादशहाच्या कैदेत असताना छत्रपती शिवाजी महाराज व युवराज संभाजीचे चित्र, आग्राभेटीच्या कैदेतून निसटल्यानंतर घोडयावर बसतानाचे छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र, छत्रपती शिवाजी महाराजांचे रायगडावरील राज्याभिषेकाचे चित्र, नावाडयाच्या वेशातील बिनदाढीची छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र, रायगड किल्ल्यावरील गंगासागर तलाव, सिंहासन, राजदरबार, खुबलढा बुरूज, हिरकणी टोक व शिवाहा महाराजांची समाधी यांचेही चित्र पाहावयास मिळते.[८०]

या सर्व चित्रावरून शिवकालीन इतिहास डोळयापुढे उभा राहतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपले स्वराज्य वाढवत असताना वरील फोटोतील वेगवेगळया प्रसंगाना सामोरे जाऊन शत्रूला दहशत बसविलेली होती. तर किल्ल्यांनी शिवाजी महाराजांचे स्वराज्य रक्षणाचे कार्य केले होते.

**५.५.१०.३ वस्त्र विभाग–**

मराठाकाळात वेशभुषा ज्या प्रकारची होती ५यातील काही वस्त्रे आपणास या विभागात आढळतात. यामध्ये स्त्रिया व पुरूष यांची जी कपडे होती ती म्हणजे स्त्रिया या प्रामुख्याने विविध रंगाचे व कमी सिवलेले कपडे वापरीत असत. स्त्रियांच्या वेशभ्अूषेत चोळी, खण, पोलका, लुगडे यांचा समावेश होतो. तर पुरूष डोक्याला बांधण्यासाठी पागोटे, फेटे, तिवरे, पगडी, टोपी, अंगात घालण्यासाठी झगा, अंगरखा, कुडते व बाराबंदी इत्यादी वापरीत. धोतराचा सर्वत्र वापत होत असे. क्वचित अंगावर घेण्यासाठी उपरणेही वापरीत. सरदार व श्रीमंत स्त्रिया पैठणी, बनारसी साडया वापरीत. इस्लामच्या आक्रमणामुळै क्षत्रियामध्ये पडदापद्धती सुरू झाली.[८१]

वस्त्र विभागात विविध प्रकारचे शेले, फेटयाचे कापड, पैठणी, जरीच्या साडया, अंगरखा, बाहू आच्छादन, जिरेटोप व पगडी, भांडी व दैनंदिन वस्तू, मनोरंजन व वाद्य साहित्य यामध्ये गंजिफा, शिक्का व मोर्तब, छत्रपती शिवाजी महाराजांच्या उजव्या हाताचा ठसा,

मराठेकालीन नाण्यामध्ये शिवकालीन दाम, होन, शिवराई होन, रूपया, मोहर, रूका टका, लारी, छत्रपती संभाजी महाराजांची नाणी, छत्रपती रामराजा महाराजांची नाणी, शाहू महाराजांचे औरंगाबाद टांकसाळीतील अप्रकाशित नाणी, पेशवेकालीन नाणी याशिवाय मराठाकालीन घोडयाची जरीची खोगीर घोडयाला चाल शिकविण्यासाठीचा खुळखुळा, लगाम व रिकीब, १७ व्या शतकातील आहेत. फिरकी, लाकडी डबा, लाकडी बाटली, बांबूची आवरण असलेली अत्तराची बाटली, काचेची अत्तराची बाटली, माकडाचे घर इत्यादी अनेक वस्तू या विभागात ठेवलेल्या आहेत.[८२]

**५.५.१०. ४ चित्र विभाग–**

चित्र विभागात छत्रपती शाहू महाराजांचे चित्र, लघुचित्र शैलीतील संगीत व कला याविषयीची चित्रे, रागशमिणीची चित्रे, भांडे घेतलेली स्त्री, राग आसावरी, राग हमीर, राग केदार इत्यादी चित्रे आहेत.

याशिवाय या विभागात प्रामुख्याने मराठेशाहीचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापासून सुमारे २०० वर्षे ज्या मराठे राज्यकर्त्यांनी मराठेशाही वाढविली, त्या ऐतिहासिक राज्यकर्त्या पुरूषांची चित्रे याठिकाणी प्रदर्शित केलेली आहेत. यामध्ये छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, पेशवे व त्यांचे सरदार माधवराव बल्लाळ, तुकोजी होळकर, मल्हारराव होळकर, पिलजीृव जाधव, महादजी शिंदे, रघुनाथराव पेशवे, पेशवा पहिला बाजीराव, सवाई माधवराव, हरिपंत फडके, महादजी शिंदे यांची चित्रे काढलेली आहेत. ही चित्रे पाहिली असता मराठाकालीन शिवकाळ व पेशवेकाळ समजण्यास मदत होते. ही चित्रे रंगीत पारदर्शक चित्रे आहेत.

गोविंद रामचंद्र माटे यांनी काढलेली रामायण व महाभारतातील पारंपरिक चित्रे आहेत. श्री. जयराम स्वामींच्या मठातील भित्तिचित्रे ही येथे ठेवण्यात आलेली आहेत. या विभागात काचचित्रे आहेत या चित्रामध्ये व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. तसेच रामायण व महाभारतातील प्रसंग रेखाटलेला आहे. यामध्ये विठ्ठल रूक्मिणी, दोनमुखी विष्णूची मूर्ती, चार मुखी विष्णूची मूर्ती, व एकमुखी विष्णूची मूर्ती, विष्णूची मूर्ती, विष्णूच्या डाव्या माम्डीवर लक्ष्मी बसलेली मूर्ती, श्रीकृष्ण गोपिका, भगवान शंकर, गणपती रिद्धीसिद्धी, शंकर पार्वती व नाद यांचे एकत्रित चित्र, विष्णू लक्ष्मीचे चित्र, श्री. विष्णू लक्ष्मी नागावर झोपलेली मूर्ती, नरसिंहने हिरण्यकश्यपाचा वध

करीत असतानाचे चित्र आणि नाकधारी गरूड इत्यादी चित्रे काढलेली आहेत.[८३]

## ५.६ सातारा शहरातील शिक्षण व्यवस्था

शिक्षण ही मानवी संकल्पना असल्यामुळे गतिमान करणे काळाची गरज आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. राष्ट्राच्या विकासासाठी व्यक्तिच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण आवश्यक आहे. शालेय शिक्षण म्हणजे शिक्षण, साक्षरता म्हणजे शिक्षण असा सर्वसाधारण समज प्रचलित असतो. परंतु शिक्षणाची व्याप्ती इतकी मर्यादित नाही. व्यक्ती जन्मापासून अनेक माध्यमातून शिक्षण घेत असतो. यामध्ये कुटुंब, समाज, निसर्ग, प्रसार माध्यमे, कीर्तने व प्रवचन इ.व्यक्तिच्या शिक्षणाची ही सहज प्रवृत्ती झाली. यातूनच ज्ञानाचा विस्तार झाला तसे हे समाजशिक्षण कमी पडू लागले. विशिष्ट उद्देश्य डोळयासमोर ठेवून व्यक्तिचे शिक्षण होणे गरजेचे झाले. त्यातूनच औपचारिक शिक्षण सुरू झाले. समूह संपर्क माध्यमातून दिले जाणाऱ्या शिक्षणाला अनौपचारिक शिक्षण म्हटले गेले. समाजाच्या विकासाबरोबर ज्ञानाचा विस्तार होत गेला. विविध कामासाठी प्रशिक्षित लोकांची गरज भासू लागली. त्यातूनच संस्थात्मक पद्धत अस्तित्त्वात आली. प्राचीन काळापासून मानवाने आपल्या प्रगतीसाठी शिक्षणाचा वापर केला आहे. मध्ययुगीन भारतातील समाजात काही विशिष्ट गटातील लोकांपुरते शिक्षण मर्यादित होते. शिक्षण ही व्यक्तिच्या वैयक्तिक जीवनाशी निगडीत असणारी बाब आहे. स्त्री शिक्षणाची कोणतीही सोय अस्तित्वात नव्हती. या काळातील शिक्षणपद्धती धार्मिक विचारसरणीवर आधारीत होती.

आधुनिक शिक्षणाच्या दृष्टीने परकीय ख्रिश्चन धर्मप्रचारकांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक साधन आहे.राष्ट्राच्या विकासासाठी व्यक्तिचा विकास व व्यक्तिच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण आवश्यक आहे. भारतात पाश्चात्य देशांनी व्यापारासाठी प्रवेश केला. त्यावेळी धर्मप्रचारार्थ मिशनऱ्यांनी शिक्षण कार्याला प्रारंभ केला.कंपनीच्या अधिकाऱ्यांनी कंपनीच्या नियंत्रणाखालील भारतीय प्रदेशात शिक्षण प्रसाराची जबाबदारी आपल्या अंगावर घेतली नाही.तरीही १७८१ मध्ये कलकत्ता येथे एक मदरसा स्थापन केला आणि १७९२ मध्ये बनारस येथे संस्कृत महाविद्यालय सुरू केले. भारतातील दिवाणी खटल्यात संस्कृत व फारसी भाषा वापरात असल्याने ती भाषा जाणणारे विद्‌वान व लिपिक तयार व्हावे हा त्यामागील उद्‌देश होता.[८४]

भारतविषयक खात्याचा प्रथम सचिव म्हणून नियुक्त झालेल्या चार्ल्स वुडने १८५४ मध्ये शिक्षणासंबंधी अहवाल भारत सरकारला पाठविला. त्यात त्याने इंग्रज नियंत्रणाखाली असलेल्या संपूर्ण भारतासाठी प्राथमिक शिक्षणापासून विद्यापीठ स्तरापर्यंतच्या शिक्षणासाठी एक स्पष्ट शैक्षणिक धोरण सूचित केले. त्यानुसार भारतात शिक्षणाचा उद्देश युरोपियन भाषांचा प्रसार हा आहे, त्यासाठी माध्यम म्हणून इंग्रजी भाषा व भारतीय भाषा राहतील. त्यासंबंधी खुलासा असा होता की, प्राथमिक शिक्षणाचे माध्यम स्थानिक भाषा असावी. माध्यमिक व हायस्कूलमध्ये स्थानिक भाषा व इंग्रजी भाषा असे माध्यम असावे आणि महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर फक्त इंग्रजी भाषा माध्यम असावे.त्याचबरोबर वुडच्या अहवालात लंडन विद्यापीठाचा आदर्श समोर ठेवून कलकत्ता, मुंबई व मद्रास येथे विद्यापीठ स्थापन करण्याची सूचना होती.[८५]

चार्ल्स वुडच्या शिफारशीनुसार १८५७ मध्ये विद्यापीठाची स्थापना होऊन माध्यमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम, कालमर्यादा व व्याप्ती ठरविण्याचा अधिकार विद्यापीठांना देण्यात आल्याने माध्यमिक शिक्षणाला दुय्यम शिक्षण म्हणून संबोधण्यात येवू लागले. वुडच्या अहवालाचा स्वीकार केल्यानंतर शिक्षण क्षेत्रात झालेल्या प्रगतीची पाहणी करून त्यात सुधारणा सुचविण्यासाठी लॉर्ड रिपन याने इ.स. १८८२ मध्ये सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षेतेखाली 'हंटर' कमिशन नेमले.या कमिशनने माध्यमिक शाळांना प्रोत्साहन अनुदान तसेच विविध अभ्यासक्रमाची सोय व्हावी अशी शिफारस केली. हंटर आयोगाचे कार्यक्षेत्र प्राथमिक व माध्यमिक शिक्षण होते.[८६]

### ५.६.१ सातारा शहरातील शिक्षणाची पार्श्वभूमी

सातारा शहराची शैक्षणिक विकासाची परंपरा फार जुनी आहे. मध्ययुगात या ठिकाणी शिक्षणाची पद्धत ही पारंपारिक पद्धतीची होती. संस्कृत पाठशाळांमध्ये संस्कृत भाषा, व्याकरण व काव्यशास्त्र हे विषय शिकवले जात असत. हे शिक्षण पंतोजीच्या हातात असे. राजघराण्यातील पुरूषांना युद्ध विषयक शिक्षणाची माहिती देत. मराठा अमंलात शिक्षणाकडे विशेष लक्ष होते असे वाटत नाही. कारण त्यावेळी शिक्षण ही सरकारची जबाबदारी नव्हती.

१८१८ मध्ये मराठी राज्याचा शेवट झाला. व इंग्रजांच्या सातारा प्रवेशाबरोबर पाश्चिमात्य शिक्षणाची पद्धत सुरू झाली. सन १८८७ मध्ये साताऱ्यात तीन इंग्रजी शाळा होत्या.

या शाळांमधून मॅट्रीकपर्यंत शिक्षण दिले जात असे. इंग्रज धोरणानुसार इंग्रज अधिकाऱ्यांना मराठी शिकता यावे व मराठयांना इंग्रजी शिकता यावे या उद्देशाने इंग्रजांनी प्रयत्न केले. ईस्ट इंडिया कंपनीने भारतात शिक्षण सर्वांसाठी खुले केले. त्यामुळे साताऱ्यातही शिक्षणाची सुरुवात झाली. छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी शिक्षणास उत्तेजन दिले.

सातारा शहरातील शिक्षण व्यवस्थेची माहिती घेत असताना यामध्ये शैक्षणिक संस्था, मराठी पाठशाळा, पूर्वप्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण, या शाळातील अभ्यासक्रम, माध्यमिक शिक्षण, उच्च शिक्षण, प्रौढ शिक्षण व ग्रंथालये इत्यादीची माहिती दिलेली आहे.

### ५.६.२ मराठी पाठशाळा

बंगालचे समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांनी केलेल्या सामाजिक कार्याची प्रेरणा सातारचे श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी घेतली. छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी बहुजन समाज व स्त्री शिक्षणाचे महत्त्व ओळखून सातारा येथे पहिली मराठी पाठशाळा 'रंगमहाल' या वाडयात सन १८२९ मध्ये काढली. या शाळेत संस्कृत, पर्शियन, मराठी, इंग्रजी, ज्योतिष व व्यायामाचे शिक्षण देण्याची सोय केली. त्यामुळे सनातनी लोकांनी त्याना विरोध करण्यास सुरूवात केली. यावर उपाय म्हणून छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी मुंबईचे डॉ. मिल्न यांच्या सहकार्याने तीन मिशनरी शिक्षक या पाठशाळेसाठी उपलब्ध करून दिले. आबा पारसनीस या ब्राह्मण शिक्षकाने ही पाठशाळा उत्तम रितीने चालविली. या शाळेत छत्रपती प्रतापसिंह महाराज यांची कन्या गोजराबाईला दाखल केले. महाराजांच्या या कार्याची प्रेरणा मुंबईचे नाना शंकरशेठ यांनी घेऊन स्वतःच्या घरात मुलींची शाळा सुरू केली.[८७]

### ५.६.३ पूर्व प्राथमिक शिक्षण

प्राथमिक शिक्षणाच्या प्रारंभापूर्वी सुमारे ३ ते ५ वयोगटात जे शिक्षण दिले जाते ते पूर्व प्राथमिक शिक्षण होय. पूर्व प्राथमिक शिक्षण हा सर्व शिक्षणाचा पाया आहे. या वयातच व्यक्तिविकासाचा पाया घातला जातो. या वयातील मुलांच्यावर जे जे संस्कार केले जातात. त्या सर्वाचा परिणाम त्याच्यापुढील आयुष्यावर होत असतो. म्हणुन या वयाला 'संस्कारक्षम वय' असे मानले जाते. सातारा शहरात पूर्व प्राथमिक शिक्षणाची सुरूवात स्वातंञ्योत्तर काळात झाली.

### ५.६.४ प्राथमिक शिक्षण

इ.स.१८२९ मध्ये छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी साताऱ्यात पहिली मराठी शाळा सुरू केली. अमेरिकन मिशनच्या श्रीमती ग्रेव्हज यांनी अमेरिकन मराठी शाळा सन १८३४ मध्ये सातारा शहरात सुरू केली. सन १८५० पासून सातारा शहरात सरकारी पातळीवर प्राथमिक शाळांची सुरूवात झाली. त्यानंतर मात्र शाळांच्या व विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होऊ लागली. ब्रिटिश काळात ईस्ट इंडिया कंपनीच्या सन १८५३ च्या चार्टर ॲक्टनुसार सन १८५५ मध्ये डायरेक्टर ऑफ इन्स्ट्रक्शन हे पद निर्माण केले व त्यामार्फत मुंबई इलाख्यासाठी शिक्षणावर देखरेख करण्यासाठी खास यंत्रणा उभारली. पहिला डायरेक्टर एर्क्सिन पेरी याने शिक्षण प्रसारासाठी लोकजागृती करून संघटना उभारली. त्यानुसार सर्व शाळांच्या कारभारावर देखरेखीसाठी प्रत्येक जिल्हयासाठी शिक्षण उपनिरीक्षकाची नेमणूक करण्यात आली. पुढे शहरातील शिक्षणाची जबाबदारी नगरपालिकावर सोपवून शैक्षणिक बाबीवर उपनिरीक्षक देखरेखीचे काम करत असे.[८८]

सन १८८५ मध्ये सातारा शहरात एक सरकारी हायस्कूल व आठ खासगी मराठी शाळा चालू होत्या. त्या शाळांची व्यवस्था ठेवण्यासाठी एक स्कूल कमिटी अस्तित्त्वात आली होती. पुढे सन १९०० पर्यत दुसरी एक शाळा नगरपालिकेने काढली. शाळा नं.३, ४ व ११ मध्ये मुलींसाठी एक जादा वर्ग सुरू केला. त्यावेळी नगरपालिकेस एकूण खर्च ७१०० रूपये आला. त्यापैकी सरकारी मदत २०२४ रूपये मिळत असे. लोकल बोर्डाकडून ७४२ रूपयेची मदत मिळत होती. तर फी १३५० रूपये जमा होत असे. बाकी रक्कम ३००० रूपये नगरपालिकेला खर्च करावी लागत होती. सातारा नगरपालिकेने केवळ मुलांची शिक्षणाची सोय केली त्याच बरोबर प्रथमपासून मुलींच्या शिक्षणाची ही सोय केली. रात्रीची शाळा काढून प्रौढ मजूर लोकांना शिक्षण देण्याचीही व्यवस्था नगरपालिकेने केली. सन १८८९–९० साली नगरपालिकेने सरकारकडून फरासखान्याची इमारत दोन हजार रूपयास शाळेसाठी विकत घेतली.[८९]

शिक्षणमहर्षि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेने रावबहादूर रामचंद्र रावजी काळे यांच्या स्मरणार्थ सन १९३६ मध्ये सातारा येथे धनिणीच्या(छत्रपती शाहू महाराजांची राणी सगुणाबाई) बागेत संस्थेची पहिली प्राथमिक शाळा सुरू केली.[९०]

### ५.६.५ मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण

सन १९१३ साली नगरपालिकेचा शिक्षण कारभार पाहण्यासाठी एक सरकारी अमंलदार एक्झिक्युटीव्ह ऑफिसर याची नेमणूक केली. सातारा नगरपालिकेने सन १९१९ पासून नवीन योजना राबविण्यास सुरूवात केली. सन १९२३ साली मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा सरकारने प्रथम केला. यापूर्वी मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण कोणत्याही शहरात सुरू झाले नव्हते परंतु सातारा शहरात ते प्रथम सुरू केले. या शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी सरकारकडून सार्वजनिक भंगीपट्टी जादा वसूल करण्याची परवानगी घेतली. १ जुलै १९२१ पासून मोफत व  सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. पहिल्या वर्षी ६ ते ११ वयाच्या शिक्षण न घेणारी २,९२३ सर्व मुले शाळेत दाखल झाली. हे एक सातारा नगरपालिकेला मिळालेले फार मोठे यश होय.

सन १९२१ मध्ये नगरपालिकेच्या एकूण नऊ शाळा होत्या. या शाळेत सर्व मुले दाखल करून त्यांना शिक्षण देणे कठीण पडू लागले. खालच्या वर्गात दुबार शिक्षण पद्धती सुरू केली. करंजे येथील शाळा नं ५ मध्ये बहुतेक शेतकरी वर्गाची मुले होती, व शाळा नं ७ मध्ये हरिजनांची मुले शिकत होती. शाळा नं ६ मध्ये उर्दू शिक्षणासाठी स्वतंत्र वर्ग काढला होता. त्यात मुलींसाठी एक स्वतंत्र वर्ग चालू केला होता.[९१]

### ५.६.६ स्कूल बोर्डाची स्थापना

सरकारने सन १९२३ मध्ये सक्तिच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास केला. या कायदयानुसार  सातारा नगरपालिकेने १ एप्रिल १९२५ रोजी स्वतंत्र स्कूल बोर्ड स्थापन केले. हे स्कूल  बोर्ड आजही चालू आहे.[९२]

सन १९४७–४८ मध्ये नगरपालिकेच्या शाळांची संख्या १६ असून विद्यार्थी संख्या ३८१० आहे. शिक्षक १२३ आहेत. खाजगी शाळा २७ असून विद्यार्थी संख्या ६०३३ आहे. त्या शाळेमध्ये ११० शिक्षक होते.[९३]

नगरपालिका प्राथमिक शाळेत इ.१ ली ते ७ वी पर्यत शिक्षण दिले जात. सन १९०३–०४ ते सन १९४७–१९४८ पर्यत नगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी संख्या यांचा तक्ता खालीलप्रमाणे दिला आहे.

| अ.क्र. | वर्ष | शाळेची संख्या | विद्यार्थी संख्या | शिक्षक संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | १९०३–०४ | १० | १००५ | ३० |
| २. | १९२५–२६ | ०९ | १९७४ | ६९ |
| ३. | १९३०–३१ | १० | २४४५ | ७० |
| ४. | १९३५–३६ | ११ | २२०२ | ८१ |
| ५. | १९४०–४१ | १६ | २५८९ | १०१ |
| ६. | १९४५–४६ | १६ | ३८१० | ११० |
| ७. | १९४७–४८ | १६ | ३८१० | ११०[९४] |

वरील तक्त्यावरून आपणास असे दिसते की, नगरपालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या प्रारंभी मोठया प्रमाणावर आहे. परंतु सन १९०३–०४ पासून ही विद्यार्थी संख्या वाढत गेलेली आहे. सन १९४५४६ व १९४६४७ मध्ये विद्यार्थी संख्या स्थिर झालेली पाहावयास मिळते. या शाळेत प्रामुख्याने कष्टकरी व मध्यमवर्ग झोपडपट्टीतील विद्यार्थी शिक्षण घेताना दिसून येतात.

**५.६.७ नगरपालिकेच्या प्राथमिक शाळा**

मराठी शाळा नं. १ या शाळेची स्थापना सन १८५३ मध्ये झाली. ही शाळा इयत्ता १ ली ते ४ थी पर्यतचे शिक्षण देत होती. या शाळेतील विद्यार्थी संख्या ३७ होती. या शाळेत २ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत.[९५] मराठी शाळा नं. ३ या शाळेची स्थापना सन १८६२ मध्ये झाली. या शाळेत इयत्ता पहिली ते सातवी पर्यतचे शिक्षण दिले जात होते. या शाळेत विद्यार्थी संख्या कमी झाल्याने तसेच शाळेची इमारत भाडयाची असल्याने शाळा सन १९९७–९८ मध्ये बंद करण्यात आली.[९६]

मराठी शाळा नं. ७ या शाळेची स्थापना सन १८५३ मध्ये झाली. ही शाळा इयत्ता १ ली ते ४ थी पर्यतचे शिक्षण देत होती. या शाळेतील विद्यार्थी संख्या ४१ होती. या शाळेत २ शिक्षक अध्यापनाचे काम करीत होते.[९७] मराठी शाळा नं. ८ या शाळेची स्थापना सन १८६४ मध्ये झाली. ही शाळा इयत्ता १ ली ते ४ थी पर्यतचे शिक्षण देत होती. या शाळेतील विद्यार्थी संख्या ३१ होती. या शाळेत २ शिक्षक अध्यापनाचे काम करीत आहेत.[९८]

उर्दू शाळा नं. १० या शाळेची स्थापना सन १९४६ मध्ये झालेली आहे. ही शाळा इयत्ता पहिली ते चौथी पर्यतचे शिक्षण देत होती. सन १९४६ मध्ये या शाळेतील एकूण विद्यार्थी संख्या २२ असून यामध्ये मुलांची संख्या २ व मुलींची संख्या १८ आहे. या शाळेत २ शिक्षक अध्यापनाचे काम करीत होते.[९९]

मराठी शाळा नं. ११ या शाळेची स्थापना ६ जून १९३७ रोजी झाली. ही शाळा इयत्ता पहिली ते सातवी पर्यतचे शिक्षण देत होती. या शाळेतील एकूण विद्यार्थी संख्या ८५ होती. या शाळेत २ शिक्षक अध्यापनाचे काम करीत होते.[१००]

उर्दू शाळा नं. १३ या शाळेची स्थापना सन १९३५ मध्ये झाली. या शाळेत इयत्ता पहिली ते चौथी पर्यतचे शिक्षण दिले जात होती. या शाळेतील विद्यार्थी संख्या ४५ होती. या शाळेत २ शिक्षक अध्यापनाचे काम करीत होते.[१०१]

मराठी शाळा नं. १४ या शाळेची स्थापना सन १९४५ मध्ये झाली. ही शाळा इयत्ता पहिली ते चौथी पर्यतचे शिक्षण देत होती. या शाळेतील विद्यार्थी संख्या ३७ होती. या शाळेत २ शिक्षक अध्यापनाचे काम करीत होते.[१०२] मराठी शाळा नं. १६ या शाळेची स्थापना सन १९३५ मध्ये झाली. ही शाळा इयत्ता पहिली ते सातवी पर्यतचे शिक्षण देत आहे. या शाळेतील विद्यार्थी संख्या ६३ होती. या शाळेत ७ शिक्षक अध्यापनाचे काम करीत होती.[१०३] मराठी शाळा नं. १७ या शाळेची स्थापना सन १८८२ मध्ये झाली. ही शाळा इयत्ता पहिली ते चौथी पर्यतचे शिक्षण देत होती. या शाळेतील विद्यार्थी संख्या ३२ होती. या शाळेत २ शिक्षक अध्यापनाचे काम करीत होते.[१०४]

मराठी शाळा नं. २० या शाळेची स्थापना सन १८८५ मध्ये झाली. ही शाळा इयत्ता पहिली ते चौथी पर्यतचे शिक्षण देत होती. या शाळेतील विद्यार्थी संख्या ३६ होती. या शाळेत २ शिक्षक अध्यापनाचे काम करीत होते.[१०५] मराठी शाळा नं. २४ या शाळेची स्थापना सन १९३१ मध्ये झाली. ही शाळा इयत्ता पहिली ते चौथी पर्यतचे शिक्षण देत होती. या शाळेतील विद्यार्थी संख्या ३७ होती. या शाळेत २ शिक्षक अध्यापनाचे काम करीत होते.[१०६]

### ५.६.८ माध्यमिक शिक्षण

सातारा शहरात सन १८५१ मध्ये प्रतापसिंह हायस्कूल सुरू झाले. तर न्यू इंग्लिश स्कूल हे हायस्कूल सन १८९९ मध्ये सुरू झाले. मुलींसाठी सन १९२२ मध्ये कन्याशाळा सुरू

झाली.[१०७] याशिवाय सातारा शहरात सन १९४० म्ध्ये रयत शिक्षण संस्थेचे महाराज सयाजीराव गायकवाड हायस्कूल सुरू झाले.[१०८]

### ५.६.८.१ न्यू इंग्लिश स्कूल सातारा

न्यू इंग्लिश स्कूल सातारा या संस्थेचा स्थापनेचा दिवस ६ डिसेंबर, १८९९ हा असला तरी त्यापूर्वीचा छोटा प्रवाह या संस्थेला येऊन मिळाला आहे. सातारा हायस्कूल ही संस्था वगळल्यास १८८७ सालापासून सातार्‍यात दोन शाळा होत्या. त्या म्हणजे श्री.नारायणराव देशपांडे यांची इंग्रजीमराठी शाळा व श्री दत्तोपंत जोशी यांची न्यू इंग्लिश स्कूल या दोन्ही शाळातून पर्यतचे दहावीपर्यतचे शिक्षण मिळत होते. पुढे प्लेगामुळे श्री दत्तोपंत जोशी यांना शाळा चालविणे अवघड वाटून आपली शाळा त्यांनी एज्युकेशन सोसायटीच्या स्वाधीन केली. ही शाळा घडविण्याचे काम सोसायटीतर्फे सीतारामपंत देवघर यांच्याकडे सोपविण्यात आले.

ही शाळा प्रथम नगरवाचनालयाच्या मागील बाजूस दिवाणांच्या पागेत भरत असे. पण ही जागा अगदीच गैरसोयीची होती. पहिल्या दिवशी शाळेत ३५ विद्यार्थ्यांनी नावे नोंदविली होती. पुढे नगरपालिकेने आपल्या ताब्यातील दवाखान्याची इमारत शाळेला भाडयाने दिली. पहिल्या वर्षातच विद्यार्थ्यांची संख्या २५० पर्यत वाढली. दवाखान्याची इमारतही गैरसोयीची वाटल्यामुळे संस्थेच्या स्वतःची इमारत असणेच योग्य आहे हे जाणून सोसायटीने त्या रोखाने पावले टाकली. रा.ब.काळे याांनी स्वतःकरिता विकत घेतलेला मुजुमदारांचा वाडा घेतलेल्या किमंतीस दिला व इमारत बांधणीसाठी ३४००० रूपये अल्प व्याजाने दिले. १९०७ साली या शाळेच्या इमारतीचा पाया खोदण्यात आला. १९०८ च्या ऑगस्टपासून शाळेने स्वतःच्या वास्तूत आपला संसार थाटला होता. प्रारंभी उत्तर बाजूचा दुमजली भाग व पूर्व बाजूकडील चार खोल्यांच्या एकमजली भाग बांधण्यात आला.[१०९]

या शाळेत प्रारंभी सात शिक्षक होते. पुढे त्यात वाढ होत गेली. प्रारंभी ३५ विद्यार्थ्यावर हे हायस्कूल चालू होते. सन १९४७ साली ती संख्या ९०० वर पोहचली होती. सातारा जिल्हयातील ही सर्वात मोठी शाळा असून तिचा लौकिकही चांगला आहे. बौद्धिक शिक्षणाबरोबरच शारीरिक शिक्षणाकडे या शाळेने कटाक्षाने लक्ष पुरविले आहे. शाळेचे भव्य सभागृह व रंगभूमी ही शाळेची आकर्षणे तर आहेतच, मात्र यांचा फायदा सातार्‍यातील नागरिक व विविध संस्था यांना सभासमेलनाच्या निमित्ताने वळोवेळी होतो. जनतेच्या या गरजा लक्षात

घेऊन  संस्थेनेही याबाबतीट उदार धोरण स्विकारलेले आहे. शाळेतील अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाला वाव देण्यासाठी शाळेने विविध मंडळे व उपक्रम चालू ठेवले आहेत. त्यतील काहींचा उल्लेख अवश्य करावयास पाहिजे. मराठी वाङ्मय मंडळ, समाजशिक्षण विभाग, विद्यार्थिप्रतिनिधीसभा, बालवीर पथक, कलापथक, हस्तलिखित साप्ताहिके व नियतकालिके, वादविवाद सभा, सहली, दृक्शिक्षण विभाग आदि विभागात विद्यअर्थी मोठया उत्साहाने भाग घेत होते. शालेय अभ्यासक्रमाबरोबरच संगीत, सुतारकाम, विणकाम, इर्दू व फारशीच्या शिक्षणाची सोय या शाळेने केली होती. मराठी, संस्कृत, हिंदी, चित्रकला या विषयांच्या बाहेरील परीक्षासाठी विद्यार्थ्यांचे वर्ग चालविले जातात. सदर परीक्षांना विद्यार्थी मोठया हौसेने व बहुसंख्यने बसत होते.

काळाबरोबर पावले टाकण्यासाठी शाळेने अद्ययावत शास्त्रीय उपकरणे विकत घेतली आहेत. सोळा मिलिमिटर प्रोजेक्टर व दूरध्वनिक्षेपक यंत्रामुळै विद्यार्थ्यांच्या ज्ञानात अशी भर टाकता आली आहे तशीच अनेक व्यक्तीची व्याख्याने, दैनमदिन वर्तमानपत्रातील निवडक वार्ताविहाार व त्वरीत प्रकटणे यांची खूप सोय झाली आहे. शाळेचे माजी विद्यार्थि मंडळ व स्नेहसंमेलने ही देखील अनुकरणीय वैसिष्टये आहेत. गरीब विद्यार्थ्यांसाठी चालविलेले विद्यार्थि भंडार, सुसज्ज व्यायामशाळा, कवायतीसाठी व खेळासाठी विस्तीर्ण क्रिडांगणे, आठवी ते अकरावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी सरकारी थंदेसिक्षण साळेच्या सहकार्याने केलेल औद्योगिक शिक्षणाची सोय, बँड व बायायतीचे दिले जाणारे शिक्षण अशी या शाळेची अनेक आकर्षणे सांगता येतील. आदर्श स्नेहसंमेलने व नाटके करून आपल्यातील भावना अधिक दृढ करून संस्थेला आर्थिक साहाय्य करण्यावरच समाधान न मानता माजी विद्यार्थि मंडळाने एक माजी विद्यार्थिगृह बांधण्याला नुकतीच सुरूवात केली आहे.[११०]

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व शारीरिक विकासाबरोबरच शिस्त व शील यांची जोपासना व वाढ करण्याच्या कामी सातान्यातील ही एक अग्रेसर व नमुनेदार संस्था आहे.

**५.६.८.२. कन्याशाळा**

इ.स.१९१६ मध्ये भारतीय महिला विद्यापीठाची स्थापना गु.आण्णासाहेब कर्वे यांनी हिंगणे येथे केली. स्त्रियांच्या शिक्षणासाठी स्वतंत्र अभ्यासक्रम आखून तो मातृभाषेतून शिकविण्याकरिता विद्यालये व महाविद्यालये स्थापन करण्याचेही प्रयत्न त्यांनी सुरू केले होते.

सातारा शहरीही त्यांनी असाच प्रयत्न केला होता. त्या त्यांच्या प्रयत्नास यशही लाभले होते. २२ ऑक्टोबर १९२२ रोजी भाऊबीजेच्या दिवशी त्यावेळच्या राष्ट्रीय शाळेतील ६ मुली व इतर ५ मुली अशा ११ मुली असताना शाळा स्थापन करण्यात आली.

ऑक्टोबर १९२३ मध्ये शाळेत ही विद्यार्थी संख्या ४६ झाली. डिसेंबर पासून ही शाळा चितळे वाडयात भरू लागली. काही शिक्षक विना वेतन व काही अल्पवेतन घेऊन काम करीत असत. फीचा दर शक्य तितका कमी ठेवण्यात आला होता. जनतेच्या मदीतवर देणग्या, वर्गण्या, भाऊबीज निधी या स्वरूपाने शाळेचा खर्च चालवावा लागत असे. शाळा सुरू होताच एक चार सभासदांचे मार्गदर्शक मंडळ नेमले होते.[१११]

कन्याशाळेला अनेक लोकांनी देणग्या देऊन व तिला योग्य मार्गदर्शन केल्यामुळे पाहिल्याच वर्षी ती चांगली चालू लागली होती. १९२७ मध्ये विद्यार्थिनीची संख्या वाढून ती ९५ झाली होती. याला कारण म्हणजे शिक्षक वर्गाचा अमूल स्वार्थत्याग व महान कष्ट हे होय. सरकारी अधिकाऱ्याकडून व ठाकरसी विद्यापीठाकडून शाळा तपासणी होत होती. व त्यांना योग्य असे मार्गदर्शन व उत्तेजम दिले जात होते.

सन १९३०१९३३ मध्ये विविध आपत्ती आल्या तरी सतत प्रयत्न करून कन्याशाळा जिवंत ठेवली आणि वाढविली परंतु खर्च पेलवत नव्हता. यामुळे खूप विचारविनिमय होऊन ही शाळा हिंगणे स्त्री शिक्षण संस्था हिच्या स्वाधीन एप्रिल १९३५ अखेर करण्यात आली.

शाळेला कै.रा.ब.काळे यांनी आपल्या पत्नीच्या श्राद्धदिनादिवशी दिलेल्या वाडयात आणण्यात आले या वाडयाचे कै.सत्यभामाबाई काळे स्त्रीशिक्षणमंदिर असे नामाभिधान झाले. कै.रा.ब.काळे यांचे ऋण संस्था कधी विसरू शकणार नाही. सन १९३५ मध्ये शाळोत एकंदर ६० ते ७० विद्यार्थिनी होत्या.

या शाळेत प्रौढ स्त्रियांना एकत्र करणे, निरनिराळे खेळ व कार्यक्रम साजरे करणे, सभा, सफरी, व्याख्यानादि कार्यक्रमाच्या सहाय्यने आत्मविकास घडवून आणणे वगैरे गोष्टीचे उपक्रम राबविले जात होते.[११२]

### ५.६.८.३.रयत शिक्षण संस्था, सातारा

रयत शिक्षण संस्थेची स्थापना कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सन १९१९ मध्ये कराड जवळील काले येथे केली आहे. या संस्थेचे रजिस्ट्रेशन सन १९३५ मध्ये झाले होते. या

शिक्षण संस्थेचे ध्येय पुढीलप्रमाणे होते. अज्ञान सागरात पिचत पडलेल्या व दारिद्रयाने गांजलेल्या बहुजन समाजामध्ये जातीभेद, पंथभेद, वर्णभेद इत्यादी भेदांना मूठमाती देऊन स्वावलंबनाच्या तत्वावर बुद्धीबरोबर घाम गाळून कमी खर्चात प्राथमिक, दुय्यम ट्रेनिंग व उच्च शिक्षणाचा प्रसार महाराष्ट्रात करणे.

## मुलांमुलीसाठी वसतिगृहे

सन १९०९ सालापासून दुधगाव काले, नेर्ले येथे शिक्षण संस्था काढून शिक्षण प्रसारास सुरूवात केली.सन १९२४ मध्ये सातारा येथे बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसाराकरिता ध्येयवादी चारित्र्यवान कार्यकर्ते निर्माण करण्यासाठी रामचंद्र घोलप नावाचा एक हरिजन विद्यार्थी घेऊन वसतिगृह सुरू केले. सन १९२७ मध्ये महात्मा गांधी यांच्या हस्ते वसतिगृहास छत्रपती शाहू बोर्डिंग असे नाव दिले आहे. आतापर्यत वसतिगृहातून ४०० मॅट्रिक व १०० पदवीधर निर्माण झाले आहेत. यापैकी २० पदवीधर संस्थेचे आजीव सेवक म्हणून काम करतात. हल्ली संस्थेमार्फत मागासलेल्या जातीकरिता सरकारमान्य ११ वसतिगृहे निरनिराळ्या ठिकाणी चालविली जात असून सातारा येथे मुलीकरिता एक वसतिगृह चालविले जाते. सर्व वसतिगृहात एकूण ६०० विद्यार्थी एकत्र राहात होते. वार्षिक खर्च रूपये १,३५,२५० आहे. यापैकी तीन वसतिगृहांना सर्टिफाईड स्कूल्स म्हणून मान्यता मिळाली आहे.[११३]

## प्राथमिक शिक्षण

रयत शिक्षण संस्थेने सन १९३५ पासून दक्षिण व उत्तर साताऱ्यात डोंगरी व मागासलेल्या भागात प्राथमिक शाळा चालविल्या आहेत. सातारा शहरात रावबहादूर रामचंद्र रावजी काळे यांच्या स्मरणार्थ सन १९३६ मध्ये सातारा येथे धनिणीच्या(छत्रपती शाहू महाराजांची राणी सगुणाबाई) बागेत संस्थेची पहिली प्राथमिक शाळा सुरू केली. मुंबई राज्यात १९३७ मध्ये काँग्रेसचे मंत्रिमंडळ सत्तेवर आल्यावर प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी ऐच्छिक प्राथमिक शाळांची योजना सुरू झाली. त्यानुसार या संस्थेने सन १९३८ पाून सन १९४९–५० पर्यत ५७८ शाळा सुरू केल्या. पुढे सन १९४७ मध्ये मुंबई शासनाने सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा मंजूर केल्यामुळे प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सर्वस्वी शासनावर पडली होती. त्यामुळै संस्थेने या सर्व शाळा हळूहळू जिल्हा सकूल बोर्डाच्या ताब्यात दिल्या होत्या. याच कायद्याने सात वर्षाचा अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला. त्यानुसार जिल्हा

सकूल बोर्ड व मान्यताप्राप्त नगरपालिकांकडे शाळा सुरू करण्यासंबंधीचे काही अधिकार देण्यात आले.[११४]

### ट्रेनिंग स्कूल

खेडयामध्ये काम करण्यास लायक शिक्षकवर्ग निर्माण करण्यासाठी सन १९३५ मध्ये संस्थेने प्राथमिक शिक्षखाम्च्या प्रशिक्षणासाठी सिल्व्हर ज्युबिली रूरल ट्रेनिंग कॉलेज सुरू केले. हे सध्याचे महात्मा फुले अध्यापक विद्यअलय होय. प्रारंभी सात विद्यार्थी प्रशिक्षण घेत होते. पुढे एक स्त्रियांच्या प्रशिक्षणाकरिता १९४२ सालापासून सातारा येथे जिजामाता अध्यापिका विद्यालय सुरू केले. सन १९५४ पर्यत संस्था, म्युनिसिपालिटी, स्कूलबोर्ड यांचे नोकरीतील २,००० शिक्षक ट्रेंड करून संस्थेने सरकारची बचत केली आहे. सातारा येथे ट्रेनिंग कॉलेजला जोडून एक प्रॅक्टिसिंग स्कूल चालविले जाते. ट्रेनिंग, कॉलेजला जोडून एक प्रॅक्टिसिंग स्कूल चालविले जाते.[११५]

### माध्यमिक शिक्षण

ग्रामीण भागातील गरजू व होतकरू व शारीरिक श्रम करून शिक्षण घेणऱ्या विद्यार्थ्यासाठी आर्थिकदृष्टया शक्य व्हावे यासाठी या संस्थेने सातारा शहरात सन १९४० मध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड मोफत हायस्कूल सुरू झाले. गरीब परंतु होतकरू व शारीरिक श्रम करून शिक्षण घेणऱ्या विद्यार्थ्यासाठी सातारा येथे एक मोफत हायस्कूल सुरू केले होते. सन १९४३ पासून निरनिराळया खेडेगावात हायस्कूल काढण्याची योजना आखून दरवर्षी नवीन शाळा काढल्या जात होत्या.[११६]

### उच्च शिक्षण

स्वातंत्र्यपूर्व काळात जिल्हयात महाविद्यालयीन शिक्षणाची सोय नसल्याने बहुतांश विद्यार्थ्याना पुणे, कोल्हापूर, मुंबई व बडोदा येथे उच्च शिक्षणासाठी जावे लागत होते. ही समस्या दूर करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा येथे सन १९४७ मध्ये सातारा येथे छत्रपती शिवाजी कॉलेज सुरू करून चार वर्षे मोफत चालविले. पुढे या कॉलेजमध्ये व्बसतिगृहात राहाणाऱ्या व शारीरिक श्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना फी मध्ये विशेष सवलती दिल्या आहेत. या कॉलेजमध्ये बी.ए.पर्यतचे वर्ग चालविले जात होते.[११७]

**इतर कार्य**

संस्थेने १९४० सालापासून सेवकांच्याकरिता व विद्यार्थ्याकरीता सहकारी पद्धतीवर एक क्रेडीट सोसायटी व धान्याचे दुकान चालविले आहे. या सोसयतीचे १५९ सभासद असून भांडवल २२,२६९ रूपये होते. संस्थेने निरनिराळया खेडयात ७० समाजवर्ग व २५ वाचनालये चालविली आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपल्या पत्नीच्या स्मरणार्थ कै.सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांनी आपल्या पत्नीच्या स्मरणार्थ कै.सौ.लक्ष्मीबाई स्मारक शिक्षण फंड उभारला आहे. या फंडास संस्थेचे माजी विद्यार्थी मासिक वर्गनी देतात. या फंडातून दरवर्षी सुमारे १०,००० रूपये स्कॉलरसिप गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी दिल्या जातात.[११८]

**५.६.८.४ . सातारा एज्युकेशन सोसायटी, सातारा**

सातारा एज्युकेशन सोसायटीची स्थापना श्री.अ.वि. फडके यांनी इ.स.१९३५ मध्ये विजयादशमीच्या मुहूर्तावर झाली. परंतु सोसायटीचे प्रत्यक्ष कार्य १० जून १९३५ पासून सुरू झाले होते. ही शाळा सुरू होण्यापूर्वी एक आवेदन नागरिकांना उद्देश्यून काढण्यात आले होते. शहरातील सुमारे ५० प्रमुख नागरिकांच्या सहया घेतल्या होत्या. यावरून वाढत्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी या प्रयत्नाला सर्वांचा पाठिंबा होता. असे दिसून येते. म्हणून प्रत्यक्ष कार्याला अगोदर सुरूवात करून सार्वजनिकरित्या सोसायटीची स्थापना करण्यात आली. प्रारंभी या स्कूलमधील विद्यार्थ्यांची संख्या सुमारे ६० असून १ ते ४ एवढेच वर्ग सुरू करण्यात आले होते.

शाळा सुरु झाल्यावर रीतसर सरकारी मान्यता येणे जरूर होते. शिक्षण खात्याकडून घातल्या गेलेल्या अटीची पुर्तता केल्यावर एप्रिल १९३७ मध्ये शाळेला सरकारी मान्यता मिळाली. व संस्थेचा प्रगतीचा मार्ग मोकळा झाला. नंतर क्रमाक्रमाने विद्यार्थी संख्या वाढत गेल्याने पुढील वर्गही सुरु करण्यात आले.[११९]

सन १९३५ ते १९४४ हा कालखंड संस्थेला फार त्रासदायक गेला होता. परंतु सातारा शहरातील नागरिकांच्या सहानुभूतीमुळै संस्था टिकली व तिचा विकास झाला. अगदी प्रारंभी अदीअडचणी, शिक्षण खात्याच्या विविध अटी यातून मार्ग मार्ग काढला. तोपर्यंत सन १९४०

संस्थेचे संस्थापक व पहिले प्रधानाध्यापक श्री.अ.वि. फडके यांचे आकस्मिक निधन झाले. त्यामुळे संस्थेवर आपत्ती कोसळली. तरीही ही शाळा पुढे टिकून राहिली होती.

या शाळेत दुय्यम शिक्षणाबरोबरच प्राथमिक शिक्षणाची सोय करण्याच्या उद्देश्याने सोसायतीने प्राथमिक शाळा सुरू करण्याचे ठरविले होते. सन १९३६ मध्ये प्रथम ४ थी चा वर्ग सुरू करण्यात आला. व सन १९३७ मध्ये १ ते ४ थी चे वर्ग सुरू करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे नागरिकांच्या मागणीवरून शनिवार पेठेत एक शाखा सुरू करण्यात आली. तेथे इ.स.१ ते ४ एवढेच वर्ग आहेत. दोन्ही भागात मिळून सन १९५४ मध्ये ६५० विद्यार्थी शिक्षण घेत होते.[१२०]

### ५.६.८.५. राष्ट्रभाषा विद्यालय सातारा

या विद्यालयाची स्थापना सन १९४४ मध्ये करण्यात आली होती. मुंबई सरकारने चालविलेल्या हिन्दी शिक्षक सनद परीक्षांचे वर्ग या विद्यालयामार्फत चालविले जातात. मुंबई राज्यात अन्यत्र क्वचितच सापडेल अशाप्रकारचा अभ्यासक्रम घेतला जातो. रा.भा. कोविद, सा.सुधाकर, सा.रत्न आदि २४ उपाधी परीक्षांचे वर्ग येथे चालतात. तसेच मराठी, कानडी, गुजराती, बंगाली, उर्दू आदि प्रादेशिक भाषांचे अध्ययन करण्याची विशेष सोय येथे केलेली आहे.[१२१]

### ५.६.८.६. सातारा आयुर्वेद प्रसारक मंडळीचे आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा

सन १९१३ मध्ये मकरसंक्रांतीच्या दिवशी सातारा येथील डॉक्टर व वैद्य मंडळीनी देशी व आंग्ल वैद्यक विषय शिकवून विद्यअर्थी तयार करण्याकरिता आर्यांग्ल वैद्यक शाळा नावाची संस्था स्थापा केली. पुढे १९१७ मध्ये आयुर्वेद व नवीन वैद्यकीय शास्त्राच्या अभ्यासाने आयुर्वेदाची सेवा करून नागरी व ग्रामीण विभागातील रूग्णास अल्प मोबदल्यात वा विनामुल्य वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्याकरीता आयुर्वेद प्रसारक मंडली या संस्थेची स्थापना होऊन या संस्थेमार्फत आर्याग्ल वैद्यक शाळेचे काम जोराने सुरू झाले.

संस्थेचा शिक्षणक्रम प्रथम ३ वर्षाचा होता व 'आयुर्वेदचिकित्सक' ही पदवी देणयत येत होती. नंतर सन १९२४ पासून पुढे संस्थेचा शिक्षणक्रम ४ वर्षाचा होऊन 'आयुर्वेद विशारद' ही पदवी देण्यात येत होती. 'आयुर्वेद चिकित्सक' व 'आयुर्वेद विशारद' या दोन्ही शिक्षणक्रमास प्रवेश लायकीची अट मॅट्रिकपर्यंत होती.

नंतर सन १९३८ पासून संस्थेच सरकारची कायमची मान्यता मिळाली. व देशी वैद्यक बोर्डाचा डी.ए.एस.एफ. हा चार वर्षाचा अभ्यासक्रम सन १९४१ पासून संस्थेत सुरू करण्यात आला. प्रवेश लायकी संस्कृत विषय घेऊन मॅट्रिक इतकी करण्यात आली. सन १९५४ पर्यत संस्थेतून ३५० ते ४०० विद्यार्थी पास होऊन प्रत्येकाने धंद्यास सुरूवात केली आहे व काही लोक लोकलबोर्ड व सरकारी दवाखान्यावर नेमले गले आहेत. हा कोर्स पास होणाऱ्या विद्यार्थ्यास सरकारी दवाखान्यात नोकरी मिळत होती.[१२२]

### ५.६.८.७. तंत्रशिक्षण

सातारा शहरात तंत्रशिक्षणाची सुरूवात सन १८५८ मध्ये झली. खाजगी संस्थेची दि स्कूल ऑफ इंडस्ट्रि नावाची औद्योगकि प्रशिक्षण शाळा स्थापन झाली होती. पुढे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सन १९४९–५० मध्ये सरकारने युद्धोत्तर पुनर्बाधणी योजनेनुसार ही शाळा ताब्यात घेऊन त्यास तांत्रिक माध्यमिक शाळा जोडली. या शाळेने सातारा येथील स्थनिक तीन माध्यमिक शाळांमधील इ.८वी ते ११ वी पर्यतचा एक एक विभाग बनवून त्यांना भूमिती आणि यंत्र आलेखन, तंत्रशास्त्र(श्रेणी१) व अभियांत्रिक मुलतत्त्वे आणि विद्युत अभियांत्रिकी ते तीन तांत्रिक वियय कोणतीही फी नघेता शिकविले जात होते.[१२३]

### ५.६.८.८. साक्षरता

ब्रिटिश राजवटीपूर्वी सातारा शहरातील शिक्षणाच्या अत्यल्प सोयीमुळे फारच थोडया व्यक्ती साक्षर होत्या. फक्त उच्च वर्गीयामध्ये साक्षरतेचा प्रसार झाला होता. ब्रिटिश राजवटीपासून शिक्षणविषयक वाटत्या सोयी, पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार, समाजसुधारकांचे प्रयत्न व नवीन शैक्षणिक कायदे यामुळे साक्षरतेच्या प्रमाणात वाढ होत गेली. सातारा शहरातील सन १९०१ पासून एकूण लोकसंख्येशी साक्षरतेची टक्केवारी पुढीलप्रमाणे

| अ.नं. | वर्ष | एकूण | पुरूष | महिला |
|---|---|---|---|---|
| १. | १९०१ | ३.९५ | ७.७५ | ०.२७ |
| २. | १९११ | ३.५० | ६.७५ | ०.३९ |
| ३. | १९२१ | ४.६१ | ८.३२ | ०.९९ |
| ४. | १९३१ | ६.५२ | ११.७९ | १.३० |
| ५. | १९४१ | १५.०१ | २५.६८ | ४.५३[१२४] |

वरील विवरणावरून हे स्पष्ट होते की, सन १९११ ची साक्षरता तपासली असता निश्चितच कमी दिसून येते. यामध्ये पुरूषापेक्षा महिलाचे साक्षरतेच प्रमाण खूपच कमी आहे. आणि सन १९४१ चे पुरुष व स्त्रिया यांचे साक्षरतेचे प्रमाण पाहिले असता असे दिसून येते की, सन १९०१ च्या तुलनेत ते कितीतरी पटीने वाढले आहे.

## ५.७ समारोप

सातारा शहर व परिसरातील धार्मिक स्थळांनी महाराष्ट्राच्या इतिहासात आपला ठसा उमटविलेला आहे. ही स्थळे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक कारणातून निर्माण झालेली आहेत. लोकांनी आपले अध्यात्म जपण्यासाठी या धार्मिक स्थळांना फार मोठया प्रमाणात महत्त्व होते हे स्पष्ट होते. पुराणातून आणि प्राचीन धर्मग्रंथातून वर्णन केलेली ही तीर्थस्थानं आजच्या काळातही आपल आध्यात्मिक महत्त्व टिकून आहेत. महाराष्ट्रामध्ये श्रद्धा आणि अध्यात्म यांना महत्त्वाचे स्थान आहे. विज्ञानामध्ये मोठया प्रमाणावर प्रगती झाली असतानादेखील नाशिक शहरातील सिंहस्थ कुंभमेळयास लाखो लोक येतात. यावरून तीर्थाचे महत्त्व आजही टिकून असल्याचे दिसते. धार्मिक स्थळामुळे जातीय ऐक्याचा पाया मजबूत करण्यास विशेष मदत होते.

सातारा शहर व परिसरातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांनी महाराष्ट्राच्या इतिहासात आपला ठसा उमटविलेला आहे. ही स्थळे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक कारणातून निर्माण झालेली आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासात या ऐतिहासिक स्थळांनी चांगली कामगिरी बजावली आहे. त्याच्या जोरावर छत्रपती शिवाजी महाराजांनी सातारा जिल्हयात स्वराज्याची स्थापना करून स्वराज्य विस्ताराचे धोरण अवलंबिले. त्यांना यश मिळवून देण्यासाठी येथील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांनी फार मोठे काम केले आहे.

छत्रपती शाहूच्या काळात सातारा ही मराठयांची राजधानी होती. पेशवे जरी पुण्यातून कारभार पाहत असले तरी ते सातारच्या छत्रपतीच्या सल्ल्याने पाहत होते. त्यांना पेशवाईची वस्त्रे ही सातारच्या छत्रपतीकडून दिली जात होती. त्यामुळे सातारा शहरातील अदालतवाडा, रंग्महाल, जुना राजवाडा, नवा राजवाडा, छत्रीचा हौद व चार भिंती या ऐतिहासिक वस्तूमुळे सातारा शहरातील इतिहास जागृत होण्यास मदत होते. या वास्तू छत्रपती प्रतापसिंह

महाराजांच्या काळापासून ते भारत स्वातंत्र्य होईपर्यत बांधल्या गेलेल्या आहेत. या वास्तूमुळे सातारा शहराचा इतिहास समजतो.

सातारा शहराने शैक्षणिक बाबतीत स्वातंत्र्यपूर्व काळातही विकास झालेला होता. सन १८२९ पासून सातारा शहरात शिक्षणास प्रारंभ झाला. विशेष म्हणजे या शिक्षणाची सुरूवात सातारचे श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी मराठी पाठशाळेच्या माध्यमातून केली असली तरी . या शाळेत संस्कृत, पर्शियन, मराठी, इंग्रजी, ज्योतिष व व्यायामाचे शिक्षण देण्याची सोय केली होती. सन १८८५ मध्ये सातारा शहरात एक सरकारी हायस्कूल व आठ खासगी मराठी शाळा चालू होत्या. पुढे सन १९०० पर्यत दुसरी  एक शाळा नगरपालिकेने काढली. सातारा नगरपालिकेने केवळ मुलांची शिक्षणाची सोय केली त्याच बरोबर प्रथमपासून मुलींच्या शिक्षणाची ही सोय केली. रात्रीची शाळा काढून प्रौढ मजूर लोकांना शिक्षण देण्याचीही व्यवस्था नगरपालिकेने केली. पुढे नगरपालिकेने सातारा शहरात एकूण १२ प्राथमिक शाळा सुरू केल्या होत्या. त्यानंतर सातारा शहरात माध्यमिक शिक्षणासाठी प्रतापसिंह हायस्कूल, न्यू इंग्लिश स्कूल, कन्याशाळा, रयत शिक्षण संस्थेची प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्च शिक्षण, ट्रनिंग स्कूल, सातारा एज्युकेशन सोसायटीची शाळा व राष्ट्रभाषा विद्यालय सातारा इत्यादी शाळा सुरू होऊन सातारा येथील शैक्षणिक विकासात भर घातली.

## संदर्भ


१) शेणोलीकर ह.श्री., व देशपांडे प्र.न., महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, मोघे प्रकाशन पुणे, १९७२, पृ.३६०

२) कित्ता, पृ.१०३

३) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, १९९९, पृ. ५९

४) नाईक जे.व्ही., न्यू इंडियन अँटिक्वेरी खंड ९, १९४७, पृ.२९६

५) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.१०३

६) कित्ता, पृ.१०३

७) उपाख्य महादेव चिंतामण, बहुलेकर बाळासाहेब, आपला सातारा, सातारा, ६ मार्च १९९४, पृ.१५५

८) काळे–पाटसकर भाग्यश्री, महाराष्ट्राची मंदिरशैली, नोव्हेंबर २००९, पृ.६९

९) देशपांडे सु.र., वाई: कला आणि संस्कृती, २०११, पृ.५५, ५६

१०) माटे गो.रा., असा घडला जिल्हा सातारा, महाराष्ट्र मित्र मुद्रणालय, सातारा, जानेवारी १९८८, पृ.५७

११) कित्ता, पृ.५७

१२) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र शासन साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९९९, पृ. ९०८

१३) कित्ता, पृ.९०७, ९०८

१४) देशपांडे महेश, साताऱ्याच्या परिसरात, लोकव्रत प्रकाशन, सातारा, ७ ऑगस्ट २०११, पृ.१३

१५) उपाख्य महादेव चिंतामण, बहुलेकर बाळासाहेब, उपरोक्त, पृ.१५५

१६) सपकाळ सुभाष, निसर्गरम्य क्षेत्र यवतेश्वर, दैनिक ऐक्य सातारा, १० ऑगस्ट १९९२, पृ.४

१७) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ.७९३

१८) कित्ता, पृ.७९३

१९) माटे गो.रा., उपरोक्त, पृ.१५५

२०) कित्ता, पृ.५९

२१) कित्ता, पृ.५९

२२) कित्ता, पृ.६०

२३) उपाख्य महादेव चिंतामण, बहुलेकर बाळासाहेब, उपरोक्त, पृ.१५५

२४) कित्ता, पृ.१५६

२५) माटे गो.रा., उपरोक्त, पृ.६१

२६) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, पृ.३१

२७) उपाख्य महादेव चिंतामण, बहुलेकर बाळासाहेब, उपरोक्त, पृ.१६३

२८) केळकर य. न., रामशास्त्री प्रभुणे, भारतीय इतिहास आणि संस्कृती, एप्रिल १९९६, पृ.९६

२९) देशपांडे महेश, उपरोक्त, पृ.१९

३०) पाठक अरूणचंद्र(संपा.),सातारा जिल्हा गॅझेटियर, १९६३, पृ.८४५

३१) कित्ता, पृ.८४४

३२) देशपांडे महेश, उपरोक्त, पृ.१८

३३) कित्ता, पृ.१९

३४) पाठक अरूणचंद्र(संपा.),सातारा जिल्हा गॅझेटियर, उपरोत, १९६३ पृ. ८४८,८४९

३५) बेंद्रे वा.सी., राणी येसूबाई साहेब, भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, जुलै १९६४, पृ.५६

३६) गर्गे स.मा., छत्रपतींची धाकटी पाती, मराठयांचा इतिहास, खंड–२, १९८५, पृ.१९०

३७) माटे गो. रा., उपरोक्त, पृ.९६

३८) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड८, मुंबई १९९२, पृ.१९२.

३९) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.८५०

४०) सासवडकर प्र.ल., श्री ब्रम्हेंद्रस्वामी धावडशीकर, १९८५, पृ.१३ व ७३

४१) कित्ता, पृ.७०

४२) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.९०८

४३) कित्ता, पृ.९०९

४४) उपाख्य महादेव चिंतामण, बहुलेकर बाळासाहेब, आपला सातारा, मावळा प्रकाशन, सातारा, ६ मार्च १९९४, पृ.१६०, १६१

४५) लांजेकर रू.ज., सातारा जिल्हयातील प्रेक्षणीय स्थळे, १९९३ पृ.१५

४६) गायकवाड, हणमाने व सरदेसाई, इतिहास लेखनशास्त्र, २०००, पृ.१३२

४७) कित्ता, पृ.१३२

४८) सचिव(संपा.), नगर विकास आघाडी, सातारा 'आपला सातारा विकास आणि संकल्प', पृ.१५

४९) लांजेकर रू. ज., उपरोक्त, पृ.१५

५०) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.८५९

५१) दै.पुढारी, सातारा आवृत्ती, ७६ वा वर्धापनदिन विशेषांक पुरवणी अंक, १३ जानेवारी २०१५, पृ.२

५२) कित्ता, पृ.९०४

५३) लांजेकर रू. ज., उपरोक्त, पृ.१०

५४) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.९०३

५५) भोसले एस.एच., सातारा जिल्हयातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा-एक चिकित्सक अभ्यास (इ. स.१६०० ते १९००), टि. म. वि. पुणे, एम. फिल. प्रबंध, ऑक्टोबर २००८, पृ.५२

५६) स्मरणिका, आमचा सातारा, सातारा शहर नगरपालिका, १९६७, पृ.२४

५७) लांजेकर रू. ज., उपरोक्त, पृ.१५

५८) पाटणे संभाजीराव, अजिंक्यताऱ्यावरून, अजिंक्य, ६६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सातारा, १९६३, पृ.५१

५९) जोशी वा.वि., सातारा शहरासंबंधी काही जुनी माहिती, भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, एप्रिल १९७३, पृ.२८

६०) कित्ता, पृ.३८

६१) सातारा शहर नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक१९५४, पृ.१

६२) देशपांडे महेश, उपरोक्त, पृ.१६

६३) Joshi P.M.,The Adilshahi and the baridi, History of medival Deccan (1295-1724), Vol.I, P.338

६४) Ibid, P.341

६५) सरदेसाई गो.स., उपरोक्त, मराठी रियासत खंड–१, मुंबई १९९२, पृ.३०४

६६) केपन डेव्हिड, मराठयांची बखर, पृ.७८

६७) Kulkarni A.R., The Maratha\s, History of medival Deccan, Vol.II, P.591

६८) सरदेसाई गो. स., उपरोक्त, मराठी रियासत खंड–२, पृ.१५९

६९) सरदेसाई गो. स., उपरोक्त, खंड ३, पृ.४९,५०

७०) कित्ता, पृ.११६

७१) सरदेसाई गो. स., उपरोक्त, खंड ५, पृ.२९८,२९९

७२) सरदेसाई गो.स., उपरोक्त, खंड ८, पृ.५६६

७३) देशपांडे सु.र., उपरोक्त, पृ.२५

७४) दै.लोकसत्ता, लोकरंग पुरवणी, १२ एप्रिल, २००९, पृ.३

७५) सरदेसाई बी.एन., इतिहासलेखन परिचय, कोल्हापूर, २००६, पृ.१६६, १६७

७६) दैनिक लोकसत्ता, १२ एप्रिल २००९, २००९, पृ.४

७७) श्री.छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, सातारा, मार्गदर्शक पुस्तिका, पृ.३

७८) श्री.छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, सातारा पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय विभाग, महाराष्ट्र शासन यांची हस्तपुस्तिका, पृ.२

७९) मार्गदर्शक पुस्तिका, उपरोक्त, पृ.३

८०) कित्ता, पृ.४

८१) कोलारकर श.गो.,मराठयांचा इतिहास, श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर, २००३, पृ.५२७

८२) ओवाळे डी.जे., श्री. छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, सातारा–एक चिकित्सक अभ्यास, एम.फिल. शोध–प्रबंध, टि.म.वि.पुणे, २०११, पृ.६३

८३) कित्ता, पृ.६४

८४) बी.एल.ग्रोवर, 'आधुनिक भारताचा इतिहास', एस.चंद आणि कंपनी लि.,नवी दिल्ली,२००३,पृ.२१२

८५) कित्ता.पृ.२१३

८६) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४,, पृ.४३

८७) कोष्टी प्रभाकर, शैक्षणिक वाटचाल, सातारा जिल्हा परिषद गौरवगाथा, रौप्य महोत्सवी विशेषांक, १९८७ पृ.४

८८) शिक्षणावर दृष्टिक्षेप, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे, १९९५–९६, पृ.२०

८९) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, पृ.३९

९०) रयत शिक्षण संस्था, वार्षिक अहवाल, सातारा, १९८२–८३, पृ.८

९१) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, पृ.११७,११८

९२) संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल, २००४–२००५, पृ.७७

९३) कित्ता.पृ.७८

९४) सातारा नगरपालिका वार्षिक अहवाल, १९०३–०४ ते २००४–०५ संबंधित वर्ष

९५) नगरपालिका मराठी शाळा नं.१ च्या रेकॉर्डवरून, पृ.७

९६) नगरपालिका मराठी शाळा नं.३ च्या रेकॉर्डवरून, पृ.२

९७) नगरपालिका मराठी शाळा नं. ७ च्या रेकॉर्डवरून, पृ.६

९८) नगरपालिका मराठी शाळा नं. ८ च्या रेकॉर्डवरून, पृ.७

९९) नगरपालिका उर्दू शाळा नं. १०, च्या रेकॉर्डवरून, पृ.१०

१००) नगरपालिका मराठी शाळा नं. ११ च्या रेकॉर्डवरून, पृ.५

१०१) नगरपालिका उर्दू शाळा नं. १२ च्या रेकॉर्डवरून, पृ.४

१०२) नगरपालिका मराठी शाळा नं. १४ च्या रेकॉर्डवरून, पृ.७

१०३) नगरपालिका मराठी शाळा नं. १६ च्या रेकॉर्डवरून, पृ.११

१०४) नगरपालिका मराठी शाळा नं. १७ च्या रेकॉर्डवरून, पृ.१५

१०५) नगरपालिका मराठी शाळा नं. २० च्या रेकॉर्डवरून, पृ.१२

१०६) नगरपालिका मराठी शाळा नं. २४ च्या रेकॉर्डवरून, पृ.५

१०७) कोष्टी प्रभाकर, शैक्षणिक वाटचाल, सातारा जिल्हा परिषद गौरवगाथा, रौप्य महोत्सवी विशेषांक, १९९५, पृ.७

१०८) रयत शिक्षण संस्था, वार्षिक अहवाल, सातारा, १९८२८३, पृ.८

१०९) सातारा शहर नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक१९५४, उपरोक्त, पृ.७४

११०) कित्ता, पृ.७५

१११) कित्ता, पृ.७५

११२) कित्ता, पृ.७६

११३) कित्ता, पृ.७६

११४) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.६५३

११५) रयत शिक्षण संस्था, वार्षिक अहवाल, सातारा, १९८२८३, पृ.८

११६) कित्ता, पृ.८

११७) कित्ता, पृ.८

११८) सातारा शहर नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक१९५४, उपरोक्त, पृ.७७

११९) कित्ता, पृ.७७

१२०) कित्ता, पृ.७८

१२१) कित्ता, पृ.७९

१२२) कित्ता, पृ.७९

१२३) Satara District Gazeetter 1963, P.727

१२४) सातारा जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ, १९८१, सातारा जिल्हा, पृ.१७

## प्रकरण सहावे

# उपसंहार

प्राचीन मध्ययुगीन आणि आधुनिक महाराष्ट्राच्या पर्यायाने देशाच्या विकासात अनेक शहराचा मोठा वाटा आहे. सातारा शहर हे त्यापैकी एक आहे. सातारा शहराला प्राचीन काळापासून ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. याची साक्ष सातारा शहर व परिसरातील अनेक ऐतिहासिक स्थळे देत आहेत. सातारा शहर हे व जिल्हयाच्या ऐतिहासिक वारसा सांगणाऱ्या खाणाखुणा आजही येथील परिसरात सुस्पष्ट आहेत. सातारा शहरास प्रागैतिहासिक काळापासून ते आधुनिक काळापर्यत राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक पार्श्वभूमी लाभली आहे. त्यामुळे सातारा शहरास महाराष्ट्राच्या इतिहासात गौरवशाली स्थान प्राप्त झाले आहे. दुर्गमता हे सातारा शहराचे भौगोलिक वैशिष्टय आहे. या वैशिष्टयामुळेच सातारा परिसरातच शिवाजीराजांच्या रूपाने स्वराज्य स्थापनेचा पहिला प्रयोग झाला. सातारा शहराला या वैभवशाली ऐतिहासिक परंपरेचा सार्थ अभिमान आहे. सातारा जिल्हयात घडलेल्या राजकीय परिवर्तनाचे दुरगामी परिणाम समाजजीवनाच्या सर्वच बाजूंवर झाले.

सातारा हे अनेक दृष्टींनी एक लक्षवेधी गाव आहे. ज्या पर्वताच्या पायथ्याशी आणि काही प्रमाणात त्या पर्वतावर ते वसले आहे. तो सहयाद्री हा पृथ्वीच्या पाठीवरील सर्वात जुना पर्वत आहे. अडीच हजार वर्षापासून सातारा भागात लोकवस्ती आहे. इसवी सनापूर्वी दोनशे वर्षे सातारा येथे बौद्ध लोकांचा अमंल होता. त्यापूर्वी आंध्रभृत्याचे राज्य येथे होते. साताऱ्याचा इतिहास म्हणजे एकापरीने अंजिक्यतारा किल्ल्याचाच इतिहास असे म्हटले पाहिजे. कारण या किल्ल्यावर बहुतेक सर्व महत्त्वाच्या घटना घडल्या आहेत. सुमारे ८०० वर्षापूर्वी सातारा हे ठिकाण अगर या नावाचे अस्तित्त्वात नव्हते.

इ.स.पू.पहिले शतक ते इ.स.चौथे शतक या काळात येथे सातवाहन राजांचा अंमल होता. इ.स.च्या १३ व्या शतकामध्ये साताऱ्यावर चालुक्य व राष्ट्रकुट राजांचा अंमल होता. शिलाहार घराण्यातील राजा दुसरा भोज याने १५ किल्ले बांधले होते. त्यामध्ये सातारा किल्ल्याचा सामावेश होतो. शिलाहार राजा भोज याने सन ११९० मध्ये हा किल्ला मजबूत बांधकाम करून पुर्ण केला. तथापि इ.स.१२०० मध्ये हा किल्ला देवगिरीच्या यादववंशीय सिंघण राजाने शिलाहार यांचेकडून जिंकून घेतला. तो इ.स.१३०० मध्ये दिल्लीच्या अल्लाउद्दीन

खिलजीने जिंकून घेतला. खिलजी घराण्याकडून तो पुढे तुघलक घराण्याकडे व तुघलकांच्याकडून हा किल्ला बहामनी राजाच्या ताब्यात गेला. इ.स.१३४७ मध्ये बहामनी घराण्याची स्थापना झाली. त्या बहामनीचे शकले पडल्यानंतर सातारचा किल्ला निजामशाहीच्या ताब्यात गेला. निजामशहाने हा किल्ला चांदबिबीच्या विवाहाप्रसंगी विजापूरकरास अंदन दि ला. सन १५७९ मध्ये चांदबीबीविरूद्ध आदिलशहाच्या किश्वरखानाने बंड करून चांदबीबीस या किल्ल्यावर दीर्घकाळ बंदिवासात ठेवले होते. इ.स.१५९२ मध्ये आदिलशहाचा दिवाण दिलावरखान यास याच किल्ल्यावर मरेपर्यत कैदेत ठेवण्यात आले होते. काही कालावधीतच तो तेथे मरण पावला. विजापूरकरानी फलटणचे मुधोजी नाईक निंबाळकर यांना सन १६४० पर्यंत ७ वर्षे या किल्ल्यावर बंदिवासात ठेवले होते.

पुढे यादव, खिलजी व तुघलक घराण्यांनी याठिकाणी राज्य केले. बहामनी सत्ता दुभंगल्यानंतर हा किल्ला विजापूरच्या आदिलशहाच्या ताब्यात गेला. या किल्ल्याला 'हुकेबहन' असे नांव दिले होते. शिवकाळात सातारा किल्ल्याचे महत्त्व वाढले. १७व्या शतकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेले हे शहर आहे. सातारा शहर अंजिक्यतारा, पांडवगड, वैराटगड, चंदनगड, वंदनगड़ वंसतगड आणि सदाशिवगड या सात किल्ल्यांच्या सुरक्षित तटबंदीमध्ये वसलेले शहर आहे. औरंगजेब बादशहाने इ.स. १६८९ मध्ये मराठयांची राजधानी रायगड जिंकली. तेंव्हापासून छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई आणि नंतर छत्रपती शाहू महाराजांच्या काळात सातारा शहर मराठयांची राजधानी म्हणून प्रसिद्धीस आले. पुढे पेशवे मराठयांचा कारभार पुणे येथून पाहत असले, तरी ते सातारच्या छत्रपतींच्या अधिपत्याखाली होते.

सन १६७३ मध्ये शिवाजी महाराजांनी परळीचा किल्ला जिंकल्यानंतर साताऱ्यास वेढा दिला. ३ महिन्याच्या वेढयानंतर किल्ला महाराजांच्या ताब्यात आला. महाराणी येसूबाईंनी शिवाजी महाराजांचे द्वितीय पुत्र राजाराम महाराज यांना गादीवर बसविले. छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजीच्या वेढयातून निसटून आल्यावर २३ मे १६९८ रोजी मराठयांची राजधानी विशाळगड किल्ल्याहून सातारा किल्ल्यावर राजधानी आणली. इ.स.१६९९ मध्ये मोगल बादशहा औरंगजेबाने या किल्ल्यास वेढा दिला. १७०० मध्ये बादशहाने किल्ला जिंकून घेतला व त्याचे नांव 'आझमतारा' असे ठेवले. १७०३ साली सातारचा किल्ला पुन्हा मराठयांच्याकडे

आला.  इ.स.१७०७ साली औरंगजेब मरण पावल्यावर शाहू महाराजांची त्याच्या छावणीतून सुटका झाली व ते साताऱ्यात आले. १२ जानेवारी १७०८ रोजी छत्रपती शाहू महाराजांचा सातारा किल्ल्यात राज्याभिषेक झाला आणि ते मराठी सत्तेचे छत्रपती झाले. येथून पुढे सन १८४८ पर्यत साताराच मराठयांची अधिकृत राजधानी होती. इ.स.१७०८ ते इ.स.१७४९ या काळातील मराठयांच्या इतिहासातील महत्त्वाच्या घटनेशी साताऱ्याचा संबंध आहे. इ.स. १८१८ मध्ये इंग्रजांनी सातारा पेशव्याकडून जिंकून घेतला होता. तेथे प्रतापसिंह महाराजांच्या अधिपत्याखाली सातारा शहर हे राजधानीचे शहर म्हणून नावारूपास आले. छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा इंग्रज सहाय्यक जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ याने ‘मराठयांचा इतिहास’ याच शहरात लिहिला.

अशाप्रकारे सातारा नगरीस मराठी राज्याच्या राजधानीचा दर्जा प्रथमच दिला गेला. यापूर्वी सातारा किल्ल्याचा उपयोग फक्त राज्याचे संरक्षण व राजकीय कैद्यांना बंदिवासात ठेवण्यासाठीच केला जात होता. छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात राज्यकारभाराच्या सोईसाठी किल्ल्यावर आवश्यक सुविधा निर्माण केल्या. पूर्वेकडील बुरूजाशेजारी ढाली, तलवारी, भाले, बरची, चिलखते, बाण इत्यादी शस्त्रास्त्रे बनविण्याचा कारखाना सुरू केला. धान्याची कोठारे, घोडयांच्या पागा, कैद्यासाठी तुरूंगाची इमारत वगैरे बांधून घेतल्या. उत्तरेस लांबवर पसरलेल्या चार भिंती टेकडीवर टेहळणी बुरुज निर्माण केले. याच टेकडीला पुढे चार भिंती टेकडी हे नाव रूढ झाले. त्या टेकडीच्या पायथ्याशी मेट म्हणून ठिकाण आहे. अशाप्रकारे मेटाच्या वस्तीपासून किल्ल्याच्या पायथ्याशी सातारा शहराच्या स्थापनेचा प्रारंभ झाला.

छत्रपती शाहू महाराजांनी १२ जानेवारी १७०८ रोजी सातारा किल्ल्यावर स्वतःस राज्याभिषेक करवून घेतला व अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली. छत्रपती शाहू महाराजांचे आसन स्थिर झाल्यावर त्यांनी या ठिकाणास राजधानीस योग्य असे रुप देण्यास सुरूवात केली.  छत्रपती शाहू महाराजांचे आयुष्य औरंगजेब बादशहाच्या छावणीत गेल्याने त्यांना सपाट प्रदेशात राहण्यास आवडत होते. यासाठी त्यांनी किल्ल्याच्या खाली वस्ती करण्यास सुरूवात केली. या वस्तीच्या भागास प्रथमतः त्यांनी वारांची नावे दिली होती. यामुळे सात वारांची नावे पेठांना आहेत. या सात भागातच इतर लहान लहान भाग पडून त्यांना निरनिराळी नावे मिळाली. छत्रपती शाहू महाराज हे राज्याचा कारभार पाहू लागले. त्यावेळी सातारा हे

राजधानीचे ठिकाण होते. छत्रपती शाहूच्या राज्याचा विस्तार वाढू लागल्याने शाहू व त्याचे मंत्री, सरदार हे वाडे बांधून राहू लागले.

छत्रपती शाहू महाराजांची राजधानी प्रारंभी सातारा किल्ल्यावर होती. पुढे राज्याचा विस्तार वाढल्याने ती गैरसोयीची वाटून किल्ल्याच्या उत्तरेकडील पायथ्याशी छत्रपती शाहू महाराजांनी शाहूनगर नावाचे एक शहर वसवले. हेच आजचे सातारा होय. या शाहूनगरीची स्थापना इ.स.१७२१ च्या सुमारास झाली व तिचा सर्वाधिक विस्तार छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीत झाला. या शहराची रचना व त्यातील भागाची नावे छत्रपती शाहू महाराजांच्या आमदनीची आठवण करून देतात. शाहूनगर येथे छत्रपती शाहू महाराज यांनी रंगमहाल, अदालतवाडा यासारख्या वास्तू बांधल्या. यवतेश्वराहून व महादऱ्याहून खापरी नळाने पाणी आणून साताऱ्यात पाण्याची व्यवस्था लावली. हौद बांधले. उत्तर हिंदुस्थानातून व दक्षिणेकडून सावकारी, वकिली, देवतार्चन इत्यादी कामे करणारी अनेक कुटुंबे शाहूनगरात येऊन राहिले. त्याचबरोबर आशानंद, सुखानंद, मनसापुरी, बन्सीपुरी, सुमेरगिरी, गोसावी यासारखे नामांकित व्यापारी साताऱ्यात येऊन राहिल्यामुळे सातारा शहराची भरभराट झाली. सातारा ही मराठयांची राजधानी असल्यामुळे प्रधान व सरदारांचे वाडे बांधले. नवीन पेठा वसविल्या. सातारा शहराच्या सौंदर्यात भर घातली. छत्रपती शाहू महाराजांनी करंजे येथे बागा लावल्या. विविध प्रकारची फळझाडे व फुलझाडे येथे होती.

छत्रपती शाहू महाराजांच्या काळात सातारची जी जुनी वस्ती होती त्यामध्ये माची, मंगळवार पेठ, चिमणपुरा पेठ, शुक्रवार पेठ, व्यंकटपुरा पेठ, यादोगोपाळ पेठ व केसरकर पेठ, रघुनाथपुरा, राजसपुरा व दुर्गा पेठ व संगममाहुली इत्यादी पेठा वसविल्या तर वाडयाचे बांधकामामध्ये अदालतवाडा, रंगमहाल, तख्ताचा वाडा, महादरे व गेंडामाळ एवढाच विस्तार होता. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात सातारा शहराची वस्ती होती. ही वस्ती वसविण्याकामी छत्रपती शाहू महाराजांचे योगदान मोठे होते. पुढे ब्रिटिश काळात प्रतापसिंह महाराज व त्यानंतरच्या छत्रपतींनी सातारा शहराचा विस्तार केला होता. ब्रिटिशांनी सातारा शहराचा विकास करत असताना वेगवेगळया पेठांना वेगवेगळी नावे दिली होती.

सातारा शहराचा विकास खऱ्या अर्थाने छत्रपती शाहूच्या काळात झाला. छत्रपती शाहूने अजिंक्यतारा किल्ल्यावरून पायथ्याला शहराचा विकास करून त्यास शाहूनगर हे नाव दिले.

छत्रपती शाहू महाराजांच्या काळात सातारची जी जुनी वस्ती होती त्यामध्ये माची, मंगळवार पेठ, चिमणपुरा पेठ, शुक्रवार पेठ, व्यंकटपुरा पेठ, यादोगोपाळ पेठ व केसरकर पेठ, रघुनाथपुरा, राजसपुरा व दुर्गा पेठ व संगममाहुली इत्यादी पेठा वसविल्या तर वाडयाचे बांधकामामध्ये अदालतवाडा, रंगमहाल , तख्ताचा वाडा, महादरे व गेंडामाळ एवढाच विस्तार होता. पुढे छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या काळात त्याच्यात वाढ होऊन त्यामध्ये भवानी पेठ, सदाशिव पेठ, दुर्गा पेठ, मल्हार पेठ, प्रतापगंजपेठ, जुना राजवाडा व जुने जलमंदिर इत्यादीची निर्मिती करून सातारा शहराचा विकास केला. छत्रपती आप्पासाहेब महाराजांच्या काळात सातारा शहरात  नवीन राजवाडा व नवे जलमंदिर निर्माण केले जाऊन सातारा शहराच्या विकासात भर पडली. ब्रिटीश काळात सातारा शहरात ज्या नवीन पेठा वसविल्या होत्या, त्यांची नावे गोसावीपुरा, शनिवार पेठ, सोमवार पेठ, गुरूवार पेठ, बुधवार पेठ, रघुनाथपुरा पेठ, राजसपुरा, बसाप्पाची पेठ, पंताचा गोट, दुर्गा पेठ, व रविवार पेठ इ. आहेत.

छत्रपती शाहू महाराजांचा मृत्यू इ.स.१७४९ मध्ये झाला.  छ. रामराजा महाराजांचा ४ जानेवारी १७५० रोजी साताऱ्यात राज्यारोहण समारंभ पार पडला.  छत्रपती रामराजा यांना राज्यकारभार चालविण्याचे कसलेही शिक्षण त्याला मिळाले नव्हते. राज्यकारभार चालवण्यास लागणारे गुणही त्याच्या अंगात नव्हते. तो त्या कामास पुर्णपणे लायक नव्हता. महाराणी ताराबाईचा ९ डिसेंबर, १७६१ मध्ये सातारा येथे वयाच्या ८६ व्या वर्षी मृत्यू झाला. त्यानंतर छत्रपती रामराजे नाना फडणवीसांच्या नजरकैदेत राहिले. ९ डिसेंबर, १७७७ रोजी छत्रपती रामराजांच्या मृत्यू झाला. छ. रामराजा महाराजांच्यानंतर छ. दुसरे शाहू महाराजांचा राज्याभिषेक १२ डिसेंबर, १७७८ रोजी साताऱ्यात झाला. छत्रपती दुसऱ्या शाहूस स्वातंत्र्य कधीच मिळाले नाही. छत्रपती दुसरा शाहू यांच्या नशिबी बंदिवास, तेजोभंग व अपमानाचे प्रसंग येऊ लागले. छत्रपती दुसरा शाहू याचा मृत्यू ४ मे १८०८ रोजी झाला. त्यानंतर छत्रपती प्रतापसिंह महाराज हे सत्तेवर आले.

छत्रपती प्रतापसिंह महाराजांना प्रारंभापासूनच अनेक हालअपेष्टांना तोंड द्यावे लागले होते. दुसऱ्या बाजीराव पेशव्याने इंगजाशी वैर येताच छत्रपती प्रतापसिंह महाराजांना नजरकैदेत ठेवले होते. त्यांनी इंग्रजांशी गुप्तपणे संधान बांधून कैदेतून सुटण्याचा प्रयत्न केला. तेव्हा बाजीरावाने काही लढायात छत्रपती प्रतापसिंह महाराजांना सोबत घेतले. शेवटी इंगजांच्या हाती

१० फेब्रुवारी १८१८ रोजी छत्रपती प्रतापसिंह महाराज लागले. इंग्रजांनी पेशवाई इ.स.१८१८ मध्ये नष्ट करून बाजीरावास उत्तरेस ब्रम्हवर्तास पाठविले आणि सातारच्या गादीवर इ.स.१८१८ मध्ये छत्रपती प्रतापसिंह महाराजांना बसविले. पुढे त्यांच्याशी १८१९ म्ध्ये एक तह करून त्यांच्या पूर्वापार चालत आलेल्या हक्कात काटछाट केली. एक मांडलिक संस्थान एवढा दर्जा ठेवून संस्थानास सैन्य वाठविणे, इतरांशी राजनैतिक संबंध प्रस्थपित करणे वगैरेवर निर्बंध घालण्यात आले. राज्यकारभार व व्यवस्था पाहण्यासाठी मुंबईचा गव्हर्नर एल्फिन्स्टन याने ब्रिटिश रेसिडेंट (प्रशासक) दरबारी ठेवला. पहिला रेसिडेंट म्हणून ग्रँट डफ याने छत्रपती प्रतापसिंह महाराजांना राज्यकारभाराचे प्रशिक्षण दिले आणि उत्तेजनही दिले. त्यामुळे छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी सातारा शहरात अनेक सुधारणा केल्या. राजवाडा, जलमंदिर यांसारख्या अनेक वास्तू बांधल्या. शिक्षणासाठी पाठशाळा बांधल्या. इंग्रजी अध्ययनाची सोय केली. छापखाना काढून ग्रंथ छापविले आणि सातारा शहरास पाणी पुरवठा करणारी योजना कार्यान्वित केली. तेव्हा ग्रँट डफने त्यांच्याविषयी कंपनीकडे शिफारस केले. तसेच ईस्ट इंडिया कंपनीने त्यांच्या अधिकारात काही प्रमाणात वाढ केली. डफने इ.स.१८१८ ते १८२२ या काळात ऐतिहासिक साधनसामग्री जमवून पुढे इ.स.१८२६ मध्ये हिस्टरी ऑफ मराठाज हा ग्रंथ लिहिला. एल्फिन्स्टनची गव्हर्नरची मुदत संपली आणि डफही इंग्लडला गेला, तेव्हा छत्रपती प्रतापसिंह महाराजांचे मुंबईचे गव्हर्नर रॉबर्ट ग्रँट(इ.स.१८३५ ते १८३८) आणि नंतरचे रेसिडेंट ब्रिग्ज, रॉबर्टसन, लॉडविक यांच्याशी पटले नाही. तेव्हा छत्रपती प्रतापसिंह महाराज इंग्रजांविरूद्ध कारस्थान करतो, म्हणून चौकशी समिती नेमली. तर ओव्हान्स या रेसडिंटने गोवा व नागपूरशी संगनमत करून छत्रपती प्रतापसिंह महाराज कट करीत असल्याचा खोटा आरोप केला. यावेळी छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी जहागिरदारावरील अधिकार सोडून देणयच्या इंग्रजांच्या सूचनेचे पालन केले. तेव्हा ४ सप्टेंबर १८३९ रोजी छत्रपती प्रतापसिंह महाराजांना पदच्युत करून सहकुटुंब  काशीला बनारस पाठविले. तिथेच छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा इ.स.१८४७ मध्ये मृत्यू झाला.

इ.स.१८१८ पासून स्वातंत्र्याचा लढा सन १९४७ पर्यत अविरतपणे जवळजवळ १३० वर्षे चालू राहिला होता. सातारचे राजे छत्रपती प्रतापसिंह महाराज हे इतिहासाच्या अभिमान बाळगणारे राजे असल्यामुळे इंग्रजांना त्यांना गादीवर ठेवणे अडचणीचे झाले. म्हणून त्यांनी

अनेक प्रकारचे आरोप करून छत्रपती प्रतापसिंह महाराजांना ४ सप्टेंबर १८३९ रोजी सातारा गादीवरून दूर केले व त्यांचे लहान बंधू आप्पासाहेब महाराजांना गादीवर बसविले. आप्पासाहेब महाराजांनी आपले जहागिरदारीवरील हक्क पूर्णपणे सोडून दिल्यामुळे इंग्रजांना सातारा राज्याची अडचण राहिली नाही. पण आप्पासाहेबांच्या मृत्यूनंतर सातारा राज्य भविष्यात अडचणीचे ठरू शकेल म्हणून इंग्रजांनी दत्तक वारस नामंजूर हे निमित्त करून सन १८४८ मध्ये सातारा संस्थान खालसा केले. छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा उठावाचा प्रयत्न अनेक कारणानी अयशस्वी झाला होता. त्यांचे प्रतिनिधी रंगो बापूजी इंग्लंडहून सन १८५३ मध्ये हिंदुस्थानात परत येऊन इंग्रजी राजवटीविरूद्ध उठावासाठी देशातील परिस्थितीचा अंदाज घेत होते. त्यांनी साताऱ्यात आपली मजबूत गुप्त संघटना तयार केली होती. सन १८५६ मध्ये बंडाची तयारी झाली होती परंतु फितुरीमुळे यश मिळाले नाही. १२ जून १८५७ रोजी इंग्रजांच्या विरूद्ध उठाव कानपूरला झाला. त्याच दिवशी सातारा येथे सशस्त्र उठाव करण्याची तयारी पुर्ण झाली होती. परंतु फितुराकडून ही बातमी इंग्रजांना समजली. त्यामुळे उठावकर्त्यांना पकडून तोफेच्या तोंडी देण्यात आले. त्यामुळे त्या दिवशी उठाव होऊ शकला नाही.

लोकमान्य टिळकांची होमरूल चळवळ व राष्ट्रावादी आंदोलनात साताऱ्यातील काँग्रेसजनांनी त्यांना भरघोस पाठिंबा दिला होता. लोकमान्य टिळक यांनी सुरू केलेल्या वंगभंग स्वदेशी आंदोलन, भूमिगत कारवाया आणि जहालमवाळ संघर्षातही सातारच्या कार्यकर्त्यांनी टिळकांचा जोरदार पुरस्कार केला होता.

लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांच्या राजकीय विचारसरणीचा समर्थ असा एकही नेता नव्हता. त्यामुळे महाराष्ट्रात राजकीय पोकळी निर्माण होण्याची भिती निर्माण झाली. याचवेळी टिळक पक्षाच्या प्रभाव कमी झाला. तथापि राष्ट्रवादी आंदोलनात सातत्य टिकविणे आवश्यक असल्याने महात्मा गांधीचे नेतृत्त्व स्विकारले. त्यावेळी शंकरराव देव, न.वि.गाडगीळ, गंगाधरराव देशपांडे, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी स्पष्ट केले की, महात्मा गांधीजी हेच खरे लोकमान्य टिळकांचे उत्तराधिकारी मानले होते.

महात्मा गांधीजीं आणि काँग्रेस विचारांच्या आंदोलनाचे नेतृत्त्व सन १९२० पासून ते सन १९५० पर्यंत सातारा शहरासह जिल्हयाचे नेतृत्त्व सातारा शहरातील कार्यकर्ते रामचंद्र गणेश तथा भाऊसाहेब सोमण वकील यांनी खंबीरपणे केले होते. असहकार आंदोलनात सातारा

शहरातील नारायण नरहर अष्टपुत्रे, डॉ. वा.वि.आठल्ये, नारायण कृष्ण आगाशे, रघुनाथ पांडुरंग करंदीकर, आचार्य कालेलकर, काळे रावजी रामचंद्र, नारायण केळकर, उमरभाई बाळभाई खाटिक, गोविंदानंद स्वामी, पंढरीनाथ वामन घाणेकर, घाणेकर निळकंठ वामन, गणेश वासुदेव चिरमुले, जोशी माई गोपाळ, महादेव दत्तात्रय ढगे, वाग्भट नारायण देशपांडे, परचुरे शास्त्री, दत्तात्रय रामचंद्र पराजंपे, महादेव नारायण पारसनीस, नबी मोहमंद बागवान, मुकुंद चिंतामण बापट, शंकर भालचंद्र बापट, केशवराव मारूतराव बुधकर, विष्णू बळवंत भिडे, दादामिया अंबूलाल महात, विष्णू नायक मुतालिक, गणपतराव हरी साठे, विठ्ठल वामन हडप, भाऊसाहेब सोमण, इस्माईल नूरमहमंद हकीम, गणपतराव साठे, रामचंद्र नरसू नांगरे, वि.गो.कुर्लेकर, आचार्य दत्तात्रय काकासाहेब कालेलकर, श्रीधर दत्तात्रय अवचट, दादासाहेब करंदीकर, दत्तात्रय कृष्ण गोसावी यांना दोन वर्षाची शिक्षा झाली होती. माई गोपाळ जोशी, लक्ष्मण रामचंद्र जोशी, विठ्ठल रामचंद्र दुधे, दत्तात्रय रामचंद्र परांजपे, राजाराम केशव पालकर, विठ्ठल वासुदेव फडके, केशवराव मारूतीराव बुधकर, चंपावती मोडक, महादेव कृष्णजी लेले, पिलू बुवा वडूजकर, अनंत वासुदेव सहस्त्रबुद्धे, शंकर विनायक सोवनी, शंकरराव देव, कृष्णा रामा कुऱ्हाडे, वि.स.पागे, गोविंद खोत, डॉ.सोहनी, रा.ग.सोमण, आप्पासाहेब लाड, नाथाजी लाड, जी.डी.लाड, भगवान पाटील, गोविंद बापूजी श्रोती इत्यादी कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता.

सन १९४२ मध्ये सातारा शहरात कलेक्टर आगमनाच्या वेळी प्रचार पत्रके वाटण्याचे काम दत्तात्रय रामचंद्र आगटे यांनी केले. त्याबद्दल त्यांना अटक व स्थानबद्ध करण्यात आले. आप्पा मास्तर यांनी या चळवळीच्यावेळी सातारा शहरात तुफान सेनेची निर्मिती केली होती. शिवनारायण जगन्नाथ कासट, विष्णू दत्तात्रय चितळे, ढवळे बाबूराव मार्तंड, गोपाळ विष्णू पालकर, किसनदास लक्ष्मणदास दोशी, गीताबाई गणपती तेली, रामभाऊ कोंडिबा माने, सुशिला पांडुरंग होनराव, महादेव कृष्णाजी लेले व बाळू बाबाजी खुडे यांनी चलेजाव आंदोलनात भूमिगत आंदोलनाचे कार्यकर्त्यांना सहाय्य करून आश्रय देण्याचे कार्य केले. महिपतराव अण्णासाहेब खोचरे(पाटील), पुरूषोत्तम बाळकृष्ण पेंढारकर, कमलाकांत सदाशिव तालिम, महादेव वासुदेव मुतालिक व नारायणदास गोवर्धनदास गुजर यांनी या चळवळीत भूमिगत कार्य केले होते. मोडतोड व जाळपोळीच्या कार्यात सहभाग घेतला होता. महादू विठू चव्हाण यांनी चलेजाव आंदोलनाच्या वेळी वडूज ता.खटाव येथे निघालेल्या मोर्चात सहभागी

झाले होते. तसेच त्यांनी भूमिगत कार्य केले होते. शंकर रामचंद्र जगदाळे यांनी सातारा शहरातील मिरवणुकीत भाग घेतला होता. त्यामुळे त्यांना मारहाण केली. टेलिफोनच्या तारा तोडणे, शाळांच्या इमारती व बंगल्यांना आगी लावणे यासारख्या घातपाती कृत्यात भाग घेतला. विश्वनाथ कृष्ण टेंबे यांनी या चळवळीत विद्यार्थी संघटनेत कार्य केले होते. शाहू नागेश थोरात, भास्कर रघुनाथ दामले, रामचंद्र दत्तात्रय दिक्षित, प्रमिला विष्णू देशपांडे, महादेव नारायण पारसनीस, जयनारायण किसनलाल लाहोटी, लक्ष्मण तुकाराम क्षीरसागर यांनी चलेजाव चळवळीत सभामिरवणुकीत भाग घेतला होता. मधुसुदन हणमंत दिवेकर यांनी या चळवळीत भूमिगत कार्य केले होते तसेच गुप्त वाङ्मय प्रसार, शस्त्रास्त्रांची जमवाजमव, मोडतोड व जाळपोळीत सहभाग घेतल्याने त्यांना एक वर्ष सक्तमजुरीची शिक्षा आणि पुन्हा शस्त्रास्त्रे जवळ ठेवल्याबद्दल सन १९४४ मध्ये दोन महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली होती.[१५३]

श्रीधर वामन कुलकर्णी, पांडुरंग केशव कोल्हटकर, वासुदेव शंकर कुमठेकर, एकनाथ दत्तात्रय गोडसे, दत्तात्रय कृष्ण गोसावी, गणेश रामकृष्ण गोळवलकर, उषाताई वसंत घाटगे, रामचंद्र बळवंत घोरपडे, माई गोपाळ जोशी, श्रीपाद गोविंद जोशी, गणपती देवजी तपासे, ज्ञानेश्वर रामच्द्र देवकर, रामचंद्र नरसू नांगरे, तुषार पांडुरंग पवार, आनंदा हरी पाटील, महादेव नारायण पारसनीस, वसंत काशिनाथ पालकर, बन्सिलाल रामगोपाळ भट्ट, नरहर वामन लिमये, पिलू बुवा वडूजकर, रामकृष्ण नारायण वाठारे, आबास बंडूभाई शेख, शंकर विनायक सोवणी, गंगाधर केशव सोहनी, इस्माईल नूरमहामंद हकिम, विठ्ठल वामन हडप, मारूती आत्माराम हळब इत्यादीनी सन १९४२ च्या चलेजाव आंदोलनात सहभाग घेतला होता.

प्रतिसरकारने केलेल्या धाडशी कृत्यामुळे भूमिगत कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला होता. मात्र त्याबरोबर पोलिसांचे दडपणही वाढले होते. पोलिसांचे खबरे प्रतिसरकारच्या स्वातंत्र्य सैनिकांची माहिती पोलिसांना पुरवित असत. त्यामुळे अनेकांना शिक्षा भोगावी लागत असे. प्रतिसरकारचे काही कार्यकर्ते पोलिसांचा गणवेश करून जमीन महसूल व निधी गोळा करीत. पोलिसांच्या खबऱ्याना हैराण करीत असत. काही सरकरनिष्ठ लोक खास करून पोलीस पाटील भूमिगत सैनिकांची माहिती पोलिसांना पुरवित. म्हणून अशा विरोधकांचा समाचार घेण्यासाठी प्रतिसरकाचे कार्यकर्ते तुरळक हिंसाचार करण्यासाठीही प्रवृत्त होत असत. ते पोलिसांच्या खबऱ्यांच्या तळपायावर मिठाचे पाणी ओतून काठीचे आघात करून त्यांना चालणे

अशक्य करीत. शिक्षेचा हा प्रकार पत्री लावणे या नावाने ओळखला जात असे. यावरून प्रतिसरकाला अपभ्रंशाने 'पत्री सरकार' हे नाव मिळाले. या संघटनेतील कार्यकर्ते जीवावर उदार होऊन इंग्रजांचे सरकार उखडून टाकण्यासाठी करीत असलेल्या संग्रामाला सर्व जनतेचा पाठिंबा होता. चळवळीतील लोकांबद्दल जनतेच्या मनात आदराचे स्थान होते. जनतेच्या पाठिंब्यामुळेच १ जून १९४३ पासून १३ जून १९४६ पर्यत प्रतिसरकार कार्यरत राहिले.

सातारा शहराने स्वातंत्र्यपूर्व काळात सातारा, सांगली, कराड, कोल्हापूर, पुणे, सोलापूर अहमदनगर, नाशिक, पैठण, औरंगाबाद व मुंबई या शहराप्रमाणेच स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला होता. एवढेच नव्हे तर सातारा शहरातील कार्यकर्त्यानी साताऱ्याव्यतिरीक्त इतर शहरातील स्वातंत्र्य चळवळ यशस्वी करण्यासाठी महत्त्वपूर्ण कामगिरी केली होती. भारतात स्वातंत्र्य चळवळ सुरू झाल्यानंतर जे विविध उपक्रम झाले ते यशस्वी करण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला होता त्यामध्ये राष्ट्रीय शिक्षण, असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळीत जंगल सत्याग्रह, मीठाचा सत्याग्रह, अस्पृश्यता निवारण, वैयक्तिक सत्याग्रह व चले जाव आंदोलन यामध्ये फार मोठया उत्साहाने सहभाग घेऊन स्वातंत्र्य मिळविण्यासाठी यश मिळविले होत.

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत सातारा शहराने महत्त्वपुर्ण भुमिका बजावली होती. क्रांतिसिंह नाना पाटील, किसन वीर, यशवंतराव चव्हाण व नागगाथ नायकवडी वगैरे देशभक्तांनी साताऱ्यात 'प्रतिसरकारची स्थापना' केली होती. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून त्याचे मुख्य कार्यालय सातारा शहरात आणले. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत 'क्रांतिकारकांचा जिल्हा' म्हणून सातारा शहराची प्रसिद्धी भारतभर होती.

आधुनिक कालखंडात सातारा शहरात ज्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक बदल झाले, ते महत्त्वपूर्ण आहेत. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत या शहराने मोलाची कामगिरी पार पाडली होती. याशिवाय या काळात महाराष्ट्रामध्ये ज्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक सुधारणा राबविल्या गेल्या होत्या, त्यातही सातारा शहराने सहभाग घेतला आहे. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात ज्या राजकीय व सामाजिक घडामोडी घडल्या त्याचेही पडसाद सातारा शहरावर पडले होते.

आधुनिक काळात सातारा शहरात अनेक सुधारणा होऊन मोठया प्रमाणावर प्रगती झाली. नगरपालिकेच्या साहाय्याने अनेक उपक्रम राबवून सातारा शहरात सुधारणा घडवून आणल्या गेल्या आहेत. त्यामुळे सातारा शहरात राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, सहकार क्षेत्रात बदल घडून आल्याने सातारा शहरास महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

भारतीय समाजरचना ही 'वर्णाश्रम व्यवस्था' यावर अवलंबून होती. परंपरेने चालत आलेल्या या व्यवस्थेला धर्माच्या नावाने स्मृतिग्रंथांनी आणि कर्मसिद्धान्ताच्या तत्त्वज्ञानाने अगदी सनातन करून टाकल्याने याबाबत नवे प्रयोग करण्याचा कोणी प्रयत्नच केला नाही. ज्यांनी या व्यवस्थेविरूद्ध थोडेसे बंड केले त्यांचे प्रयत्न तितकेसे यशस्वी झाले नाहीत किंवा त्यांना या व्यवस्थेशी तडजोड करणेही भाग पडले. समाज हा प्राचीन काळापासून चातुर्वर्ण्य पद्धतीवर आधारलेला दिसून येतो. वर्णव्यवस्था खोलवर रूजून त्यातूनच जातिसंस्था वाढीस लागली. या चातुर्वर्ण्य पद्धतीतून पुढील काळात जातीसंस्था निर्माण झाल्या.

सातारा शहरात १९ व्या शतकात समाजरचना जातीव्यवस्थेवर आधारित होती. धर्मशास्त्रानुसार मनुष्य ज्या जातीत जन्मला त्या जातीत मरणे आवश्यक होते. त्याला इतर जातीचा व्यवसाय करणेही जातीसंस्थेविरूद्ध मानले जात होते. त्यामुळे धर्म, जाती, रूढी, परंपरा यांच्या मर्यादा कोणीही ओलांडत नसत. शक्यतो धर्म, जातीच्या मर्यादेत जीवन जगण्याचा प्रत्येक व्यक्ती प्रयत्न करीत असे. समाजव्यवस्थेत जन्मावरून माणसाची जातवार विभागणी झाली, पण त्याशिवाय त्यात्या जातीचा व माणसाचा सामाजिक दर्जा ठरलेला होता. त्यामुळे प्रत्येक जातीच्या वस्त्या वेगळया, पाणवठे वेगळे, सभागृहे व स्मशाने वेगळी असलेली दिसतात.

सातारा शहरातील समाजात एकत्र कुटुंबपद्धती होती. त्यानुसार एका घरात दोन ते तिन पिढयांचे लोक एकत्र राहत असत. या कुटुंबातील वयाने ज्येष्ट असणारी व्यक्ती कुटुंबप्रमुख म्हणून राहत असे. सातारा शहरात विविध धर्माचे लोक राहत होते. तसेच सर्वच जातीचे लोक एकत्र राहून सर्व समाजातील सन व उत्सवामध्ये सहभागी होत असत. ख्रिश्चन, इस्लाम, जैन व हिंदू इत्यादी धर्माचे लोक होते व आहेत. सातारा शहरात मराठे, ब्राम्हण, माळी, लोणारी, कुंभार, रामोशी, धनगर, मांग, चांभार, ढोर, कैकाडी, कोल्हाटी, नंदीवाले, कातकरी इत्यादी जाती व जमाती व इस्लामधर्मीय आहेत.

सातारा शहरात जातीनिहाय वेगवेगळे पोषाख परिधान करत असल्याचे दिसते. सातारा शहरात अलंकारात जातीनुसार अलंकार वापरण्यात विविधता आढळते. सातारा शहरातील मराठी ही प्रमुख भाषा आहे. त्याखालोखाल दुसऱ्या क्रमांकावर उर्दू भाषा बोलली जात होती. तर हिंदी भाषा बोलणाऱ्यांचा तिसरा क्रमांक असून एकूण लोकसंख्येच्या १.६८ टक्के लोक हिंदी भाषा बोलतात. याशिवाय कन्नड, तेलगु आणि गुजराथी या भाषाही बोलल्या जातात. सातारा शहरात स्वातंत्र्यपूर्व काळात सरदार, जहागीरदार व इनामदार लोकांचे वाडे दुमजली, चौक असलेले, कौलारू आणि भाजलेल्या विटाचे अथवा दगडी भिंतीचे होते. पाळीव प्राण्याकरीता मागील बाजूला गोठा असे. मागील परसात फुलझाडे असत. घरासमोर तुळसी वृंदावन होते. मोठा दिंडी दरवाजा व देवडी अशी रचना होती. श्रीमंत लोकांची घरे दुमजली व अनेक खोल्या असलेली होती. त्यात चौक, ओटा, पडवी, भोजनगृह, स्वयंपाक घर, देवघर, स्नानगृह, कोठीघर, शयनगृह, अतिथीगृह अशा सर्व सोयीनियुक्त अशी होती.

सातारा शहरातील एकूण लोकसंख्येपैकी ४० टक्के लोक संपन्नतेचे जीवन जगत होते आणि ६० टक्के लोक गरीब व दारिद्र्याचे जीवन जगत होते. सातारा शहरात मध्यम वर्गीयांची घरे ही प्रामुख्याने भाजलेल्या विटांच्या भिंती व कौलारू छपरांची, गवत, कामटयांचे विणलेले छप्पर आणि कच्च्या विटा अथवा मातीच्या भिंती, गवत, कामटयांचे छप्पर आणि गवतावर चिखल थापलेल्या भींतीची आणि मातीचे छप्पर दिसून येतात. स्वातंत्र्य पूर्वकाळात अशाप्रकारे मध्यम वर्गियांची घरे होती. वाई शहरातील गरीब व भटक्या लोकांची घरे जाडया–भरडया कापडाचे लहान तंबू अथवा पाल आणि बांबूच्या कामटयापासून अथवा पावसापासून बचावासाठी गवत व काडयांचा आडोसा बांधून तयार केलेली घरे होती.

सातारा शहरात समाजातील स्त्रियांची परिस्थिती एकंदरीत दयनीय होती. स्त्रिया या अबला, दुबळया व सर्व बाबतीतच कमी दर्जाच्या मानल्या जात होत्या. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. मात्र उच्चकुलीन स्त्रियांना शिक्षण दिले जात होते. तसेच या स्त्रिया राजकारणातही भाग घेत असत. सर्वसामान्य समाजातील स्त्रियांना शिक्षण दिले जात नव्हते. या स्त्रिया कुटूंबाचा चरितार्थ चालावा म्हणून कुटूंबातील पुरूषांबरोबर कष्टाची कामे करीत असत.

धार्मिक बाबतीत पौराणिक देवदेवताचे माहात्म्य या काळात वाढलेले दिसते. व्रतवैकल्य आणि धार्मिक कल्पनांचा प्रभाव लोकांच्यावर पडलेला होता. सातारा शहरातील हिंदू, जैन,

वाणी, लिंगायत, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी लोकांचे आपल्या घरात जातीधर्माप्रमाणे देव असत. ख्रिश्चन लोक चर्चमध्ये प्रार्थना करत. मुस्लिम लोक शहरातील मशिदीमध्ये नमाज पडत. वाणी लोक, शिव, राम, विठोबा देवाची पूजा करीत. हिंदू लोक विठ्ठल, मारूती, गणपती, मुरलीधर, दत्त लक्ष्मीनारायण वेताळ, शंकर यांची पूजा करीत असत. सातारा शहरात हिंदु धर्मियाची सुमारे २०० मंदिरे होती. मुसल्मान धर्मियांच्या तीस मशिदी, ख्रिश्चनांची चार चर्च, जैन लोकांची तीन, पारशी एक व विश्वसमाज धर्माचे बहाई भवन अशी प्रार्थना स्थळे होती.

सातारा शहरात लोक दरवर्षी अनेक सण साजरे करीत असत. हिंदू लोक गुढीपाडवा, रामनवमी, दसरा, दिवाळी, मकरसंक्रांत, होळी, शिवरात्र, गोकुळाष्टमी, नारळी पौर्णिमा व गणेश चतुर्थी इत्यादी सण साजरे केले जातात. सातारा शहरातील लोक आपले आरोग्य सांभाळण्यासाठी वैद्याकडून औषधे घेत असत. शहरात मलेरिया, हिवताप, देवी, प्लेग, कॉलरा, क्षयरोग, कुष्ठरोग व अंधत्व यासारख्या साथीचे रोग येत असत. त्याला त्यांना सामोरे जावे लागे. साथीच्या रोगाच्या निवारणासाठी छत्रपती आप्पासाहेब महाराज यांनी सातारा येथे जिल्हा नागरी रूग्णालयाची स्थापना १८४० मध्ये केली होती. आधुनिक औषधे व उपचार पद्धतीचा संशोधनापूर्वी कॉलरा, देवी, गोवर, घटसर्प, क्षय, धनुर्वात, पोटाचे व आतडयाचे विकार आणि हिवताप तसेच ताप व श्वसनविषयक रोगांमुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण जास्त असे.

सातारा शहरात १९व्या व २० व्या शतकात ज्या सामाजिक संस्था अस्तित्त्वात होत्या. त्या सामाजिक संस्थानी शहरात सामाजिक बदल घडवून आणले होते. या सामाजिक संस्थामध्ये सत्यशोधक समाज, गणेश मेळा चळवळ, आयुर्वेद प्रसारक मंडळ, अंत्यसंस्कार सहाय्यक मंडळ, डिस्ट्रिक्ट ॲण्ड आफ्टर केअर असोशिएशन, युनियन क्लब, सातारा महिला मंडख व महिला मंडळ कन्याशाळा इत्यादी सामाजिक संस्थानी फार मोठे कार्य केले आहे. त्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे

सातारा शहरात काही ऐतिहासिक घराणी प्रसिद्ध होती. या घराण्यांनी मराठा काळापासून इतिहासात फार मोठी कामगिरी केली आहे. मंत्री, अभ्यंकर, देवस्थळी, गजेंद्रगडकर, माटे, दीक्षित चिपळूणकर, भागवत, तांबवेकर, जोशी, नातू, मुतालिक, भोसले आगटे, बाळ जोशी चंद्रशेखर, किबे, कान्हेरे, दिवाण, फडणीस, अनगळ, सुमंत, पंडितराव, पंडित पिंगळे, पंत प्रतिनिधी, पंत सचिव, काकडे, शिर्के, राजज्ञा इत्यादी घराण्यांनी सातारा

शहराचे ऐतिहासिक महत्त्व वाढले आहे.

सातारा शहरात समाजजीवनामध्ये अनेक जाती धर्माच्या लोकांचा समावेश होता व आहे. शहरात जातीयता होती. जातीद्वेष दूर करण्यासाठी किंवा समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी अनेक उपक्रम राबविले होते. त्यासाठी सातारा शहरातील संस्थाही कार्य करीत होत्या. सातारा शहारातील लोकजीवन हे सुसंस्कृत व उच्च प्रतीचे होते. समाज हा परंपरा व रूढीप्रिय होता. इंग्रजी राजवटीतील गुलामगिरी आणि सनातनीवृत्ती शहरात होती. वकिल, डॉक्टर आणि वेदविद्या पारंगत व्यक्ती श्रेष्ठ व्यक्तिमत्वात गणल्या जात होत्या. पण शेतकरी, कामकरी, बारा बलुतेदार यांची अवस्था दयनीय होती. सर्व जातीजमातीचे लोक एकमेकांच्या सण–समारंभात सहभागी होत होते. तसेच सर्व समाज सर्वधर्मसमभावाने राहत असे व हिंदू–मुस्लिम वादही साताऱ्यात झालेला आढळत नाही. काळाच्या ओघात सामाजिकदृष्टया अनेक स्थित्यंतरे झाली आहेत. पूर्वीची सामाजिक बंधने व प्रथा यांच्यात बदल होऊन पाश्चिमात्य पद्धतीनुसार सुधारणा झालेल्या दिसतात. याशिवाय सातारा शहरातील काही घराणी ही ऐतिहासिक असून त्यांनी सातारा शहराच्या इतिहासात फार मोलाची भर घातली आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्यामुळे सातारा शहराचा ऐतिहासिक वारसा जपण्यास मदत झाली आहे.

प्राचीन काळापासून भारताचा आर्थिक विकास हा शेती, व्यापार व उद्योगधंदे यावर अवलंबून होता. पूर्वीपासून खेडी ही स्वयंपूर्ण होती. खेडयातील गरजा या खेडयातच भागविल्या जात होत्या. त्यामुळे एकदा का सरकारचा महसूल भरला की, सरकारचा व त्या खेडयाचा संबंध संपुष्टात येत होता. त्यामुळे त्यावेळी आर्थिक संपन्नता होती. व्यापाराबाबतही अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापार त्या काळात चालत असलेला दिसून येत होता. त्यावेळच्या सत्ताधिशांनी आपापल्या परीने व्यापारास उत्तेजन दिले होते. तसेच उद्योगधंद्याबाबतही खेडयातील लोकांचा जातीनुसार व्यवसाय ठरलेला होता. त्यामुळे खेडयातील लोकांच्या गरजा भागवून उरलेल्या वस्तू हे कारागीर पेठेच्या ठिकाणी विक्रीसाठी आणीत होते. त्यामुळे उद्योगधंद्यास चालना मिळत होती. याशिवाय सरकारी कारखान्यातून विविध उद्योगधंदे मध्ययुगीन काळात चालू होते.

प्राचीन काळापासून मानवी जीवनास शेतीला अत्यंत महत्त्वाचे स्थान असून आजही जवळपास ७० टक्के लोक शेतीवर आपली उपजिविका करीत आहेत. राष्ट्रीय उत्पन्नात देखील

शेती उत्पादनाचा फार मोठा वाटा आहे. म्हणूनच भारताला पूर्वीपासून कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. अर्थव्यवस्थेमध्ये प्रामुख्याने शेतीच्या उत्पादनांनी फार मोलाची मदत केलेली आहे.

सातारा शहराच्या पश्चिमेकडील भाग हा सहयाद्रीच्या बेसॉल्टीक खडकांच्या रांगानी व्यापलेला आहे. तेथील जमीन ही पूर्वेकडे लहानमोठया टेकडयासह उताराची होत गेलेली आहे. स्वाभाविक रचनेमुळे जमिनीचा मगदूर भूभागानुसार भिन्न भिन्न आढळतो. त्यामुळे जमिनीचे मध्यम काळी जमीन, हलकी जमीन, लॅटेराईट जमीन इ. जमिनीचे प्रकार पडतात. या जमिनीतून भात, ज्वारी, बाजरी, गहू, मका, ऊस, नाचणी, व हळद, वरी, राळा, हरभरा, भुईमूग, तंबाखू, मिरची, आले, करडई व विविध प्रकारची फळे व भाजीपाल्याची पिके घेतली जात होती.

. शेतीबरोबरच अनेक पुरक व्यवसाय मोठया प्रमाणावर सुरू होते. आठवडे बाजाराची पद्धती फार प्राचीन काळापासून अस्तित्त्वात होती. अन्नधान्य, डाळी, तेल, मिरची, मसाले, गूळ, कापड, फळे, भाज्य, तांबेपितळीची भांडी इत्यादी वस्तू बाजारात विक्रीसाठी आणल्या जात होत्या. मध्ययुगीन काळापासून सातारा येथे व्यापारी पेठ अस्तित्त्वात आली होती. या बाजारपेठेत स्थानिक मालांच्या विक्रीबरोबरच परप्रांतातून आयात मालाची विक्रीही होत होती. या पेठेतून भुईमूग, शेंगा, हळद, मिरची, गूळ, तांदूळ, तंबाखू, धणे, घोंगडी इत्यादी माल प्रामुख्याने मुंबई, पुणे व कोकणात पाठविला जात होते. मुंबई व पुण्याहून विदेशी कापड नागपूर व सोलापूरहून कापड, चिपळूण, महाड व रत्नागिरीहून नारळ, खजूर, खारीक, सुपारी, मीठ व मसाल्याचे पदार्थ याची आयात होत असे. मराठयांच्या काळात सहयाद्रीच्य घाटमाथ्यावर दोन प्रमुख मार्ग होते. त्यापैकी पुणे कोल्हापुर आणि कर्नाटक हा मार्ग पुणे जिल्हयातील बोर घाटातून निघून कोरेगावच्या क्रमशः ईशान्येस व आग्नेयेस असलेल्या सालपे घाटातून पुढे सातारा–तासगावमार्गे मिरजला किंवा तारगाव व मसूरहून कराडला जात होता. सातारा शेजारील देऊर गावच्या नैऋत्येस सालपे घाटातून बैलगाडयांची वाहतूक केली जात होती.

अण्णासाहेब चिरमुले यांनी २० ऑगस्ट १९०७ रोजी सातारा स्वदेशी कमर्शियल बॅंकेची स्थापना केल्यापासून वाणिज्य बॅंकांच्या जिल्हयातील व्यवहाराचा प्रारंभ झाला. साताऱ्यास सन १९३६ मध्ये युनायटेड वेस्टर्न बॅंक ऑफ इंडियाची स्थापना झाली. सन १९१३ मध्ये

साताऱ्यास बा.ग.चिरमुले उर्फ नानासाहेब यांनी वेस्टर्न इंडिया लाईफ इंश्युरन्स कंपनी स्थापन केली.

सातारा जिल्हयातील कुटिरोद्योग व गूळ तयार करणे हे प्राचीन काळापासूनचे व्यवसाय आहेत. सातवाहन काळात कराड हे समृद्ध व्यापारी केंद्र होते. प्रतापसिंह महाराजांनी साहित्य प्रकाशित व्हावे यासाठी सातारा येथे एक छापखाना सुरू केला इंग्रजी सत्ता रूढ झाल्यावर स्वयंपूर्न अर्थव्यवस्थेचा ऱ्हास होण्यास प्रारंभ झाला. सन १८८७ मधरे पुणे–मिरज लोहमार्ग कार्यान्वित झाल्यावर पाश्चिमात्य पद्धतीची औद्योगिक संरचना उपलब्ध होण्यास प्रारंभ झाला. लोहमार्गाच्या सुविधाबरोबर मुंबई व पुण्याशी निकटचा संबंध आल्यामुळे या जिल्हयात उद्योग सुरू झाले.

सन १९३३ मध्ये सातारा येथे सातारा इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी सुरू होऊन वितरण सन १९३५ मध्ये सुरू झाले. सन सातारा नगरपालिकेने कास तलावातून बिडाचे नळ घालून विशिष्ट उंचीवरून पाणी खाली पडेल अशी व्यवस्था करून दिल्याने तेथे सातारा इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीने वीज निर्मिती सुरू केली. भारतातील हे पहिले लहान जलविद्युत केंद्र होय. पुढे १ फेब्रुवारी १९५७ रोजी मुंबई राज्य विद्युत मंडळाची स्थापना झाली. त्यात हे विद्युत केंद्र विलीन करण्यात आले.

खाद्यपदार्थामध्ये साखर, गूळ, खाद्य तेल, मिरची व मसाला पावडर, बेकरी, बिस्किट व गोळया, बर्फ, लोणची, दुग्धजन्य पदार्थ इत्यादी तयार करणाऱ्या कारखान्यांचा समावेश होतो. साताऱ्यासह संपूर्ण जिल्हयात याचे उत्पादन मोठया प्रमाणात घेतले जात होते.

सातारा शहरात उद्योगातंर्गत रासायनिक उद्योग, औषध उत्पादने, रबर, प्लॅस्टिक, पेट्रोलियम आणि दगडी कोळसा यापासून होणारे उत्पादन, अधातू खनिज पदाथ यामध्ये काच व काचेच्या वस्तूचे उत्पादन, मूलभूत व मिश्र धातू, धातूच्या वस्तू व सुटे भाग, यंत्रसामग्री, यांत्रिक अवजारे व सुटे भाग, छापखाने व सलग्न उद्योग, यंत्रमाग उद्योग, रेशीम कापड उद्योग, कुटीरोद्योग यामध्ये हातमाग, लोकर विणकाम, सुतारकाम, चर्मोद्योग, कुंभार उद्योग, बांबू वेतकाम, तांबे व पितळी भांडी, तेलघाणी हे प्रमुख कुटिरोद्योग होते.

सातारा नगरपरिषदेमार्फत शहरातील लोकांना पुरविलेल्या सुविधा त्यासाठी होणारा खर्च व त्या मोबदल्यात लोकांच्याकडून विविध मार्गाने जमा होणारे उत्पन्न हे खर्चाच्या तुलनेत कमी

होते. घरपट्टी, पथकर/गाडीकर, सार्वजनिक भंगीपट्टी, सार्वजनिक पाणीपट्टी, दिवाबत्ती कर व शिक्षण कर, कुत्र्यांवरील कर, करमणूक कर इत्यादी मार्गाने सातारा शहरास आर्थिक फायदा होत होता.

सातारा नगरपालिकेला अनेक लोकोपयोगी कामे व शहर स्वच्छ ठेवण्यासाठी तसेच लोकांना सोयीसुविधा पुरविण्यासाठी खर्च करावा लागत होता. नगरपालिकेचा सामान्य प्रशासन व वसुली खर्च, नगरपालिकेचा सार्वजनिक सुरक्षितता खर्च, नगरपालिकेचा सार्वजनिक आरोग्य व सोयीवरील खर्च, नगरपालिकेचा अंशदाने खर्च, नगरपालिकेचा इतर खर्च, नगरपालिकेचा असाधारण खर्च, नगरपालिकेचा शिक्षण खर्च, नगरपालिकेचा अग्निशमन खर्च, नगरपालिकेचा दिवाबत्ती खर्च, नगरपालिकेचा पाणीपुरवठा खर्च, नगरपालिकेचा सार्वजनिक तारतखाने व मुताऱ्यावरील खर्च, नगरपालिकेचा साफसफाई व सोयीवरील खर्च, नगरपालिकेचा जलनिःसारण खर्च, नगरपालिकेचा बांधकामावरील खर्च, सन १८८५–८६ मध्ये नगरपालिकेचा शिक्षण खर्च हा ७५० रूपये एवढे होता. तो पुढे वाढत जाऊन सन १९४६–१९४७ मध्ये ९०,१८६/–रूपये एवढा झाला होता. यावरून हे स्पष्ट होते की नगरपालिकेचा शिक्षण खर्च हा दरवर्षी उत्पनाच्या प्रमाणात वाढत गेला आहे. सन १८५३ साली एकूण खर्च ११,००० झालेला होता. पुढे त्यात वाढ होऊन तो दर दहा वर्षानी वाढत जाऊन १९२२–२३ साली ७,१४,३६० रूपये एवढा झालेला आहे तर सन १९४२–४३ मध्ये त्याच्यात मोठया प्रमाणात वाढ होऊन तो ३,०७,९०८/– रूपये एवढा झालेला आहे. असा खर्च वाढण्याचे कारण म्हणजे शहरातील वाढणारी लोकसंख्या हे होय. या वाढत्या लोकसंख्येला सोयी व सुविधा पुरविण्याकामी नगरपालिकेने लक्ष दिलेले दिसते. त्या सोयीमध्ये प्रामुख्याने रस्ते, शाळा, दवाखाने व इतर सुविधा यांचा समावेश झालेला होता.

सातारा शहराचा आर्थिक इतिहास पाहत असताना असे दिसून येते की, सन १८४८ पर्यत साताऱ्यातील व्यापार व संपत्तीत बरीच वाढ झाली होती. तरीही भूधारकांचा कर्जबाजारीपणा वाढलेला होता. परंतु साताऱ्याच्या राजाच्या नियमानुसार भूधारकांना संरक्षण मिळाले होते. त्यामुळे कर्जापोटी त्यांची जमीन सावकारास विकत घेता येत नसे. ब्रिटिश सत्तेच्या प्रस्थापनेनंतर १८४९ मध्ये सातारा प्रदेशाला राजकीय स्थिरता लाभली. दुष्काळी स्थितीशी मुकाबला करण्यासाठी या सरकारने काही उपाययोजना केल्या. तथापि इंग्रज सरकार

इंग्लडच्या आर्थिक स्वार्थाच्या मर्यादेत राहूनच उपाययोजना करीत असे. दुष्काळ निवारणार्थ उपाय होत असत. मात्र ते तत्कालिक होते.

सन १८७५–७६ व १८७६–७७ ही दोन्ही वर्षे आर्थिक स्थिती हलाखीची होती. यावेळी दख्खनच्या बऱ्याच भागात अवर्षण झाल्याने जनता इंग्रज सरकारविरूद्ध बंद करून उठली होती. अनेक ठिकाणी दंगे झाले होते. हा उद्रेक 'दख्खनचे दंगे' या नावाने प्रसिद्ध आहे. पुढील वर्षी खरीप व रबी हंगाम चांगले आल्याने आर्थिक स्थितीत थोडी सुधारणा झाली. पुढे सन १९०७–०८ मध्ये अपुरा व अनियमित पावसामुळे पिकांची आनेवारी सरासरीपेक्षा चार आणे कमी आली होती. कृषी विभागाने जिल्हयात भुईमूगाची विदेशी जातीची लागवड सुरू केली. शेतकऱ्यांना बी–बियाणे, पशुधन खरेदी व कृषी विकासासाठी वाढ केली. सन १९०९–१० मध्ये कापसाचा वाढत्या किंमतीमुळे त्याखालील क्षेत्रात वाढ झाली होती. अशीच परिस्थिती सन १९४७ पर्यत शेतीतील उत्पादनात कधी चढ तर कधी उत्पन्नच नाही अशी अवस्था झालेली दिसून येत होती.

महात्मा गांधीजीनी असहकार आंदोलन सुरू केले त्यावेळी स्वदेशी वस्तू बनविण्यावर भर देण्यात आलेला होता. त्यानुसार सातारा येथे खादी विणकरांना चांगले दिवस आले होते. काच उद्योग, आयात रेशिम प्रक्रिया उद्योग, लोकर विणणे, दोर तयार करणे इत्यादी कुटीरोद्योगही चांगल्या स्थितीत सुरू होते. पुढे कूपर कंपनी सुरू झाल्याने उद्योगात वाढ झाली होती. सन १९२५ ते १९२८ पर्यत शेती अर्थव्यवस्था चांगली नव्हती. उत्पादन कमी होऊनही शेतकऱ्यांच्या मालाला किमंत नव्हती. जागतिक आर्थिक मंदीचे वेध प्रत्यक्ष मंदी येण्यापूर्वीच लागलेले होते. हीच परिस्थिती पुढे सन १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीच्या वेळेस चालू राहिली होती.सन १९३७ ते ३९ दरम्यान कॉंग्रेस मंत्रिमंडळाने शेतसाऱ्यास सूट, ग्रामीण पाणीपुरवठा, कुटीरोद्योगास अर्थसहाय्य, कृषी विकास, ग्रामीण विकास व सहकारी चळवळीस मदत केल्याने जनतेस बराच दिलासा मिळाला होता. या पार्श्वभूमीवर या काळात शेती हंगाम समाधानकारक आल्यामुळे आर्थिक स्थिती बरी होती.

सप्टेबर १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाल्याने त्याचे अर्थव्यवस्थेवर मोठया प्रमाणावर परिणाम झालेले दिसून येतात. युद्धजन्य परिस्थिती व अमेरिका आणि रशियाच्या युद्धातील प्रवेशाने जागतिक बाजारपेठेमध्ये उत्साह निर्माण झाला. तथापि त्याचा भारतातील

व्यापारावर काहीही परिणाम झाला नाही. अन्नधान्याच्या किमंती वाढल्या परंतु कापूस व भुईमूगाच्या किमंतीत घट झाली. त्यामुळे शेतकऱ्याची आर्थिक स्थिती सुधारली नाही. ऑगस्ट १९४२ मध्ये सुरू झालेल्या 'छोडो भारत' आंदोलनामुळे राजकीय परिस्थितीत तणाव निर्माण होऊन जनजीवन विस्कळीत झाले. पिके सर्वसाधारण आली होती. 'अधिक धान्य पिकवा' या मोहिमेमुळे अन्नधान्याखालील क्षेत्र वाढून कापूस व भुईमूगाखाली क्षेत्र कमी झाल्याने व्यापारात मंदी आली होती.अधिक धान्य पिकवा मोहिमेमुळे एकूण लागवडीखालील क्षेत्र वाढून उत्पादनही वाढले. पण त्याचा फायदा शेतकऱ्यांना न मिळता महायुद्ध करणाऱ्या इंग्लडला मिळाला होते. सातारा येथील सर्व उद्योग सुरळीतपणे सुरू होते.

सातारा नगरपालिकेने वेगवेगळया बार्बीपासून मिळणारे उत्पन्न, जकात कर व शासकीय अनुदान हे सातारा शहरातील लोकांच्या शैक्षणिक व आरोग्य या नागरी सुविधा पुरविणेसाठी पैसा खर्च केला आहे. शहरातील रस्ते साफसफाई, बालवाडया, पिण्याचे पाणी, इत्यादी बाबीवर खर्च करून इतर नगरपालिकांना एक आदर्श घालून दिलेला आहे. विशेष म्हणजे सातारा नगरपालिकेचे उत्पन्नही जास्त होते. त्यामुळे त्याचा विनियोग सातारा नगरपालिका प्रशासनाने शहरातील लोकांना सर्व प्रकारच्या सुविधा पुरविण्यासाठी केलेला दिसून येतो.

सातारा शहरात विविध धर्माचे लोक राहतात. साताऱ्यातील सर्व धर्माचे लोक आपापले धार्मिक उत्सव, चालीरिती व परंपरा निष्ठेने पार पाडतात. सातारा शहरातील देवालये, मंदिरे, मशिदी, चर्च, अग्यारी यावरून शहरात सर्वच जातीचे लोक राहत होते, हे स्पष्ट होते. सातारा शहरास मराठयांच्या काळापासून ऐतिहासिक महत्त्व होते हे तेथे असलेल्या स्थळावरून समजते. त्यामुळेच सातारा शहर हे एक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे असलेले एक पर्यटन स्थळ समजले जात होते. त्यामुळे या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांच्या आधारे तत्कालीन सांस्कृतिक स्थितीची माहिती मिळते.

शिक्षण ही मानवी संकल्पना असल्यामुळे गतिमान करणे काळाची गरज आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. राष्ट्राच्या विकासासाठी व्यक्तिच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण आवश्यक आहे. शालेय शिक्षण म्हणजे शिक्षण, साक्षरता म्हणजे शिक्षण असा सर्वसाधारण समज प्रचलित असतो. परंतु शिक्षणाची व्याप्ती इतकी मर्यादित नाही. व्यक्ती

जन्मापासून अनेक माध्यमातून शिक्षण घेत असतो. यामध्ये कुटुंब, प्रसार माध्यमे, कीर्तने व प्रवचन इ. व्यक्तिच्या शिक्षणाची ही सहज प्रवृत्ती झाली. यातूनच ज्ञानाचा विस्तार झाला तसे हे समाजशिक्षण कमी पडू लागले. विशिष्ट उद्देश्य डोळयासमोर ठेवून व्यक्तिचे शिक्षण होणे गरजेचे झाले. त्यातूनच औपचारिक शिक्षण सुरू झाले.

सातारा शहरातील मंदिर वास्तूशिल्पशैली, मूर्तिकला, मशिदी व दर्गे, ऐतिहासिक वाडे व प्रासाद वास्तूशैली, भित्तिचित्रकला, सातारा व आसपासची धार्मिक व पर्यटन स्थळे यांनी सातारा शहराच्या सांस्कृतिक इतिहासात भर घातली आहे. याशिवाय सातारा शहरात जे सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात त्यातून तेथील सातारा शहराची सांस्कृतिक परंपरा कशी जोपासली जात आहे याबाबत माहिती मिळते.

सातारा शहरातील मंदिर वास्तूशिल्पामध्ये काही मंदिरे शिवकाळातील, काही छत्रपती शाहूरांजाच्या काळातील तर काही उत्तर पेशवाईतील आहेत. या मंदिरावरून त्या काळातील कला व संस्कृती यांची माहिती मिळण्यास मदत झाली आहे. वास्तूशास्त्रादृष्टया या मंदिराची मुळ रचना चौकोनी किंवा तारकाकृती आहे. शिखरे ही आयताकार व अष्टकोनीय आहेत. मराठयांच्या दक्षिण व उत्तर हिंदुस्थानातील संचार संपर्कातून इस्लामी व दक्षिणेकडील वास्तूंचे घटक मराठा मंदिराच्या वास्तूशैलीत समाविष्ट झालेले दिसतात.

सातारा शहरातील मंदिर वास्तूंच्या सर्वेक्षणातून असे स्पष्ट होते की, पेशवाईकाळात सातारा शहरात मंदिरांची बांधणी मोठया प्रमाणात झाली परंतु त्यांच्या बांधणीकडे कलात्मक दृष्टीने फारसे कोणी लक्ष दिलेले दिसत नाही. दगडांना खाचा पाडून ते एकमेकांत अडकवून मंदीर उभारणी केली आहे. त्यांना साधंण्यासाठी चुना किंवा तत्सम पदार्थाचा वापर न करता शिशांचा उपयोग केला आहे. तथापि स्तंभ व बाहेरच्या भिंती यावर नक्षीकाम किंवा कोरीव काम केलेले नाही. त्यामुळे या मंदिरातून शिल्पकलेचे जवळजवळ उच्चाटन झालेले दिसते. या मंदिरातील पाषाणमूर्ती हे तात्कालिन शिल्पकलेचे उल्लेखनीय नमुने आहेत. शिखरांच्या बांधकामात विटा व चुना यांचा भरपूर वापर केलेला आढळतो. काही मंदिराच्या शिखरावर चुनेगच्चीतील मूर्तिकाम आहे. या मूर्तिमध्ये सुबकपणा आहे. सर्व शिखरे वास्तूशास्त्राच्या दृष्टीने एकाच प्रकारची दिसत असली तरी ती एकसारख्या रचनेची नाहीत. त्यामध्ये विविधता आहे. ही कला यादव शैलीतून निर्माण झालेली असून त्यावर कोनाडयांची रचना केली आहे. त्या

कोनाडयात बसविलेल्या चुनेगच्चीतील मूर्तींनी शिखरांना उठावदारपणा आलेला आहे. शिखरावर दक्षिणेकडील गोपुरांच्या बांधणीतील आयताकार, अष्टकोनीय व अनेककोनीय रचनाप्रकार आढळतात. तसेच विजापूरच्या आदिलशहाच्या इस्लामी शैलीतील मनोरे, कमानी व घुमटाचा प्रभाव दिसतो. शिखरांच्या या कलात्मक बांधणीमुळे व त्यावरील मूर्तीकामामुळे मंदिरांच्या सांस्कृतिक कलेत भर पडली आहे. काही मंदिरांची शिखरावरील चुनेगच्चीतील सुबक प्रमाणबद्ध मूर्ती व शिखरांची कलात्मक रेखीव रचना यांनी मराठाकालीन कला जोपासण्याचे महत्त्वाचे कार्य तत्कालीन कलाकारांनी केले आहे. असा हा ऐतिहासिक वारसा जतन करणारी ही सातारा शहरातील प्रेक्षणीय मंदीरे आहेत.

सातारा शहरात हिदूंच्या मंदिराप्रमाणेच मुस्लिमांच्या दर्गे व मशिदी यांनीही मुस्लिम धर्माची संस्कृती जपण्याचे कार्य केले आहे. दर्गे व मशिदीमध्ये मुस्लिम धर्माचे लोक नमाजासाठी एकत्रा येत असतात. त्यातूनच या दोन्ही प्रकारच्या वास्तूंचे ऐतिहासिक दृष्टीने महत्त्व समजते. या दोन्ही प्रकारच्या वास्तू छत्रपती शाहू महाराजांच्या काळात बांधलेल्या असून तेव्हापासून या वास्तूंचे महत्त्व टिकून असलेले दिसते. या वास्तूमुळे मुस्लिम धर्माची एकता वाढण्यास व या धर्माच्या संस्कृतीचे संवर्धन होण्यास मदत झाली आहे. याद्वारे मुस्लिम परंपरा टिकून राहिली आहे.

शाहू महाराजांच्या काळापासून सातारा शहरात वाडयांच्या बांधकामास सुरूवात झाली होती. हे वाडे वेगवेगळे प्रकारचे असलेले दिसून येतात. या काळात वाडयांची आकारनिर्मिती, भक्कम पाया व इमारत बांधणी, सुक्ष्म कलाकुसर, प्रकाशाचे नियोजन ही वैशिष्टये दिसतात. वाडे हे सरदार, सरंजामदार व सावकार इत्यादीनी बांधलेले आहेत. यांचा उपयोग निवासस्थान, कार्यालय व अन्य दैनंदिन व्यवहारासाठी होत असे. वाडयाच्या छताचा आकार मेघडंबरी असे व हे त्या काळातील वास्तूशिल्पाचे मुख्य वैशिष्टये समजले जाते. या वाडयावरून पेशवेकाळातील शिल्पांचा उत्तम नमुना व वैशिष्टये दिसतात. या वाडयावरून पेशवेकाळातील वास्तूशिल्प व ऐतिहासिकदृष्टया महत्त्व समजते. वाडयाच्या रचना व बांधकामासाठी वापरलेल्या साहित्यावरून त्या काळातील राजकीय,सामाजिक, आर्थिक व धार्मिक परिस्थिती समजते.

सातारा शहरातील काही मंदिरे व वाडे यांच्यावरील भित्तिचित्रे ही अठराव्या शतकातील आहेत. ही भित्तिचित्रे प्रसंगानुसार काढलेली दिसतात. ती पौराणिक असून त्यात रामायण,

महाभारत, दशावतार व कृष्णलीला यामधील प्रसंग मोठया प्रमाणावर दाखविले आहेत. त्यामुळे यातून धार्मिक जीवनाचे दर्शन हिंदू समाजाला मिळते.

भित्तिचित्रांची निर्मिती ही प्रामुख्याने वास्तूच्या भिंती व छत यावर केलेली दिसते. वास्तूच्या भिन्न भागातील चित्रकामाची योजना करताना चित्रतलाची उपलब्धता, त्या जागेचे महत्त्व व रंगकामाचा परिणाम यांचा विचार केलेला आहे. त्यामुळे त्या चित्रांचा आकार, त्यांची व्याप्ती ही संबधित भिंत आणि छत यांच्याशी नेहमी सुबद्ध असेल अशाप्रकारे निश्चित केलेला आहे. सातारा शहरातील या भित्तीचित्रावरून त्या काळातील मराठी राज्याची सुबत्ता, धार्मिक परंपरा, समजूती, वेशभूषा, केशभूषा, राहणीमान, जीवनशैली व समाजजीवनाची माहिती मिळते. समजण्यास मदत होते.

सातारा शहर व परिसरातील धार्मिक स्थळांनी महाराष्ट्राच्या इतिहासात आपला ठसा उमटविलेला आहे. ही स्थळे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक कारणातून निर्माण झालेली आहेत. लोकांनी आपले अध्यात्म जपण्यासाठी या धार्मिक स्थळांना फार मोठया प्रमाणात महत्त्व होते हे स्पष्ट होते. पुराणातून आणि प्राचीन धर्मग्रंथातून वर्णन केलेली ही तीर्थस्थानं आजच्या काळातही आपल आध्यात्मिक महत्त्व टिकून आहेत. महाराष्ट्रामध्ये श्रद्धा आणि अध्यात्म यांना महत्त्वाचे स्थान आहे. विज्ञानामध्ये मोठया प्रमाणावर प्रगती झाली असतानादेखील नाशिक शहरातील सिंहस्थ कुंभमेळयास लाखो लोक येतात. यावरून तीर्थाचे महत्त्व आजही टिकून असल्याचे दिसते. धार्मिक स्थळामुळे जातीय ऐक्याचा पाया मजबूत करण्यास विशेष मदत होते.

सातारा शहर व परिसरातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांनी महाराष्ट्राच्या इतिहासात आपला ठसा उमटविलेला आहे. ही स्थळे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक कारणातून निर्माण झालेली आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासात या ऐतिहासिक स्थळांनी चांगली कामगिरी बजावली आहे. त्याच्या जोरावर छत्रपती शिवाजी महाराजांनी सातारा जिल्हयात स्वराज्याची स्थापना करून स्वराज्य विस्ताराचे धोरण अवलंबिले. त्यांना यश मिळवून देण्यासाठी येथील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांनी फार मोठे काम केले आहे.

छत्रपती शाहूच्या काळात सातारा ही मराठयांची राजधानी होती. पेशवे जरी पुण्यातून कारभार पाहत असले तरी ते सातारच्या छत्रपतीच्या सल्ल्याने पाहत होते. त्यांना पेशवाईची

वस्त्रे ही सातारच्या छत्रपतीकडून दिली जात होती. त्यामुळे सातारा शहरातील अदालतवाडा, रंग्महाल, जुना राजवाडा, नवा राजवाडा, छत्रीचा हौद व चार भिंती या ऐतिहासिक वस्तूमुळे सातारा शहरातील इतिहास जागृत होण्यास मदत होते. या वास्तू छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या काळापासून ते भारत स्वातंत्र्य होईपर्यंत बांधल्या गेलेल्या आहेत. या वास्तूमुळे सातारा शहराचा इतिहास समजतो.

सातारा शहराच्या आसपासच्या प्रेक्षणीय, ऐतिहासिक व धार्मिक स्थळांनी सातारा शहराचे सांस्कृतिकदृष्टया महत्त्व वाढविले आहे. यामध्ये यवतेश्वर, धावडशी, माहुली, पाटेश्वर व सज्जनगड या स्थळांनी सातारा शहराच्या राजकीय, सामाजिक, धामिक व सांस्कृतिक इतिहासात भर टाकली आहे. ही स्थळे प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळातील असल्याने त्यावेळच्या परिस्थितीचे, कलेचे ऐतिहासिकदृष्टया महत्त्व समजते. ही स्थळे सातारा शहराशी निगडीत असल्याने सातारा शहराचा सांस्कृतिक इतिहास समजण्यास मदत झाली आहे.

भारत देशात कला व संस्कृतीचा मोठा खजिना जागोजागी असलेला दिसतो. भारतावर वर्षानुवर्षे परकियांची आक्रमणे झाली होती. त्या आक्रमकांनी आपला देश लुटला होता. येथील कला व संस्कृतीचा विंध्वस केला, येथील वास्तू व प्रार्थनास्थळे उध्वस्त केली तरीही त्यातून जे शिल्लक राहीले, ते ही महत्त्वपूर्ण आहे. उलट त्यामध्ये जित व जेत्यांचा कला व संस्कृतीचा संगम होऊन नवीन कलाविष्कार निर्माण झालेला दिसतो. त्याचे प्रत्यतंर देणारी अनेक सुप्रसिद्ध ठिकाणे या देशात आहेत. आपल्या महाराष्ट्रात पुणे, नाशिक व पैठण अशी अनेक प्राचीन व मध्ययुगीन गावे कला व संस्कृतीने परिपूर्ण आहेत. ही शहरे निसर्गरम्य, सांस्कृतिकदृष्टया कलासंपन्न होती. त्याचप्रमाणे सातारा शहरामध्येही ज्ञान, कला व संस्कृती यांचा संगम झालेला आहे. मध्ययुगीन काळापासून अनेक प्रतिभावंताना या शहराचे आकर्षण वाटत आले आहे. सातारा शहरास डोंगरदऱ्यानी वेढलेले असून शहराजवळ कृष्णा व वेण्णा नद्यांचा संगम झालेला आहे. या संगमावर अनेक मंदिरे आहेत.

सातारा शहरातील लोकांनी धर्म, ज्ञान, कला, संस्कृतीचा वारसा टिकवून ठेवलेला दिसतो. हर्बट रीड या सुप्रसिद्ध इंग्रज लेखकाने प्राचीन व मध्ययुगीन भारतासंबधात असे लिहीले आहे की, भारतीय ज्ञान, कला व संस्कृती ही येथील जीवनाचा एक अविभाज्य घटक होती. त्याचे प्रत्यतंर सातारा शहरात अनुभवता येते. यावरून सातारा शहाराचे सांस्कृतिक

इतिहासाचे महत्त्व दिसून येते.

सातारा शहरास राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे या क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक मान्यवरांनी भेटी दिलेल्या आहेत. त्यामध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी सातारा शहरास सन १९१६ मध्ये भेट दिली. महात्मा गांधीजीनी १९२० मध्ये सातारा शहरास भेट दिली होती. २० नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे सरसेनापती जनरल करिअप्पा यांनी सातारा शहरास भेट दिली. १० ऑक्टोबर १९५९ रोजी काँग्रेस अध्यक्षा श्रीमती इंदिरा गांधी यांनी भेट दिली होती. त्यावेळी त्यांच्यासोबत अर्थमंत्री व्यंकटरमण, राष्ट्रपती संजीव रेड्डी हे होते. २६ डिंसेबर १९८८ रोजी भारताचे उपराष्ट्रपती शंकर दयाळ शर्मा, महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री राम मेघे, विधान सभेचे अध्यक्ष शंकरराव जगताप, खासदार प्रतापराव भोसले इत्यादी वरिष्ठ नेत्यांनी भेटी दिल्या व त्यांनी सातरा शहराबद्दल गौरवोद्गार काढले आहेत. यावरूनच सातारा शहराचे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व दिसून येते. सातारा शहराने महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक चळवळीत फार मोठी कामगिरी केली आहे. त्यामुळे सातारा शहराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

# संदर्भ ग्रंथसूची

## अ) प्राथमिक साधने

### इंग्रजी (अप्रकाशित)

### Bombay Archival, Mumbai


1) Home Department(Special), weekly Report, File No. C/83, 9th August 1934

2) Home Department, Special Branch, File No. 1020(5) 8 (13), 1941

3) Bombay Archival Dept. Bombay, Political Department, 1857, Vol.26(II)

4) Bombay Legisltative Council Debates, 1921.

5) Report On The Administration Of the Bombay Presidency, 1911-12

6) Report On The Administration Of the Bombay Presidency, 1923-24

7) Statistical Atlas, Of Bombay State(Provisnal) Part, 1925

8) Statistical Atlas, Of Bombay State, 1950


### मराठी (अप्रकाशित)


१) जिल्हा आरोग्य अधिकारी, सातारा यांचेकडून मिळालेल्या माहितीनुसार.

२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था सातारा

३) नगरपालिका मराठी शाळा नं.१, ३, ७, ८, १०, ११, १२, १४, १६, १७, २०, २४ चे रेकॉर्ड

४) पुणे पुराभिलेखागार, प्रतापसिंह महाराजांची रोजनिशी क्र.३,

५) पुणे पुराभिलेखागार, प्रतापसिंह महाराजांची रोजनिशी क्र.६, तारीख २७.११.१८२२

६) महाराष्ट्र कृषि सांख्यिकीयविषयक जिल्हावार माहिती, भाग २, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, १९४१–४२

७) महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, १९४१–४२

८) महाराष्ट्र राज्य, पशुधन जनगणना अहवाल सन १८८२–८३

९) महाराष्ट्र राज्य, पशुधन जनगणना अहवाल सन १९००–१९०१ ते १९३९–४०

१०) महाव्यवस्थापक, सातारा जिल्हा उद्योग केंद्र यांच्याकडून मिळविलेल्या माहितीनुसार

११) रयत शिक्षण संस्था, वार्षिक अहवाल, सातारा, १९८२–८३

१२) शिक्षणावर दृष्टिक्षेप, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे, १९९५–९६

१३) शाहू दप्तर, अ सिरीज २६२०० ते २६२१०, ३८५२०

१४) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १८५३–१९८०, जमाखर्च अंदाज पत्रक

१५) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, १९३८–८०, जमाखर्च अंदाज पत्रक,

१६) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, ठराव नं ३, दि. २४ ऑगस्ट १८८३

१७) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडींग बुक, ठराव ६, १८ जुलै १९३३

१८) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.९, दि.१४ सप्टेंबर १९४८

१९) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं. ४, विषय नं.४, दि.३० सप्टेबर १९२७

२०) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक, ठराव नं.६, विषय नं.६, दि.२५ ऑगस्ट १९४४

२१) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, ठराव नं.३, दि.१२ फेब्रुवारी १९३४

२२) सातारा नगरपालिका, जनरल प्रोसिंडींग बुक, ठराव नं.४, दि.११ जुलै १९४२

२३) सातारा नगरपालिका वार्षिक अहवाल, १९०३–०४ ते १९४६–४७ संबंधित वर्ष

२४) सातारा जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ, १९८१, सातारा जिल्हा

**इंग्रजी (प्रकाशित)**

1) Banking Statistics, Basic Statistical Returns, Vol.20, Reserve Bank Of India, March 1991

2) Chaudhari K.K.(Ed.), Source Material for a History of the Freedom Movement in India(1818-1885) Vol.I Government Central Press, Bombay, 1889

3) Chaudhari K.K.(Ed.), Source Material for a History of the Freedom Movement in India(1885-1920) Vol.II Government Central Press, Bombay, 1923

4) Chaudhari K.K., History of Bombay : Modern period
5) Censes Of India 1991, Series 14 Maharashtra, Port 4(B)(2) Religion Table C 9
6) Censes Of India, 1961,Vol.10, Part 7-C, Maharashtra.
7) Census of India – 2001
8) District Municipal Act.1884
9) Gazetteer of the Bombay Presidency, Satara, Government Central Press, Bombay, 1963
10) Gazetteer of the Bombay Presidency, Satara, Government Central Press, Bombay, 1885
11) Imperial Census and Census of India 1872 to 1941
12) Ogilvy T., Memoir of Satara Territory – Selection from the Record of Bombay Government, Vol.XLI, (New Series), Bombay 1857
13) Satara District Supplementary, 1904
14) Satara District Supplementary, 1926

## मराठी (प्रकाशित)

१) कराड नगरपालिका, शतसांवत्सारिक स्मृति ग्रंथ, १८५५–१९५५
२) काळे विकास, लेखमानपूरचे राष्ट्रकूट नृपती अविधेय यांचा वळई ताम्रपट, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद कोल्हापूर, अधिवेशन बारावे, कोल्हापूर, २००७,
३) कॅनिंगहॅम, स्टुप ऑफ भारहूत, लेख क्र.१३५, १३८, १३९
४) जोशी महादेवशास्त्री(संपा.) भारतीय संस्कृतिकोशखंड ३, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, १९६५
५) डॉ.कुंटे भ.ग.(संपा.), स्वातंत्र्य चरित्रकोश, महाराष्ट्र राज्य पश्चिम विभाग, खंड ३, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८०, पृ.१९५
६) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९६७
७) रायगड जिल्हा गॅझेटियर १९९३, पृ.२२०, २२१

८) सातारा जिल्हा जनगणना अहवाल, १९४१

९) संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल, २००४–०५

१०) सातारा नगरपालिका वार्षिक अहवाल जमाखर्च १९४९–५०

११) सातारा नगरपालिका जमाखर्च अंदाजपत्रक १९७२–७३

१२) सातारा नगरपालिका वार्षिक अहवाल १९०३–०४

**एम.फिल. व पीएच.डी.(अप्रकाशित प्रबंध)**

१) प्रा. ओवाळे दत्तात्रय जयसिंग, मध्ये ‘श्री.छत्रपती शिवाजी संग्रहालय, सातारा : एक चिकित्सक अभ्यास (१६००–१९००)’, एम.फिल. शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०११

२) भोसले एस.एच., सातारा जिल्हयातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा– एक चिकित्सक अभ्यास(१६००ते १९००), एम.फिल.शोधप्रबंध, टि.म.वि.पुणे, ऑक्टोबर २००८,

३) दिसले नलिनी, सातारा शहराचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास(सन १९०० ते १९४७), एम.फिल. शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, जून २००५

४) प्रा. जाधव विनायक शंकर, ‘छत्रपती प्रतापसिंह महाराज आणि सातारा(१८०८–१८३९)’ एम.फिल. शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, जून १९८६

५) काळे व्ही.सी., सातारा जिल्हयातील मराठयांचे मराठा स्वातंत्र्ययुद्धातील ऐतिहासिक महत्त्व, (१६८९–१७०७) एम.फिल. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, जुलै २००८.

६) डॉ.अरूण भोसले, सातारा जिल्हयातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास(१८८५–१९४७), पीएच.डी. शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, १९७८

## ब) दुय्यम साधने

## इंग्रजी साधने

1) Ballhatchet Kenneth, Social Policy & Social Change in Western India(1817 to 1830), London, 1957

2) Basu B.D. Story of Satara, Bombay¸ 1963

3) Bhatia B.M., Famis In India, 1963

4) Colebrooke T.E., Life of the Mountstuart Elphinstone, London, 1884

5) Deglurkar G.B., Temple Architechar and Culture of Maharashtra, Nagpur University, Nagpur, 1974

6) Gail Aamvate, Cultural Revolt in a Kalonial society, Scintific Socilist Education Trust, Bombay, 1976.

7) Joshi P.M., The Adilshahi And The Baridi, History of Medival Deccan (1295-1724), Vol.1

8) Joshi P.M.,The Adilshahi and the baridi, History of medival Deccan (1295-1724), Vol.I

9) Kulkarni A.R.,The Maratha's, History of Medival Deccan, Vol.I, 1989

10) Kulkarni G.T., The Mughal-Maratha Relations: Twenty Five Faitful Years(1682-1707), Pune, 1983

11) Malik A.C., Stone Age Industries of The Bombay and Satara, Badoda, 1959 .

12) Ramesh K.V., Chalukya of Watapi, Agamkala Publication Delhi, 1984.

13) Richard Cashman, The Mith Of The Lokmanya: Tilak And Mas Politics In Maharashtra,1922

14) Sardesai G.S. New History of the Maratha's, Vol. 1, Dhavl Publication, Mumbai, 1971

15) Sardesai G.S.(Ed.), Selection from the Peshwa Daptar, Vol.42, Government Press, Mumbai, 1934

16) Sawloman S., Crops Of the Bombay State : Their Cultivation and Statistics, 1953

17) Sharma N.P., Local Self Government in India, Hind kitab Ltd. Mumbai, 1974.

18) Thakur B.K., Indian Administration to the Down of the Responsible Government

## मराठी साधने


१) अक्कलकोट सतीश, दुर्ग, सहयाद्री दुर्गभ्रमण मंडळ सांगली, नोव्हेंबर २००९

२) अभ्यंकर रा. वि., महाराष्ट्रातील शक्तिस्थाने, आमोद प्रकाशन मुंबई, प्रथमावृत्ती २००६

३) आपटे द.वि., दिवेकर स.म.(संपा.) शिवचरित्र प्रदिप, शिवापूर दप्तर यादी, पुणे, १९२५

४) आठल्ये वा.वि., आत्मवृत्त, डॉ. आठल्ये ग्रंथप्रकाशन समिती सातारा, १९५८, पृ.३३

५) आत्रे त्रिंबक नारायण, गांवगाडा, नाग नालंदा प्रकाशन, इस्लामपूर, १७ सप्टेंबर २०११

६) उपाख्य महादेव चिंतामण, बहुलेकर बाळासाहेब, आपला सातारा, मावळा प्रकाशन, सातारा, ६ मार्च १९९४

७) कठारे अ.मु., 'मराठेकालीन सरकारी अधिकारी आणि त्यांचे गैरवर्तन', पुणे, १९९५

८) कर्वे इरावती, मराठी लोकांची संस्कृती, आर. जे. देशमुख प्रकाशन, पुणे, १९६२

९) कणगली एस.एम., पुण्याचा माहितीगार, १९४९

१०) काळे मुकुंद, इतिहासाचे साक्षीदार–मराठेकलीन सांस्कृतिक वैभवाचा मागोवा, मनोविकास प्रकाशन, २०११

११) काळे–पाटसकर भाग्यश्री, महाराष्ट्राची मंदिरशैली, डायमंड पब्लिकेशन, पुणे, नोव्हेंबर २००९

१२) काळदाते सुधा, भारतीय समाजरचना, भारत मुद्रक, औरंगाबाद, १९७६

१३) कायंदे पाटील गंगाधर वि., यशवतंराव चव्हाण, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक, २०००

१४) किंकडे आणि पारसनिस, 'हिस्ट्री ऑफ मराठा पिपल', खंड–२, १९२२

१५) कुलकर्णी अ.रा. व ग.ह.खरे(संपा), 'मराठयांचा इतिहास', खंड–२, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८५,

१६) कुलकर्णी अ.रा. व ग.ह.खरे(संपा), 'मराठयांचा इतिहास', खंड–३, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे १९८६

१७) कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र, मराठयांचा इतिहास, खंड १, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९८४

१८) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह., मराठयांचा इतिहास खंड–२, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८५

१९) केपन डेव्हीड, मराठयांची बखर (ग्रँट डफच्या हिस्टरी ऑफ दि मराठाज चे भाषांतर) भारत संशोधन मंडळ, पुणे, १९८५

२०) केळकर न.चि., गतगोष्टी, आर्यभूषण छापखाना, पुणे, १९७८

२१) कोठेकर शांता व वैद्य सुमन, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, १९९३ मुंबई

२२) कंटक प्रेमा, सत्याग्रही महाराष्ट्र, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला पुणे, ऑक्टोबर १९४०

२३) गरूड आप्पासाहेब व सावंत बी.बी., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, १९९३

२४) गर्गे स.मा., छत्रपतींची धाकटी पाती, मराठयांचा इतिहास, खंड-२, गो.य.राणे, प्रकाशन, १९८५

२५) गर्गे स.मा.(संपा.), मराठी रियासत, खंड-३, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९१

२६) गर्गे स.मा.(संपा.), मराठी रियासत गो.स.सरदेसाई खंड ५वा. पॉप्युलर प्रकाशन, १९९०

२७) गर्गे स.मा., करवीर रियासत, गो.य.राणे प्रकाशन जानेवारी १९६८.

२८) गर्गे स.मा., छत्रपतींची धाकटी पाती, मराठयांचा इतिहास, खंड-२, १९८५

३९) गायकवाड आर.डी. व इतर, शिवाजी महाराजांचे सहा किल्ले, प्रा.सौ.डॉ.हेमलता रामचंद्र गायकवाड प्रकाशक सातारा, फेब्रुवारी २००९

३०) गायकवाड, हणमाने व सरदेसाई, इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन कोल्हापूर, २०००

३१) गोविलकर मोहन (प्रकाशक), आधुनिक भारत, १९९५

३२) गोसावी र.रा., पाच भक्तिसंप्रदाय, प्रतिमा प्रकाशन, तृतीय आवृत्ती पुणे- २००८

३३) गोखले कमल, छत्रपती संभाजी, मराठयांचा इतिहास, खंड १, ज्ञान-विज्ञान विकास मंडळ, पुणे, १९७१

३४) गोखले पु.पा. जागृत सातारा, लोकसेवा संघ प्रकाशन, सातारा, १९३५

३५) ग्रोवर बी.एल., आधुनिक भारताचा इतिहास, एस.चंद आणि कंपनी लि.,नवी दिल्ली, २००३

३६) घाणेकर प्र.के., इथे महाराष्ट्र देशी, स्नेहल प्रकाशन, पुणे १९९४

३७) घाणेकर प्र.के., साद सहयाद्रीची भटकंती किल्ल्यांची, स्नेहल प्रकाशन, पुणे १९९६
३८) चव्हाण यशवंतराव, कृष्णाकाठ, खंड पहिला, प्रेस्टिज प्रकाशन, पुणे, नवी आवृत्ती, १९८७
३९) चौधरी कि.का., धर्मनिरपेक्षता आणि कर्मवीर, लोकराज्य, १ जुलै १९८७
४०) चव्हाण यशवंतराव, चव्हाण यशवंतराव, कृष्णाकाठ, खंड पहिला, प्रेस्टिज प्रकाशन, पुणे, नवी आवृत्ती, १९८७
४१) चव्हाण रामनाथ, जाती आणि जमाती, १९८२
४२) श्री. छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, सातारा यांची मार्गदर्शक पुस्तिका
४३) जोशी नि.पु., भारतीय मूर्तीशास्त्रे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, १९७९
४४) जोशी प्र.न., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, स्नेहवर्धन प्रकाशन, पहिली आवृत्ती पुणे, २००२
४५) जोशी श.ना., शिवकालीन पत्रसारस १९) जोशी सु.ह. महाराष्ट्र दर्शन, समाजदर्शन, पुणे १९८६
४६) ठाकरे केशव सिताराम (प्रबोधनकार), छत्रपती प्रतापसिंह आणि रंगो बापूजी, म.रा.साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९४८
४७) दारूवाला महंमदमियाँ, आपली प्राचीन वाई, दारूवाला मजहर हुसेन प्रकाशन, वाई, २००१
४८) दाते य. रा. (संपा.), मराठी शब्दकोश, विभाग तिसरा, १९३४,
४९) देव शा. भा. महाराष्ट्र एक पुरातत्त्वीय समालोचन, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय दादर मुंबई, १९६८
५०) देशमुख रा.नी., आपला सातारा जिल्हा, कल्पना प्रकाशन, २०११
५१) देशपांडे महेश, साताऱ्याच्या परिसरात, लोकव्रत प्रकाशन, सातारा, ७ ऑगस्ट २०११
५२) देशपांडे सु.र., वाई: कला आणि संस्कृती, आस्था, पर्यावरण मैत्री संस्था, वाई, २०११,
५३) देव शा. भा. महाराष्ट्र एक पुरातत्त्वीय समालोचन, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय दादर मुंबई, १९६८

५४) नाईकनवरे विश्वास, महाराष्ट्रभूषण यशवंतराव चव्हाण, (महाराष्ट्र चरित्र ग्रंथमाला संच), श्री गंधर्व प्रकाशन, २०१०

५५) पगडी सेतू माधवराव(संपा.), 'मोगल दरबारातील बातमीपत्रे', खंड २, महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९८३

५६) पवार जयसिंगराव, 'महाराणी ताराबाई', मराठयांचा इतिहास, खंड १, १९८४

५७) पगडी सेतूमाधव(संपा.), मोगल आणि मराठे(तारिखे दिल्कुशा), ग.ल.ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६३

५८) पगडी सेतू माधवराव(संपा.), 'मोगल दरबारातील बातमीपत्रे', खंड– २, महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९८३

५९) पगडी सेतू माधवराव(संपा.), मराठे व औरंगजेब, ज्ञानराज प्रकाशन, पुणे, १९६३,

६०) पगडी सेतू माधवराव, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, ज्ञानराज प्रकाशन, पुणे, १९६६,

६१) पाटणे संभाजीराव, स्वातंत्र्य संग्रामातील सातारा जिल्हा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सवी समिती सातारा, १९९२

६२) पवार आ.ग., 'स्टडिज इन मराठा हिस्ट्री', शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७१

६३) प्रधान ग.प्र., स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत, साधना प्रकाशन, पुणे, १९६९

६४) पाटणकर भारत, खेडयातील गरीबांची झुंज, संपादीत क्रांतिसिंह मुक्त व्यासपीठ, विटा

६५) पाटील मदन, छत्रपती प्रतापसिंह , श्री स्वामी पब्लिकेशन, पुणे, २००४

६६) पानसे मु.ग., यादवकालीन महाराष्ट्र, मुंबई, १९६३,

६७) फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १, विद्या प्रकाशन, पुणे, १९८९

६८) बहुलेकर बाळासाहेब, आपला सातारा, मावळा प्रकाशन, सातारा, ६ मार्च १९९४

६९) भावे विनायक लक्ष्मण, मराठी दफ्तर(रूमाल दुसरा), मराठी दफ्तर संस्था ठाणे, १९२२

७०) भावे वा.कृ. पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन पुणे,१९९८

७१) भावे विनायक लक्ष्मण, मराठी दफ्तर(रूमाल पहिला), मराठी दफ्तर संस्था ठाणे, १९१७

७२) भिडे व्ही.जी., सातारचे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज व प्रतिनिधी आणि अष्टप्रधान यांचा इतिहास, भोर, १८६६

७३) माटे गो.रा., असा घडला जिल्हा सातारा, महाराष्ट्र मित्र, मुद्रणालय, सातारा, १९८८

७४) मंत्री रमेश, सुंदर सातारा, अनुभव प्रकाशन, मुंबई, १९८६

७५) माटे गो.रा., असा घडला जिल्हा सातारा, महाराष्ट्र मित्र मुद्रणालय, सातारा, जानेवारी १९८८

७६) मिराशी वा.वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ, नागपूर, १९५७, पृ.८३

७७) राजवाडे वि.का., मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड १८, मुंबई, १९१४, क्र.४६

७८) राणे.र.गो., छत्रपती प्रतापसिंह महाराजांचे चरित्र, भाग १, सातारा, १९२९(सुधारित आवृत्ती २०११) वैशाली प्रकाशन पुणे, २०११

७९) लाड अप्पासाहेब व पाटील उत्तमराव, क्रांतिवीर नाना पाटील, १९८९

८०) लांजेकर रू.ज., सातारा जिल्हयातील प्रेक्षणीय स्थळे, १९९३

८१) लेले वि.ग., शिवशाहीचा अस्त, मंगल साहित्य प्रकाशन, पुणे, १९४८

८२) शेणोलीकर ह.श्री.व देशपांडे प्र.न., महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९७३

८३) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड ३, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, १९८७,

८४) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड ४, गव्ह.सेंट्रल प्रेस मुंबई, १९८८

८५) सचिव(संपा.), नगर विकास आघाडी, सातारा 'आपला सातारा विकास आणि संकल्प', सातारा

८६) सरदेसाई गो.स., मराठी रियासत-खंड२ : स्थिरबुद्धी राजाराम, पॉप्युलर प्रकाशन, १९२६

८७) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड १, पॉप्युलर प्रकाशन, पुणे,१९८८

८८) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड ८, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९१

८९) सरदेसाई गो.स., मराठी रियसत खंड १, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८८

९०) सासवडकर प्र.ल., श्री ब्रम्हेंद्रस्वामी धावडशीकर, १९८५,

९१) साळुंखे गणपतराव, असा घडला सातारा, संजीवन पब्लिकेशन्स, सातारा, १ ऑगस्ट, २०१२

९२) हेवाडकर र.वि.(संपा.), थोरले शाहू महाराज यांचे चरित्र(चिटणिसकृत), पुणे, १९७६

## स्मरणिका

१) चव्हाण शिवाजी, सातारा जिल्हयाचा सांस्कृतिक आकृतीबंध सातारा जिल्हा परिषद गौरव गाथा रौप्यमहोत्सवी अंक सातारा, १९८७

२) पाटणे संभाजीराव, अंजिक्यताऱ्यावरून, अंजिक्य, ६६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सातारा, १९६३

३) रयत शिक्षण संस्था, वार्षिक अहवाल, सातारा, १९८२–८३,

४) सातारा नगरपालिका शिक्षण मंडळ, स्मरणिका, २००४

५) सचिव नगरविकास आघाडी सातारा(संपा.), आपला सातारा विकास आणि संकल्प, सातारा, २००१

६) सातारा शहर नगरपालिका, शताब्दि महोत्सव स्मृतिग्रंथ, सप्तर्षि आमची शाहुनगरी, प्रजासत्ताक दिन, २६ जानेवारी १९५४

७) संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अहवाल, २००४–२००५

## मासिके, त्रैमासिके, नियतकालिके

१) कोष्टी प्रभाकर, शैक्षणिक वाटचाल, सातारा जिल्हा परिषद गौरवगाथा, रौप्य महोत्सवी विशेषांक, १९९५

२) बेंद्रे वा.सी., राणी येसूबाई साहेब, भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, जुलै १९६४,

३) जोशी वा.वि., सातारा शहरासंबंधी काही जुनी माहिती, भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, एप्रिल १९७३

४) जोशी वा.वि., सातारा शहरासंबंधी काही जुनी माहिती, भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, एप्रिल १९७३

५) केळकर य. न., रामशास्त्री प्रभुणे, भारतीय इतिहास आणि संस्कृती, एप्रिल १९९६,

६) पाटणे संभाजीराव, अजिंक्यताऱ्यावरून, अजिंक्य, ६६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सातारा, १९६३

७) कुरूंदकर नरहर, साधना, शिवराज्याभिषेक त्रिशताब्दी विशेषांक, जून १९७४,

८) भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक मुंबई

९) भारत इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक, पुणे

१०) राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक, धुळे.

## वर्तमानपत्रे

१) सपकाळ सुभाष, निसर्गरम्य क्षेत्र यवतेश्वर, दैनिक ऐक्य सातारा, १० ऑगस्ट १९९२

२) दै. तरूण भारत, सातारा

३) लोकराज्य, १९३२


४) दै. केसरी, ६ डिसेंबर १९२१

५) दैनिक लोकसत्ता, लोकरंग पुरवणी, १२ एप्रिल २००९

६) दै. पुढारी, सातारा आवृत्ती, ७६ वा वर्धापनदिन विशेषांक पुरवणी अंक, १३ जानेवारी २०१५

## (परिशिष्ट- १)अजिंक्यतारा (सातारा) किल्ल्यावरील शिलालेख






या लेखाचा अर्थ

१) ऐश्वर्य तुझ्या दारांतून तोंड दाखवीत आहे.

२) तुं विवंचना दूर होण्याचें स्थान युक्त-

आहेस, परंतू पुन्हां विवंचना युक्त आहेस.

३) तुझ्यापासून सर्व विवंचना दूर होतात.

४) हिंमत त्याच्या (रेहानच्या) कामामुळें-

सर्व फुलांना प्रफुल्लित करीत आहे.

(परिशिष्ट- २)




छत्रपती शाहू महाराज (थोरले)

(संभाजी महाराजांचे पुत्र)

यांचे समाधी स्थळ


जन्म - १६ मे १६८२ मृत्यू - १५ डिसेंबर १७४९

राज्याभिषेक - १२ जानेवारी १७०८

ही समाधी सातारा (माहूली) येथे कृष्णा व वेण्णा नदीच्या संगमावर आहे.

(परिशिष्ट- ३)

## कृष्णेश्वर मंदिराच्या खांबावरील शिलालेख



**कृष्णेश्वर मंदिराच्या खांबावरील शिलालेख**

श्रीकृष्णेश्वर मंदिर पहिल्या बाजीराव पेशव्याचे मामा कृष्णाजी चासकर यांनी बांधले आहे. ते सातारा शहराच्या पश्चिम टोकास यवतेश्वराच्या पायथ्याशी शके १६४५ (२७ जानेवारी १७२४) मध्ये बांधले आहे. तेंव्हा या भागास सदाशिवपुरा असे नाव होते. हे मंदिर बांधल्यावर पाच वर्षांनी व्यंकटराव घोरपडे या भागात वाडा बांधून राहू लागले. तेव्हापासून यास व्यंकटपुरा नाव प्राप्त झाले. या देवालयात गाभाऱ्याच्या बाहेरील दगडी स्तंभावर खालील शिलालेख आहे.

"श्रीकृष्णेश्वरं नामक पशुपतेलिंग शिव नार्मर्द

ज्योतिर्वित्कुलदीपकृष्णजमहादेवेत स्थंस्थापित ।

स श्रीशाहुनृपात्सदाशिव इति प्राप्यभिधानं नव्रं


लिंगाग्रां कृतवान्सदाशिवपुरीमित्युचिवान, चास्कर : ।।

शके १६४५ शोभंकृत संवत्सेर, माघ शु।। त्रयोदशी सोमः ।

कृष्णाजी जनार्दनपंत."

# (परिशिष्ट- ४)

## चारभिंती येथील वास्तुवैशिष्टये सांगणारा शिलालेख










(रंगो बापूजी गुप्ते यांचे चारभिंती वास्तुवरील स्मारक)

(झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या विषयी माहिती देणारा शिलालेख)

३२७

(परिशिष्ट- ५)



**फाशीचा वड स्मारक**

सातारा शहरात शाहूपुरी रस्त्यावर स्वातंत्र्य लढयातील घटनांचा साक्षीदार म्हणून एक स्तंभ उभारला आहे. त्यास फाशीचा वड असे म्हटले जाते. ८ सप्टेबर १८५७ रोजी सातारा येथे १७ क्रांतिवीरांना ठार मारण्यात आले.

**या क्रांतिकारकामध्ये सातारा शहरातील गेंडा माळावर फाशी देण्यात आलेले**

१) श्री. नारायण(नाना) बापू पावसकर(सोनार), २) केशव नीलकंठ चित्रे, ३)शिवराम मोरेश्वर (बहुश्रुत) कुलकर्णी, ४) विठ्ठल कोंडी (तात्या) वाकणीस, ५) सीताराम रंगो गुप्ते इ.


**तोफेच्या तोंडी दिलले क्रांतिकारक**

१) मुनाजी उर्फ बापू(नारायण) बाबर उर्द भांदिर्गे, २) सखाराम बळवंत शेट्ये(चव्हाण), ३) बाब्या नाथ्या गायकवाड, ४) येशा नाथ्या गायकवाड, ५) गणेश सखाराम कारखानीस ६) नाना उमाजी रामोशी(मुडके) इ. चा समावेश होता.

**इंग्रज अधिकाऱ्यांनी समोरासमोर गोळया घालून ठार केलेले क्रांतिकारक**

१) रामजी बापूजी उर्फ रामसिंग चव्हाण, २) बाब्या हणंगू शिरतोडे, ३)नाम्या नाईक चव्हाण, ४) शिवाजी सोमाजी पाटोळे, ५) पर्वती विठोबा सांळुखे,६) पाटलू येसू घाडगे यांचा समावेश होता.

(परिशिष्ट- ६)



**सातारा शहरातील ग्रँट डफ या पोलिटिकल एजंटचे घर**

या घरात ग्रँट डफ इ.स.१८१८ ते १८२२ या काळात राहिलेले होते. आज या घरात शहा फरशीवाले हे राहत असून त्यांनी या घराची डागडुजी करून बदल केलेला आहे.


## (परिशिष्ट- ७)




नेताजी सुभाषचंद्र बोस चौकातील हुतात्मा स्मारक

हे हुतात्मा स्मारक भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झालेल्या स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेल्या बलिदानाच्या स्मृती-प्रित्यर्थ उभारण्यात आलेले आहे. या स्वातंत्र्यसैनिकाची किंवा हुतात्म्यांची सविस्तर माहिती या स्मारकावर कोरण्यात आलेली आहे . ती माहिती पुढीलप्रमाणे आहे.


१) हुतात्मा रंगो बापूजी गुप्ते, २) हुतात्मा सीताराम रंगो गुप्ते, ३) हुतात्मा बावरीया नथय्या गायकवाड, ४) हुतात्मा यशवंत नथू गायकवाड, ५) हुतात्मा पाटलू येसू घाडगे, ६) हुतात्मा बावू शिरतोडे, ७) हुतात्मा गणेश सखाराम कारखानीस, ८) हुतात्मा केशव निळकंठ उर्फ आण्णा चित्रे, ९) हुतात्मा हैबतराजे महाडीक, १०) हुतात्मा शिवराम मोरे, ११) हुतात्मा नाना मुडके, १२) हुतात्मा मुनाजी बापू, १३) हुतात्मा शिवा सोमाजी पाटोळे, १४) हुतात्मा नारायण बापू पावसकर(सोनार), १५) हुतात्मा पर्वती सांळुखे, १६) नारायण विश्वनाथ शेंडे, १७) हुतात्मा अंबाजी राजे शिर्के, १८) हुतात्मा चंपाबाई बन्सीलाल भट्टड, १९) हुतात्मा पुरूषोत्तम उर्फ तानाजी बाळकृष्ण पेंढारकर इत्यादी हुतात्म्यांनी इ.स.१८५७ च्या बंडात सहभागी होऊन हौतात्म्य पत्करले होते. त्यांच्या या हौतात्म्याचे स्मरण राहावे यासाठी हा स्मारक उभारला आहे.




महाराष्ट्राचा नकाशा (संदर्भ- डॉ. दास्ताने संतोष, महाराष्ट्र २०१२) ऑक्टोबर, २००९





सातारा जिल्हा (संदर्भ- सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९)




सातारा शहराचा नकाशा

संदर्भ- सातारा नगरपालिका शहर विकास विभाग





सातारा शहर सभोवतालचा १६ कि.मी. परिसराचा नकाशा

संदर्भ- सातारा नगरपालिका शहर विकास विभाग





सातारा शहर व परिसराचा नकाशा

संदर्भ- सातारा नगरपालिका शहर विकास विभाग



सातारा गादीचे संस्थापक छ. शाहू महाराज (१७०८ ते १७४९)


(सातारा अदालतवाडा)



छ.प्रतापसिंह महाराज, (इ.स.१८१८ ते १८३९)
(ग्रँट डफच्या निवासस्थानातील छायाचित्र)



छ. आप्पासाहेब महाराज़ **(इ.स.१८३९ ते १८४८)**
(नवा राजवाडयातील छायाचित्र)



अजिंक्यतारा किल्ला (प्रत्यक्ष कॅमेऱ्यातून टिपलेले छायाचित्र)



सातारा शहर व परिसर (प्रत्यक्ष कॅमेऱ्यातून टिपलेले छायाचित्र)



जुना राजवाडा (प्रत्यक्ष कॅमेऱ्यातून टिपलेले छायाचित्र)




नवा राजवाडा (प्रत्यक्ष कॅमेऱ्यातून टिपलेले छायाचित्र)



अदालतवाडा (प्रत्यक्ष कॅमेऱ्यातून टिपलेले छायाचित्र)



छत्रीचा हौद (प्रत्यक्ष कॅमेऱ्यातून टिपलेले छायाचित्र)




सातारा शहरातून कोल्हापूर व चिपळूण या ठिकाणी जाण्यासाठी इ.स.१८५५ मध्ये ब्रिटिशांनी काढलेला दक्षिणेच्या बाजूस असलेला बोगदा (प्रत्यक्ष कॅमेऱ्यातून टिपलेले छायाचित्र)



छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा राजवाडयापुढील पुतळा (प्रत्यक्ष कॅमेऱ्यातून टिपलेले छायाचित्र)



संगम माहुली येथील शंकर मंदिराचा बाहेरील परिसराची रेखीव रचना (प्रत्यक्ष कॅमेऱ्यातून टिपलेले छायाचित्र)



संगम माहुली येथील कृष्णा नदी व नदीवरील ब्रिटिशकालीन पूल (प्रत्यक्ष कॅमेऱ्यातून टिपलेले छायाचित्र)



संगम माहुलीतील महादेव मंदिरासमोरील दिपमाळ (प्रत्यक्ष कॅमेऱ्यातून टिपलेले छायाचित्र)



संगम माहुलीतील महादेव मंदिरासमोरील नंदीमंडप (प्रत्यक्ष कॅमेऱ्यातून टिपलेले छायाचित्र)




संगम माहुली येथील महादेव मंदिर (प्रत्यक्ष कॅमेऱ्यातून टिपलेले छायाचित्र)





श्री. छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, सातारा (प्रत्यक्ष कॅमेऱ्यातून टिपलेले छायाचित्र)






श्री यवतेश्वर मंदिर

फोडजाई मंदिर





बहुलेश्वर मंदिर

कृष्णेश्वर मंदिर

(प्रत्यक्ष कॅमेऱ्यातून टिपलेली छायाचित्रे)